दिवाळी २०२१
रु. १५०/-



# साहित्य

## बोलीभाषा विशेषांक

मालवणी वाडवळी आगरी झाडी वऱ्हाडी अहिराणी
कोल्हापूरी चंदगडी सांकेतिक पारधी सामवेदी
ठाकरी गोंडी निहाली कातकरी पावरी कोरकू
कोलामी सोलापूरी तंजावरी



मालवणी वाडवळी आगरी झाडी वऱ्हाडी अहिराणी
कोल्हापूरी चंदगडी सांकेतिक पारधी सामवेदी
ठाकरी गोंडी निहाली कातकरी पावरी कोरकू
कोलामी सोलापूरी तंजावरी

# साहित्य

मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक

स्थापना : जानेवारी १९४७

**दिवाळी २०२१**

**संपादक**

नारायण लाळे

**साहाय्यक संपादक**

अशोक बेंडखळे

राजीव जोशी

**प्रकाशक**

उज्ज्वला मेहेंदळे

मुखपृष्ठ : श्रीधर अंभोरे ● आतील मांडणी सजावट : सतीश खानविलकर

मुद्रितशोधन : अनिल दाभाडे

अक्षरजुळणी : ग्रंथाली, छपाई : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई-४०००३१

■ **मूल्य रु. १५०/-**

वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. १२०/- द्विवार्षिक वर्गणी रु. २००/-

■ धनादेश 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावाने असावा.



**व्यवस्थापकीय पत्ता :** मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४. दूरध्वनी : २३८७६१५८, २३८५६३०३

इमेल : sahityasangha@gmail.com & sahityasangh@mtnl.net.in

वेबसाइट : www.mumbaimarathisahityasangh.com

**संपादकीय पत्ता :** १०४, सीतामाई, अयोध्या नगरी, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१. दूरध्वनी : ९९८७९२४१९९

narayanlale@gmail.com



या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे. या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.



**सर्व हक्क प्रकाशकाकडे आहेत.**

# ।। संपादकीय ।।

**‘साहित्य’चा** २०२१चा दिवाळी अंक, ‘महाराष्ट्रातल्या बोलीभाषा’ विशेषांक म्हणून वाचकांसमोर सादर करताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे. ‘मुंबई मराठी साहित्य संघ’ने या दिवाळी अंकाच्या संपादनाची जबाबदारी माझ्यावर सोपवली. या जबाबदारीला मी संधी मानले आणि वाचकांना दर्जेदार अंक देण्याचा आत्मीयतेने प्रयत्न केला आहे. या अंकाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील बोलीभाषांचा ‘मंडप’ उभारणे, सजवणे हे एकट्या-दुकट्याचे काम नाही, याची मला जाणीव होती, पण त्यासाठी सहसंपादक म्हणून आणि कुशल मार्गदर्शक म्हणून मला श्री. अशोक बेंडखळे, तसेच कवीमित्र राजीव जोशी यांची सक्रिय साथ मिळाली. त्यांच्या सहकार्यानेच हा बोलीभाषांचा ‘मंडप’ मी साकारू शकलो.

वीस बोलीभाषांवरील अभ्यासपूर्ण लिहिलेले पंचवीस लेख, बोलीतूनच लिहिलेल्या सोळा कविता, बोलीभाषेतूनच लिहिलेल्या कथा, ललित लेख, बोलीभाषांच्या संबंधित जाणीवपूर्वक दिलेल्या चौकटी, ही या अंकाची समृद्धी आहे, असे म्हणता येईल. भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांचा महत्त्वपूर्ण लेख, महाराष्ट्रातील बोलीभाषांच्या अभ्यासकांनी लिहिलेले लेख, बोलीतूनच कविता लिहिणारे कवी-कवयित्री, ही या अंकाच्या समृद्धीची साधनं आहेत, असे मी म्हणेन. मुखपृष्ठापासून ते अंकाच्या शेवटच्या पानापर्यंत नजर फिरवली तर लक्षात येईल, संपूर्ण अंक बोलीभाषांना महत्त्व देणारा आहे. वाचकांच्या सोयीसाठी आणि खासकरून शहरी वाचकाला बोलीभाषांच्या जवळ नेण्यासाठी बोलीभाषेतील लेखनाखाली शब्दार्थ देण्याचा प्रयोग केला आहे.

या संपादकीय लेखनाच्या निमित्ताने मला, जागतिक स्तरावर पसरलेली कोरोनाची महामारी आणि जागतिक स्तरावरच भाषांवर आणि बोलीभाषांवर आलेली ‘महामारी’ यात कमालीची साम्यता दिसते आहे. कोरोनाची महामारी मृत्यूचे थैमान घालत आपल्या घरापर्यंत आली... भाषांवरची महामारी बोलीभाषांना खिळखिळं करत आपल्या गावापर्यंत, गावातून घरापर्यंत आली आणि घरातल्या बोलींवर, आपल्या मातृभाषेवर तिने हल्ला चढवला. अनेक बोलींना तिने 'and all others' च्या पोत्यात भरून गायब करण्याचा सपाटाच लावला. महाराष्ट्रात जवळपास साठ ते सत्तर भाषा बोलल्या जातात; वीस मराठीशी संबंधित तर इतर भाषांमध्ये भटक्या-विमुक्तांच्या, आदिवासींच्या भाषा आहेत. युनोस्कोच्या लुप्तप्राय होणाऱ्या भाषांच्या यादीत महाराष्ट्रातील निहाली, नायकी व कोरकूचा समावेश आहे. एकूणच बोलीभाषांच्या बदलत्या स्वरूपामुळे त्यातील समृद्ध लोकसाहित्याचा खजिना नष्ट होत आहे. आपल्याकडे आधी डॉ. अशोक केळकर आणि आता डॉ. गणेश देवींसारखे भाषातज्ज्ञ बोलीभाषा वाचवण्यासाठी मार्गदर्शन करताहेत. डॉ. श्रीकृष्ण काकडे, डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांच्यासारखे बोलीभाषाकार्यकर्ते तळमळीने फिल्डवर काम करतायत. भाषेचे डॉक्टर्स आपापल्या जागी भाषांना आणि बोलीभाषांना वाचवण्याचा कसोशीने प्रयत्न करतायत. अशी अनेक तुलनात्मक उदाहरणे देऊन, कोरोनाची महामारी आणि बोलीभाषांवरील ‘कोरोना’ यांच्यातील साम्य सिद्ध करता येईल. परंतु उद्देश तो नसून, कोरोनापासून वाचण्यासाठी आणि बोलीभाषांना वाचवण्यासाठी, **आपण काय करतो?** हा प्रश्न जर आपल्या मनात उमटला, तर ते या बोलीभाषा विशेषांकाचे फलित आहे, असे मी समजेन. WHO प्रमाणे LHO (लँग्वेज हेल्थ ऑर्गनायझेशन) अशी भाषांची काळजी वाहणारी संस्था असावी, असेही मला सुचवावेसे वाटते.

समाजमनाच्या पोटात शिरायचे असेल, तर सर्वात मोठा आधार भाषेचा घ्यावा लागतो. आपण मात्र आज आंधळ्या ‘सुधारणे’च्या मागे लागत बोलीभाषांना अव्हेरण्यात कळत-नकळत हातभार लावत आहोत. बोलीभाषा बोलूनच टिकतील हे जरी खरे असले, तरी बोलीभाषांचे कार्यकर्ते निर्माण होणे तितकेच महत्त्वाचे आहे. गावागावांत डॉक्टर, त्याप्रमाणे गावागावांत बोलीभाषाकार्यकर्त्यांची आज नितांत गरज आहे आणि म्हणूनच, ‘साहित्य’चा दिवाळी अंक साकारताना संपादक या संबोधनापेक्षा, बोलीभाषेचा एक कार्यकर्ता म्हणून नाते जोडणे मला जास्त महत्त्वाचे वाटते.

अंकाची रूपरेषा ठरवताना बोलीभाषाकार्यकर्ते डॉ. श्रीकृष्ण काकडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अंकाच्या निर्मितीत साहित्य संघाचे डॉ. अश्विनी भालेराव, प्रा. उषा तांबे व प्रकाशक म्हणून डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांचे प्रोत्साहन उत्साह देणारे ठरले. चित्रकारमित्र श्रीधर अंभोरे यांचे कलात्मक मुखपृष्ठ, रेखाटने, तसेच चित्रकार सतीश खानविलकर यांनी केलेली मांडणी व सजावट अंकाच्या देखणेपणात भर टाकणारे आहे. साहित्य संघाच्या दीपाली माने, रजिता पारेकर यांचे सहकार्यही महत्त्वाचे आहे. अंकाच्या उत्तम छपाईमध्ये ‘ग्रंथाली’चे सुदेश हिंगलासपूरकर व योगिता मोरे, तसेच बारकाईने मुद्रितशोधन करणारे अनिल दाभाडे यांचा वाटा महत्त्वाचा आहे. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

जाहिरातदार, सर्व वाचक, सर्व लेखक, कवी, कवयित्रींना दीपावलीच्या व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

**संपादक – नारायण लाळे अशोक बेंडखळे राजीव जोशी**

मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक

# साहित्य : दिवाळी २०२१

## ‘महाराष्ट्रातील बोलीभाषा’ विशेषांक

संपादक : नारायण लाळे

## अनुक्रम


- **भाषाविविधतेची मशागत** / ३
  डॉ. गणेश देवी
- **मायेमोगाची माय माझी मालवणी** / ८
  प्रवीण दशरथ बांदेकर
- **मालवणी ललितलेख : आबोलेचो वळेसर** / १५
  रश्मी कशेळकर
- **वाडवळी बोलीभाषेतील सौंदर्यस्थळे** / १९
  डॉ. मधुकर केशव वर्तक
- **वाडवळी कथा : हळदीसे** / २६
  प्रा. स्मिता पाटील
- **आगरी समाजाची लोकसंस्कृती स्वरूप व परंपरा** / ३२
  डॉ. अविनाश पाटील
- **आगरी कथा : आकासदिवा** / ४०
  भानुदास पाटील
- **सामवेदी बोली** / ४६
  डॉ. नरेश नाईक
- **कोल्हापुरी भाषा** / ५३
  डॉ. नंदकुमार मोरे
- **चंदगडी बोली** / ६३
  प्रा. डॉ. गोपाळ ओमाणा गावडे
- **अहिराणी बोली** / ६७
  डॉ. रमेश सीताराम सूर्यवंशी
- **सोलापुरी बोलीची वैशिष्ट्ये** / ७४
  डॉ. राजशेखर शिंदे
- **वऱ्हाडी बोली : काल आज आणि उद्या** / ७७
  डॉ. प्रतिमा इंगोले
- **तंजावरची मराठी बोलीभाषा** / ८१
  निखिल बेल्लारीकर
- **झाडी बोली : अध्यतन, अवलोकने** / ८८
  डॉ. हरिश्चंद्र बोरकर
- **‘न्हांगूळ आदार इला’ सामाजिक वास्तवाचे पारुषी** / ९६
  डॉ. देवानंद सोनटक्के
- **कोलामी भाषेचे स्वरूप व विवेचन** / १०३
  डॉ. श्रीकृष्ण काकडे
- **ठाकरी बोली** / १०७
  मोहन रणसिंग
- **गोंडी बोलीतील वाक्यरचना आणि पदबंध** / ११६
  डॉ. हरिचंद नांगसू नरेटी
- **आदिवासी निहाली भाषेचे स्वरूप** / १२२
  रश्मी जगदीशराव सातफळे
- **आदिम कातकरी लोकांचे राहणीमान व संस्कृती** / १२५
  दत्तात्रय चि. पवार
- **कोरकू बोली** / १३०
  डॉ. काशीनाथ बऱ्हाटे
- **आदिवासी पावरा समाज आणि पावरी बोलीभाषा** / १४३
  संतोष पावरा
- **मराठीच्या सांकेतिक आणि गुप्त बोली** / १४९
  डॉ. अनंता कस्तुरे
- **बोलीभाषेतील कथाविश्व** / १५८
  मनीष पाटील


**कविता**


**मालवणी बोली** – दादा मडकईकर, कल्पना बांदेकर / १६६
**आगरी बोली** – एल.बी. पाटील / १६७
**सामवेदी बोली** – सिसिलिया कार्व्हालो / १६७
संगीता वाझ / १६८
**वाडवळी बोली** – सुहास राऊत / १६९
**कादोडी बोली** – बर्नड लोपीस / १७०
**अहिराणी बोली** – मंदाकिनी पाटील / १७०
**मराठवाडी बोली** – अमृत तेलंग / १७१
**तावडी बोली** – अशोक कौतिक कोळी / १७२
**झाडी बोली** – लोकराम शेंडे / १७३
**चंदगडी बोली** – हणमंत पाटील / १७३
**कोरकू बोली** – रामगोपाल भिलावेकर / १७४
**दखनी बोली** – डी. के. शेख / १७५
**बंजारा बोली** – वीरा राठोड / १७५
**पावरी बोली** – विठ्ठल भंडारी / १७६

**परिचय** / १७८ ते १८१



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# भाषा-विविधतेची मशागत

डॉ. गणेश देवी

**बंगाली, तेलगू आणि मराठीसारख्या महत्त्वाच्या भाषांसंबंधीही चिंता व्यक्त व्हायला सुरुवात झाली आहे. या अचानक निर्माण झालेल्या भाषेवरच्या जागतिक संकटाची संपूर्णपणे चिकित्सा करून, त्याची माहिती, भाषा, रोजच्या जीवनात वापरणाऱ्या भाषा, समुदायांना पोहोचवणे जरुरीचे आहे. म्हणजे, जसे पर्यावरण आणि जीववैविध्य यांच्याबद्दल एक किमान सभानता निर्माण झाली, तशीच सभानता भाषेबद्दलही निर्माण होऊ शकेल.**

**मानवाला** अन्य प्राण्यांपासून वेगळे करण्यामागे भाषा या सामुदायिक प्रक्रियेचा फार मोठ्या प्रमाणात हातभार लागला आहे. किंबहुना, असेही म्हणता येईल की भाषेमुळे माणूस, माणूस बनला. हा सारा इतिहास जवळजवळ ७०,००० वर्षांपासून उत्क्रांत होत आहे. त्याआधी ध्वनिमाध्यमातून सांकेतिक आकाराचे ‘शब्द’ वापरात नव्हते. म्हणजे, ज्याप्रमाणे हवा किंवा पाणी मानवाला नैसर्गिकरीत्या प्राप्त झाले, त्याप्रमाणे भाषा नैसर्गिक नाही. ती, मानवी समाजानी घडवलेली एक सामुदायिक संहिता आहे. मुळात ती ध्वनि स्वरूपात व कालक्रमाने लिखित आणि नंतर मुद्रित स्वरूपात आपल्याला मिळालेली एक वारसागत भेट आहे. संपूर्ण विश्वाचा उगम कशात आहे, हे कोडे मानवी मनाला अजूनही संपूर्णपणे सोडवता आले नसले, तरीही सध्यापुरता, विश्वनिर्मितीचे कारण म्हणून ‘बिग बँग’ सिद्धांत स्वीकारण्यात आला आहे. ‘त्या’ घटनेस साधारणतः १४०० कोटी वर्षे झाली असावीत, असे मानण्यात आले आहे. ज्या सूर्यमालिकेत आपली पृथ्वी आहे, त्या सूर्यमालिकेच्या निर्मितिप्रक्रियेस पूर्णता सुमारे ६०० कोटी वर्षांपूर्वी आली असावी, असे मानण्यात आले आहे. त्यानंतर जीवनिर्मिती. अत्यंत प्राथमिक स्वरूपाच्या जीवनिर्मितीचा काल २५० कोटी वर्षांपूर्वीचा असावा असे या कालमापनात कल्पिले आहे. ह्या साऱ्या प्रचंड आकड्यांत, मनुष्य प्राण्याची निर्मिती सुमारे ५ लाख वर्षांपूर्वीची समजली जाते. ५ लाख वर्षांपूर्वीचा आपला पूर्वज पाठीच्या कण्याच्या साहाय्याने ताठ उभा राहू शकत होता. त्याच्या शरीराची ठेवण जवळपास आपल्यासारखीच होती. ते आपले पूर्वज आणि आपल्यामधला सर्वांत महत्त्वाचा फरक होता तो म्हणजे, सध्याचा मानवप्राणी अभिव्यक्ती व संवाद यासाठी भाषा हे माध्यम वापरतो. ५ लाख वर्षांपूर्वीचे आपले पूर्वज ते माध्यम त्या काळात निर्माण करू शकले नव्हते, करू शकले नसते. प्रारंभीच्या सुमारे २ लाख वर्षांत ते पूर्वज हावभावाच्या साहाय्याने ‘संवाद व अभिव्यक्ती’ दर्शवायचे. आजही बोलताना आपण हातवारे करतो, चेहऱ्यावर भाव व्यक्त करतो, अन्य व्यक्तीला ‘होकार व नकार’ देण्यासाठी मान हलवतो. या साऱ्या सांकेतिक निर्मितीचे श्रेय आपल्या ४ ते ५ लाख वर्षांपूर्वीच्या पूर्वजांना द्यायला हवे. त्या सुरुवातीच्या ‘नाटकी’ संवाद माध्यमाची नंतरची पायरी ‘संगीताच्या ’ माध्यमातून विकसित होत गेली. हुंकार भरणे, आरोळ्या ठोकणे, उसासे टाकणे, छोटे- मोठे स्वर पुनरावर्तित करून भावना व अर्थ व्यक्त करणे, हा प्रकार जवळपास दोन-अडीच लाख वर्षे चालत राहिला. पण त्यातून, ‘स्वर’ हे अभिव्यक्तीचे समर्पक माध्यम बनू शकते, हा विश्वास त्या पूर्वजांना आला. आपल्यासारख्या ‘बोलक्या’ भाषेच्या निर्मितीच्या संदर्भात भाषाशास्त्र व अन्य मानवव्यशास्त्रे यांनी आपल्याआधी ७०,००० वर्षे हा कालावधी स्वीकारला आहे.

संपूर्ण विश्वनिर्मितीच्या प्रदीर्घ प्रक्रियेत सत्तर हजार वर्षे फारसा मोठा कालावधी म्हणता येणार नाही, तथापि आपल्या समकालीन

दृष्टिकोनांतून तो फारच प्रदीर्घ आहे. या पैकी, पहिली चाळीस हजार वर्षे, मौखिक भाषेला वर्तमानकाळवाचकाच्या पलीकडे नेण्यासाठी घालवावा लागला. वर्तमानकाळ-वाचके मात्र, दृष्टीसमोर किंवा 'दृष्टी-साध्य' वास्तव-संदर्भात वावरतात. पण त्यापलीकडे जाण्यासाठी 'भूतकाळ' कल्पावा लागतो. शिवाय, 'भूतकाळाचे प्रतिबिंब' असा 'भविष्यकाळ'ही कल्पावा लागतो. ते तसे, कल्पण्यासाठी, 'भाषा' या सांकेतिक संवादव्यवस्थेला ४०,००० वर्षे खपावे लागले. शेवटी, आपण जिला भाषा म्हणतो ती गेल्या तीस हजार वर्षात माणसाच्या हाती आली.

पण त्यानंतरही भाषेचा प्रवास सुखरूपपणे चालू शकला नाही. भाषांच्या इतिहासाचे विशेषज्ञ सांगतात त्याप्रमाणे साधारणतः दहा हजार वर्षांपूर्वी, जगभरच्या बहुतांश भाषा नाहीशा होऊ लागल्या. 'शिकार व जमेल ते गोळा करणे'- hunting-gathering - ह्यावर आधारित श्रमव्यवस्था व अर्थ व्यवस्था लयाला जाऊ लागल्या, व त्यांच्या जागी शेती आधारित श्रमव्यवस्था व अर्थव्यवस्था येऊ लागल्यावर, त्या आधीच्या भाषा माणसास अपुऱ्या वाटू लागल्या. त्यांच्या जागी अन्य पर्यायी भाषांचा विकास करणे गरजेचे बनले. म्हणजे आज जगभर ज्या भाषा, अभिव्यक्ती व संवादासाठीच्या 'चलनव्यवस्था' आहेत, त्या तशा स्थितीत केवळ गेली दहा हजार वर्षे आहेत. अर्थात अभिव्यक्तीची टेक्नॉलॉजी म्हणून त्यांचे जे अद्भुत गुणधर्म आहेत, त्यांच्या जोरावरच मानवाने उत्क्रांतीच्या मार्गावरचे अनेक दुसाध्य टप्पे पाहतापाहता ओलांडले आहेत. साधारणतः दहा हजार वर्षांपूर्वी भाषांची जी स्थिती झाली होती तशीच पुन्हा एकदा आपल्या काळात होत चालली आहे. सध्या संपूर्ण जगभर लहान-मोठ्या मिळून सुमारे ६००० भाषा बोलल्या जातात. गेल्या दोन दशकांत सगळ्याच देशात भाषांच्या संख्येत नोंदपात्र कमी होते आहे, असे दिसून आले आहे. युनेस्कोची पंधरा वर्षांपूर्वी द वर्ल्ड लांग्वेजीस इन डेंजर अशी यादी बाहेर पडली. त्यात शेकडो भाषा संपूर्णतः मरणासन्न कशा आहेत, याचे वर्णन होते. गणिताच्या साहाय्याने 'मोडेलिंग' करून, त्याचप्रमाणे समाजशास्त्रीय अभ्यास करून, जगातील कोणकोणत्या भाषा नाहीशा होतील, हे सांगण्याचे प्रयत्न होत आहेत. स्वीडनमधील एका प्रयोगशाळेत, युरोपमधल्या ९० भाषांचा अभ्यास केला. तेव्हा त्यातील सत्तरहून अधिक येत्या तीन चार दशकांत निष्प्रभ बनतील, असे अनुमान काढण्यात आले. बहुतेक तर्क व ठोकताळे येत्या तीन-चार दशकात जगातील दोन-तृतीयांश भाषा नष्ट होतील असे दर्शवतात.

बाकीच्या २००० भाषांची स्थितीही फारशी ठीक राहण्याची चिन्हे नाहीत. बऱ्याच प्रमुख भाषांचे 'डोमेन्स'- विशिष्ट व्यवहाराची अंगे-- विकलांग झाले असतील. ही स्थिती का आली, याबद्दलचे बरेच तर्क अस्तित्वात आहेत. भाषांकडे पाहण्याची प्रत्यक्ष त्या त्या भाषिकांची उदासीनतेची दृष्टी, सरकारची चुकीची भाषिक धोरणे, मार्केटचा संस्कृती-भाषा यांवर होणारा परिणाम, इंग्लिश शाळांचा परिणाम, वाढते स्थलांतर, नव्या टेक्नॉलॉजी, वगैरे अनेक कारणे या मुद्याला धरून पुढे करण्यात आली आहेत. ही सारी कारणे तर आहेतच, पण त्याहूनही एक अत्यंत महत्त्वाचे कारण आहे, ज्याचा अजून व्यापक विचार सुरू झालेला नाही. ते कारण असे...

मौखिक भाषा ही निर्मितीप्रक्रिया, संवाद व अभिव्यक्ती व्यवस्थेच्या केंद्रबिंदूस आल्यावर आणि खासकरून त्या निर्मितीमध्ये 'भूतकाळ वाचकीय' संकेत-स्वर स्वीकारले गेल्यानंतर, मानवाच्या मेंदूमध्ये 'स्मृती' संकलनाची समीकरणे बदलत गेली. त्याआधी मात्र शरीरसंवेदनांची स्मृती सांभाळणारा मेंदू, त्यानंतर, म्हणजे गेल्या तीस हजार वर्षांत सांकेतिक स्वरूपात नोंदवल्या गेलेल्या 'भूत-कालीय' अर्थव्यूहांना स्वीकारू लागला. मेंदूत जे कोट्यवधी न्युरॉनस् अर्थविघटनाचे व पुनर्घटनाचे काम करतात, ते त्या कामगिरीदरम्यान मेंदूमध्ये नवीन नवीन अतिसूक्ष्म ट्रॅक्स बनवत राहतात. ते ट्रॅक्स या नव्या सांकेतिक आवाज-आधारित संवादात बदलत राहिले. जेव्हा, माणसाची स्मृती अनेकानेक अनुभवांनी गुंतागुंतीची बनू लागली तेव्हा, इतिहासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात, स्मृती एकत्र करण्याचे काही सामुहिक प्रयोग सुरू झाले. शाळा, विद्यापीठे, म्युझियम्स ही त्यांची अलीकडच्या काळातील प्रगत रूपे आहेत. अशा संस्था निर्माण झाल्यावर, स्मृती जोपासण्याचे सामुहिक प्रयोग जास्त प्रभावशाली व व्यक्तीच्या तुलनेने जास्त 'महत्त्वाचे' बनत गेले. गेल्या काही दशकांत स्मृतीसंग्रह करण्याचे काम माणसाने कृत्रिमरीत्या बनवलेल्या सिलीकॉन चीपकडे सोपवले आहे. साहजिकच, शाळा, विद्यापीठे, म्युझियम्स, वाचनालये यांची जागाही सिलीकॉन चीप झपाट्याने पादाक्रांत करत चालली आहे. गेल्या दोन दशकांत न्युरॉलॉजीच्या अंगाने जे संशोधन झाले त्यातही, मानवी मेंदूत भाषेचे आकलन ज्या डाव्या भागात होते, ते आता थेट 'भाषेखेरीजच्या सांकेतिक आकृत्यांद्वारा' मेंदूच्या समोरच्या हिश्शात - प्री-फ्रंटल लोबमध्ये होत राहण्याची शक्यता अटळ मानली गेली आहे. थोडक्यात, भविष्यातील मनुष्य शब्द-बद्ध व आवाजावर आधारित भाषेपेक्षा, आकृतिबद्ध अन्य सांकेतिक प्रतिकव्यवस्थेवर अवलंबित राहणे पसंत करेल, ही शक्यता वाढत चालली आहे. शब्दबद्ध भाषेत 'भूत', 'वर्तमान', 'भविष्य' या कला-सापेक्षी रचनांनी आत्तापर्यंत मानवी आकलनशक्तीस 'एकाच वेळेस

अनेक-काळी' आकलन करण्यावर घातलेली बंधने व मर्यादा ओलांडून मानवी मन आता अनेक-काल तसेच अनेक स्थळ-संदर्भ-उदाहरणार्थ, अनेक ग्रहांचे सम्यक वास्तव स्वतःच्या आवाक्यात आणण्याचे प्रयत्न करत आहे. उत्क्रांतीच्या सततच्या प्रक्रियेत तसे होणे, हे थांबवणे मानवास ज्ञात असणाऱ्या कोणत्याही शक्तीच्या हातात नसल्याने, ही सततची उत्क्रांती स्वीकारणे, हेच एक शक्य आहे.

वेगळ्या शब्दात सांगायचे, तर आपण सारे इतिहासाच्या एका अशा संक्रमणाच्या बिंदूवर उभे आहोत, जेथे बोलली जाणारी भाषा अस्तास जाऊन 'पाहिली जाणारी' भाषा अस्तित्वात येणार आहे. जगभर बोलल्या जाणाऱ्या भाषांची जी अचानक वाताहत सुरु झाली आहे, त्याचे हे प्रमुख कारण आहे. अन्य सारी दृश्य कारणे, लक्षणे आहेत, मूलकारण नव्हे.

बरेचदा मला असा प्रश्न विचारला जातो, 'भविष्यातली माणसे संपूर्णतः शब्दविहीन असतील काय?' ह्याचे स्पष्ट उत्तर आहे, 'ती तशी नसतील.' ज्याप्रमाणे, या पूर्वीच्या संवाद व्यवस्थेतील हाव-भाव, स्मित, हुंकार, चीत्कार इत्यादी आपल्या शब्द-बद्ध भाषेत टिकून राहिले, त्याच प्रमाणे आपले सध्याचे बरेच प्रमुख शब्दही लाखो वर्षे टिकून राहतील. पण, त्यांची महत्ता बदललेल्या स्वरूपात असेल. या प्रस्थापित व्यवस्थेला संपूर्णतः निकालात न काढता पुढे सरकणाऱ्या उत्क्रांतिप्रक्रियेचा एक महत्त्वाचा उपयोग आहे. तो असा, गेल्या काही लाख वर्षांत मानवाने जमवलेल्या अनुभवाची सारी स्मृती सध्यातरी शब्दमाध्यमात आहे. ती जाणीवपूर्वक आपण या पुढच्या युगांपर्यंत घेऊन जाऊ शकतो. किंबहुना, उत्क्रांतीचा एक संकेत आहे, तो म्हणंजे जर विविधता कमी होत गेली तर उत्क्रांतीची प्रक्रिया शिथिल बनत जाते. जेथे विविधता आहे, तेथे निसर्ग स्वतःचे काम योग्य रीतीने करू शकतो. हा संकेत दर्शवतो की, आज जर आपण भाषिक विविधता जपण्याचे, सांभाळण्याचे पूर्ण प्रयोग केले नाहीत, तर या पुढच्या युगांत आत्तापर्यंत जमवलेले अनुभववैविध्य आपण गमावून बसू. या सर्वावरून निष्कर्ष मात्र एवढाच आहे, आपल्या काळातील भाषावैविध्य जितक्या विविध मार्गांनी आपण उत्क्रांत मेंदूच्या नव्या वाटांवर आणून सोडू, तेवढा मानवी अस्तित्व-सातत्यासाठी मार्ग सुकर बनत जाईल. हे करण्यासाठी विविधता हे तत्त्व जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्वीकारणे निकडीचे बनले आहे. त्यासाठी जैविक विविधता, सांस्कृतिक विविधता, मत-वैविध्य हे सारे एका प्रगतिशील दृष्टिकोनातून स्वीकारणारे समाज, सरकारे, देश, संस्था निर्माण करणे, हे आपले कर्तव्यच बनते. ते केले नाही, त्याऐवजी 'एक-भाषा, एक-विचार, एक-दृष्टी' राखणाऱ्या संस्था, समाज, देश, सरकारे यांना आपण आंधळ्या प्रेमापोटी कवटाळत राहिलो, तर आपण स्वतःच्या हातून मनुष्यजातीचा विनाश ओढवून घेऊ. आजच्या भाषा विविधतेचे दूरगामी परिणाम काय आहेत, ते संपूर्णपणे ओळखूनच आपल्याला पुढचे पाऊल घेणे जरुरीचे आहे.

गेल्या सत्तर हजार वर्षांत भाषा अनेक महत्त्वाच्या स्थित्यंतरातून प्रसार होत होत आज ती जशी आहे त्या स्वरूपात आपल्यापर्यंत येऊन पोहचली आहे. परंतु गेल्या काही दशकांत जगात सर्वत्रच भाषा खचत चालल्या आहेत, असे दिसू लागले आहे. जगभरातल्या अनेक नामवंत भाषाशास्त्र्यांनी या विषयाला धरून चिंता व्यक्त करायला सुरुवात केली आहे. माझ्या पाहण्यात, भाषा खचत असण्याच्या या अनाकलनीय सांस्कृतिक प्रक्रियेच्या अंगाने, पन्नासहून जास्त, महत्त्वाचे ग्रंथ केवळ गेल्या दोन दशकांतच प्रसिद्ध झाल्याचे लक्षात येते आणि केवळ छोट्या छोट्या, लिपी नसणाऱ्या भाषाच नव्हे, तर बंगाली, तेलगू आणि मराठीसारख्या महत्त्वाच्या भाषांसंबंधीही चिंता व्यक्त व्हायला सुरुवात झाली आहे. या अचानक निर्माण झालेल्या भाषेवरच्या जागतिक संकटाची संपूर्णपणे चिकित्सा करून, त्याची माहिती, भाषा, रोजच्या जीवनात वापरणाऱ्या भाषा, समुदायांना पोहोचवणे जरुरीचे आहे. म्हणजे, जसे पर्यावरण आणि जीववैविध्य यांच्याबद्दल एक किमान सभानता निर्माण झाली, तशीच जरुरी सभानता भाषेबद्दलही निर्माण होऊ शकेल. याचे दोन मार्ग आहेत, एक म्हणजे सैद्धांतिक विश्लेषण करणे आणि दुसरा मार्ग म्हणजे प्रत्यक्ष पाहणी करून निष्कर्ष काढणे. अर्थातच ही दोन्ही कामे इतकी सहजासहजी करण्यासारखी सोपी नाहीत आणि ते, तूर्तास तरी महाकठीण आव्हान होऊन बसले आहे.

भारतात इंग्रजी अमलात जनगणनेचा प्रयत्न पहिल्यांदा १८३०मध्ये हेन्री वॉल्टरने केला. तथापि जास्त शिस्तबद्धरीत्या झालेला पहिला प्रयत्न १८६५ ते १८७२ मधला होता. त्यानंतर, भारतासाठी जनगणनेची प्रक्रिया विकसित होत गेली आणि १९३१पर्यंत तिला नक्की स्वरूप प्राप्त झाले. दर दहा वर्षाने करायच्या या प्रक्रियेला, १९४१चे वर्ष, दुसऱ्या महायुद्धामुळे इंग्रज सरकारला आणि १९५१ हे वर्ष, स्वातंत्र्यानंतरच्या सत्तांतराच्या गुंतागुंतीमुळे, स्वतंत्र भारताच्या सरकारला, जनगणनेची प्रक्रिया अधिक विकसित करण्याच्या दृष्टीने अवघड ठरली. त्यामुळे १९६१ची जनगणना, त्यानंतरच्या दशकातील जनगणनांचा तुलनात्मक विचार करताना, बेंचमार्क म्हणून महत्त्वाची ठरते. प्रत्येक जनगणनेत नागरिकांच्या मातृभाषाविषयक माहितीचा समावेश

होत असतो. १९६१च्या सेन्ससमध्ये मातृभाषांची संख्या १६५२ दाखवली गेली होती. त्यानंतरच्या जनगणनेत मात्र यापैकी बऱ्याच भाषांची नावे गायब होत राहिली. १९७१च्या मोजदादीमध्ये ती थेट १०९ झाली. त्यापैकी १०८ होती, भाषांची नावे आणि १०९वे 'ऑल अदर्स' (अन्य साऱ्या भाषा). माझ्यासाठी हा मोठाच धक्का होता.

जनगणनेची इतर बरीच आकडेवारी त्या त्या दशकाच्या सुरुवातीच्या वर्षात जाहीर होते; पण भाषांची आकडेवारी जवळजवळ ५-६ वर्षांनंतर नागरिकांसाठी प्रकाशित करण्यात येते. १९७८ला जेव्हा आर. सी. निगम या सेंसस अधिकाऱ्यांची, भाषांच्या आकडेवारीवरची पुस्तिका प्रकाशित झाली, तेव्हा माझ्यापुढे प्रश्न पडला की, या नाहीशा झालेल्या भाषा एका दशकातच कशा बेपत्ता झाल्या? येथे एक स्पष्ट करणे जरूर आहे की, १९७०च्या दशकात भाषेच्या प्रश्नावरच, त्याआधीचा पूर्व पाकिस्तान, पाकिस्तानातून फुटून निघून बांगलादेश बनला होता. स्वाभाविकच भारतात भाषामुद्यावर देशाच्या एकता आणि अखंडतेला धक्का लागू नये, यासाठी संवेदनशीलता कमालीची वाढली होती. त्याआधी १९५०च्या दशकात, भाषावार प्रांतरचनेच्या पार्श्वभूमीवर पंजाब, तेलंगणा, तामिळनाडू, कर्नाटक आणि महाराष्ट्र या (सध्याच्या) राज्यांत उग्र आंदोलने झाली होती. आसाममधून मेघालयसारखी नवी राज्ये बनवावी लागली होती. काश्मीर, मिझोराम आणि नागालँड यांचे प्रश्न डोके वर काढत होते. त्याच्या आठवणी १९७०च्या दशकात अजून ताज्या होत्या. त्यामुळे, सरकारने ज्या भाषा बोलणाऱ्यांची संख्या १०,००० पेक्षा कमी आहे, त्यांची नावे सेन्सस रिपोर्टमधून गाळण्याचा निर्णय घेतला होता. हा १०,०००चा आकडा कोणत्याही भाषिक अथवा शास्त्रीय निकषावर ठरवला नव्हता. एखादी भाषा 'भाषा' होण्यासाठी ती बोलणारे, समजणारे किमान दोघेजण असतील, तरीही ती 'भाषा' असू शकते. तथापि या कट-ऑफ आकड्यामुळे, १९६१ सालच्या १६५२ मातृभाषा, १९७१च्या सेन्सस आकडेवारीत १०८ करून दाखवल्या होत्या. किमान तसे सेन्सस अधिकाऱ्यांकडून सांगितले गेले होते.

ही पद्धत १९८१, १९९१, २००१च्या भाषिक जनगणनेत राबवली गेली. अर्थात वेगळी राज्यांची मागणी येणे यामुळे सर्वस्वी थांबले नाही, आणि भाषिक अस्मितेतून उद्भवणारे तंटे सुरूच राहिले. त्या तंट्यांना सामोरे जात, संविधानाच्या आठव्या परिशिष्टात कोंकणी, डोग्री, बोडो, संताली, मैथिली वगैरे भाषांची नावे सामील करण्यात आली. सध्या त्या परिशिष्टात २२ भाषांचा समावेश आहे आणि सुमारे ३५ अन्य भाषांचे समावेशासाठीचे गृहखात्याकडे वेळोवेळी आलेले क्लेम्स विचाराधीन आहेत. थोडक्यात, सेन्ससचे आकडे दडपल्यामुळे भाषिक अस्मितेचा मुद्दा जनमानसातून हटला नाही, हे वास्तव आहे. वास्तविक भाषिक अस्मितेला समजून घेऊन बहुभाषिकतेला आपल्या लोकतांत्रिक संघराज्याचे भूषण बनवणे योग्य झाले असते. ते तसे झाले नाही. त्याचे मूलगामी परिणाम भारतीय अस्मितेवर काय झाले, याचा भविष्यात कधीकाळी इतिहास लिहिला गेला तर या दहा-हजारी भाषागणती विषयी बरेच काही लिहिले जाईल, हे निश्चित. एकंदरीत २००१च्या भाषिक आकडेवारीत आठव्या परिशिष्टातील २२ भाषा आणि ९९ इतर भाषा अशी आकडेवारी देण्यात आली. २०११च्या जनगणनेच्या वेळेस, एक नवे भाषिक आंदोलन उभे राहिले होते. जवळपास ३००० व्यक्तींच्या साहाय्याने पीपल्स लिंग्विस्टिक सर्व्हे, म्हणजे भाषांचे जन-सर्वेक्षण सुरू झाले होते. त्यात ८५० भाषा आजही देशात जिवंत आहेत, हे समोर आले होते. मला या जन-आंदोलनाच्या वतीने, त्या वेळच्या मानव संशोधन मंत्र्यांनी बोलावून, त्या सर्व्हेची विस्तृत माहिती समजून घेतली होती आणि त्यावेळच्या सेन्सस अधिकाऱ्यांना सूचना देऊन, या सर्व्हेची दखल घेण्याची सूचना केली होती.

२०११च्या जनगणनेत झालेल्या भाषिक सेन्ससची आकडेवारी नेहमीपेक्षा फार उशिरा, म्हणजे जून २०१८ला प्रकाशित झाली. त्यात बरेच आकडेवारीचे इंजिनीरिंग करण्यात आले आहे, हेही स्पष्ट होते. उदाहरणार्थ, हिंदी भाषा फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे, असे दाखवले गेले होते. १९७१च्या आकडेवारीत, देशाच्या एकूण ५२ कोटी ८२ लाख लोकसंख्येत २० कोटी २८ लाख असलेली हिंदी भाषिकांची संख्या २०११च्या जनगणनेत, १२१ कोटी ८ लाख, पैकी ५२ कोटी ८३ लाखांची मातृभाषा हिंदी आहे, असे नमूद केले होते. दर दहा वर्षात १९७१पासून झालेली हिंदीची वाढ, एकूण लोकसंख्येपैकी ७१ला ३६.९९ टक्के, १९८१ला ३८.७४, १९९१ला ३९.२९, २००१ला ४१.०३ आणि २०११ला ४३.६३ टक्के, म्हणजे १९७१च्या एकूण संख्येच्या अडीचपटीहून जास्त दाखवली गेली होती. हे आकडे स्थलांतरित होणाऱ्या लोकांच्या आकडेवारीशी ताडून पाहिल्यास त्यात सेन्ससने केलेल्या ॲडजेस्टमेन्टचा अंदाज येऊ शकेल. याच्या तुलनेने मराठी भाषा बोलणारे देशाच्या एकूण संख्येत १९७१ला ७.६२ टक्के; १९८१ला ७.४३; १९९१ला ७.४५ला २००१ला ६.९९ आणि २०११ला ६.८६; तामिळ भाषिक १९७१ ला ६.८८ आणि २०११ला ५.७० टक्के; आणि उर्दू बोलणारे १९७१ला ५.२२ आणि

२०११ला ४.१९ टक्के दाखवले गेलेत. देशातल्या अनेक भाषा संख्येने खाली चालल्यात, मात्र हिंदी सतत मोठी होत चालली आहे हे दाखवण्याचे सेन्ससवरचे दडपण का आहे, ते वेगळे सांगण्याची गरज नसावी. तथापि, भारतीय भाषांच्या आकडेवारीच्या या गल्लतीत देशाच्या संघराज्यात्मक रचनेची स्थिती कशी भरकटते आहे, हे लक्षात घेणे खूपच महत्त्वाचे आहे. हिंदी बोलणाऱ्यांची संख्या एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी, भाषाशास्त्राचे बहुतेक सारे प्रस्थापित नियम धाब्यावर बसवून त्यात 'पोटभाषा' सदराखाली, २०११च्या आकडेवारीत, ज्या त्रेपन्न 'भाषां'चा समावेश करण्यात आला त्यातील काही आहेत : उत्तर प्रदेशची अवधी–(बोलणाऱ्यांची संख्या ३८,५०,९०६); राजस्थानची राजस्थानी (२,३४,२२७); स्थलांतरित होत राहणाऱ्या बंजारांची बंजारी (१५,८१,२७१); हिमालयातील मेंढपाळांची गड्डी (१,८१,०६९); बिहारमधली भोजपुरी (५,०५,७९,४४७) ; बंगालमधली बिष्णोई (१२,०७९); मध्यप्रदेशातील बुंदेली (५६,२६,३५६); छत्तीसगढची छत्तीसगडी (१,६२,४५,१९०); झारखंडची खोरटा (८०,३८,७३५); उत्तराखंडची कुमाऊंनी (२०,८१,०५७); महाराष्ट्राची पावरी (३,२५,७७२). मी ही काही नावे दिली आहेत. त्या सगळ्या त्रेपन्न भाषा बोलणाऱ्यांची लोकसंख्या हिंदीच्या संपूर्ण संख्येतून बाद केली तर मात्र हिंदी बोलणाऱ्यांची संख्या थेट ३२ कोटी २२ लाखावर येते, म्हणजे देशाच्या संपूर्ण लोकसंख्येच्या २५ टक्के किंवा काही प्रमाणात कमी. हिंदी भाषेचा, राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा आधार शोधणाऱ्यांसाठी हे सोयीचे असणार नाही. पण, या सगळ्या आकडे-इंजिनीअरिंगसाठी इतर हजारो भाषांना स्वतःचा बळी कसा द्यावा लागतो, हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

जनगणनेत प्रत्येक नागरिकाला मातृभाषेविषयी माहिती विचारण्यात येते. नागरिकांनी दिलेली त्यांच्या त्यांच्या मातृभाषांची एकूण नावे, २०११ सेन्ससमध्ये १९,५६९ जमली होती. याना सेन्सस 'रॉ रिटर्न्स' म्हणतात. यात अनेक चुका असू शकतात. तथापि त्या सगळ्या चुका गाळून नंतर ज्या मातृभाषांची नावे शिल्लक ठेवण्यात आली, ती होती १३६९ (आणि शिवाय १४७४ पोटभाषांची नावे.). त्यानंतर, पूर्वपरंपरेने वापरलेल्या दहाहजारी हिशोबाने त्यातील केवळ १२१ भाषा 'भाषा' म्हणून जाहीर करण्यात आल्या. म्हणजे, दहाहजारपेक्षाही कितीतरी जास्त संख्या असूनही (१३६९ वजा १२१) १२४८ भाषांचे स्वतंत्र अस्तित्व नाकारण्यात आले. आपल्यापैकी कितीतरीजण म्हणतील, 'तर मग त्यात काय आकाश कोसळले? त्याचे सोपे उत्तर आहे की, १९६१च्या १६५२पैकी २०११मध्ये– त्याच पद्धतीने – १३६९ मातृभाषा अजून अस्तित्वात आहेत, याचा अर्थ गेल्या ५० वर्षांत २८३ मातृभाषा मरण पावल्या. या भाषांना त्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करून अजून थोडे जास्त आयुष्य देता आले असते. हिंदी वाढते आहे हे दाखवण्यासाठी भाषिक अल्पसंख्यांकांच्या भाषा मारून टाकणे, हा एकच मार्ग आपल्यापुढे असेल, तर अजून पाचसहा दशकांनी, सगळ्या लहानलहान भाषा नाहीशा झाल्यानंतर मराठी, उर्दू, तामिळ यांचीही त्यांच्यासारखीच स्थिती होऊ शकते. तसे होणे म्हणजे भारताचे संघराज्य स्वरूप मिटवणे आणि हजारो वर्षांच्या भाषिक हेरिटेजची वाट लावणे असेल. अंदमानमधील बोआ भाषा ४५००० वर्षे जुनी होती. ती गेल्या दहा वर्षांत लुप्त झाली आहे. आपल्याच महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यात बोलली जाणारी निहाली किमान १२ हजार वर्षांपासूनच्या परंपरेची आहे. तीही लवकरच गेलेली असेल. २०२१ पुन्हा एकदा सेन्सस होतोय, पुन्हा एकदा भारतातील भाषिक विविधतेला गुंडाळून ठेऊन आकडेवारी तयार करण्यात येणार आहे. भाषा बोलणारा प्राणी म्हणून त्याप्रति आपली काही जबाबदारी नाही का? की आपल्या टीव्ही, सहली, अमेझॉन-खरेदी, सेल्फिज यात मश्गूल राहून हा फोनोसाईड पाहत राहायचं? भाषा ही कम्युनिकेशन व्यवस्था घडवायला, माणूस (होमो सॅपीएन) प्राण्याला किमान पाच लाख तीस हजार वर्षे परिश्रम घ्यायला लागले होते. गेली सत्तर हजार वर्षे ती व्यवस्था आपण वापरतोय. मानवाने विकसित केलेली प्रत्येक भाषा एक अद्भुत किमया आहे. त्या टिकवण्याचे आपले उत्तरदायित्व २०२१ सालात विशेष महत्त्वाचे बनते. त्या दिशेने 'साहित्य'च्या या विशेषांकासाठीचा विषय लक्षणीय ठरतो. कोकणातल्या मालवणीसारख्या दीर्घ भूतकाळाची भाषा, उत्तर महाराष्ट्रातील पावरीसारखी आदिवासींची भाषा, भटक्या-विमुक्तांच्या, त्यांच्यावरील होत राहणाऱ्या जुलुमामुळे केवळ सांकेतिक स्वरूपात बोलाव्या लागणाऱ्या 'गुप्तभाषा', मराठीच्या कितीतरी प्रादेशिक छटांच्या पोटभाषा, अशा अनेक विषयांवर अभ्यासपूर्ण लेख लिहून घेणे, त्याचे संकलन या अंकासाठी करणे, हे महत्त्वाचे आहे. हे पुनःश्च सांगण्याची गरज नसावी. भाषा, मग ती कोणतीही असो, जिवंत ठेवणे आजच्या घडीला एक वैश्विक परिप्रेक्षातील जबाबदारी बनली आहे. मग ती भाषा आपली असो वा इतरांची. भाषा जगल्या तरच आपण माणूस म्हणून अस्तित्व टिकवू शकू, अन्यथा मेमरी चिपच्या हुकमतीखालची वेगळ्या प्रकारची जनावरे म्हणून आपले जीवन असेल.

**– डॉ. गणेश देवी**

**बोलीभाषा विशेषांक**

## लेख

# मायेमोगाची माय माझी मालवणी...

**प्रवीण दशरथ बांदेकर**

**मराठीची एक बोली, एवढ्यापुरताच मालवणी शब्दाचा अर्थ स्तिमित नाही, तर त्याही पलीकडे दक्षिण कोकणातील गोमंतक राज्यापर्यंत लोकांच्या रोजच्या जगण्यात, चलन-वलनात पिढ्यान् पिढ्या रुजलेली संस्कृती आहे. लोकसंस्कृती बोलीभाषेतून व्यक्त होते, तशीच मुलखातील खाण्यापिण्यातून, सणउत्सवातून, देवदेवस्कीतून, लोककलांतूनही प्रकटत असते. नमुनेदार शब्द, चपखल म्हणी, वाक्प्रचार, लयबद्ध लोकगीते आणि हुमाणी यांनी मालवणी बोलीला समृद्धता दिली आहे.**

### प्रसंग एक

(दोन मालवणी बायकांमधील संवाद)

स्थळः बाबल्या परबाचं घर.

''रे बाबल्या, मेल्या खंय गेलं रे? सकाळीच मायझयो दोस्तादारांवांगडा गजाली मारत बसलो आस्तलो खंय तरी चव्हाट्यार...''

''गे बाबल्याच्या आवशी, काय झालां सक्काळी सक्काळीच? खेकां अशी करवादत ऱ्हवलंस? खंय गेलो तुजो झिल?'' शेजारच्या सावतीनीने चौकशी केली.

''गो बाये तुकां तरी आता काय माज्या कर्माचे दशा सांगू? एरंडासारो वाडलो हा मेलो पण घरात काडीची म्हणान् मदत नाय. आता गेलो आस्तोलो खंय तरी झोळूक. अरदो मिरग सरान गेलो आनी परबीनीच्या झिलान उतव केलो म्हणान् लोक आता तोंडात श्यान घालतले माज्या...''

''खरां आसा माझे आवशी. या हालीच्या पोरांचा खरेपन नाय. आपण मेल्याशिवाय स्वर्ग नाय दिसाचो. आपला आपल्याकच बगूक व्हयां. जातंय बाय, नाय तं गजालीन खाल्यान् घोव नि फुरश्यान खाल्यान् बायल असली गत व्हयत. कामां काय माजो बापूस येवचो नाय करूक...''

या संवादांमधून दिसणारे चित्र हे साधारणतः मालवणी मुलखातील कुठल्याही एखाद्या गावातील प्रातिनिधिक चित्र म्हणता येईल. मालवणी ही मराठीची एक बोली, एवढ्यापुरताच मालवणी या शब्दाचा अर्थ सीमित नाही. तर त्याही पलीकडे ही दक्षिण कोकणातील देवगड-कणकवली-कुडाळ-मालवणपासून ते पार गोमंतक राज्याला खेटून असलेल्या वेंगुर्ले-सावंतवाडी-दोडामार्गपर्यंतच्या गावांतील लोकांच्या रोजच्या जगण्यात, चलन-वलनात पिढ्यान् पिढ्या रुजलेली संस्कृती आहे. ही लोकसंस्कृती जशी वैशिष्ट्यपूर्ण बोलीभाषेतून व्यक्त होते, तशीच ती या मुलखातील खाण्यापिण्यातून, सणउत्सवातून, देवदेवस्कीतून, लोककलांतूनही प्रकटत असते. मालवणी लोकसंस्कृतीची सगळी वैशिष्ट्ये मालवणी बोलीमधून अत्यंत सक्षमपणे व्यक्त होताना दिसून येतात. मालवणी माणसांची स्वभाववैशिष्ट्ये असोत की इथल्या बारापाचाच्या प्राचीन देवस्थान संस्कृतीचं वेगळेपण दाखवणारी गाऱ्हाणी, दशावतारासारख्या लोककलेतल्या संकासूराची बडबड असो की अबोली-सुरंगीचे वळेसर केसांत माळून कांकणासारख्या किणकिणाऱ्या मालवणी बायकांची बोलणी असोत, मालवणी भाषेतले नमुनेदार शब्द, चपखल म्हणी आणि वाक्प्रचार, लयबद्ध लोकगीते आणि हुमाणी या सगळ्याच भाषेशी जोडलेल्या घटकांनी मालवणी बोलीची समृद्धता जगाला दाखवून दिली आहे. या

मालवणी बोलीला जाणून घेणं म्हणजे निव्वळ व्याकरणाचे बारकावे नि तपशील शिकणं नव्हे. ते भाषाशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी करावं, विद्यापीठातल्या विद्वानांनी करावं. तुमच्यामाझ्यासारख्या सर्वसामान्य माणसांसाठी मालवणी जाणून घेणं म्हणजे मालवणीचा गाभा असलेली लयदार शब्दसंपत्ती जाणून घेणं, या शब्दसंचिताचं बोट पकडून तिच्या अंगाखांद्यावर पिढ्यान् पिढ्यांपासून खेळणाऱ्या लोकगीतांच्या अंतरंगात शिरणं, तिच्या अंगप्रत्यंग खुलवणाऱ्या म्हणी वा वाक्प्रचारांसारख्या अलंकारांचं सौंदर्य न्याहाळणं, या साऱ्यातून प्रकटणारं या मायमालवणीचं रूपडं मनात साठवणं. बोलीवरच्या प्रेमाखातर हे इतकं तर आपण नक्कीच करू शकतो ना!

जगातील कुठलीही भाषा पाहिली तरी तिच्या अनेकानेक बोलीभाषा असतात हे लक्षात येईल. बोली या जणू मूळच्या प्रमाण भाषेच्या जीवनवाहिन्या असतात. बोली संपत गेल्या की हळूहळू ती भाषाही आक्रसत जाते, हे भाषेच्या अभ्यासकांनीच सप्रमाण दाखवून दिलं आहे. कुठलीही भाषा ज्या एखाद्या विशिष्ट भूप्रदेशात बोलली जाते, तिथेही तिथला भौगोलिक परिसर, निसर्ग, हवामान, व्यवसायप्राबल्य, संस्कृतीविशेष, अन्य सीमावर्ती भाषांशी येणारा संपर्क, शैक्षणिक परिस्थिती अशा काही घटकांमुळे ती भाषा बोलणाऱ्या लोकसमूहांमध्ये आपसूकच काही फरक पडत जातात. हे फरक शब्दांच्या उच्चारणापासून ते पूर्णपणे वेगळ्याच शब्दांच्या वापरापर्यंत आणि व्याकरणातील सूक्ष्म वा ढोबळ बदलापासून ते अगदीच वेगळ्या वाटणाऱ्या व्याकरणरचनेपर्यंत कशाही स्वरूपाचे असू शकतात. या बदलांचे स्वरूप कालपरत्वे हळूहळू ठळक होत होत, त्या त्या विशिष्ट भाषिकसमूहाच्या वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये काही पोटभाषा निर्माण होऊ लागतात. या पोटभाषांमधूनच त्या त्या मुख्य भाषेची बोलीरूपे तयार झालेली दिसतात. काही वेळा या बोलीरूपांमधूनच एखादी स्वतंत्र नवी भाषाही निर्माण झालेली दिसून येते. गोव्यात बोलली जाणारी गोवन कोकणी भाषा ही याचे चांगले उदाहरण म्हणता येईल. मुळात ही भाषादेखील मालवणीप्रमाणे मराठी भाषेची बोली म्हणून अस्तित्वात होती, हे दाखवता येते.

एकूणच कुठल्याही मूळ भाषेच्या अशा अनेक बोली असू शकतात. या बोलींमधूनच मूळ भाषेला सामर्थ्य प्राप्त होत असते. बारकाईने पाहिले तर अनेकदा एकाच कुटुंबात वावरणाऱ्या माणसांच्या भाषेतही त्या भाषेची अनेक बोलीरूपे दिसून येऊ शकतात. ही बोलीरूपे शिक्षण, व्यवसाय, प्रवास, वाचन, लोकसंपर्क, वय, लिंग, अन्य भाषिकांशी येणारे संपर्क अशा अनेक गोष्टींमुळे व्यक्तिपरत्वे वेगवेगळी झाली असल्याचे दाखवता येईल. मालवणी बोली प्रामुख्याने दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात बोलली जाते. ही भाषा बोलणाऱ्या व्यक्तींमध्येही समुद्रकिनारपट्टी–वरची गावे, डोंगराळ भागातली गावे, मुख्य रस्त्यावरची गावे, शहरवजा गावे, मुख्य रस्ते व शहरांपासून अलग पडलेली गावे, वेगवेगळे जातसमूह, साक्षर–निरक्षर, स्त्री–पुरुष, अशा घटकांनुसार फरक पडल्याचे जाणवून येते. उदा. 'इकडे कुठे' हे वाक्य हय खंय, हडे खडे, हकडे खडे, हुंय खुंय, हुंयसर खुंय, हडेन खडे, हिंगा खंय, हांगासर खुंय, अशा वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळ्या लोकांकडून बोलले जाते. बोलण्यातील हा फरक या घटकांमुळेच पडलेला जाणवतो.

बहुजन व अन्य बहुजनेतर जातिनिहाय 'इलो– आयलो' असे काही ठरावीक शब्दांतील बोलीभेद आढळून येतात. म्हणी व वाक्प्रचार यांचा वापरही गेल्या काही पिढ्यांतील खेड्यांतील निरक्षर स्त्रियांकडून जास्त प्रमाणात होताना दिसून येईल. साक्षरतेच्या वाढत्या प्रमाणाबरोबर बोलीची रूपेही अधिकाधिक प्रमाणभाषेला जवळ जाणारी बनत आहेत असेही एक निरीक्षणाला येते. उदा. 'जेवलास काय रे?' हे वाक्य 'जेयलंस काय रे' असं न बोलता 'जेवलंस काय रे' असं बोललं जाणं. या ठिकाणी जेयणे या मालवणी बोलीतील क्रियापदाऐवजी मूळ मराठीतील जेवणे हेच क्रियापद वापरून त्याचे जेवलंस हे मालवणी बोलीरूप बनवलेले दिसते. शहरी भागातील, नव्या पिढीतील किंवा शिकलेल्यांकडून अशी अनेक बदललेली रूपे वापरात आलेली दिसतील. (उदा. ठेयलंस– ठेवलंस, सांगल्यान– सांगितल्यान् इ.)

कुठल्याही अन्य बोलीबाबत असतात तसे मालवणीविषयीही अनेकांचे गैरसमज आहेत. बोलीची गोडी आणि महत्त्व न जाणणाऱ्या काही पांढरपेशांनीच ते पसरवले आहेत किंवा पसरायला हातभार लावले आहेत. पहिला सगळ्यात मोठा गैरसमज म्हणजे सिंधुदुर्गात बोलली जाणारी मालवणी म्हणजेच कोकणी भाषा. अनेक जण कोकणात बोलली जाणारी भाषा म्हणून कोकणी भाषा असेच तिला म्हणत असतात. पण मालवणी ही मराठीच्या अन्य बोलींप्रमाणे एक बोली असून ती सिंधुदुर्ग या कोकणातील फक्त एकाच जिल्ह्यात बोलली जाते, शिवाय कोकणी म्हणजे गोव्यात बोलली जाणारी स्वतंत्र राज्यभाषा आहे, हे समजून घेण्यात अनेक जण गल्लत करतात. अगदी

एम.फील, पीएच.डी. झालेले मराठी भाषा आणि साहित्य शिकवणारे अनेक प्राध्यापकही हेच समजून चालत असतात. मालवणीप्रमाणे कोकणातील अन्य भागांमध्ये वेगवेगळ्या बोली बोलल्या जातात. त्यामध्ये संगमेश्वरी, चिपळुणी, बाणकोटी, आगरी, मांगेली, सामवेदी अशा काही बोलींचा उल्लेख करता येईल. मालवणीचे बरेचसे साम्य गोव्यात बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेशी आहे. अनेक शब्द, व्याकरणिक रूपे याबाबतीत हे शब्द दाखवता येतात. पण मालवणी म्हणजे कोकणी भाषा नव्हे, ती फक्त कोकणातील मराठीची एक बोली आहे, एवढे समजून घ्यायला हवे.

मालवणी म्हणजे केवळ शिव्या नि गाळींची गावंढळांची भाषा हाही असाच एक गैरसमज. 'वस्त्रहरण' या मालवणी बोलीच्या लोकप्रियतेनंतर रंगभूमीवर आलेल्या काही नाटकांनी, विशेषतः या गैरसमजाला हातभार लावला असे म्हणता येईल. पण शिव्या तर सगळ्याच बोलीभाषांत असतात. या शिव्यांच्या मागील समाजशास्त्र लक्षात घेतलं तर अनेक शिव्या या शिव्या राहतच नाहीत. एकापेक्षा एक इरसाल शिव्या, म्हणी आणि वाक्प्रचार हा तर मालवणी बोलीचा अविभाज्य भाग आहे. मालवणी माणसांच्या गप्पा-गजाली अशा शिव्या नि म्हणींमुळेच तर अधिक खुलत असाव्यात. एखादा बहुमूल्य खजिना असावा तसा आजवरच्या कैक पिढ्यांनी हा सांस्कृतिक खजिना आस्थेनं नि आपुलकीनं जपला आहे; पुढच्या पिढ्यांपर्यंत संक्रमितही केला आहे. साधारणतः राग, तिरस्कार, द्वेष, मत्सर, निराशा अशा काही नकारात्मक भावना अधिक तीव्रपणे व्यक्त करण्याच्या हेतूने आपल्या बोलण्याला अधिक धार यावी म्हणून कुठल्याही भाषेत शिव्यांचा वापर केला जातो.

पण जगाच्या पाठीवर मालवणी ही अशी एक बोली भाषा आहे की ज्यामध्ये प्रेम, लोभ, माया, वात्सल्य, मित्रत्व, सात्त्विक संताप अशा भावनांच्या आविष्कारासाठी शिव्यांचा वापर केला जाताना दिसतो. त्यामुळेच अगदी सुरुवातीला दिलेल्या उदाहरणातल्याप्रमाणे एखाद्या आईने आपल्या मुलाला 'रे मायझया' म्हणून बोलावलं तरी त्यात कुणाला गैर वाटत नाही. कुठल्याही बोलीचा स्वभावही ती बोलणाऱ्या माणसांच्या स्वभावातूनच घडत गेलेला असतो. मालवणी माणसांचा इरसालपणा, तोंडफाटकी वृत्ती या भाषेत अगदी ठासून भरली असल्याचं दिसून येईल. अलीकडेच काही दिवसांपूर्वी वॉट्सॲपवरून मालवणी मुलखाचा संदर्भ असलेला एक विनोद सर्वत्र फिरत होता. त्यात शिक्षिकेनं विचारलेल्या 'ताजमहाल कुठे आहे' या प्रश्नाचं उत्तर विद्यार्थ्याने बरोबर देऊनही त्याला चूक म्हणून सांगण्यात आलं होतं. त्यामुळे जाब विचारायला गेलेल्या पालकांना मालवणी संस्कृतीत मुरलेले हेडमास्तर उत्तर देतात, 'बरोबर आसां आमच्या मास्तरीन बाईंचा. जोपर्यंत तुमी तुमच्या झिलाची उरलेली फी भरनास नाय, तोपर्यंत ताजमहाल आग्र्यात नाय, सावंतवाडीतच ऱ्हंवतलो...'

हा हजरजबाबीपणा, ही इरसाल वृत्ती मालवणी माणसांच्या रक्तातच भरलेली असावी. याला जोड मिळाली आहे ती तिरफळं नि मालवणी मसाला घालून बनवलेल्या तिखट-आंबट चवीच्या बांगड्याच्या तिखल्यासारख्या झणझणीत मालवणी बोलीभाषेची. मालवणी माणसाच्या स्वभावाचे सगळे गुण-अवगुण या बोलीमध्ये उतरले आहेत. मालवणी मुलूख निसर्गसौंदर्याने नटलेला, सदाबहार, चैतन्यमय; तरीही इथली भूमी खडकाळ, डोंगराळ, फारशी सुपीक नसलेली. इथली माणसं बुद्धिमान; तरीही अंधश्रद्धाळू, देवभोळी. कितीही जीवाला जीव देणारा भेटला तरीही त्याच्या हेतूविषयी संशय घेऊन त्याचीच मापं काढणारी. श्रीमंती आली तरी सतत पिरंगत राहून आपली मूळची कद्रू वृत्ती सहसा न सोडणारी. नेमकं हेच सगळं मालवणी बोलीभाषेचं वैभव म्हणता येईल अशा म्हणी व वाक्प्रचारांमधून, शिव्या नि गजालींमधून व्यक्त होताना दिसून येतं. पण हे इतक्या सहजतेनं आणि आंतरिक गोडव्यानिशी आलेलं असतं की, कुणालाच त्यात काही चुकीचं आहे, अप्रस्तुत आहे असं मनातही येत नाही. रोजच्या जगण्यातील कितीतरी छोट्या-मोठ्या प्रसंगांमधून या भाषेचा नि त्यांतून प्रकटणाऱ्या संस्कृतीचा गोडवा आपल्यासमोर उलगडत जाताना दिसतो.

*आराड गे बेडके सांज जाव्दे, शेतातली आये घरां येव्दे...*
*झापात कोकू काकारतां, चिनभिन् बगून कलकलतां*
*गोठ्यात वासरू हंबारतां, तुकां भितुरसां बोलायतां*
*झाळ्केतलों पाको उडान्दे, शेतातली आये घरां येव्दे...*

शेतातली कामं करायला गेलेली आई तिन्हिसांज झाल्याशिवाय घरी परतणार नाही, हे माहीत असलेली मालवणी मुलखातली मुलं आईची वाट बघत उंबरठ्यावर बसून हे गाणं म्हणत असतात. पिढ्यान् पिढ्यांपासून या परिसरात लोकप्रिय असलेली अशी कितीतरी लोकगीतं या मुलखातल्या बोलीची सांस्कृतिक श्रीमंती दाखवून देतात. पारंपरिक फुगड्यांच्या, विविध सण, उत्सव वा विधीच्या प्रसंगी स्त्रियांकडून म्हटली जाणारी गाणी, श्रमपरिहार करण्यासाठी म्हटली जाणारी गाणी यांमध्येही मालवणी

बोलीचे अनोखे सौंदर्य जाणवून येते. उदाहरणार्थ, वनदेवीची आळवणी करण्याचा 'धालो' नावाचा एक विधी इथल्या स्त्रिया साजरा करतात. त्या प्रसंगी म्हणायच्या गीतांपैकी हे एक पाहता येईल –

*आमची वन्देवी भली गे, मांडार खेळाक इली गे*
*हसत खेळत येशी गे, मांड सोबव्न घेशीत गे*
*वन्देवी आये बेगिना ये फुगडी घाल गे फू... फू... फू...*

शिमग्याच्या दिवसांत होळीसमोर पुरुष टिपऱ्यांसारखे खेळ खेळताना काही पारंपरिक गाणी म्हणतात. त्यातही मालवणी बोलीचे विशेष दिसून येतात. या वेळी एकमेकांची छेडाछेडी काढताना गाण्यांतूनच काही मासलेवाईक टोमणेही मारले जातात. उदा.

*सायल्याची काटी कशी तळापता*
*बायलेक घोव कसो वळाकता...*

मालवणी मुलखात लोकप्रिय असलेल्या दशावतार या लोकनाट्यामध्ये संकासूराचे एक पात्र असते. इथल्या बहुजनांच्या जीवनजाणिवांचे प्रतिनिधित्व करणारे असे हे पात्र आहे. अभिजनांच्या सणपरंपरा, देवता यांची थट्टा करणाऱ्या या संकासुराच्या तोंडी मालवणी बोलीतील संवाद असतात. गणपतीची तो करत असलेली आरतीही मालवणी बोलीतील आणि प्रमाणमराठीतील पारंपरिक आरतीपेक्षा वेगळी अशी आहे. मालवणी भाषेची सगळी वैशिष्ट्ये या आरतीमध्ये कशी सामावली आहेत ते पाहता येईल. संकासूर गणपतीला उद्देशून म्हणतो –

*बटबट्या डोळ्यांचो, फटफट्या कानांचो,*
*ह्यो बग सोंडयाळो*
*आव्स किनयाळी, बापूस जटयाळो*
*झिल ह्यो पोटयाळो*
*वरसून दिसतां बरो, वरसून दिसतां बरो*
*खायलो हुळहुळो...*

दशावतारातील संकासूर आणि सूत्रधार ब्राह्मण यांच्यातील संवादही बहुजन आणि अभिजन यांच्या भाषेतील, जगण्यातील, विचारांतील आणि संस्कृतीतील फरक दाखवून देण्यास सक्षम असेच आहेत. मालवणी बोली आणि लोकसंस्कृतीमध्ये रस असलेल्या अभ्यासकांनी ते मुळातूनच पाहण्यासारखे आहेत. संकासुरासारख्या कष्टकऱ्यांची वहिवाट असलेल्या डोंगररानांतून देवादिकांनी यज्ञकर्मे आरंभल्याने त्यांना तिकडे जाण्यास मज्जाव केला जातो, त्यांची उपासमार होऊ लागते. म्हणून चिडलेल्या संकासुराने तपाचरण करणाऱ्या ब्रह्मदेवाची वेदविद्या चोरून नेली. यावर संतापलेल्या ब्रह्मदेवाने त्याला नष्ट करण्यासाठी त्याच्यावर ब्रह्मास्त्र सोडले. या अनुषंगाने संकासूर व सूत्रधार यांच्यातील संवाद पाहता येईल.

संकासूर : नायकानुं, त्या मेल्या ब्रह्मदेवान् माजो जीव हैराण करून टाकल्यानहां.

सूत्रधार : अरे, तो तर जगद्पिता! अवघ्या सृष्टीचा पालनकर्ता. तो कशाला निष्कारण तुझ्यामागे लागेल?

संकासूर : कसलो जगद्पिता? कोणाचो पालनकर्तो? खंयच्या काळातले गजाली सांगतास ह्ये? जो तो आपली तुंबडी भरूक बघता आजकाल. दुधीनबाय पसारली नि आदले दुण इसारली, असी गत झालीहां.

सूत्रधार : अरे! अरे!! अरे!!! प्रत्यक्ष परमेश्वराबद्दल अविश्वास? ज्याने हे जग निर्माण केले, ज्याने तूस आणि मजदेखील जन्मास घातले, त्याच्याबद्दल असे अपशब्द? नरकात जाशील रे मेल्या, नरकात!

संकासूर : कसलो नरक आणि कसलां काय? आमकां सगळा सारक्याच. जन्माक घातलेल्यांकाच आमी नको झालंव तर आनी काय बोलायचां?

मालवणी मुलखातील अशा पारंपरिक लोककला व लोकगीतांप्रमाणेच मौखिक परंपरेतून आलेल्या असंख्य अर्थवाही म्हणी मालवणी बोलीला समृद्ध करणारा महत्त्वाचा ठेवा आहे. या म्हणी लोकजीवनातील रांगडेपणा, खुलेपणा, बेधडक मोकळीढाकळी वृत्ती यांचे जसे दर्शन घडवतात, तसेच त्या मालवणी मुलखातील माणसाच्या स्वभावाच्या विविध कंगोऱ्यांचे, त्यांच्या मानसिकतेचे व वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचेही मनोवेधक दर्शन घडवतात. या म्हणींच्या अर्थामागील सूचकता, लाक्षणिकता, तसेच संदर्भवैविध्यता यांसारख्या भाषाविशेषांमुळे या म्हणी मनात ठसून राहतात. त्यातील मार्मिकता, हजरजबाबीपणा, विसंगतीचे दिग्दर्शन, श्लीलअश्लील अशा गोष्टींना अवास्तव महत्त्व न देणे यांसारख्या घटकांमुळेही त्या विसरता येत नाहीत. उदाहरणादाखल काही म्हणी पाहता येतील.

आगासला ता मागासला, पाठसून इला तां गुरवार ऱ्हंवलां. (एखादा आपल्या कर्माने वा नशिबाने मागे पडतो आणि मागचे त्याच्या पुढे निघून जातात. अशा वेळी त्याला हिणवताना उपहासाने ही म्हण वापरली जाते.)

गावात लगीन आनी कुतऱ्याक बोवाळ. (ज्याच्याशी आपला काहीच संबंध नाही अशा गोष्टीत एखाद्या माणसाची निरर्थक आणि हास्यास्पद लुडबूड सुरू असेल तर मालवणी माणसे ही म्हण वापरून त्याची खिल्ली उडवतात.)

इतभर तवंसा, हातभर बी. (वितभर काकडीची हातभर लांब बी. एखाद्याच्या अतिशयोक्तीपूर्ण बोलण्याची थट्टा करताना उपहासाने ही म्हण वापरली जाते.)

कावळ्याक केलो सुबेदार, त्याना हगान नासयलो दरबार. (लायकी नसलेल्या माणसाच्या हातात कारभार सोपवला की तो त्याचा सत्यानाश करतो, हे सांगण्यासाठी ही मार्मिक म्हण वापरली जाते.)

घोवान म्हटल्यान् रांड तर जग म्हणतां सांड. (आपणच आपल्या माणसांना जाहीरपणे दोष देऊ लागलो तर बाकीचे लोक त्याचा फायदा घ्यायला टपलेले असतात, हे दाखवणारी म्हण.)

मोठे कुले तेका जग भुले. (भपकेबाजपणाला दुनिया भुलते या गोष्टीची जाणीव करून देणारी म्हण.)

गजालीन् खाल्लो नि फुरश्यान् खाल्ल्यान् बाईल (फालतू गप्पांमध्ये वेळ वाया घालवल्यामुळे होणारे नुकसान. कोकणी माणूस प्रत्यक्ष कृतिशील असण्यापेक्षा बऱ्याचदा मोठेपणाच्या बाता मारण्यात रमलेला असतो, अशा माणसांची ही प्रवृत्ती या म्हणीमधून चपखलपणे व्यक्त झाली आहे.)

यांसारख्या असंख्य म्हणी आजही या मुलखातील बायाबापड्यांपासून ते अगदी नव्या पिढीच्याही तोंडी असल्याचे दिसून येईल. अर्थात, अलीकडे काळाबरोबर बदलत जाताना मालवणीनेही नवे शब्द, नवी परिभाषा आत्मसात केली आहे. एखाद्या परबीनीची कॉलेजात जाणारी पोरगी रागारागाने शेजारच्या गावड्यांच्या पोराला सुनावते, ''परत माका मिस्कॉल मारलं तर बघ, नाय तुका आयुष्यात्सून डीलिट केलंय तर बापाशीचा नाव नाय सांगायचंय...'' खरं तर, काळासोबत चालत असल्यामुळेच मालवणी आजही शिळी वाटत नाही. दोडामार्ग किंवा बांद्यासारख्या एखाद्या खेडेगावातल्या नव्वदीतल्या आजीबाईपासून ते मुंबईसारख्या महानगरातल्या भांडूप किंवा जोगेश्वरीमधल्या एखाद्या चाळीत राहणाऱ्या मध्यमवयीन मालवणी स्त्रीपर्यंत सगळ्यांनीच या बोलीतील जिवंतपणा, प्रवाहीपणा आपापल्या जगण्याची जोड देत जपला आहे.

रोजच्या जगण्यातील कितीतरी छोट्या-मोठ्या प्रसंगांमधून या भाषेचा नि त्यांतून प्रकटणाऱ्या संस्कृतीचा गोडवा आपल्यासमोर उलगडत जाताना दिसतो. या अनुषंगाने अलीकडचा एक अनुभव सांगावासा वाटतो. खूप दिवसांनी सहकुटुंब गावी गेलो होतो. महामारी थोडी आटोक्यात आल्यावर सामाजिक व्यवहारांवरचे निर्बंध थोडे सैल केले गेले. त्यामुळे गावी येणं शक्य झालं होतं. नदी ओलांडून गावात पाय ठेवल्या ठेवल्या गावातले लोक आमच्याकडे बारकाईनं निरखून बघतायत असं लक्षात आलं. खूप दिवसांनी येतोय त्यामुळे असेल किंवा चेहऱ्यावरच्या मुस्क्यामुळे चट्कन ओळखता येत नसल्याने असेल, असं मनात येत होतं. इतक्यातच घराशेजारची भागीरथी सावतीण आमच्याकडे बघत म्हणाली, ''अगे बाये माज्या! तुमी लोक अगदी कडक कोरोना पाळतांस् वाट्टां. हंय गावात काय नाय तितक्या. आमी नाय कोन पाळनंव... म्हंतत तसां, आपल्याक घेना नाय देना तर खेंका होया सोनां? खरां ना?''

मला एकदम हसायला आलं. किती सहजपणे तिने 'कोरोना पाळणे' हा शब्दप्रयोग केला होता. मनात आलं, हा थेटपणा, ही नैसर्गिक उत्स्फूर्तता हेच मालवणी बोलीचं वैशिष्ट्य असावं. हीच तर कुठल्याही बोलीभाषेची गंमत आहे. इथं कोंबड्या पाळल्या जातात आणि श्रावणही पाळला जातो. अगदी तस्साच इथं कोरोनाही 'पाळला' जातो. शिवाय ज्या निरागसपणे ती हे बोलत होती, ते बोलता बोलताच किती सहजतेने तिने मालवणी मुलखात प्रचलित असलेली एक चपखल म्हणही वापरली होती. त्यातही किती सहजभाव होता.

मला वाटतं, हा सहजभाव, ही नैसर्गिकता मालवणी मुलखातील माणसांच्या जगण्याचाच एक स्थायिभाव आहे. तो ओढूनताणून आणलेला नाही. तो या मातीचाच गुण आहे. मालवणी माणसाकडे आतबाहेर काही नसतं. तो परिणामांची फारशी फिकीर न करता बेधडकपणे मनात असेल ते बोलून जातो. या मालवणी मातीचे हे वैशिष्ट्य मालवणी बोलीतही पुरेपूर उतरलं असावं. त्यामुळेच मालवणी बोलीमध्ये एक प्रकारचा खुला रांगडेपणा आहे. 'काय रे मायझयां, उशीर कसो झालों? खंय श्यान खाव्क गेल्लंस इत्को वगत? आता ह्यां काम कोन तुझ्या आवशीचो घोव पुरां करतलों?' असं एखादी आई आपल्या मुलाला प्रेमाने रागावून विचारू शकते आणि यातल्या शिव्या मालवणी बोली नि संस्कृतीशी परिचित नसलेल्या माणसांखेरीज कुणालाही फारशा खटकत नाहीत.

बोलीतले अनेक शब्द काळाच्या ओघात प्रमाणभाषेनेही स्वीकारलेले दिसतात. मालवणीतले घोव, बाईल, वळेसर, बुडकुला, मिरग, शबय, कुकारा, खोप, आयदान, वाडवन, भगुने असे अनेक शब्द प्रमाणभाषेत गेलेले आहेत. मालवणीतले काही शब्द अगदी ज्ञानेश्वरीसह इतर अनेक

संतसाहित्यातही आढळून येतात. उदा. बावडी (विहीर), मुरकूट (मच्छर), लवण (मीठ), ढवळा (पांढरा), वाडवण (केरसुणी), उंडी(घास) असे काही शब्द दाखवता येतील. हे शब्द मुळात संस्कृतसारख्या भाषेतून अपभ्रंश होऊन मालवणीसारख्या बोलीमध्ये आलेले असू शकतात. सुणो (श्वान), राजू (रज्जू), वळेसर (वलयांकित सर) अशी काही उदाहरणे यासंदर्भात पाहता येतील.

मौखिक परंपरेप्रमाणे आधुनिक मराठी साहित्यालाही मालवणी बोलीने लक्षणीय योगदान दिले आहे. मालवणी बोलीमध्ये 'भगवद्‌गीता' अनुवादित करणारे अ. ब. वालावलकर, *ठेव झिला घराची आठव रे, पाच तरी रुपये पाठव रे...* किंवा *चल गो चेडवा पाडावात्सून आगबोटीत जपान...* अशा मालवणी कविता लिहून मालवणी कवितेचा श्रीगणेशा करणारे वि. कृ. नेरुरकर, किंवा साठसत्तरच्या दशकात मालवणी बोलीचा वापर कथा, कादंबऱ्या, नाटकांमध्ये करणारे आ. ना. पेडणेकर, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, चंद्रकांत खोत, नारायण पेडणेकर, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, चिं. त्र्यं. खानोलकर, प्र. श्री. नेरुरकर, दिवाकर कांबळी, वसंत सावंत, मनोहर कदम, प्रभाकर भोगले, लुई फर्नांडिस, हरिहर आठलेकर, ना. शि. परब यांच्यासारखे साहित्यिक लक्षणीय आहेत. संपूर्ण बोलीमध्ये लिहिलेल्या मालवणी नाटकांचा, काही कवितांचा अपवाद वगळता पूर्ण संहितेसाठी मालवणीचा वापर फार कमी लेखकांनी केलेला आहे. कथा, कादंबऱ्यांमधून निवेदनाऐवजी प्रामुख्याने संवादांसाठी मालवणीचा वापर केलेला जाणवतो.

'आ. ना. पेडणेकरांच्या शेलूक' किंवा रेडग्रीन' यांसारख्या कथासंग्रहांतील कथांचे उदाहरण प्रातिनिधिक अर्थाने पाहता येईल. मालवणच्या किनारपट्टीवरील भंडारी, मच्छीमार यांच्या जगण्याचे संघर्ष या कथांच्या आस्थेचे विषय होतात. ह्या माणसांच्या तोंडची रसरशीत मालवणी भाषा पडणेकरांनी या कथांमधून जिवंत केली आहे. साठोत्तर दशकाच्या पिढीतील लघुअनियतकालिकांच्या चळवळीला 'अबकडई'च्या अंकांद्वारे मौलिक योगदान देणाऱ्या चंद्रकांत खोतांनी 'मर्तिक'सारखा मालवणीतील कवितासंग्रह प्रकाशित करून आपले वेगळेपण आणि या बोलीचे सामर्थ्य दाखवून दिले आहे. *मी माज्या तोंडार शिरा पडलेलो, कापो फनस खावचो तसां सपान,* यांसारख्या त्यांच्या कविता लक्षणीय आहेत. खोतांप्रमाणेच नारायण पेडणेकर यांनीही 'फुरसा' हा मालवणी कवितासंग्रह प्रकाशित केला आहे. अगदी विंदा करंदीकरांसारख्या मराठीला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणाऱ्या कवीनेही इथलं लोकजीवन, संस्कृतिविशेष आणि माणसांची स्वभाववैशिष्ट्ये टिपणाऱ्या काही अप्रतिम मालवणी रचना केल्या आहेत. करंदीकरांनी आपल्या लघुनिबंधांमध्येही आवश्यकतेनुसार मालवणी बोलीचा वापर केला आहे.

काही नव्या पिढीतील महेश केळुसकर, दादा मडकईकर, नामदेव गवळी, रश्मी कशेळकर, बाळकृष्ण लळीत, वैभव साटम वगैरे अनेक साहित्यिक मालवणीचा अर्थपूर्ण वापर त्यांच्या लेखनामध्ये करीत आहेत. *मी पाव्स तू पाव्स, पाव्स भरान् इलो, सुक्या मनार पानापानांर पाव्स पडान् गेलो...* यांसारख्या अप्रतिम गेयरचना करणारे दादा मडकईकर, *हत्ती इले, हत्ती इले, हत्ती इले, हत्तींनी गावागावाचे सातबारा आपल्या नावार् केले* यांसारख्या बदलत्या कोकणचे वर्तमान वास्तव मांडणाऱ्या कविता लिहिणारे नामदेव गवळी किंवा मालवणी लोकसंस्कृतीचे बारकावे आपल्या ललित गद्यामधून मांडणाऱ्या रश्मी कशेळकर यांनी मालवणी बोलीला नव्या पिढीशी जोडून घेण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. आधीच्या पिढीतील बहुतांश लेखक हे काही एका उच्च जातप्रवर्गातून आलेले होते. याउलट अलीकडे लिहू लागलेल्यांमध्ये अठरापगड जातीचे, वेगवेगळ्या व्यवसायांशी संबंधित असलेले लेखक दिसू लागले आहेत. त्यामुळे या लोकांनी वापरलेली मालवणी बोली ही अधिक जीवनसन्मुख, रसरशीत व त्या त्या पोटसंस्कृतीची वैशिष्ट्ये घेऊन आलेली अशीच आहे. या दृष्टीने रश्मी कशेळकर, नामदेव गवळी, मोहन कुंभार, वैभव साटम, रुजारिओ पिंटो, सई लळित, कल्पना मलये, कल्पना बांदेकर यांचे लेखन पाहता येईल. या लेखनामधून मालवणी बोली व संस्कृतीचे आजच्या वर्तमानामधील बदललेले रूपही अभ्यासता येऊ शकते.

अकालीच गेलेल्या मनोहर कदम या गुणी कथाकाराने त्याच्या 'शबय' या कथासंग्रहात वर्तमान कवेत घेणारी बदलत्या मालवणी कुटुंबव्यवस्थेतली भाषा कशी वापरली आहे हे पाहता येऊ शकेल. या संग्रहातील एका कथेतील चाकरमानी मुलाला त्याची आई म्हणते, ''तुज्या नोकरेनच सगळो घात केल्यान्. पाच वर्सां झाली तरी बायलेक न्हेवसां वाटनां नाय? रे, तिनां काय निस्त्यो गवऱ्ये थापूसाटी लगीन केल्यान्? लोकांचे चाकरमानी येतत, म्हैनो म्हैनो ऱ्हंवतत, तेंका धाकटी व्हतंत. तिच्या जीवाक् काय वाटत असात? रे, नखायेदा असल्यापास्नां तेकां बगतंय मी,

तुज्यासाटी निस्तो जीव तुटायचो तेचो... घरात बापयो मानुस नाय... मी रांडमुंड म्हून तशेच दिस काढले नि हिना... तू धडधाकट घोव जितो असताना अशेच दिवस काडायचे काय रे?'' जयवंत दळवी, चिं. त्र्यं. खानोलकर, मधु मंगेश कर्णिक, आ. ना. पेडणेकर, मनोहर कदम यांचा हा भाषिक वारसा 'चाळेगत'सारख्या बदलत्या कोकणचे राजकीय व सामाजिक दृष्टिकोनातून चित्रण करणाऱ्या कादंबरीमधून पुढे चालवण्याचा मी प्रयत्न केला आहे, असे म्हणू शकतो.

'आरते ये, पण आपडां नको', अशीही एक नमुनेदार म्हण मालवणीत आहे. तिचा सरळ अर्थ जवळ यायला हरकत नाही, पण शिवू नकोस, स्पर्श करू नकोस, असा होतो. तरीही त्यामधून अनेक गोष्टी सुचवल्या गेल्या आहेत हेही जाणवून येईल. मला ही म्हण मालवणी माणसाच्या स्वभावावरचं नि एकूणच मालवणी संस्कृतीवरचं एक प्रकारचं भाष्य वाटतं. मालवणी भाषाही अशीच आहे. ती तुम्हाला जवळ येऊ देते, पण आपल्या पोटात दडवलेली गुपितं मात्र ती सहजासहजी तुम्हाला उलगडवून दाखवत नाही. त्यासाठी ती किंमत चुकवायला लावते, तुमची कठोर परीक्षा पाहते. सुप्रसिद्ध लेखक जयवंत दळवींनी एक निरीक्षण सांगितलं होतं, ''जन्मानं मालवणी असलेला माणूस कधी 'मासे' नाही म्हणत, 'तो 'माशें' म्हणतो, आईला प्रेमानं 'ग्ये आये' म्हणून हाक मारतो.'' तुम्ही किती अस्सल मालवणी आहात, मालवणी बोली आणि संस्कृतीत किती खोलवर मुरलेले आहात हे तुमच्या अशा साध्या साध्या शब्दांच्या उच्चारणावरूनही समजून घेता येऊ शकतं. नुसतं मालवणी असण्याचं सोंग आणून मालवणी होता येत नाही, हे अगदी खरं आहे.

मालवणी भाषेतील नाटकांनी मराठी रंगभूमीवर एक काळ गाजवला. मालवणीची पार्श्वभूमी असलेल्या टीव्ही मालिकाही लोकप्रिय ठरल्या. साहित्यातूनही या बोलीची दर दहापंधरा मैलांवर बदलणारी रूपं अनुभवायला मिळत आहेत. मौखिक परंपरेतली लोकगीते, स्त्रीगीते, हुमाणी, हमवणी, धाले, गाऱ्हाणी, फुगड्या गीते, चतुर्थीची भजने यांमधून मालवणी संस्कृती जपली गेली आहे. दशावतारासारख्या इथल्या पारंपरिक लोकनाट्यातील संकासुरासारखे पात्रही मालवणीतून प्रेक्षकांशी गजाली मारते. इथला शेतीव्यवसाय संपत चालला, घरोघरच्या शिकलेल्या लेकीसुना नोकरीनिमित्ताने घराबाहेर पडू लागल्या, सगळंच बदललं, तरी पण आमच्या मालवणी मुलखातली आजीबाई आजही आपल्या नातवाला खेळवताना पिढ्यान् पिढ्यांपासून चालत आलेलं बडबडगीत गाताना म्हणते, *वाडी सुंदर, वेंगुर्ला बंदर, शिरोडा शिटूक गो... दर्यान् केल्यान चेटूक गो...*

आज जगभरातच अनेक बोली झपाट्याने नष्ट होऊ लागल्या आहेत. बोली म्हणजे खरंतर प्रमाणभाषेच्या जीवनवाहिन्या. बोली संपल्या की भाषाही मरते. भाषा मेली की संस्कृती लोप पावते. संस्कृती संपली की तो समाजही नष्ट व्हायला वेळ लागत नाही. म्हणूनच वाटतं, माझ्या मायबोली मालवणीने आजवर जपलेलं हे संचित यापुढेही कायम राहायला हवं असेल तर आयेची ही बोली बोलण्यातून, लिहिण्यातून, व्यवहारातून आपणच पुढे नेली पाहिजे. म्हणूनच जाता जाता या मायेमोगाच्या मालवणीच्या रक्षणासाठी गाऱ्हाणं घालताना म्हणेन –

बा देवा रवळनाथा म्हापुर्सा, तू बारापाचाचो आकार, या भूमीचो पिढ्यान् पिढ्यांचो राखनदार तर देवा म्हाआराजा, आज ही अठरा पगड मालवणी मुलखातली पिलगी तुज्यासमोर इलेली आसत, तेंका तुजो आशीर्वाद दे, त्येंच्या आवशीबापाशीच्या मुखातली मालवणी भाषा जित्ती ऱ्हवांदे म्हणान् ती बोलाचालाची त्येंका बुद्धी दे, त्येच्यासाठी त्येंका कोनाची लाज वाटांदे नको... या मुलखावरची सगळी संकटां, इडापिडा जी काय आसात, ती पायाबुडी घालून त्येंचा रक्शन कर रे देवा म्हाआराजा...

**– प्रवीण दशरथ बांदेकर**

भाषा ही काहीतरी ग्रांथिक, एकाच वर्गाच्या बोलण्यासाठी व उच्च कोटीची, शुद्ध स्वरूपाची वस्तू नसून समाजातल्या सर्व क्षेत्रांत, सर्व थरांत प्रत्येकजण आपल्या आईपासून शिकतो तीच खरी भाषा असते व ती आत्माविष्काराला पूर्णपणे समर्थ असते.

**'टीकास्वयंवर' – रा.रा. भालचंद्र नेमाडे**

बोलीभाषा विशेषांक

## मालवणी ललित लेख

# आबोलेचो वळेसर

**रश्मी कशेळकर**

**ललित लेखांच्या प्रकारात बोली भाषेतील ललित लेख विरळच. भुईरिंगण आणि भुयपर्मळ या मराठीतील महत्त्वाच्या ललित लेख संग्रहाच्या लेखिका रश्मी कशेळकर यांनी मालवणी बोलीतूनच ललित लेख लिहिण्याचा अनोखा प्रयोग केलेला आहे. ललित लेखनाची स्वतःची शैली असलेल्या कशेळकरांच्या लेखात मालवणी, कुडाळी बोली सहजतेने सामावलेल्या आहेत.**

**खळ्याच्या** पेळेवर आबोली फुलल्ली हां ना? तां घर माईचा. अशी आमच्या गावात त्या घराची वळक व्हती. आमच्या वाडीतला भरडावरचा तां घर, म्हणजे शेवटचा. माईच्या परसवात समुद्राची वाळू शिरलंली होती. तेंची माडाची बाग सोपली की फन्यारड्याची वय नि मगे समुद्र. त्येंच्या पाटच्या पडवेत बसल्यार बुडणारो सूर्य दिसा. या वाडीच्या वांगडाक् गाज होती. तिच्याशिवाय या वाडीचो वावर होवचो नाय. अशा या वाडीत प्रत्येकाच्या खळ्या-पेळेर,वय - दांड्याक् आबोली होती. पण माईच्या परसावत आबोलीचे पाच-सहा ओळये होते. अगदी नजार पोचत नव्हती. कामट्यांच्या आधारान् उबी ऱ्हवलंली; तांबड्या केसरांनी सळसळणारी ती अबोली बगल्यावर आंगावर आनंदाचो काटो फुलां.

आमच्या वाडीत शिरल्यार् एकाद्या नवख्यान् चौकशी केल्यांन् की, अबोलेचे पातये व्होये व्होते. तर साकरी आंब्याबुडच्या भटाच्या घरातली, रस्त्यान् कोण येतां-जांता ह्या किचमिच डोळ्यांनी बगीत ऱ्हवणारी म्हातारी एकाद्या नकावड्या पोराक् हाक मारी नि त्येकां भरडावर न्हेवन सोडूक् लावी.




''माई... गे माई..'' रस्त्यातल्या बेड्यातनां तां प्वॉर साद घाली.

कुरळ्या केसांची, ठेंगणी, आडव्या बांध्याची माई दारातनांच इचारी, ''काय गो व्हया?''

तो कोण तो खळ्यात येवन् उबो ऱ्हवलो की ती चौकशी करी. कोणतरी लय लांबसून आबोलेचे पातये आणि वळेसर सांगाक् इलंलो आसां. घरात कोणाचा तरी लगीन ठरलंला आसां.

''थांबा बसा चाय घेवा.'' ती सांगी.

ओटीवर बसलंलो तो माणूस माजघरात कान लावन बसां.

''गो हळू बोलां. भायर कोणतरी इलां हा.'' तरीपण

समुद्राकडेची ती बायमाणसां हळू बोलांन् बोलतंली किती?

भायर बसलंल्याच्या कानावर सगळा आपसूक पडा.

''काय गो? सुन् ल्याच्या बायकोक् इतक्या लवकर दिवस कशे गेले? पैला पोरग्या ल्हान आंसा नाय गो?'' पायाच्या अंगठ्याक् केळीच्या सोपाची वली गाठ अडकवलंली पालकरीण बोलली.

''होय. कॉपर टी बसवन् घितल्यान् व्हती. पण काय झालां काय म्हायत.'' कोपऱ्यातनं आवाज इलो. ही शालग्याची आवस. कलाबूत कापून दुर्वासारी जुडी करून ठेवचा काम तिचा.

''कॉपर टी भंगली. तिचा काय खरां नाय. पाळी इली नाय तं ताबडतोब डाक्टराकडे जायचा नाय? हेरशी हगल्या-पादल्याक् डाक्टराक् पैसो घालतंत. तो कुत्रो बाळगलंलो हा. खयच्या बाय जातीचो; त्येची किंमत किती नि निगा करूक् डाक्टर किती?'' अलक्याची आवस पातयेत घालूची हिरवी बकरीची पानां नीट-वाट करी होती.

''होय. ही अक्कल ह्येच्या घोवाक् नको? आपल्या बायकोकडे लक्श नको?'' अलक्यान् केळीच्या सोपाचे उबे धागे काडूक घितल्यान् .

''पुर्शांका काय! त्येंका काय निस्तरूचां लागतांहा. ह्या आपल्याक् बायमाणसांक् कळाक् व्हया. आज जावयां उद्या जावयां करीत ऱ्हवलां असतंला. हेरशी बाजाराक् काय नाय काय हाडूक् जातां ना? देवळात जावचा असलां तं पेशल रिक्शाशिवाय भायर जावचा नाय. स्वोताक् डाक्टर व्हयो तं जावचां.'' साळसकर काकी दोन-दोन फुलां उचलून सटसट पाती वळां होती.

''आता काय करतांहा कोणाक् म्हायत. सोनोग्राफी करीत. झीलगो आसलो तं ठेवित. माका जरा फुलां दी गे.'' परडीभर फुलां पालकरणीच्या फुड्यात इली.

''तुजा फास्ट काम असां. ही तिसरी ना?''

त्या आबोलेच्या ढीगाभोवती बसलंली ही बायमाणसां छाटण्यो मारता मारता पातये वळं होती.

एका कोपऱ्यात वळेसर वोवणारे हात वेगळ्याच विषयात खिं खिं खूं खूं करी होते. आबोलेचे मोतयासारे देठ भायर दिसतीत असे वळेसर तयार होयत होते. बायकांच्या आंबाड्यावर पाती म्हंजे वेणये नि पोरींका हे वळेसर म्हंजे गजरे.

खुसूरफुसूर चल्लंली.

''गो खऱ्यानी काय? तो तुका कदी भेटलंलो?''

''काय बोल्लो? डायरेक् इचारल्यांन्?''

''सांग मं गो..''

''तो मनिषा वांगडा फिरां होतो. त्येचा काय झाला?'

''भांडणा झाली? बघ हां, नाय तं दोनवल्या दगडावर पाय ठेवित. त्येंका काय ! ह्या माझ्या वांगडान् हां नि तां हां. असां निस्ता भापाक् मिळाला तं व्हया असतां. आपलो जीव जडलंलो आस्ता.''

''आदी मनषाक् इचार. तू नको, मी इचारतंय. कळंला. शायनिंग मारत फिराचा सोप्या हां. नै काय गो?''

''चलांत मी काय बोल्लंय नाय. तो लायन् मारतांहा तां माका कळलंला होता. घरात कळतां नये. नायतं भाई त्येकां ठेवचो नाय.''

''काय लिवल्यान् हां चिटयेत बगुया तरी..''

सुरेखाच्या हातातलो वळेसर अदिकच लालम् लाल झालो नि चेऱ्यावर त्येचो रंग चढलो.

दुपारचा जेवाण-खावाण, भांडी-कुंडी आटपान् माईकडे इलंली ही बायमाणसां पातये वळूक् बसलंली होती. सकाळचा कॉलेज आटपान् इलंले पोरी वळेसर ओवत होते.

माई आत इली ती पाचएकशे येणयांची आर्डर घेवन. त्यात हार नि गुच्छपण करूचे होते.

ह्यो लग्नाचो सीझन म्हंजे ह्या फुलांच्या जीवावर पैसो मिळवण्याचे दिवस. या गिमाच्या महिन्यात आबोलेचो भर म्हंजे फुलां काडणाऱ्यांचे कमरो ढीले होतीत असो. केसरांन् केसार फुल्लंला आसतां.

सकाळचा कॉलेज सुटलां की चारपाच पोरगी माईकडे हजर व्हायची. टोपल्यो घितलांनी की लागली फुलां काडूक. चायच्या मळ्यात पाना खुटणाऱ्यांच्या पाठीर टोपली असतां तशी ह्येंका व्हयी होती म्हंजे दोनवले हात फुलात गुंतले आसते. तरी छाटण्यो मारता मारता माजघरात फुलांचो डोंगर व्हायचो. तवसर पातये वळणारी हजर झाली.

साधारण तीनचार वाजातागत पातये तयार झाले की ते विकूक् पोरां भायर पडत. तेतूरले बरचशे सांगीचे असत. या गावच्या बंदरार, माशांचो लिलाव चलतां त्या भाटयेवर, मासळी बाजारात हे वेणये इकूक् जाणारे झिलगे नि चेडवा होती. तरीपण यातल्या प्रत्येकाचा गिऱ्हायक् ठरलंला होता. ह्यो गाबतिणी कितीव् घाय गडबडीत असल्यो तरी आबोलेच्या येणयेशिवाय माशे इकूक् जावचेच नाय, ह्या ठरलंला.

लाडग्या गाबतिणीक् चारचार फुलांची,जादा कलाबूत, हिरई बकरी घातलंली भरगच्च येणी लागतां. नाय तं तां पैसे देवचा नाय. राजमीन आजयेक पातळशी लांब येणी, ती आंबाड्याक् दोन वळसे मारतंली. जाडा निरू येणयेवालो दिसलो की धावत फुडे येतलां. सगळ्यांका नावा ठेयतंला. तेतूर एकपण फूल शिळा नाय ना? तां येणी उलटीपालटी करून

बगतंला. मगे एकादी घेतंला तरी उद्या जरा सोयन् करा ह्या सांगाक् तां इसराचा नाय.

पुन्हा आसां हां, ह्या जाड्या निरूक् टाळून दुसऱ्या रस्त्यान् फुडे गेल्यावर तां चिडतंला.

''मी तुमचा रोजचा गिऱ्हायक् आसंय. माईकडे येयन् . समाजलां काय? ही डॅमिसगिरी परत केलंस तं बघ,मी आसंय नि तू आसंस. मी काय फुकट मागतंय काय रे?'' निरू कातळावरचे सुके माशे परतल्यासारक्या हरएक पाती परतून बगतंला.

''गो, माका जावंनी. माझी गिऱ्हायका जातंत. लवकर घी काय तां.'' असां बोलाची सोय नाय. मगे आणकीनच उशीर लावित.

ठरलंली तीनचार ठिकाणा फिरांन झाली की उरलेले पातये नि वळेसर दाजीच्या, पांडूच्या, भाईच्या खाडये काठच्या गादयेर ठेवित. काय गादीवाल्यांची पेशल आर्डर आसां. पातयेंचा झुंबर लटकवलंला आसां. इकलंल्याचो हिशोब देव्क ही पोरां माईकडे येत.

चाय-बटर-खारी नायतर पोहे असत आणि इकलंल्या प्रत्येक पातयेमागचे ठरलंले पैशे. थयच्या दोनतीन वाडयेतली पोरां खूश होती.

वळेसर, पातये वळणाऱ्या बायमाणसांचे इरडीवर म्हणजे अर्ध्या दिवसाचो हिशोब असां. माई तो ताबडतोब पुरो करी.

माशे मार्केटात, माशे इकतंत त्या तिठ्यावर पातये इकूक् जाणारी पोरां आदी ताजी पाती बगून घेत नि जायत.

''निम्बरात जरा बावली गे..आजचो दिस माळ.'' असला कारण थय कोणाक् चलंत नसां.

त्यातही त्यांच्या घरातल्या शाईबाबाक् हार सांगीचो असा. त्येची फुलां ताजी काडायची नि तो केल्या केल्या ही माशे खरेदी करूक् भाटयेर जावच्या आधी घराकडे पोचवून यायचो. पैशे ताबडतोब हातीवर ठेयणार. पातयांची, वळेसरांची उधारी मह्यनो-मह्यनो देणार नाय. पण

''पिशवी हाडलंस? धर..'' असां म्हणान् माशाचो वाटो देतीत नि मांजरांका किरमाट दुकू. माडाच्या मुदात पिशवी ओतल्यावर फुडले चोवीस तास मांजरा आथरूणात मेल्यासारी झोपलंली असतंली.

पावसात अबोलीचा छाटकाम आसां पण अगदी थोडीशी फुलां मिळत. हे पातये रोख पैशेवाल्यांका जायत.

घाट्येतल्या फणसाबुडी अजम्याचा घर होता. तो नि त्येची बायको थय ऱ्हवा. पोर नाय बाळ, कुल्याक् बांदला शिराड अशी त्येंची गत होती. कामा करायची नि खायचा, वणवण भटकायचा ह्याच. ती एके जाग्येवर ऱ्हवली ती माईकडे. अजमो सकाळी उटलो की चाय पिव्क माईकडे भरडावर असां.

पायरहाट होतो. माडांचा, केळींचा शिपणा होता त्येसाठी मोठो हौद भरूचो लागा. नंतर अळी फोडत पाणी वळवूचा आसा. आबोलेचे पाट येगळे होते. मुळातले मातीचे उंचवटे भिजान् नरम होतीत, तिच्या पाना पानार पाणी उडात ह्या बगतांना ताटलीन् ओणव्यानी शिपणा करूचा आसां. गिमात त्या शिडकाव्यान् ती डुलत आसा. तपकिरी केसरांत सुकलेल्यो बियो दिवाळेतले केपयो वाजवल्यासारे तडतडत. चिव्याच्या कामट्यांचो त्या रोपांका आधार देवचो लागा, म्हंजे शंबर-दीडशे रोपांची फुलां काडतंना अबोलेची ढाका दुकवत नसत नि फुलां काडणाऱ्यांचे बावशे वळत नसत. रूजान इलंली रोपा अलग टोवायची, पावसाच्या आधी छाटणी करायची; ही कामा आजग्याच्या बायकोची. पाटात शेण कालवायचा ह्या काम दर आय् तवाराचा. आबोलेच्या पातयेत तीन ठिकाणी हिरवी बकरी घालीत; ती झाडा वय कडणीन् लावलंली होती. दुपारी पातये वळूक् बसणाऱ्या माणसांका केळीचा सोप तयार लागा. त्याची तयारी आजगो सकळंच करून ठेवी. केळीची सोपा काढून बारक्या डोणयेत भिजत घाली. शेण-गोठो आटापल्यावर त्येची बायको त्येचे उबे धागे काढी आणि ते मापात कापून तीन-तीन धाग्यांची गाठ मारून टोपलीत भरून ठेवी. अशा सगळ्या जय्यत तयारीमुळां अबोलेचे सादारण हजार-पाचशे पातये पटापट होयत आसत.

माईच्या ह्या घरावाटोळी ही सगळी भरड जमीन. अगदी सुरवातीक् तिनां चारपाच रोपा लावल्यान् नि ती पातये वळूक् लागली. स्वतःपुरते वळणारी घरां होती; पण त्यों इकणारी माई पयली. वाडीतल्यो बायकां छाटण्ये मारूक् येवक् लागल्यो. दुपारचो येळ जावक् लागलो नि त्येंका पैसो मिळाक् लागलो. अबोली वाड्ली. चक्र फिरांक् लागलां, त्येका गती मिळ्ली.

आत्ता भायर ओटयेवर बसलंला गिऱ्हायक् लय लाम्बसून इलंला. लग्नाचे चार दिस जितके देशाल, तितके पातये होये होते. ह्या घरातली व्होकाल म्हंजे नवऱ्याकडच्या माणसांका अबोलेची पाती ओटीत लागतंली. रोजच्या पाचएकशे पातयांचा काम होतां. माई व्यवार ठरवी होती.माईची म्हातारी आवस तिच्याकडेच होती, सासू होती. असां कोण व्यवाराचा बोलांक् ओटयेवर बसलां की म्हातारी कोपऱ्यात काय तरी काम करीत असल्यासारी देकवायची. आदल्या दिवसाक् पैशे नि दुसऱ्या दिवसाक् पातये, वळेसर जा काय व्हया तां मिळां. ह्या ठरलंला असायचा. जी काय आर्डर असांत, तेवढीच फुलां

काढायची. बाकी सगळी फुलां अबोलेर असंत. कोणतरी एक दोन पाती मागूक् इलां की ताबडतोब करून देणारी माई.

''हजाराचो व्यवार करतां, पण पन्नास पैशाचा गिऱ्हायक् सोडूची नाय.'' अशी तिची ख्याती होती.

''माई माका थोडी मदत कर गे..पडवीचा काम काडलंय.'' रोज पातये वळूक् येणारा कोणतरी विश्वासान् येवन् बसत असां.

''माई कॉलेज सुरू जातंला. लय-थोडे मिळतीत काय?''

ही अबोली त्यांच्या अडी-अडचणेक् धावान् इलली होती.

माईचा बगुन इतरांनी अबोलेचे टीकश्यो लावल्यांनी. तशी प्रत्येकाकडे झाडा होती म्हणा. पण आता वाटूक् लागलां चार पैशे आपणपण कमवया. लोक दारात येवन् इचारतंत तर दिली पाती वळून. घरात पोरां हत ती शाळेत्सुन इल्यावर गाबतांच्या वाडीत, बंदरावर जातीत नि चार पैशे हाडतीत. माईन् या लोकांका मदत केल्यान्.

''जा गो वायच घाटयेत, दोन परड्यो फुलां घेवन ये. पैशे न्ही.'' काही घरां माईक् फुलां विकूक लागली.

या अबोलीच्या फुलांचो पैसो होता, ह्या माईमुळे सगळ्यांका समाजला.

आणि ह्या माईक् कदी समाजलां?

एकदा त्यांच्या घरात भात नि कुळताची पिटी खाव्न सगळ्यांकाच वीट इललो होतो. माईची शाळेत जाणारी दोन पोरां जी आता मुंबयत हत, ती जेवत नव्हती, काय खायत नव्हती. घरात कोण कमावता नाय, तेतूर इतक्या म्हाग डाळ, कडधान्य आणायचा खयसून? अळू, अंबाडी, पालेभाजी, मुळो, शेगुल, चवळी, भोपळो होतो; पण हे पोरगे शाळेतना इले की कोणी कोणी डब्यात काय काय हाडलंला तां सांगीत नि त्वॉन्ड वाकडा करून जेवत. संकोचान् शाळेत डबो न्हेयत नसत. बरां शाळेत माशे कशे न्हेणार? ते वडी काढत जेव्क घराक् येयत. जेव् न शाळेत जायपरयात जेवलंला जिरत आसां. माईक् पोरांचे हाल बगवत न्हवते. त्यात शेजारी पाजारी हीच परस्थिती.

नाय म्हणाक् माईची भाताच्या खरयेत पंदरा-ईस कुणगे होते, तां भात मात्र येय. माड होते. त्यात तिनाच वाढ केल्यान्. तिचो धकटो पाळण्यात असतानाच घोव खयच्या तरी बुवा वांगडा सेवेकरी म्हणान् गेलो नि जातंना सांगल्यान्, मी तुमच्याच कल्याणाक् जातंय. देवावर श्रद्धा ठेवा. त्या दिवसापास्ना ह्यो संसार देवाचा नाव घेव् न माईच चालवतां.

गावात लगीन असला की माई अबोलेचे पातये,वळेसर घेवन जायची. हीच भेट नि आशीर्वाद. ती घट्ट, भरगच्च नि पातळ सोपातली पाती वळायची. अंगठ्याक् सोपाची गाठ मारल्यान् की डोळे मिटून पाती तयार. पातये कितीही करू दे, एकाही वळश्याचो फरक नसा. याच कसबाचा एकदा कौतुक झाला नि खयच्या तरी चाकरमान्यान् तिका बक्षिशी दिल्यांन. त्या दिवशी तिचा घर चांगला-चुंगला जेवला. आठ-दहा पातये, नायतर वळेसर करणारी माई आता पाचशे ते हजार पातये वळूक् लागली. चार घरां रोजाक् लागली नि ह्या अबोलेन् ह्या बायमाणसांची दुका बोलकी केल्यान्.

माईचा घर ह्या अबोलेन् वरती हाडल्यान्. आता पायऱ्हाट गेलो. बावीवर मशीन बसला नि अबोलेच्यो रांगो आणखीन् लाम्ब झाल्यो.

''मी आसंय तोवर करीन्. तेतूर काय करूचा हां? वाडीतलीच सगळां करतंत.'' माई समाधानी असां.

आज या भरडावरच्या घरातल्या माजघरात अबोलेचो ढीग आसा नि त्याच्याभोवती सगळी माणसां आपापल्या जीवातला बोलत बसलंली हत. या सगळ्यांका बोलत ठेयणारी ही अबोली या वाडीक् नांदती ठेयता. या वाडीत हरतऱ्हेची फुलां होती. कापूरवासाची गावठी गुलाबी गुलाबा फुल्ली काय त्येच्यावर उडयो पडतंत. सोलीया, सोनचाफी होती. सुरंगीचो सीझन आठ दिवसाचो, ती घमघमान् जायची. मात्र ह्यात अबोली राणी कशी, पावसातच जरा भर कमी व्हायचो. शिवाय ह्या टीकणारा फुल म्हणान् पाती दोन दिवस केसांत असायची. या गावात लग्नाकार्यात हार कसले? अबोलेची भरपूर फुलां म्हणान् तिच मिरवतंली.

आतासो पैसो सगळ्यांकडे आसां. पोरां कमावतंहत, नारळबोंडाचो पैसो येता. पण या वाडीतल्या बायमाणसांका अबोलेभोवती बसान् सां वाट्ता. गजाल सुरू जाता नि मनमोकळां झाल्यार सगळी माणसां आनंदान् घराक् येतंत. हय गाजेची साथ आसां नि अबोलेचे कान असत..बास! बायमाणसाक् आणकीन् काय व्हया?

**शब्दार्थ :**

खळ्याची पेळ - अंगणाचा बांध, भरडावर - जमीन संपून वाळू सुरू होते तो समुद्राकाठचा भाग, वांगड - सोबत, वयदांडो - गुरं न खाणाऱ्या झाडांचं कुंपण, आंब्याबुडच्या- आंब्याखालच्या, भापणे- मिरवणे, खरी - भातपीक घेण्याची अनेकांची जागा. काही एकर जमीन. कुरियाड, कुणगे - भात लावायचे चौकोन, दळे, कोट्या. कामट्या - चिव्याच्या काठ्या, भेत. टीक्शा/टीक्श्यो - फांद्या, ढाक - रोप, बावसा - खांदा, व्होकाल /वोकाल - नवरी, छाटण्या मारणे - गप्पा मारणे, गजाल रंगणे, फकांडे मारणे. किरमाट - बारीक मासे.

**- रश्मी कशेळकर**



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# वाडवळी बोलीभाषेतील सौंदर्यस्थळे

डॉ. मधुकर केशव वर्तक

**वाडवळी बोली ही डहाणू, पालघर आणि वसई भागात शेतीवाडीत गुंतलेल्या वाडवळ समाजाची आहे. तिला व्याकरणीय अनुबंधने नाहीत. संस्कृत, प्राकृत, महाराष्ट्री, अपभ्रंश अशा प्रवासातून तिची घडण झालेली आहे. मौखिक, महानुभाव पंथ, संत साहित्य, पंत साहित्याचे संस्कार झाल्यामुळे वाडवळी बोलीत तशा शब्दकळा आढळतात.**

**भारतीय** उपखंडात जाती, धर्म आणि भौगोलिकतेनुसार लोकधारणेमध्ये विविधांगी वैशिष्ट्ये दडलेली आहेत. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास त्याचे प्रत्यंतर सणावारांतून, उत्सवांतून, लग्न, बारसे आणि मरण इत्यादी प्रासंगिक उपक्रमांतून दृग्गोचर होते. महाराष्ट्रात प्रत्येक जाती आणि पोटजातीला आपली अशी स्वतंत्र परंपरा लाभलेली आहे आणि परंपरेची मुळे आपल्याला त्या त्या घटकांनी जतन करून ठेवलेल्या, जोपासलेल्या लोकधारणेच्या माध्यमातून शोधावी लागतात. त्यासाठी महानुभाव पंथाच्या अगदी अगोदर अस्तित्वात असलेल्या मौखिक वाङ्मयातून आधारभूत मूल्यं तपासावी लागतात. प्रमाणमराठी भाषेचा उगम होण्यापूर्वी ही मूल्यं सूत्ररूपाने विविध बोलीभाषांतून जतन करून ठेवलेली आढळतात. त्या दृष्टीने मौखिक वाङ्मय हे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत उतरत उतरत आले ते बोलीभाषेतील गीतांमधून. ग्रंथनिर्मिती होण्यापूर्वी हे मौखिक वाङ्मयच समाजाचे नीतिमूल्यक जीवनशास्त्र बनले होते. त्यामुळे एखाद्या बोलीभाषेचा अभ्यास करताना केवळ ती एकच बोलीभाषा विचारात घेऊन चालण्यासारखे नाही. एका बोलीभाषेवर दुसऱ्या बोलीभाषांचे संस्कार कळतनकळत होत असतात. त्यामुळे विशिष्ट बोलीभाषेचा विचार करताना तिच्या आसपास वावरणाऱ्या बोलीभाषांचा तौलनिक आधार घेणे आवश्यक ठरते. एखाद्या बोलभाषेत दृढमूल झालेली सामाजिक, सांस्कृतिक सूत्रे, सौंदर्य आणि गोडवा त्या बोलीभाषेचा आहे, असा आग्रह धरून चालण्यासारखे नाही. कारण हा तपास खोलवर जाऊन करणे प्रसंगी अवघड आहे.

सारांशरूपाने वरील विचारसरणी ध्यानात घेऊन वाडवळी बोलीभाषेतील सौंदर्यस्थळे विशद करावी लागतील. स्थलांतरामुळे वाडवळी बोलीभाषेवर प्रामुख्याने मारवाड आणि गुजरात प्रांताचा खूपसा असर झालेला जाणवतो. तसेच महानुभाव पंथ आणि संतवाङ्मय यांचेही संस्कार जडलेले जाणवतात. ज्ञानेश्वरीमधील बरेचसे शब्द वाडवळी बोलीभाषेत उतरलेले आहेत. आजतरी ही बोलीभाषा डहाणू, पालघर आणि वसई तालुक्यांपुरतीच मर्यादित असली तरी नव्या पिढींच्या प्रांतभेदापलीकडील वावरणे झाल्यामुळे तिचा भौगोलिक परीघ विस्तारला गेला आहे. वरील तिन्ही तालुके कोकणातील उत्तर पश्चिमेला विसावले गेले आहेत. मराठी वाङ्मयात कोकणाचे चित्र हर्णेबंदर, दापोली, रत्नागिरी, चिपळूण इत्यादी ठिकाणांपुरतीच मर्यादित राहिल्यामुळे आमचा उत्तर कोकण मराठी साहित्यात उमटायला बराच कालावधी जावा लागला. हे एक कारण. वाडवळी बोलीभाषा सर्वतोमुखी व्हायला तसा वेळच लागला.

मौखिक वाङ्मय, महानुभाव पंथ आणि संतवाङ्मय यांचा अन्योन्य संस्कार स्पष्ट करताना वाडवळी बोलीभाषेतील

लोकगीतांचा आधार घ्यावा लागेल. याव्यतिरिक्त महाभारत आणि रामायणातील संदर्भांचा स्पष्ट उल्लेख करावा लागेल.

*'उड उड रे काऊ*
*तुझे सोन्यानी मढवीन पाऊ'*

हे ज्ञानेश्वरीतील आमिष वाडवळी बोलीभाषेतील लग्नगीतात उतरले आहे. ते असे,

*'उडा उडा शिउनल्यांदो तुमशी पाखं सोनीयाशी,*
*तुमचे पाय रुपियांसे,*
*तुमश्या टोकी मोतीयाशा,*
*तुम्ही जावं सरगीलोकी*
*सरगीशा यशवंत देवा*
*सरगीशा सखाराम देवा*
*तुमसा नातू पर्णू जाते*
*त्याला आशीर्वाद पायजे'*

असे आवतण स्वर्गलोकी गेलेल्या पितरांना- कावळ्यांना आवाहन करून दिले गेले आहे. स्वर्गलोकी गेलेली पितरे 'आमसं यणं भादव्या मंगल्या पाखी' असे कारण सांगून 'तवा आमी आशीर्वाद देऊ' अशी भूमिका घेतात. अशावेळी लग्नप्रसंगी पूर्वजांची आठवण ठेवणे गीतांत महत्त्वाचे मानले आहे.

*'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे'* ह्या तुकारामांच्या रचनेचा आधार वाडवळी गीतात 'तेलवण' पाडताना घेतला आहे. तो असा-

*'आंब्या ग फणसाखाली दवण्यानं केली मात*
*पंढरीचं होत निंदता ग झाली रात*
*माझा ग हेतु आहे (आई) काळ्या लुगड्यावरी*
*काळ्या लुगड्यावरी मथुरा खणावरी*
*मथुरा खणावरी बिल्ल्या बांगड्यांवरी*
*बिल्ल्या बांगड्यांवरी बाळ्या तोड्यावरी*
*बाळ्या तोड्यावरी बाळी बुगडीवरी*
*नवरी ग आहे गोरी हळद लावा थोडी*
*नवरी ग आहे लान नेसवा सूर्यपान'*

नवरी लान म्हणजे लहान आहे, तिला लज्जारक्षणासाठी सूर्यपान पुरेसे आहे. हा विरोधाभासही जाणवतो. ह्या गीताला रचनेच्या बाबतीत 'आवर्ती' गती प्राप्त झाली आहे. अडाणी, अशिक्षित आयांनी गीताला लयबद्ध सुरावट देताना लयीचे भान राखले आहे. ह्या गीताचे वैशिष्ट्य म्हणजे गीतपंक्तीतील शेवटचे दोन शब्द पुढच्या पंक्तीत सुरुवातीला येऊन ही पंक्ती पुढे सरकविण्याचे काम केले आहे. ते असे,

'माझा ग हेतु आई काळ्या लुगड्यावरी'मधील 'काळ्या लुगड्यावरी' हे शब्द पुढच्या पंक्तीत पूर्ण करते झाले आहेत. ही आवर्ती म्हणजे गती देणारी लय ह्या लग्नगीतात सापडते. शिवाय त्या लयीमुळे संपूर्ण गीत लक्षात ठेवणे सोपे झाले आहे. रचनेचे, लयीचे, शब्दकळांचे भान मौखिक लोकपरंपरेने सांभाळले आहे, हे अधिक महत्त्वाचे आहे.

संजीवन समाधीचे तपशीलवार निवेदन करताना नामदेवांनी निसर्गघटकांचा प्रतिमा म्हणून सुरेख वापर केला आहे. ताटीचे दार बंद करून झाल्यानंतर तेथे जमलेल्या लाखो भागवतभक्तांची अवस्था *'बांधल्या पेंढींचा तुटलासे बंद । पेंढी रानोमाळ'* अशी झाली. त्याचाच आधार, मुलीचे लग्न झाल्यानंतर वरातीतून तिची पाठवणी करताना 'माय'ची होऊन जाते. त्याचे सम्यकदर्शन वाडवळी गीतातून प्रकटले आहे. कन्यादानाच्या वेळेपासून तिची द्विधा मन:स्थिती झालेली असते.

*'काय देऊ ग कन्ये तुला अंदाण*
*दांडावरसा टोपा*
*धुरदांडावरसी होपारी*
*तरी नाय होइ ग*
*कन्या माझी तिरपती'*

ह्या गीतात्मक अंदाणाअगोदर *'तपेल्याशी दुड (दुड) परातीसे जोड'* कन्येला देऊन झालेले असतात. मुलीचीही अवस्था काही वेगळी नसते. *'रडुनी रडुनी डोळे लाल झाले मुलीचे'* ह्या मंगलाष्टकाबरोबरच तिच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहायला लागलेल्या असतात.

वाडवळी लोकगीतांतून मांगलिक आणि भावनिक असे दोन्ही भाव प्रतीत होत असताना जाणवतात. आज तरी मर्तिकाची गीते कालबाह्य झालेली असली तरी त्या गीतांतील लय, ठेका, आरोह-अवरोह प्रसंगोपात गीतांतील भावभावना प्रकट करणारी होती. कोणे एकेकाळी एखाद्या बाईने मर्तिकाची गीते सांत्वनासाठी आलेल्या मंडळींसमोर गायली नाहीत तर त्या बाईला दु:खाचे काही नाही असा समज पसरवायला पुरेसे होते. बोलीभाषेतील मर्तिकाची गाणी हा अनमोल ठेवा प्रत्येक बोलीभाषेला लाभला आहे. कविवर्य ना.धों. महानोर ह्यांच्या काव्यरचनेला त्यांच्या भागातील ही मर्तिकाची गाणी आधारभूत ठरलेली जाणवतात.

भाषाविचारामध्ये भाषा ही मुखावाटे होणारी म्हणजेच मौखिक क्रिया आहे, हे सत्य ध्यानात घ्यावे लागते. केवळ

लिहिली जाते आणि अजिबात बोलली जात नाही अशी भाषा असूच शकत नाही. कारण लेखनपद्धती हे भाषेचे केवळ माध्यम ठरते. लेखन ही उच्चारण म्हणजे भाषेचे बोलणे टिकवून धरण्याची एक सोय आहे. उच्चारणामध्ये भाषेचे अस्तित्व अल्पकाळ असते तर लेखनात हेच भाषेचे अस्तित्व चिरकाळ टिकणारे असते. म्हणून तोंडी मजकुरापेक्षा छापील मजकुरावर आपण अधिक विश्वास दर्शवितो. तरीही तोंडातून उच्चारले जाणारे ध्वनी हेच भाषेचे खरे माध्यम आहे. म्हणून लोकधारणेतील मौखिक वाङ्मय केवळ त्याचे वाचन करून समजून घेता येत नाही. त्याचे जाणकारांकडून मौखिक उच्चारण जाणून घ्यावे लागते. कारण त्यात शब्दांचा उच्चार, लय, ठेका, आरोह-अवरोह, हेल, शब्दांना दिलेली मौखिक गती, शब्दांचे ताणणे आणि वेळप्रसंगी त्यांना आखडते ठेवणे, समजून घेतल्याशिवाय भाषेचा आणि त्याहीपेक्षा बोलीभाषेचा अभ्यास पूर्ण होणारा नाही. त्यामुळे तोंडातून उच्चारले जाणारे ध्वनी हेच भाषेचे खरे माध्यम आहे. त्यामुळे एखाद्या भाषेतील केवळ लिखित नमुने गोळा करून अभ्यास पूर्ण होत नाही.

विशिष्ट भाषेचे वर्तमानरूपही लक्षात घ्यावे लागते. भाषेचे लेखन आणि भाषेचे उच्चारण यामध्ये बरेच अंतर असते. हे अंतर ध्वनी, शब्द व वाक्य या तीन पातळ्यांवर पडताना दिसते. अक्षरांना लिखित स्वरूपात चिन्हे प्राप्त झाली नव्हती तेव्हा भाषा ही पद्यस्वरूपात अस्तित्वात होती. तिला गद्यस्वरूप नंतर प्राप्त झाले. आज प्रमाण मराठी भाषेत बोलले जाणारे एखादे वाक्य जर 'मी बाजारात जातो' असे असेल तर ते ह्यापूर्वी मौखिक व्यवहारात 'जातो मी बाजाराला' असे पद्यरूप घेऊनच प्रगट होत असे. सारांश रूपाने त्यावेळी क्रियापद हे कर्त्याच्या ठायी असायचे. म्हणूनच मौखिक उच्चारणाला एकप्रकारे काव्यमय गती असायची. ही गतीच लोकधारणेत, लोकगीतात आत्मस्वरूपी स्थान घ्यायची.

भाषेचा अभ्यास करताना आजपासून भूतकाळापर्यंत जितके मागे जाता येईल, तितके मागे जाऊन त्या भाषेचा इतिहास शोधून काढावा लागतो. इतिहास शोधून काढणे याला 'ऐतिहासिक भाषाविज्ञान' म्हणतात. सर विल्यम जोन्स या संस्कृत भाषेच्या अभ्यासकाला संस्कृत या अभिजात भारतीय भाषेचा अभ्यास करताना हा अभ्यास ऐतिहासिक दृष्टिकोनातून करता येतो, हे प्रथम सुचले. त्याच्या असे लक्षात आले की ग्रीक, लॅटिन या पाश्चात्त्य अभिजात भाषांमध्ये व संस्कृत भाषेत खूपच साम्य आहे. कलकत्ता येथे एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात इ.स. १७८६मध्ये आपला निबंध वाचताना त्यांनी संस्कृत, ग्रीक व लॅटीन भाषांतील साम्यतेचा विचार मांडून या भाषांतील घनिष्ठ व खोलवर रुजलेली साम्यस्थळे विशद केली. भाषाविज्ञानाचा ऐतिहासिक पाया १७८६मध्ये घातला गेला. त्याचे श्रेय सर विल्यम जोन्स यांनी संपादिले. भाषेच्या अभ्यासाला 'कालक्रमिक' म्हणतात. त्यामागे एकेका कालखंडातील भाषिक रूपाचा विचार झालेला असतो. ज्ञानेश्वरकाळात 'राओ' किंवा 'राऊ' मराठेशाहीत 'राया' रूप धारण करून आधुनिक काळात 'राजा' रूपापर्यंत बदल झालेला आपण पाहतो. हा बदल कालपरत्वे झालेला असतो. मुंबईत 'मी म्हणालो' तर पुण्यात 'मी म्हणलो' ही रचना ग्रामीण भागात 'मी म्हनलो' रूप धारण करते. भाषेतला होणारा हा बदल 'स्थानपरत्वे' झालेला असतो. भाषेमध्ये बदल होणे हा एक नैसर्गिक क्रम आहे.

मराठी भाषेचे मूळ संस्कृत भाषेत आहे, हे आपण मान्य केलेले तत्त्व आहे. आजच्या प्रमाणमराठी भाषेचा प्रवास संस्कृत→प्राकृत→अपभ्रंश→महाराष्ट्री→मराठी या क्रमाने होत ती विकसित झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर बदल होत असताना अगोदरच्या टप्प्यावरील गुणधर्म काही अंशाने नंतरच्या टप्प्यात येणे साहजिकच आहे. त्याचा दृश्य परिणाम बोलीभाषेवर होत असल्याचे जाणवते.

वाडवळी बोलीभाषेसंबंधी विचार करताना सोमवंशी क्षत्रिय समाज बिंबराजाबरोबर स्थलांतरित होत असताना अनहिलवाडा (पाटण) ते वाळकेश्वरपर्यंतच्या प्रवासात आधी राजस्थान (मारवाड), नंतर गुजरातप्रांतात अल्पकाळ स्थिरावताना मारवाडी आणि गुजराती भाषेचे सांस्कृतिक आणि भाषिक संस्कार घेऊनच आला. त्याचा परिणाम प्रामुख्याने बोलीभाषेवर झाला. देवीची लस टोचून झाल्यानंतर किंवा देवी आल्यानंतर पूर्वी वाडवळ समाजात देवीजागरणाचा कार्यक्रम रात्री असायचा. गीतावाटे वेगवेगळी आमिषे दाखवून देवीला प्रसन्न करायचे हा एक प्रकार होता. त्यासाठी गीते गाऊन रात्र जागवायची. खूश किंवा प्रसन्न करण्यासाठी 'देवीला (गुजरातीत देवीने) बांगड्या आपो' करीत विविध आभूषणे गीतांतून अर्पण केली जायची. इथे 'देवीने' आणि 'आपो' हे शब्द गुजरातचे संस्कार स्पष्ट करणारे आहेत. 'जावेली',

'आवेली', 'मिल्टी' (च्यासह, बरोबर) ह्यासारखे शब्द गुजराती संस्कार स्पष्ट करणारे आहेत.

तसे पाहिले तर वाडवळी बोलीभाषेवर आणि संस्कृती, आचार-विचार ह्यावर अधिकतम पगडा मारवाडी संस्कृतीचा आहे. एक मारवाडी दुसऱ्या मारवाडी माणसाला 'कटे पथारेसो' म्हणतो तेव्हा वाडवळीत 'कटे साललास' रूप घेते. मारवाडी ह्या प्रश्नाला 'अठेस' उत्तर देतो, ते वाडवाळी बोलीभाषेत 'अठीस किंवा अटेस' होऊन जाते. नवऱ्याच्या मोठ्या भावाला मारवाडीत 'जेठ' म्हणतात, तर वाडवळीत 'भावला' म्हणतात. जेठची 'जेठाणी' तर भावल्याची 'भावलाणीन'. दीर बाकी दोन्ही भाषेत 'देर'च राहिला; तसेच 'देराणी'पण. मासिकधर्मात स्वयंपाक करायला एखाद्या घरात बाईमाणूस नसेल तर मारवाडी समाजात त्या घरचा स्वयंपाक करायला शेजारची बाई पाच दिवस यायची प्रथा होती. ती वाडवळ समाजातपण होती. सुवेरच्या बाबतीत मारवाडी समाजात चाळीस दिवसांचे सुवेरपण असते. मात्र वाडवळीत ते सहा किंवा बारा दिवसांपुरतेच मर्यादित राहते. साम्यभेदाचा अभ्यास करताना त्यामागची कारणमीमांसा शोधून काढणे कधीकधी दुरापास्त होऊन जाते. पूर्वापार चालत आले आहे, ह्या विचारसरणीलाच शेवटी आधार घ्यावा लागतो.

वाडवळ समाज शेतीवाडीशी निगडित असल्यामुळे आधुनिक काळात आदिवासी, कोळी, कुणबी, आगरी, भंडारी या शेतीव्यवसायाशी संबंधित असलेल्या समाजाशी नित्यनेमाने संबंध येत असल्यामुळे वाडवळी भाषेवर त्याचे संस्कार होणे साहजिकच आहे. कारण शेतीच्या अवजारांची नामाभिधाने सर्वत्र सारखीच राहिली आहेत. शेती आणि शेती अवजारांबाबतीत या सर्वच बोलीभाषांवर महानुभावपंथीय केशिराजबास यांच्या 'दृष्टांत पाठ' ग्रंथाचा संस्कार जाणवतो. केशिराजबास हे चक्रधरस्वामींचे पट्टशिष्य नागदेवाचार्य यांच्याकडून अनुग्रहित झालेले महानुभाव पंथाचे एक आचार्य. त्यांनी नागदेवाचार्य यांच्या आज्ञेवरून संस्कृतचा आग्रह सोडला आणि मराठीत लेखन केले. म्हाईभट्ट यांनी सिद्ध केलेल्या चक्रधरस्वामींच्या लीळाचरित्रातून चक्रधरस्वामी यांनी वेळोवेळी दिलेले दृष्टान्त एकत्रित करून स्पष्टीकरणासह 'दृष्टान्त पाठ' ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथात व्यावसायिक माहिती अशा विविध विषयांवरी एकूण एकशे चौदा दृष्टांत आहेत. 'तनधरैलेया वावराचा दृष्टांत' (२८) शेतीविषयक तपशील देतो. तण भाजलेले वावर पेरणीला योग्य कसे करावे, शेतीची मशागत कशी करावी हे सांगतो. तर, 'आधारीचे या परीसाचा दृष्टांत' (५४) पास, फळा, इळा, कुऱ्हाड, तुता या शेतीच्या अवजारांचा उल्लेख करतो. कर्णोपकर्णी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत हा मौखिक ठेवा शेतीत राबणाऱ्या समाजाकडे झिरपत आला. तो त्यांचा व्यावसायिक मार्गदर्शक ठरला आहे. तो वाडवळी गीतांमधून स्पष्ट झालेला आहे. *'पाण्याने माजा घात घातलाय'* अशी अति पडणाऱ्या पावसाची तक्रारही गाण्यांतून अभिव्यक्त झाली आहे. थोडक्यात, मौखिक परंपरा, महानुभावपंथ, संतवाङ्मय आणि पंतसाहित्याचा जबरदस्त परिणाम वाडवळी बोलीभाषेवर झालेला आढळून येतो.

*'बाळामंदी बकुड्डी खिरल्यात*
*नाय ग ललिया*
*वालपाणी खाळा (खाला)*
*नाय ग ललिया.'*

ह्या होळीगीतामधून घरधणींनीची तक्रारवजा काळजी सामुदायिक अभिव्यक्त झालेली जाणवते. आपल्या भावभावनांच्या प्रकटीकरणाला स्त्रियांनी वाडवळी गीतांचा प्रसंगोत्पात आधार घेतलेला जाणवतो- तर,

*'या घरस्या नथ्यादादानं*
*केल्या दोन बायका*
*एक केली लग्नासी, बिजी केली पाटासी*
*लग्नास्या बायकोला टिकामिका भारी*
*पाटास्या बायकोला झमका भारी.'*

अशा होळीगीतामधून सवती-सवतीचे गुणात्मक वर्णन आणि त्याचबरोबर दोषात्मक टिकाटिप्पणी करताना सख्यासहेलींची स्पष्टता दृग्गोचर होते.

शृंगाराच्या बाबतीत प्रतिकात्म किंवा रूपकात्मक शब्दकळांऐवजी रोखठोक शब्दांचा वापर किंवा उच्चारण करणे गीतातून आमच्या वाडवळी बायांना मुळीच कमीपणा वाटलेला नाही.

*'नाम्या शिंप्याने सोळी बेतली*
*नाम्या शिंप्याने सोळी शिवली*
*धुवत घातली धर्म शिळे*
*वाळत घातली फुल्ल झाडा*
*घड्या नाळीला बाजू पारा*
*नेऊनी ठेविली खुंटीवरी*
*एवढी कृष्णाने माव केली*
*माझी कानसोळी सोरून नेली.'*

ह्या गीतातून विवाहोत्तर जीवनातील पहिल्याच घटकाचा परिचय आणि मानसिक स्पर्श आमच्या वाडवळी बायांना आवश्यक वाटला. अशी ही कानसोळी होती तरी कशी? तर ती अशी–

*'माही कानसोळी होती कैसी*
*सांद सूर्यासं रोज जैसी*
*पाठी लेवीले पास बंधू*
*पोटी लेवीले पास पुत्रू*
*कपाळी लेवीले मेगवर्ण*
*दंडी लेवीले चांदसूर्य*
*एवढी कृष्णाने माव केली*
*माझी (माही) कानसोळी सोरून नेली.'*

इथे नवरा मुलगा कृष्णाच्या रूपात उभा केला आहे–

*'नवरी ग आहे लान*
*नेसवा सूर्यपान.'*

नवरी मुलगी इतकी लान म्हणजे लहान आहे की नुसत्या सूर्यपानाच्या नेसवण्याने तिची अब्रू झाकण्यासारखी आहे. इथेही शृंगारात्मक वयाचे आणि शरीराचे दर्शन अभिव्यक्त झाले आहे. एवढी आपसात हळू कुजबुजणाऱ्या वाडवळी बाया स्पष्टपणे, शृंगारात्मक बाबी गीतातून उघड व्यक्त करताना आढळतात. गीताची लय, नाद, हेल, ठेका सांभाळताना आपण गुह्य गोष्ट उघड केली आहे, हे त्यांच्या लक्षातही येत नाही. इथे प्राधान्य शब्दार्थाला नसून गीताच्या गतीला आहे, हे महत्त्वाचे आहे.

पंतवाङ्‌मयातील लावणीच्या बाबतीत आडपडदा न ठेवता स्पष्ट चित्र उभे राहते, त्याचाच आधार वाडवळी शृंगारगीतातून घेतलेला जाणवतो. एरव्ही भिडस्त, संकोची, बुझटी असणारी वाडवळी स्त्री लग्नगीते, बारशाची गीते गाताना नि:संकोचपणे मोकळी होते. तिच्या मोकळे होण्याला ही लोकगीते माहेराहून धाऊन आलेले गणगोतच वाटतात. तिला खरा मोकळेपणा मिळतो तो होळीगीतातून. तिच्या भावभावना मोकळ्या करायला ही वार्षिक संधीच असते.

होळीची गाणी ही रात्री अंगणात फेर धरून म्हणायची असतात. त्यावेळी सासवा ओटीवर बसून ह्या गाण्याचा आणि त्याबरोबर नाचाच आनंद घेत असत.

*'चल ग गंगू खेळायला? – पहिला कोरस गट*
*आम्ही नाय येत खेळायला – दुसरा कोरस गट*
*का नथ येत खेळायला?*
*बांगड्या नाय घालायला*
*सोनार दादाकडे जाईन म्हणते*
*गंगूला बांगड्या घडवीन म्हणते*
*चल ग गंगू खेळायला*
*आम्ही नाय येत खेळायला*
*का नाय येत खेळायला?*
*लुगडे नाय नेसायला*
*लुगडीवाल्याकडे जाईन म्हणते*
*गंगूला लुगडे घेईन म्हणते*
*चल ग गंगू खेळायला*
*आम्ही नाय येत खेळायला.'*

अशी कारणमीमांसा जाणून घेत आणि त्या त्या कारणाला उत्तर शोधीत हा खेळ स्त्रियांच्या प्रत्येक आभूषणाचा उल्लेख करीत चालू राहतो. एकापरीने ओटीवर बसलेल्या सासवांच्या डोळ्यांत अंजन घालण्याचाच हा आडोशाने केलेला प्रयत्न असतो.

*'आज मोर कच बसले?*
*चिंचे साबुले, चिंच साबुले*
*चिंच जळलो, कोजळा पडो*
*मोरा डावुले, मोरा डावुले.'*

मोराला चिंचेच्या झाडावरून खाली आणण्यासाठी अख्खी चिंचच जाळण्यापर्यंत बायांची मजल आहे. गाण्याची लांबी वाढविण्यासाठी कधी आंबा, पिंपळ, वड, नारळ, जांबू, पेरू ही झाडे गाण्यात अवतरतात. पण झाड कोणतेही असो, त्यातील मोर महत्त्वाचा. मोर, निळा, नाग, कृष्णदेव ही रतिभावाची प्रतीके आहेत. त्यामुळे मोराला खाली उतरवून आपल्या होळीच्या नाचात त्याला सहभागी करून घेणे ह्या बायांना महत्त्वाचे वाटते. इथे रतिभावाचा आविष्कार ह्या बायांच्या बाबतीत परावलंबी असतो. नवऱ्याच्या मर्जीत येईल तेव्हाच तो पूर्ण होणारा असतो. होळीच्या गीतात मात्र हा शृंगारिक आविष्कार बायांच्या मर्जीनुसार आविष्कृत झालेला असतो. त्यामुळे गाण्यात आमच्या वाडवळणी तल्लीन झालेल्या जाणवतात. इथेही सासवांना अप्रत्यक्षपणे शारीरिकता आणि मानसिकता ह्याची जाणीव करून देण्याचा हा केविलवाणा प्रयत्नच असतो. लौकिक जीवनात उघडपणे जे व्यक्त करता येत नाही, ते होळीगीतातून अभिव्यक्त करायचे हा वार्षिक कार्यक्रम आहे. *'चिंच जळो आणि कोजळा पडो'* हे रूपकात्मक आहे. गाण्यात सासवांना चिंचेची प्रतिमा लाभली आहे. हा कोजळा मानसिकतेचा आहे. त्याच्यात

बदल होऊन तिच्या आधाराने, मर्जीने जगणारा, वावरणारा मोररूपी तिचा मुलगा म्हणजे आपला नवरा आपल्या वाटेला येवो म्हणजे संसाररूपी फुलोरा फुलविता येईल, यासाठी ही गाण्यातून व्यक्त झालेली सुवासिनींची धडपड आहे. सुवासिनीच्या जोडीला माहेरवाशिणीही असतात. त्या दुसऱ्या होळीगीतातून प्रतित झाल्या आहेत.

*'गेरूच्या ओहळावर बंधवा*
*कोणाची गाडी आली, कोणाची गाडी आली*
*शंकरदेव बंधुराज आमच्या*
*सुमनला मूळं आली, सुमनला मूळं आली.'*

मूळ धाडणे म्हणजे माहेराला बोलवायला आमंत्रण धाडणे – गाडीच्या धावेचा ठणाठण आवाज गाडी गावात शिरण्यापूर्वीच ओहळावरून गावात शिरलेला असतो. त्याचा अनुमान ह्या गाण्यातून व्यक्त झालेला आहे. चार दिवस सुखाचे आणि चार दिवस हौसमौजेचे कल्पून माहेराला जाणारी माहेरवाशीण सुखावली जाते. 'माहेर' ह्या संकल्पनेचा विस्तार विशाल, विस्तृत आणि सर्वंकष आहे. ह्या विस्ताराचा परीघ कितीही विस्तारीत केला तरी परीघात कितीतरी बाबी समाविष्ट करायच्या राहून जातात– अशा ह्या परीघाचे संक्षिप्तीकरण आधुनिक काळात होऊन माहेराचे 'आईकडे' झाले आहे. जतन ही काळाची गरज आहे. प्रमाणभाषेला समृद्धीसाठी बोलीभाषा आवश्यक आहेत. प्रमाणभाषा लिखित स्वरूपात दस्तऐवज सांभाळते तर बोलीभाषा मौखिक गुणतत्त्वे प्रमाणभाषेला पुरविणाऱ्या वाहिनी आहेत.

भारतीय भाषांमधील वैविध्य टिकवून ठेवण्याचे कार्य ह्या विविध बोलीभाषांनी केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हे भाषावैविध्य टिकवण्यासाठी ज्या प्रमाणात प्रयत्न व्हायला हवे होते, तेवढे झालेले नाहीत. हिंदी भाषा लादल्यामुळे बोलीभाषांचे प्रवाह आटले गेले आहेत. महाराष्ट्रातील बोलीभाषांवरही त्याचा परिणाम झाला. सरकारी पातळीवर हे चालू असतानाच आधुनिक पिढी आपल्या मूळ बोलीभाषांपासून दूर दूर जाऊ लागली. त्याचा दृश्य परिणाम स्वत:च्याच बोलीभाषेवर झाला आहे, हे नव्या पिढीच्या लक्षातच आले नाही. 'बोलीभाषा नष्ट होण्यासाठी स्थलांतर, त्या बोलीभाषेकडे न्यूनगंडात्मक दृष्टीने पाहणे आणि सरकार दरबारी त्यांचे खच्चीकरण केले जाणे ही तीन कारणे आहेत' असे मत भाषातज्ज्ञ प्रा. गणेश देवी ह्यांनी व्यक्त केले आहे.

२०११च्या जनगणनेत नागरिकांकडून संकलित केलेल्या माहितीनुसार एकूण १३६९ भाषा बोलल्या जात असल्याचे नमूद केले आहे. मात्र या भाषांना १२१ भाषांखाली विभाजित केल्यामुळे त्या त्या बोलीभाषेचे स्वतंत्र असे अस्तित्व राहिले नाही. या मातृमुखी असलेल्या भाषा स्थानिक पातळीवर बोलल्या जात असल्यामुळे त्यांना चालना मिळणे अपेक्षित आहे. या भाषांमध्ये कार्यक्रम होणे, साहित्यनिर्मिती अपेक्षित आहे. मात्र त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नाकारून मातृभाषेतून अभिव्यक्तीचे स्वातंत्र्यही नाकारला जात असल्याने हा चिंतेचा विषय बनल्याचे मत प्रा. गणेश देवी यांनी म्हटले आहे.

भाषातज्ज्ञांची मते लक्षात घेता आणि कारणमीमांसा आणि स्पष्टीकरण पाहता आजतरी वाडवळी बोलीभाषा टिकून आहे ती ग्रामीण भागातील वाडवळी मंडळींमुळे. स्थानांतरित झालेली आणि शहरी भागात वास्तव्य करून राहिलेली मंडळी वाडवळी रीतीरिवाजाकडे फारसे गांभीर्याने, आत्मीयतेने पाहतात आणि अंगीकारतात असे ठाम म्हणता येत नाही. मात्र ग्रामीण लग्न, बारसे, सटी आदी विधींच्या पूर्ततेतून लोकगीतांचा पुरेपूर आनंद घेता येतो. तेथे पळवाटा नसतात.

*'वडपिंपळाच्या झाडाखाली*
*कोकीळ बोले मंजुळ शब्द*
*आई, मी जाते ईश्वर पाया*
*नको जाऊ लाडक्या लेकी ईश्वर पाया*
*तुला देईन अर्ध्ये राज्य, समया दुडी*
*समया दुडी मी काय करू?*
*बारा वर्षं तप केलं*
*गळ्यातल्या गरसोळीसाठी'*

अशा पद्धतीने गीत चढत जाते आणि आई अर्ध्या राज्याबरोबर कधी 'समया दुडी'नंतर 'कळसा दुडी' तर 'गाई म्हशी'चे आमीष मुलीला दाखवते. पण मुलगी 'गळ्यातल्या गरसोळी'नंतर, 'हातातल्या चुड्यासाठी', 'भांगातल्या शेंदरासाठी' मी ईश्वर मिळवायला निघाली आहे असा हेका कायम ठेवते. ह्या गीतातील भावार्थ सौम्यस्वरूपी प्रेमळ आहे. घरातील वडीलधारी मंडळी ही सावली देणाऱ्या वडा-पिंपळासारखी आहेत. त्यांच्या सावलीत, सान्निध्यात वाढलेली ही मुलगी मंजुळ स्वरात आपले मनोगत मांडते. 'देतात का लग्न करून की जाऊ पळून' असा आततायीपणा करीत नाही. हे ते गीतातील सौंदर्य आणि आईच्या वाटेला काय मोठी मालमत्ता, जमीनजुमला आला

आहे आणि त्यातील ती अर्धा वाटा मुलीला देऊ करते, हा तो विरोधाभास. लग्नगीतातील सूर पकडायचा आणि शब्दार्थाला दुर्लक्षित करायचे, हेच शेवटी महत्त्वाचे. अर्ध्या राज्याबरोबर 'समया दुडी' ही महत्त्वाची संगती आहे. 'समया दुडी' म्हणजे दोन समया. एक समई माहेरचा प्रकाश सासरच्या प्रकाशात मिळविण्यासाठी तर दुसरी समई सासरचा प्रकाश आणखी प्रज्वलित करण्यासाठी आहे. ह्या गीतातून माहेरचे संस्कार दृग्गोचर होतात. अशी कितीतरी सौंदर्यस्थळे वाडवळी प्रासंगिक गीतातून जाणवतील. वाडवळी लग्नगीतात म्हणावयाचे रामाचे तर कधी कृष्णाचे जोडे हे नीतिपाठदर्शक तर शूरत्वदर्शक शृंगारगळेसरीच आहेत. *'सीता सुंदर नवरी झळाळिते/श्री कानसोळी शोभा देते'* हे रामाच्या जोड्यात तर

*'रुक्मिणी लावण्य रूपिका*
*कृष्ण आहे निळा*
*त्याचे चरित्र ब्रह्मादिका न कळती*
*कानी कुंडले वनमाळा, रूप सुंदर सावळा*
*पदक हार सुंदर गळा शोभतसे'*

असे वर्णनात्मक रुक्मिणी, कृष्ण अनुभवायला मिळतात. ह्या जोड्यांमध्ये स्वभावोक्ती अलंकाराचा स्पर्श जाणवतो. वर्णन, तपशील आणि शृंगाराचे सुतोवाच यांचा मिलाप आहे.

अशा रीतीने वाडवळी लोकगीतात, लोकधारणेत आणि लौकिक जीवनात उठताबसता रामायण, महाभारत यांचे संदर्भ, निसर्ग घटकांचा समयोचित सुरेख वापर, पाल्हाळिक निवेदनाऐवजी प्रतिकात्मक म्हणी, वाक्प्रचार यांचा उच्चार ठासून भरले आहेत. एखादी व्यक्ती सांगावयाची लहान बाब लांब, रुंद करून सांगत असेल तर समोरचा माणूस त्याला 'तुहं म्हणजे एक हात काकडी तू नव हात बी' सांगून मोकळा होतो. एखाद्या घरी धार्मिक कार्याला सांगूनसुद्धा हक्काने येणारी सुवासिनी कार्यात गैरहजर राहिली तर यजमानीण 'इन तांब्या उपडा केला वाटते' अशी शंका व्यक्त करायला मोकळी असे. दैनंदिन जीवनात 'पोळया लाटणे', 'कुलूपकिल्ला', 'हळदमसाला', 'हापटंपायरी' म्हणजे तराजू; 'पाटावरवंटा', 'उखळमुसळं', 'कडीकोयंडा', 'जातेघरोठा' यासारखे सामासिक शब्द प्रसंगी शृंगारिक वळणावर पोहचविण्यात वाडवळी बोलीभाषेला वावगे वाटत नाही. किंबहुना शब्दसमुच्चयाला त्या अर्थाने वळण देऊन आनंद घ्यायचा ह्यात मनस्वी आनंद घेण्यासारखा आहे. वाडवळी बोलीभाषा एकार्थी आणि द्व्यर्थी वाकणारी आहे. शब्दाला दिलेला हेल किंवा उच्चारणात दिलेली शब्दाला लांबी उचित अर्थाकडे नेणारी असते. त्याचा सतत आनंद घेत राहायचा हा मूळ हेतू दुर्लक्षित करायचा नाही, हे सूत्र पाळले की झाले. एखादी मुलगी आईच्या वळणाने वागण्या-बोलण्यात वावरत असेल तर 'दांडासं पाणी दांडाच्याच वळणानं जाणार' हा वाक्प्रचार सहजगत्या वाडवळी स्त्रियांच्या तोंडून बाहेर पडतो. रूपकात्मक, प्रतिकात्मक, म्हणी आणि वाक्प्रचार यांनी युक्त अशी ही वाडवळी बोलीभाषा आहे. आडपडदा आणि स्पष्टता अशा दोन्ही गुणांनी मंडित अशी ही बोलीभाषा आहे. राग, रुसवा आणि प्रेमळ भाव ह्यांनी तिला वेष्टित ठेवले आहे. मंद किंवा हळुवार उच्चारण तिला मान्य नाही. जे काय असेल ते तारस्वरात मांडण्यात तिला वैषम्य वाटत नाही. एखादी सून सकाळी लवकर उठत नसेल तर 'जे काय हांगायसे अहेल ते तुमस्या पोराला हांगा-आख्खी रात मला निजून देत नाही' असे सासूला खडे बोल सुनवायला सुनेला लाजीरवाणे वाटत नाही. आणि हे सांगणे सासूपुरतीच मर्यादित राहत नाही; तर आजुबाजूच्या घरांत त्याचे सूर उमटतातच. 'लपविणे आणि उघड करणे' यात बोलीभाषेत अंतर असे नाहीच. ह्या गुणामुळे वाडवळी बोलीभाषेला एक प्रकारची पारदर्शकता लाभली आहे. 'त्या दिही माला जमणार नाय. माहा महिना येतो' असे चारचोघींत किंवा चारचौघींत उघड करण्यात वाडवळी बोलीभाषेला काही वाटत नाही. स्पष्टता महत्त्वाची, ती बोलीभाषेची अंगभूत अशी बाब आहे.

वाडवळी बोलीभाषेतील सौंदर्यस्थळे विशद करताना प्रामुख्याने मौखिक वाङ्मयातून प्रतीत होणारे साहित्यच विचारात घेतले आहे. त्यात जीवनमूल्ये, व्यवसायमूल्ये, लोकधारणा, लोकगीते, आरोग्यमूल्ये, सांस्कृतिक मूल्ये, नीतिपाठ आदींचा भरणा आहे. बोलीभाषेतील अक्षरांना प्रमाणमराठी भाषेत चिन्हे प्राप्त झाली ती आधुनिक काळात. त्या अगोदर व्यवहाराची, देवाणघेवाणाची भाषा बोलीभाषाच होत्या, हे अभ्यासकांना विसरून चालणार नाही. अभ्यासकाला खूप मागे मागे जाऊन मौखिक परंपरेतील ही सौंदर्यस्थळे हुडकावी लागतील, हेच खरे.

**– डॉ. मधुकर केशव वर्तक**

बोलीभाषा विशेषांक

## वाडवळी बोली कथा

# आम्हा घरी कार्य...
# हळदीसे

प्रा. स्मिता पाटील

**मीरा** मंजे मुळात हवशी. त्यात सख्ख्या भाशीहं, शमिकाहं लगीण. प्रणव अगदी मस्त पोरगा हाय. शमिकाहा मित्र हाय तो. तिहीस निवड. दोग्वांही जोडी साजरी दिखते. प्रणवश्या घरशी मंडळी प्रकाश–प्रीतीह्या परिचयाही. शमिकाह्या निवडीत खोट काडव्या जागा नवती. दोन्वी घराणी एकमेकांना साजेशी. पास माहणं या घरशी, पास माहणं प्रणवशा घरशी मिळून होयरिकीहा बेत जुळून आला.

**गुजरात सीमेवरील देहरी ते दक्षिणेकडे वाळकेश्वर या पश्चिम किनारपट्टीवर वस्ती करणाऱ्या सोमवंशी क्षत्रियांना 'वाडवळ' असे संबोधले जाते. वाडी करणारा तो वाडवळ, असे हे व्यवसायसूचक संबोधन आहे. 'वाडवळी' ही त्यांची बोलीभाषा. 'आमा घरी कार्य' ही वाडवळी बोलीत लिहिलेली कथा आहे. वाडवळी ही मध्ययुगीन काळापासून मराठीच्या प्रांतात बोलली जाणारी एक प्राचीन बोली आहे. गेल्या शतकापर्यंत तिच्यात लिखित साहित्य उपलब्ध नाही. मात्र मौखिक परंपरेने ही भाषा आपले अस्तित्व टिकवून आहे. वाडवळी संस्कृतीचा परिचय व्हावा या उद्देशाने ही कथा जन्मली आहे.**



आज शमिकाह्या लगीणाहा मुर्त. एकुलत्या एक भाशीही एकुलती एक आत्या. मयाराहा मान आत्याहा. कहा नखरा करू नं कही मिरवू अहे मीराला जाल्तं. हक्काळपासून तिही लगबग सुरू जाल्ती. मुर्ताह्या दिहा खास मराठी पेहेराव करव्याहा तिहा बेत ओथा. लाल नव्वारीवर कोल्हापूरी साज नं होन्याहं मंगळसूत्र, नाकात नथ, कानात बुगड्या, आथात गोठ पाटल्या. नं बरी आठवण जाली, तोरड्या मंजे पायात पायजण. मनाहारका हिणगार जुळून आला तहे मीराहं मन साप्याहारकं फुलून आलं.

तवड्यात आंग धोवून शमिका बायेर आली. माथं धोवलेली गोरीपान शमिका येकदम फ्रेश दिखतोही. मीरान शमिकाला नवीकोरी पांडरीशुभ्र साडीसोळी निहडली. तिह्या कपाळावर चंद्रकोर रेखली नं रोजाह्या फुलांही मुंडावळ बांदली. गळ्यातसा होन्याचा हार तिला खुलून दिखतोहा. आथात तोडे नं बोटात शारदोन होन्याहे वाळे. मीरेह्या लक्षात आलं, शमिकाह्या नाकात नथ नौती. तिन आपली नथ काडली नं लाडक्या भाशीह्या नाकात अडकवली. आता शमिका राजकुमारीहारकी राजस सुकुमार दिखव्या लागली. नैतरी वाडवळांहा सोमवंशी क्षत्रिय वंश राजवंशस हाय कने. यी आठवण ओथास मीरा सोताहीस खूश जाली.

मीराही पोरी जाई नं तिह्या मैत्रिणी नटूनथटून कव्वाय वाट पावतोह्या. आज जकल्या महिलामंडळान नौवार नेहव्याहा घाट घातलोहा. हजल्याधजल्या बायाबापड्या मस्त फुलून आल्त्या. शमिकान मोबाइल घेतला. जमलेल्या गोताहाबरोबर भराभर सेल्फी काडले. स्वताहे सेपरेट सेल्फी घेटले नं लग्गेस प्रणवला पास केले. प्रणवजून लाइक्सशी बरसात केली. नव्या नवरीह्या गालावर गुलाब रंगले. ती अजून गोड दिखू लागली.

वाजंत्रीवाल्यांही ताल घरला. पंचारती तयार झाली. गावदेवीला हळदकुंकू, मुंडावळ नं वेण्यागजऱ्यांहा हाजहिणगार घेतला. मीरेन पुजेहं तबक वैनीह्या आथात दिलं. नव्या नवरीला घेऊन नातेवाईकांहा गोतावळा गावदेवीहा आशीर्वाद घेव्या मंदिरात निंगाला. कॅमेरा घेऊन मिहीर धावला. रस्ता कहा हाजरागोजरा दिखव्या लागला. त्यात लगीणाह्या ओव्यांही अजून रंगत आली.

*''गावाश्शा देवतांनो । तुमी लगीणाला यावं ।*
*गरीबासं कार्य तुमी । सिद्दीस न्यावं ।।''*
*''नमियेला गणपती । आनंदे निश्चिती ।*
*पंचीतना प्रती। नमस्कार।।*
*आमा घरी कार्य । हळदीसा व्यवहार ।...''*

गीत गात जकले मंदिराह्या पायऱ्या सडले. आजी गातोही, *''शितळादेवीसं बैसणं। दर्याशे किनारी । नंदर ठेविते। बाळावरी।।'' ''देवीशा आरतीला । मणभर सूत । पळीभर तूप । आरतीला गे ।।''*

''ये शमिका.'' पुजाऱ्यान शमिकाह्या आथान देवीला हळदकुकू लावलं, माथ्यावर वेणी भरली नं देवीही ओटी भरली. देवीह्या पाया पडून शमिकान आशीर्वाद घेतला.

गावदेवीनंतर कुळदेवता एकवीराआई तहेस बरम्यादेव नं वाडीह्या बिज्या देवतांना आजीन आवाहन केलं.

लगीणघरा भटजींही मुर्ताहा सब्बन जामानिमा नीटशेनीट रसून ठेवलोहा. आजी, आईबाबा न वडीलधाऱ्यांह्या पायांना आथ लावून शमिकान वाकून नमस्कार केला. काका-काकीह्या सोबतीन शमिका पाटावर बहली. बामणाया मंत्रान वातावरण भारून गेलं, *''वक्रतुंड महाकाय। सूर्यकोटी समप्रभ। निर्विघ्नं कुरू मे देव । सर्व कार्येशु। सर्वदा।।''* जमल्या लोकांही आथ जोडून नमस्कार केला. गणपतीपूजन झाले. देवतं मांडली. आंगणात पायरीयामेरे मुरतमेड रोवली. कोहळापूजन झाले. उत्साहात जकली कामं पटापट मार्गी लागली. घरश्या वडीलधाऱ्यांही भटजींना नमस्कार केला. भटजी खुशीत आले,''गीतं चालू द्या तुमची.'' भटजींही यी सूचना जकल्यांना येकदम पसन पडली.

विशिष्ट लयीत एका सुरातील गीतं बायकांह्या ओठावर येन बहली,

*''होमा होमियेल्या । कर्दळीसे लोद ।। होमा होमीयेल्या। नारळाशी हेळी।। होमा होमियेल्या। उकरीशा माती।। होमा होमीयेल्या। गायीशा गोवऱ्या।। होमा होमियेल्या। सागाशा समिदा।। होमा होमियेल्या। वडाशा समिदा।। होमा होमियेल्या। पिपळाशा समिदा।। होमा होमियेल्या। लोण्यासी धार।। होमा होमियेल्या। तूपासी धार।।...''*

बामणान नवरीहे आईबाबा प्रकाश नं प्रीती यांना होमावर बहडीलं. होमकुंडात समिधांवर तेलतूपाहा वर्षाव होऊ लागला. होमकुंड रसरसून धगधगू लागलं. घूरान घर भरलं. डोळे सुरसुरव्या लागले. पण गीतांना खंड नय पडला. मांडवात बेंजोवर पोंरांहे पाय नासू लागले. लगीणघर खऱ्या अर्थान गाजू लागलं.

शमिकाला घेऊन सवाष्णींही पापड, वडे, कोळ्याह्या शिपा, होपारी, हळकुंडं, खारका घेऊन पाटा पुजला. उखळाही पूजा करून गहू, भात, मूग, मटकी अही धान्यं उखळात कांडीली. भटजीन फर्मान काडलं, ''चुलीची पूजा करा.'' मीरा हवली. सुलीही?...आता सूल कटे बगव्या

मिळे नय. मग गॅसशी पूजा केली. जात्यात धान्यं भरडली. लग्नानंतर शमिका गृहिणी होणार. प्रणवश्या जोडीन नवा सौसार थाटणार. दोगांना सूल, जातं, उखळ, पाट्याहे जीवनातसं महत्त्व कळंल पायजे. 'कशासाठी पोटासाठी' योस सब्बन सजीवांहा जीवनमंत्र! सवीढवीहे पदार्थ बनवव्याहे ते सुलीबरोबर जातं, उखळ, पाटा यांही साथ लागते.

''अहो, आता उखळ, जाते कोण वापरतेय? त्यापेक्षा मिक्सरची पूजा का नाही करत?'' जाईन बामणाला विसारलं. ''खरं आहे. शास्त्रात बदल केला पाहिजे.'' डोळे मिसकावीत बामण बोलला तहे जकलेस हवले.

''चला. चला. बोलण्यात वेळ दवडू नका.'' भटजीनं डोळे वटारले. ''आत्याबाई, मयारी मांडा चला.''

तही मीरा पट्कन धावली. कव्वापासून ती या क्षणाही वाट पावतोही. ''आतूबाय, मान नुसता मिळे नय. हजार रुपयांशिवाय हुटका नय तूही.'' जमलेल्यांही तिही फिरकी घेव्या सुरवात केली.

''तुमी हांगा बस. जे मागाल ते...'' मीरा खुशीत येऊन बोलली.

''आइस्क्रीम...आइस्क्रीम...'' पोरांही येकस मागणी केली नं मीरेन मान डोलवीली.

''हेअ....हे...हान्शी आइस्क्रीम...मीराआत्या आइस्क्रीम देणार..'' नासत ओरडत पोरं मांडवात पळाली.

मयाराहा मान मीराला आज पैल्यान मिळतोहा. मयारी कही मांडव्याही तिला कायीस मायती नौतं. मग शारदोन बायका तियामेरे बहल्या. त्यांही जे जे हांगतलं...मीरान तहेस केलं. पैल्यान वाटीत कुकू घेऊन भिथीवर स्वस्तिक व शुभचिन्हं कोरली. त्याखाली पाटाही रांगोळी काडली. शुभचिन्हांन सुशोभित केलेले दोन-तीन घडे आणले. येकात मूग-मटकी अही जकली कठोळं तहेस तूहाभरला भाथ, गव-साऊळ अहे धान्य भरलं. बिज्यात गूळ, तूप ठेवलं. त्यावर ढाखण ठेवलं. ढाखणावर लगीणाहा मोतीसूर लाडू, खजूर, खारका नं थोडे पैसे ठेयले. तिन मयारी मांडली. एकावर एक घडे रशिले नं त्यावर मातीहं मोठ्ठं कोडं मंजे पणती ठेयली. त्यात तेलवात घालून ज्योत उजळवली. लग्नकार्याहा विधी पूर्ण होईपरेत ही ज्योत अखंड जळती ठेववी लागेल. त्या भल्या बोठ्या कोड्यात मीरान लिटरभर तेल ओतलं. मयारी भरताना मीरा गातोही, *''भरली गं मयारी भरल्या पारी। भरली गं मयारी साऊळ होपाऱ्यांनी। भरली गं मयारी हळकुंडांनी। भरली गं मयारी हळदी कुकवांनी। भरली गं मयारी खणा लुगड्यांनी। भरली गं मयारी तेलातुपानी।''*

''भरली मयारी? आतूबाय रुसल्या का नय? आतूबायला काय कमी नय नं पडलं?'' मीरेला ढुशी देत निशामावशीन मुद्दामस कुरापत काडली. मयारी मांडताना पूर्वीही आतू उणीदुणी उकरून रुसवेफुगवे करतेहे, त्यावर निशान टोला मारलोहा. मीरा मात्र आज गोड हवली. मयाराह्या बाजूला पाट्यावर वडे, पापड, होपाऱ्या, हळकुंडं, कोळ्याह्या शिपा रसून त्यावर पिठाहे बारा दिवे लावले. तेलवाती नं कस्सं हूत ठेवून पास सवाष्णींही पाटा पुजला.

शमिकाहे मित्रमैत्रिणी कुतुहलभरल्या नजरेन आणि अपूर्वाईन लगीणाह्या रीती बगीतोहे. मीराला शमिकाया ठिकाणी सोताही जाई दिखू लागली. एमबीए केलेली जाई गेल्या वहरा पालघरला कॉलेजमन लागले. आता तीकरता जवायसा शोध घेवा लागेल. गेल्यास मैन्यात तिहा पंचविसावा वाडदिही मोठ्या थाटात केला. मीरेह्या मनात फोटोग्राफी करणारा मिहीर भरल्ता. प्रणव-शमिकाहा मित्र मिहीर इंजिनीअर ओथा. मिहीर एका इंटरनॅशनल कंपनीत कामाला हाय, अहे शमिका बोल्तोही. मिहीर जाईहे कवडे फोटो काडतोहा. जाईपण छान छान पोझ देते. ''ऐ, जाईचे फोटो घ्यायला आलायस की माझे?'' खोटंखोटं रागावून शमिका ओरडली त्याला. तो नुसतास हवला. जाई मात्र लाजून गेली. मीराला वाटलं, जाईला आवडत अहवा मिहीर. येकमंकांना साजेशे वाटतात खरे. पुडं का होईल देवालास मायती. मीरेन मनातश्या मनात शितळाईला साकडं घातलं. नुसत्या विसारानस मीराला हुरूप आला.

''हळद आली.'' शमिकाहा दादा, स्मितने वार्ता दिली. त्यासरशी ''नवरीला दपवा.'' अहा गिलका झाला. कोण्लास काय सुसेना. कटे दपवव्याहं हिला आता? पूर्वी घराघरात कळंगे अहव्याहे. कळंग्यात दपलेली नवरी शोधून काडताना हळद घेऊन येणाऱ्या नवऱ्याघरश्या मंडळींह्या तोंडाला फेस येव्याहा. हताश होऊन त्यांही पराभव जाहीर केला का नवरी हळूस पुडे येव्याही. आताह्या या नव्या घरात ती सोय रेली नय. मैत्रिणींही घाईघाईत शमिकाला जिन्याह्या मंगारी अडगळीत लोटलं. डोख्यावर बुरखा घेऊन शमिका त्या अडगळीत गुपसूप बहून रेली.

प्रणवशी बोठी बयीण सायली शमिकाला शोदव्या लागली. तिया मंगारी शमिकाह्या मैत्रिणी. येकमेकीही शिडवणा करीत त्या फिरकी घेऊ लागल्या. '' नवरी मिळेस नय अटे. तुमाना कैशी मिळते ती? कटे गेली कोन्जाणे? कळलेहेल तिला, नणंदबाई खाष्ट हात अहं. पळून गेली अहेल तुमश्या धाकानं.'' मैत्रिणींया चेष्टामस्करीला नुसता ऊत आल्ता.

''अहं काय! बगीतंस मी, कय पळून जाते ती.

सप्तपाताळात दपली तरी शोदून आणीन मी तिला.''सायली काय कमी नवती.

''हो...हो.... नवरीला शोदीलं नयते प्रणवदादा घरात घेईल का, अहा प्रश्न पडलेहेल बयणाबाईला. खरं का नय?''.

''तुमी कायपण बोला. मीन शमिकाला नय शोधून काडलं ते सायली नाव लावव्याही नय. शमिका, ए शमिका, हे बघ प्रणवजून तुकरता काय काय धाडले ते.''साईलीने शमिकाह्या नावान घोषा लावला.

माजरीला दुधाहा सुगावा लागवा तही ती जिन्याह्यापाठी गेली. जकली शिडीसूप रेली. डोळ्यांह्या खाणाखुणा जाल्या. शमिकाह्या कानाला पकडून सायली बायेर आली. मैत्रिणींह्या हवण्याला सीमा नय रेली.

सवाष्णींही शमिकाला पाटावर बहडीलं. वेणीफणी केली. वेण्या, गजरे घालून हाजहिणगार केला. कानात होन्याचे डूल घातले. शमिकाला हळदीही साडी दिली. आथात हिरवा सुडा सडविला. प्रणवशी उष्टी हळद शमिकाह्या अंगावर सडू लागली. सायलीहा गीताला बायकांही साथ दिली, *''आवडीसे ये लेणे। सौभाग्य सुंदर। हळदीने वधू-वर। सोबवीती।। सईबाई म्हणे। हळद सडवा। आनंद साठवा। रिदयात।। अक्षय हळद। सडविली सुंदर। करूनी नमस्कार। देवाजींना।।''*

हळदीहा सोहळा झाला नं पावण्यांना जेवणाला घेऊन गेले. थोड्या वेळान काकण घेऊन मामा आला. *''दूरी दूरशे आले आले मुमारे। येऊन उतरले पिपळाशा पारा। तय टाखिले गायित्रीशे हेणं। तय टाखिलं वाहत्या गंगेसं पाणी। त्यावर टाखिले वाकडे तिकडे कणे। तय होडिले कस्तुरी सुवास। त्यावर टाखिले संदनासे पाट। त्यावर टाखिल्या पितांबर घड्या।''*

उंबरठ्यावर शमिकाह्या आईन मामा-मामीहे दुधान पाय धोवले. पंचारतीनं ओवाळणी केली. नासत गात आनंदाहे सोहळे मिरवत काकण मंडपात आले. मामान भाशीला मायेन मेरे घेतलं. आथात काकण बांधलं. मामान दिलेला होन्याहा शेन पावून शमिका हरखून गेली. मामान दिलेले पारनेत निहून शमिका बोवल्यावर उभी रेणार ओथी. ''पिवळ्या रंगाला हिरवा जरीकाठ. किती मस्तय नं कॉम्बिनेशन!'' जाई ओरडली. शमिकाला वाटलं पैठणीह्या पदरावरसा मोरपण तिला बगून हळूस हवतोय.

निशामावशी शमिकाह्या गालाला हळद लावतोही. ती गुणगुणू लागली, *''हळदी शा प्याकळी...''* तिहे शब्द कानावर पडतास जोरदार हशा उहळला. त्या हवण्यात निशाव सामील झाली. ''ए, ए, आमशी आतू अहेस गीत गाव्याही. मंग मीन गावीलं ते तुमी केव हवलात?'' मिश्किलपणे तिरपा कटाक्ष टाकीत निशान विसारलं. पुन्हा जोरदार हशा उसळला. शमिका, जाई नं तिह्या मैत्रिणी तोंड आवळून बगितस रेल्या.

''हळदी शा प्याकळी म्हणजे गं काय मावशी?'' जाईन शंका उपस्थित केलीस.

''अगं, 'हळदी चाफेकळी 'असं असावं त्याचं मूळ शब्दरूप.'' निशान मराठीत एमे केल्तं, ते उप्पेगी पडलं, ''आपल्या वाडवळीत 'च'चा आपण 'स' किंवा 'श' असा उच्चार करतो. आपण चिंच म्हणत नाही...शिस बोलतो. एकोणिसाव्या शतकापर्यंत आपला समाज निरक्षर. सात-आठशे वर्षांपूर्वीची ही लगीनगीते, तरीही आज आपण गातो. ही सारी आपल्या आज्यापणज्यांची कृपा. त्यांनी हा वारसा आपल्यापर्यंत पोचवला. एकीचं ऐकून दुसरी गायला लागली आणि हा संपन्न वारसा वर्षानुवर्षे त्यांनी जतन केला. एवढी वर्षे मौखिक रूपात ही गीते चालत आली तेव्हा त्यात अपभ्रंशाचे गालबोट लागणे, हा काही दोष म्हणता येणार नाही. लिखित साहित्यातही कितीतरी अपभ्रष्ट रूपे आढळतात. मग आमच्या निरक्षर स्त्रियांकडून असं काही घडलं तर त्यात वाईट का मानावं?'' निशान खुलासा केला तहे जाई न तिह्या मैत्रिणी मोकळं हवल्या.

''हळदी शा प्याकळीमधून मूळ रूप 'हळदी चाफेकळी' शोधून काढलंत मावशी तुम्ही. वा! वा!! तुमचीही कमालच हं मावशी.'' तरुणमंडळी येकदम खूश झाली.

माम्या, मावशा शमिकाहे कोड पुरवीत गाऊ लागल्या, *''हळदी साफेकळी। राय रखुमाय नवरी।''* पुढची ओळ ऐकून शमिका गोंधळलीच. तिन विसारलं, ''रखुमाई? कोण? मी?''.

''अगं...आपली नवरी म्हणजे कृष्णाची रुक्मिणीच गं! चाफेकळीसारखी सुंदर...गोग्गोड...हळदुल्या रंगात न्हालेली...'' शमिकाह्या गोड मुखड्याला आथान ओवाळून सरूमामीन कानशीलावर बोटं मोडली.

''वॉव, म्हणजे मी रुक्मिणी...प्रणवकृष्णाची!'', शमिका आनंदात एकदम ओरडली.

त्या आनंदाही लागण जकल्यांना लागली. माम्या, मावशा, काक्या, आत्या यांना शमिकाला कटे ठेवू नं कटे नय अहे जालं. जकल्या गीतं गात हुटल्या...

*''मंडप घातला कोंडाणपुरी। कोंडाणपुरीशी भिमकाशी कन्या। भिमकाशी कन्या उभ्या माडीवरी। तिसं रूप देखोनी खुश जाले हरी।''* हळद लावलेली शमिका कृष्णाह्या

रखुमाईहारकी खरंस शोबून दिखतोही.

''अगं तिहं तेलवण पाडा. पोखण करा.'' आजीन आज्ञा केली. मग काय जमलेल्यांह्या ओठावर आपसुक गीत आलं, *''आणा गं पानं। नागवेली पानं।। एक पान सारा। दुसरं पान धरा।। पडे रे तेला। सूद का मूद।। ये तेलू पडे। एकवीरा देवी से अंगी।। ये रूप सडे। शमिकासे अंगी।।''*

नागवेलीह्या पानाला तेलतूप लावून अत्तर सोळून त्यावर तिळ, साऊळ, मूग ठेयले. ते पान शमिकाया माथ्यावर धरून सवाष्णीही तेलवण पाडलं. हळदकुकवात भिजविलेल्या अक्षता घेऊन शमिकाला पोखू लागल्या.

*''इत्रोडे तिळा तांदुळा। मुगा माथणीये। आधी पोखा गे माये। मंग मावशी ये।''* पोखण मंजे औक्षणच! ताटातील ज्योतीह्यां प्रकाशात शमिका रखुमाईसारखी खरंच उजळून गेल्ती. मीराला वाटलं, शमिकाही दीठ काढव्या पायजे.

तवड्यात बारक्या पोरांही रडारड कानावर आली. काकूही झोंबी घेत तिही पास वहराही नात इशा आकांत करतोही. ''माजं डोरलं... माजं डोरलं...''

अटे इशा घळघळा रडते ने जकली खळखळा आहतात अहे विजोड दृश्य निर्माण झालं. झाल्तं अहे का, नौवार साडीवर इशान डोरलं घातलोहं. वेषभूषा स्पर्धेत तिन मराठमोळ्या बाईहा वेष केल्ता. तवा तिन ते डोरलं घातलोहं. स्पर्धेत तिहा पैला नंबर आल्ता. तवापासून नौवार नेहली का त्यावर तिला डोरलं गळ्यात पायजेस. डोरलं म्हणजे काय, डोरलं गळ्यात कवा बांदतात, हे त्या निरागस मनाला कहं कळणार? खेळताखेळता तिया गळ्यात्सं डोरलं कय पडलं ते कळलंस नय. भगून यी रडारड. बिज्यांना मात्र हवू आवरे नय अही गत झाली.

जकली अवतात पण डोरलं कोणी देय नय भगून इशाला जास्तीस रडू कोसळलं.

''थांब तुला दुसरं डोरलं आणून देते.'' तिही आई, संगीतान तिही समजूत काढली.

डोरलं मिळे नय तोपरेत तिहं रडं थांबव्याहं नौतं.

आजीन त्यासन वाट काडली, ''ए, गौरण्यांना जेवण द्या सला आता.'' त्याबरोबर रडू विहरून ईशा आंब्याहं टाळं घेव्या धावली. वैशूदीदीह्या लगीणात पायलेली गंमत ती विहरली नवती. इशाला आथाला धरून जाई नं शमिकाह्या मैत्रिणी अह्या जकल्या गौरण्या मंजे कुमारिका पोरींना मीरेन गोलाकार बहडीलं. त्या कुमारिकांहा आदरसत्कार केला. लाडू-फरसाणाही डीश भरून प्रसाद त्या गौरण्यांना दिला. कलशात्सं पाणी हिपडून मीरेन गौरण्यांभवतीन प्रदक्षिणेहा फेरा धरला. लामणदिवा आथात घेऊन संगीता तिह्या पाठून फिरतोही. काकीन पदराला आंब्याहं टाळ बांदील्तं, टाळान जमीन झाडत काकी पाठून आली. इशाहं क्यातस लक्ष नवतं. भिरभिरत्या डोळ्यान ती बिजस काय तरी बगितोही नं तिला हवू आवरत नवतं. तवड्यात जमलेल्या बायकांही आंब्याह्या छोट्या डाळीन तिह्या पाठीवर हळूस फटका मारला. खदखदतस टुणकन इशा उठली. टाळ्या वाजवीत तिन आईह्या हातसं टाळं घेतलं नं जमलेल्या बायकांना मारत सुटली. तिला तो एक खेळस वाटतोहा नं ती त्यात मनापासून रमली. जमलेल्या जकल्या बायकांही इशाह्या खेळात मनापासून भाग घेतला. एक दुहरीला मारत हुटली. बायकांह्या जोरदार कलकलाटान घडखाभर कालवा झाला. मांडवातशी पुरुषमंडळी का जालं ते बगव्या आली नं तीव या कालव्यात सामील झाली.

'' उंबराह्या मानाला जवायाला बोलवा.'' तहा सब्बनांही वैशूदीदी नं तिह्या नवऱ्याला घेराव घातला. गेल्या महिन्यात त्याहं लगीण जाल्तं. मीरेन जवायश्या आथात उंबराही डाळी दिली नं खांद्यावर शाल टाकली. शालीह्या बिज्या टोकाला वैशूदीदीहा रुमाल बांधला. आथात आरतीहं ताट घेऊन वैशू नं सवाष्णी निंगाल्या. घडे घेऊन माम्या त्यांह्याबरोबर उंबराह्या पाण्याला निंगाल्या. बावीया मेरे उंबराही डाळी मातीत रोवली. त्या डाळीभोवती दीदीन रांगोळी टाकली. त्यावर पापड ठेवले आणि कणकेहा दिवा लावला. हळदकुकू लावून सवाष्णींही उंबराही पूजा केली. आरती करून तूपसाखरेहा निवेद ठेवला. नव्या जोडप्याला ओवाळले. मग माम्यांही बावीह्या पाण्यान घडे भरून घेतले. ढोलताशाह्या गजरात मामारणी नवरीया आंगोळीकरता पाणी घेऊन आल्या. तोवर रात्शे नऊ वाजून गेल्ते.

उद्या दहा वाजून वीस मिनिटांनी लगीणाहा मुर्त होता. गाणी गाऊन आणि मनसोक्त नासून रात जागवव्याही ओथी. स्मित नं त्याह्या मित्रमंडळान जाहीर केलं, ''शमिकाला घेऊन जकल्यांही आश्शा राती नासव्याहं हाय.''

आजीन आठवण केली, ''बायांदो, तिही दीठ काडव्या विहरू नका गे.'' दाराह्या उंबरठ्यावर शमिका बहली. मीरेन तिला गूळ केळ्याहा प्रसाद भरविला. नंतर काकीन तिह्या डोख्यावर शाल टाकली.

आजीह्या ओठावर अलगद गाणे आले, *''दीठा काडा गो आयांदो। दीठा काडा गो बायांदो।।''* मीरेन मीठमोहरी घेतली, थोडी सरूमामीह्या आथात दिली. उंबरठ्याह्या ऐलपैल उभ्या रेवून नासत गात दोग्वी शमिकाही दीठ काढू लागल्या.

हजलीधजली शमिका एखाद्या परीहारकी दिवसभर घरभर मिरवली.. लगीणाह्या विधी हमजून घेत त्यात तिन

भाग घेतला. मनापासून एन्जॉय केला यो सोहळा. आता मात्र थकून गेली. अजून उद्या उभं रेव्याहं हाय तिला.

शमिकाही या घरातशी यी शेवटशी रात्र. या घरसं ये लाडकं कौतुक उद्या परघरी जाईल. उद्यापासून ये घर तिला परकं होईल. जय जन्म झाला, लानपण सरून आपल्या पायावर उभं रेव्या, ज्या घरानं तिला पाठबळ दिलं, ते घर उद्यापासून तिहं मायेर होईलं.

लेक परघरी जाईल ते वैनीला काय वाटेल? प्रीतीवैनीही आठवण ओथास मीरेया मनात कालवाकालव झाली. धावत जाऊन तिन प्रीतीला मिठी मारली. प्रीतीला उमाळा फुटला. ''ए वैनी, रडव्याहं नय हं. '' सोताहे डोळे भरून येतोहे तरी मीरेन वैनीला दटावलं. आईला रडताना पावून शमिकाला रडू फुटलं. आईह्या कुशीत शिरून ती रडू लागली. मीरेहा उर भरून आला.

आजीन त्यांना वेंगेत घेतलं. ''अहे रडव्याहं ओथं ते पोरीहं लगीण क्याला काडलं प्रीती? शमिका, प्रणवला निरोप धाड...वराड घेन उद्या येव नोको.'' शमिका आजीह्या गळ्यात पडली.

शमिकाह्या माथ्यावरून आथ फिरवीत आजी सोताहीस बोलतोही जणू...''मनापासून जोडलेलं ये नातं. दोन घरांना एकत्र जोडणारा यो धागा. वडीलधाऱ्यांही विसारपूर्वक घेतलेला निर्णय. दोन्व्या घरांही जोडीन निभावून नेव्याहे... अहे ये नातं. एका नवीन जीवनाला सुरुवात करून देणारा यो सोहळा.. त्याकरता शमिकाबाई तुला दुखालाव साजरं करून गोड मानून घेवं लागेल. हाऊहहरा, देरजावा, नण्दाभासरं, हेजोळपाजोळ यांना आपलं करवं लागेल. दायदाणा जपून वापर. माहणाला हमजून घे. शिडयामुगल्यांपासून जकल्यांही काळजी घे. देव तुहं भलंस करील. तुही ओटी भरून पावेल.'' डोळे पुहीत आजीन शमिकाह्या माथ्यावर आथ ठेवले. शमिका आजीला जास्तीस बिलगली. दोग्वी येकमेकीही आसवं पुहीत हवू लागल्या.

शमिकाह्या आयुष्यात्सा टर्निंग पॉइंट यो. कुमारवयीन षोडशा नय रेली ती आता. तिह्या ओंजळीत बाईपणाहं नातं सोपवणारा यो सोहळा! सहजीवनाही सार्थकता अनभवावी भगून नरनारीला धर्मान दिलेली ही मान्यता. हेजोळकरी, आप्तेष्ट, हग्याहोयऱ्यांह्या साक्षीन प्रणव-शमिकाला नवजीवन उभारण्याकरता दिलेली समाजमान्यता.

जो निसर्ग आपल्यांना जन्म देतो, आपला पिंड वाडवीतो, त्याहे ऋण कहे फेडणार? माणूस हा निसर्गाहा घटक नय का? त्याहा जन्म कारणावीना कहा अहेल? निसर्गजीवनामन्शी मानवाही वेल विस्तारण्याही जबाबदारी कोण्शी? 'धर्म, अर्थ, काम, मोक्ष' हे शार पुरुषार्थ धर्मान मानले. ज्या विश्वात आपला जन्म झाला, त्या विश्वाहे शक्र आपल्या परीन आपल्या खांद्यावर वाहून नेण्याकरता सिद्ध करणारा यो सोहळा. विश्वाहं शक्र अखंड सालू रेवं भगून प्रत्येक जीवान आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे, अहे हांगणारा यो क्षण. त्याला धार्मिक अधिष्ठान देणारा यो सोहळा. योग्य वयात प्रत्येक नरनारीन हमजूनउमजून स्वीकारण्याहं व्रत ये.

लगीणाया सोहळ्याहं सारसर्वस्व आठवतास मीरेला खूप छान वाटलं. मांडवाह्या दूरश्या कोपऱ्यात तिन जाईला मिहीरबरबर वार्ता करताना पायलं. शमिकाह्या ते कव्वास लक्षात आल्तं. दोग्वीही नजर येकमेकींना भिडली. कायतरी हमजल्याहारक्या दोग्वीव हवल्या. पुडश्या येकदोन वहरात आपल्या घरा अहास सोहळा रंगात येल, अही खुणगाठ मीरेन मनाही बांदली. जाई परघरा जाईल या भावनेन ती व्याकूळ झाली. पट्‌कन तिन शमिकाला जवळ घेतलं. दोग्वींह्या डोळ्यांसन आसवं ओधळली. ती आनंदाही आसवं ओथी. त्यांही ती आसवं ओंजळीत घेतली. दोघी मनभरून हवल्या. मीरेन तिला शुभाशीर्वाद दिला.

जमलेल्या गणगोताला मीरेन नमस्कार केला नं आवाहन केलं,''उद्या बोवल्यावर सडेल तवा पार बदलून जाईल शमिकाहं जीवन. पोरीह्या माथ्यावर तुमा सब्बनांहा आशीर्वाद असू द्यावा.''

खाली वाकून शमिकान आजीला नं सब्बन वडिलधाऱ्यांना नमस्कार केला.

आजीन तोंड भरून आशीर्वाद दिला, *''इष्ट पुत्रा सौभाग्यवती भव ।''*

शमिका लाजून लाल झाली. बारा वाजून गेल्ते. आज तिला झोप कही येईल? प्रेमाह्या गोतावळ्यासन जरा बाजूला होत मित्रमैत्रिणींबरोबर नासव्या ती मांडवात पळाली.

**शब्दार्थ :**

खोट - दोष/वैगुण्य, मेरे - जवळ, जकले - सगळे, होयरिक - वाङनिश्चय, बिज्या - दुसऱ्या, सोताहीस - स्वत:शीच, रोजाही फुलं - झेंडूची फुले, कव्वाय - केव्हापासून, सूल - चूल, होपाऱ्या - सुपाऱ्या, हवली - हसली, कळंगा - कणगा, आथ - हात, दपव - लपव, अळद - हळद, रेली - राहिली, शिडवणा - चिडवणे, टाळ - आंब्याचे टहाळ, बाव - विहीर

**- प्रा. स्मिता पाटील**

बोलीभाषा विशेषांक

लेख

# आगरी समाजाची लोकसंस्कृती स्वरूप व परंपरा

डॉ. अविनाश पाटील

**आगरी बोलीभाषेची भाषिक वैशिष्ट्ये मूळ यादवकालीन प्राकृत भाषेशी निगडीत आहेत. संत साहित्यात आढळणारे कित्येक शब्द आगरी बोलीत आढळतात. ळ, ब, ज्ञ ही व्यंजने आगरी बोलीत वापरली जात नाहीत. प, फ, ब, भ ओष्ठ्य ध्वनी टाळण्याकडे अधिक कल असतो. आगरी बोली बंगाली भाषेसारखी मृदू व गोड आहे. यात म्हणी व वाक्प्रचाराचे भांडार विपुल आहे.**

**'आगरी बोली'** उत्तर कोकणातील सर्वाधिक प्रमाणात बोलली जाणारी बोली भाषा आहे. ही बोली प्रामुख्याने मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे, पालघरचा काही भाग, इगतपूरी, घोटी, नाशिक, धुळे, जळगावचा काही भाग, दक्षिणेस रत्नागिरीतील अठरा गावांत बोलली जाते. भाषा सहा मैलांवर बदलते या न्यायाने यात काही बदलही दिसून येतात. मूळ बोलीवर स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव असतो वेषभूषा, राहणीमान यातही वेगळेपणा दिसतो.

आगरी संस्कृती ही समृद्ध लोकसंस्कृती आहे. श्रम करणारा हा समाज बेडर आहे. त्यांचे सांस्कृतिक जीवन पारंपरिक वारशाने सधन झालेले आहे, आगरी समाजावर मुळातच शिक्षण व सांस्कृतिक संस्कार उशिरा सुरू झाल्याने त्यांनी आपल्या रूढी, परंपरा, लोकसाहित्य, लोकगीते, लोककथा यांचे जतन जीवापाड केले. अनेक राजसत्ता बदलत गेल्या त्याचा प्रभावही समाजावर होत असतो. सत्ताधीश आपली संस्कृती पराभूत समाजावर लादत असतात यांचाही प्रत्यय येतो. सातवाहन, यादव, बहामनी, मुस्लीम, इंग्रज इ. सत्ताधीशांनी महाराष्ट्रावर, कोकणावर राज्य केले. त्याचा प्रभावही आगरी संस्कृतीवर वेळोवेळी झालेला आहे. त्यामुळे या बोलीत या भाषांतील शब्दांचा समावेश आहे. कोकणातील अतिशय पुरातन, पण संपन्न समाज आगरी कोळी, ठाणे, रायगड, मुंबई भागात त्यांचे प्राचीन काळापासून वास्तव्य आहे. ऐतिहासिकदृष्ट्या आगरी लोक हे बिंबराजा यादव यांच्या सैन्यासोबत मुंगी पैठण येथून आले असे काही अभ्यासक मानत असले तरीही आगरी समाजाचे अस्तित्व सातवाहन काळापासून किंबहुना त्याआधीपासून कोकणकिनारपट्टीवर बहुसंख्येने होते. इतिहासकार डॉ. दाऊद दळवी याचे हे मत अधिक पटण्यासारखे आहे.

**आगरी संकल्पना :**

आगरी संस्कृतीचा अभ्यास करताना प्रथम तिचं स्थान, लोकसंस्कृतीची विचारधारा समजून घेणे गरजेचे आहे. 'आगर' या शब्दाचा अर्थ मोठी ठेव अथवा खजिना असा आहे. आगर शब्दांचा उल्लेख संतसाहित्यातही ठायी ठायी सापडतो.

*'सर्व सुखाचे आगर*
*बापरखुमादेवीवर!'*

ज्ञानेश्वर माऊलीने आपल्या अभंगात विठूरायाला सुखाचे आगर संबोधले आहे. सुखाचा मोठा ठेवा, अशा अर्थाने देवाला त्यांनी गौरवलेले आहे. संतशिरोमणी ज्ञानेश्वरमहाराजांच्या ज्ञानेश्वरीत हा आगरी शब्द येतो तो शेत किंवा खाचर या अर्थाने आहे. महाराष्ट्र शब्दकोशात संपा. यशवंत दाते यांनी आगर व आगरी शब्दासंबधी व्याख्या केलेली आहे. त्यांनी म्हटले आहे की रायगड जिल्ह्यातील आगरी ही सर्वात मोठी कृषक जात असून बागाईतदार म्हणून

प्रसिद्ध आहे.

मुंबई गॅझेटमध्ये मुंबईतील आगरी समाजाबाबत म्हटले आहे की The Agri of Maharastra are known as Agle and Kharpatil. They are distributed in the Kulaba (Raigad) and Thane Districts and in the subarban area of Bombay city. The population of Agri in Bombay Province according to the 1931 census was 2,65,285. They speak to Indo Aryan Language Marathi Agri Boli at Home as well as out side and use the Devanagri script.

बागाइतदार आगरी हा शब्द प्रथम इ.स.१२८९ साली नागांव (अलिबाग) येथील मराठीतल्या पहिल्या शिलालेखात आढळून येतो. मिठागरातील कामकरी असाही उल्लेख या समाजाबाबत आढळून येतो. आगरी मराठी भाषिक असले तरी त्यांची बोलीभाषा इतर कुणब्यांच्या भाषेहून बरीच भिन्न आहे. यादवकालीन प्राकृत भाषेचा प्रभाव त्यावर दिसून येतो. आगरी समाजावर मुळातच शिक्षण व सांस्कृतिक संक्रमण उशिरा सुरू झाल्याने त्यांनी आपल्या रूढीपरंपरा, लोकसाहित्य, लोकगीते, लोककथा यांचे जतन जीवापाड केले. अनेक राजसत्ता बदलत गेल्या त्याचा प्रभावही समाजावर होत असतो. सत्ताधीश आपली संस्कृती पराभूत समाजावर लादत असतात यांचाही प्रत्यय येतो. सातवाहन, यादव, बहामनी, मुस्लीम, इंग्रज इ. सत्ताधीशांनी महाराष्ट्रावर, कोकणावर राज्य केले त्याचा प्रभावही आगरी संस्कृतीवर वेळोवेळी झालेला आहे. आगरी मुळात कष्टकरी जमात आहे. खाड्यांच्या कडेकपारीत त्यांनी आपले बस्तान मांडले आहे. आता हे किनारे सेझसारख्या किंवा एम.आय.डी.सी.सारख्या, सिडको, म्हाडा, हुडको, शहरीकरणाच्या प्रकल्पानी व्यापल्याने आगरीसमाज भूमिहीन होऊ लागला आहे. नामशेष होत आहे. त्यामुळे त्यांची संस्कृती व इतिहास जतन करणे गरजेचे आहे. अलीकडे शिक्षणाबाबत हा समाज खूप जागृत झाला आहे. अनेक क्षेत्रात आगरी मुले-मुली नाव कमावत आहेत. समाजकारण, प्रशासन, राजकारण, उद्योगव्यवसाय, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान अशा अनेक ठिकाणी आगरीलोक आपला ठसा उमटवित आहेत. आजकाल समाजाच्या राहाणीमानातही बदल होत आहेत.

**आगरी पोटजाती :**

ऐतिहासिक काळात आगरी लोकांचा उल्लेख आगळे, कुणबी, बाजे, कोळी असा आढळतो. मराठा आरमारावर लढणारे व तराफेवाले लोक आगरी मोठ्या प्रमाणात होते. आगरी समाजातील काही पोटजाती जरी आज कालबाह्य झाल्या असल्या, तरी उपलब्ध माहितीच्या आधारे व ज्ञानकोशकारांनी वर्णन केल्याप्रमाणे या जातीचे ढोबळ मानाने खालील प्रकार अस्तित्वात होते. मीठ आगरी, वरप आगरी, सोन आगरी, नवे मराठे (धर्मांतरित) आजकाल फक्त दसआगरी किंवा कराडी आगरी असे पोट प्रकार पनवेल व सफाळे / पालघर भागात तुरळक प्रमाणात आढळून येतात.

पाथरवट ही आगरी जातीची शाखा समुद्रापासून दूर राहणारी आहे. केवळ मिठागर किंवा शेतमळ्याशी संबध आलेला आगरी एवढाच मर्यादित संदर्भ न घेता इतर स्थळी राहणारा समाजही विचारात घेतला पाहिजे. गो.बा. मोकल आगरी समाजाविषयी आपली भूमिका मांडताना लिहितात की, आकर म्हणजे खाण. खाणीत काम करणारे म्हणजे आगरी. यातून पाषाणशिल्प अस्तित्वात आले. मूळचे हे क्षत्रिय लोक. पैठण नेवासा या ठिकाणी वस्ती करून राहिले. राष्ट्रकूट, चालुक्य, यादव या राजांनी त्यांना आश्रय दिला. द्रविडांपासून त्यांनी दाक्षिण शैली व त्याची राजस्थानी शैली या दोहोंचा वापर करून जगन्मान्य शिल्प तयार केले. त्यांनी पाषाणातून भव्यदिव्य मूर्ती, मंदिरे, किल्ले, गुंफा, स्तंभ, प्रासाद, कोट बांधले. त्यांना आगरी पाथरवट असे म्हणतात.

आगरीसमाजाची १९३१च्या जनगणनेत गणना केली गेली. त्या वेळी २,६५,२८५ इतकी एकूण आगरी लोकसंख्या होती. त्यानंतर जातिनिहाय लोकसंख्या उपलब्ध झाली नाही व जातिनिहाय गणना सध्या केली जात नाही. पण ती करण्याचा शासनाचा विचार आहे असे निदान वृतपत्रातील बातम्यांच्या आधारे स्पष्ट होते.

मुंबईतील आगरीसमाजाची लोकसंख्या १९३१ साली २,६५,२८५ इतकी होती. आगरी जातीची गणना त्यानंतरच्या जनगणनेत स्वतंत्रपणे झाली नाही. परंतु आता ही संख्या अंदाजे ६० ते ७० लाखापर्यंत झाली असावी. लोकनेते मा. दि.बा. पाटील यांच्यामार्फत स्वतंत्रपणे अशासकीयपणे आगरी जातीची गणना करण्याचा उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला गेला; परंतु अपुरे मनुष्यबळ व अपुरे आर्थिकबळ यांच्या अभावी आगरी जनगणनाप्रकल्प तडीस जाऊ शकला नाही. त्यामुळे आगरी समाजाची निश्चित लोकसंख्या उपलब्ध होऊ शकली नाही. आता ओ.बी.सी.ची गणना करावी अशी मागणी अनेक संघटना

शासनाकडे करीत आहेत. एखाद्या समाजाची / जातीची खरी माहिती मिळण्याकरिता अशी खरी आंकडेवारी खूप उपयुक्त ठरते. महाराष्ट्राखालोखाल गुजरातमध्येही आगरी समाज विखुरलेला आहे. दक्षिण कोकण व गोवा येथेही आगरी समाजाचे अस्तित्व आढळून येते. रत्नागिरी जिल्ह्यातही अठरा गावे आगरीसमाजाची असल्याचे आढळून येते. परंतू त्याच्या रीतीरिवाजात फरक आढळून येतो. लोकसाहित्य व बोलीतही प्रादेशिकतेनुसार फरक दिसून येतो. आगरी समाजाचे केवळ मिठाशी नाते पूर्णत: जोडता येत नाही. आता अन्य समाजही त्यात पारंगत होत आहे. आगरी ही कोलीयवंशाशी जोडले गेलेली जात आहे; परंतू त्यास कोळी जातीसारखी विशेषता मिळत नाही किंवा मागासवर्गीय समजली जात नाही. सन १९११मध्ये कुलाबा (रायगड जिल्ह्यात १,१६,७११, ठाणे जिल्ह्यात ९६,५४८), जंजिरा (मुरूड) २०,२९४ अशी २,३३,५५३ इतकी आगरी लोकसंख्या उपलब्ध होती. मुंबई वृतांत या ग्रंथानुसार १८८१ साली मुंबईतील जनगणनेनुसार मुंबई शहरात आगरी ६,६२३, मीठआगरी १,७३२, आगरी पाथरवट १५४ व कुणबी आगरी ५६,५९३ अशी लोकसंख्या होती.

नाशिकमध्येही आगरी पाथरवटसमाज बहुसंख्येने राहत असून पंचवटीला आगरी पाथरवटसमाजाचा खूप मोठा विस्तार आहे. पेशव्यांचे सरदार नारो शंकर यांनी मंदिरे, घाट व विहिरी बांधण्यासाठी या समाजाच्या शिल्पकार, कारागीर यांच्या गुणवत्तेचा उपयोग करून घेऊन राजाश्रय दिला. भोर संस्थान, पुणे जिल्ह्यात, मावळमध्ये, तसेच दक्षिणेत उत्तरेतही आगरी समाज आढळून येतो. पाकिस्तानात कराची शहारातही दर्यावर्दी आगरी समाज राहत होता. शहरीकरणामुळे मुंबईतील आगरी शेतकरी आपल्या जमिनी विकून, ठाणे, रायगड (कुलाबा) येथे स्थलांतरित झाला. स्वत:च्या भूमीतून परागंदा झाला. हे आगरी लोक स्वत:चे आडनाव अभिमानाने मुंबईकर असे लावतात. मुंबईतसुद्धा ५२ खेडी होती. चूभूर चेंबूर, कांधीवली कांदिवली, देवनेरे देवनार, भायखळा, नागपाडा, आगरीपाडा, वेरोळी वरळी, दादर यासारखी प्राचीन गावे आगरी वस्तीची होती. कोळभाट कुलाबा येथेही मोठ्या प्रमाणात आगरीसमाजाची वस्ती होती. आगरी मूळ रहिवासी चौदा पाटील म्हणून उल्लेखले जातात. मुंबईतील आगरीसमाज हा फार मोठ्या जमिनीचा मालक होता. दादर-परळगाव भागातील जमीन कसणारा आगरी समाज होता, जो आज मुंबईतून नामशेष झाला आहे व आता नवी मुंबईतूनही त्याला नव्या शहरीकरणाने भूमिहीन केला आहे. मुंबई ही बावन्न गावांची असल्यामुळे येथील आगरी स्वत:स बावन्न पाटील संबोधून घेण्यात भूषण मानत असतात.

**आगरी राहणीमान :**

पूर्वीच्या काळी आगरी लोकांची घरे चौकोनी असत. पुढे ओसरी (ओटी), मधील खोली स्वंयपाकघर, भाताची कोठी व घराच्या अर्ध्या भागात गुरांसाठी गोठा असे. विटांच्या भिंती, केंबळीचे (पेंढ्याचे ) छप्पर असे. काही सधन लोकांच्या घरावर मंगलोरी कौले असत. ओटीवर आल्यागेल्या पांथस्थाला आसरा मिळत असे. घरात एकत्र कुटुंब असे, चारचार भाऊ त्यांची पोरेबाळे, लेकीसुना असा मोठा परिवार एकत्र नांदे. पूर्वी एकत्रित कुटुंबपद्धती अधिक रूढ होती.

बहुतेक आगरी लोक सावळे व बांध्याने मजबूत असतात. पुरुषाचा वेष पाटलोण, सुरके, लंगोटे, सदरा, बंडी, कब्जा किंवा लोकरी कोठ्या. विशेष प्रसंगी कासेचे धोतर, कोट वडीलधारी मंडळी परिधान करतात. स्त्रिया आडवे नऊवारी लुगडे नेसतात. डाव्या बाजूने आडवा पदर घेतात, काळा लोकरीचा घोंगडीसारखा खोंडा डोक्यावर घेतात. हा बायकांच्या डोक्यावरचा खोंडा (खोंडी) विशेषत: पेण, अलिबाग तालुक्यातच आढळून येत असे.

भात, मासे, मांसाहार हे जरी आगरी समाजाचे प्रमुख अन्न असले, तरी बरेचसे लोक अलीकडे वारकरी संप्रदाय अथवा स्वाध्यायपरिवार व समर्थ सांप्रदाय या पंथात गेले आहेत व शाकाहारी बनले आहेत. समर्थ संप्रदाय, जीवनविद्या यासारख्या समाजप्रबोधनात्मक उपक्रमामुळे आध्यात्मिक उन्नती होऊन लोकांच्या मनाची शेती नांगरण्याचा उपक्रम झालेला दिसून येतो. शाकाहाराचे प्रमाण वाढून सात्त्विकतेकडे हे लोक वळलेले दिसतात. गावोगावी मोठ्या प्रमाणात हरिनामसप्ताह साजरे होतात.

आगरी समाजात मुलांमुलीची लग्ने विचारपूस करून केली जातात. अलीकडे काही संस्था वधूवरमेळावे घेतात. इंटरनेटवरही जोडीदार शोधण्याचे साधन उपलब्ध झाले आहे. आंतरजातीय विवाह समाजात मान्य केला जात नाही. त्यावर गावकी बहिष्कार टाकते किंवा दंड करते. शहरातल्या समाजात मात्र ही शिथिलता आलेली दिसून येते. देण्याघेण्याचे हुंड्याचे प्रस्थ आगरी समाजात नाही. किंबहुना हुंडा घेणे ही पद्धतच आगरी समाजात नाही. आताचे हळदी, साखरपुडे खर्चिक झाले आहेत. पैशाची आवक वाढल्याने अनावश्यक रूढी बोकाळल्या आहेत. दारू-मटणावर खर्च

होतो. त्यातून समाज बदनाम होतो, जे बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आगरीसमाजातील विवाह हा औत्सुक्याचा विषय आहे. लग्नातील प्रत्येक विधी धार्मिक परंपरेने सजलेला असतो. काळानुरूप बाह्यबदल ह्या सोहळ्यात होताना दिसत असले तरी आंतरिक गाभा किंवा आत्मा तोच आहे. आगरी बोलीत धवळे केवळ वरासाठीच गायले जात नाहीत तर वधूसाठीही गायले जातात. उलट वधूसंबधीचे धवळे हे अधिक भावनात्मक व काव्यात्मक असतात. धवळे गाणाऱ्या स्त्रियांना धवलारी म्हणतात. असे भारतीयसंस्कृती कोशात म्हटले आहे. महानुभाव पंथात गोविंद प्रभूच्या आज्ञेने महादंबेने प्रथम धवळे गायले. आगरी बोलीवर यादवकालीन भाषेचा व संस्कृतीचा गहिरा प्रभाव आहे. हे धवळे आजही आगरी बोलीत गायले जातात. त्याशिवाय आगरी लग्ने साजरी होत नाहीत. असे विविध विधीचे अप्रतिम धवळे उपलब्ध आहेत.

**आगरीसमाजातील जन्मविधी :**

मूल जन्मल्यावर त्यास सूपात घालतात. मूल जन्माला आल्यावर बारा दिवसाचा सुयेल (सुतक) पाळतात. मूल तीन दिवसाचे झाले की लाठा करतात, त्याकरिता तांदळाच्या पिठात गूळ मिसळून मुटके करतात, घुगऱ्या वाटतात. कल्याण-डोंबिवलीकडील ग्रामीण भागात लाठ्याला 'तिजोरा' म्हणतात.

गाता उजाळणी ही त्यातीलच एक प्रथा. खाटेच्या कडेच्या ज्या लांब लाकडी पट्ट्या असतात, त्यांना गाता असे म्हणतात. तांदळाच्या पिठाचे छोटे गोल आकाराचे थापटे वाफेवर शिजवलेले असतात. कापसाच्या वाती तेलात भिजवून त्या थापट्यांवर ठेवतात. त्या खाटेच्या गातांवर चारही बाजूवर ते थापटे ठेवतात. त्या वाती पेटवितात. त्याला गाता उजाल्ली असे म्हणतात. यावेळी सोईण (सुईण) मावशी बाळाला म्हणते ते संस्कार महत्त्वाचे आहेत.

*आगीला भिऊ नको*
*वाघाला भिऊ नको*
*आशीला भिऊ नको*
*बापासला भिऊ नको*
*ठपकला भी.*

म्हणजे बाळा तू विजेला भिऊ नको, गाजेला म्हणजे दर्याच्या लाटांना भिऊ नको, आगीला, वाघाला, आईबापाला भिऊ नको, पण ठपकला म्हणजेच अब्रूला / इज्जतीला घाबरून रहा व जप असा उपदेश बाळाला केला जातो. गरीब असलास तरी अब्रूदार म्हणून जग. सुईणमावशी असे सांगते व संस्कार करते व अंगारा लावते.

**गावजत्रा :**

कार्ल्याच्या एकवीरेची यात्रा आगरी समाजास विशेष प्रिय असते. यानंतर हनुमानजयंती येते, गावोगावी जत्रा भरतात. पालख्या, उत्सव, सप्ते साजरे होतात. हेळकोटी उभारतात, लेपे काढतात. हेळकोटींची सासण काठ्यांची स्पर्धा, विशेषत: गडब, वाशी, पेण येथील खूप प्रेक्षणीय असते. आगोटीपूर्वीच्या खरेदीकरिता या यात्रा, उत्सवाची ग्रामीण समाजाला पर्वणी असे. काही गावात एका ठरावीक दिवशी सर्वसंमतीने गावजत्रा करतात. गावातील देवाचे मान देतात, अर्थात तो कोंबडे, बकरे याचा असतो. गावाच्या वेशी पूजतात, तरवे काढतात व नैवेद्य घाऱ्या (वडे) केल्या जातात. नातेवाईक व लेकीबाळींना यावेळी माहेरी बोलवले जाते. पावसाळ्याच्या सुरुवातीस आगोटीपूर्वी शेतीभातीची कामे सुरू होण्याअगोदर शेतावरील देवांची, भूताखेतांची शांती केली जाते, मान दिला जातो, त्यास गावजत्रा असे म्हणतात. यानंतर येते नारळी पुनव.

पावसाळ्यात मच्छीमारीच्या हंगामाची सुरुवात या दिवसापासून होते. दोन महिने मच्छीमारीला असलेली बंदी या दिवशी संपते. नांगरून ठेवलेल्या आपल्या होड्या आगरी, कोळी या दिवशी समुद्रात लोटतात. दुसरी विशेषता ही की, नारळी पौर्णिमेमुळे लोकांना वृक्षारोपणाचे महत्त्व पटते. आगरी कोळीलोक वाजतगाजत दर्यास नारळ अर्पण करतात. वादळवाऱ्यापासून रक्षण करून दर्याने शांत व्हावे म्हणून व नवी झाडे उगवावीत, म्हणून हा वृक्षारोपणाचा संदेश देणारा सण साजरा होतो.

**गौरीगणपती व दिवाळी :**

भाद्रपदात कोकणात गणपतीउत्सव धूमधडाक्यात साजरा होतो. लोकमान्य टिळकांनी श्रीमंतांच्या दिवाणखान्यात बंदिस्त असलेला गणेशोत्सव सार्वजनिक केला. आगरी गावात घरोघरी गणपती मांडतात. कोकणात आगरीसमाजात गणेशोत्सवाची लोकप्रियता अधिक आहे. चाकरमानी या सणाची वाट आतुरतेने पाहत असतो. जाखडी नाच नाचायला गावाला येतो. गौरीगणपतीची विपुल लोकगीते आजही आगरी समाजात बोलली जातात. नवी मुंबईत बेलापूर, आग्रोळी, धाकटा खांदा या गावात 'एक गाव एक गणपती' ही संकल्पनाही अनेक वर्षांपासून आजही पाळली जाते. घरात कुणीही गणपती मांडत नाही.

आगरीसमाजात दिवाळी शेतकऱ्याचा राजा,

बळीराजाच्या स्मृतीसाठी साजरी केली जाते. दिवाळीही बलीप्रतिपदेस रात्री शेकोटी पेटवून त्यात बोधी छोटा खेकडा अथवा पिठाची चिंबोरी टाकून तीस काठीने मारीत व घोणी विंचूस मारीत म्हणतात–

*घोण घोण इंचू*
*बळीचा राजा!*

आगरी गावात पहाटे घरातला सगळा उंबरा, चुलीतली राख कटोऱ्यात भरून, चिरबुटात पणती करून पायवाटेवर नेऊन ठेवतात व करुणा भाकीत म्हणतात, इरा पिरा जावू दे अन् बळीचं राज येऊ दे! शेतकऱ्याचा राजा बळीराजा त्याची आठवण या दिवशी केली जाते.

ठाणे जिल्ह्यात, पालघर जिल्ह्यात बळीला पाताळात गाडण्याची प्रथा आहे. अंगणात दारापुढे कना (रांगोळी) काढून त्यावर पिऱ्हा (पाट) ठेवतात. पाटाशेजारी तांब्या नारळाचा करा ठेवतात. खराट्याच्या काड्यांमध्ये रोजाची फुले ओवून त्या नारळाच्या शेंडीत खोचतात, पाच बोथ्था असलेला निवडुंग घेऊन त्यांच्या पाच फांद्यांत दिवे लावतात व तो 'बळी' म्हणून जमिनीत गाडतात. बळीची पूजा कोकणात सर्वसामान्यांचा राजा, शेतकऱ्याचा राजा म्हणून केली जाते. पुराणात या बळीराजाचे वर्णन दैत्य, राक्षस असे वर्णिले आहे. ते एकांगी वाटते.

**होळी (शिमगा) :**

आगरीसमाजात व कोळी समाजात होळीउत्सवास विशेष स्थान आहे. फाल्गुनाच्या शुक्लपंचमीपासून सावरीच्या झाडाचे, काही ठिकाणी आंब्याचे तर अलिबाग, मुरुड भागात केळीचे अथवा सुपारीचे छोटे झाड व्हलुकरे म्हणून पूजेसाठी जमिनीत रोवतात. आगरी बोलीत होळीस 'हावलुबाय' म्हटले जाते. होळी पेटवताना गावच्या पाटलाला उघड फाके देता येतात. अर्वाच्य, अश्लील बोंबा मारल्या जातात. मनातली मळमळ ओकण्याचा हा सण असतो. या दिवशी सारे माफ असते. शिव्या ओव्या असतात, हे सारे शिमग्यात असते. दुसऱ्या दिवशी सोंगे काढली जातात. गावभर बोंबा मारीत पोरे फिरतात. पोस्त मागायला दाराशी येतात.

*खोय खोय खोबोटी*
*उंदरानी न्हेली लंगोटी*
*आयनाचे बयना ।*
*घेतल्याबिगर जाय ना ।।*

शिमगा म्हणजे लोकोत्सव असतो. धुळवड रंगपंचमीला साजरी होते. होळीची विपुल लोकगीते आगरी बोलीत उपलब्ध आहेत. परंतु कालपरत्वे नवी पिढी ते विसरू लागली आहे.

**आगरी बोलीची भाषिक वैशिष्ट्ये :**

भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण भाषातज्ज्ञ गणेश देवी यांनी केले आहे. इंग्रजीच्या आक्रमणामुळे प्रांतिक भाषा व बोलीभाषा नष्ट होऊ घातल्या आहेत. याबाबत ते लिहितात की, भाषा ही एक अशी महत्त्वाची गोष्ट आहे, जिच्यामुळे माणूस निसर्गापासून, इतर प्राण्यापासून अधिक प्रगत ठरला आहे. सांस्कृतिक भांडवलामधला भाषा हा महत्त्वाचा घटक आहे. या महत्त्वपूर्ण भांडवलाच्या (भाषेच्या) निर्मितीची प्रक्रिया गेली पाच लाख वर्षे सातत्याने सुरू आहे. आता मात्र आपण हे भांडवल (बोलीभाषा) गमावण्याच्या टप्प्यावर येऊन पोहोचलो आहोत. बोली भाषा वेगाने नष्ट होत आहेत. त्या लिखित स्वरूपात जतन केल्या पाहिजेत. महत्त्वाची गोष्ट नमूद करावीशी वाटते की याबाबत आगरी बोलीत नवी पिढी जोमाने लिहीत आहे. विविध माध्यमांत प्रकट होत आहे. शंकर सखाराम, परेन जांभळे, अरुण म्हात्रे, मोहन भोईर, डॉ. अविनाश पाटील, भानुदास पाटील, गजानन म्हात्रे, इ.नी आगरी बोलीत सकस लेखन केले आहे. कै.प्रा. शंकर सखाराम यांची आगरी बोलीतील सेझ कांदबरी मुंबई विद्यापीठाने अभ्यासक्रमासही लावली होती. आता आगरी बोलीतील कथा व कविताही 'आगरातील वाटा' मुंबई विद्यापीठाने एस.वाय.बी.ए.चा ऐच्छिक विषय म्हणून समाविष्ट केला आहे. आगरी बोलीची साहित्यसंमेलनेही साजरी होतात. तीही सरकारी अनुदानाशिवाय लोकाश्रयावर होत असतात. यामध्ये नव्या ग्रामीण लेखकांना व्यासपीठ मिळते. बोलीभाषा जिवंत ठेवण्यास ते गरजेचे आहे.

आगरी बोलीची भाषिक वैशिष्ट्ये नमूद करावयाची तर ती मूळ यादवकालीन प्राकृत बोलीशी निगडित आहे. संत साहित्यात आढळणारे कित्येक शब्द आगरी बोलीत आढळतात. जंव चाले मोठा धंदा तंव बहीण म्हणे दादा (संत तुकाराम) लांबा उगवे आगरी (ज्ञानेश्वरी) लांबा म्हणजे शेतातील तण. आगरी शेतकरी आजही हा शब्द वापरतात. ळ, ण, ज्ञ ही व्यंजने आगरी बोलीत वापरली जात नाहीत प, फ, ब, भ हे ओष्ठ्य ध्वनी टाळण्याकडे अधिक कल असतो. ही बोली बंगाली भाषेसारखी मृदू व गोड आहे. यात म्हणी, वाक्प्रचारांचे विपुल भांडार आहे. या म्हणी मराठी साहित्याला नव्या आहेत. उदा. खारीन नय खोसा न घराला नय वासा (अत्यंत गरीबी) व्हरका घराला नय ठेवी फरका (वाळूचा मचवा कधी पैसा देतो तर कधी नुसकान करतो)

दर्यान मासा न घरान भरोसा (जीवनाची अनिश्चितता व्यक्त करणे). पालघर भागातील दस आगरी बोलीही आगरी बोलीची उपशाखा आहे. त्यांचे हेल व शब्द आदिवासी बोलीच्या सारखे आहेत हे त्याचे वेगळेपण आहे. भाषा सहा मैलांवर बदलते, तसे त्यातील भौगोलिक बदलही दिसतात. आगरी बोलीही त्याला अपवाद नाही. पेण-अलिबागची आगरी बोली व नवी मुंबई-उरणची बोली, वसई-पालघरची आगरी बोली यामध्ये उच्चार हेल, शब्द यात थोडाफार फरक होतच असतो. अलिबागमध्ये कोयता शब्द भिंवडीमध्ये कोता म्हणून उच्चारला जातो. अशी भाषिक बदलाची अनेक उदाहरणे देता येतील. ग्रामीण बोलीत दीर्घ उच्चार टाळण्याकडे अधिक कल असतो.

**आगरी बोलीतील नवसाहित्याचा उन्मेष :**

मराठी साहित्यात लिखित आगरी बोलीचे आगमन अगदी अलीकडे झाले. परंतु आता नव्या जोमाने आगरी बोलीत, कथा, कादंबरी, कविता, ललित, आत्मचरित्र असे विविधांगी लेखन केले जात आहे. १९७०नंतर ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रात फार मोठी चळवळ निर्माण झाली. स्वातंत्र्योत्तर काळात खेडे वरवर बदललेले दिसत असले तरी ग्रामीण भागातील प्रश्न मात्र बदललेले दिसत नाहीत. गावगाडा बदलला तरी तो शोषण, विषमतेच्या गाळात रुतला गेला. शहरे झपाट्याने वाढू लागली. औद्योगिकीकरणामुळे शासकीय यंत्रणेच्या गरजेमुळे नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. खेड्यातील माणसे पोटासाठी शहरांकडे धावू लागल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीचा पगडा त्यांच्या मनावर पडलेला होता. ग्रामजीवनाचे स्वरूप चितारण्यासाठी १९६० ते १९७५नंतर ग्रामीण लेखकांना सामाजिक जाणिवेने लिहावेसे वाटले. ग्रामीण कथा, कादंबरी, नाटक अशा विविध वाङ्मयप्रकारात बदलत्या जाणिवा, अनुभव, वेदना, संवेदना चितारल्या जाऊ लागल्या.

उपलब्ध साधनानुसार आगरी बोलीत लेखन करण्याची सुरुवात पेझारी अलिबाग येथील कै. म.ना. पाटील यांनी केलेली आढळून येते. रसमाधुरी (१९६५), खलाटी (१९८०) ही पुस्तके त्यांनी लिहिली. आगरी बोलीचे आगमन अगदी अलीकडे झाले. परंतु आता नव्या जोमाने आगरी बोलीत, कथा, कादंबरी, कविता, ललित, आत्मचरित्र असे विविधांगी लेखन केले जात आहे. १९७०नंतर ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रात फार मोठी चळवळ निर्माण झाली.

ग्रामीणता आणि प्रादेशिकता यावर भाष्य करताना डॉ. म.सु. पाटील म्हणतात, आज आपण ग्रामीण, प्रादेशिक असे दोन शब्द वापरतो. खरंतर त्यामध्ये आपणास सुस्पष्ट भेद आजपर्यंत दाखविता आला नाही. ग्रामीण जीवन हे ग्रामीण व्यवसाय आणि ग्रामसंस्था यांच्या चौकटींनी अधिक नियमबद्ध असते. त्यामुळे या जीवनात प्राकृतिक वृत्ती व प्रवृत्ती, तसेच त्याच्याशी निगडित अशा भावभावना अधिक दृग्गोचर होतात. या चौकटीत जीवन जगणाऱ्या समूहाइतका जोरकसपणा असण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे अशा जीवनातील नाट्य पकडताना सामान्यातील एखाद्या असामान्य व्यक्तीवर लेखकाला आपले लक्ष केंद्रित करावे लागते आणि बाकी साऱ्या गोष्टी पार्श्वभागी ठेवाव्या लागतात.

आगरी बोली एक नादमधुर बोली आहे. ठाणे, रायगड जिल्ह्यातील खारेपाटात खाड्यांच्या टापूत समुद्रकिनारी वसलेला आहे. आगरीसमाज आपल्या सुखदु:खाच्या कथा आपल्या लोकसाहित्यातून व्यक्त करीत असतो. नव्याने शिक्षित झालेला समाज अलीकडे आगरीसमाजाचे भावविश्व, त्यांच्या वेदना, संवेदना शब्दांत साकारू लागला आहे. विविध प्रकल्प, शहरीकरण, औद्योगिकीकरण यामुळे जमीन विक्रीस निघत आहे. गरजेपेक्षा जास्त पैसा हाती येतो आहे. आर्थिक समृद्धी किंवा येणाऱ्या पैशांच्या ओघात नातेसंबध दुरावत आहेत. पैसा विनाश घेऊन येतो. श्रद्धा, अंधश्रद्धा, नैसर्गिक आपत्ती, सामाजिक विषमता, संघर्ष, राजकीय, आर्थिक शोषण यामुळे नातेसंबधातला तणाव, कोसळणारा ग्रामव्यवस्थेचा डोलारा, पुढच्या पिढीस जगायला आधार उरणार नाही असे अनेक प्रश्न शंकर सखाराम यांची सेझसारखी कादंबरी मांडते. डॉ. अविनाश पाटील यांची 'वस्ती नसलेले गाव', प्रा. वासंती ठाकूर यांच्या 'ऊफल्या', अनंत पाटील यांची 'रायता', इत्यादी कादंबऱ्यांनी आगरी समाजसंस्कृतीच्या दर्शनाने वेगळेपण सिद्ध केले. आगरी साहित्यिकांनी आगरी बोलीचे नवे भावविश्व मराठी सारस्वताला दाखविले आहे. नवा अनुभव त्यामुळे मराठी साहित्यात रुजू झाला आहे.

'वस्ती नसलेले गाव' (२००४) आगरी लोकसंस्कृतीचे वास्तवदर्शन घडविणारी ही कादंबरी आहे. त्यात खारेपाटातील आगरी समाज, समुद्रात बुडी मारून वाळूचा व्यवसाय करणारा मचवेकरी यांचे जीवन चितारून एक वेगळे विश्व मराठी साहित्यात आणले आहे. आगरी बोलीचे गोड मोहक रूपही या आगरी बोलीतील कादंबरीत भाषा

सौंदर्यामध्ये अनुभवण्यास मिळते.

उरणच्या ज्येष्ठ लेखिका प्रा. वासंती ठाकूर यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. 'ऊफल्या' ही लघुकांदबरी त्यांनी साकारली आहे. आधुनिकीकरणाचे ग्रामसंस्कृतीवर अतिक्रमण होत आहे. शहरांच्या सान्निध्यातील गावाचा चेहरामोहरा त्यामुळे बदलला आहे. प्राचीन परंपरा रीतीरिवाज काळाच्या ओघात अस्तंगत होऊ लागले आहेत. एकूण मानसिकताच नव्हे तर ग्रामीण जीवनातील अनेक चांगल्या गोष्टी नष्ट होऊन आधुनिकतेच्या नावाखाली नव्या अनिष्ट गोष्टी ग्रामजीवनाला ग्रासू पाहत आहेत. भूमिपुत्रांना नव्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

दलित आत्मकथेप्रमाणे स्वत:चे आत्मचरित्र लिहिण्याची सुरुवात आगरीबोलीत अलीकडे मोठ्या प्रमाणात झाली आहे. आगरीबोलीत आत्मचरित्रपर लेखन अत्यंत मर्यादित आहे. अनेक उत्साही लेखक आता या प्रकाराकडे वळत आहेत. नवा प्रवाह त्या रूपाने रूढ होत आहेत. मागील पिढीतील आगरी लोकांचे जीवनानुभव यात चित्रित झालेले आहेत. यामधून पूर्वी शिक्षण घेणे किती कष्टदायक होते व गरिबीमुळे जीवनमान किती हलाखीचे होते हे चित्रित झाले आहे. आगरी समाजाचा भूतकाळ त्यामुळे ज्ञात होण्यास मदत होते. अवती भवती (सुचेता थळे) यांच्या या पुस्तकाचा आगरीबोलीतील पहिले व एक उत्तम आत्मचरित्र म्हणून उल्लेख करता येईल. पत्रावळ (ए.डी. पाटील यांचे) उत्तम आत्मचरित्र आहे.

व्ही. के. पाटील 'आलो कोठून कोठे' या पुस्तकाचे लेखक आहेत. गेलेले दिवस हे आठवत राहतात. माणसे गतस्मृतीवर जगत असतात त्यातूनच अनमोल आठवणींवर आधारित उत्तम आत्मचरित्रे आकारास येतात व महत्त्वाचे ऐवज ठरतात. मागील काळातील माहितीचा खात्रीशीर ऐवज म्हणूनही या सर्वांनी लिहिलेल्या आत्मचरित्राचे महत्त्व अधिक आहे. 'स्मृतिगंध' (सुनंदा मोरखडकर) या सजग व जिज्ञासू लेखिका आहेत. त्यानी आपल्या आत्मचरित्रात चितारलेला कालखंड हा स्वातंत्र्यपूर्व व नंतर असा आहे. तत्कालीन आगरी समाजाची, जुनी जीवनप्रणाली यामुळे कळून येते.

'लांबा उगवे आगरी' (प्राचार्य डॉ. म.सु. पाटील) यांचे हे आत्मचरित्र आहे. अलिबाग तालुक्यातील शहाबाज गावापासून ते सुरू होते. नोकरीसाठी त्याचे मुंबईत येणे सरकारी खात्यात कारकूनी करताना शिक्षण घेणे, मग मनमाड, मालेगाव येथे प्राध्यापक, प्राचार्य होणे, अन्य अनेक ठिकाणी ते फिरले. या संघर्षमय जीवनात सत्त्व परिक्षा घेणारे असे अनेक प्रसंग यात आहेत. कितीही दूर गेलो तरी आपली भूमी आपल्याला साद घालते हे सतर-ऐंशी वर्षांपूर्वीचा आगरी खेड्यांचा काळ हे आत्मचरित्र दर्शविते.

आगरी कथांचा विचार करताना प्रथम ठळक नावे पुढे येतात, ती म्हणजे परेन शिवराम जांभळे व प्रा. शंकर सखाराम; तसेच डॉ. अविनाश पाटील, मोहन भोईर, चंद्रकांत पाटील, भानुदास पाटील, ए.डी. पाटील, गजानन म्हात्रे, एम.एन. म्हात्रे इ. नव्याने आगरीबोलीत आंतरिक जाणिवेतून आगरी कथा लिहिली गेली आहे.या कथा वेगळा जीवनानुभव घेऊन येतात. आगरी समाज शहरीकरणाच्या, औद्योगिकीकरणाच्या वरंवट्याखाली भरडला जात आहे, नामशेष होत आहे. यामुळे या लेखकांच्या कथा धारदार आहेत. आगरीबोलीत म्हण आहे की- ज्याच्या मरा त्यालाच लरा म्हणजे ज्याचे नातलगाचे मयत झाले आहे, तोच रडतो; इतर लोक फक्त बघत उभे राहतात असा यांचा आशय आहे. आगरी बोलीतील कथांचेही हेच सूत्र आहे. ज्यांनी सोसलं, भोगलं, तेच संवेदना व्यक्त करू शकतात. आपले भावविश्व मांडताना दिसतात.

आगरीबोलीत कविता साधारणत: १९८४-८५च्या सुमारास लिहिली जाऊ लागली. सिडको आंदोलनात आपल्या गाव व जमिनीविषयीच्या अस्मितेमुळे हा समाज खूप आक्रमक झाला. प्रकल्पग्रस्तांची लेखणी सरसावली. आंतरिक तळमळ कागदावर उतरली. आपली जमीन त्यांना जीवापाड प्रिय होती. ती उद्ध्वस्त होतानाची तडफड आगरीबोलीतील कवितांत आली. यावर अनेक कवींनी लिहिले आहे. कवी अरुण म्हात्रे यांनाही हा मोह आवरला नाही. ते सेझवर केलेल्या एका कवितेत म्हणतात-

*ही धरती अमुची आई, ही जन्माची पुण्याई*
*प्राण गेला तरीही देणार कुणाला नाही.*

आगरीबोलीतील कवितेची विविध रूपे अनुभवायला मिळतात. यामध्ये आता अनेक कवी निर्माण होत आहेत. कवींचे पीक उदंड येत असले तरी प्रकल्पग्रस्तांचा आक्रोश, त्यांची दु:खे, त्यांचे बेघर होणे हा आगरी कवितेचा किंबहुना आगरी साहित्याचाच विषय आहे.

लोणघरचे (अलिबाग) पहिले आगरी नाटककार भ.ल. पाटील यांनी १९३६च्या सुमारास चार ग्रामीण नाटके लिहिली. संगीत कूळ कायदा, संगीत जमीनदार, राजमुकूट, चौथे रत्न इ. त्याचे प्रयोग महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर बेळगावात झाले. मराठी साहित्याच्या इतिहासकारांनी मात्र

दुर्दैवाने या नाटककाराची योग्य नोंद घेतलेली दिसून येत नाही. आगरी बोलीत नाटकांची मुहूर्तमेढ खऱ्या अर्थाने मोहन भोईर यांच्या 'तरवा' या आगरी नाटकाने पंचवीस वर्षांपूर्वी रोवली. प्रा. एल.बी. पाटील हे प्रसिद्ध नाटककार आहेत. त्यांची जवळपास पंधरा नाटके पुस्तक रूपानेही प्रकाशित झाली आहेत. या नाटकांपैकी 'मांडवान पांडव', 'एसईझेर', 'बाय चालली इवानान' ही तीन नाटके आगरी बोलीत आहेत. त्यांनीही या नाटकांना व्यावसायिक रंगमंचावर आणण्याचा प्रयत्न केला. 'देईन बगराव पाय' (बबन पाटील), 'सातबाराचा उतारा', 'हाय त्या बरा हाय' (मोहन भोईर), 'टोकन आयलंय नाऱ्याला' (स्वप्नील तांडेल) हे नाटक आले 'वनवा इझल का' (वसंत पाटील) इ. 'मांडवाचे मंघारी चाललंय काय' (नंदकुमार म्हात्रे) आगरीबोलीतील नाटकाला व्यावसायिक परिमाण मिळवून देण्याचे मोठे काम या नाटकांद्वारे केले आहे. आगरी बोली आता समाजाभिमुख होत असल्याचे द्योतक असून अन्य भाषिकही मालवणीप्रमाणे आगरीबोलीतल्या नाटकांची रुची घेत असून ते आगरी ठसका अनुभवायला नाट्यगृहात येऊ लागले आहेत.

आगरीबोलीतील साहित्य प्रमाणमराठी साहित्यात अनमोल अशी भर टाकीत आहे. त्यामुळे संशोधनाची विविध क्षेत्रे उपलब्ध झाली आहेत. आगरीबोलीतील कथा, आगरीबोलीतील कादंबरी, आगरीबोलीतील नाटके, आगरीबोलीतील कविता, आगरीबोलीतील आत्मचरित्रे, आगरीबोलीचे भाषिक विशेष, आगरीसाहित्यातील विद्रोह, आगरीबोलीतील पर्यावरणीय संवेदन, नवा शब्दसंग्रह, अशा विविध अंगांनी एक वेगळे भावविश्व समोर येण्यास मदत होत आहे. मराठी भाषेला वेगळ्या जाणिवांची व अनुभवांची अनुभूती मिळत आहे. बोलीभाषा या प्रमाणभाषेचे झरे असतात.

भविष्यामध्ये ज्या भाषा रोजगार, व्यवसाय समाजाला देऊ शकतील, त्याच भाषा जिवंत राहतील. ज्या भाषा समाजाला व्यवसाय देऊ शकत नाहीत, त्या भाषा सोडण्याकडे समाजाचा कल असतो. असे डायनील इब्राहम याने म्हटले आहे. आज आपल्या समाजाला इंग्रजी माध्यमाचे वेड यामुळेच लागले आहे. खरंतर इंग्रजीबाबत जगातील फक्त १४ देशांतच इंग्रजीचे प्राबल्य आहे. इतर देशांत आपल्या स्थानिक भाषेतच शिक्षण दिले जाते. इंग्रजी फक्त व्यवहाराची भाषा मानली जाते. चीन, जपान, जर्मनीसारख्या देशांत त्या त्या देशाच्या भाषेत शिक्षण दिले जाते. ते अधिक सहजतेने ग्रहण केले जाते. प्रादेशिक भाषा किंवा बोलीभाषा जगवायचा असतील तर हे पाऊल उचलणे गरजेचे आहे. प्रादेशिक भाषा विज्ञानाच्याही भाषा जेव्हा बनतील, तेव्हा त्या अधिक काळ जगतील.

**संदर्भ :-**


१. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण - मु. संपा. गणेशदेवी/ अरुण जाखडे (मराठी)

२. आगरी समाजाचा इतिहास - संपा. मुरलीधर म्हात्रे

३. आगरी बोली लोकसंस्कृती साहित्यपरंपरा - डॉ. अविनाश पाटील


**- डॉ. अविनाश पाटील**

१. '**मन्हा मामाना गावले जाऊ**' हा महाराष्ट्रातील पहिला अहिराणी बालकुमार कवितासंग्रह. यात डाव्या पेजवर अहिराणी कविता व उजव्या पेजवर अनुवादित मराठी कविता आहे. द्विभाषिक कवितासंग्रह आहे. या पुस्तकास शासनाचा बालकवी पुरस्कार (२०१३) प्राप्त आहे.

२. '**मन्हा गावले**' हा संपूर्ण अहिराणी बालकवितासंग्रह. दिलीपराज प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. यात कवितेखाली शब्दांचे अर्थ दिले आहेत.

३. '**आनंदेरो झाड**' हा आबा महाजन यांच्या निवडक कवितांचा बंजारा बोलीत केलेला अनुवाद आहे. संपादन युवराज माने यांनी केले आहे. अनुवाद शालेय विद्यार्थ्यांनी केला आहे.

बोलीभाषा टिकणे आवश्यक आहे. बोलीमुळे आपली भाषा समृद्ध होते. आपली संस्कृती समृद्ध होते. बोलीचा लहेजा गोडवा अमूल्य आहे.

**सौजन्याने : आबा महाजन**

बोलीभाषा विशेषांक

## आगरी बोली कथा

# आकासदिवा

भानुदास पाटील

**''येकमातरं खरं होतं, आरोली-भूतोली गावाला लागलेलं मतलबी राजकारनचं गिरान सोरवाची कोचीस गावचे सालामास्तर गज्यानन मातरे करीत व्हतं. गावकरी त्याना गज्यागुर्जी म्हणून वलखीत. तैसी गज्यागुर्जींची गावभं बऱ्यापयकी ऊठबस व्हती. काँचेबी सुखा-दुखाला गुर्जी पयलं धाऊन जात. सोयरीक जमवाची आसो, हेवंदावं मिटवाचं आसो, गज्यागुर्जी चुटकीशी प्रश्न सोरवीत असत.'' समकालीन वास्तवाची बोली भाषेतून दखल घेणारी आगरी बोलीतील कथा.**



सखा

**आरोली**-भूतोली गाव. गावाचं नुस्तं नाव आईकतूच भल्याभल्यांना आपसूक काफरं भरत व्हतं. गावाचा ठावठिकाना म्हंजे ठाने परगन्यांचे पार्सिक डोंगराचे दरी वसलेला ज्याम म्होटा गाव. गावान जानारा दोन किलोमीटर आरवलनाचा गावरस्ता आजगरासारका सूस्तावलेला. त्याचे दोनी अंगाला वराची, जांबलाची, मवाची, आंब्यांची, चिचांची आरडांड झारं, चोरमानीन चोरांची वसती नव्हती, तं ती व्हती गुरचरन. दिवालीन म्हैसरं नं बईलांच्या झुंजी येच ठिकानी लागत, रंगत. आजूबाजूला रानझुरपं, खोंदान गच्पाटं, त्यान रानटी जनावरं. एकट्या दुकट्याला गावान जाता जाता घाम फुटाचाच. गावाचे भवताली भातसेतांची खाचरं, डोलकी, पाट्या नं ऊती. त्यांची राखन करनाऱ्या वंधांच्या वया. तल्याचे काठावं सरलसोट झिपरं तारमार. गावाकुसाला दोन पाखीं साला नं निरनिराले नावांच्या बावीं. वेसीवं गावदेईचं देऊल. गावान कौलारू टुमकी घरं, मोसं आंगनी. गावाचे मावलतीला मिठागरं नं समिंदर. आवरी सगली निसरगाची गावावं आफाट किरपा व्हती. गाव सुखी-समाधानी व्हता. पून जैसा काल बदालला तैसी गावकऱ्यांन दिसोंदिस सत्तीस गुनांची भर परत रयली....

आरोली-भूतोलीचे आग्या गावाला आग्याभूताचा वारवा लागलाता, नसानसांन सचारला व्हता. जैसा देस, तैसा वेस! ये परमानं सरपंच भुजंगाचा इखारी इलखा आख्खे गावाला परलाता. गरामसेवक सदा तुंबरे गरामपंच्यातीला गरममसाला लाऊन मलय चाटीत व्हता. गावपाटल नाग्या सरपटे यावं त्यावं डूख धरून फुतकारत व्हता. खूज्यातलाटी भलंभलं फेरफार करून सवताचं ललाट लाल करीत उजलीत व्हता. आतल्या गाठीचा नाऱ्या सुतार निवरनुकीचा आंदाज झेत मोटे घराच्या वास्यांना गिरमीट फिरवीत भूसा करीत व्हता. फतले गावपंच नावजोरून जोरजोरशी टाल्या पिटीत व्हतं. तरनीताठी टवली झोटिंगांगत झोकांड्या खात व्हती. बेफाम निशांनी बर्बारत व्हती. कोक्याभगत काल्या करनीत गुतला व्हता, भोलसट आया-बायांना लाखारीचा टिकला लावून फसवत होता. बेताल येताल आपलाच नगारा वाजवत जीवाची जतरा करत व्हतं. घराघरांन सालकाया मालकाया वतरत व्हत्या, अंगारं धुपारं उधलीत व्हत्या. गाव निरालेच यंतरं तंतरान झपाटला व्हता. जो तो सारेकाल भूतांगत हाताची बोटं नाचवत व्हता. गावाचे इकासाच्या गोस्टी हावेन धुरल्यागत तरत व्हत्या, इरत व्हत्या.

येकमातरं खरं होतं, आरोली भुतोली गावाला लागलेलं मतलबी राजकारनचं गिरान सोरवाची कोचीस गावचे सालामास्तर गज्यानन मातरे करीत व्हतं. गावकरी त्याना गज्यागुर्जी म्हणून वलखीत. तैसी गज्यागुर्जींची गावभं बऱ्यापयकी ऊठबस व्हती. काँचेबी सुखा-दुखाला गुर्जी पयलं धावून जात. काँची सोयरीक जमवाची आसो नयतं हेवंदावं मिटवाचं आसो, गज्यागुर्जी चुटकीशी प्रश्न सोरवीत असत. गावच्या पोरीबालीं शिकाव्या, पोरां-सोरांनी गावाचं नाव उजलावं. गावाला आंध्रसद्देची लागलेली बुरसी कायमची घालवावी नं आरोली भूतोली गाव आदर्श व्हावा, ईच गुर्जींची मनोमन मंशा व्हती.

गज्यामास्तर साला संभालून गावांचे समजदार लोखांच्या भेटीगाठी झेत व्हतं, आपलं म्हननं पटवून देत व्हतं. आस्तीआस्ती गज्यागुर्जीला गावकऱ्यांची साथ मिलाला लागली. तैसं गुर्जीचं धारिस्टं बलावलं.

गज्यामास्तरानी गावात भलत्याच इषयाची शिकवनी सुरू केल्याची वार्ता नाऱ्यासूताराचे कानावं परतूच त्यांनी सरपंच भुजंगाचं कान मीठमसाला लावून फुकलं...

''नारेदादूस, तू आवरी धास्ती नको करू. ते मास्तुरकं, ये भुजंगाचे नादाला लागनार नाय!'' सरपंचाने मत मांडलं.

''कपाल फुटो, पून संशय मिटो! उगाच बेसावध रयलू तं दुसमन कंचेबी रुपान येल नं आपले डोक्यावं बैसल!'' नाऱ्यासूतारानी सरपंच भुजंगाचे डोक्यान भूसा पेटीवंला.

''आरं, आसा आसल, तं सात दिसांन दिसाढवल्या लोखांसमक्ष त्याचा काटा कारीन, भुजंग हाय मी!'' सरपंचानी हाताची मूठ आवलीत नाऱ्यासूताराला पक्का भरोसा दिला.

झाकली मुठ सव्वा लाखाची, ये जानून झेन्यासाठी नाऱ्यासूतार लांब टांगा टाकीत पटापट घरा पोचला नं चुगलीचं पैसं मोजू लागला....

ई पिरा जवाचे तवाच ठेचाला पाह्यजे, फोफावली तं आपलाच घात हाय. आपलं पद शाबूत रयलं पाह्यजेच, गावकऱ्यांचा काय डाव हाय? याचा सोक्षंमोक्षं केलाच पाह्यजे, या उद्देसान सरपंच भुजंगाने तातरीचे गरामसबेचं ज्याईर आवतन आख्खे गावाला दिलं.

मारवती मंदिराचे पटांगनावं हौसे, नवसे नं गवसे आगे गावकरी जमले. सरपंचानी इशारा करताच सेकरीटरी सदा तुंबरेनी गावसबेला सुर्वात केली...

गावसबेला जमलेले आख्ते-पोख्ते आपले मुद्दे मांडीत व्हते, पून सरपंच त्याना पुरुन व्हता, बोलनाऱ्यांचं म्हननं खोल खड्ड्यान पुरीत व्हता.

आखिर गज्यामास्तर बोलू लागले, ''आपल्या आरोली भूतोली गावाचे माननीय सरपंच, जमलेले माजे गावकरीहो, आज यासबेचे निमितान मी पयला आपले गावाचा इत्यास सांगतंय... बिटिशांनी भरमसाट लादलेल्या सेतसाऱ्याचे इरोधान जिल्यांचे सेतकऱ्यांची पर्षद आपले आरोली भूतोली गावान भरलीती. स्वातंतराचे मागनीसाटी रास्टीय पुडाऱ्यांनी केलेल्या चलवलीत गावकऱ्यांनी भाग झेतलाता. मिठाचा सत्याग्र गावानी क्याला. गावाची येकी नं धमक बगून सत्याग्रई छावनी झैली. मोट्या मोट्या नेत्यांनी आपल्या गावाला भेटी दिलत्या. एक का दोन, सेकरो देसभगतांचं पाय ये गावाला लागलंतं. त्याकाली आदर्शगाव म्हगून आरोली भूतोली गावाला मान व्हता....''

''....ओ गुर्जी, आवरी लाम्हन नको लावूस, थोरक्यान बोल!'' सरपंचाने गुर्जीला रोखन्याची कोचीस केली.

गज्यामास्तर मान डोलवत बोल्ला, ''हो सायेब, आज गाव बदालंलाय. गावान आंध्रसद्देची माजलेली बुरशी खलास कराला पाह्यजे. इस्कटलेलं गवत वललं तं त्या दोरीने मस्तावलेला हत्तीबी बांधून ठेवता येतं. आजकाल आपल्या गावाचा कारभार....''

''....आरं, बंद कर तुजा बाजार! यो इत्यास सालंचे पोरांना नयतं घरांचे बायको पोराला शिकव! तुजेपक्षी आमी च्यार पावसालं ज्यास्तीच कारलेन!'' नाऱ्यासूताराने गज्यागुर्जींचे पाठीवं धारदार सकूनांचा रंधा फिरवला.

''हो, खराच हाय. पून ते पावसाचं पानी तुमी वाया घालवलं. आरवलं आस्तं तं जमीन वांझोटी रायली नसती!'' गज्यामास्तरानी नाऱ्यासूताराला बीजगनितान बुचकीलंला.

नाऱ्यासूताराची बाजू झेत झिंग्या झिंगटे कमरेवं हात ठेवून वकला, ''आरं, ये बरम्हन्यानाच्या गोस्टी सांगतान नं् घरांचे मोरीन दपून रयतान!''

''आग्दी सत्य हाय. आशी मान्सं गावान पायलीची पन्नास हातीन. बोलाला पास नं् कामाला नापास!'' गावपाटल नाग्या सरफटे फन्कारला.

''ई सगली तुमची पिलावल हाय. गावाचा इकास कराचा सोरुन भकास केलंय! याला जबाबदार बायकी गावपंच!'' गावपंचांकर डोलं वटारीत घाऱ्या घुबरेनी आरोपांचं घाव घातलं.

तैसं पाच पंच पिस्काटलं, घुबरेवं धजून परलं. ई झटापट बगून बिज्यांनाबी चट लागली. त्यांच्या बावखंडांना फुरन चरलं. लाठ्या-काठ्यांच्या खटाखट उपटी परत व्हत्या. पाठींवं वल उठत होते, तनीपून त्यांचे वल जात नव्हते. गज्यागुर्जी भान्गर थॉपवाची कोचीस करत व्हता, पून गुर्जीला तिच लाथ नं् तिच बुक्की मिलत व्हती. परिस्थी हाताबायेर जेली, गावसबा रगतान माखत खपली.

गावान दुपारच्याला चिस्टाल झैलं. भूतनीगत वावटल येऊन गरगर फिरली. पिपलाची पानं थरथरली, काई गलून परली. गरग्यावं बेसलेला काफऱ्याबाबा काफला. वेसीवले गावदेईचे देवलावंला कलस कालाठिक्कार परला. निरालेच कुतरभुकींनी कालजाला चरं परत व्हतं. गावाचे वरशी हुटूटी वरडत घिरट्या घालू लागली....

नासकं दान टाकून आगीचं कोंबरं झुंजावनारं कवाच पसार झैलं. सरपंच भुजंगाने मुक्या-बैराटाचं सोंग झेतलं. सेकरीटरी सदा तुंबरेनी टोंडाला टालं लावलं. गावपाटल नाग्या सरपटे आरकुशीला जाऊन दपला. नाऱ्यासूताराचे डोल्यांवं सुतेरं धावलं. घाऱ्या घुबरे घाबराघुबरा झैला. सतार उघरी असणारी दारं बंद झालती. चिलीपिली दुदावली. गजबजलेला गाव एकाकी थबाकला, धपाकला. दुखावलेल्यांची बायका-पोरं लाखोल्या देत व्हती, आसवं ढालीत व्हती. गज्यामास्तरची भार्जा सरसोती हुंदके देत व्हती. बेसूद परलेल्या गज्यागुर्जीला त्याचा पोरगा आकासने खांद्यावं झेऊन घराकरं निंगला व्हता.

घरान गज्यामास्तरची बायको सरसोती ई गुरुजींचे सूजले थॉबारावं औशेदपानी करत व्हती. येका कोपऱ्यान आकास पुस्तकान डॉका घालून व्हता, पून त्याचं ध्यान नं् कान येस-बापासचे बोलन्याकरं व्हतं.

आंगदुखीचे ठनक्यांनी गज्या मास्तर इवालंला, ''आयेऽ, आयेऽ गंऽ बाबाऽ, बाबाऽ!''

सरसोती चरत्या आवाजानुच बोल्ली, ''या लस्कराच्या भाकऱ्या भुजाला तुमाला कोनी सांगल्या?''

''आगो, आपला गाव सुधारला पाह्यजे. मी गावाचा इत्यास सांगाला जेलू नं्... आयेऽ बाबाऽ बाबा!'' गज्यागुर्जींनी आंग मोरलं.

''ओ, आपली आपल्याला नाय धुपं नं् बिज्यांची घालवाला चाल्लेन दुखं! गाव सुधराचं काम पुडारी बगतील. मास्तरकीचा पेशा सोरुन भलती आपेशा कला कराची?'' सरसोतीने गज्यागुर्जींचे डोक्याला बाम चोलला.

''आगो, टाकीचे घाव सोसल्याबिगर देवपन येत नस्तं!'' लाठीकाठीं झेललेल्या गुर्जीने कल सोसून आभिमान सांगला.

''ओ माजे देवा, कराला जेलंस गनपती नं् सवताच झैलंस मारवती! मार खाऊन कती सूजल्यांस बगा?'' सरसोतीनी गज्यामास्तरचा मुका मार उखिलंला.

''सरसोते, तू माझे जखमेवं मीठ चालू नको. आज नयतं उंद्या ती बरी व्हेल. पून मी, ये गावाला आदर्श गाव बनवीन्याचे शिक्षन देन!'' गज्यामास्तरानी मनांची मंशा सांगीत कूस बदलंली...

तेच वखताला शेजारचा शांत्याबा गुर्जींची इच्यारपूस कराला आला. तो घोगऱ्या आवाजात बोल्ला,''कॉय रं गज्या, काय झैला?''

''शांत्याबानु, ये आमचं डोंगर उल्टाला जेलतं, पून डोंगरुच यांचे अंगावं परला. बतं, गाव सुधराचा हाय!'' सरसोतीनी हकिकत सांगली.

''आरं, उंद्राचे पॉराला लॉगडाचा यापार काय उपेगाचा?'' शांत्याबानी उदारन दिलं.

''मंग काय तं, भलत्याच उठाठेवी!'' सरसोती हुंकारली.

''गावांचं पुडारी कवा कॉंचा काटा कारतील?याचा नेम नय. यो सगला सरपंचाचा डाव हाय, कावा हाय!'' आनुभवी शांत्याबानी भुजंगाचं नाव ज्याईर क्यालं.

मुकायेच आईकीत रयलेल्या गज्यामास्तरांनी आंबूटचिट टोंड करून डोलंमिट केली... शांत्याबा निगून जेल्यावं

सरसोती सैपाक घरान शिरली.

आकास पुस्तकाची पानं वाचू लागला, आदर्शे इचार साचवू लागला. सरपंचाची करतूत आयकून आकासचं मन चलबिचल झैलं. आखरं वय न् तखरं नय, यो नवा पेच आकासला सतवू लागला. तो शिरकीजवल जाउन एकटक बगू लागला. त्याचे डोल्यांना ती चालती-बोलती चितरं दिसू लागली....

आपले बापासची ध्येय-धोरनं पुरी करन्याचं आकास चितीत व्हता, आराखरं रचित व्हता. त्याचे ध्यानीमनी तीच मनीषा फेर धराला लागली....

काई दिसांनी गज्यामास्तरचं आजारपनात मईत झैलं. सौसाराचा भार सरसोतीवं परला. आपले एकुलत्या एक आकासचं शिक्षन पुरं क्यालं. आथा आकासचं लगीन थाटामाटान कराचं, येच उलासान सरसोतीच मन आनंदानं नाचू लागलं....

आकासला जवानीचं घुमारं फुटू लागलं. त्या जोसान आकास गानं गुनगुनला, हम होंगे कामयाब, हम होंगे कामयाब। एक दिन होऽ होऽऽ, मन मे है विश्वास, पुरा है विश्वास, हम होंगे कामयाब, कामयाबऽऽ....''

''....हाऽ हाऽऽ बाला, कामाला लाग! कामाला लाग!! यंदा तुजं लगीन कराचं हाय, माजे राज्या!''

''आयव, मी तुजे मनासारकंच करनार हाय, पून...!''

''....ते पूनफून करु नको. काय सांगाचं ते सपस्ट सांग!''

''आयव, मी येक ध्येय पुरं करनार हाय. ते झाल्याबिगर लगीन करनार नाय. तुजा पयला होकार पाह्यजे. माजी ती मनीषा....''

''....आरं लबारा, काँचे पिरेमान-लफऱ्यान परलेस काय रं? आसूंदे, आसूंदे!आजकाल तैसाच जमाना हाय, जया बगावी तया बिनखताची लवाटं! माजा या गोस्टीला होकार हाय!''

''पून तू माज्यावं रुसनार नाय नं?''

''आरं आकास बाला, तू माजे कालजाचा तुकरा. तूला आवरा मोटा वारीवला, शिकीवला पून तूला कवा दुखीवला नाय. आथा मी कला रागवू? सांग तूजी मंशा!''

''तं मंगं मना वचेन दे!''

''आरं बाला, वचेनुच काय? तुजेसाटी मी माजं आख्खं कालीज द्यावाला तयार हाय. तू फकस्तं बोल बस्!''

''आयव, तूजे ये तयारीनी माजं आर्धे ध्येय पुरं झैलं!''

''आरं, आर्ध नय, सगल पूरं व्हेल, तू बोल!''

''आये, मी सवता आव्वेयदान करनार हाय! आव्वेयदानाचं मत्व लोखांना सांगनार हाय!''

''आरं बाला, आजपरेंन मी भूदान, गोदान, रक्तदान, आन्नदान, कन्यादान नं पिंडदान आयकून व्हतू, पून ये आव्वेयदान काय पर्कार हाय?''

''जितेपनी नयतं मेल्यावं आपला एखूदा आव्वेय गरजू असलेल्या रोग्याला दान कराचा त्याला आव्वेयदान बोलतान. डोलं, रुदय, किरनी, कातरी दान कराचं!''

''नाऽऽय, ये मी तुला आजिबात करु द्यानार नाय. आरं, तुजा बापूस किरन्या खराब होऊन म्याला, पून गावांचे लोकानी येक किरनी दान नाय केली. मंगं आपून यो आव्वेयदानाचा कला उद्देग कराचा? उंऽउंऽऊंऽहूऽऽ!''

''आयव, आयव, तू लरु नको. एकाने गाय मारली म्हगून आपून गोजरुक माराचं नाय. आव्वेयदानाने एखादे रोग्याचा जीव वाचत असेल तं म्हापुन्य हाय!''

''आरं आक्शाऽऽ, ये म्हापाप हाय रंऽ, म्हापापऽ! आरं, जन्माला घालताना देवानी सगलं आव्वेय दिलंतं, मंगं देवाचे घरा जातांना बिनडोल्यांचा, बिन कालजाचा मानूस! आरं, काय उत्तर देशील रंऽऽ? माजे आक्शा, ये दान तू करू नको रंऽ, ये देवा-धरमाचे इरुद्ध हाय रंऽ!''

''आये, आये, देवांनी तर अशी दाने मागितली व्हती!''

''ते काईपून आसूंदे. ये तुजं ध्येय मनं आजिबात पसंत नाय रंऽऽ!''

''आये, तुजी शपथ झेऊन सांगतंय, मला आव्वेयदान कराचेच हाय. माजा निरधार पक्का हाय!''

''आररंऽ, ये येऱ्याला कोनीतनी अक्कल शिकवा. नवसाचा पूत, तोपून निंगला म्हाभूत! ओ शांत्याबा, शांताबा, लवकर या. माजे आकासला समजाऊन सांगा. उंऽ ऊंऽ.. हूऽ...!''

शांत्याबा वाकत, खोखत आला. त्यानी भलत्याच संशयाने इचिरलं, ''काय झैलं, बोंब ठोकाला? कोनी...''

''....मेला नाय, यो आक्शा मराचे तयारीन हाय!'' सरसोतीने आकासकरं बोट क्यालं.

''काय रं बाला? आत्महत्या कराला निंगलास काय रं?'' शांत्याबा रोखठोक बोल्ला.

''नाय आजू, आत्महत्या नाय. मी माजे आव्वेय दान करनार हाय!''

''आरं, तुजं ते सगलं आव्वेय दान दिलंस तं मेल्यावं का निस्ता हारांचा सापला न्यावाचा सरनावं? बतं, आव्वेयदान!

आव्वेयदान!!'' शांत्याबाने आकासला धर्पिरला.

''आजू, ई समाजान आंध्रसद्दा हाय. मी सांगतंय, मानूस मेल्यावं त्याचा जीव निगून जातं नं् त्याचे देहाची राख, माती व्हतं. आपले सोन्यासारके आव्वेयांची राख, माती होन्यापक्षी ते आव्वेय गरजू रोग्यांना दिलं तं ते जितं रयतील, बिच्यारांचं भलं व्हेल, खरं हाय नं् आजू!''

''आकासबाला, तुझं शंभर टके सत्य हाय. मना तुझं ज्यामूच पटला. देवासारका बोल्लास रंऽ बाला. आथा मीपून आव्वेयदान कराला तयार हाव!'' शांत्याबाने जंच्या तयाच होकार दिला.

''ओ शांत्याबा, तुमीपून आकासला संमती दिली? समजून सांगायचं सोरुन तुमी त्याला सामील झैलंस? काय करावं? मंगं मीपून आव्वेयदानाला तयार हाय झे!'' सरसोती आवंढा जिलीत बोल्ली.

घरच्या लोखांनीच पाठिंबा दिल्याने आकासचे आंगान बल सचारलं. त्याच आवेशान तो सांगू लागला, ''आव्वेयदान यो नये युगाचा मंतरं हाय, नारा हाय. आव्वेयदान ये मोठं दान हाय. याचे मत्व सगले लोखांना माईत परावं म्हगून परतेक घराघरांन, गावागावांन जागरुती कराला पाह्यजे. गरजू आजाऱ्याला आव्वेयदान करा, ईच देवाची, देशाची सेवा हाय. मना वाट्टंय मरावं पून किरतीचे रुपान उरावं! आव्वेयरुपान जगावं! चला, आथा सगल्यांनी येकमुखांनी बोलूया, आव्वेयदान शिरेष्ठ दान!''

शांत्याबा, सरसोती नं आकासनी जयघोस क्याला. आरोली-भूतोली गावान येक नये कामाची सूभ सुर्वात झैली....

आव्वेयदानाचा पर्चार करन्याचे रीसने आकास सगल्यांना समजावून सांगीत फिरू लागला. गावांचे बवतेक गावकरी आव्वेयदानासाटी खूषीनी पुरं सरसावलं. आवरंच काय? सरपंचाने आपले कुटुंबासईत भाग झेतला. आपला इलखा सईल केलंय का नईन मेख मेरलंय? याचं कॉरं कॉनलाच सुटत नव्हतं.

ई वार्ता वाऱ्यासारकी गावंभं पसरली. तापट सरपंच ठन कैसा परला? यावं गावपंचानी बरीच काथ्याकूट केली, पून ई गातागूत उंगारली नय. सेकरीटरी सदा तुंबरेची आक्कल डबक्यागत तुंबली. मुंज्यावानी डोकं खांडलीत जोखू लागला. खूज्यातलाटी ये फेरफाराचे फेऱ्यान चकरावला. चवकसी करून करून गावपाटल नाग्या सरपटेचं डॉच्कं साटालल. तो दोरीलाच सरप समजून कुटीत गाव भटकत व्हता. सांगलेली आक्कल नं कमरेला बांधलेली भाकर तवऱ्याच पुरती आस्तं, ये नाऱ्यासूताराला कललं. चव्हाट्यावं चऱ्हाट चगलीत झोटिंग टवली दमली. झिंग्या झिंगरेची नशा उतरली. सालकाया-मालकाया एकबिजींची कान्चीटं खात आतली गोस्ट बायेर कारन्यान गुमातल्या व्हत्या. सरपंचाचे सभावान घटकान बदल कैसा झैला? याचा आंदाज आदमास्येनांबी लागत नव्हता. कयातनी पानी मुरलंय, याचा सोध कतीबी खोदलं तनी लागत नव्हता. सरपंच भुजंगाची ई नई चाल गावाला कंच्या वाटेनं नेतंय? याचीच जो तो वाट बगाला लागला....

एक दिस आच्यानक सरपंचाने बिजूक गावसबा ठेवली. मागचे सभेची आटवन होत गावकऱ्यांना भीती व्हतीच तनीपून गावकरी सबेला जमलं. जिलाधिकारीचं भासेन लोखं कान लावून आयकीत व्हते. आव्वेयदान करन्यासाटी गावकऱ्यांनी उचाललेलं पाऊल मत्वाचं हाय म्हगून आरोली भूतोली गावाला जिलाधिकाऱ्यानी मानपतरं सरपंचाकरं दिलं. त्याकामी ज्याम मेहनत करनारा तरनाताठा, गोरापान नं् डोल्यांना गोगल लावलेल्या देखनुक आकासचा सतकारबी जिलाधिकारीने क्याला. तवा सबेन बसलेल्या सरसोतीचे डोल्यांन आनंदाची आसवं टपाकली. भर्तार गज्यामास्तरचं सपान सत्यान उतरल्याचं सरसोतीला दिसू लागलं. शांत्याबाचे खोल डोल्यांना आकास आभाआवरा दिसला. लोखांनी एकच जल्लोस क्याला, ''गज्यामास्तर जिंदाबाद! आकास जिंदाबाद!! आव्वेयदान श्रेस्ट दान!!!'' घोसना घुमल्या. गावकऱ्यांनी आकासला खांद्यावं झेऊन नाचवंत रयलं... पुच्याट पुडारी च्याट परलं.

आकासने घरान आल्या आल्या सत्कारान मिल्लेला फुलांचा तुरा सरसोतीचे पायांवं ठेवत वंदन क्यालं नं् तो बोल्ला, ''आयव, तुनी दिलेल्या पाठिंब्यानी मी ध्येय पुरं क्यालं. आजूक मना मोठा पल्ला गाठाचा हाय!''

''होऽ होऽ बाला, माजा तूला पका आशिरवाद हाय. पून तू लगीन याच वरसी कर होऽ!'' सरसोती आयेचे मायेने बोल्ली.

''आयव, तुजी मंशा येच वरसी मी पुरी करीन. तुलसीचं लगीन झाल्यावं उर्कून टाकू लगीन. उंद्यालाच तू जा नं होनारे सुनसला बगून ये!'' आकासनी सरसोतीवं जबाबदारी सोपीवली.

''आरं बाला, तुला पसंत हाय नं, बस झैलं! मंगं ती कैसीबी आसूंदे!'' सरसोती खूषीन बोल्ली.

''आयव, एक सांगू, आपल्या गावचा सरपंच भुजंगाची पोर माजे मनान भरलंय!'' आकासने खरं खरं सांगलं.

''काय? ते दुसमनाची पोर नं आपले घरान? आरं आक्शाऽ, तुज्या बापासला, ते सरपंचाचे कट कारस्थानानी मार खावा लागला. ये भलतं नातं जुलीवंलं तं लोखं काय बोल्तील?'' सरसोतीनी आगपाखर केली.

आकासनी सरसोतीला समजावून सांगाची कोचीस केली, ''आयव, ते मनीषाचं नं माजं बरेच दिस पिरम व्हतं. पून ये म्हामारीचे कालान तिचं दोनीं डोलं....''

''.....फुटलं! आरं, ऐसे गांधारीला गल्यान घालून सौसार कैसा करशील? आक्शी, काय क्यालंस तूनी?'' सरसोतीनी आकासला गदगदा हालवला.

''आये, माझे ध्येय धोरनापरमानं क्यालं. माजा एक डोला आव्वेयदान करून मनीषाला दिला!'' आकासनी डोल्यावंला गोगल कारला.

सरसोती आकासचं डोलं निरखीत बोलू लागली, ''तुजे पईत्र पिरमाचा मयमा सांगाला सकूनुच नय. खरच आकासबाला, तू ये घराचा वंशाचा दिवा व्हेस. सवता कालोखान –हेवून आजूबाजूला उजेर देनारा तू आकासदिवा व्हेस! 'आकासदिवा!!' ''

**शब्दार्थ :**

आकासदिवा – दिवाळीत उंच काठीला अडकवून लावलेला दिवा, परगना – परगणा, भूप्रदेश, डोंगराचे दरी –डोंगराजवळ, ज्याम – भरपूर, पुष्कळ, आरवलनाचा – आडवळणी, वराची – वडाची, आरडांड – आडदांड, दांडगा, म्हैसरं – म्हशी रेडे, खोंदान गच्पाटं–खोलगटभागी गच्च झुडूप, गवत जागा, वंधांच्या वया – निवडुंगकुंपण, बावी – विहिरी, साला – शाळा, आसा – असे, मोसं – समोर, पुढे. सत्तीस गुन – छत्तीस गुण, आवरी – इतकी, आग्या येताल– भुतांचा राजा, तापट मनुष्य, वारवा – स्पर्श, वारा, सावली. मलय – मलई (वरची कमाई), फतले – नपुंसक (हिजड्यासारखे), सालकाया मालकाया – काहीच काम नसलेल्या बायका, झोटिंग – जुलमी माणूस, बर्बारत – बडबडत, लाखारी – चुलीतील राख, यंतरं. तंतरान – यंत्र तंत्रात, गिरान – ग्रहण, काँचेबी – कुणाचेसुद्धा, आंध्रसद्दा – अंधश्रद्धा, येस–बापूस – आईवडील, वकला – ओकला, बोलला. गरामसबा – ग्रामसभा, आख्ते–पोख्ते – वृद्ध जाणकार, चरं – चऱ्हे, गरग्यावं – दगडांवर, मुक्या–बैराट – मुका–बहिरा, धर्पिरला – खडसावले, इत्यास – इतिहास, पर्षद – परिषद, रास्टीय – राष्ट्रीय, लाम्हन – दीर्घकाळ, चट – चव, रग. बावखंड – बाहूदंड, फुरन – स्फुरण, वल – माराने उठलेला चट्टा, नेहमीची सवय, चिस्टाल – अवचित भयदृश्य, कुतरभुकी – कुत्र्यांचा भुभुकार, हुटूटी – टिटवी, आरकुशीला – आडबाजूला, सरसोती – सरस्वती, चिलीपिली – लहान मुले, दुदावली – इतरत्र गेली, सुतेरं – कोळी, भार्जा – पत्नी, इवालंला – हळू ओरडला, आंग मोरलं– आळोखेपिळोखे, आपेशा – अपेक्षा, उखिलंला – उकरून काढला, मंशा – इच्छा, मनीषा. लॉगडाचा – लोखंडाचा, यापार – व्यापार, आखरं वय – इकडे वई, कुंपण, तखरं नय – तिकडे नदी, चितीत – चिंतन, मईत – मरण पावला, देवाज्ञा. लवाटं – शेतातील निदन, लांबा. गोजरुक – वासरू, म्हापाप – महा पाप, म्हापुन्य – महा पुण्य, निरधार – निर्धार, हारांचा – हाडांचा, जंच्या तयाच – जिथल्या तेथेच, मना – मला, मत्व – महत्त्व, जागरुती – जागृती, किरती – कीर्ती, शिरेष्ठ – श्रेष्ठ, पर्चार – प्रचार, रीस – ईर्ष्या, सईल – सैल, डॉच्कं – डोके, सरप – सर्प, चव्हाटा – चौक, रस्त्यावर, कान्चीट – कानातील मळ, कानगोष्टी, बिजूक – पुन्हा, परत, मानपतरं – मानपत्र, गागल – गॉगल, देखनुक – देखणा, सतकार – सत्कार, भर्तार – पती, भ्रतार, जलोस – जल्लोष, पुच्याट – पांचट, च्याट – आश्चर्यचकित.

**– भानुदास पाटील**

## बोलीभाषेवर संकट

गावाकडच्या भाषेत बोलण्याची लाज का वाटते? जी बोली जिभेवर बसलेली आहे आणि जी मला व्यक्त होण्यासाठी सर्वात प्रिय; अशा बोलीबद्दलचा गौरव व आनंद आपण का लपवतो, याचा विचार जरा गंभीरपणे करण्याची वेळ आलेली आहे. घर आधी, शाळा नंतर ही पायरी आपण का विसरतो आहोत? माणसाचा पहिला आवाज व्याकरणातून निघत नसतो. बोलींतूनच सर्वांचा पहिला हुंकार वा पहिला ध्वनी बाहेर आलेला आहे. 'सुधारणा' या फसव्या शब्दाच्या दबावाखाली जिभेवरच्या बोली संकटात आल्या आहेत, हे आपण का विसरतो आहोत. बोलीभाषा जतनासाठी समाजातून सारासार विचार झाला पाहिजे.

**'भाषा चिंतन' – डॉ. केशव सखाराम देशमुख ('सकाळ' प्रकाशन)**



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# सामवेदी बोली

डॉ. नरेश नाईक

**पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्याच्या उत्तर भागात राहणारे ब्राह्मण व ख्रिस्ती लोक बोलतात ती बोली म्हणजेच सामवेदी बोली होय. सामवेदीवर प्राकृत, महाराष्ट्री व मराठी भाषेचा परिणाम असल्याचेही स्पष्टपणे दिसते. मूळ संस्कृत भाषेतून प्राकृत भाषा आकार घेत असताना सामवेदी बोलीवर संस्कृत ध्वनींचा प्रभाव पडलेला दिसतो तसाच तो प्राकृत भाषांचाही जाणवतो. सामवेदी बोलीत आजही प्रचलित असलेली काही शब्दरूपे तत्कालीन प्राकृत भाषेत होती.**

**पालघर** जिल्ह्यातील वसई तालुक्याच्या उत्तर भागात प्राचीन काळापासून सामवेदी लोक राहतात. या भागाला प्राचीन काळी अपरांत म्हणत. नंतरच्या काळात हा भूभाग शुर्पारक म्हणून प्रसिद्ध होता. प्राचीन काळी सुमारे ३० कि.मी. लांब व १५ कि.मी. रुंद असलेले संपूर्ण शुर्पारक बेट या सामवेद्यांच्या वहिवाटीत होते. हा समूह आजही शेतीप्रधान म्हणून ओळखला जातो. ज्याला फार्महाउस म्हणता येईल अशा प्रकारची घरे व त्याच्या आजूबाजूला शेती-बागायती हे या समूहाचे वासाहतिक वैशिष्ट्य आहे. वेदकाळात यज्ञप्रसंगी करावयाच्या सामगायनात यांच्या पूर्वजांचा सहभाग होता असे यांचे म्हणणे आहे. यज्ञसंस्कृती लयास गेल्यावर या लोकांच्या पूर्वजांना उपजीविकेसाठी शेतीकडे वळावे लागले. शहरीकरण व आधुनिकीकरणामुळे आज या परिसराला बकालपणा आलेला आहे. परंतु प्राचीन काळी हा भूभाग हे एक सुरक्षित व समृद्ध असे बेट होते.

प्राचीन काळापासून हा समूह हलिक ब्राह्मण म्हणजेच हलधर ब्राह्मण म्हणून ओळखला जात होता. पोर्तुगीजांच्या काळात वसईतील बऱ्याच हिंदूंचे सक्तीने धर्मांतरण झाले. त्यात या सामवेदी ब्राह्मणांचा मोठा गट ख्रिस्ती झाला. आज हा गट सामवेदी ख्रिस्ती म्हणून ओळखला जातो. त्यांचे धार्मिक रीतिरिवाज बदलले तरी मूळची जीवनशैली व बोली तशीच राहिली आहे. उत्तर वसईत सामवेदी ब्राह्मण व सामवेदी ख्रिस्ती लोक बोलतात ती बोली म्हणजेच सामवेदी बोली होय. ब्रिटिशांच्या काळात सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनी इ.स.१८९४ साली भारताची भाषिक पाहणी केली होती. १९२२ पर्यंत त्या पाहणीवर आधारित त्यांनी एकूण ११ खंड प्रसिद्ध केले. त्यात तेव्हाच्या ब्रिटिश अंमलाखालील भारतीय साम्राज्यात १७९ भाषा आणि ५४४ पोटभाषा व बोलींची नोंद केली आहे.[१] त्यात त्याने मराठीच्या एकूण ३९ बोली नोंदल्या आहेत.[२] त्याचे पुन्हा त्याने देशी, कोकण स्टॅन्डर्ड, कोकणी आणि वऱ्हाडी असे प्रादेशिक गट केले आहेत. कोकण स्टॅन्डर्ड भाषिक गटात उत्तर कोकणातील एकूण १९ बोलींचा समावेश केला असून त्यात या बोलीचीही नोंद केलेली आढळते.

'वेदांची भाषा छांदसि' होय. परंतु पाणिनीने या 'छांदसिबरोबर भाषायाम्'चाही उल्लेख आपल्या व्याकरणात केला आहे. याचा अर्थ असा की, तत्कालीन समाजात छांदसिहून वेगळी भाषा (बोली) लोकव्यवहारात अस्तित्वात होती. त्या भाषेतही आणखी पोटभेद असावेत असे राजवाड्यांचे मत आहे. वैदिक आर्ष काली आर्य भाषेचा असुरलोक दुष्ट उच्चार करून अपभ्रंश करीत. हे असुर लोक असुर्या देशात राहत. आर्ष ब्राह्मणांनी त्यांचा पराभव केल्याचा उल्लेख शतपथ श्रुतित आहे. अव्यक्त उच्चार करणे हा असुरांचा मुख्य उच्चारदोष होता. यावरून आर्ष भाषेचा अपभ्रंश होता हेच सिद्ध होते. याशिवाय आर्ष भाषेच्या प्रांतिक किंवा गोत्रिय भाषाही होत्या. कारण देवाः-देवासः, देवैः-देवेभिः, त्वानं-त्वीनं-त्वाः अशी अनेक रूपे एकाच

विभक्तीची व वचनाची ज्या भाषेत सापडतात, त्या भाषेत प्रांतिक किंवा गोत्रिय किंवा जातिक पोटभेद असले पाहिजेत यात संशय नाही.''[३] असे राजवाडे यांचे मत आहे.

भाषिकदृष्ट्या पाणिनीकालीन समाजाचे दोन गट झाले होते. त्यातील पहिला गट हा त्रैवर्णिकांचा होता. त्यात ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्यांचा समावेश होता. दुसरा भाग शूद्रांचा. बंदी न केलेल्या शूद्रांना ब्राह्मणांची संस्कृत भाषा कळे. परंतु बोलताना ते तिचा अस्पष्ट उच्चार करीत. ह्या अस्पष्ट बोलण्याला पाणिनी म्लिष्ट असा शब्द वापरतो. त्यामुळे अस्पष्ट उच्चार करणाऱ्या सर्व लोकांना त्या काळी म्लेंच्छ म्हणत. जीभेला उच्चाराचे वळण नसल्याने ते संस्कृत भाषा बोबड्याने बोलत. थोडक्यात, पाणिनीकाली ब्राह्मणांत शुद्ध संस्कृत भाषा, क्षत्रिय व वैश्यांत अस्पष्ट व गावंढी भाषा आणि माणसाळलेल्या शूद्रात बोबडी चालीपुरती चालचलाऊ बोली असे भाषेचे तीन प्रकार रूढ होते.[४] म्हणजेच मूळ संस्कृतपासून प्राकृत भाषा निर्माण झाल्या आणि प्राकृत भाषेपासून अपभ्रंश जन्मल्या; त्या अपभ्रंशापासून पुन्हा स्थानपरत्वे वेगवेगळ्या भाषा निर्माण झाल्या. त्या भाषा म्हणजेच मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली इ. अर्वाचीन भाषा आहेत.

वसईत राहणारे सामवेदी ब्राह्मण व सामवेदी ख्रिस्त्यांची बोली ही मराठीचीच एक बोली आहे. बोली म्हणजे एखाद्या विवक्षित समाजगटाची परस्परविनिमयाची बोलभाषा. तिच्यातील शब्द, उच्चार, रूपे, वाक्प्रचार इ. शेजारच्या समाजगटाला समजत असले तरी ते त्यांच्या बोलीतील शब्दोच्चार, रूपे इत्यादींहून काहीसे भिन्न असतात. दोन व्यक्ती एकाच समाज-संस्कृतीगटातील असल्या तरीही त्यांच्या शब्दोच्चारादी भाषिक विशेषांतही फरक पडतो.

सुरुवातीला आर्य लोकांत तीनच वर्ण होते. त्यांना आर्येत्तरांशी सतत संघर्ष करावा लागत होता. त्याला कंटाळून आर्येत्तरांपैकी काही टोळ्यांनी रानावनाचा आश्रय घेतला, तर काहींनी त्यांचे वर्चस्व स्वीकारले. त्यांना आर्यांनी वैदिक धर्मात सामावून घेतले व चौथ्या वर्णाचा दर्जा दिला. परंतु या चतुर्थ वर्णामुळे आर्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर बराच परिणाम घडून आला. त्यात आर्यांच्या भाषेवर झालेला परिणाम फार महत्त्वाचा होता.

त्या काळी समाजात अनुलोम विवाहाची पद्धत रूढ होती. एकाहून अनेक विवाह करण्याचीही प्रथा होती. ब्राह्मणपुरुष ब्राह्मण स्त्रियांव्यतिरिक्त क्षत्रिय, वैश्य व आर्यांत सामावलेल्या शूद्र स्त्रियांशीही विवाह करीत. त्यांच्यापासून ब्राह्मणाला झालेली मुलेही ब्राह्मणच गणली जात व ती ब्राह्मणांच्या घरीच राहत. त्यामुळे शूद्रीच्या पोरांना शूद्रीचे शौचकर्म, शूद्रीचे अस्पष्ट उच्चार, शूद्रीचा कृष्णवर्ण व शूद्रीच्या माणसांची संगत लागून ब्राह्मणांच्या घरात एकप्रकारचे अपकृष्ट ब्राह्मण निपजत.[५] हाच प्रकार क्षत्रिय व वैश्यांच्या घरातही होत असे. घरातील शूद्रस्त्रिया, शूद्रसेवक व शूद्रोत्पन्न ब्राह्मण पोरे यांच्या संख्याबाहुल्याने व ह्यांच्याशीच सदा व्यवहार पडल्याने शुद्ध त्रैवर्णिकांच्या गृहपत्न्यांचाही आचार, विचार व भाषा प्राकृत झाली. त्यामुळे घरात मुख्य जो ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्य, तो एकटाच तेवढा संस्कृत बोलणारा व शुद्ध आचारविचार बाळगणारा राहिला. आर्यस्त्रिया केवळ शूद्र स्त्रीवत् होऊन गेल्या[६] असे निरीक्षण राजवाडे यांनी नोंदवून ठेवले आहे. अशा अनार्यांच्या संगतीने ब्राह्मणांनादेखील अपोच्चार व अपभाषण करण्याची सवय लागण्याची भीती होती. म्हणून ब्राह्मणाने अनार्य म्लेंच्छासारखे अपभ्रष्ट उच्चार करू नयेत असा इशारा त्या काळी उच्छृंखल ब्राह्मणांना तत्कालीन शिष्टांनी दिला होता.

वैदिक संस्कृत भाषेची अशा प्रकारची भ्रष्टता किंवा तिचे संस्कृत भाषिकाच्या दृष्टीने अनिष्ट असे परिवर्तन थांबविण्यासाठी आणि आपली वैदिक संस्कृत भाषा शुद्ध स्वरूपात टिकविण्यासाठी आर्यांनी प्रथम आपले मंत्र मुखोद्गत केले आणि ते संग्रहित व संरक्षित केले. ही घटना साधारण इ.स.पूर्व १२व्या शतकात म्हणजेच मौर्य-ब्राह्मी लिपी तयार झाल्यावर घडली असली पाहिजे असे चतर्जींचे मत आहे. त्यामुळे प्राचीन ग्रंथातून जरी वैदिक संस्कृत शुद्ध स्वरूपात टिकून राहिली तरी वाचिकदृष्ट्या तिची भ्रष्टता वाढतच गेली. त्यात नंतर उदयास आलेल्या जैन व बौद्ध पंथांनी शूद्रादी सर्व लोकांना समजणाऱ्या प्राकृत भाषेत लिहिण्याचा व बोलण्याचा उपक्रम सुरू केला. त्याचाही त्रैवर्णिकांच्या संस्कृत व वैदिक भाषांवर परिणाम झाला. त्यामुळे जैन-बौद्ध पंथांचा प्रसार होता होता वैदिक भाषेसह संस्कृतचे उच्चाटनही सहजपणे झाले. अर्थात ह्याला तत्कालीन वैदिक ब्राह्मणांचा कर्मठपणाही तितकाच कारणीभूत ठरला. त्यामुळे पुढे संस्कृत भाषेतून पाली, सौरसेनी, मागधी, पैशाची, महाराष्ट्री अशा प्राकृत भाषा निर्माण होत गेल्या. आणि त्यातूनच पुढे मराठी, गुजराती, बंगाली इ. प्रांतिकभाषा निर्माण झाल्या ज्याचा उल्लेख वर झालेला आहे.

अपरार्काच्या काळी म्हणजेच साधारणपणे बाराव्या शतकात ब्राह्मणांना प्रथम मांसाहार निषिद्ध झाला. नंतर ब्राह्मणांच्या इतर वर्णीयांबरोबरच्या भोजनादी व्यवहारावरही बंदी आली. त्यावरून तत्कालीन समाजात आहारावरून वर्णाच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेचा वेगळा मापदंडही तयार झाला. साहजिकच मांसाहार करणाऱ्या इतर वर्णियांच्या स्त्रियांशी

विवाह करण्यावरही बंधनेच आली. परिणामी ब्राह्मणांचा इतर वर्णियांशी असलेला सामाजिक सलोखाही आपोआप संकुचित होत गेला. यावरून असे म्हणता येईल की, त्याकाळी प्रथम ब्राह्मणासारख्या प्रमुख वर्णांचे कर्मठ जातीत रूपांतर होत गेले. नंतरच्या काळात इतर वर्णांनीही त्यांचेच अनुकरण केले. आधी वेदांप्रमाणे ब्राह्मणांचे चार गटात विभाजन झाले. त्यात अनुलोम विवाहाच्या प्रथेमुळे मुख्य वर्णातही अनेक उपजाती निर्माण होत गेल्या. कालांतराने त्याही दृढ झाल्या. पुढे त्यांच्यातील रोटी-बेटी व्यवहारही निषिद्धच मानला जाऊ लागला. अशा प्रकारे चार प्रमुख वर्णांतून अनेक जाती-उपजाती निर्माण झाल्या. या उपजातींमुळे भाषासंकर होत गेला व पुढे त्यातूनच अनेक उपबोलीही तयार झाल्या. एकाच प्रांतातील दोन उपबोलींच्या शब्दांत किंवा ध्वनीमध्ये जे साधर्म्य आढळते, त्याचे कारण आपल्याला यात सापडते.

भाषा अपभ्रष्ट होण्यास किंवा त्यातून नवीन बोली निर्माण होण्यास वेगवेगळे सामाजिक व सांस्कृतिक घटक कारणीभूत ठरत असतात. याशिवाय स्थानपरत्वे, व्यक्तिपरत्वे, संस्कृतिपरत्वे आणि वाचिकदृष्ट्याही भाषेवर परिणाम घडत असतो. एखादी भाषा नव्याने बोलणाऱ्याचा शब्दोच्चार करतानाचा आळस किंवा शारीरिक ठेवणीमुळे काही विशिष्ट उच्चार करण्याची असमर्थता हे घटकही भाषेवर परिणाम करू शकतात. कधी कधी शब्दातील मूळ शब्द किंवा धातू व त्यांना लागणाऱ्या प्रत्ययासंबंधीचे अज्ञान हेही एक कारण असते, आणि (बरेचदा) ते अधिक प्रभावी ठरते. यातून जे अपभ्रंश निर्माण होतात, ते बालांच्या ठायी सहज संभवतात. त्यानंतर अशिक्षित स्त्रिया, शूद्र लोकांच्या मुखातून असे अपभ्रंश निर्माण होत राहतात[८] असे निरीक्षण राजवाडे यांनी नोंदवून ठेवले आहे.

यावरून असे म्हणता येईल की, मूळ संस्कृत भाषेतून प्राकृत भाषा आकार घेत असताना सामवेदी बोलीही आपले रूप सिद्ध करीत गेली. त्यामुळे सामवेदी बोलीवर संस्कृत ध्वनींचा जसा प्रभाव पडलेला दिसतो, तसाच तो प्राकृत भाषांचाही जाणवतो. सामवेदी बोलीत आजही प्रचलित असलेली काही शब्दरूपे तत्कालीन प्राकृत भाषेत होती. आणि याचा पुरावा आपल्याला डॉ. वा. वि. मिराशी यांच्या 'सातवाहन व पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास' या ग्रंथात सापडतो. हा ग्रंथ सातवाहन व पश्चिमी क्षत्रप यांच्या कोरीव लेखांवरून सिद्ध झाला आहे व त्यातील लेखांची भाषा तत्कालीन बोलीसारखी होती.[९] असे मत मिराशी यांनी मांडले आहे. या सातवाहनांचा कालखंड इ.स.पूर्व २३० ते इ.स. २३० असा आहे, अशी नोंदही डॉ. मिराशी यांनी करून ठेवली आहे.[१०]

प्राकृतातून सामवेदी बोलीत आलेली ही रूपे पहा.

| संस्कृत | प्राकृत | सामवेदी |
|---|---|---|
| द्वितीया | बितिय | बिज |
| तृतीया | ततिय | तिज |
| द्वादशी | बारस | बारस |
| त्रयोदशी | तेरस | तेरस |
| पक्ष | पख | पाख |
| नक्षत्र | नखत | नखित्र |
| वत्सी | वच्छी | वच्छी |

'वत्सी' म्हणजे पुत्री अथवा मुलगी होय. संस्कृतमधील हे सर्वनाम प्राकृतात येताना नाम झाले व सामवेदीत ते तसेच राहिले. प्राकृतात 'क्ष' चा 'ख' होतो. बोळिंज व विरारच्या मध्ये खारोडी नावाची छोटीशी वस्ती आहे. तिचे मूळ संस्कृत नाव 'क्षारवटिका' असे होते. प्राकृतात त्याचे क्षारवाडी खारवाडी खारोडी असे रूप झाले. महाराष्ट्री व शौरसेनीत अकारान्त पुल्लिंगी प्रथमेचे एकवचन ओकारान्त होते. क्षेत्रपाल या पुल्लिंगी नामाचे प्रथमेचे एकवचन सामवेदीत खेत्र्यो' असे ओकारान्त झाले. प्राकृतात मूळ 'स' व 'स्स' यांचा उच्चार 'ह' असा झाला.[११] सामवेदी बोलीतही 'स' चे उच्चारण 'ह' असेच होते. उदा. संक्रांत-हिकरात, सोपारा-होपारा, सोनं-होना, बस-ब्येंह्यॅं इ.

नाणेघाटातील पांडवलेण्यांत जी सहा सनाम चित्रे कोरलेली आहेत, त्यांत 'कुमारी हकु सिरि' हे एका राजपुत्राचे नाव आहे. हा 'हकु' शब्द 'सकु' शब्दाचेच ('स' चा 'ह' होऊन झालेले) दुसरे रूप आहे. असाच 'स' चा 'ह' आंध्रभृत्यांच्या दुसऱ्या एका नावात झालेला आहे. वायुपुराणातल्या यादीतील सातवे नाव 'हाला'चे आहे. हे नाव 'साल' असेहि प्रसिद्ध आहे. सालोमनच्या काळात (इ.स.पूर्व १०००) 'सोपारा'चे 'होपारा' (ओफिर) झाल्याची नोंद ठाणे गॅझिटिअरने करून ठेवली आहे.

गुजराती भाषेतही अशीच 'स' चा 'ह' करण्याची लकब आहे. त्यामुळे काही लोकांचे असे म्हणणे आहे की, सामवेदी बोलीवर गुजराती भाषेचा प्रभाव आहे. परंतु हीच 'स'चा 'ह' करण्याची लकब बोर्डी, घोलवडपासून ते थेट मुंबईपर्यंत पसरलेल्या पश्चिम किनारपट्टीतील सोमवंशी क्षत्रियांच्या वाडवळ बोलीतही आहे. वाडवळ बोलीत आजही संक्रांताला हकरात, सोन्याला होनं, सकाळला 'हकाळ' अशी रूपे आहेत. आणि हे सोमवंशी क्षत्रिय तर तेराव्या शतकात बिंब राजाबरोबर पैठणहून उत्तर कोकणात येऊन स्थिर झाले. त्यामुळे गुजराती भाषेचा पैठण परिसरातील सोमवंशी

क्षत्रियांच्या वाडवळ बोलीवर प्रभाव पडण्याची शक्यता खूपच धूसर आहे. शिवाय सामवेदी बोलीनेही ही लकब या सोमवंशी क्षत्रियांच्या आगमनापूर्वीपासून स्वीकारली होती हे आपण यापूर्वीच पाहिले आहे. म्हणून या सोमवंशी क्षत्रियांच्या वाडवळ बोलीने ही लकब कुठून कशी स्वीकारली असा प्रश्न येथे निर्माण होतो.

पंजाब व गंगेचे खोरे येथे वैदिक आर्यांनी वस्ती केल्यानंतर हिंदुस्थानात ज्या आर्यांच्या टोळ्या आल्या, त्या Homo Alpinus वर्गाच्या. (म्हणजे गुलाबी रंग, मध्यम बांधा, उठून दिसणारे नाक, सरळ लांबट चेहरा, विपुल कुरळे केस व लहान डोके असणाऱ्या) रास्टिक किंवा रट्ट यांच्यापैकी पहिली टोळी गंगेच्या खोऱ्याला दक्षिणेकडे वळसा घालून बिहारकडे गेली व तेथे स्थायिक झाली. रट्टांची दुसरी टोळी काठेवाड व दक्षिण देशाकडे वळली. त्यांच्या नावावरूनच सौराष्ट्र व महाराष्ट्र ही देशनामे पडली[१२] असे मत रामप्रसाद चंदा यांनी नोंदवून ठेवले आहे. डॉ. भांडारकरांच्या मते पैठणला राहणारे रास्टिक म्हणजे राष्ट्रीक ते हेच महाराष्ट्रीय लोक असावेत. कारण रट्ट नावाची एक जमात फार प्राचीन काळापासून दक्षिणापथावर राजकीय वर्चस्व गाजवून होती. हे रास्टिक किंवा राष्ट्रीक हे मूळचे आर्यच असले पाहिजेत असे चिंतामणराव वैद्यांचेही मत आहे. मराठे हे आर्योद्रविडिअन असून ते आर्यभाषिक होते असेही त्यांचे म्हणणे आहे. त्यांनी काढलेला निष्कर्ष असा की, वऱ्हाड व महाराष्ट्र येथे वस्ती करून राहिलेले लोक सोमवंशी होते व ते हिंदुस्थानात आलेल्या दुसऱ्या टोळीच्या आर्य लोकांपैकीच होते.[१३]

याचा अर्थ पश्चिम किनारपट्टीवरील सोमवंशी क्षत्रिय हे मूळचे आर्यवंशीय व आर्यभाषिकच होते. आर्यबोलीने प्राकृतरूप धारण केल्यानंतर ते दक्षिणेकडे सरकले असावेत. या संदर्भात आणखीन एक शक्यता पडताळून पाहता येईल. परशुरामाने ज्याचा वध केला, तो कार्तवीर्य सहस्रार्जुन हैहय हा सोमवंशी क्षत्रिय होता. महाराष्ट्रात, विशेषतः जळगाव जिल्ह्यात राष्ट्रकूट नृपती प्रथम अमोघवर्ष याच्या काळातील शके ७४७ (इ.स. ८२६) मधला मेहूण शिलालेख सापडला. तेथे महाराष्ट्रीय हैहय वंशीयांचे राज्य शके ७२८ (इ.स. ८०७) पूर्वीपासून असले पाहिजे. हैहय वंशीय राजे मूळचे माहिष्मतीचे म्हणजे नेमाड जिल्ह्यातील नर्मदेच्या काठावरील महेश्वर येथील होय. इतिहासाला ज्ञात असलेले माहिष्मतीचे कलचुरी (हैहय) ही त्यांची मूळ शाखा. त्यातील शेवटचा ज्ञात राजा म्हणजे बुद्धराज होय. तो उत्तरेत माळव्यापासून दक्षिणेत महाराष्ट्रापर्यंत पसरलेल्या विस्तृत प्रदेशाचा स्वामी होता असे डॉ. मिराशींचे मत असल्याचे वि.भि. कोलते यांनी म्हटले आहे.[१४] आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ ते पुढे म्हणतात, ''धामोरी (जि. अमरावती) येथे माहिष्मतीचा कलचुरी (हैहय) नृपती कृष्णराज याच्या चांदीच्या नाण्यांचा एक फार मोठा साठा सापडला होता. त्यावरून माहिष्मतीच्या कलचुरी-हैहयांचा अस्त झाल्यावर त्यातील काही राजपुरुष या प्रदेशात आश्रयाला येऊन त्यांनी तेथे नवीन राज्य स्थापन केले असणे अशक्य नाही''[१५] असेही त्यांचे मत आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, माहिष्मतीहून दक्षिणेकडे सरकलेल्या हैहयवंशीय क्षत्रियांबरोबर पश्चिम किनारपट्टीवरील सोमवंशी क्षत्रियांचे पूर्वजही स्थलांतरित झाले व पैठणपरिसरात स्थिर झाले.

इ.सनाच्या दुसऱ्या शतकात होऊन गेलेल्या श्रीपुळुमायी या सातवाहन अथवा शालिवाहन राजाचे पैठण हे राजधानीचे शहर होते अशी नोंद टॉलेमी या ग्रीक लेखकाने करून ठेवली आहे.[१६] याचाच अर्थ असा की, तत्कालीन भाषेचा प्रभाव सामवेदी बोलीवर जसा पडला, तसाच तो सोमवंशी क्षत्रियांच्या बोलीवर पडला होता आणि सातवाहन काळातील भाषेत 'स' चा 'ह' करण्याची जी लकब होती, ती या सोमवंशी क्षत्रियांच्या बोलीने त्याकाळीच उचलली होती. परंपरेने ती तशीच चालत राहिली इतकेच. याच सोमवंशी क्षत्रियांमध्ये काही लोकांचे उपनाम चुरी असे आहे, त्याचा संबंध प्राचीन कलचुरी या नावाशी असावा असे दिसते.

यावरून आपल्या असे लक्षात येते की सामवेदी, वाडवळ किंवा गुजराती भाषेतील 'स'चा 'ह' करण्याची लकब ही पूर्णपणे प्राकृत भाषेची देणगी आहे. आंध्रभृत्यांच्या काळात प्राकृत भाषेला राजाश्रय मिळाला होता. त्यामुळे तत्कालीन बोली व (शिला)लेखांतही ही रूपे तशीच राहिली. ही प्राकृत भाषा साधारण इ.स.पूर्व ६०० ते इ.स. ६०० अशी हजार बाराशे वर्षे टिकली[१७] असे मत ग्रामोपाध्ये यांनी नोंदविले आहे. तिच्यातून पुढे अपभ्रष्ट भाषा निर्माण झाली व ती साधारणपणे अकराव्या शतकापर्यंत टिकली. त्यातूनच पुढे मराठी भाषा विकसित झाली.

याच दरम्यान शंकराचार्यांनी वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन सुरू केले. त्यामुळे संस्कृत भाषेला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले. इतकेच नाही तर संस्कृतमधून ग्रंथरचनाही होऊ लागली. आपले समकालीन संस्कृत भाषेचा प्रसार व प्रचार करीत असताना ज्ञानेश्वरांनी मात्र मराठी भाषेचा पुरस्कार केला. इतकेच नाही तर ज्ञानेश्वरीच्या रूपाने मराठीला ग्रांथिक मान्यता व प्रतिष्ठाही प्राप्त करून दिली.

प्राचीन मराठीत एँ किंवा एनि या प्रत्ययांनी तृतीयेची रूपे सिद्ध होतात. या रूपांबरोबर आँ-प्रत्यान्त तृतीयेचे रूपही आढळते. (उदा. डोलाँ, वेगाँ, श्रोताँ, नवरसाँ इ.) मराठीतील

'आ' प्रत्ययान्त रूपे सामवेदीत 'ओ'न्त होतात. या 'ओ' प्रत्ययात ज्ञानेश्वरकालीन 'आँ' प्रत्ययध्वनि मिसळून सामवेदी बोलीत ग्येलौं, बोयलौं, ब्येहलौं अशी आँ+ओ मिश्रित चतुर्थी एकवचनाची रूपे आढळतात. याच धर्तीवर जासौं, कन्यासौं, आढ्यासौं अशी सप्तमी एकवचनाची रूपेही आढळतात. ज्ञानेश्वरीतील 'मी बोलिंलौं'(२.५२) असे 'औं प्रत्ययान्त कर्तरिरूप म्यें बोयलौं' अशा रूपात सामवेदीतून येते.

ज्ञानेश्वरांच्या काळातच सर्वसामान्यांना सामावून घेणारा व जातिभेद न मानणारा महानुभाव पंथ उदयास आला. या पंथाने जनसामान्यांबरोबरच त्यांची बोलीभाषाही स्वीकारली. सामवेदी बोलीत आजही प्रयोगात असलेली कित्येक शब्दरूपे आपल्याला महानुभाव वाययात आढळतात. महदंबा ही महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांची शिष्या. तिने लिहिलेल्या 'रुक्मिणी-स्वयंवर' कथेला 'धवळे' असे म्हणतात. या धवळ्यातून आढळणारी ही काही रूपे पहा.[१८]

| **धवळ्यातील शब्दरूपे** | **सामवेदीतील शब्दरूपे** |
|---|---|
| आइकता/आयकौनि (पृ. ८०.) | आयकोन |
| आयकीले (पृ. ८१.) | आयकीला |
| इए (पृ. ८०.) | इआ |
| आफविला (पृ. ८१.) | आपविला |
| एउनिया (पृ. ८२.) | एवोन |
| मीरवताए (पृ. ८२.) | मिरवातैं |
| जाला (पृ. ८२.) | जालें |
| करविली (पृ. ८३.) | करविला |
| दुइता (पृ. ८५.) | दुइ |
| आंग (पृ. ८७.) | आंग |
| आइति (पृ. ९१.) | आयता |
| घाए (घाव) (पृ. ९६.) | ग्हाय |
| यातें (ह्याला) (पृ. ९६.) | यातैं |
| दरूषण (दर्शन) (पृ. ९७.) | दरषाण |
| पोखणे (पृ. ९७.) | पोखणा |

श्रीगोविंदप्रभुचरित्रातही[१९] काही शब्द आढळतात.

| | |
|---|---|
| वीकरा (पृ. ५७.) | विक्रो |
| दाभ (पृ. ७८.) | दाब |

याशिवाय दृष्टांत पाठातील[२०] ही रूपे ही पाहण्यासारखी आहेत.

| | |
|---|---|
| पाखा (पृ. २९.) | पाख |
| जीभ झडे (पृ. ३७.) | जीबजढ्दें |
| पींढे (छोटा पाट) (पृ. १११.) | पिंडा |
| वाकळ (पृ. १११.) | वाकळ |
| डाळ (डहाळी) (पृ. १४२.) | डाळ |
| रीण (कर्ज) (पृ. १४२.) | रिण |

या उदाहरणांच्या तुलनेत गुजराती भाषेतील शब्दरूपांचे साधर्म्य मात्र सामवेदी बोलीत अधिक प्रमाणात आढळून येते. या सामवेद्यांचे पूर्वज काठेवाडातून स्थलांतरित झाले होते. त्यामुळे त्यांच्या बोलीवर तिथल्या भाषेचाही परिणाम झाला असणे शक्य आहे. परंतु या साधर्म्याचे मुख्य कारण असे आहे की, प्राकृत भाषेतून गुजराती भाषा आकार घेत असताना सामवेदी बोलीही आपले स्वतंत्र रूप सिद्ध करीत होती. कदाचित ही भाषिक प्रक्रिया सुरू असण्याच्या काळातच सामवेद्यांच्या पूर्वजांचे स्थलांतरण झाले असावे. याशिवाय व्यापाराच्या निमित्ताने या सामवेद्यांचा गुजराती भाषकांशी संबंधही येत होता. (कोफराड हे ग्रामनाम तेथल्या पेढीवर येणाऱ्या गुजराती व्यापाऱ्यांनी दिल्याचे आपण यापूर्वी पाहिलेच आहे.) त्यामुळे सामवेदी बोलीत काही रूपे प्राकृतातून, काही गुजरातीतून तर काही महाराष्ट्री बोलीतूनही आलेली दिसतात. पुढे उदाहरणादाखल गुजराती बोलीतून सामवेदी बोलीत आलेली शब्दरूपे दिली आहेत.

अणवरी, अहींतहीं, आइतवार, आकडौं, आंगळी, आफड, ई(हे-सर्वनाम), इट, उगाड, उच्छव, (त्स चा च्छ ही प्राकृतची देणगी), उनाळो, ओ(वो) (तो-सर्वनाम), ओट (ओहोटी), ओटो, ओवाळ, ओळो, कंई(काही), कंकोत्री, कनेरी (कणेरी), कंतान, कपची, कपरोड (यावरून कोफराड हे ग्रामनाम रूढ झाले), कलाक, काथो, कित्तो, किस्सो, किडो, कुपो, कुलो, कोथळी, खटलो, खाडो, खोटी, खोबो, गांठ (प्लेगची गाठ. यावरून सामवेदीत 'गांठ आली' अशी शिवी प्रचलित आहे), गाळी, गुनो, गुंतो, गोठो, गोळो, चा(सा)डी (चहाडी), चितार, फटाको, फटको, फायदो, फासो, बाफलेली, बाक (डा), बाबरी, बिल्लो, बीज, बोणी, बोंबाट, भ्यें(भय), मस्को, मसा(शा)लो, माजूर, माळो, म्यें-मी, जांबू, जघडो, डाम, डाळ (डहाळ), डोळो, तर होडी, दमडो, दिवो, दोरो, धो(व्), गोखो, नाथ, पकवान, पत्तो, पाणेरी, (मूळ शब्द पनिहारी, म्हणजेच पाणी भरणारी स्त्री. त्यावरून सामवेदीत स्वयंपाकघरात पाणी ठेवण्याच्या स्टँडला पाणेरी हा शब्द रूढ झाला.) पंद्रा, पानो, पालो, राखोडी-राखाडी, लाणी, वरोटो, वारो, हेज. इ.

प्राकृतातील 'आ'प्रत्ययान्त रूपे 'ओ'प्रत्ययान्त करण्याची लकब सामवेदी बोलीप्रमाणे गुजराती भाषेतही आढळून येते. वर दिलेली काही रूपे तत्सम तर काही तद्भव आहेत. अपवाद

सोडल्यास ही सर्व रूपे प्राकृतातून सामवेदी व गुजरातीमध्ये आलेली दिसतात. त्यामुळे सामवेदी बोलीवर गुजराती भाषेचा प्रभाव आहे असे म्हणण्यापेक्षा या दोहोंवर प्राचीन प्राकृतचा प्रभाव आहे. आणि यामुळेच या दोन्ही बोलींतील ध्वनींत बरेच साधर्म्य आहे असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल.

केरळात कोचीनमध्ये राहणारी एक जमात आहे. ते लोक जी बोली बोलतात तिला 'कोचीन बोली' असे म्हणतात, त्या बोलीतील काही शब्दांचेही सामवेदी बोलीतील शब्दरूपांशी साधर्म्य आहे. पुढे दिलेली कोचीन व (कंसातील) सामवेदीरूपे पहा.

भेंड्ये (बेंढ्ये), आंबो (आंबो), कोयती (कोयती), वोयी (वय), मांडुरी (मांडुला), सावी (चावी), शड्डी (शड्डी), मुंब्रा (मुंब्रा/मच्छर), जीवाण (जिवाण), मराण (मराण), विस्सु (विस्सु), माई-सासू (माई), रूख (प्राकृत) वृक्ष, पालो (पालो), कडे (कडे, कोठे?), शिकल (शिक्कल), पोकाळ (पोकाळ), ताम्डो (ताम्डा), रित्तो (रितो), डावो (डावो), काळो (काळो), नवो (नवो), सवदा (सवदा), शोवीस (शोवीस), सौतीस (सौतीस), शाळीस (शाळीस), सप्पन (शप्पन), आयको (आयको), डेव (डेव), शिर (शीर), रडा (रडा) इ. या कोचीन बोलीचे पूर्वजही प्राकृत भाषेचे संस्कार घेऊन उत्तरेकडून दक्षिणेकडे सरकले असावेत असे दिसते. त्यामुळे त्यांच्या बोलीनेही तेच संस्कार टिकवून ठेवले आहेत.

या विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, सामवेदी बोलीवर वेदकालीन भाषायाम्चा (विशेषतः सामगायनातील ध्वनींचा) जसा प्रभाव आहे, तसा त्यानंतर आलेल्या प्राकृत, महाराष्ट्री व मराठी भाषेचा परिणाम घडला असल्याचेही स्पष्टपणे दिसते. परंतु या बोलीच्या ध्वनींवर असलेला सामगायनाचा प्रभाव हे तिचे खास वैशिष्ट्य म्हणता येईल. त्यामुळे सामवेदी लोक बरेचदा हेल काढून बोलतात. त्यांना सर्वसाधारण संभाषणातही वरच्या पट्टीत बोलण्याची सवय आहे. आधीच्या पिढीत सामवेदी बोलताना अनुनासिकांचा वापरही अधिक होत होता. उदा. गाय=गांय्, जाय=नांय्, गाव=गांव् इ. हा सामगायनाच्या उच्चसुरांतील ताना व ललका-यांचा प्रभाव आहे असे म्हणता येईल.

सामवेदी बोलीभाषकाच्या घरगुती बोलण्यात स्वरस्वनांची ध्वनिपातळी सर्वसाधारणपणे मध्यमच राहते. परंतु संभाषण, संबोधन किंवा प्रश्नोत्तराच्या वेळी काही ध्वनींची पातळी उच्च (High) होत जाते. सर्वसाधारणपणे प्रमाण मराठीतील स्वरस्वनांच्या तुलनेत सामवेदी बोलीतील स्वरस्वनांची ध्वनिपातळी काहीशी उच्च राहते. /ए/ आणि /ओ/ हे दोन स्वरस्वन उच्च आणि निम्न अशा दोन्ही स्तरावर वापरले जातात. विशेषतः /ओ/हा स्वरस्वन निम्नस्तर, निम्न स्तरावर घुमटाकार चढता (Gobal Rise बोठ्यो↗= मोठ्या), घुमटाकार उतरता (Gobal Fall ओ↘ ब्डा= एवढं), अशा वेगवेगळ्या प्रकारे वापरला जातो. हा /ओ/अधिक घुमटाकार होतो तेव्हा तो बहुतांशी /ऑ/ च्या दिशेने खाली कंठाच्या दिशेने सरकतो. उदा. सामवेदी बोलीत सून म्हणजे ओव्. यातील /ओ/ या स्वरस्वनाचे उच्चारण घुमटाकार आहे. संरचनात्मकदृष्ट्या/ओव्/ या एकवचनी सामान्यरूपाला अनेकवचनी प्रत्यय लागल्यावर त्यांची रूपे ओआरांना= सुनांना, ओआरांयी= सुनांनी, ओआरांयो= सुनांच्या अशी होणे अपेक्षित आहे. परंतु सामवेद्यांच्या मुखातून याचे उच्चारण ऑआरांना, ऑआरांयी अशा ऑ'कारी स्वरूपात होते. एरव्ही ऑ हा स्वरस्वन सामवेदी बोलीत अपवादानेच आढळतो.

स्वनविपर्यय हेही या बोलीचे आणखीन एक वैशिष्ट्य आहे. स्वनविपर्यय म्हणजे प्रमाण मराठी पदांमध्ये व्यंजनस्वनांचा जो क्रम असतो, तो बदलून वेगळाच क्रम स्वीकारणे किंवा तो वगळून नवीन व्यंजनस्वन स्वीकारणे होय.

पूर्वव्यंजनस्वन विपर्यय आण= आढ, दोघे=दोगे, भांडण= बांढाण, उधार= उदार इ.

पश्चव्यंजनस्वनविपर्ययसुरवंट= हिरबूट, शिंपी=हिंपी, सासू= हावू इ. (सामवेदी बोलीत स चा ह करण्याची लकब आहे.) पूर्वपश्चस्वनविपर्यय धिंड= दिंढ, घास= गाहा, सुंभ= हुंब इ. लुप्तव्यंजनस्वनविपर्यय होडी= ओढी, हंडा= अंढो, हिंदू= इंधू इ.

या बोलीत त= ग-हात, ला= माला, ने= त्याने, पा= त्यापा (त्याच्याजवळ), यी= त्यायी(त्याची), ये= त्याये (त्याचे), ओर= त्योर (त्याच्यावर) असे साधकप्रत्यय वापरले जातात.

या बोलीतील विविध विषय व पदे याप्रमाणे सांगता येतील.

१. वस्तुवाचक नामः- ग-ह (घर), सूल (चूल), बाव (विहीर), राट (रहाट) इ.
२. पदार्थवाचक नामः- श्या (चहा), बाथ (भात), दूद (दुध) इ.
३. सर्वनामः- तो, ती, त्ये, त्यो, वो, आमी, आपुण, तुमी इ.
४. क्रियावाचकः- ब्येहे (बस), धोव् (धू), ठोव् (ठेव), आढ् (आण) इ.
५. स्थलवाचकः- वर, खाला (खाली), अडे (इथे), तडे (तिथे), लाम् (लांब), मे-ये (जवळ), उस्सा (उंच) इ.

६. गुण व भाववाचकः- उषा-ह (हुषार), वेडो (वेडा), शाणो (शहाणा), पांड्रो (पांढरा), काळो (काळा) इ.

७. योगवाचकः- जर-तर, जहां-तांहां (जसे-तसे), जो-तो, ज्याओ-त्याओ (ज्याचा-त्याचा), जडने-तडने (जिथून-तिथून) इ.

८. परिमाणवाचकः- किलो, लिटर, ग्रॅम, तोळो (तोळा), खंडी, मण, फरो, पायली, टिपरी, पेलो इ.

९. अनिश्चित परिमाणवाचकः- ज्याम, खूब, गण्हा (जास्त), थोडा, ओब्डा (एवढं) इ.

वार : होमवार, मंगाळवार, बुदवार, गुर्वार, हुक्कुरवार, हिनवार, रइवार.

मराठी महिने : सैत (चैत्र), वइशाक (वैशाख), ज्येठ (ज्येष्ठ), आखाड (आषाढ), हराण (श्रावण), बाधवो (भाद्रपद), आश्विन, कार्तिक, महगीर (मार्गशीर्ष) पूह (पौष), शिमगो (फाल्गुन).

तिथी : बिज (द्वितीया), तीज (तृतीया), शतुर्ती (चतुर्थी), पन्शमी (पंचमी), शठी (षष्टी), बारस (द्वादशी), तेरस (त्रयोदशी) इ.

***टीप :*** *देवनागरी लिपीत ऱ्हस्व व दीर्घ स्वनांचे उच्चार दर्शविण्यासाठी ऱ्हस्व आणि दीर्घ इकार व उकाराची सोय आहे. परंतु मराठीतल्या बोलींचे लिप्यंकन (Transcription) करताना ही सोय अपुरी आहे. इंग्लिश कळफलकावर (Keyboard) इंग्लिश भाषेतील ध्वनींची वैशिष्ट्ये दर्शविणारी वेगवेगळी चिन्हे उपलब्ध आहेत. तशी सोय मराठी कळफलकावर उपलब्ध नाही. आपल्या बोलीतील ध्वनींचे उच्चस्तरीय व निम्नस्तरीय उच्चारण (High pitch, Low pitch) आणि ओ या स्वरस्वनाचे घुमटाकार चढते व घुमटाकार उतरते उच्चारण (Global rise Global fall) दर्शविण्यासाठी मराठीत स्वतंत्र चिन्हे उपलब्ध नाहीत. त्यामुळे मराठीच्या विविध बोलीत लेखन करणारे लेखक व कवीसुद्धा त्याचे लिप्यंकन मराठीप्रमाणेच करतात. यामुळे वाचकाला संबंधित बोलीतल्या अचूक ध्वनींचा अंदाज येण्यास मर्यादा पडते. सामवेदी बोलीचा संरचनात्मक अभ्यास करताना मी निम्नस्तर व उच्चस्तरासाठी (खाली-वर) दिशादर्शक बाणाचा आणि घुमटाकार चढता व उतरता ध्वनी दर्शविण्यासाठी तिरप्याबाणाचा वापर केला आहे.*

**संदर्भ :**


१. सर जॉर्ज ग्रिअर्सन, लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया, खंड,१ भाग १. प्रस्तावना पृ. १८.

२. तत्रैव, पृ. १४३.

३. वि. का. राजवाडे, ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. ६४.

४. वि. का. राजवाडे, राधामाधवविलासचंपू, पृ. १३५.

५. तत्रैव, पृ. १४७.

६. तत्रैव, पृ. १५०.

७. सु. कृ. चतर्जी, इन्डो आर्यन अँड हिंदी, दु.आ. पृ. ५६.

८. वि. का. राजवाडे, ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण, पृ. ४४.

९. वा. वि. मिराशी, सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. २५४.

१०. तत्रैव, पृ. ०३.

११. गं. ब. ग्रामोपाध्ये, भाषाविचार आणि मराठी भाषा, व्हिनस प्रकाशन, पुणे, पृ. ५२.

१२. रामप्रसाद चंदा, इंडो-आर्यन रेसेस, भाग१,(१९६६), पृ.७५.

१३. गं. ब. ग्रामोपाध्ये, उनि, पृ. १७.

१४. वि. भि. कोलते, महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, पृ. २३३.

१५. तत्रैव, पृ. २४८.

१६. रघुनाथ म. भुसारी, आद्य महाराष्ट्र आणि सातवाहन काल, पृ. ४२.

१७. गं. ब. ग्रामोपाध्ये, उनि, पृ. ५३.

१८. महदंबेचे धवळे, (संपा. सुहासिनी इर्लेकर).

१९. श्रीगोविंदप्रभु चरित्र, (संपा. वि. भि. कोलते), स्नेहवर्धन प्रकाशन,

२०. दृष्टांतपाठ, (संपा. रा. शं. नगरकर), स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

२१. नरेश नाईक, सामवेदी बोलीः संरचना आणि स्वरूप, सिमित प्रकाशन, वसई, पृ.४८-४९.


**- डॉ. नरेश नाईक**



बोलीभाषा विशेषांक

लेख

# कोल्हापूरची भाषा

डॉ. नंदकुमार मोरे

**कोल्हापूरची भाषा येथील प्रत्येक जातिधर्माच्या माणसाला आपली वाटते. कारण ती सर्वांनी मिळून घडवलेली आहे. तिच्यातून कोल्हापूरच्या समाजजीवनाबरोबर येथील माणसांचे स्वभाव, त्यांचे जगणे ध्वनित होते. त्या त्या प्रदेशाची भाषाच तेथील लोकांची ओळख असते. कोल्हापूरही त्याला अपवाद नाही. त्यामुळे कोल्हापूर समजून घेण्यासाठी येथील भाषा समजून घेण्याला पर्याय नाही. म्हणूनच कोल्हापूरकरांची भाषा समजली की, कोल्हापूर समजले म्हणतात.**

**कोल्हापूरची** भाषा म्हणजे कोणती आणि कोणाची भाषा? हा प्रश्न सोडवून घेतल्याशिवाय कोल्हापूरच्या भाषेची चर्चा करता येणार नाही. *'चार कोस पे बदले पानी और बारा कोस पे बानी'* या वाक्प्रचाराप्रमाणे प्रदेशानुसार भाषा ही बदलतेच. त्यानुसार कोल्हापूरची म्हणून एक भाषा आहे. मग कोल्हापुरात ती सर्वत्र एकसारख्या पद्धतीने बोलली जाते काय? तर, नाही. जगाच्या पाठीवर कोठेही भाषा सर्वत्र एकसारखी वापरली जात नाही. ती प्रदेश, वय, वर्ग, लिंग, स्तर, जाती, धर्मानुसार बदलते. एवढेच नाही, ती व्यक्तीनुसारही बदलते. कोल्हापूरची भाषा असे म्हणताना कोल्हापूर शहरातील भाषा असे समीकरण झाले आहे. वास्तविक कोल्हापूर जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक माणूस स्वत:ला कोल्हापुरी म्हणवून घेतो. या सर्वांचेच कोल्हापूरच्या वैभवात योगदान आहे. त्यामुळे या सर्वांची भाषा ती कोल्हापूरची भाषा होय.

कोल्हापूर कलानगरी आहे. ती शेती, क्रीडा, उद्योग-व्यवसायातही आघाडीवर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह वर्षानुवर्षे कामधंदा करणारे येथील पारंपरिक व्यावसायिक, उद्यमनगरीतील कारागीर, गावोगावी राहणारे विविध जातिधर्माचे लोक या सर्वांनी मिळून कोल्हापूरची भाषा घडवली आहे. कोल्हापूरच्या वेगवेगळ्या प्रदेशात स्वतंत्र उच्चारवैशिष्ट्ये, शब्दसंग्रह असलेली भिन्न भिन्न प्रकारची मराठी ऐकायला मिळते. शाहूवाडी तालुक्यातील मराठी आणि चंदगड, आजऱ्याची मराठी यामध्ये अनेक प्रकारचे भेद आहेत. इचलकरंजीतील हातमाग, पॉवरलूमच्या व्यवसायातून घडलेली भाषा आणि कोल्हापूरच्या उद्यमनगरीतील भाषा नक्कीच एकसारखी नाही. चंदगडची 'चंदगडी बोली' तर पूर्णत: स्वतंत्र बोली म्हणून ओळखली जाते. गडहिंग्लजच्या भाषेवर कन्नडचा प्रभाव आहे, तर आजऱ्याच्या भाषेवर मालवणी-कुडाळीचा. त्याशिवाय कोल्हापूर जिल्ह्यातील पूर्वाश्रमीचे सर्व बलुतेआलुतेदार, भटके यांच्या भाषाधारे कोल्हापूर आणि परिसरातील बोलीभाषांचा विस्तृत विचार करता येतो.

कोल्हापूरला कर्नाटक राज्य आणि कोकणची सीमा लाभलेली आहे. त्यामुळे सीमेलगतच्या प्रदेशांमध्ये उच्चार, प्रदेशविशिष्ट शब्दसंग्रह, क्रियापदांचा आणि काळाचा वापर इत्यादी बाबतीत फरक दिसतो. हे उच्चार येथील मराठीत वेगवेगळ्या पद्धतीने मुरलेले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात एक शब्द विविध पद्धतीने कसा उच्चारला जातो याचे एक बोलके उदाहरण पाहता येईल. उदाहरणार्थ, खूप किंवा भरपूर या शब्दासाठी मायंदळ, बक्कळ, लै, रग्गड, लई, हुचेतेवढे, दांडगे, भयंकर इत्यादी शब्द प्रदेशानुसार वापरले जातात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोल्हापूर शहराची म्हणून एक खास भाषा आहे. ती फार लोकप्रियही आहे. तिलाच 'कोल्हापुरी बोली' म्हणून ओळखले जाते. कोल्हापूरचे लोक शब्द घडवण्यात माहीर आहेत. अलीकडे येथील एका नेत्याच्या प्रचारातील टॅगलाइनमुळे 'आमचं

ठरलंय' हा शब्द महाराष्ट्रात बराच लोकप्रिय झाला. काही वर्षांपूर्वी कोल्हापुरातील दुसऱ्या पुढाऱ्याने भ्रष्टाचारावरून 'ढपला पाडला' हा शब्द येथील गुळाच्या ढपल्यावरून घडवला होता. तर 'लई भारी' हा शब्द कॉईन करून एका पुढाऱ्याने आपला प्रचार केला. हा शब्द इतका लोकप्रिय केला की, या शीषर्काचा एक मराठी सिनेमा निघाला. अशापद्धतीने शब्दांची घडण करण्यात कोल्हापुरी लोक प्रसिद्ध आहेत.

कोल्हापूर शहरातील तरुण मंडळांची नावं आणि त्या अनुषंगाने वापरली जाणारी भाषा स्वतंत्र चर्चेचा विषय होईल. कारण या मंडळांच्या नावांमधून येथील तरुणांची मानसिकताच व्यक्त झालेली दिसते. त्यातून तरुणांची एक भाषा अभ्यासता येते. कोल्हापूरमध्ये लाभ उठवण्याला 'आंबा पाडणे' असा शब्दप्रयोग करतात. थाप मारण्याशी संबंधित 'गंडीव, फशिव, पुड्या सोड' असे शब्द वापरतात. खड्ड्याला 'डबरा', खिळ्याला 'मोळा', बटरला 'वरकी' असे येथील खास शब्द आहेत. खूप चांगले असे सांगण्यासाठी लैभारी, चक्कीत जाळ, खत्र्या, नादखुळा, काटाकिर्र असे अर्धा डझन शब्द आहेत. मनावर घेतले तर अशा शब्दांचा एक कोश तयार होईल. उदाहरणार्थ, 'वांड' हा शब्द रूढार्थाने 'खोडकर' या अर्थाचा आहे. कोल्हापुरात तो 'फार भन्नाट, जबरदस्त, अकल्पित' अशा अर्थासाठी वापरला जातो. त्यामुळे शब्दांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर करण्यात कोल्हापूरकरांचा हात कोणी धरणार नाही.

रांड्या, दादा, भावा हे शब्द जणू येथील व्यवहाराचे 'शब्दतुरे' आहेत. मित्राशी संवादाची सुरुवात यांपैकी एका शब्दाने होते. 'रांड्या, काय सांगतईस', 'दादा, ऐक जरा', 'भावा, पेटलंस की' हे शहरात सहज चक्कर मारताना कान बारीक करून ठेवले की, वारंवार ऐकू येणारे शब्द आहेत. वस्तूतील, व्यक्तीतील भन्नाटपणा सांगताना'काटाकिर्र', 'चक्कीत जाळ' '–जाग्यावर पलटी', 'नादखुळा', 'लई भारी', 'जगात भारी' अशी शब्दमालिकाच ऐकायला मिळते. यातील कोणता शब्द कोठे निवडायचा याचेही शास्त्र ठरलेले असते. अर्थात ते समजून घेणे एखादी सांकेतिक भाषा समजून घेण्याइतके महाकठीण काम आहे. तानून दे, इस्कटलंय, घुमीव, तर्राट, तरतरीत, पेटलाइस की, चिरकुट, चहात दही, सोड पुड्या, डँबीस, टग्या, ब्येनं, ठेंगा, हिंगणमिट्टा, खमक्या, खनक्या, उचापती, इदरकल्याणी, कंचाटा, खंचका, बुंगाट, डोस्कं, टाळकं, टकूरं, नरडं हे येथे वारंवार ऐकू येणारे खास कोल्हापुरी शब्द आहेत. या शब्दांचा उच्चारही खास 'कोल्हापुरी' ढंगात होतो. एखादी व्यक्ती अतिशयोक्त बोलायला लागली की आपसूक 'रांड्या, सोड पुड्या' हे वाक्य कानावर पडणारच. महत्त्वाच्या कामात काही घोळ घातला किंवा चांगल्या विषयात कोणी भलताच थिल्लर विषय घुसवला, तर 'चहात दही' ओतू नकोस म्हणून त्याला 'जाग्यार' थांबवले जाते. वरून त्याची 'आडगं' म्हणून बोलती बंद केली जाते. कोणी उगाच गोड बोलू लागला तर 'दादा, लई राघुवानी बोलू नगस' म्हणत त्याच्या सांगण्यातली हवा काढून घेतली जाते. येथे अनेक गोष्टींचा 'धुरळा' उडवला जातो. अगदी गल्लीतल्या हाणामारीचाही 'धुरळा' उडतो. मग या धुरळ्या 'ढोपार फोडीन', 'हान', 'बडीव', 'घुमीव'ची खास भाषा वापरली जाते. अर्थात् यामध्ये 'पिटिव' म्हणणारीही असतातच. त्यातूनही कोणी जबाबदार माणूस समजूत घालू लागल्यास, 'डोस्क्यात काय इना' म्हणून धुरळा उडवणारे'गपगार' वाटेलाही लागतात. कोल्हापुरीलोक बोलण्याची सुरुवात 'कुठं हुतास भावा'पासून 'ते नव्हं', 'ह्यची भणं', 'च्याआयला' ते 'आईकतासा न्हवं' अशा काही खास पद्धतीनेच करतात. समोरचा बोलताना मध्येमध्ये कधी कारणाने, तर कधी विनाकारण होय, होय करताना दिसतात.

मित्रांच्या गप्पांमध्ये वारंवार विचारले जाणारे काही खास प्रश्न आहेत. विशेषत: समोरचा काही विचित्र किंवा न पटणारे सांगू लागला की, 'गुढघ्याव पडलाइस काय?', 'वडिणग्यासनं आलाइस काय?', 'डोक्याव पडलाइस काय?' असे कोल्हापूर प्रसिद्ध प्रश्न विचारण्याची 'स्टाइल' आहे. एखाद्याला मूर्ख किंवा महामूर्ख म्हणण्याची गुळगुळीत भाषा कोल्हापुरात चालत नाही. त्यासाठी 'वडिणग्यातनं आलाइस काय?' असेच म्हणावे लागते. या वाक्याच्या पार्श्वभूमीदाखल काही माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केल्यास ऐकणाऱ्याच्या हसून हसून डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही. असो. तर कोल्हापूर शहरात 'साळोता' हा शब्द झाडूसाठी, नळासाठी 'चावी' तर दळणासाठी 'दळाप', वाजंत्रीसाठी 'वाजाप', हरणाला हाराण, बदकाला बदाक, वानराला वांदार, मांजराला मांजार असे 'अ'च्या जागी 'आ'म्हणण्याची खास पद्धत आहे. 'टाइम्स' वर्तमानपत्रालाही 'पुढारीच' म्हणणार. भानगड ऐवजी 'लडतर', कशाचाही 'भुमका' उडीवणार, उगाच 'काखेत लिंबू' घालून फिरणार, रस्त्यावरच्या खड्ड्यांना 'डबरे' म्हणून आयुक्तांना कामापेक्षा भाषेचे टेन्शन देणारे कोल्हापुरी लोक आपल्या खास 'भाषे'साठी ओळखले जातात. येथे राजकारण एवढं रक्तात भिनलेले असते की, समोरच्याला वाक्यावाक्याला 'नेतं', 'गंडवा आमास्नी' असे म्हणत राहणार. येथे थापा मारण्याच्या कृतीला 'डांबरीवर

हरण' सोडणं म्हणतात. कोल्हापुरात प्रत्येक बिनडोक माणूस 'रेमं' असतो. तर पश्चाताप करून घेणारी व्यक्ती कितीही सज्जन असली तरी ती येथील लोकांच्या लेखी 'झक मारून झुनका खाणारी'च असते.

कोल्हापुरी सर्वच बाबतीत अशी वेगळी आहे. कोल्हापूरच्या परिसरातही या बोलीचा थोडाबहुत प्रभाव आहे. शहराबाहेर, शहरात काही खास शब्द आणि उच्चार ऐकायला मिळतात. त्यामध्ये ल्हिव (लिही), चिच्चुकं, खाँड (वासरू), खोबरेल त्याल, एशेल त्याल, फवं, ईस्कुट (खेळखंडोबा), आदुगर (आधी), कळवंडणे (भांडणे), गुळमाट (गोड), ढांपी (फांदी), बारडी (बादली), डांब (खांब), डोस्कं, हेंगाड, भस्का, वाइच (थोडं), टक्कूरं (डोकं), टाम्याटू (टोमॅटो), इस्कूट करणे (वाटोळे करणे), पाक इस्काटलंय (सर्वनाश झाला आहे), कावणे (वैतागणे), तर 'गदबाळलं', 'हुबाल्या', 'हेमलं', 'कडू बेणं' असे अनेक शब्द, भाषाप्रयोग आहेत. या शब्दांचा वापर केलेला व्यवहार कोल्हापूरबाहेरील लोकांना समजेलच असे नाही. नागपूरकडे 'काम शिस्तीत करा'मधील शिस्त'सावकाश' वाटण्याऐवजी 'चुका न करता' असे वाटल्यावरून उडालेला 'गोंधळ' मी अनुभवला आहे. त्यामुळे कोल्हापुरी शब्द बाहेर वापरताना काळजी घ्यावी लागते.

कोल्हापुरी भाषेत सर्वनामांचा, लिंगाचा वापरही वैशिष्ट्यपूर्ण केला जातो. सर्वनामे आमास्नी (आम्हाला), त्यास्नी, त्येनी (त्यांना), तुम्हास्नी (तुम्हाला), त्येला (त्याला), त्येच्या (त्याच्या) अशी वापरली जातात. शिवाय क्रियापदांच्या वापरात आणि लिंगाच्या बाबतीत वैशिष्ट्यपूर्णता दिसते. उदाहरणार्थ, कोल्हापूरी स्त्रिया पुरुषवाचक क्रियापदांचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. मी जेवले ऐवजी 'मी जेवलो', मी आले ऐवजी 'मी आलो', 'गेलो' अशी भाषा येथील स्त्रियांच्या तोंडी रुजलेली आहे. एखादी व्यक्ती खूपच खूश झाली तर 'हारकलाईस काय' म्हटले जाते. किंवा माघारी त्याच्या खूश होण्याला 'हरखुन टुम्म झाल्तं' असे कौतुक केले जाते. ही खास बोलण्याची लकब येथील जगण्यातूनच आलेली आहे. जगायचे ते आरपार. कशाची लपवालपवी नाही. त्यामुळे भाषाही तेवढीच पारदर्शक आहे. अशी प्रत्येक गावची म्हणून असलेली भाषाच तेथील सर्व व्यवहार पूर्ण करीत असते. त्या त्या गावचा दैनंदिन व्यवहार तीच पूर्ण करत असते. त्यामुळे भावा काय करायलईस, जिकलास भावा, शानं हू की!, गबस!, गंडीवलईस, आंबा पाडालईस, रस्सा चरचरीत हुदे, जिकल्यात जमा, खुळ्या टाळक्याचं, कावलंय, सपलंच की सगळं, आनि काय निवांत असे शेकडो शब्दच कोल्हापूरचा भाषिक व्यवहार पूर्ण करताना दिसतात. या भाषिक व्यवहारात येथील खाद्यसंस्कृतीची भाषाही विचारात घेतली पाहिजे. कोल्हापूर हे चवीचे खाणाऱ्यांचे गाव आहे. त्यामुळेच भारतभरातील हॉटेल्समध्ये 'कोल्हापुरी डिश'ची फर्माइश होत असते. येथील तांबडा-पांढरा, मिसळ, भेळ, कटवडा आणि त्यासंदर्भाने तयार झालेली भाषा कोल्हापूरकरांच्या जगण्याचा भाग आहे. अशी येथील खास 'कोल्हापुरी' भाषा येथील लोकांचे जीवन अर्थवाही करीत असते.

कोल्हापूरलगतच्या कागल तालुक्यात बोलताना शब्दांना, शक्यतो क्रियापदांना 'आव' प्रत्यय लावला जातो. उदाहरणार्थ, जाताव, करताव, खाताव, ऐकताव, बसताव, सांगताव, म्हणताव, उठताव, लावताव, वाचताव, जेवताव इत्यादी. हे प्रत्यय अनेकवचनी असतात. याच प्रत्ययाच्या पुढे 'की' असा शब्द जोडला जातो तेव्हा, निश्चितता व्यक्त होते. उदाहरणार्थ, जाताव की, करताव की, खाताव की, ऐकताव की, बसताव की, सांगताव की इत्यादी. ज्यावेळी एखादं काम करत असताना त्याला परत त्याच कामाविषयी विचारले तर तो, 'करत आहे' ऐवजी 'करालोय नव्हं' असं उत्तर देईल. यावेळी नकारार्थी वाक्याचा अर्थ होकारार्थी होतो. एखादा माणूस गप्पा मारत बसलेला असेल आणि त्याला वेळ होतो म्हणून तो जात असेल तर त्याला 'जाशील म्हणस बस.' किंवा 'जाशील गा' असे म्हटले जाते. या ठिकाणी जाशील म्हणजे थोडावेळ अजून थांबून मग जा, म्हणजे भविष्यकाळ होतो.

सहज जाता जाता वाटेत एखाद्या माणसाला बोलवायचे असेल तर त्याला 'काय गा' असे विचारले जाते. 'गा' हे पुरुषवाचक संबोधन आहे. आपल्यापेक्षा मोठ्या माणसाला बोलवताना 'गा' हे संबोधन उपयोजले जाते. तसेच आपल्यापेक्षा मोठ्या माणसाला नावानिशी बोलवायचे असेल तर त्याच्या नावापुढे 'दा' हा प्रत्यय लावला जातो. उदाहरणार्थ, राजूदा, संजूदा, परसूदा, विष्णूदा, पिंटूदा, पप्पूदा इत्यादी. इथे 'दा' या प्रत्ययाचा अर्थ दादा असा होतो. संवादामध्ये 'काय' या शब्दाची पुनरावृत्ती होत असते. उदाहरणार्थ, काय गा, काय चाललंय, काय आणि, कसं काय, काय म्हणतोय, काय करतोय इत्यादी अशी प्रश्नार्थक पुनरावृत्ती होते. बऱ्याचदा 'काय'चं देखील फक्त 'का' होतं. उदाहरणार्थ, का गा, का, का ते, का केलं इत्यादी. इथं 'का'चा अर्थ 'काय' आणि 'कशाबद्दल' असाही होतो. स्त्रियांच्या संवादामध्येही पुरुषी क्रियापदांचा वापर होतो. परंतु जसे पुरुष 'गा' वापरतात, तसे स्त्रिया 'गं' वापरतात.

उदाहरणार्थ, काय गं, व्हय गं, ये की गं, जा की गं, उठ की गं, बस की गं इत्यादी. बऱ्याचदा काही तरी विचारायचं असतं त्यावेळी 'व्हय गं' या शब्दांनी संवादाची सुरुवात होते. उदाहरणार्थ, व्हय गं, तुला म्हायती हाय काय, कल काय झालं त्ये. असा प्रश्न विचारून आपणच उत्तर देत संवाद सुरू होतो.

कोल्हापूरपासून चाळीस पन्नास कि.मी.च्या अंतरावर असलेल्या भुदरगड तालुक्यात खास 'गारगोटी' उच्चार ऐकू येतात. मिण्ण (मी), तुण्ण (तू), ह्यास्नी (यांना), तुम्हास्नी (तुम्हाला) अशा खास शब्दांचा उच्चार कानी येऊ लागतात. आपण गारगोटी परिसरात असल्याचा फिल येतो. कंची (कोणाची/कुठली), संगट (सोबत), कवा, पातुर (पर्यंत), बिगर, मिंत्या (विनंती) अशा शब्दांबरोबर येताव, जाताव, जेवलाव, आलाव, गेलाव, लग्गट, लंपास, व्हय, न्हाई, सपलं, न्हाईनपत, लगट, चितागती असे काही खास पद्धतीचे शब्दभांडार हे येथील भाषिक वैशिष्ट्य सांगता येईल. सर्वनामांचा वापर ह्यास्नी, तुम्हास्नी असा तर 'कव्वाधरण सांगायलोय आइकचिला न्हवं', 'आतारहिच्यानु', 'इसवान करून घे', 'भुकायचं कशाला', 'वळचनीला राह्याचं','संपोट' असे काही वाक्यप्रयोग येथील व्यवहारात ऐकायला मिळतात. वाक्यांच्या पातळीवरही येथील एक लकब दिसून येते. नदीवर म्हशीला धुणारी बाई धुता धुता म्हशीलाच म्हणेल, 'रांड, तुला ग्वाड वाटावं म्हणूनच चाललंय नव्हं सगळंऽऽ! काय माझ्यासाठी चाललंया ह्यो.' अशी वाक्यरचना, या वाक्यातील रांड, ग्वाड, चललंयासारखे खास उच्चार आणि शब्द सोडले तर या परिसरात कोल्हापूरच्या आसपास बोलली जाणारीच भाषा आहे.

गारगोटीहून 'लगत'चा तालुका गडहिंग्लज. कन्नड भाषेचा खास प्रभाव असलेली भाषा हे गडहिंग्लजचे वैशिष्ट्य. हा परिणाम शब्दस्तरावरून वाक्यस्तरापर्यंत दिसून येतो. बहुसंख्य क्रियापदांचा वापर कन्नडच्या प्रभावात होत असल्याने येथील भाषा ऐकायला गंमत वाटते. मी आंघूळ केलो, मुलगी गावाला गेलं, परवा एक घर बघितलो, मी फोन केलो, माझी मुलगी आलं, अशा पद्धतीच्या कन्नड प्रभावित वाक्यरचना ऐकू येऊ लागल्या की आपण गडहिंग्लजपरिसरात असल्याचे लक्षात येते. येथील भाषेतही मीनं, तुनं, म्या, त्वा, तुमी, त्यास, तेनी, आमच्यात, त्येंच्यात अशी सर्वनामे दिसतात. तर शेजारच्या आजऱ्यातील भाषा कोकणीच्या मालवणी-कुडाळी बोलीच्या प्रभावात आहे. दळाण, तुमी, आमी, तुको, इटाळ, इडो, इचको, इचार, दॅवपण, दबो असे खास कोकणी पद्धतीचे सर्व शब्द येथील भाषिक व्यवहारात दिसतात. या परिसरात आलता, गेलता, ह्यास्नी, त्यास्नी, यताव, जाताव, बसताव अशी भाषा वापरली जाते. ह्यास्नी, त्यास्नी ही सर्वनामे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तर भुकावलय, खादवायलय, बसतुईस काय असे बोलण्याची खास आजरेकरांची पद्धत आहे. सर्वच क्रियापदांना 'सा' हा प्रत्यय लावण्याकडे या लोकांचा कल असतो. बसतासा, येतासा, जातासा अशी क्रियापदे तर न्हायीका, नाईनप्पत, धुवाणपाणी, चुरूट, सुमाट, गुंडगुळ, चित्ताड असे काही शब्द उदाहरणादाखल सांगता येतील.

गावागावात भाषा घडण्याचाही एक इतिहास असतो. उत्तूरला मित्राकडे 'महाजनाचा रेडा' हा शब्द व्यक्तीला उद्देशून वापरलेला ऐकला. त्यांना मी अर्थ विचारल्यावर त्यांनी खास उत्तुरी स्टाइलने, 'त्ये व्हय, गावात म्हाजनांचा रेडा व्होता. तो आपुनीबी काय करायचा नाय आणि दुसऱ्यासबी काय करू द्याचा न्हाय' असे सांगितले. हे ऐकल्यावर त्या शब्दाचा अर्थ लखलखीतपणे मला कळला आणि हसू फुटले. तर भाषा अशी घडत असते.

चंदगड हा तर स्वतंत्र 'चंदगडी बोली'चा प्रदेश आहे. कन्नड, कोकणी आणि मालवणी-कुडाळी या भाषा-बोलींच्या प्रभावात येथील भाषा वैशिष्ट्यपूर्ण बनली आहे. ही बोली आता सर्वदूर परिचित झाली आहे. यूजीसीपासून शालेय अभ्यासक्रमात अभ्यासक्रमाला लागली आहे. या बोलीचा स्वतंत्र शब्दसंग्रह, व्याकरणिक विशेष आणि उच्चार वैशिष्ट्ये ऐकताक्षणीच लक्षात येतात. चंदगडी बोलीमध्ये स्त्रिया 'मिय्या जेवलो', 'मिय्या बाजारास गेल्लो' असे बोलतात. या वाक्यातील क्रियापदे कोल्हापूरस्टाइल 'पुलिंगी' आहेत. परंतु असे बोलणे या बोलीत रूढ होऊन गेलेले आहे. तर वाक्याच्या प्रारंभी 'बायल', 'भणंन्हुन', 'सुकान' असे शब्द वापरण्याची सवय अनेकांना आहे. त्याशिवाय खरंतरबी, खरं हे शब्दही वारंवार वापरण्याची पद्धत रूढ होऊन गेली आहे. त्यामुळे बोलीविचारात रूढीचाही विचार महत्त्वाचा ठरतो.

चंदगडी बोलीमध्ये पश्चिमविभाग आणि पूर्वविभाग असे दोन विभाग कल्पिता येतात. पूर्वेकडून पश्चिमेकडे जाताना कन्नड भाषेच्या प्रभावातून कोकणीच्या प्रभावात जात असल्याचा अनुभव येतो. या बोलीतील शब्दांचा प्रमाणमराठीतील शब्दांशीही तुलनात्मक विचार नोंदविता येतो. उदाहरणार्थ, 'वसूला' हा शब्द प्रमाण मराठीतील वसूल, वसूली या शब्दाशी संबंधित नाही. चंदगडी बोलीत 'वसूला' हा शब्द 'वशिला' या अर्थाने वापरला जातो. 'वट' हा शब्द 'हुकमत' या अर्थाने वापरला जातो. तर 'वट्टात' हा शब्द चंदगडी बोलीत दोन भिन्न अर्थाने प्रचलित आहे. 'मिय्या वट्टात वाटणी देऊसकी न्हाय' या वाक्यामध्ये तो 'अजिबात'

या अर्थाने येतो. तर 'आम्मी वट्टात श्यात करूलावात' या वाक्यात तो 'एकत्र' किंवा 'मिळून' या अर्थाने येतो. या बोलीतील शब्दसंग्रहाचे असे पुष्कळ विशेष सांगता येतील. बांबार (कुजलेला चिखल), किरमं (सर्दी), किरवं (खेकडा), बुरसा (घाणेरडा), ठकणं (तब्येत ढासळणे), न्हंगडं (आजारपण), डोके (पाय), डोगाल (ढोपर), मोसबा (नखरा), आरगाड (मोठ), भुत्तूर (आत) अशा निवडक शब्दांवरून येथील शब्दसंग्रहाची कल्पना येईल.

चंदगडी बोलीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे उच्चारण हे आहे. ही बोली एका विशिष्ट उच्चाराने, हेल काढून बोलली जाते. 'जाऊलेसाय...' हा एक शब्द वाटत असला तरी, हा शब्दप्रयोग 'तू जात आहेस?' या अर्थाने वापरला जातो. या शब्दातील 'ऊ' 'सा' आणि शेवटी 'य' या तीन ध्वनींचा उच्चार सुरावटीत केला जातो. अशा प्रकारे या बोलीमधील जवळजवळ प्रत्येक शब्दात ही सुरावट दिसून येते. त्यामुळे व्यवहारात या बोलीलाच एक सुरावट प्राप्त होते. 'तिया यल्लीस' हे वाक्य प्रश्नार्थक आहे. परंतु ही प्रश्नार्थकता या बोलीच्या सुरावटीतून, सूर ओढण्याच्या पद्धतीतून प्राप्त होते. 'तू आलेली होतीस का?' हे प्रश्नार्थक वाक्य वरील केवळ दोन शब्दांतून विशिष्ट सुरावटीमुळे बोलता येते. 'यल्लीस' या शब्दातील 'ई' आणि 'स' या दोन्ही ठिकाणी सूर ओढला जातो. 'ई'ची सुरावट दीर्घ आहे. ही सुरावट दीर्घ असली तरी शेवटी पुन्हा 'स' उच्चारण्यापूर्वी 'ई' वर जोर दिला जातो.

'तिय्या जाऊललीसाय' या वाक्यामध्ये 'तू' हे सर्वनाम 'तिय्या' असे होते. शिवाय 'तिय्या'चा उच्चार पुन्हा 'आ'ची री ओढून खास सुरावटीमध्ये होतो. ही सुरावट, उच्चारविशेष कोकणीच्या जवळची आहे. अशी विशिष्ट सुरावटीमध्ये बोलली जाणारी बोली तालुक्याच्या पश्चिम-विभागात दिसते. पूर्वविभागात बोलीची सुरावट कन्नडच्या प्रभावाने तयार झालेली आहे. तन्न (त्याने), कन्न/ कव्वा (केव्हा), कास (कशाला), खट्टे (कोठे), गसली (गेल्यावर्षी), तण्ण (तेव्हा), तवरस्क (तोपर्यंत), चकोट (चांगले), बळ्यान (खोटे), माज (मला), मिय्या (मी) असे उच्चार पूर्वविभागात दिसतात. 'कासणी ते' 'खट्टे गेल्ल्यास', 'कण्णच्चान सोदूलोय मसोटीत गेल्ल्यास काय' अशी वाक्ये प्रत्यक्ष ऐकणे हा एक अनुभव असतो. या विभागात तुजं, माजं, त्यास, तिण्णं, मिण्णं, त्यण्णाणी, ह्यणाणी अशी सर्वनामे वापरली जातात.

चंदगडपासून जिल्ह्याच्या दुसऱ्या टोकाला शाहुवाडीला लागून असलेल्या गावांमध्येही पुन्हा वैशिष्ट्यपूर्ण भाषा बोलली जाते. भुईबावडा ते फोंडा या टप्प्यातही या भाषेचा टोन ऐकायला मिळतो. मिया (मी), तिका (तिला), ह्यंचे (यांचे) अशी सर्वनामे, वळाखलंय, घातलंय, थांबलंय अशी क्रियापदांची रूपे दिसतात. तर 'आमच्या वांगडा भाषान टाकलेला' म्हणजे आमच्याशी बोलणं बंद केलेली.किंवा 'काय व्हया तर आरडत जा' म्हणजे काय हवे असेल तर सांगत जा. अशा पद्धतीची कोकणीमिश्रित भाषा वापरली जाते. कराड (गवत), झपार (झोपडी), माघारनी (बायको), सरले (संपले), इला (आला), येय (येई), भियत (भीत) असे खास शब्द तर 'खय चलली हा?' सारखी तळकोकणच्या प्रभावातील वाक्य हा येथील भाषिक व्यवहार आहे.

तर गगनबावडा परिसरातही वैशिष्ट्यपूर्ण भाषा ऐकायला मिळते. सांडलं (हरवलं), वगुत (वेळ), गवासलं (मिळालं), म्होरं (समोर), बुडी (खाली), चिवा (बांबू), दांडगा (मोठा), बिगीन (लवकर), नकाडं (थोडे), मिनत्या (विनंती), भगुनं (पातेलं), सांबारी (आमटी), खवाट (कठीण), कोरड्यास (भाजी), इख (विष), बावी (विहीर), सांज (संध्याकाळ), पडसं (सर्दी) असे शब्द या परिसरात ऐकायला मिळतात. शब्दांचे उच्चारण सोडले तर यातील बरेच शब्द चंदगडी बोलीतही दिसतात. दोन्ही प्रदेश तळकोकणाला जवळचे असल्याने असे वैशिष्ट्यपूर्ण शब्द दोन्हीकडे पाहायला मिळतात.

कोल्हापूर जिल्हा उद्योगधंद्याबरोबर शेतीप्रधान जिल्हा आहे. येथील जमीन सुपीक आणि पाण्याखाली आलेली असल्याने शेती हिरवीगार दिसते. सहकाराचे जाळे, साखर कारखाने, मोठमोठे कृषिउत्पन्न बाजार यादृष्टीनेही कोल्हापूर हा शेतकऱ्यांचा जिल्हा आहे. त्यामुळे येथील शेतीधंद्याची माहिती घेतल्याशिवाय कोल्हापूरची भाषा समजणार नाही. शेतकरी शेतातील कामे करताना पेरणी, टोकणणी, धुळपेरणी, कुरी, मोगणे, कोळपा, कोळपणे, खुरपणे, खुरपे, विळा, भांगलणे, नांगरणे, कुळवणे, दिंड मारणे, व्हलपाटा मारणे, फेसाटी फिरवणे, तिकाटणे ओढणे, तिकाटणे, व्हलपाटा मारणे, बांडगं, इसकी अशा शेकडो शब्दांचा वापर करत असतो. यातील बरेचसे शब्द वाक्प्रचार म्हणून येतात, तर काही शब्द अवजारांची नामे आहेत. शेतकऱ्याच्या जीवनात कधीकाळी बैलगाडीला अनन्यसाधारण महत्त्व होते. बैलगाडीने कोल्हापूरच्यात नव्हे मराठी शब्दवैभवात मोलाची भर घातली आहे. येटाक, जू, वालं, फाळ, फास, दांडी, ठेचकं, सापणी, मुसकी, वेसण, म्होरकी, दावं, बिरडं, कंठा, कडाणी, पावकुडा, वंगाण, चाक, आरं, वट्टं, कगा, तोबरी, वड, झटका, गानगाडी, घोडा, सोगा असे अनेक शब्द बैलगाडीमुळे भाषेत आले आहेत. यातले जू, फास, ठेचकं,

सापती, मुसकी, म्हारेकी दावं, लोढणं, वंगाण असे बरेच शब्द मानवी जीवनव्यवहारासाठी प्रतीकात्मक रूपानेही वापरले जातात.

शेतकऱ्याचं पशूधन म्हणजे त्याचा गोतावळा. यामध्ये जनावरांना वयानुसार, लिंगानुसार वेगवेगळी नावं असलेली दिसतात. 'पाडा' म्हणजे गायीचं पुल्लिंगी वासरू तर 'पाडी' म्हणजे स्त्रीलिंगी. 'रेडा' म्हणजे म्हैशीचे पुल्लिंगी 'रेडकू' तर 'रेडी' म्हणजे स्त्रीलिंगी. 'दावण' म्हणजे सर्व जनावरे एका ओळीत बांधण्याची जागा. 'गोरण' जनावरांना 'वैरण' किंवा 'पेंढी' टाकण्याची जागा. 'चगाळ' म्हणजे जनावरांनी वैरण खाऊन राहिलेला टाकाऊ भाग. रवंथ, वैरण, वेळती म्हणजे वैरण तोडण्याचे विळ्यासारखे असणारे धारदार अवजार. 'कडबाकुटी' म्हणजे 'कडबा' कुटण्याचे अवजार. 'पायकुटी' म्हणजे जनावरांना पळू नयेत म्हणून पुढच्या एका पायाला मागचा पाय बांधणे. कुंपण, व्हळी म्हणजे विशिष्ट पद्धतीने रचून ठेवलेली वैरण. 'पिंजार' म्हणजे भात पिकाची मळणी झाल्यानंतर वाळवून ठेवलेले भातपिकांचे खोडं. गार किंवा उकीरडा, पेंडी म्हणजे एकत्र बांधलेली वैरण. 'कट' म्हणजे गवताचा एकमेकांना जोडून भारा बांधण्यासाठी दोरीऐवजी केलेला वापर. 'खोपरी' म्हणजे दोरीची हातापासून खोपराच्या आकाराची केलेली गुंडाळी. 'मेंडा' म्हणजे गवताच्या कटाची भारा बांधताना मारलेली गाठ. 'खराटा' गोठा लोटण्यासाठी वापरले जाणारे साधन. 'पत्री' म्हणजे बैलाच्या नख्या झिजू नयेत म्हणून नख्यांना मारले जाणारे लोखंडी नाल. 'वशिंड' म्हणजे बैलाचा खांदा. 'आयाळ' म्हणजे बैलाच्या मानेच्या खालचा भाग. 'खुराड' म्हणजे कोंबड्या ठेवण्याचे ठिकाण. 'शीट' म्हणजे कोंबड्यांची विष्ठा. 'कुकडशा' म्हणजे कोंबड्यांच्या राहण्याच्या ठिकाणी तयार झालेले बारीक जंतू. 'तलंग' म्हणजे कोंबडीचे स्त्रीलिंगी पिल्लू. 'खुडूक' म्हणजे अंडी न देणारी कोंबडी. इत्यादी शब्द हे शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांशी संबंधित आहेत.

शेतकऱ्याच्या प्रत्येक घटकाने मराठी भाषेत भर घातली आहे. आडं, मेढ, कुड, पांझराण, शेकारणी इत्यादी झोपडीशी संबंधित शब्द आहेत. उजरणी, लावण, आमुन, चिमुन, खोडवं, निडवं, जोडवं इत्यादी शब्द हे ऊसशेतीमधून आलेले आहेत. ऊसाची लागण केल्यानंतर दुसरे पाणी दिले जाते त्याला 'आमुन' म्हटले जाते तर तिसऱ्या पाण्याला 'चिमुन' म्हटले जाते. लागण तुटून गेल्यानंतर दुसऱ्या वर्षी जे पिक घेतले जाते, त्याला 'खोडवा' म्हटले जाते. तिसऱ्या वर्षीच्या पिकाला 'निडवं' तर चौथ्या वर्षीच्या पिकाला 'जोडवं' म्हणतात. पीक काढायला आलेला हंगाम म्हणजे 'सुगी'. हा सुगी शब्द सर्वत्रच वापरला जातो. कारण 'सुगीचे दिवस' सर्वांनाच हवेसे असतात.

गावातील शेतकरी हा मुख्य उत्पादक म्हणून ओळखला जातो. शेतकऱ्याभोवती बाकी लोक जमा होतात. त्यांचा गावगाडा तयार होतो. आता पारंपरिक गावगाडा संपलेला असला तरी त्या अनुषंगाने वापरली जाणारी भाषा आजही ऐकायला मिळते. शेतीव्यवसायात नांगर सर्वात महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे नांगरटीचा संदर्भ भाषिक व्यवहारात अनेक अंगाने होतो. जमीन नांगरून तयार ठेवणे, हे वाक्य केवळ शेतीशी संबंधित राहिले नाही. या नांगरीमध्ये पास, पेटणं, दांडा, जोता, जू असे काही शब्द जोडले गेले आहेत. पास टाकणे, अंगावरचे जू उतरवणे, भूमी नांगरणे असे शब्दप्रयोग त्यातूनच तयार झाले आहेत. पेटणं म्हणजे नांगरीचा वरचा भाग, ज्याला मूठ बसवलेली असते. हे पेटणंही शेतकऱ्याच्या भाषिक व्यवहारात अनेक संदर्भाने वेळोवेळी येताना दिसते. 'जू' हेही रूपक बनले आहे. तर बैलांना शेतीची मशागत करताना बांधलेले 'मुसके' हाही शेती व्यवसायातून प्रमाणमराठीत आलेला महत्त्वाचा शब्द. मुसक्या आवळल्या, मुसक्या बांधल्या ही भाषिक रूपं त्यातून आलेली आहेत. शेतात हाती आलेले पीक बैलांनी खाऊ नये यासाठी केलेली योजना भाषाव्यवहारात फार अर्थपूर्ण बनली आहे.

शेतकऱ्याचे भाषिक भांडार फार समृद्ध आहे. हुलवर (जमीन भुसभुशीत करण्याचे अवजार), कुळव (कोळपे/ मशागतीचे अवजार, दींड), घुट्टा (शेतातील मातीचे दगड (ह्यंडे) फोडून ते पसरवण्याचे लाकडी अवजार), हेंडोर (शेतातील ह्यंडे फोडण्याचे लाकडी अवजार), कोळपा (पिकातील तण काढण्यासाठी), कोरण्याचे अवजार), तिकटं (तिफन), हाडगं (एकावेळी चार सऱ्या तयार करणारे भात पेरणीचे अवजार), फाळ, पान (फाळाबरोबर जमिनीत घुसणारा लाकडी भाग), दावं (बैलाचे कासरे एकत्र धरणे, दावं धरणे), वालं (शेतीकामात वापरायची दोरी), इसाड (लांब लाकडी वासा नांगराला जोडलेला), इरस (बैलगाडीसाठी जाड लोखंडी बार), डोणा (लोखंडी इरसवर असलेले आधारासाठीचे लाकूड), बिरया (लाकडी हौद बैलगाडीवरील), खरडी (बैलगाडीचा वेग कमी करण्यासाठी लाकडी ब्रेक), घोडकं, जू (अवजारे ओढण्यासाठी बैलांच्या खांद्यावरचे साधन), कडीणी (बैलगाडीच्या चाकांना आधारासाठी अडकवलेली लोखंडी पट्टी), सुवारी (बैलगाडीला बांबूची तट्टी बांधणे), दांडी (कोळप्याला लावलेले बांबू), मुसकी (बैलांच्या तोंडाला बांधलेली जाळी), कासरा

(बैलांच्या वेसणीला बांधलेला दोर), यसण (वेसण, बैलांच्या नाकातील दोरी), इरस, दींड (कुळवाचा आडवा लाकडी ठोकळा), कांड (बैलाच्या गळ्यातील दोर), पेसाटी (कोळ्या घाटल्यावर मातीत पुरलेले भात उठवण्यासाठी), कप्पय (बैलांना धुण्यासाठीचा काथ्या), घोळणा (नाचण्याची कणसे चाळण्यासाठी), ओपा (मोठा प्लॉट), गादा (मध्यम अकाराचे एक शेत), कुणगी (छोट्या आकाराचे शेत), बना (वाफा), खागं (वाफ्यातील एक भाग), ख्वाळ (पावसाळ्यात पोते दुमडून डोकीवर घेणे), भाव (विहीर), व्हंडवा, हळळा, व्हळ (ओढा), व्हळी (गवताची गंजी), मूळ (वताचा एक प्रकार, ज्याचे झाडू बनवतात. आणि बेंदूर सणाला चौकटीला याची दोरी बांधतात), शिस ओपा (शिसण्याच्या झाडाजवळील शेत), तिरवाड (चिखलात बसण्याचे साधन), गोराब (पावसाळ्यात बांबूच्या बेळापासून बनवलेले साहित्य-इरलं), यरवानं (बांबूची टोपली) इत्यादी शेकडो शब्दांशिवाय शेतकऱ्याचा भाषिक व्यवहार पूर्ण होत नाही.

याचदृष्टीने येथे पूर्वाश्रमीचे आलुतेबलुतेदार, इतर पारंपरिक व्यावसायिकांच्या भाषांचे मोठे ऋण कोल्हापूरच्या भाषेवर आहे. पारंपरिक व्यावसायिकांचा आणि बलुतेदारांशी असलेला परस्परांचा नित्य संपर्क यामुळे त्या भाषा जवळजवळ सर्वपरिचित झालेल्या असतात. भाषेच्या अभिवृद्धीसाठी या भाषा जेवढ्या महत्त्वाच्या आहेत, तेवढ्याच त्या समाजाच्या अभ्यासाच्या दृष्टीनेही फार महत्त्वाच्या आहेत. भाषांच्या घडणीत या लहानलहान गटांचे योगदान लक्षात येते. त्यांच्या व्यवसायकर्मातील रूपकांमुळे भाषेला अर्थवत्ता प्राप्त होत असते. भाषेत आलेले अनेक शब्द, प्रतिमा, प्रतीके अनेक समाजगटांच्या दैनंदिन व्यवहारातून आणि जातिविशिष्ट संस्कृतीतून आलेले दिसतात. कोल्हापूर जिल्ह्यात सर्वत्रच व्यवसायविशिष्ट शब्दप्रयोग भाषाव्यवहारात रुजलेले दिसतील. उदाहणार्थ, हजामत करणे, चंपी करणे, इंगा दाखवणे, पाणी लावणे, खरडपट्टी काढणे, भादरणे हे शब्द विशिष्ट धंद्यातील असले तरी, ते आज त्या धंद्यापुरते सीमित नाहीत. त्यांची अर्थवत्ता अधिक व्यापक झालेली आहे. या सर्वांबरोबर इतर समाजांचाही या पद्धतीने विचार केला पाहिजे. उदाहरणार्थ, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये गोसावी समाज मराठीमिश्रित गोसावी बोली वापरतो. या बोलीची जननी राजस्थानी व गुजराती भाषा आहे. स्थलांतरित समाजामुळे ही बोली येथे बोलली जाते. ही बोली मराठी भाषेच्या संपर्कामुळे मराठीची वाटावी इतकी मराठीमिश्रित झालेली आहे. याप्रमाणेच कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये छप्परबंद समाज आहे. हा समाजही आपली भाषा इतरांना कळू नये या उद्देशाने अनेक भाषांचे मिश्रण असलेली छप्परबंद बोली बोलतो. या बोलीविषयी विशेष माहिती खुद्द ती बोलणाऱ्या समाजालाही नाही. परंतु ही बोली तेलगू, कन्नड, मराठी, हिंदी, उर्दू या भाषांच्या मिश्रणातून तयार झालेली असून या बोलीचे स्वरूप गुप्त बोलीसारखेच आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात मोठ्या संख्येने असणाऱ्या काही समाजांच्या भाषेचा थोडक्यात आढावा घेऊ. पूर्वाश्रमीचा महार आणि आता नवबौद्ध झालेल्या समाजात प्रेत जाळण्याची प्रथा नाही. प्रेत पुरले जाते. त्यातून काही वेगळे शब्द आलेले आहेत. माती देणे हा त्यापैकी एक शब्द. म्हारकी, म्हारताळ, तराळकी, वर्षील, जोहार, येसकर, बैतं, बलुतं, सागोती (मटण), कांजी (आमटी), बाय (आई) हे काही या जातीशी संबंधित शब्द आहेत. तर लेडा, डांटपित्तला अशा काही खास शिव्याही आहेत.तर मांतग समाजात (आंबूजी) पारुषी ही सांकेतिक आणि गोपनीय भाषा आहे. गुप्तबोलीतील शब्दांची व्युत्पत्ती आणि क्रियापदांची रूपे वगैरे व्याकरणिक विशेष सांगता येत नाहीत. तरीही काही शब्दांच्या माध्यमातून या बोलीची चर्चा करता येईल. पेडणे (जाणे), वरवणे (येणे), दुतवणे (जेवणे), ठिकणे (थांबणे), दुकवणे (जिवे मारणे), काटवणे (मैथुन करणे), हेकवणे (घेणे), टिंबळणे (रडणे), खिसणे (हसणे), टोळकणे (झोपणे), टुकणे (मरणे), हिडकणे (मारणे), धुळकणे (पादणे), शेगणे (चोरणे), तावाटणे (मरणे) या भाषिक भांडारातील बहुतांश शब्दांचे निरीक्षण केल्यानंतर सुरक्षिततेच्या दृष्टीने ही तयार झालेली सांकेतिक भाषा असल्याचे लक्षात येते. फाशी देण्यासारखे धाडसाचे काम करणारी ही जात सर्वच बाबतीत धाडसी होती. त्यातून या समाजात वरील शब्दांची निर्मिती झालेली दिसते.

पवनी (बायको), हालाहाली (नवराबायको), चिगडा (पांढरा), भुया डोईवर आला (सूर्य डोक्यावर आला) असा बऱ्यापैकी वेगळा आणि स्वतंत्र शब्दांचा वापर या समाजात सर्रास केला जातो. शरीराच्या अवयवांसाठी यांच्या भाषेत स्वतंत्र शब्द आहेत. शिकरं (नाक), किजवा (डोळा), गवनं (पाय), खुमरं (तोंड), करकं (हात), डोंबाल (पेकाट), कपची (योनी), चिंब (स्तन), चिराल (स्तन), घांगई (ढुंगण) असे विपुल शब्द अवयववाचक आहेत. ही भाषा वेळप्रसंगी मर्यादित लोकांमध्ये बोलली जाणारी भाषा आहे. आपले बोलणे दुसऱ्याला कळू नये हे या बोलीचे एकमेव प्रयोजन आहे. त्यामुळे अतिशय मर्यादित शब्दसंग्रह या बोलीचा आहे.

चांभार केवळ चप्पलच बनवत होते असे नाही. तर

शेतकऱ्यांसाठी मोटेच्या पिशव्या, गोफण, चाबूक, आसूड, घुंगरमाळा इत्यादी वस्तू बनवून देत होते. मोट, गोफण या वस्तू काळानुसार कालबाह्य झाल्या आहेत. परंतु आसूड ओढला, आसूडी भाषा अशा प्रकारचे शब्दप्रयोग मात्र अजून आहेत. 'गोफणगुंडा' हा शब्दही वापरात आहे. हा व्यवसाय जनावरांच्या कातड्याशी संबंधित आहे. त्यामुळे चामडे, मुंडाले, सळपट्टी, शेपटी, शेपी असे काही शब्द या व्यवहारात येतात. 'बेत पाडणे' हाही शब्द खास चांभार व्यवसायात आहे. कच्च्या चामड्यापासून चपला बनविताना माणसांच्या पायाच्या आकारानुसार चामड्याचा बेत पाडला जातो. पाडलेला बेत लोखंडी 'हस्ती'ने 'तकटला जातो.' तकटणे हा शब्दप्रयोगही यातूनच आलेला आहे. चामड्याची 'कापणी' रापीने होते. शेतकरीव्यवसायातील कापणी आणि चांभाराची कापणी यामध्ये खूप फरक आहे. कापलेले चामडे योग्य आकारानुसार शिवण्याच्या हत्याराला 'आरी' म्हणतात हे आपण पाहिले आहेच. चांभाराजवळ इंगा हे हत्यार असते. त्यातून 'इंगा दाखवणे' हा शब्दप्रयोग तयार झाला आहे. चांभारसमाजाकडून मराठीला मिळालेला अजून एक वाक्प्रयोग म्हणजे, 'टाका घालणे' हा होय. 'टाका ढिला होणे' हा शब्दही त्यातूनच आलेला आहे. 'जोडणी' हा शब्द कोल्हापूरमध्ये बराच प्रसिद्ध आहे. हा शब्द राजकारणात खूप वापरला जाऊ लागला आहे. 'जोडणी करणे' याला त्यामुळे बरेच महत्त्व आले आहे. हा शब्द चामड्याचे दोन तुकडे एकत्र करण्यातून आपल्या भाषेत आलेला आहे. चांभार जातीत हा शब्द महत्त्वाचा व्यावसायिक शब्द आहे. तयार चपलांसाठी चांभार लोक 'माल' असा शब्द वापरतात. माल संपला, माल आणला, माल तयार आहे. शिवाय या समाजाकडून गांडीखाली आरी आणि चांभार पोरं मारी, चपला झिजल्या, टाका ढिला झाला, आसूडाचा मार, मोट बांधणे, रिबीट मारणे, तळ ठोकणे (संदर्भ ऐतिहासिकही) असे वाक्प्रचार भाषेला मिळाले आहेत.

सुतार हा गावगाड्यात शेतकऱ्यांना सर्वाधिक जवळचा बलुतेदार. सुतारांना वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळी नावे असलेली दिसतात. सुतार, सुत्तार, बाडिग, बडगी, थवी, बढई असे शब्दप्रयोग दिसतात. त्यांच्या व्यवसायात वापरली जाणारी हत्यारे आणि त्यांचे काम यावरून अनेक शब्द प्रमाणभाषेत प्रविष्ट झालेले दिसतात. त्यामध्ये पाचर मारणे, खुट्टा मारणे, तासणे असे काही शब्द सांगता येतील. सुतारांच्या धंद्यात अनेक लहानमोठ्या हत्यारांना महत्त्व असते. त्यापैकी अनेक हत्यारांशी संबंधित आणि त्याच्या कामाशी संबंधित भाषिक प्रयोग प्रमाणभाषेत रुजले आहेत. 'अंबोर' हे हत्यार लाकडात खिळा ठोकताना किंवा पूर्वीचाच जुना खिळा बाहेर काढण्यासाठी वापरले जाते. आरगडा (बैलगाडीच्या चाकांना गोल आकार यावा यासाठी या हत्याराचा वापर करतात), खतावणी किंवा गिट्या (या हत्याराने लाकडावर खुणा केल्या जातात), करवत (काही भागात खरगस म्हणतात. या हत्याराने लाकडे कापली जातात. खरगसाचे अनेक लहानमोठे नमुने आहेत. सोयीनुसार सुतार ते वापरतात), कानस (कानस ह्या अनेक पद्धतीच्या असतात. कानस हे हत्यार करवताना धार काढण्यासाठी वापरले जाते.), कुऱ्हाड (कुऱ्हाड शेतकऱ्याकडे आणि सुताराकडे असणारे सामाईक हत्यार आहे. ते लाकूड तोडण्यासाठी आणि तासण्यासाठी वापरले जाते. परंतु सुताराकडील कऱ्हाडी आणि शेतकऱ्यांकडील कुऱ्हाडींमध्ये बराच फरक असतो. सुताराला लहानमोठ्या आकाराच्या अनेक कुऱ्हाडी वापराव्या लागतात. काही भागात याला 'तासणी' असेही म्हणतात.), कैवार (लाकडांना गोलाकार आकार देण्यासाठी, विशेषत: गोलाकार आकाराची अवजारे बनवण्यासाठी वापरले जाणारे हत्यार), कोरकापी (कोरकापी हे हत्यार अलीकडे कालबाह्यच झालेले दिसते. कारण लाकडावर नक्षीकाम पूर्वी हातानेच केली जात होती. त्यावेळच्या सुतारकर्मात हे महत्त्वाचे हत्यार मानले जायचे. नव्या सुतारांकडे हे फारसे आढळत नाही. काही सुतारांना माहितीही नाही.), चिरणं (चिरण्याने लहान लहान छिद्रं पाडली जातात), ठिय्या (बाभळीचे टणक कापीव गोलाकार ठोकळ्यांचे लाकूड जमिनीत पुरले जाते. या बाभळीच्या टणक लाकडावर सुतार आपले काम करतात. सुताराची धारदार हत्यारे काम करताना या लाकडावर आदळली, घासली किंवा पडली तरी त्यांची धार जात नाही आणि खालचे टणक लाकूड लवकर झिजतही नाही. अशा या जागेला ठिय्या असे म्हणतात.) चंदगडपरिसरात सुतार ज्या जागेत काम करतो, त्या जागेला सुताराची शाळा म्हणतात. या सुतारशाळेलाही ठिय्या शब्द आहे.

दुसरा महत्त्वाचा समाज लोहार आहे. या समाजाच्या कामाचे स्वरूप सांगणारी 'सौ सोनार की, और एक लोहार की' ही म्हण प्रसिद्ध आहे. या समाजातील कष्टाच्या कामाचे स्वरूपच यातून व्यक्त होते. लोखंडाला आकार देणारा हा समाज किती कष्टाळू असेल हे या म्हणीवरून स्पष्ट होते. लोहार हा लोखंडी हत्यारे बनवणारा समाज आहे. या समाजाने अनेक उद्योगव्यवसायांना मदत केली आहे. हत्यारे बनवून देणारा हा समाज असल्याने श्रम हलके करणे हे या समाजाचे कार्यच होते. ऐरण, एकलई, कानस, कुत्रे, घण, चोपणी, छन्नी, जंतर, डहाण, डागपान्हा, ताव, पोगर, भट्टी,

भाता, सांडसी, शेक, हातोडा, अडकित्ता, आख, इड्या, इळत, उकरी, उलाथणे, कडी, कत्ता, कढई, कन्पी, कानखिळ, खुणी, कुदळ, पहार, कुऱ्हाड, कुसा, कोयते, कुरपे, खोरे, धुमटक, चिमटा, जाळी, टिकाव, दातऱ्या, लोखंडी कोळपा, दाभण, धावपट्ट्या, नाल, पहार, पळी, पास, पावशी, फाळ, फारुळा, फरशी, फुंकणी, भोरकडी, खलबत्ता, वाकस, विळा, शेवटणे, सतूर, साखळी, हूकपट्टी, आगळपट्टी असे अनेक शब्द लोहार धंद्याशी संबंधित आहेत. कोल्हापूरच्या जगदीश खेबूडकरांनी या व्यवसायावरून *ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू* दे गीत'साधी माणसं' या सिनेमासाठी लिहून लोहाराच्या व्यवसायासह भाषेला पडद्यावर जिवंत केले आहे.

कुंभार गावगाड्यात ओल्या मातीपासून सुरई, माठ, खुजे, रांजण, कुंड्या, घट, गाडगी, मडकी, झाकण्या, पणत्या, कौले, विटा, कुंड्या इत्यादी घडवून, त्या वस्तू भाजून विकणारा कारागीर. तो एकेरी आणि दुहेरी चुली व शेगड्याही तयार करतो, मात्र त्या भाजायची गरज नसते. महाराष्ट्रातील कुंभार गौरी-गणपतीच्या, दुर्गेच्या आणि अन्य मूर्ती, हरतालिका, बैलपोळ्याचे बैल, दिवाळीच्या किल्ल्यात ठेवायच्या वस्तू आणि बाहुल्याही (बुलाबाई-बुलोजी) बनवतो. कुंभार हा बारा बलुतेदारांपैकी एक आहे. ऋग्वेदकाळापासून कुंभार आहेत. त्यांच्या देवता पांचानेपीर, भवानी, सांगई, सीतला, हर्दिया या असतात. या जातीत काही पोटजाती आहेत. आवा (कुंभाराची भट्टी) पेटवून तीत भाजली जातात. आवा (म्हणजे कुंभाराची वस्तू भाजायची भट्टी)ही भट्टी पाचसहा विटांचे थर आणि त्यावर कोळसा, परत विटांचे थर आणि कोळसा, अशी आव्याची रचना असते. भाजलेल्या वस्तूंना तांबडा रंग हवा असेल तर आव्यातील धुराला बाहेर जाण्यासाठी वाट करून देतात. वस्तू काळ्या रंगाच्या हव्या असतील तर आवा पेटल्यावर काही वेळाने धूर बाहेर जाणे बंद करतात, म्हणजे धूर आतल्या आत कोंडून वस्तूंना काळा रंग येतो. गंडा किंवा गुंडा (हा एक बहिर्वक्र आकाराचा दगड असतो. वस्तूच्या आतून, वस्तूवर हा एका हाताने फिरवला की वस्तू गुळगुळीत आणि पक्की होते), चोपणे (ही एक प्रकारची लाकडी थोपटणी असते. जी वस्तू तयार करायची असेल तिला बाहेरून चोपण्याने ठोकले जाते. त्यामुळे वस्तू पक्की होते), बांबूचा दांडा (हा चाक फिरवायला लागतो. चाकाच्या दोन आऱ्यांमध्ये बांबू घुसवून कुंभार चाकाला गती देतो), मण्यांची माळ (ही वस्तूला चकाकी आणण्यासाठी वस्तूवरून फिरवली जाते.), साचे, विटा, मूर्ती वगैरेंसाठी लाकडी साचे असतात.) या समाजात चाक, आवा, कोळसे, इंगळ, खापर, खापऱ्या, गार, भाजणी, धिसू, चिखल, माती, शाडू, थापी, दोरी, रिंग, रक्षा असे शब्द वारंवार येताना दिसतात.

सोनार हे नाव धंदेवाचक असल्यामुळे या नावाखाली विविध वर्णांचे व धर्मांचे लोक येतात. पूर्वी नाण्यांची पारख करण्याकरिता सोनाराची आवश्यकता असे. त्या सोनारांना 'पोतदार' ही संज्ञा असून बलुतेदारांत त्यांचा समावेश केला जाई. या समाजाकडूनही 'सोनारे कान टोचले, इकडून तिकडे गेले वारे'सारखे वाक्यप्रयोग भाषेला मिळाले आहेत. तर न्हावी हा गावोगावी दिसणारा समाज आहे. तो आता बलुते बंद झाल्यापासून गावोगावी चकचकीत दुकाने थाटून व्यवसाय करतो. त्यांच्या पारंपरिक व्यवसायाचे स्वरूप पूर्ण पालटले आहे. त्यातून त्यांचा भाषिक कोशही विस्तारला आहे. चार वस्तू सोबत घेऊन व्यवसाय करणाऱ्या पारंपरिक न्हाव्यामध्ये आणि आजच्या न्हाव्यामध्ये बराच फरक पडला आहे. तो त्यांच्याकडील वस्तूवरूनही दाखवता येतो. आरसा, कपडा, कटिंग, (कटिंग हे छोटे भाषिक लघुक्षेत्र गृहीत धरले तर, बॉबकट, बॉयकट, गांधीकट, साइडकट, चंपी, टकलू, सोल्जरकट, मिल्ट्रीकट, राउंडकट इत्यादी. असे काही शब्द दाखवता येतात.) कंगवा (येथेही अनेक प्रकार सांगता येतात. विशेषत: नंबरावर कंगवा ओळखला जातो), कात्री (कात्र्यांचेही अनेक प्रकार, नंबर), ब्लेड, वस्तरा, वाटी, मशीन, तुरटी, साबण, हजामत, दाढी, मिशी, बगल, नखंकोरी, धोपटी असे अनेक शब्द या व्यवसायाशी संबंधित आहेत. ये हजामा, ये न्हाव्या या शिव्या म्हणून वापरल्या जातात. जातीवरून उल्लेख करून हिणवणे ही शिवी बनली आहे. इकडची बातमी तिकडे करणाऱ्या माणसाला 'न्हावीपणा करू नको' म्हणतात.

कोरवी समाज भटका आणि विमुक्त आहे. विविध शुभ प्रसंगी वाजंत्री वाजवणे आणि एरवी बांबूपासून विविध वस्तू बनवणे हा त्यांचा उदरनिर्वाहाचा व्यवसाय आहे. अलीकडे तो स्थिर झालेला दिसतो. कोरवी बोलीतील उच्चारण गतिशील असते. या बोलीवर तेलगु, कन्नड, तमिळ आणि मराठीचा प्रभाव आहे. कोरवी लोकांची वेशभूषा, व्यवसाय, घरे, राहणीमान, खाद्यपदार्थ, विविध विधी, लोकदेवता, शिव्या, गाणी, उखाणे, म्हणी, वाजंत्र्यांची वाद्ये वैशिष्ट्यपूर्ण आहेत. हा समाज कैकारी, कैकाडी, बरगंडी, येरुकला, कोरवा अशा विविध नावाने ओळखला जातो. कैकाडी या शब्दाचा अर्थ तमिळ भाषेत 'कयी' म्हणजे हात आणि 'कुडे' म्हणजे टोपली म्हणजेच हाताने टोपल्या विणणारे असा होतो.

त्यांच्या बोलीभाषेत तमिळ आणि तेलगु शब्द आढळतात. ब्रिटिशांनी काही जातींना गुन्हेगार ठरवलं त्यातीलच एक जमात म्हणजे कैकाडी किंवा कोरवी ही आहे.

वडार समाजही कोल्हापूर जिल्ह्यात सर्वत्र आढळणारा समाज आहे. ग्रामीण आणि शहरी दोन्ही ठिकाणी हा समाज दिसतो. या जमातीचे मुख्य काम त्यांच्या पोटजातीनुसार बदलते. तरीही माती आणि दगडाशी संबंधित कामे हे लोक करत होते, काही अद्याप करताहेत. या समाजाची वडारी बोली तेलुगू भाषेची बोली आहे. तिला स्वत:ची लिपी नाही. त्यामुळे ती केवळ या समाजात दैनंदिन व्यवहारात बोलण्यासाठी वापरली जाते. या समाजातील काही जाणकार लोक आपली बोली तेलुगू भाषेतून तयार झालेली आणि तिच्यावर कन्नड भाषेचा प्रभाव झाल्याचे सांगतात. महाराष्ट्रात येऊन स्थिरस्थावर होऊन अनेक वर्षे झालेल्या या समाजाच्या बोलीवर आता मराठी भाषेचाही खूप खोलवरचा प्रभाव पडला आहे. कारण कोल्हापूर परिसरातील वडारी समाज आता पूर्ण मराठी भाषेतून सर्व व्यवहार करताना दिसतो. या बोलीतील काही शब्दांची चर्चा येथे करू. नीन (मी), मानादाद (आपण), नु (तुम्ही), आंग (त्याला), वाऊ (त्यांनी), आद (ती), मनाद (आम्ही), आडाव (कोण), बेलरू (गोड), हुदोड (मोठा), शहापटोन (शहाणा), फुल्लस (आंबट), सुतोड (लहान) असा पूर्णत: वेगळा शब्दसंग्रह वडारी बोलीभाषेत दिसतो. अम्मा म्हणजे आई, मब्बाड म्हणजे वडील, कोडंक म्हणजे मुलगा, कॉडाल म्हणजे सून असा नातेवाचक शब्दसंग्रहही वैशिष्ट्यपूर्ण आहे. या भाषेत नातेवाचक शब्द विपुल आहेत. अगदी अनौरस अपत्याबद्दलही स्वतंत्र शब्द आहेत.

मलकापूर, जोतिबा परिसतात राहणारे वैदू लोक कुटुंबापुरता मराठी-कानडी मिश्रित तेलुगूचा वापर करताना ते आपल्या तेलुगूचाही अभिमान बाळगतात. हा समाज वडाच्या झाडाला 'रामझाड' असे स्वच्छ मराठीत म्हणतात. त्यांच्या भाषेत 'शट्टू' म्हणजे झाड. या समाजाचा व्यवसाय जंगली औषधे विकण्याचा असल्याने झाड या शब्दाला यांच्या भाषेत विशेष स्थान आहे. वडाच्या झाडाला काप मारल्यांतर जो लालसर द्रव स्रवतो, त्याला ते 'रक्तशट्टू' म्हणतात. वडाच्या सालाची पूड ते जखमेवर औषध म्हणून वापरतात. या पुडीला ते 'मरीशट्टू' म्हणातात. ही मरीशट्टू ते फार औषधी आहे, असे सांगतात. यांच्या भाषेत झाडे आणि फळांविषयक विपुल भाषिक भांडार सापडते.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मुस्लीम समाज फार मोठा आहे. पठाण, शेख, सय्यद, मोगल, अत्तार, कागझी, नालबंद, बारुदगार, मणियार, महावत, रंगारी, सारवान, बोहोरा, मोमीन, कसाई, मुकरी, लब्बे असे अनेक पोटभेद कोल्हापूर जिल्ह्यातील मुसलमान समाजात पाहायला मिळतात. यापैकी काही बारा बलुतेदारांमध्ये मोडतात तर काही केवळ पारंपरिक व्यावसायिक आहेत. शिकलगार, मुल्ला (मुलाणी), मिसगर, मदारी, कुरेशी, पिंजारी, तांबोली, मन्यार, अत्तार, मोमीन, बागवान, छप्परबंद आणि फकीर यांना गावगाड्यात बलुतेदार म्हणून विशेष स्थान असलेले दिसते. हे सर्वच मुसलमान समाजाच्या सेवेत खपत असलेले दिसतात. त्यांच्या अनेकविध व्यवसायामुळे मानवी जीवन सुकर होताना दिसते. हा समाज व्यवसायानिमित्त भटकंती करीत असल्याने यांना अनेक भाषा येतात. मराठी, हिंदी, उर्दू या भाषा ते जाणतात. त्यांना हिंदी, उर्दू कळण्यापुरती येते. परंतु सारा व्यवहार ते मराठी आणि दखनी भाषेत करतात. सर्वसामान्य मुस्लीम व्यावसायिक लोक वापरत असलेल्या दखनीमध्ये अरबी-फारसी शब्दांचा खूप भरणा आहे. मात्र क्रियावाचक शब्द मराठी आहेत. कोल्हापुरात तिन्हीत्रिकाळ या समाजाचा संबंध मराठी बोलणाऱ्या लोकांशी व्यवसायानिमित्त येत असल्याने ही बोली मराठी मिश्रित झालेली दिसते. त्यामुळे मराठी क्रियापदांचा वापर या भाषेचा भाग बनला आहे. च, नको, लई, बेगी असे अनेक शब्द दखनीचे झाले आहेत. पीठ रखना (पाठराखण), जीव पों खेलना (जीवावर खेळणे) अशा वाक्यप्रचारांबरोबरच फाट (पहाट), जीब (जीभ), धई (दही), भार (बाहेर), भोतेक (बहुतेक) अशा मराठी शब्दांचे उच्चार सादृश्यत्व मोठ्या प्रमाणात आलेले आहे.

अशी ही कोल्हापूरची भाषा आहे. ती येथील प्रत्येक जातिधर्माच्या माणसाला आपली वाटते. कारण ती सर्वांनी मिळून घडवलेली आहे. तिच्यातून कोल्हापूरच्या समाजजीवनाबरोबर येथील माणसांचे स्वभाव, त्यांचे जगणे ध्वनित होते. त्या त्या प्रदेशाची भाषाच तेथील लोकांची ओळख असते. कोल्हापूरही त्याला अपवाद नाही. त्यामुळे कोल्हापूर समजून घेण्यासाठी येथील भाषा समजून घेण्याला पर्याय नाही. म्हणूनच कोल्हापूरकरांची भाषा समजली की, कोल्हापूर समजले म्हणतात.

**डॉ. नंदकुमार मोरे**



**बोलीभाषा विशेषांक**

## लेख

# चंदगडी बोली

**प्रा. डॉ. गोपाळ ओमाणा गावडे**

**भाषेपेक्षा बोलीमध्ये उच्चारण सुलभता अधिक प्रमाणात पाहायला मिळते. यातून अनेक शब्दही निर्माण होताना दिसतात. भाषिक सुलभीकरण हे काहीवेळा स्वनांमध्ये होते तर काहीवेळा शब्दांमध्ये देखील होताना पाहावयास मिळते. चंदगडी बोलीमध्ये 'ओ' चा 'व्ह' होताना दिसतो. जसे, 'ओहळ' चे 'व्हळ' असे भाषिक रूप तयार होते. तर व्हळ ला 'या' प्रत्यय लागून 'व्हळया' असे अनेकवचन होते.**

**जगभरात** जवळजवळ सात हजार भाषा बोलल्या जात होत्या. त्यांपैकी एकट्या भारतात तीन हजारच्या आसपास भाषा बोलल्या जात होत्या. भाषांची संख्या झपाट्याने कमी होताना दिसते. आज अस्तित्वात असलेल्या अनेक भाषा आपले अस्तित्व टिकविण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

कोणत्याही भाषेची सीमारेषा निश्चित सांगता येत नाही. म्हणतात की, बारा कोसावर भाषा बदलते. त्यामुळे त्या-त्या प्रदेशाच्या भाषेचं वैशिष्ट्य वेगळं असतं. तरीही ती कोणत्यातरी एका भाषेशी आपले नाते सांगत असते. अशा भाषांच्या प्रदेशविशिष्ट विभिन्न रूपांमधून बोली निर्माण होत असते. त्यामुळेच तिचे आकलन करणे शक्य होते. हे वेगळेपण अनेक कारणांनी निर्माण होते. प्रदेश हा जसा त्याचा एक भाग आहे, तसेच समाज, जात, वर्ग, लिंग, हवामान, संस्कृती, व्यवसाय अशी काही आणखी कारणे सांगता येतात. प्रदेशसान्निध्य व संस्कृतिसंक्रमण यानेही भाषाबदल घडून बोलींची निर्मिती होत असते. व्यवसायाच्या निमित्ताने दुसऱ्या प्रदेशात स्थायिक झालेल्या लोकांनी जसे त्या प्रदेशाला आपल्या भाषेची देणगी दिली, तशाच पद्धतीने आपल्या भाषेतदेखील नव्या शब्दांची भर घातली. आधुनिक काळात भाषेमध्ये हे मोठ्या प्रमाणात घडले. भाषासंमिश्रणाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात घडून आली. त्यातून शहरात काहीवेळा भाषा ही प्रदेश व व्यवसाय व जात यांच्या ओळखीस कारण बनल्याने गंड निर्माण झाले तर काहीवेळा प्रमाणभाषेने आक्रमकपणे बोलींना आपल्यात सामावून घेतले. तरीही शहरात बोली आपले वेगळेपण टिकवून राहिल्या. मोठ्या प्रमाणातील संमिश्रणाने बोलीचे कंगोरे गुळगुळीत होत त्या नष्टप्राय होत गेल्या हेही नाकारता येत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुका व आसपासच्या भागात चंदगडी बोली बोलली जाते. चंदगडी बोली बोलणारा प्रदेश प्रामुख्याने चंदगड तालुका आहे. त्याबरोबर बेळगाव जिल्ह्यातील काही गावे गडहिंग्लज आणि आजरा तालुक्यातील दक्षिण भागाकडील काही गावांचा समावेश करता येईल. चंदगड हा तालुका महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या तीन राज्यांच्या सीमावर्ती भागावर वसलेला, चंदगडी बोलीचा भाग आहे. १९६०पर्यंत हा तालुका बेळगाव जिल्ह्यामध्ये होता. भाषावार प्रांतरचनेनुसार चंदगड हा भाग कोल्हापूर जिल्ह्याला म्हणजेच महाराष्ट्राला जोडण्यात आला. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक, शैक्षणिक सुधारणांपासून हा भाग दूरच राहिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या किल्ल्यांपैकी चार गड या तालुक्यात आहेत. मौर्य, सातवाहन, शिलाहार, कदम्ब इ. घराण्यांनी या भागात राज्य केल्याचे संदर्भ मिळतात. चंदगड तालुक्याचे दोन स्वाभाविक भाग पडतात. बेळगावजवळ असलेल्या पूर्वेकडील भागाला किणी-कर्याद

म्हणतात. पश्चिमेकडील भाग कोकणी भाग म्हणून ओळखला जातो. चंदगडच्या आग्नेय, पूर्व, नैऋत्य आणि दक्षिण बाजूस सध्या कर्नाटकात असलेला सीमाभागातील बेळगाव जिल्हा आहे. वायव्य दिशेस गोवा, पश्चिम दिशेला सावंतवाडी तालुका (कोकण), ईशान्य दिशेला आजरा तालुका आणि उत्तरेकडे गडहिंग्लज तालुका आहे.

बेळगाव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मराठी बोलली जाते. बेळगावी मराठी म्हणून ती प्रसिद्ध आहे. पूर्वी चंदगड तालुका बेळगाव जिल्ह्यात असल्यामुळे चंदगडच्या पूर्वेला बेळगावी मराठीचा प्रभाव जाणवतो. आणि बेळगावी मराठीवर कानडीचा प्रभाव जाणवतो. कुठे गेला होतास? या प्रश्नार्थक वाक्यासाठी बेळगावी मराठीसाठी 'खट्टे गेल्ल्यास?' तर चंदगडी बोलीतील पश्चिम भागाकडे 'खलेडे गेल्लेस?' असे बोलले जाते. चंदगड तालुक्याच्या दक्षिणेला आणि पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वतरांगा आहेत. घाटमाथ्यावर चंदगड तालुका आणि घाटाच्या खाली गोवा आणि सावंतवाडी- दोडामार्ग (कोकण) आहे. पश्चिमेकडील भाग डोंगराळ असल्यामुळे सुपीक जमीन नाही. त्यामुळे या भागातील लोकांचे जगणे हलाखीचे होते. कामाधंद्याच्या निमित्ताने इथला माणूस गोव्याला अधिक जोडला गेला. कोदाळी, पार्ले, इसापूर, हेरे, कानूर, झांबरे, उमगाव, पुंद्रा इ. पश्चिमेकडील गावातील भाषेवर कोकणीचा प्रभाव अधिक जाणवतो. मुलगा, मुलगी यास झिल, चिडू म्हणतात. मी, तू ही सर्वनामे मिय्या, तिय्या, त्याचप्रमाणे मीनं, तूनं अशी उच्चारली जातात.

कोकणी, मराठी, कानडी, बेळगावी मराठी आणि गोवा मराठी या भाषांच्या संकरातून चंदगडी बोली निर्माण झाली आहे. अगदी अलीकडेपर्यंत चंदगडमधील लोकांना सुद्धा चंदगडी ही वैशिष्ट्यपूर्ण भाषा आहे, याची जाणीव नव्हती. २१व्या शतकाच्या प्रारंभापासून चंदगडी बोलीविषयी विचारमंथन सुरू झाले आहे. प्रसिद्ध लेखक विजयकुमार दळवी, प्रा. (डॉ.) गोपाळ गावडे, प्रा. (डॉ.) नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. गुंडू कांबळे यांचे चंदगडी बोलीच्या अनुषंगाने संशोधन आणि ललित लेखन सुरू आहे. तरुणवर्गात चंदगडी बोलीविषयी आस्था निर्माण झालेली आहे. त्यातूनच चंदगडी बोलीतील नवसाहित्य निर्माण होत आहे.

**चंदगडी बोलीचे काही भाषाविशेष –**

**भाषिक सुलभीकरण प्रक्रिया–**

भाषेपेक्षा बोलीमध्ये उच्चारण सुलभता अधिक प्रमाणात पाहायला मिळते. यातून अनेक शब्दही निर्माण होताना दिसतात. भाषिक सुलभीकरण हे काहीवेळा स्वनांमध्ये होते तर काहीवेळा शब्दांमध्येदेखील होताना पाहावयास मिळते. चंदगडी बोलीमध्ये 'ओ'चा 'व्ह' होताना दिसतो. जसे, 'ओहळ'चे 'व्हळ' असे भाषिक रूप तयार होते. तर 'व्हळ'ला 'या' प्रत्यय लागून 'व्हळया' असे अनेकवचन होते. कोकणीप्रमाणे चंदगडी बोलीमध्ये महाप्राणव्यत्यास प्रत्ययाला येते. काहीवेळा 'उ'चा 'ओ' होतो. उच्चाराच्या सुलभीकरणातून हा भाषाबदल झालेला आहे. उदा. 'सुकणे' या शब्दात 'सोकणे' असा बदल होतो.

चंदगडी बोलीत काहीवेळा 'र'चा 'य' होतो. 'वाटेवरचं' याच्यासाठी 'वाटेवयलं'. जसे, परडं- पयडं. वरून- वयनं. त्याचप्रमाणे 'ल'ऐवजी 'य' वापरला जातो. जसे की, 'खालचं'साठी 'खायलं' असे शब्दप्रयोग रूढ आहेत. उदा. वाड्यावयनं, घोड्यावयनं इ. असेही शब्द येतात. चंदगड बोलीमध्ये 'य' श्रुती खूप मोठ्या प्रमाणावर दिसते. वयल्या वाटेवयलं शात भांगलूलावात असे एखादे वाक्य उदाहरणासाठी पाहता येईल.

**क्रियापदातील बदल –**

चंदगडी बोलीमध्ये क्रियापदांच्या रूपांमध्ये बदल होताना दिसतो. त्यामध्ये क्रियापदाला 'शी' प्रत्यय लागतो. जसं, यल्याशी, गेल्याशी. यामध्ये आदरार्थी व अनेकवचनी नामरूपांच्या क्रियापदाला 'शी' प्रत्यय लागतो. काही क्रियापदे ही उच्चारसौकर्याने संक्षिप्त झालेली आहेत. त्यांना प्रसंगी 'ताय' प्रत्यय लागतो. जसे की, रडताय, पिताय, खाताय, निजताय, जेवताय, काम करताय, व्हडदाडताय, किरकीरताय, लुटताय इ. या रूपांमध्ये ता मधील आ हा दीर्घ उच्चारला जातो. 'आहे' ऐवजी 'य' येते. तसेच 'लाय/लय' प्रत्ययदेखील लागून अशीच शब्दरूपे तयार होतात. रडत आहे, जात आहे, पित आहे, निजत आहे, खात आहे इत्यादी प्रमाणभाषेतील रूपं चंदगडी बोलीमध्ये रडोलेय, जाऊलेय, पिओलेय, निजोलेय अशी स्त्रिलिंगी तर रडोलाय, जाऊलाय अशी पुल्लिंगी रूपे बनतात. उपरोक्त शब्दातील 'त'चा लोप होऊन त्या जागी 'ल' प्रत्यय लागला आहे. आलं, आलो या क्रियापदांमध्ये 'आ'ऐवजी 'य'चा उच्चार केला जातो. उदा. यलं, यलो इ. 'आहे'च्या ऐवजी 'य' हे संक्षिप्त रूप वापरले जाते. जसे की, धुताय, तळताय इ.

त्याचप्रमाणे 'लाली' या प्रत्ययाचा वापर होऊन क्रियापदे तयार होतात. ती सामासिक शब्दांप्रमाणे वापरली जातात. उदा. खेळत आहे या क्रियापदाचे खेळोलाली – खेळू लागली/खेळोलालेय ही संक्षिप्त रूपे तयार होतात.

'लाला/लाली' या प्रत्ययांचा वापर होऊन क्रियापदे तयार होतात. उदा. शाळा सुडून तिते खेळोलाला. यामध्ये पुल्लिंगी व स्त्रीलिंगी क्रियापदाप्रमाणे बदल होतो. बघूलेय (स्त्रीलिंगी), बघूलाय (पुल्लिंगी) लिंगभेदानुसार अशाप्रकारे शब्दभेद निर्माण होतो. चंदगडी बोलीमध्ये काळाचा विचार करतो तेव्हा वर्तमानकाळी– 'तो खेळोलाय किंवा खेळताय', भूतकाळी– 'खेळ्ळा' या एका शब्दातून पूर्ण वाक्य उच्चारले जाते. भविष्यकाळी तो खेळत असेल यासाठी 'खेळेल' हा एकच शब्द उच्चारला जातो.

काळवाचक शब्दातूनही चंदगडी बोलीचे वेगळेपण अधोरेखित होते. त्या दिवशी यासाठी 'तदी', तेव्हा या शब्दासाठी 'तव्वं' खूप दिवसांपूर्वीऐवजी 'लईंदी', मागच्यावेळीसाठी 'मागलेंदी', गेल्यावर्षीसाठी 'गसाली' असे शब्दोच्चार होतात. यावर्षीसाठी 'आवंदू', नेहमी–खाईम, संध्याकाळ–काळवा, ह्यावेळी–पावटी, खेपा, एवढ्या लवकर, आत्ता–यदवं, पहाटे–यरवाळी, वेळ–वकोद असे काही खास चंदगडी बोलीमध्ये वापरले जाणारे शब्द सांगता येतात.

भाषिक सुलभीकरणातून अनेक सामासिक शब्दांची निर्मिती झालेली पाहायला मिळते. तेदेखील काहीवेळा क्रियापदांप्रमाणे वापरले जातात. 'फुललेयी' हा शब्द 'फुलली आहे' याऐवजी आलेला आहे. 'आहे'ऐवजी 'यी' प्रत्यय लागलेला दिसतो. उदा. यलेयी, गेलेयी हे सामासिक शब्द अनुक्रमे आली आहे, गेली आहे याऐवजी आले आहेत.

**संक्षिप्त रूपांची निर्मिती –**

भाषेमध्ये उच्चारसौकर्यासाठी काही संक्षिप्त रूपे निर्माण होत असतात. चंदगडी बोलीचे खास वैशिष्ट्य म्हणजे बोलताना प्रत्येक शब्दाला 'स' प्रत्यय लावून बोलले जाते. उदा. दडोस, दडूस, जेवणास, रडोस, रडूस, खाऊस, पिवोस, जाऊस, राहूस, निजोस, उठोस, अवतास, लाकडास, दारास, घरास इ. 'ला' प्रत्ययाऐवजी 'स' प्रत्यय सर्रास लावला जातो. उदा. कोंबडीस रावणीस बशीव. (कोंबडीला रावणीला बसव.), उदे गावास जाऊस व्हये. (उद्या गावाला जायला पाहिजे.) किंवा पाहिजे हे क्रियापद पायजे असे वापरले जाते.

**एक शब्द दोन अर्थाने वापरणे–**

मराठीच्या विविध बोलींमध्ये एकाच अर्थाच्या शब्दासाठी विविध पर्यायी शब्द पाहायला मिळतात. याला आनुषंगिक विविधता म्हणतात. प्रत्येक शब्दाचे अर्थक्षेत्र हे वेगळे असते. घागर या शब्दाला मोगा, बिनगा. भाजी या शब्दाला शाक, वांगड. तर ताट या अर्थी ताटली, गुळंबी, जोगली (मातीची) हे शब्द वापरले जात होते. तसेच पान, सार, सारण, पात, रोव, लव्हा, तरवा, डोणा, राकोस, चिमणी, घळ, वादी, चुरा इत्यादी काही शब्द दोन अर्थाने वापरले जातात. उदा. सार = आमटी व पाण्याचा पाट, सारण = पाण्याचा पाट व करंजीतील सारण, पात = जनावरांची व पीकांची ओळ, रोव = गरगट व कोवळी भाजी, लव्हा = नाचण्याची रोपं व नाचण्याचे वावर, ताट = ताट व गोरबाचा सांगाडा, राकोस = राक्षस व संरक्षण करणारा, चिमणी = पक्षी व दिवा, घळ = उंदराचे बीळ व रोप लावताना ठेवलेली वाट इत्यादी.

एका अर्थासाठी दोन शब्द वापरले जातात. उदा. गवत = कराड व पिंजार, ओपा = वरा, कुणगा, उजाडणे = भगभगणे, भिनभिनणे, मातीचा हंडा = भाचर, डेरा, मातीची छोटी घागर = बिंदगा, मोगा, साडी = सावलं, पातळ, बांबू = चिवा आणि मानगा, ओढा = व्हळ, हाळ्ळा, आमटी = कोरड्यास, वांगड, नंतर = मानं, माग्न

लिंगभेद, आकारमानातील फरक यासारख्या अनेक कारणांनी शब्दभेद व अर्थभेद होताना दिसतो.

**शब्दनिर्मिती –**

बोली बोलीमधील प्रादेशिक बदल ओळखणे काही वेळा सोपे असते. एखादा भाषेतर घटक भाषिक विनिमयामध्ये अडथळा निर्माण करतो तेव्हा बोलीतील भेद स्पष्ट लक्षात येतो. चंदगडी बोलीमध्येदेखील कोकणी व कर्नाटकी यांच्यापेक्षा वेगळे काही शब्द सापडतात. जे चंदगडी बोलीतील म्हणून सांगता येतात. चंदगडी बोलीमध्ये 'सुद्धा' ऐवजी 'दुक्कुल' हा शब्द वापरला जातो. उदा. ह्यो दुक्कुल यतो म्हेंताय. (हा सुद्धा येतो म्हणतोय.) 'पाहिजे' ऐवजी 'व्हये' असे रूप वापरले जाते. उदा. तुला काय व्हये ते सांग. (तुला काय पाहिजे ते सांग.) पाणी न्हाणे – आंघोळ करणे, तंबीट हा लाडूसाठी वापरला जाणारा शब्द बोलीविशिष्ट आहे. तंबीट हे भाजलेल्या तांदळाच्या पीठापासून गुळाच्या पाकात बनविले जातात. अशा प्रकारचे शब्दवैविध्य हे कोकणी व कर्नाटकीच्या प्रभावातून झालेले आहे. यातून चंदगडीबोली विस्तारलेली आहे. दैनंदिन जीवनामध्ये वापरल्या जाणाऱ्या शब्दांच्या बाबतीत हे वैविध्य जाणवते.

चंदगडी बोलीमध्ये एका शब्दातून एक वाक्य उच्चारले जाते. जसे की, यऊलेसाय, जाऊलेसाय, जेऊलेसाय यासारखी रूपे होय. जेऊलेसाय यामधून तू जेवत आहेस?

असे प्रश्नार्थक वाक्य व्यक्त होते. यन्हाइस - तू येणार नाहीस काय? असा अर्थ हा एक शब्द व्यक्त करतो. न्हा मधील 'आ' व 'इ' हे स्वर उच्चारामध्ये दीर्घ बनतात. हा शब्द जरी उच्चारसुलभतेतून निर्माण होत असला तरी व्याकरणिक नवी रूपे तयार करतो.

**चंदगडी बोलीतील काही वैशिष्ट्यपूर्ण वाक्प्रचार व शब्द – वाक्प्रचार –**

स्यास भरणे- आहेर देऊन ओटी भरणे, डबऱ्यात घालणे - तोटा करणे/ खड्ड्यात घालणे, मोळका मोडणे- चेंदामेंदा करणे, सुपडा साफ करणे- सर्वनाश करणे/ सर्व संपवणे, शिर पडणे/पाड पडणे/खेव पडणे - वाया जाणे, खराब होणे, कुरडा कोंबा करणे- पाट लावल्यानंतर, लग्नानंतर नवरा-नवरीसाठी जेवण करणे.

**शब्द –**

अंडीबैल (पाडा), गोड्डु (वांझ), घुण (गोम), चंदी (वळचण), इरागत (मूत्र), किरमं (सर्दी), कुयडा (तिरळा, चकणा), न्हंगडे (आजार), ओमण्या (गोराब बांधण्याची बारीक बेळं), खस्डी (बैलगाडीचा ब्रेक), गबोटा (केळीच्या झाडाची साल), गोराब (इरलं), फोडणी (पहिली नांगरट), मंज (दव), यरवान (बेळाची लहान बुट्टी), वाकोरा (गोरबाच्या आत भाकरी ठेवण्यासाठी बेळांची जाळी), हुडवा (शेणीचा रचलेला ढीग), हेंडे (मातीची ढेकळं), कवाट (अंडे), कुसमेर (अंड्याची भुरजी), बावची (गवार)

फणसाच्या अर्ध्या भागाला ढेपूल म्हटले जाते. लसनाचा आकार कांद्यासारखा म्हणून लसूनला लसनीचा कांदा असे म्हटले जाते. पत्रावळीला इस्तारी तर घवणं करताना वापरल्या जाणाऱ्या केळीच्या पानाच्या देठाला चंदगडीमध्ये 'कातोंबा' म्हटले जाते. उल्लसक्कं म्हणजे थोडंसं. इंग्रजी इस्टेटवरून चंदगडीमध्ये संपत्तीदर्शक शब्द 'इस्टन' आला.

खाली चंदगडी बोलीच्या नमुन्यादाखल एक उतारा दिला आहे.

आण्णूबाबाचं पयडं समुद्रातल्या बेटासखं व्हतं. सोतंत्र. गावात यगळं. यकाद्या वाड्यास चिरेबंदी तट आसताय, तसा आण्णूबाबाच्या पयड्याचा चिरेबंदी कूप व्हत्ता. ईत-ईतभर जागेत यरंडाचे मोके मारले आसेत. तेच्यामधी येक येक लाकडाचा मोका रून, यकास येक लागोन सगूणीची शिरडं रोवली आसेत. मांजरासदुक्कुल भुत्तूर जाऊस यईत नसे. खोपीच्या म्होरे मोट्टीच्या मोट्टी तडकी व्हत्ती. पयड्यात बयलांची खोप, बईलगाडी, गवात, लाकडं सगळं आबादान व्हतं. तांबूस बईलजुडी व्हत्ती. बयलं व्हत्ती तवर आण्णूबाबा खोपीतच निजे. भिन-भिनतानं उठे. उठला की, आदी बैलास्नं खोपीत्नं भाईर आणून बांदे, तेस्नं गवात घाली. मग घराडे यई. त्वांड धुन हुलग्याम्होरे बसोन दोन-तीन भाकरी खाई. भाकरी खाऊच्यादी कधी भाईर पडोस नव्हता. भाकरी खाऊन जाल्यावर दोन हातात दोन घागरी पाणी घून खोपीडे जाई. कप्पय घून दोनी बयलांचं आंग घासून काडी. आण्णूबाबाच्या बयलांच्या आंगावर येक तांब न्हतर पिस्सू दिसोस न्हवती. बयलांचे कान सोच्छ पुसून घी. शेपटी चोळून झाली की ती ताकतीन वडी. येकेक पाय उचलून चारी पायांची गेळंदिक्कूल चोळून काडी. म बयलांचं गवात खाऊन झालं की, तेस्नं पाणी पाजी. पाणी पियेपत्तर इरस आणि कडाण्यास्नं त्याल घाली. जुवास सापत्या बांदोन घिई. नांगरी, यटाक, जू आणि आज कामास लागणारं सगळं सामान गाडीत ठिवी. बिराकीस मागल्या बाजून वालं बांधोन घी आणि म तडकी उघडी. मग्न गाडीस बयलं जुपे. गाडी भाईर आणून थांबवी. तडकी घट्ट बांधोन गाडीत चढला की, दोनी बयलांचे कासरे दोनी हातात घून उभे ऱ्हाई. आणि कासरे हालवून 'चल गबरू' म्हटल्यान की, बयलं पळोस लागेत. खण खण वाजेत बग्ता बग्ता गाडी रस्त्यास लागे. आण्णूबाबाची गाडी दणकट व्हत्ती; म्हण्णंच खणखणीत आवात यई. बयलांची रंगीसिंगी जुडी. यकदम चपळ. पळोलाली की, जमनीवर पाय ठरेत नसे. आण्णूबाबा आस्सा परतेक गोष्टीत रुबाबात जगला. गाडी रुबाबदार. बयलं रुबाबदार. पयडं रुबाबदार. दारू पिला की राजासखा रुबाबात यई. आणि बईलगाडीत चढला की, कोलापुरी पईलवानागत रुबाबात उभे ऱ्हाई. गाडी खड खड खड हादरे तशा आण्णूबाबाच्या काळ्याकुट्टं पिंढऱ्या लड-लड हालेत.

**– प्रा. डॉ. गोपाळ ओमाणा गावडे**



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# अहिराणी बोली

**डॉ. रमेश सीताराम सूर्यवंशी**

**अहिराणी ही एकेकाळी खानदेश परिसरातील मुख्य बोली होती. अहिरराजे यांची ही प्रमुख बोली. खानदेश परिसरात ती आज बोलली जाते. पूर्वी अहिराणी बोलणे गावंढळ लक्षण मानले जाई. अलीकडे भाषिक अस्मिता जोपासली जाऊ लागली आहे. याशिवाय जागतिक स्तरावर विविध विद्यापीठातून भाषेच्या अभ्यासाचे महत्त्व पटू लागल्याने त्या जतन करण्याकडे, त्यांचे संवर्धन करण्याकडे, जगाचा कल वाढू लागला आहे.**

**खानदेशाचे** अतिप्राचीन नाव ऋषिक देश. यादवांच्या काळात खानदेश सेऊणदेश म्हणून ओळखला जाई. मोगलांच्या कारकिर्दीत हा भूभाग खानदेश म्हणून ओळखला जाऊ लागला.

अहिराणी ही खानदेश या भूप्रदेशात बोलली जाणारी बोली. महाराष्ट्रातील धुळे आणि जळगाव या दोन जिल्ह्यांच्या मिळून होणाऱ्या प्रदेशास आजही खानदेश म्हणून ओळखतात. पूर्वी खानदेश हा मुंबई इलाख्याचा एक जिल्हा होता. प्राचीन काळी खानदेश या प्रदेशाचा विस्तार सातपुडा पर्वतापासून दक्षिणेकडे सातमाळा व अजिठ्यांचे डोंगर येथपर्यंत तर पूर्वेकडील वऱ्हाड प्रांत ते निमाड जिल्ह्यापासून पश्चिमेकडे बडोदे संस्थान व रेवाकाठ जहागिरीपर्यंत इतका होता. याचे अतिप्राचीन नाव ऋषिकदेश. यादवांच्या काळात हा भूभाग सेउनदेश म्हणून ओळखला जाई. मोगलांच्या कारकिर्दीत हा भाग खानदेश म्हणून ओळखला जात होता. व्यवस्थापनाच्या दृष्टीने इ. स. १९०६मध्ये खानदेश जिल्ह्याचे पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश हे दोन भाग पाडण्यात आले. पुढे १९६०पासून पूर्व खानदेशास (पू. खा.) जळगाव जिल्हा व पश्चिम खानदेशास (प.खा.) धुळे जिल्हा अशी नावे देण्यात आली.

खानदेशात इ.स.पूर्व चौथे ते इ.स. दुसऱ्या शतकात मौर्यांचे राज्य होते. पहिल्या शतकात सातवाहनांची सत्ता होती. तिसरे ते पाचव्या शतकांत वाकाटकांची सत्ता होती (वर्षदेव, स्वामीदास, मुलंदा). चौथ्या शतकात वाकाटकांसोबतच अभीरांचीही सत्ता होती. इ.स.६५५ ते ७०२ या काळात सेद्रकांचे (निकुम्माल्लशक्ती, नृपती जयशक्ती, नृपती वैरसेन) राज्य होते. यासोबतच सहाव्या शतकात कलचुरी तर सातव्या शतकांत पुलकेशीचे तर आठव्या शतकात त्रैकूटकांचे राज्य होते. त्यानंतर नवव्या ते बाराव्या शतकापर्यंत राष्ट्रकूट, सोमवंशी आणि यादव यांचे राज्य होते. पुढे अल्लाउद्दीन खिलजी, अकबर यांच्या सत्तेनंतर १८व्या शतकांत (इ.स-१७२०) निझामांचे राज्य होते. १७६० ते १८१८ हा मराठ्यांचा काळ तर १८१८ ते १९४७ हा ब्रिटिशांचा काळ गणला जातो.

### अहिर–अहिराणी बोली / खानदेश – खानदेशी बोली

खानदेश हा मूळचा अहिरांचा देश. अहिर ही शेतकऱ्यांची, गवळ्यांची एक जात. प्रमुख उद्योग गुरे राखणे. मत्स्यपुराणात सात तर वायुपुराणात दहा अशी अहिर राज्यांची संख्या दिसते. इ.स.१५०मध्ये आंध्रांचा ऱ्हास होऊन अभीरांचे राज्य आले. वायव्येकडून ते दक्षिणेकडे सरकत आले. चौथ्या शतकात खानदेशावर अहिरांचे राज्य होते. आठव्या शतकात काठी लोक जेव्हा गुजराथेत आले, तेव्हा बराच मुलुख हा अहिरांच्या ताब्यात होता. अहिरांनी सुपीक जमिनीवर गुरे चारण्यासोबतच शेतीव्यवसाय सुरू केला. शेतीव्यवसायाला पुरक असे विविध व्यवसाय करणारे इतर लोक

अहिरांशी सततच्या संपर्कात येऊ लागले. सत्ता, व्यापार, व्यवसाय यातील अहिरांच्या भाषेचे वर्चस्व हे खानदेशभर वाढल्याने अहिराणी ही प्रदेशाच्या नावाने म्हणजे खानदेशी बोली या नावाने ओळखली जाऊ लागली. ती एका जातीची भाषा न राहता ती त्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांची, प्रदेशाची भाषा झाली. अहिरांशी सततचा इतर भाषिकांचा संपर्क आला. तो इतर भाषिक समाजही त्यांच्या स्वत:च्या बोलींची छाप असणारी अहिराणी, मिश्रित अहिराणी बोलू लागला. खानदेश या जिल्ह्याच्या भूप्रदेशात ती बोलली जाते. म्हणून ती खानदेशी. या बोलीचे क्षेत्र या जिल्ह्याच्या क्षेत्राहून मोठे आहे. चांदवडचे डोंगर, सातपुड्याचे डोंगर, वाघुर नदी आणि संह्यपर्वत, अजिंठ्यांचे डोंगर या निसर्गांने तोडून वेगळ्या ठेवलेल्या खोलगट भूभागात, खदाणीत, खाणीत ही खानदेशी, अहिराणी बोलली जाते. या भूभागात मग नाशिक, नंदूरबार, औरंगाबाद, जळगाव, धुळे या जिल्ह्याच्या गावांचाही समावेश होतो. या परिसरात वास्तव्यास असलेल्या ज्या ज्या जमातींनी ती भाषा स्वीकारली, त्या त्या जमातींच्या नावाने ती बोली ओळखली जाऊ लागली. यानुसार खानदेशी बोलीचे सामाजिक आणि प्रादेशिक असे प्रभेद निर्माण झालेत. खानदेशीच्या प्रादेशिक प्रभेदांचा विचार करता, खानदेशाच्या नैऋत्येकडील बागलाण भागातील ती बागलाणी, उत्तरेकडील तापीच्या परिसरातील ती तप्तांगी, दक्षिणेकडील ती दखनी किंवा डोंगरांगी, पश्चिमेकडील ती वरल्ह्यांगी, पूर्वेकडील ती खाल्ल्यांगी, नेमाडकडील ती नेमाडी, डांगा परिसरातील ती डांगी, तसेच जामनेर, पोचारो परिसरातील विदर्भ, मराठवाडा आणि लेवा बोलींच्या प्रभावाखालील ती तावडी असे प्रादेशिक प्रभेद आढळतात. तर सामाजिक प्रभेदात, खानदेशात वास्तव्यास असणाऱ्या प्रत्येक जातीच्या स्वत:च्या बोलीची छाप असलेली अहिराणी बोली ही त्या जातीची स्वतंत्र नामधारण करून सामाजिक प्रभेदाचे रूप बनली. त्यात महारांची ती महाराऊ, लाडशाखीय वाण्यांची ती लाडसिक्की, भिल्लांची ती भिलाऊ, अहिरांची ती अहिराणी, लेवा पाटीदारांची ती लेवा पाटीदार बोली, पावरांची ती पावरी, काटोनी भिल्लांची ती काटोनी, घाटावरून आलेल्यांची स्वत:च्या बोलींची छाप असलेली ती घाटोयी, गुजरांची ती गुजरी, भावसारांची ती भावसारी, परदेशांची ती परदेशी अशा जातिनिहाय अहिराणीच्या सामाजिक प्रभेदांची यादी वाढतच गेली. या सर्व सामाजिक आणि प्रादेशिक प्रभेदांना एकाच नावाने सामावून घेणारी विशाल संकल्पना आहे. खानदेशात जनमानसात खानदेशी आणि अहिराणी ह्या दोन संकल्पना कधीही नव्हत्या. खानदेशी व अहिराणी हे दोन शब्द अर्थभेदक कधीही ठरले नाहीत.

**अहिराणीचे वैभव :** अहिराणी बोलीत विपुल असे लोकसाहित्य आहे. खानदेशात साजरा केला जाणारा प्रत्येक सण, उत्सव हा लोकगीत आणि विधिनाट्य यांनी भरलेला आहे. प्रत्येक प्रसंगांची, विधिनाट्यांची, सण-उत्सवांची लग्नाची गाणी ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ती महाराष्ट्रातल्या इतर भागात कुठेही आढळत नाहीत. कानबाईच्या वह्या, गोठाड्यानी गोट, मोटेवरीची गाणी, मरणाच्या वेळी बायकांची रडण्याची पद्धती, झोक्यावरची गाणी, जात्यावरची गाणी, सण-उत्सव वा विधी यात म्हटली जाणारी गाणी ही खूप असून वैशिष्ट्यपूर्ण अशी आहेत. जीवनाचे सार असलेल्या अशा वैशिष्ट्यपूर्ण म्हणींचा वापर दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर हा होतोच. खानदेशातील सारेच सण महाराष्ट्रातील इतर सणांप्रमाणेच साजरे केले जातात. खानदेशातील आखाजी हा मुख्य सण. या दिवशी संपूर्ण स्वातंत्र्य असते. मुली माहेरी झोका, खेळ, गाणी यांत रंगतात. गौराईची गाणी गातात. गावाच्या आमराईत झिम्माफुगडी खेळतात. शेतमजूरांचा कामाचा करार आज संपतो व नव्याची सुरुवात होते.

मुले, माणसे पत्ते खेळतात. सारे गोडधड खातात, पितरांचेही श्राद्ध पुजले जाते, नैवद्य दिला जातो. बलुतेदारांचा सन्मान केला जाऊन वार्षिक कराराची रक्कम, धनधान्य (गव्हाई) दिले जाते. खोपडी, बारस, भंडारानी तई उखलनं, आरत्या, भालदेव, कानबाई, गौराई हे पारंपरिक सण (वा विधी) आजही खानदेशात मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. खानदेशाची खाद्यसंस्कृतीसुद्धा आगळीवेगळी अशी आहे. बंगा, दघडपाणी, बट्ट, डबूकवडा, पुरन पोई, सातपुडन्या पाटोड्या, बेसनवांगा, घुण्या, सांजऱ्या ही खाद्यसंस्कृतील नावेही महाराष्ट्राला माहीत नसावीत अशी आहेत. खानदेशातील बोली, म्हणी, वाक्प्रचार, कृषिअवजारे यावर डॉ. रमेश सूर्यवंशी यांनी आपल्या ग्रंथसंपदेतून प्रकाश टाकला आहे. नातीगोती व सणउत्सव यांचं दर्शन खानदेशातील प्रचलित लोकगीतांच्या आधारे डॉ. उषा सावंत व कृष्णा पाटलांनी त्यांच्या ग्रंथातून घडविले आहे. तर देवदेवता, ग्रामदैवते यावर डॉ. सयाजी पगार यांची ग्रंथसंपदा आहे.

**अहिराणी काल, आज आणि उद्या :** अहिराणी ही एके काळी

खानदेशपरिसरातील मुख्य बोली होती. ती व्यवहाराची भाषा होती. अहिरराजे यांची ती प्रमुख बोली. धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिकचा कळवण, सटाणा, मालेगाव अन् औरंगाबादचा कन्नड व सोयगाव या तालुक्यांचा भाग या परिसरात ती आजही बोलली जाते. या परिसराची लोकसंख्या ही एक कोटीच्या आसपास आहेच. याशिवाय उर्वरित महाराष्ट्रात आणि गुजरात व मध्यप्रदेशात नोकरी वा व्यापारानिमित्ताने गेलेले सारे खानदेशवासीय हे आपल्या घरात अहिराणीच बोलतात. जगाच्या पाठीवर अनेक देशांतही खानदेशातील माणूस स्थाईक झालेला आहे. तेथेही तो आपल्या कुटुंबात अहिराणी जपून आहे. पूर्वी अहिराणी बोलणे गावंढळ, ग्राम्यतेचे लक्षण मानले जाई. अलीकडे भाषिक अन् प्रादेशिक अस्मिता जोपासली जाऊ लागली आहे. याशिवाय जागतिक स्तरावर विविध विद्यापीठातून बोलीभाषेच्या अभ्यासाचे महत्त्व पटू लागल्याने त्या जतन करण्याकडे, त्यांचे संवर्धन करण्याकडे जगाचा कल वाढू लागला आहे.

**बोलीची संमेलने :** अहिराणी बोलीची आजवर पाच अखिल भारतीय अहिराणी साहित्यसंमेलने पार पडलीत. प्रा. चव्हाण आणि प्रा. डॉ. सौ. शकुंतलाताई चव्हाण या दाम्पत्याने त्यांच्या शब्दशक्ती या नावाच्या मराठी साप्ताहिकाच्या पहिल्या वार्षिक अंकाच्या निमित्ताने १२ फेब्रुवारी १९९८ रोजी प्रा. राजा महाजन यांच्या अध्यक्षतेखाली अंमळनेर तालुक्यातील मांडळ या गावी छोटेखानी अखिल भारतीय अहिराणी साहित्यसंमेलन भरविले. त्यानंतर दुसरे दोन दिवसीय अखिल भारतीय अहिराणी साहित्यसंमेलन साक्री तालुक्यातील कासारे या गावी २७ व २८ फेब्रु. १९९९ रोजी प्राचार्य सदाशिवराव माळी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. चाळीसगाव येथे २५ व २६ मार्च २००० रोजी अखिल भारतीय अहिराणी साहित्यसंमेलन येथे डॉ. रमेश सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. चौथे अहिराणी साहित्यसंमेलन दि. ३ व ४ डिसेंबर २०११ रोजी नाशिक येथे महाकवी कालिदास कलामंदिरात प्रा.डॉ. सौ. शकुतंलाताई चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. पाचवे अहिराणी साहित्यसंमेलन हे ९ व १० एप्रिल २०१६ रोजी धुळे येथे अहिराणी कथाकथनकार श्री सुभाष अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. त्यानंतर मात्र आज २०२१पर्यंत संमेलनाची ही परंपरा खंडित झाल्यासारखी वाटते.

या अखिल भारतीय अहिराणी संमेलनाशिवाय दोनेक खानदेश फेस्टिव्हल्स खानदेशात पार पडलेत. खेड्यापाड्यांतून तालुकास्तरावरील काही मंडळी आपापल्या संस्थांमार्फत ग्रामीण साहित्यसंमलने घेऊन बोलीची ज्योत तेवत ठेवतच आहेत. मालेगावच्या ग्रामीण साहित्यसंमेलन समितीने आजवर दहा संमेलने घेतलीत. तर भडगाव, सिन्नर येथील मंडळानेही आजवर काही ग्रामीण साहित्यसंमेलने भरवली आहेत.

**बोलीतील नियतकालिके व वृत्तपत्रीय सदर :** या संमेलनांच्या चळवळीसोबतच अहिरीणी बोलीतून नियतकालिक सुरू करण्याच्या बाबीलाही प्रोत्साहन मिळाले. बडोद्याहून भाषा संशोधनकेंद्रातून निघणाऱ्या 'ढोल' या मासिकाच्या अहिराणी आवृत्तीचे संपादन सटाण्याचे डॉ. सुधीर देवरे यांनी केले आहे. तर कापडण्याचे श्री. रामदास वाघ यांनी २००१पासून गावशिव हे संपूर्ण अहिराणीतून निघणारे त्रैमासिक सुरू केले आहे. धुळ्याहून श्री. रमेश बोरसे हे वाणगी नावाचे मासिक चालवतात. अहिराणी लोकसाहित्याला वाहिलेले 'आखो' हे नियतकालिक मुंबईच्या महेश लीला पंडित यांनी सुरू केले आहे, तर ओरिसामधून 'लाडकी ताई' या नावाच्या मासिकाचे प्रकाशन विजयकुमार मोहपात्रा यांनी केले होते.

काही वृत्तपत्रांनी अहिराणीची सदरं प्रकाशित केली आहेत. प्रा. राजा महाजन यांचे सोनसाखळी, रमेश बोरसे यांचे अप्पान्या गप्पा, प्रा. भगवान पाटलांचे चांगभलं, आनंदा पाटलांचे चावडी, सुभाष अहिरेचं गावनं गावपन, संजीव गिरासे यांचे गणगोत, गोकूळ बागुलांचे भिकाना भाऊ, म्हणी अनुभवाच्या खाणी हे बाळासाहेब गुंजाळांचे सदर अशा प्रकारे ही अहिराणी बोलीतील सदर प्रकाशित झालीत. एवढेच नाही तर धुळे आणि जळगाव आकाशवाणीनेही अहिराणी बोलीतील कार्यक्रमांना प्राधान्यक्रम देणे सुरू केले. हल्ली तर दूरदर्शनवरही हास्यमालिकांतून अहिराणी बोलीची झलक पाहावयास मिळते. अशा अहिराणी संवादांना श्रोत्यांचा चांगला प्रतिसादही मिळतो आहे.

**दृकश्राव्य माध्यमातून बोली :** अहिराणीतून चित्रपट–निर्मितीही झाली आहे. दत्ताराम चिंचोले यांचा सटीना टाक, साजीद अन्सारी यांचा चंदन हा अहिराणी चित्रपट, योगेश कुलकर्णी यांचा मोल हा चित्रपट तर संजय गिरासे यांचा सासरवास हे प्रदर्शित झाले आहेत.

सुरुवातीचा काळ हा टेपरेकॉर्डवरील टेपचा होता. कॅसेट्स जाऊन सीडीचा जमाना आला. त्यातही ऑडिओच्याही पुढे व्हिडिओ सीडीजचा जमाना आला. पुढे कॉम्प्युटर,

इंटरनेट, मोबाइल यांचा प्रचंड वापर होऊ लागला. त्यातून व्हिडिओ क्लिप्स बनवणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली. एमपी थ्री, सीडी, व्हिसीडीऐवजी यूट्यूब, लाइव्ह फेसबुक व्हिडिओ यांचा वापर प्रचंड होऊ लागला. अहिराणीतून वेबसाइट अन् मोबाइल ॲप्स होऊ लागले आहेत. व्हाटसॲप ग्रुप्स अन् फेसबुक ग्रुप व पेजेस यांचा तर खानदेशात सुळसुळाट झालेला आहे. अहिराणी बोलीतून व्हिडिओज, यूट्यूब बनविण्याचा वेग हा दिवसाकाठी ८/१० असा आहे. या निर्मितीचा विचार केला तर हा मराठीहून अधिकचा वेग आहे. खानदेशी रेडिओ हे मोबाइल ॲप, खानदेश वाहिनी हे ॲप सुरू झालेत. व्हाट्सॲप व फेसबुकवर असंख्य पाने व गट तयार झालेत. यात सदस्यांची संख्याही कोटीच्या घरात आहे.

महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठांतून आजवर अनेकांनी अहिराणी किंवा खानदेशाच्या बोलीवर, तिच्या लोकसाहित्यावर संशोधनाचे कामही केले आहे व पीएच.डी. ही उपाधीही प्राप्त केली आहे. अहिराणीवर लेखन, भाष्य, चिंतन करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. त्यात प्रामुख्याने कृ.पा. कुळकर्णी, दा.गो. बोरसे, विजया चिटणीस, तोताराम चोपडे, नारायण चौधरी, अनिल सहस्रबुद्धे, सूर्यवंशी शामराव, पांडुरंग जोशी, रमेश सूर्यवंशी, शशिकांत पाटील, उषा सावंत, सुधाकर चौधरी, सुधीर देवरे, फुला बागूल, म.सु. पगारे, संजीवकुमार सोनवणे, कैलाश सार्वेकर, शं.क. कापडणीस, बापूराव देसाई, जीवन जगदाळे, सयाजी पगार, दिलीप धोंगडे, शशिकला चव्हाण, रामदास वाघ, नि.रा. पाटील, कृष्णा पाटील, सदाशिव सूर्यवंशी, सुरेश पाटील, बापू हटकर, इ. अशा अनेक नावांचा उल्लेख करता येईल. अहिराणी बोलीतून लिहिणाऱ्या कवींची, अहिराणी कथाकथन करणाऱ्यांची संख्या ही खूप मोठी आहे. आता अहिराणी बोलीतून सारेच वाङ्मयप्रकार हाताळले जात आहेत.

आता ही अहिराणी बोली आहे तरी कशी? या बोलीची भाषिक वैशिष्ट्ये थोडक्यात समजावून घेऊ–

**अहिराणीचा स्वनविचार :** खानदेशातील खानदेशी या बोलीच्या बागलाणी, भिल्ली, लाडसिक्की, खालल्यांगी, तप्तांगी, गुजरी, परदेशी अशा विविध प्रादेशिक आणि सामाजिक प्रभेदांचा खानदेशभर सर्रास वापर होत असला तरी त्यांची स्वनव्यवस्था ही मध्यवर्ती अहिराणीहून फारशी भिन्न नाही. खानदेशीचे स्वनिमव्यवस्था प्रमाणमराठीशी जुळते असले तरी मराठीप्रमाणे दन्त्य व तालव्य स्पर्शसंघर्षी ध्वनीमध्ये खानदेशीत मराठीइतका व्यतिरेक सांभाळला जात नाही. हे ध्वनी मुक्तपरिवर्तनशील असलेले आढळून येतात. त्याचप्रमाणे खानदेशीच्या काही प्रभेदात मूर्धन्य नासिक्य /ण्/ अणि मूर्धन्य पार्श्विक /ळ/ यांचा वापर होत असला तरी अधिकांश भाषिकांमध्ये त्याचा आढळ होत नाही. या स्वनिमांची जागा /न्/ आणि /य्/, /ड्/ या स्वनिमांनी घेतलेली आढळते. खानदेशीच्या विविध प्रभेदात दन्त्य व तालव्य संघर्षी स्वनिमांमधील व्यतिरेकही सांभाळला जात नाही.

**स्वरव्यवस्था :** खानदेशी बोलीत एकूण सहा स्वर आहेत. त्यांच्या संरचनेमध्ये १) जिभेच्या स्थितीयोगे येणारा व्यतिरेक २) जिभेच्या उंचीयोगे येणारा व्यतिरेक दोन प्रकारचा व्यतिरेक सांभाळला जातो. या बोलीमध्ये ओष्ठ्य वर्तुलन व्यतिरेकी नाही. पश्चस्वर हे नेहमी वर्तुलित तर अन्य स्वर हे अवर्तुलित असतात. स्वनिकदृष्ट्या /अ/, /आ/ हे स्वर समवर्ती स्वरांपेक्षा निम्नतर आहेत. स्वरांची दीर्घता मराठी प्रमाणे स्वनिमिक नाही. स्वनिकदृष्ट्या स्वर हे ऱ्हस्व किंवा दीर्घ असे असू शकतात. हे ऱ्हस्वत्व किंवा दीर्घत्व शब्दांच्या अवयवांचा आकार व प्रकार (syllable) यांवर अवलंबून असते. या बोलीमध्ये अनुनासिकत्व हूंकारात्मक शब्द सोडले तर क्वचितच आढळून येते. लाडसिक्की बोलीत मात्र अनुनासिकत्व व्यतिरेकास कारणीभूत होतो आणि चित्पावनीप्रमाणे प्रत्येक शब्दात एकतरी नासिक्य वर्ण असतो. याशिवाय शुद्ध बोलण्याच्या प्रयत्नातही इतर बोलीतही हे अनुनासिकत्व मुद्दाम आणण्याचा प्रयत्न केला जातो.

**व्यंजनव्यवस्था :** खानदेशातील बोलीच्या शब्दामध्ये ३४ व्यंजन स्वनिम आढळतात. त्यांपैकी १४ महाप्राणयुक्त आहेत. स्पर्श व स्पर्शसंघर्षी ध्वनीच्या बाबतीत घोषत्व हे व्यतिरेकी आहे. नासिक्य, पार्श्व, कंपित आणि अर्धस्वर हे नेहमी सघोष असलेले आढळतात. संघर्षी स्वनिम अघोष आहेत– स्पर्श आणि स्पर्शसंघर्षी ध्वनीशिवाय नासिक्य /न्ह/, /म्ह/, कंपित /ऱ्ह/, अर्धस्वर /व्ह/ हे महाप्राणयुक्त स्वनिम आहेत. ओष्ठ्य ध्वनीमध्ये स्पर्श व नासिक्य हे द्वयोष्ठ्य आहेत. तर अर्धस्वर दन्त्योष्ठ्य आहेत. दन्त्यस्पर्शी हे जिव्हाग्राने वरच्या दातांशी संयोग होऊन उच्चारले जातात. परंतु मूर्धन्य ध्वनीच्या सान्निध्यात त्यांचे स्थान दंतमूल आहे. दन्त्य नासिक्य /न्/ हे तालव्य ध्वनीपूर्वी तालव्य व मूर्धन्य ध्वनीपूर्व मूर्धन्य उच्चारले जातात. /ल्/ चा उच्चार महाप्राणयुक्त ध्वनी /ल्ह्/ लेवा पाटीदार, बागलाणी या

बोलीत आढळतो. प्रमाण मराठीतील /ष्/ हा मूर्धन्यसंघर्षी स्वनिम या बोलीत नाही. क्वचित मूर्धन्यस्पर्शापूर्वी त्याचे उच्चारण केले जाते. शिक्षितांच्या बोलीत व काही प्रभेदांत याचा वापर आढळतो. (जसे- चाष्टी, नाष्टा, काष्टा, उष्टा). बागलाणी, लेवा पटीदार वा लाडसिक्कीखेरीज /ळ/ चा आढळ होत नाही. प्रमाण मराठीतील /ळ/ चे खानदेशातील /य्/ किंवा /ङ्/ या स्वनिमांशी सादृश्य आढळते. मृदूतालव्यकंठ्य ध्वनीपैकी /ङ्/ हा ध्वनी शब्दांच्या मध्यस्थानी समवर्गीय स्पर्शध्वनीच्या पूर्वी येतो. तरीपण मृदूतालव्य स्पर्शापूर्वी /न्/आणि /म्/ हे नासिक्य ध्वनी येत असल्याने /ङ्/ ची गणना स्वतंत्र स्वनिमांमध्ये केलेली आहे.(उदा. चांङ्गी, सारङ्ग, आङ्गन मांङ्वे इ.

खानदेशी बोलीत दन्त्य आणि तालव्य स्पर्शसंघर्षी स्वनिमांमध्ये मराठीप्रमाणे व्यतिरेक आढळून येत नाही. दोन्ही प्रकारच्या स्पर्शसंघर्षी ध्वनीचे मुक्त परिवर्तन होत असताना दिसते.

वारंवारितेच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास ठ्, छ्, झ्, न्ह्, म्ह्, ऱ्ह् आणि व्ह् हे स्वनिम फारच थोड्या शब्दांमध्ये आढळून येतात. याशिवाय स्वनिमांचे वितरणही सीमित आढळून येते. /ङ्/ हा आद्य व अंत्यस्थानी आढळत नाही.

शब्दांच्या अंत्यस्थानी महाप्राण ध्वनीचे उच्चारण अल्पप्राण करण्याची प्रवृत्ती आढळते. उदाहरणार्थ ख्, ठ्, थ्, ध्,फ्,भ् हे महाप्राणध्वनी अंत्यस्थानी अनुक्रमे क्, ट्, त्, द्, प्, ब् असे अल्पप्राण उच्चारले जातात. छ्, ह्,ऱ्ह्,व्ह् हे अन्त्यस्थानी आढळत नाहीत.

पारोळा, एरंडोल, भडगाव तालुक्यातील बोलीला काही भागात खाल्यांगनी (पश्चिम दिशेकडील) बोली म्हणून संबोधतात. येथील बोलीत तालव्य स्पर्शसंघर्षी व्यंजनांचा आढळ होतो. त्याच शब्दातील च्, ज्, छ्, झ् या व्यंजनांचे उच्चारण इतरत्र दन्त्यस्पर्शसंघर्षी आढळते. अर्थात तालव्य स्पर्शसंघर्षी आणि दन्त्यस्पर्शसंघर्षी यात व्यतिरेक आढळत नाही.

रावेर, भुसावळ, सावदा या परिसरात लेवा पाटलांच्या बोलीच्या संपर्कात आणि अहिराणी बोलीच्या संपर्कात असणारे /स/ वा /श/ चा /छ/ करताना आढळतात तर /य/ वा /ड/ चा /ळ/, /न/ चा /ण/ करताना आढळतात. जसे छानं-सानं, बछी - बसी / बशी, छाताळ - शातडं/छातडं, परसाकळे-परसाकडे, पाखळणे-पाखडनं इ.

**नामव्यवस्था :** अहिराणी बोलीत स्वरान्त नामे व व्यंजनान्त नामे आढळतात. नामांमध्ये पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग यांचा आढळ होतो. नामांच्या वचनांचा विचार करता एकवचनी नामे, बहुवचनी नामे, आणि वचनभेद निरास असे नामांचे तीन गट पडतात. नामांचे वाक्यांतील कार्य दाखविण्यासाठी संबंधदर्शक प्रत्यये लागत असून त्यात विभक्ती प्रत्ययांचा आणि शब्दयोगी अव्ययांचा समावेश होतो. असली संबंधदर्शक प्रत्यय लागताना काही नामांचे सामान्य रूप होते. या बोलीत एकवचनी स्वरान्त पुल्लिंगी नामांचे शेवटी आ, इ, उ, किंवा ओ हे स्वर येऊ शकतात. एकवचनी स्वरान्त स्त्रीलिंगी नामांच्या शेवटी अ, इ, उ, किंवा ओ स्वर येवू शकतात. तर एकवचनी स्वरान्त नपुंसक नामांच्या अंती अ, इ, उ किंवा ए हे स्वर येऊ शकतात. अहिराणी बोलीत नामांचे एकवचन आणि बहुवचन किंवा अनेकवचन हे होते.

काही पदार्थवाचक नामांचे पुल्लिंगरूप आकारान्त, स्त्रीलिंगरूप इकारान्त असते. या पदार्थवाचक लिंगभेदातून त्या पदार्थाचे लघुत्व आणि गुरुत्व यांचे दिग्दर्शन होते. जसे-लोटा-लोटी, चिमटा-चिमटी, नाडा-नाडी, हातोडा-हातोडी.

**विभक्ती प्रत्यय :**

अहिराणी बोलीत नपुंसकलिंगी एकवचनी अकारान्त आणि एकरान्त नामांचे सामान्यरूप आ तर नपुंसकलिंगी एकवचनी उकारान्त नामांचे सामान्यरूप हे शून्य प्रत्यय लागून होते. तर इतर एकवचनी पुल्लिंगी व एकवचनी स्त्रीलिंगी नामांना शून्य हा संबंधपूर्व प्रत्यय लागतो. म्हणजे पारंपरिक व्याकरणात सांगावयाचे झाल्यास त्याचे सामान्यरूप होत नाही.

मात्र अनेकवचनात पुल्लिंगी, स्त्रीलिंगी आणि नपुंसकलिंगी नामांना विभक्ती प्रत्यय किंवा शब्दयोगी हे संबंधदर्शक प्रत्यय जोडण्यापूर्वी (सामान्यरूप करताना) /स/ हा संबंधपूर्वप्रत्यय लागताना दिसतो.

या बोलीतील विभक्ती प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत.

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | - | - |
| द्वितीया | ले,से,शे | ले,से,शे |
| तृतीया | नी,न्ही,कन,कडथीन, वरी,घै, घाई घै,घायी | नी,न्ही,कन,कडथीन, वरी,घै,घाई घाई |
| चतुर्थी | ले,से किंवा शे | ले, से किंवा शे |
| पंचमी | तीन,थीन,थाईन,थून, पान,पाईन | तीन,थीन,थाईन,थून, पान,पाईन |

| | | |
|---|---|---|
| | पाइन,पान | पान,पाइन |
| षष्टी | नं,ना,नी,न्हं,न्हीन,न्या | नं,ना,नी,न्हं,न्हीन,न्या |
| सप्तमी | मा,मं,म्हान,म्हजार, मझार | मा,मं,म्हान,म्हजार, मझार |
| संबोधन | रे,वं | वं,व्ह,वन,व्हन |

**शब्दयोगी (संबंधदर्शक प्रत्यय) :** नामांना व नामांचे कार्य करणाऱ्या इतर शब्दांना शब्दयोगी जोडून येतात. ते जोडण्यापूर्वी त्या नामांना संबंधपूर्व प्रत्यय (सामान्यरूप प्रत्यय) जोडला जातो. हे संबंध पूर्व एकवचनात पुल्लिंगी, स्त्रीलिंगी नामात शून्य प्रत्यय तर नपुंसकलिंगी नामांना शून्य किंवा आ प्रत्यय लागतो तर अनेक वचनात तीनही लिंगात /स/ हा संबंधपूर्व प्रत्यय लागतो. शब्दयोगीचे अर्थानुसार कालवाचक, स्थलवाचक, करणवाचक, हेतूवाचक, तुलनावाचक, व्यतिरेकवाचक, योग्यतावाचक, संबंधवाचक, सहचार्यवाचक, भाववाचक, विनिमयवाचक, विरोधवाचक इ. गटात विभाजन करता येईल.

**सर्वनामव्यवस्था :** संख्येने सर्वनाम ही मर्यादित असूनही अर्थदृष्ट्या नामांपेक्षा व्यापक आहेत. सर्वनामांना संबोधन हा विभक्तीचा प्रत्यय सोडला तर इतर विभक्ती प्रत्यये नामांप्रमाणेच लागतात. त्याचप्रमाणे शब्दयोगी प्रत्ययेसुद्धा सर्वनामांना लागतात. हे लागण्यापूर्वी सर्वनामांनाही लिंगवचनानुसार शून्य किंवा /स/ हा संबंधपूर्वप्रत्यय लागतो. मात्र असे प्रत्यय लागण्यापूर्वी सर्वनामांच्या रूपात अंतर्गत बदल होतात. या बोलीत एकवचनी आणि अनेकवचनी सर्वनामे असून आदरार्थी एकवचनी सर्वनामे आणि अनेकवचनी सर्वनामे ह्यांची रूपे सारखीच ओहत. प्रथमपुरुष आणि द्वितीयपुरुष या सर्वनामांची लिंगभेदानुसार वेगळी रूपे नाहीत. सर्वनाम जशीच्या तशी प्रत्ययाशिवायही येऊ शकतात. पण प्रत्ययासह ही सर्वनामे येताना त्या सर्वनामांच्या रूपात अंतर्गत बदल होतात.

**विशेषणव्यवस्था :** अहिराणी बोलीत विकारी विशेषणे आणि अविकारी विशेषणे आढळतात. गुणदर्शक विशेषण हे नामापूर्वी किंवा क्रियापदापूर्वी येऊ शकते. नामांपूर्वी येणारे हे नामपूर्वविशेषण किंवा अधिविशेषण आणि नामांतर किंवा इतरत्र येणारे हे नामोत्तर विशेषण म्हणून गणले जाते. या बोलीत सिद्ध विशेषणे आणि साधित विशेषणे हे दोनही प्रकार आढळतात. विशेषणांचे गुणदर्शक विशेषण, संख्यावाचक विशेषण, सर्वनामात्मक विशेषण आणि स्वामित्वदर्शक विशेषण हे प्रकार आढळतात.

विकारी विशेषणावर नामाच्या किंवा नामाचे कार्य करणाऱ्या शब्दाच्या लिंगवचनाचा विकार होतो. पुल्लिंगी, स्त्रीलिंगी, नपुंसकलिंगी या नामांसह येणारे विशेषणाचे रूप हे त्याच्या लिंगवचन यानुसार असते. पुल्लिंगी नामांसह येणारे विकारी विशेषण ही दोनही वचनांत अकारान्त आढळतात. तर स्त्रीलिंगी नामांसह येणारी विकारी विशेषणे हे एकवचनात इकारान्त तर अनेक वचनात अकारान्त आढळतात. नपुंसक लिंगी नामांसह येणारी विकारी विशेषणे ही एकवचनात अकारान्त तर अनेकवचनात आकारान्त आढळतात. विकारी विशेषणे ही स्वरान्त असतात. अनेकवचनी नामांसह विकारी विशेषणे ही अकरान्त असतात. एकवचनात या विकारी विशेषणांचे पुल्लिंग, स्त्रीलिंग व नंपुसकलिंग यानुसार अनुक्रमे आकारान्त, इकारान्त अणि अकारान्त असे रूप आढळते.

अविकारी विशेषणे ही व्यंजनात किंवा स्वरान्त असतात. या विशेषणांवर लिंगभेद किंवा वचनभेद यांचा परिणाम होत नाही. सर्वत्र या अविकारी विशेषणाचे रूप सारखेच राहते. विशेषणांची सिद्धीचा विचार करता सिद्ध विशेषणे ही मूळचीच विशेषणे असतात. मात्र साधित विशेषणे ही रचनेनुसार उपसर्गघटित साधित विशेषणे आणि प्रत्ययघटित साधित विशेषणे अशा दोन गटात आढळतात.

**क्रियापदव्यवस्था :** क्रियापदातील मुख्य रुपिम क्रियाधातू होय. हे विकारी असतात. क्रियाधातू हे सिद्ध किंवा साधित असतात. क्रियाधातूंवर पुरुष, वचन, लिंग, काळ, अर्थ, क्रियाव्याप्ती, प्रयोग या व्याकरणिक कोटीचा विकार होऊ शकतो. धातूंना लिंग, वचन, पुरुष, काळ, अर्थ व क्रियाव्याप्ती यांचे प्रत्यय लागून क्रियापदे सिद्ध होतात. ही पदे वाक्यात प्रधान विधेय म्हणून वापरली जातात व कर्तरी प्रयोगात कर्त्याशी तर कर्मणि प्रयोगात कर्माशी अन्वयसंबंध ठेवतात. धातूंना साधित प्रत्यय लागून कृदन्ते तयार होतात. या प्रकारची पदे वाक्यात गौण विधेये म्हणून वापरली जातात.

क्रियाधातूंचे सकर्मक क्रियाधातू अणि अकर्मक क्रियाधातू असे दोन गट पडतात. क्रियाधातूंना साधक प्रत्यये लावून किंवा त्या धातूंत आंतरिक बदल घडवून त्या धातूंचा वर्ग बदलता येतो. सकर्मक धातूंचे अकर्मक धातूत तर अकर्मक धातूचे सकर्मक धातूत किंवा अकर्मक धातूचे प्रयोजक क्रियापदात परिवर्तन साधक प्रत्ययामुळे होऊ शकते.

प्रयोजक क्रियाधातू हे सकर्मक क्रियापद-धातू आणि अकर्मक क्रियापद-धातू यांना आड् किंवा आव् प्रत्यय लागून

सिद्ध होतात. क्रियाधातूंची अक्षरव्यवस्था पाहता खानदेशी बोलीतील बहुतांश क्रियापद धातू हे व्यंजनान्त आहेत. परंतु काही सकर्मक आणि अकर्मक धातूंच्या अंती आ, इ, उ, ए हे स्वर येतात. अशा धातूंची संख्या फारच मर्यादित आहे.

**खानदेशी बोलीचा शब्दसंग्रह :** अहिरांचा अन्य भाषिकांशी संबंध आला. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न असणाऱ्या लोकांशी सतत संपर्क आला. सामाजिक व राजकीय स्थित्यंतरे आणि सांस्कृतिक व शैक्षणिक देवाण-घेवाण या सर्वांमुळे अहिराणी बोलीचा शब्दसंग्रह हा वाढत गेला. मराठी, गुजराती, फार्सी, तुर्की, इंग्रजी आदी शब्दांची भर पडत गेली. स्वतःच्या शब्दसंग्रहाबरोबरच स्वीकारलेले शब्द बोलीत चपखलरित्या एकरूप झाले आहेत.

आठे, तठे, जोयजे, बस्तरवार, डिक्रा या गुजरातीच्या लकबी या बोलीतील आन्डोर, शाक, साक्रू, गोखलं, सानं, साटा, कावड, झोऱ्या इ. शब्दांसह सर्रास वापरल्या गेल्यात. वसरी, खवाटा, झाड, डोंगर हे देशी शब्द तर उसय, गध, मिरोनूक, आच्छेर, बरड, हूडा, बोनं, गुध इ. कानडी शब्द यादवकाळातील कानडी भाषेच्या संपर्कामुळे येणे सहजशक्य झाले. मुलांच्या विटीदांडूच्या खेळातील वखत, लेन्ड, मूंड, नाल, आबित आर इ. शब्द हे तेलगू भाषेतील आहेत असे कुणाला जाणवतही नाही. खानदेशातील मुसलमानी अमलामुळे मुसलमानीत आधीच हजर असलेले अरबी, फार्सी आणि तुर्की शब्द मुसलमानीतून सहज अहिराणीत आलेत. कमजोर, कमर, कलंदर, खाक, तमाशा, नापाक, दगा, बर्बाद, बाग, बार्दान, बिल्कूल इ. हे फारशी शब्द आहेत. तर मजल, मत्लब, मनोरा, मर्जी, रगड, राजी, वहीम, मुर्वत, मालूम हे अरबी शब्द आहेत. वार, साबूदाना, बटाटा, तिजोरी, पगार, साबू, जल्दी, देस, जागा, सामान, तारीक, सवाल, फालतू हे पोर्तुगीज शब्द आहेत, असेही कुणालाही भासत नाही. एवढे ते या बोलीत एकरूप झाले आहेत. तसेच इंग्रजी अमलामुळे आधीच प्रचलित असलेल्या इंग्रजी शब्दांत आता टी.व्ही. शिक्षण यामुळे भरच पडत आहे. मास्तर, सर, टेबल, मोटार, कोर्ट, तिकिट, डागतर, मनिआडर, फेसन, टेसन इ.

या शिवाय आदानप्रक्रियेमुळेही अहिराणी / खानदेशी बोलीचा शब्दसंग्रह हा वाढतच गेला. उपरोक्त शब्दादानाची उदाहरणे आपण पाहिलीतच. रूपांतरादान, संमिश्रादान, उच्चारणादान, व्याकरणादान, आत्मसातीकरण इ.मुळे शब्दसाठा हा वाढत गेला. इंग्रजी ट्रंकचा आपण टरंग केला. डॉक्टरचा दागतर केला. फारसी प्रत्यय मराठीतून वा मुसलमानीतून अहिराणीत आलेत. दार अणि गी हे प्रत्यय- जमीनदार, कामदार, भागीदार, चवदार, परवानगी, खाजगी, पोटगी, देणगी, केवळ फारशी शब्दांपुरते मर्यादित राहिले नाहीत. व्याकरणादानाने ते अहिराणीलाही मिळतील. संमिश्रादानात दोन किंवा अधिक भाषेतील समानार्थी शब्द एकत्र केले गेलेत. पावरबाज, टाइमशीर, येवखत, टापम्हा, नकपालीस, पायसिकल, टायमोटाइम इ.

**- डॉ. रमेश सीताराम सूर्यवंशी**

## अहिरणी बोलीभाषेतील बालकवितासंग्रहाचे, साधना लाळे यांनी अहिरणी भाषेतूनच लिहिलेले पुस्तक परीक्षण-एक प्रयोग

'मन्हा गावले' हाऊ कवी आबा गोविंदा महाजन ह्यास्ना बालकवितासंग्रह मन्हा हातमा शे. या संग्रहना प्रकाशक शेतस दिलीपराज प्रकाशन, पुणे. पुस्तकनं चित्र, मांडणी, मुखपृष्ठ बठ्ठ सरदार जाधव या नावाजेल चित्रकारन शे. हाई पुस्तक हातमा लिसन माले वाटणं, मी मनोमनमा खान्देशमा, मन्हा गावले गऊ. मन्हा अहिराणी भाषा बोलेत त्या मित्र मैत्रिणीस्मा बठेल शे. मना हातमा खान्देशनी माटी शे. हवा शे. आम्हाना खान्देशी लोकं मनना भलता धवया पाक शेतस. आबास्नी हाऊ संग्रह अहिराणी भाषाले अर्पण करेल शे. आपली बोलीभाषा टिकी ऱ्हावाले जोयजे अस आपू म्हणतस. त्याना करता ती पुढला पिढीले, छोटा पोरसले, काल दिनना भावी पिढीना मनमा रुजवनी पडी. त्यासले आपली भाषानं महत्त्व मालूम शे. आबास्नी प्रत्येक कविताना खाले अहिराणी शब्दसना अर्थ देल शेतस. वाचिसन, त्या कवितास्ना आनंद लेतीन.

**सौजन्याने : तरुणभारत (जळगाव)**



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# सोलापुरी बोलीची वैशिष्ट्ये

डॉ. राजशेखर शिंदे

**सोलापुरी मराठी बोलीत व हिंदी, कन्नड, तेलगु बोलीत महत्त्वाकांक्षेचा स्वर क्षीण जाणवतो. महत्त्वाकांक्षा असेल तर व्यक्तीजीवनाला वा समाजजीवनाला गती मिळालेली असते. ते चापल्य सोलापुरी बोलीत नाही. सामाजिक व सार्वजनिक प्रश्नांची कमालीची सोशिकता जाणवते. बोलीत अभिसरण संसर्गासारखे असते. जलद गतीने सामान्य मनात विशेष समज रुळून जातात.**

**प्रस्तुतच्या** लेखात सोलापूर शहरातील बोलीची वैशिष्ट्ये शोधण्याचा प्रयत्न केला आहे. भाषाशास्त्रीयदृष्ट्या विचार करता सोलापुरी बोलीभाषा ही स्वतंत्र बोली ठरत नाही. कारण सोलापुरी बोलीची मराठीच्या प्रमाणभाषेहून वेगळी भाषिक रूपं सिद्ध झाली नाहीत. बोलीत ध्वनिपरिवर्तन आणि अर्थपरिवर्तन या दोन महत्त्वाच्या बाबी असतात. स्वतंत्र बोली होण्याकरिता शब्दाचे स्वतंत्र रूप, अर्थरूप, औच्चारिक रूप सिद्ध व्हावे लागते. कोणत्याही बोलीचे रूप तिच्या प्रमाणभाषेहून दुसऱ्या भाषेइतके वेगळे नसते. असा वेगळेपणा सोलापुरी बोलीत नाही. सोलापुरी बोलीत प्रमाणभाषा रूपातीलच काही वैशिष्ट्यपूर्ण रूपे घडलेली जाणवतात त्याचे स्वरूप कसे ते पाहू.

**सोलापूरची समाजव्यवस्था** : सोलापूर हे गिरणगाव म्हणून प्रसिद्ध होते. भोंग्याच्या आवाजावर १९८५पर्यंत सोलापूरचा व्यवहार होत असे. सोबत जिल्ह्याचा शेती हाच मुख्य व्यवसाय. गिरण्यांसाठी प्रशिक्षित किंवा अशिक्षित कामगारवर्ग मोठ्या प्रमाणात लागायचा. तो शेजारच्या कर्नाटक आणि आंध्रप्रदेश राज्यातून मिळे. ही राज्ये सोलापूरला लगत आहे. त्यामुळे १८व्या शतकापासून तेथील लोक सोलापुरात कामधंदा आणि सुरक्षिततेच्या भावनेपोटी आले.

सोलापूर बहुभाषिक शहर आहे. हिंदू, मुसलमान, साळी, बौद्ध, ख्रिश्चन, सावजी, जैन असे धर्मपंथाचे लोक सोलापुरात आहेत. सोबतच पारधी, कैकाडी, लमाण, ग्वल्ल, भिल्ल, वैदू, कुडमुडे असे भटकेही स्थिरावलेले आहेत. हे सर्व लोक आपापल्या भाषासंस्कृतीसह राहतात. मराठी, कन्नड, हिंदी, तेलुगू या भाषा मोठ्या प्रमाणात तर गुजराथी, इंग्रजी, पारशी याही भाषा काही प्रमाणात बोलल्या जातात. शिवाय सावजी, कैकाडी, भिल्ल यांच्या बोलीही आहेत. या सर्वांचा मराठीशी संपर्क अपरिहार्यपणे होतोच. यातून मराठीची वैशिष्ट्यपूर्ण रूपं ऐकावयास येतात.

**१) अनादरकारक नपुंसकलिंगी रूपे** : बोलीत मराठी प्रमाणभाषेची उपभ्रष्ट रूपे वापरली जातात. सर्वनामांची एकाक्षरी रूपे द्व्याक्षरी आदर आणि अनादर अशा दोन्ही रूपात योजली जातात.

हा - ह्यनं - अनादर, एकवचनी, ह्यनी - आदर, अनेकचं एकवचनी रूप

तो - त्यनं - त्येनी - एकवचनी, अनादर, त्यवनी अनेकवचनी आदरयुक्त त्योनी, त्यवनला अशी अनेकवचनी रूप

ती - तिनं एकवचनी, तनी - स्त्रीवाचक अनेकवचनी

ते - तनी - त्यनी, तेंला/तेन्ला, आदरार्थी

ही - हीनं, एकवचनी, ह्यवनी अनेकवचनी आदरार्थी

अशी सर्वनामी मजेदार रूपे सोलापुरी मराठी भाषेत आहेत. नामोल्लेख न करता सर्वनामांची नपुंसकलिंगी खडा मारण्याची कला सोलापुरी बोलीत आहे! उदा. 'ह्यबग हे अलं!', 'त्येबक ते आलं!', 'त्यबक ती जलं!' अशा दर्शक सर्वनामांचा वापर करून येणाऱ्याचा न्यूनत्वबोधक उल्लेख हमखास केला जातो. कधी कधी अप्रियता,

हिणकस यांचेही सूचन अपभ्रष्ट सर्वनामांतून केले जाते. 'त्येबक ते तित् पडलंय!', 'त्यबकऽऽ तितऽऽ पडलाय!'

एकवचनी सर्वनामी रूपांचे 'हे', 'ते', 'ह्यबक', 'त्यबक' अशी नपुंसकलिंगी रूपे तयार झाली आहेत. 'आले'चे आलं-अलं असे अकारांत रूप करून नापसंती वा अधिक्षेप दर्शविला जातो.

**२) क्रियापदांची संयुक्त रूपे** : भाषेच्या शुद्धाशुद्ध विवेकात शब्दांती स्वनांतराचा स्पष्टोच्चार होतो. प्रमाणभाषेत उच्चारांचे नियमन असते; परंतु बोलीत उच्चाराचे नियमन नसते. त्यामध्ये मुक्तस्वातंत्र्य असते. हे स्वातंत्र्य अबाधित राहिले तर कालांतराने बोली उच्चार व अर्थपरिवर्तन होऊन बोली प्रमाणभाषेपासून वेगळी चूल मांडू लागते. कोकणीचे तसे झाले.

औच्चारिक दृष्ट्या सोलापुरी उच्चारस्वातंत्र्यात संयुक्त क्रियापद तयार करते. क्रिया-कर्म आणि क्रियापद यांचे संयुक्त रूप पाहायला मिळते. उदा. अल्ता, गेल्ता, अल्ती, गेल्ती, जेव्लो, जेव्ल्ये, हन्ला, फेक्लो, झोप्लो इ. आलो होतो/नव्हतो, गेलो होतो, जेवण केले, फेकलो होतो, झोपलो होतो. अशी क्रिया आणि क्रियावाचक-क्रियाकाळवाचक क्रियापद न दाखवतो. क्रिया आणि क्रियापद संयुक्त केले जाते. कोल्हापुरी बोलीत फक्त क्रिया दर्शविली जाते. 'गेलेलो' यात पुढे क्रियापद 'होतो', 'नव्हतो' हे कोल्हापुरी बोलीत नसते.

**३) लिंगनिश्चितीमधील गोंधळ** : लिंगनिश्चितीबाबत सोलापुरी बोलीत खूप मोठा गोंधळ आहे. सजीवांच्या बाबतीत तेवढा नाही, पण वस्तूंबाबत गोंधळ आहे.चहा, कॉफी, भात या पदार्थांतला लिंगगोंधळ आहेच.

चहा - पुल्लिंगी शब्द. तो योजणाऱ्याच्या लिंगानुसार तो स्त्रीलिंगी/पुल्लिंगी होतो.

कॉफी - स्त्रीलिंगी. तो योजणाऱ्याच्या लिंगाप्रमाणे होतो.

एसटी - स्त्रीलिंगी शब्द तो स्त्रीलिंगीच वापरला जातो. पण ट्रक हा पुल्लिंग शब्द स्त्रीलिंगी रूपात वापरला जातो. कन्नड, हिंदी, तेलुगू या भाषांचा सर्रास वापर आता होत आहे. भाषाव्यवस्थापनातील ही अडचण आहे. सुघड भाषा उपयोजनाची आवड नसणे, शब्दरूपांचे अज्ञान, एकंदर भाषिक अनास्था यामुळे हा गोंधळ राहिला आहे.

**४) हेलयुक्त रूप** : बोलीत नादमधुरता असते. नादमधुरतेमुळे बोलीमधील गोडवा वाढतो. नादात लय अपेक्षित असते. लय संवेदनक्षम असते. बोली अनेक भाषांच्या संपर्कात येतात, तेव्हाच प्रमाणभाषा समृद्ध होते. या प्रक्रियेत लयीची मात्रा वाढते. मूळ उच्चारापेक्षा वाढलेल्या मात्रेच्या लययुक्त उच्चाराला हेल म्हणतात. सोलापुरी बोलीत कानडीमुळे हेल आहेत असे नाही. जर कोल्हापुरी बोलीत 'हेल'सारखी लय आहेत. 'त्यो सानी कवा आलाऽय!'

'या'ला दीर्घ करण्यात हेल जाणवतोय.

मराठीत कानडीच्या 'या'कार आणि 'उ'कारयुक्त 'उ'कारयुक्त 'ओ'कार हे अधिक आहेत. बंदिल्ला, उंडिल्ला, नितिल्ला, होगिल्ला अशी 'ल्ला'युक्त म्हणजे शब्दयोजना कानडीत मोठ्या प्रमाणात आहे. कानडीत अ, उ, आ, ऊ, यो हेलकारी रूपे आहेत. कन्नड भाषांच्या संपर्कामुळे सोलापुरी बोलीत हेलयुक्त रूपं निर्माण झाली आहेत. 'अलावंऽऽ', गेलावंऽऽ', 'जेवलावंऽऽ', 'बसलावंऽऽ', 'खल्लावंऽऽ', असे 'अ' स्वरसार उच्चार केल्याने हेल निर्माण होतात. यातूनच येकिब्बेऽऽ, जाकिब्बेऽऽ, अब्बेऽऽ, तूब्बेऽऽ 'ए'कार युक्त हेल आहेत. आलोक, गेलो, जातोऽऽ, जेवल्लो, ऱ्हतोऽऽ, इसोप्तोऽऽ अशी 'ओ'युक्त हेलपद्धतीची प्रवृत्ती दुणावत आहे.

सोलापूरचे सांस्कृतिकक्षेत्र चांगलेच आहे. पंढरपूरचे माहात्म्य माहीत आहे. मध्ययुगीन काळापासून पंढरपूरला संत वारकरी येत. त्यामुळे सोलापूरकडे वाट वळत. हे एक कारण एकोणिसाव्या शतकात नाटकमंडळी सोलापूरला खेळ करण्याकरिता येत. दीनानाथ मंगेशकरांनी नाटककंपनी काढण्याचा संकल्प सोलापुरातच सोडला होता. मराठी नाटके, मराठी सिनेमा मोठ्या प्रमाणात सोलापुरात लागत असत. नावाजलेली विद्वानमंडळी अगदी राम जोशी, शुभराय महाराज, नागेश हे सोलापुरातलेच. लोककलावंतांनी वक्तृत्वातून, कीर्तनप्रवचनांतून सोलापूरचे भाषिकमन तयार केले होते. सत्तरीच्या आणि ऐंशीच्या दशकात सोलापुरात गणेशोत्सवात आणि शारदोत्सवात चार-चार ठिकाणी मोठमोठ्या व्याख्यानमालांचे आयोजन होई. याचा चांगला परिणाम रसिकांवर होई. त्यामुळे प्रमाणभाषेपासून ती लांब गेली नाही. विश्वसमाचार, समाचार यांसारख्या वृत्तपत्रांनी भाषाप्रवृत्तीस हातभार लावला.

प्रत्येक बोलीभाषेचा एक स्वभाव तिच्या भाषकांवरून बनत असतो. कोल्हापुरात सर्वसामान्यपणे खरं की, खरंऽऽ, रांडेच्या अगदी मित्राच्या आईसमोरच किंवा मित्राच्या आईलाच रांडेचा कालपासून भेटला नाही! (त्या बिच्चारीला वाटते, या दोघांत किती प्रेम आहे!) सोलापूरच्या बोलीभाषेचा स्वभाव भाषकांनी बनला. आज त्यावरून बोलणाऱ्याचा स्वभावविशेष कळतो. सोलापूरच्या बोलीतून संथ जीवनाची कल्पना करता येते. रस्तोरस्ती 'काय कसं काय? कसं चाललंय? काय करताय/करतावं?' असं ख्यालीखुशालीची चौकशी केले जाणारे प्रश्न ऐकायला मिळतात. तेव्हा त्यावर हमखास उत्तर मिळते- 'काऽऽय नाही, हेच चाललंय!' 'काय

नाय, निवांतय(!)' हे म्हणत असतानाही जीभ जणू आत ओढली जात असावी, असंच जाणवत राहतं. काम तर करायचंच आहे. ते पाचवीला पूजलेले आहे. त्यात नवीन ते काय? रोजच काम. रोजचं काम, नवीन असं काहीच नाही. जगण्यासाठी वा जगण्यापुरतं केलं म्हणजे पुरे झालं. अशी भावना त्यामागे असते.

सोलापुरी मराठी बोलीत वा हिंदी, कन्नड, तेलुगू बोलीत महत्त्वाकांक्षेचा स्वर क्षीण असा जाणवतो. महत्त्वाकांक्षा असेल तर व्यक्ती जीवनाला वा समाजजीवनाला गती मिळालेली असते. ते आपल्या या बोलीत नाही. एरवी अबेतुबेची भाषा, अहमहमिका, हमरीतुमरी हे चित्र सर्वसामान्य असते. पण सामाजिक व सार्वजनिक प्रश्नांची कमालीची सोशिकता जाणवते.

बोलीत अभिसरण संसर्गासारखे असते. जलद गतीने सामान्य विशेष समाजमनात रूळून जातात, समाजमनच लीलया बोलीविशेषांना आपलेसे करते.

**प्रमाणभाषा व बोली** : बोली आणि प्रमाणभाषा या दोन स्वतंत्र, वेगवेगळ्या भाषा नसतात. प्रमाणभाषा म्हणून अशी भाषाच नसते. जीवनव्यवहारात विचारव्यवहार आणि भावभावनांचा व्याप व ताणतणाव व्यक्त करण्यासाठी भाषा निर्माण होते. विकसित होत असते. बोलीतूनच प्रमाणभाषा निर्माण होते. निर्माण होत असतात. बोलीलाच प्रमाणित करावे लागते.

बोली मानवी भावनांचे आणि मानवी व्यवहाराचे एक साधन म्हणून रूढ होतात. मानवी समाज ती निर्माण करतो, तिला अनेक चिन्हांद्वारे स्वीकारतो. भाषा म्हणून बोली विकसित होतात, विकसित होत राहतात. विकसनशीलता आणि परिवर्तनशीलता हा भाषेचा मूळ स्वभाव असतो. हा स्वभाव लक्षात घेऊन त्यावर काही नियमन केले, हे नियमन म्हणजेच प्रमाणभाषेचे रूप होय.

प्रमाणभाषा म्हणजे शुद्ध भाषा नव्हे. नियमांनी बांधलेली भाषा नव्हे. भाषा वापराच्या वैशिष्ट्यावरून, क्रियादर्शक रूपावरून, काळदर्शक शब्दांवरून, कारकार्थवरून, नामांवरून, शब्दयोजनेवरून व्याकरणाचे नियम तयार झाले. व्याकरणाचे नियम वेगळे आणि भाषा वेगळी असे नसतेच. त्याची भाषा, भाषेची प्रवृत्ती, त्यावरून भाषाव्याकरण. भाषेवरून भाषेचे भाषेसाठी तयार केलेले नियम म्हणजे व्याकरण. ते नियम त्याच भाषेसाठी असतात. भाषेचे नियम भाषेसाठी सारखेच असतात. परंतु भाषेनुसार रूप निराळे असते. कर्ता, कर्म, क्रियापद यांनीच वाक्य बनते. हे आगतिक, सार्वकालिक सत्य आहे. भाषेनुसार त्यांचा क्रम बदलतो. कर्ता-कर्म-क्रियापद ही मराठीची वाक्यरचना तर कर्ता-क्रियापद-कर्म ही इंग्लिश वाक्यरचना. या व्याकरणाच्या नियमांमुळे अर्थबोध होतो, भाषा शिकता येते. व्याकरणाच्या नियमामुळे, गुणधर्मामुळे भाषेतील बदल, भाषेतील परिवर्तन सांगणे शक्य होते. भाषिक प्रवृत्तीमुळे शब्दांचे अर्थपरिवर्तन व उच्चारपरिवर्तन सांगणे शक्य होते.

भाषेची परिवर्तनशीलता समजणे भाषेच्या प्रमाणीकरणामुळे शक्य झाले आहे. भाषेचे प्रमाणीकरण भाषेचा एकसंधपणा टिकविण्यासाठी महत्त्वाचे असते. महाराष्ट्रातील मराठी बोलीची प्रमाणभाषा नसती तर तिच्या अनेक बोली भाषारूपात निर्माण झाल्या असत्या. सुसूत्रित असे नियम नसती तर कोल्हापूरची बोली नागपूरच्या टोकाकडे कळली नसती, तिकडची कोल्हापूरला कळली नसती. ती प्रमाणभाषेमुळे कळते. टिकते. टिकून राहील. संस्कृत आज लोकभाषा नाही. पण प्रमाणभाषेमुळे संस्कृत वाचू शकतो. ती लोकभाषा नसतानाही टिकून आहे ते प्रमाणित असल्याने प्रमाणभाषा म्हणजे शुद्ध भाषा नव्हे तर प्रमाणभाषा म्हणजे भाषेचे संजीवक रूप. लोक बोलतात ती बोली असते. कालांतराने काही भाषांना भाषेच्या विचारवंतांनी त्या भाषेला चिन्हांकित केले म्हणजे लिपी निर्माण केली. भाषेच्या विकासाच्या अवस्थांतरणात भाषेच्या सुनियंत्रणासाठी, भाषेच्या दीर्घकालासाठी काही नियम तयार करण्यात आले.

भाषा समाजनिर्मित आहे. माणसाला ती अर्जित करावी लागते. मातृभाषा सहज-स्वाभाविकपणे अर्जित करता येते. मातृभाषा आणि परिसरभाषा या लोकबोली असतात. लोक बोलताना शब्दांचे अर्थ वस्तुवाचक, पदार्थवाचक व भावनादर्शक असतात. परिसरामुळे ते सहजच कळते. लोकांचा जीवनव्यवहार ज्ञात असतो. त्या बोलीचे नियम माहीतही नसतात. आपण लोकांची बोली बोलत असतो. समूहाची बोली बोलत असल्याने त्या बोलीच्या रचनासंकेतानुसार आपण लीलया बोलतो, त्यात अचूकता असते, बिनचूकपणा असतो. कारण बोलीचा संवाद उद्देश पूर्ण होतो.

भाषेची रचना समजून घ्यायला लागल्यानंतर रचनातंत्रे समोर येतात. वाक्यरचना दिसते. वाक्यरचनेतील शब्दरचना दिसते, शब्दरचनेच्या वेगवेगळ्या जाती दिसतात; आणि वाक्याचा काळ, काव्यप्रकार, कारकार्थ, कारकप्रत्यय या सर्व 'भाषेच्या रचनेतील' बारीक बारीक तंतू दिसू लागतात. हा झाला भाषेचा अभ्यास. या सर्व बारीक बारीक धाग्यांनी भाषक भाषा विणत जातो.

**– डॉ. राजशेखर शिंदे**



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# वऱ्हाडी बोली: काल, आज आणि उद्या

डॉ. प्रतिमा इंगोले

**वऱ्हाडातील बोली प्राकृत होती. हिलाच महारठी, मरहट्टी, महाराष्ट्री म्हणत होते. (पण गुणाढ्याचा बृहत्कथा हा ग्रंथ पैशाची बोलीत आहे.) या सर्व तेव्हाच्या प्राकृतच्या बोली होत्या. पाली भाषा ही मिश्र बोली होती. त्याशिवाय आभिरी, चांडाली वगैरे बोली होत्याच. पण प्राकृतातून ग्रंथनिर्मिती झाली ती वऱ्हाडात. आणि ग्रंथनिर्मिती झाली की भाषा स्थिरावते. तिला बोलीपेक्षा उन्नत स्वरूप प्राप्त होते.**

**इसवीसनापूर्वी** दक्षिणापथ म्हणजे दण्डकारण्य होते. ह्या दण्डकारण्यात अर्थातच अनार्य कुळे वसत होती. तेव्हा मातृसत्ताक पद्धती रूढ होती. सर्वत्र गणराण्या राज्य करीत होत्या. पण सत्ता प्रकृतीची होती आणि भाषा प्राकृत होती. काही आदिम जमातींची बोली वेगळीही होती; पण आर्यांची पहिली वसाहत विदर्भात झाली. पहिला आलेला आर्य अगस्ती, त्याचा आश्रम कुंडीर पर्वतावर होता. ह्याबद्दल इतिहासतज्ज्ञ या.मा. काळे म्हणतात, ''अगस्ती ऋषीच्या रूपाने आर्यांनी प्रथम दक्षिणेत प्रवेश केला. दक्षिणेत प्रथम आर्यांनी वस्ती केली ती विदर्भात. म्हणून दक्षिण हिंदुस्थानात सर्वात जुना देश वऱ्हाड.'' (वऱ्हाडचा इतिहास) अगस्तीची अनेक सूक्ते ऋग्वेदात आहेत. अगस्तीने विदर्भाची गणराणी लोपामुद्रा हिच्याशी विवाह केला. तिचा नामनिर्देश ऋग्वेद मंत्रात १-१७९-८ येतो. इथून संस्कृतिसंघर्ष सुरू झाला. पण ह्या प्रदेशाला वऱ्हाड (विदर्भ) म्हणत होते आणि भाषा प्राकृती होती. तर काही गोंड, कोरकू, कोलाम, भिल्ल आपापली बोली बोलत होते. ती प्राकृतोद्‌भव पैशाची बोली होती. ह्यावेळी मागधी आणि अर्ध-मागधीही बोलल्या जात होत्या. शौरसेनी भाषा मथुरेच्या आसपास बोलली जात होती. महाभारताची मूळ भाषा शौरसेनी होती. जैनांचे काही 'आगमग्रंथ' शौरसेनी भाषेत आहेत. बौद्धांचा 'त्रिपिटक' हा ग्रंथ मागधी भाषेत आहे. जैनांचा 'आचारांग सूभं' अर्धमागधीत आहे. नमोकार मंत्रही ह्याच भाषेत आहे.

वऱ्हाडातील बोली मात्र प्राकृत होती. हिलाच महारठी, मरहट्टी, महाराष्टी म्हणत होते. (पण गुणाढ्याचा बृहत्कथा हा ग्रंथ पैशाची बोलीत आहे.) ह्या सर्व तेव्हाच्या प्राकृतच्या बोली होत्या. पाली भाषा ही मिश्र बोली होती. ह्याशिवाय आभिरी, चांडाली वगैरे बोली होत्याच. पण प्राकृतातून ग्रंथनिर्मिती झाली ती वऱ्हाडात. आणि ग्रंथनिर्मिती झाली की भाषा स्थिरावते. तिला बोलीपेक्षा उन्नत स्वरूप प्राप्त होते. तत्पूर्वी इथल्याच प्राकृत बोलीवर संस्कार करून संस्कृत तयार झाली. ती धार्मिक कार्यासाठी तयार केल्यामुळे तिला गिर्वाण भाषा अथवा देववाणी म्हणत होते. त्यामुळेच संस्कृतमध्ये आणि वऱ्हाडातील बोलीमध्ये अथवा ऋचातून आलेल्या शब्दांमध्ये साम्य आढळते. काही शब्दांवरून हे स्पष्ट होते.

१) उपरास (१०-१५-२), उपरचा (नंतरचा), २) सिचा (१०-१८-११), सेव (पदर), ३) इर (९-८७-१), इराकत (लघवीला जाणे), ४) रंघ्या (४-१-३), रेंघी (छोटी बैलगाडी), ५) वाश्रा (१-३७-१०) वासरू, ६) उर्वर (८-९१-६) वावर, ७) आणि (५-४३-८) अणी (टोक), ८) वरत्रा (४-५७-४), ९) वारती (चामड्याचा दोर), १०) षाट (१-६३-३) छाट (कापून काढणे) इत्यादी मराठी भाषेची मूळपीठिका या पहिल्याच प्रकरणात वि.ल. भावेही म्हणतात, ''अजून मराठीत असे पुष्कळ शब्द आहेत की, ज्यांचा संबंध संस्कृतशी जोडता येणे कठीण आहे. उदा. डोळा,

पोट, हाड, वाट, आई, बाप, दोरी, थेंब, गवत, तसेच दिंडी, ओवी वगैरे छंदही अस्सल देशी आहेत. ते मूळचे येथलेच जन्मलेले, येथल्या मूळच्या लोकांच्या तोंडचे दिसतात. त्यांचा उगम संस्कृतशी लावता येणार नाही. या व असल्या अनेक कारणांवरून 'मराठी' ही भाषा स्वतंत्रपणे मूळची येथीलच.'' (महाराष्ट्र सारस्वत ५-६) म्हणजेच वऱ्हाडातील. कारण ''एवढेच नव्हे तर ऋग्वेद सर्वात प्राचीन ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाचे दुसरे मंडळ सर्वात प्राचीन असून त्यापासून ऋग्वेदाची सुरुवात मानली जाते. ह्या ऋग्वेदातील दुसऱ्या मंडळाचा रचयिता गृत्मसद ऋषी विदर्भातील आहे.'' (वऱ्हाडी लोकभाषा आणि संस्कृत भाषा आणि जीवन वर्ष ३३ अंक-३ भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे येथे १९।४।२००५ला वाचलेला निबंध) विशेष म्हणजे गृत्समद अनार्य होता. ह्याचा अर्थ ऋग्वेद काळातही अनार्यांचा प्रभाव होता. ते विदर्भातील होते आणि येथील लोकभाषेतच बोलत होते. म्हणूनच सुरुवातीच्या ऋचा प्राकृतप्रचूर आहेत.

डॉ. प्र.रा. देशमुख-सिंधुसंस्कृती ऋग्वेद व हिंदू संस्कृती या ग्रंथात म्हणतात, ''ऋचांचे सूक्ष्म निरीक्षण केले असता असे आढळून येईल की, सुरुवातीच्या ऋचा जास्त प्राकृतप्रचूर झाल्या आहेत.'' ह्याचाच अर्थ संस्कृत ही इथल्या बोलीनंतरची व तिच्यावर संस्कार करून संपन्न केली आहे. पण आपण हे अद्यापही मान्य करीत नाही. त्यामुळे सर्व घोटाळे होताहेत. संस्कृत-प्राकृत-मराठी ही उपपत्तीच चुकीची आहे. त्यामुळेच आपण संस्कृत आणि प्राकृत यांच्या संघर्षातून अपभ्रंश भाषा तयार झाली म्हणतो ते तपासून पाहण्याची गरज आहे. शब्दाचे अपभ्रंश रूप असू शकते. पण भाषेचे कसे काय असू शकेल? भाषेला आपण मातृभाषा म्हणतो. भाषा महत्त्वाची सामाजिक संस्था आहे म्हणतो. तिच्यावर आपले व्यवहार अवलंबून असतात. तिच्यामुळेच आपले भरणपोषण होते.

''मराठी संस्कृतापासून अपभ्रष्ट झालेली भाषा नसून ती मूळ प्राकृतपासून विकसित झालेली भाषा आहे.'' (प्र.रा. देशमुख, नवभारत १९६८) अर्थातच ह्या प्राकृतला महाराष्ट्री प्राकृत म्हणत होते. पण ती वऱ्हाडी बोलीचे आद्यरूप महारठी होती. ''मराठी भाषा हे याच मूळ प्रकृतीचे एक विकसित रूप होय. ते संस्कृतचे अपभ्रष्ट रूप नव्हे. एक भाषा अपभ्रष्ट होऊन त्यातून अगदी वेगळी अपभ्रष्ट भाषा निर्माण होते ही कल्पनाच मुळी अशास्त्रीय व चुकीची आहे. ती उत्क्रांतिवादाच्या अगदी विरुद्ध आहे. मराठी भाषा आमचे भाषिक पंडित समजतात तशी संस्कृतची अपभ्रष्ट भाषा नाही. ती संस्कृतइतकीच जुनी आहे.'' (देशमुख-नवभारत) ''उलट जो पुरावा उपलब्ध झाला आहे, त्या सर्वच पुराव्यावरून मराठी भाषा निश्चित फार प्राचीन व संस्कृत आणि प्राकृतच्या बरोबरीची किंबहुना त्यांच्यापेक्षा प्राचीन असण्याची शक्यता आहे.'' (देशमुख-नवभारत) ''इतरेजनांची भाषा सातत्याने चालत आलेली आर्यपूर्व प्राचीन भाषा होय. त्या ग्रामीण भाषेचे स्वरूप नागरी भाषेपेक्षा वेगळे आणि संस्कृत भाषेपासून दूर गेलेले दिसले तरी प्राचीन भाषेचे ते अविकृत आणि शुद्ध रूप होय.'' (देशमुख-नवभारत) आणि ते रूप वऱ्हाडीचे पूर्वरूप आहे. म्हणजेच प्राकृतच्या पूर्वीचे आहे अथवा सातत्याने चालत आलेले रूप आहे. अर्थातच ह्या रूपाला देशनामावरून वऱ्हाडीच म्हणायला हवे, अथवा महारठी.

खरंतर माझ्या अल्पमतीप्रमाणे आपल्याच मायबोलीला अपभ्रंश म्हणणे म्हणजे आपलीच माय विधवा झाली तर तिचे केशवपन करण्यासारखेच आहे; पण असे आपण करीत होतो. कारण चुकीच्या विचारांचा पगडा आपल्यावर होता. तसाच संस्कृतपासून प्राकृत आणि प्राकृतपासून महाराष्ट्री अपभ्रंश आणि त्यापासून मराठी ह्या चुकीच्या धोरणामुळे आपण मराठी भाषेलाच डबके केले आहे. कारण मराठी शब्दांच्या व्युत्पत्ती आपण संस्कृतात शोधतो आणि सापडल्याच नाही तर सरळ दाक्षिणात्य भाषेकडे जातो; पण चुकूनही बोलीकडे जात नाही. कारण मराठीतून बोली ही आमची ठाम समजूत आहे. आता काही शब्दांपासून तपासून पाहू. 'महाराष्ट्र' शब्दाची व्युत्पत्ती यादवकालीन मराठी भाषा ह्या ग्रंथात ''महार ह्या अस्पृश्य जातीवरून 'महाराष्ट्र' हे नाव पडले असावे असा तर्क प्रथम मोलस्वर्थने आपल्या शब्दकोशाच्या प्रस्तावनेत केला. पुढे जॉन विल्सनने पुष्टी दिली. अलीकडे डॉ. केतकर यांनी महार आणि रट्ट ह्या जातिनामांचा संयोग होऊन 'महारट्ट' असे रूप तयार झाले व महाराष्ट्र हे याच रूपाचे संस्कृतीकरण होय.'' ह्यावरूनही महारट्ट आधी आणि संस्कृतीकरण नंतर असेच संकेत मिळतात.

डॉ. भांडारकरांच्या मते महाराष्ट्राचे नामकरण राष्ट्रिक किंवा रट्ट नावाच्या लोकांवरून झाले असून या मतास ऐतिहासिक प्रमाण मिळते. नाणेघाट, भाजे, कार्ले व कान्हेरी येथील शिलालेखांत 'महारठिनी', 'महारठी' अशी अनुक्रमे स्त्री-पुरुषवाचक विशेषणे आढळतात. नाणेघाट शिलालेख (६ क्र.) यात 'महारठिगणकहिरो' असा स्पष्ट उल्लेख आहे. भाजे व बेडसे येथील लेखांतही अनुक्रमे 'महारठिस कोसकीपुतस विण्हुदतस' व 'महाभोय बालिकाय महादेविय महारठिनिय' असे उल्लेख आढळतात. पण ह्या शब्दाची

व्युत्पत्ती त्या त्या काळाच्या बोलीत शोधत नाहीत. काही तर पुन्हा संस्कृत महारथीचा तो अपभ्रंश मानतात तर काणे म्हणतात, महाराट अथवा महाराठी हा शब्द वऱ्हाडी आहे. लोकगीतात तो आहे. ''मऱ्हाटी संस्कृती लिहिणारे श्री. जोशी म्हणतात, त्याप्रमाणे हाटी लोकांशी नाही.'' (वऱ्हाडी लोकभाषा–प्रतिमा इंगोले), ''काही तर त्याची व्युत्पत्ती तामीळमध्ये शोधतात. तामीळ र आणि मराठी ऱ्ह यांच्या साम्यावरून तामीळमध्ये शोध घेतला तर द–३८९७ – मर – विसरणे, नाहीसे करणे, मरै लपवलेले असणे, आवरणात असणे, झाकणे, लपवणे, मरा=मऱ्हा म्हणजे न झाकलेले अर्थात उघड किंवा स्पष्ट असे डॉ. विश्वनाथ कैरे अडगुलं मडगुलं पृ. ४०, ४१मध्ये म्हणतात,

*''महारठ देस्यामंधी, पिकाची कमती नाही।*
*धानाचं पिक लई, उभ्या कपासीच्या रासी*
*वो माहे गिरजाबाईऽऽ''* (ना. रा. शेंडे, पृ. २९)

'लोकसाहित्य संपदा'मध्ये वरील ओवी संकलित केली आहे. याचा अर्थ तो शब्द लोकभाषेतील आहे. वऱ्हाडी आहे. ''मराठी–प्राकृत, वैदिक भाषा किंवा तिचा पाणिनीकृत नवीन अवतार म्हणजे संस्कृत भाषा यांच्यापासून उत्पन्न झालेली नाही, तर मराठी–प्राकृतवरील भाषांची जननी आहे. याचा आणखी एक पुरावा म्हणजे 'ट' वर्गाचे शब्द होय. संस्कृतपासून जर मराठी अपभ्रंशाने निर्माण झाली असेल तर 'ट' वर्णवार शब्दांची संख्या जास्त असायला पाहिजे. पण तसे दिसत नाही. ट, ठ, ड, ढ या वर्णाचे मराठी कोशात (शब्दरत्नाकर – वा.गो. आपटे) क्रमश: अंदाजे ५४०, ३००, ६०० आणि ३०० शब्द आहेत. तर संस्कृत भाषेत या वर्णाचे क्रमश: १८, ३, २७ आणि ८ म्हणजे केवळ ५६ शब्द आहेत. (पहा Sanskrit-English Dictrionary - V.S. Apte, P.S. Sadar) यावरूनही संस्कृतच्या आधी मराठी प्राकृत म्हणजेच त्याकाळची लोकभाषा होती, जी वऱ्हाडीचे पूर्वरूप होती.'' शब्दांत त्या समाजाचे युगायुगाचे अनुभव निविष्ट झालेले असतात. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे तर शब्दात त्या त्या समाजाचा आणि पर्यायाने मानवजातीचा इतिहास समाविष्ट असतो. भाषेवरून सामाजिक इतिहास तयार करण्याचे कार्य काही जर्मन विद्वानांनी केले आहे. त्या दृष्टीने भारतीय प्रादेशिक भाषांचे, विशेषत: ग्रामीण भाषेचे महत्त्व त्या सहा हजार वर्षांपासून सातत्याने चालत आलेल्या प्राकृत भाषेचे स्वरूप असल्यामुळे फार आहे. त्यातून भारताच्या प्राचीनतम इतिहासाचे व भाषेच्या मूळ स्वरूपाचे दर्शन होते. त्या दृष्टीने वैदर्भीय ग्रामीण भाषेचे महत्त्व अपरंपार आहे. ती अत्यंत प्राचीन अतंएव मूळ प्रकृतीच्या जवळ व समृद्ध आहे.'' (देशमुख–नवभारत) आणि तीच वऱ्हाडची लोकभाषा आहे; पण आजही आम्हाला ते पटत नाही.

इसवीसनानंतर २५० ते ५५०पर्यंत वाकाटकांचे राज्य विदर्भावर होते. ह्याला साहित्याचा सुवर्णकाळ म्हणतात; पण ह्या काळात यापूर्वीही विदर्भ देशाची व्याप्ती बृहन्महाराष्ट्रभर होती. वाकाटकांच्या काळात इथे आताच्या वऱ्हाडात प्राकृत आणि संस्कृत ग्रंथ निर्माण झाले. परिणामी आत्ताच्या वऱ्हाडची पूर्वीची भाषा प्रमाणभाषा झाली. तीच प्राकृतचे उभत रूप, जिला महाराष्ट्री वा प्राकृत म्हणत होते. ''ह्याच महाराष्ट्रीचा हेमचंद्र हा व्याकरणकार प्राकृत भाषा म्हणून उल्लेख करतो.'' (वऱ्हाडी लोकभाषा) ह्या महाराष्ट्री प्राकृतापासून अपभ्रंश व अपभ्रंशापासून मराठी उत्पन्न झाली हे डॉ. गुणे ह्यांचे मत डॉ. तुळपुळ्यांनी व्याकरणाच्या व भाषाशास्त्राच्या साहाय्याने सिद्ध केले. आणि विक्रमस्मृती ग्रंथात डॉ. कोलते यांनी वाङ्मयाचा पुरावा देऊन डॉ. तुळपुळे यांच्या मताला पाठिंबा दिला आणि हे मत विद्वानांना मान्य झाले.'' (वऱ्हाडी लोकभाषा पृ. २७)

आता अपभ्रंश भाषा म्हणून तिचा अवमान करण्यापेक्षा तिलाच वऱ्हाड प्राकृत म्हणावे अथवा वऱ्हाडी पूर्वभाषा म्हणावे. कारण तीच वऱ्हाडीचे तान्हे रूपडे आहे. ह्या भाषेत आणि वऱ्हाडीत साम्य आहे. ह्याच भाषेपासून मराठी उत्पन्न झाली हे सर्वच मान्य करतात. ह्यावरून मराठीचे जन्मस्थान विदर्भ आहे, यात शंका नाही. वि.ल. भावे म्हणतात, मराठीचे माहेर विदर्भातच आहे. (महाराष्ट्र सारस्वत) तुळपुळेही यादवकालीन मराठीत आणि वऱ्हाडीत साम्य आहे म्हणतात. अपभ्रंश भाषेतील लिखित साहित्यासाठी पुष्पदंताचे 'णायकुमारचरिक', तसेच 'जसहरचरिक' व 'महापुराण' हे तीन काव्यग्रंथ महत्त्वाचे मानतात. या तीन काव्यग्रंथांचा कर्ता पुष्पदंत हा मूळचा वऱ्हाडातील होता. पण मालखेड ह्या (मान्यकूट) राष्ट्रकूटांच्या राजधानीला राहत होता. पण त्यावेळची लोकगीते अथवा लोककथा त्यादृष्टीने अभ्यासत नाहीत. अपभ्रंशाचा हा काळ साधारण दहावे शतक मानतात आणि बाराव्या शतकात तर महानुभाव साहित्याची प्रचंड निर्मिती वऱ्हाडच्या भाषेत आहे. तेव्हा त्यापूर्वीची दहाव्या शतकातील भाषा वऱ्हाडीचे आद्य रूपच होती हे निर्विवाद सत्य आहे.

तसेही अपभ्रंश भाषेत आणि वऱ्हाडीत खूपच साम्य आहे. 'यादवकालीन मराठी भाषा' ह्या ग्रंथात जे अपभ्रंशातील शब्द दिले आहेत, ते आजच्या वऱ्हाडीत कायम आहेत.

(विस्तारभयास्तव देता येत नाहीत.) पण तत्पूर्वीच्या वाकाटकपूर्वक लीन मल्हारा येथील आदित्यराजाचा ताम्रपट आणि वाकाटककालीन ताम्रपटात 'न' आहे. 'ऋ'साठी 'रि' आणि 'लृ'साठी ली अक्षर वापरले आहे, जे वऱ्हाडीत वापरतात. रिद्धिपूर असाच शब्दप्रयोग वऱ्हाडीत आहे. मल्हारा ताम्रपटाची मिती प्राकृतात आहे. हा साधारणत: दुसऱ्या शतकातील आहे. त्यानंतरच्या वाकाटकनृपतींच्या पुणे येथील प्रभावती गुप्ताच्या ताम्रपटात ऋबद्दल रिचा उपयोग केला आहे. (वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, पृ. १८७) बेलोरा ताम्रपटातही ऋबद्दल रि आणि लृबद्दल लि लिहिला आहे. (पृ. २०४) प्रभावतीच्या रिद्धपूर ताम्रपटात लृ या स्वराबद्दल लि लिहिला आहे. (पृ. २३४) तिरोडी ताम्रपटातही रि वापरला आहे. तसेच लि लिहिला आहे. काही ठिकाणी वऱ्हाडीप्रमाणे शेवटचे व्यंजन गाळले आहे. उदा : नरत्तङ्वारिस्थाना (ओळ १, पृ. २५९) *'सखू जाते पंढरपुरा'* किंवा *'सखु आली वसानवाळ्या'* अशा ओळी लोकगीतात असंख्य आहेत.

'विचारसमीक्षा' ह्या ग्रंथातील वा.ना. देशपांडे यांनी आपल्या वऱ्हाडी लोकभाषा ह्या ग्रंथात 'मराठीचे उत्पत्तिस्थान विदर्भ देश होय' (पृ. ३) असे म्हटले आहे. ''वऱ्हाडी भाषेचे स्वरूप मात्र तेराव्या शतकातील मराठीसारखे किंबहुना त्याहूनही प्राचीन आहे हे उपलब्ध झालेल्या ज्ञानेश्वरकालीन महानुभाव वाङ्मयावरून खात्रीपूर्वक सांगता येते.'' (पृ. ७०), ''मराठीच्या बाल्यावस्थेत जे ग्रंथकार होऊन गेले, ते बहुतेक विदर्भीय असल्याने मराठीचा उगम विदर्भातच झाला असावा. या अनुमानास प्रमाण मिळते.'' (पृ. १७) मराठीतीलच नव्हे तर संस्कृतातील, प्राकृतातील, अपभ्रंशातील सर्व ग्रंथकार एखाददुसरा अपवाद वगळता विदर्भातीलच आहेत. (ज्ञानेश्वरीपर्यंत) गाथासप्तशती वाशिमला लिहिला असल्याचे आता सिद्ध झाले आहे.

ज्या प्रदेशात ग्रंथनिर्मिती होते, त्या त्या प्रदेशातील भाषेची स्थिती त्यापूर्वीच उन्नत झालेली असते. यावरून सहाव्या-सातव्या शतकातच वऱ्हाडात मराठीच्या उत्पत्तीची पूर्वतयारी सुरू होती, हे सिद्ध होते. वैदभारतीचा उगमही साक्षात वऱ्हाडातीलच आहे. गाथासप्तशती-हालराजा, हरिविजय-सर्वसेन, वज्जालग्गू-जयवल्लभ हे तीन ग्रंथ महारठी प्राकृतात आहेत. तसेच वासुदेव हिंडी हा जैन ग्रंथ महारठी भाषेत आहेत. ह्याशिवाय राजशेखरचे बालरामायण, मुरारी कवीचे अनर्घराघव, ह्याशिवाय भवभूती, कालिदास, हेमाद्रिनाथ, (चतुर्वर्गचिंतामणी) भास्कराचार्य, बोपदेव (मुक्ताफल व हरिलीला), राजकवी भोज, त्रिविक्रमभट्ट (नलचम्पू) भास्करभट्ट, महेश्वराचार्य, लक्ष्मीधर, ज्ञानराज (सिंधतिसुंदर), सूर्यपंडित, कमलाकर, चिंतामणी, गणेश, धुंडिराज, नारायण, गांधर, अनंत, नीलकंठ, राम, गोविंद, कृष्ण, (छादकनिर्णय, नवांकुरा) नारायण व मुनीश्वर, रामकृष्ण, नागेश दैवज्ञ, इत्यादी संस्कृत ग्रंथकार विदर्भात होऊन गेल्याचे या. मा. काळे वऱ्हाडचा इतिहास यामध्ये म्हणतात. (पृ. ३३ ते पृ. ५०)

आता इतक्या ग्रंथांची निर्मिती करणारा प्रदेशच भाषेची संपन्नता जोपासून असेल हे वेगळे सांगायला नको. ह्या संपन्नतेतून मराठीचा उदय झाला. महानुभावकाळी तर इतके ग्रंथ निर्माण झालेत, की त्यातून समिती नेमून हे सात उत्कृष्ट पद्यग्रंथ, हे सात उत्कृष्ट गद्यग्रंथ, हे सात उत्कृष्ट महत्त्वाचे ग्रंथ असे ठरवून बाकीचे नष्ट करण्यात आले. अर्थातच ह्याच प्रदेशाची भाषा प्रमाणभाषा झाली तीच मराठी! तर ''वर्धा नदीच्या पूर्व-पश्चिम भागात जी भाषा निर्माण झाली, हीच वऱ्हाडी प्रमुख भाषा. याच भाषेचे रूप मरहट्टी, मराठी आहे.'' (समतेसाठी बहुजन संघर्ष-मायबोली पृ. ११२), ''प्राचीन विदर्भाची मर्यादा लक्षात घेता मराठीचा उगम हा विदर्भातच झाला आहे असे दिसून येते. प्राचीन भाषेचा वारसा मिळालेली ही एकमेव वैदर्भी बोली आहे. असे म्हणण्याचे कारण एवढेच की, आज विदर्भात जी भाषा बोलली जाते, तिच्यातील हजारो शब्द, वाक्प्रचार व म्हणी प्राचीन साहित्याचे अवलोकन केल्यास त्यात दृष्टीस पडतात.'' देवीदास सोटे-वऱ्हाडी बोलीचा शब्दकोश (पृ. ५), ''मराठीचा जन्मच हा मुळात विदर्भात झाला असल्याचे मराठी इतिहासावरून लक्षात येते.'' (पृ. ७) याच शब्दकोशाला उपोद्घात लिहिताना डॉ. सुरेश शेळके म्हणतात, ''ज्या या प्राचीन विदर्भात महाराष्ट्री प्राकृत जन्माला आली, त्याच प्रदेशात मराठीचा ग्रंथरूप (व म्हणूनच तत्पूर्वी काही शतके बोलीरूप) आविष्कार झाला.'' ''महाराष्ट्र शारदेचे मंदिर उभारण्याचे कार्य विदर्भानेच - अर्थात विदर्भात निर्माण झालेल्या मराठी ग्रंथानेच केले आहे. म्हणजेच प्राय: आजच्या वऱ्हाडने!'' ''अर्थात वऱ्हाड हेच मराठीचे-वऱ्हाडी ही मूळ मराठीच होय'' असा दुजोरा देतात. पण भाषातज्ज्ञ हे मानत नाहीत आणि वऱ्हाडी अभ्यासक त्यांची री ओढतात हे दुर्दैवच!

**- डॉ. प्रतिमा इंगोले**



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# तंजावरची मराठी बोलीभाषा

निखिल बेल्लारीकर

**जवळपास पावणेदोनशे वर्षे महाराष्ट्रापासून शेकडो किलोमीटर दूर असलेल्या या दक्षिणेकडील भागात मराठी भाषेचे अस्तित्व अखंड टिकून राहिले. त्यांचे सांस्कृतिक योगदान आणि त्यांच्या बोलीची वैशिष्ट्ये आज महाराष्ट्रात काही मोजके अभ्यासक वगळता अज्ञात आहेत. तंजावरातील मराठीचा इतिहास हा फक्त त्या बोलीचा किंवा त्या प्रदेशातील साहित्यापुरता मर्यादित नसून महाराष्ट्रातील साहित्याशीही त्याचा घनिष्ठ संबंध आहे. तिच्यात अनेक अभ्यासकांना नव्याने संशोधन करण्यास पुष्कळ वाव आहे.**

**मराठीचा** भाषाव्यवहार अतिशय गुंतागुंतीचा व विस्तीर्ण आहे. इंडो-आर्यन भाषाकुळातील एक अतिशय महत्त्वाच्या अशा या भाषेची स्वत:ची अशी अनेक रोचक वैशिष्ट्ये आहेत. मराठीचा गाभा जरी संस्कृत-प्राकृत भाषांच्या मिश्रणातून तयार झाला असला तरी त्यासोबतच द्राविडी भाषाकुळाच्याही अनेक लकबी तिच्यात तितक्याच खोलवर समाविष्ट आहेत. किंबहुना मराठी भाषेची सर्वांगीण जडणघडण समजून घेण्याकरिता कन्नड, तेलुगु, तमिळ या द्राविडी भाषांचे ज्ञानही अतिशय आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील भाषावार प्रांतरचनेमुळे मराठीचे महाराष्ट्राबाहेरील, त्यातही दक्षिण भारतातील भाषा, साहित्य, संस्कृती आणि इतिहासाशी असलेले घनिष्ठ संबंध सहजगत्या दिसून येत नाहीत. सकृद्दर्शनी पाहता दाक्षिणात्य भाषा मराठीपेक्षा पूर्णत: वेगळ्या व तिथली संस्कृतीही अपरिचित वाटू शकते. राजकीय व साहित्यिक इतिहासाचा अभ्यास केल्यास मात्र दक्षिणेशी असलेले महाराष्ट्राचे प्राचीन काळापासूनचे नाते अतिशय ठळकपणे दृग्गोचर होते.

### पूर्वपीठिका

कर्नाटकात बेंगळुरूच्या पश्चिमेस १४४ किलोमीटवर श्रवणबेळगोळ या गावातल्या *श्री चावुंडराजे करवियले : श्री गंगराजे सुत्ताले करवियले* या इ.स.१०व्या शतकातील प्रसिद्ध शिलालेखात दक्षिणेकडील मराठीचा सर्वात पहिला पुरावा आढळतो. हे ठिकाण दक्षिण कर्नाटकात आहे – मराठीभाषक प्रदेशाच्या हद्दीपासून शेकडो किलोमीटर दक्षिणेस. इतक्या दूरवर मराठीत हा शिलालेख कोरण्याचे कारण बहुधा तेथे येणारे बहुसंख्य जैनधर्मीय मराठीभाषक असावेत. यानंतरही अधूनमधून दक्षिणेत मराठी माणसांचे क्वचित उल्लेख सापडतात. उदाहरणार्थ इ.स.१५४४ सालच्या एका शिलालेखात तत्कालीन विजयनगरचा सम्राट सदाशिवराय याचा एक सामंत विठ्ठलेश्वरदेवाचा श्रीमन्महामंडलेश्वर श्री मराटेय विठ्ठलेश्वरदेव महाअरसु अशा प्रकारे उल्लेख येतो. श्री मराटेय यावरून तो मराठी असल्याचे स्पष्टच आहे. एकुणात पाहता मध्ययुगात दक्षिणेतही तुंगभद्रा नदीच्या उत्तरेकडे मराठी भाषकांची संख्या व प्रभाव पुष्कळ आढळतो. तुंगभद्रेच्या दक्षिणेस मात्र मराठी प्रभावाची सुरुवात शिवछत्रपतींचे वडील शाहजीराजे यांच्यापासून झाली.

निजामशाहीतून आदिलशाहीत प्रवेश केल्यावर शहाजीराजे कर्नाटकात बेंगळुरू येथे इ.स.१६३८च्या सुमारास आले व इ.स.१६६४मध्ये त्यांच्या मरणापर्यंत तिथेच राहिले. या पंचवीसेक वर्षांच्या कालावधीत त्यांनी दक्षिणेत चांगला जम बसविला. आदिलशाहीच्या वतीने कर्नाटक व तमिळनाडूत अनेक ठिकाणी यशस्वी स्वाऱ्या करून त्यांनी स्वत:चा दबदबा तयार केला. त्यांच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातून बेंगळुरू व आसपासच्या अनेक गावांत कैक

मराठी कुटुंबे स्थलांतरित झाली, तसेच स्थायिकही झाली. शाहजीराजे शूर व धूर्त होते, त्यासोबतच त्यांना काव्यशास्त्रविनोदातही उत्तम रस होता. त्यांच्या पदरच्या जयराम पिंड्ये या कवीने राधामाधवविलासचंपूत त्यांच्या बेंगळुरूतील विद्वत्सभेचे उत्तम वर्णन केले आहे. त्यावरून दिसते की उत्तर भारतीय भाषांसह कन्नड व तेलुगुसारख्या द्राविडी भाषा जाणणारेही कैक कवी व पंडित त्यांच्या पदरी होते. तंजावरच्या राज्याची ही एकप्रकारे नांदी किंवा रंगीत तालीमच ठरली असे म्हणायला हरकत नाही

शहाजीराजांनी इ.स. १६६०-६१मध्येच तंजावरच्या राज्यावर स्वारी करून आदिलशाहीच्या वतीने खंडणी मिळवली होती. परंतु खुद्द तंजावरमध्ये मराठेशाहीची प्रत्यक्ष मुहूर्तमेढ रोवण्याचा बहुमान जातो तो शहाजीराजांचे पुत्र आणि शिवछत्रपतींचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजे ऊर्फ एकोजीराजे यांच्याकडे. तंजावर आणि मदुराईच्या राज्यांमध्ये वेळोवेळी कायमच झगडे होत असत. इ.स.१६७३मधल्या तंजावर-मदुराई युद्धात शेवटी तंजावरचा शेवटचा नायक विजयराघव याने सहकुटुंब आत्महत्या केली. त्यात विजापूरच्या वतीने एकोजीराजांनी हस्तक्षेप केला आणि पुढे स्वतंत्र सत्ताधीश म्हणून इ.स. १६७६पासून तंजावर येथे राहू लागले. अशाप्रकारे तंजावरच्या मराठेशाही राज्याची स्थापना झाली.

यानंतर कैक मराठी कुटुंबे तंजावर, कुंभकोणम, तिरुचिरापल्ली, तसेच मदुराई, रामेश्वरम इत्यादी ठिकाणी येऊ लागली. यांत पूर्वी बेंगळुरू व कर्नाटकात अन्यत्र, तसेच तेलुगु भाषिक प्रदेशात स्थायिक झालेल्यांसोबतच नव्याने महाराष्ट्रातून येणाऱ्यांचाही भरणा होता. दक्षिणेतील अन्य ठिकाणच्या मराठी समूहापेक्षा तंजावरमधील मराठीसमूहाचे वेगळेपण हे की तेथील राज्यकर्ते मराठी असल्यामुळे मराठी भाषा व संस्कृतीला मानाचे उच्च स्थान होते. त्यामुळे इ.स. १६७६मधील स्थापनेपासून ते इ.स.१८५५मध्ये तंजावरचे राज्य खालसा होईतोवर जवळपास पावणेदोनशे वर्षे महाराष्ट्रापासून शेकडो किलोमीटर दूर असलेल्या या दक्षिणेकडील भागात मराठी भाषेचे अस्तित्व अखंड टिकून राहिले. महाराष्ट्राचे हे भाऊबंद आज बहुतांशी दुर्लक्षित आहेत. त्यांचे सांस्कृतिक योगदान आणि त्यांच्या बोलीची वैशिष्ट्ये आज महाराष्ट्रात काही मोजके अभ्यासक वगळता अज्ञात आहेत. तंजावरातील मराठीचा इतिहास हा फक्त त्या बोलीचा किंवा त्या प्रदेशातील साहित्यापुरता मर्यादित नसून महाराष्ट्रातील साहित्याशीही त्याचा घनिष्ठ संबंध आहे. हा इतिहास खरंतर सोन्याची खाण आहे. तिच्यात अनेक ज्ञात-अज्ञात रत्ने दडलेली असून, अभ्यासकांना नव्याने संशोधन करण्यास पुष्कळ वाव आहे.

दक्षिण भारत हा मुळातच साहित्यदृष्ट्या समृद्ध प्रदेश. त्यातही तमिळभाषक प्रदेशापुरते पाहता, कावेरी नदीच्या खोऱ्यातील प्रदेश हा मध्ययुगीन चोळांच्या वेळेपासून सांस्कृतिक केंद्राची भूमिका बजावत होता. तंजावरच्या नायक राजवटीतही साहित्याला उत्तेजन मिळाले होते. पुढे मराठेशाहीतही येथील साहित्य वृद्धिंगत झाले. यांपैकी प्रस्तुत लेखात फक्त मराठीचाच विचार कर्तव्य असला तरी तंजावरमधील मुळातले बहुभाषी वातावरण लक्षात घेणे आवश्यक आहे. संस्कृत वगळता तंजावर व आसपासच्या प्रदेशातील बहुसंख्य लोकांची भाषा तमिळ, तंजावर नायक राजघराण्याची भाषा तेलुगु तर मराठ्यांची भाषा मराठी अशा तीन भाषांना इथे महत्त्वाचे स्थान होते. या तीनही भाषांना आपापला मोठा इतिहास असून स्वत:ची स्वतंत्र साहित्यिक संस्कृतीही आहे. त्यामुळे त्यांचा एकमेकींशी संपर्क आल्यावर फक्त शाब्दिक किंवा व्याकरणाच्या पातळीवर सरमिसळ न होता ही देवाणघेवाण साहित्यसंकेतांपर्यंतही गेल्याचे दिसून येते. इथले मराठी काव्य महाराष्ट्रापेक्षा अतिशय वेगळ्या वातावरणात बहरले. त्यावर दाक्षिणात्य संकेतांचा मोठा प्रभाव आहे. याची अनेक उदाहरणे येथील मराठी साहित्यात सापडतात.

**तंजावरचे मराठी साहित्य**

स्वत: व्यंकोजीराजांनी संस्कृतमध्ये समस्या नामक काव्यरचना केली, त्याशिवाय गोपिनाथ स्वामी, नागनाथ कृष्ण, नरसिंह कवी, त्र्यंबकराय मरवी, इ. कवींना त्यांनी आश्रय दिला. व्यंकोजीराजांची राणी दीपाबाई हिनेही भक्तिपर काव्यरचना केल्याचा उल्लेख चिंदड शंकर या दरबारी कवीच्या काव्यात आढळतो. व्यंकोजीराजांचे पुत्र व वारसदार शाहजीराजे दुसरे हे स्वत: प्रतिभावान असून त्यांनी विशेषत: अनेक नाटके लिहिली. त्याशिवाय विविध विषयांतील कैक पंडित व बहुभाषिक साहित्यिकांना आश्रयही दिलेला होता. रघुनाथ पंडित नवहस्त (नवाथे) हा प्रसिद्ध लेखक, शहाजीराजे दुसरे यांच्याच पदरी होता. 'भोजनकुतूहला'सारखा आहारविषयक महत्त्वाचा ग्रंथ त्याने लिहिला. कृत्तिकेय कवी, नाना जोशी, रुक्मांगद कवी इ. अनेक कवी त्यांच्या पदरी होते. त्यानंतर सरफोजीराजे पहिले व तुळजाराजे पहिले यांच्या काळात अनंतराय, आनंद

नारायण, व्यंकटेश कवी, जगन्नाथपंडित, घनश्यामपंडित, कृष्णपंडित, इ. साहित्यिक होते. यांपैकी अनंतराय हा सरफोजीराजे पहिले यांचा मंत्रीही होता. यांच्यानंतर राज्यारूढ झालेले राजे प्रतापसिंह स्वत: मराठी, संस्कृत व तमिळ या तीनही भाषा उत्तम जाणत. त्यांनी कैक मराठी नाटकेही लिहिली. त्यांच्या पदरी रामकृष्णपंडित, गोविंद कवी, रामपंडित, विरूपाक्ष कवी, केशवसुत इ. कवी होते. यांच्यानंतर तुळजाराजे दुसरे व अमरसिंह यांच्या कारकिर्दीतही साहित्यरचना अबाधित सुरू राहिली. पण अमरसिंहानंतर राज्यारूढ झालेले सरफोजीराजे दुसरे यांच्या काळात तंजावरच्या राज्यात एक सर्वांगीण क्रांतीच घडून आली. स्वत: सरफोजीराजे मोठे विद्वान असून, मराठी, संस्कृत, तमिळ इ. भाषांशिवाय त्यांना इंग्रजी, इटालियन, लॅटिन, ग्रीक, फ्रेंच इ. युरोपीय भाषाही उत्तमरीत्या अवगत होत्या. त्यांनीही मराठीत कैक काव्ये व नाटके लिहिलेली आहेत. मराठी वाङ्मय छापण्याकरिता त्यांनी प्रथम छापखानाही स्थापन केला. सरस्वती महाल हे ग्रंथालय नायकराजांच्या काळापासून होतेच, त्यात त्यांनी अतिशय मोलाची भर घातली. सरफोजीराजे दुसरे यांच्या मृत्यूनंतर राज्यारूढ झालेले शिवाजीराजे दुसरे हे तंजावरचे अखेरचे राजे असून त्यांनीही आपल्या पूर्वजांप्रमाणे कवी व विद्वानांना आश्रय दिला. तंडालं रामचंद्रराव यांच्यासारखे प्रसिद्ध कवी त्यांच्या पदरी होते. त्यांची आख्यानकाव्ये तिथे बरीच प्रसिद्ध होती.

स्वत: राजे व दरबारी कवींशिवाय तंजावरातील रामदासी संप्रदायाचाही तेथील मराठी साहित्यरचनेत मोलाचा वाटा आहे. तेथील कैक रामदासी मठांचे संस्थापक व त्या परंपरेतील इतरही संतमहंतांनी विपुल साहित्यरचना केलेली आहे. यात माधवस्वामी, राघवस्वामी, मेरूस्वामी, भीमस्वामी इ. अनेकांचा समावेश होतो. यांपैकी माधवस्वामी हे महाकवी म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी मायावरम जिल्ह्यातील त्रिवंदूर येथे मराठीत महाभारत लिहिले. यात तब्बल एकोणीस हजार ओव्या आहेत. त्याशिवाय योगवासिष्ठ, मल्लारीमहात्म्य, विष्णुपुराण हे ग्रंथ आणि प्रबोधचंद्रोदय नामक रूपकात्मक नाटकही लिहिले. भीमस्वामींनी प्रामुख्याने पदरचना केली. यात राम, कृष्ण, अद्वैतमत इ. अनेक विषयांचा समावेश होतो. राघवस्वामींनी कैक पदे, स्तोत्रे, आरत्या इ. लिहिल्या. श्रीधरस्वामींनी रामायणावर आधारित एकूण तेवीस रचना लिहिल्या. यात व्यासोक्तरामायण, गंधर्वरामायण, चित्ररामायण इ. कृती अंतर्भूत आहेत.

या अतिसंक्षिप्त आढाव्यावरूनही तंजावरच्या लहानशा राज्यात मराठी साहित्य व संस्कृतीचे संवर्धन किती जोमाने होत होते, याची काहीएक कल्पना आल्यावाचून राहत नाही. मूळचा समृद्ध प्रदेश, नायककाळात नावारूपाला आलेली साहित्यिक परंपरा पुढे अबाधित राहणे, सर्वसाधारणपणे उत्तरेच्या तुलनेत मोठी युद्धे कमी असणे इ. अनेक गोष्टी याला कारणीभूत असण्याची शक्यता आहे. या जोमदार आणि समृद्ध साहित्यव्यवहाराचे वर्गीकरण प्रामुख्याने आख्यानकाव्ये व नाटके या दोन अतिढोबळ वर्गांत करता येईल. यातही प्रत्येक वर्गात अनेक उपविभाग असून प्रत्येक उपविभागाचे स्वत:चे एक वेगळेपण आहे. विश्लेषणाच्या सोयीकरिता प्रत्येक विभागातील एखाद्या प्रातिनिधिक साहित्यकृतीचे थोडक्यात विश्लेषण केल्यास या साहित्यसंभारामागील पार्श्वभूमी व सांस्कृतिक चौकट स्पष्ट होईल.

**काव्ये**

याकरिताचे प्रथम उदाहरण म्हणजे रघुनाथपंडितकृत नलदमयंतीस्वयंवर हे लहानसे पंडिती आख्यानकाव्य होय. उपलब्ध माहितीवरून रघुनाथपंडित हा साधारणपणे शिवकालीन असावा, तसेच कदाचित आरणी येथे राहणारा असावा इतकेच म्हणता येते. अनंततनय नामक एक प्रसिद्ध कवी त्याचा व्याही असल्याचीही एक लोकस्मृती पूर्वी रूढ होती. तंजावर प्रांतात हे काव्य अतिशय प्रसिद्ध असून, *कथा ऐसी चंदावरकर रघुनाथचि करी* अशी उक्ती त्याच्या काव्यकौशल्याबद्दल प्रचलित होती. तेथे रचलेल्या अनेक काव्यांमधून नलदमयंतीस्वयंवरातील काही ओळी अथवा श्लोक आहे तसे किंवा थोडा फेरफार करून वापरलेले आढळतात. अव्वल इंग्रजीत परशुरामतात्या गोडबोले यांनी त्यांच्या नवनीत या प्रसिद्ध ग्रंथात हे काव्य पूर्णत: छापल्यानंतर महाराष्ट्राला त्याची ओळख झाली. त्या काव्यातील *कठिण समय येता कोण कामास येतो* सारख्या ओळी आज अतिशय प्रसिद्ध आहेत. या काव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यातील कथा पूर्णत: लौकिक परिणयाशी संबंधित आहे. शृंगार आणि करुण हे दोन्ही रस यात उत्तमरीत्या उतरले आहेत. कवीने काव्यात सुरुवातीलाच *कथा बोलू मधुर हे सुधाधारा, होय शृंगारा करुणरसा थारा* या ओळींतून हे स्पष्ट केले आहेच.

तत्कालीन महाराष्ट्राच्या तुलनेत पाहता नलदमयंती स्वयंवराच्या कथेतील लौकिकता, तसेच शृंगारावर दिलेला

भर उल्लेखनीय आहे. यामागे तत्कालीन तेलुगु वाङ्मयाची पार्श्वभूमी आहे. मराठेशाहीच्या अगोदर तंजावरवर नायकराजे राज्य करीत. ते तेलुगुभाषक असून, त्यांमध्ये रघुनाथ नायक (इ.स.१६१३-१६३१) आणि त्याचा पुत्र विजयराघव नायक (इ.स.१६३१-१६७३) या दोघांची कारकिर्द तेलुगु साहित्याकरिता विशेष भरभराटीची ठरली. त्यांच्या कारकिर्दीतील तेलुगु काव्यांमध्ये ही शृंगारप्रधान पद्धत आढळते. याखेरीज, मुळात तेलुगु साहित्यात नलदमयंतीच्या कथेलाही एक वेगळे स्थान होते. इ.स.१५व्या शतकात श्रीनाथ कवीने तेलुगुत नैषधीयाचा अनुवाद करून शृंगारकाव्याचा पाया घातल्यानंतर रघुनाथ नायकाचा आश्रित कवी कृष्णाध्वरि याने नैषधपारिजातमु या कृष्ण आणि नल या दोघांचीही कथा सांगणाऱ्या द्व्यर्थी काव्याची रचना केली, तसेच खुद्द विजयराघव नायकानेही नलचरित्र लिहिले. अशा पार्श्वभूमीवर रघुनाथपंडिताने त्या कथेची निवड करणे हे तेथील अभिरुचीला धरूनच होते. तेलुगु रचनांप्रमाणेच रघुनाथपंडिताच्या काव्याचेही महाभारताऐवजी नैषधीयचरिताशी जास्त साधर्म्य आहे.

शिवाय नलदमयंतीस्वयंवरात येणारे चूर्णिका हे वृत्तही त्याअगोदरच्या मराठी साहित्यात येत नाही. हे वृत्त मुळात तेलुगु साहित्याच्या संपर्काने मराठीत आले. काही तेलुगु शब्दही त्यात आढळतात त्यांचाही विचार करणे आवश्यक आहे. त्यांपैकी आलोचना हा शब्द महत्त्वाचा आहे. हा शब्द संस्कृतातही येतो. जुन्या मराठी काव्यात सूक्ष्मपणे विचार करणे या अर्थाने हा शब्द रूढ असला तरी निव्वळ विचार करणे या अर्थाने हा शब्द फक्त तेलुगुमध्ये प्रचलित असून त्याच अर्थाने तो नलदमयंतीस्वयंवरात येतो. *जिची आलोचना करता ये नीरच लोचना* या ओळीत तोच अर्थ अभिप्रेत आहे. याखेरीज चिगुर हा शब्द कोणत्याही झाडाच्या पालवीस उद्देशून तेलुगुमध्ये वापरतात. तो शब्द *चिगुरले फुलले फळले तसे, तरुच भूषण ते वन लेतसे* या ओळींत याच अर्थाने रघुनाथपंडिताने गजेंद्रमोक्ष काव्यात वापरलेला आहे.

रघुनाथपंडित वगळता संताजी साळुंखे नामक मराठा कवीने एक रामायण रचलेले असून त्याची शैली व वर्णनही तेलुगु संकेतांनी प्रभावित आहे. सेतुबंधन, नल-हनुमान कलह, रामप्रताप, कुंभकर्णवध, इ. रामायणातील कैक प्रसंगांचे त्याने केलेले वर्णन हे तेलुगुतील रंगनाथ रामायणाशी मिळतेजुळते आहे.

**कुरवंजी**

याखेरीज काव्य व नाटक यांच्या सीमारेषेवर असलेला कुरवंजी नामक साहित्यप्रकार मुळात अस्सल द्राविडी यक्षगानाचा एक प्रकार असून तंजावरला या प्रकारातील कैक मराठी साहित्यकृती निर्माण झाल्या. कुरव या शब्दाचा अर्थ बुरुड असा असून, या समाजातील लोक तत्कालीन तमिळनाडूत भटक्या जीवनशैलीने राहत असत. त्यांच्यातील चौकसपणा व धीटपणा या गुणांचे काहीसे cliche वाटावे असे वर्णन करून त्याआधारे कथाभाग पुढे सरकतो. या प्रकारच्या बहुतांश कथांमध्ये एखादी सुंदरी एखाद्या राजावर, मंत्री किंवा एखाद्या क्षेत्रदैवतावर अनुरक्त होते. प्रथम भेटीनंतर दोघांचा विरह होतो, निसर्गातील विविध दृश्ये पाहून नायिकेला बरे वाटण्याऐवजी त्रासच होतो व ती आपल्या सख्यांना नायकाची भेट घडवण्याकरिता परोपरीने विनवते. यावेळेस कुरव समाजातील स्त्री अर्थात कुरत्ती तिला भेटते, तिचा हात पाहून, त्याआधारे भविष्य सांगून तिची व नायकाची भेट होईल असे सांगते. भविष्यकथनासोबतच नायिकेला ती मार्गदर्शनही करते. पूर्वी या प्रकारातील साहित्य हे आध्यात्मिक स्वरूपाचे असून, आत्म्याला परमात्म्याबद्दल वाटणाऱ्या ओढीचे त्यात चित्रण असे. मात्र नायककाळापासून यात शृंगारास प्राधान्य आले.

कुरवंजी प्रकारात दुसऱ्या सरफोजीराजांनी रचलेल्या देवेंद्र कुरवंजीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. नेहमीच्या कुरवंजीत नायक-नायिकेचा विरह व पुनर्मीलन याला प्राधान्य असून, त्यातील कुरत्ती अर्थात बुरडीण या पात्राला महत्त्व असले तरी पूर्णत: प्राधान्य नसते. देवेंद्र कुरवंजीत मात्र सरफोजीराजांनी हा साचाच आमूलाग्र बदलून टाकला. इंद्र व इंद्राणीचा विरह होऊन एका बुरडिणीच्या माध्यमातून त्यांचे पुनर्मीलन होते अशी ढोबळ कथा असलेल्या या कुरवंजीत मुख्य पात्र हे बुरडिणीचे असून, इंद्र-इंद्राणीला गौण महत्त्व आहे. या साहित्यकृतीचा मुख्य उद्देश हा जगाचा भूगोल सांगणे हा आहे. इंद्राणीने विचारल्यावरून बुरुडीण इंद्रलोकासोबतच अखिल पृथ्वीचाही भूगोल अतिशय तपशीलवारपणे कथन करते. आशिया, आफ्रिका, युरोप आणि उत्तर व दक्षिण अमेरिका या पाचही खंडांचा यात सविस्तर परामर्श घेतलेला आहे. ऑस्ट्रेलियाचा मात्र उल्लेख आढळत नाही. साधारणपणे इ.स. १८२५च्या आसपास रचलेल्या या साहित्यकृतीतील भौगोलिक तपशील अतिशय सविस्तर असून तत्कालीन अद्ययावत भौगोलिक ज्ञानाची परिसीमा यात आढळते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. विविध

खंडे, त्यांतील प्रमुख देश, त्यांमधील मुख्य शहरे, नद्या व पर्वतरांगांची नावे सरफोजीराजांनी विशिष्ट स्वरूपात लिहिली आहेत. उदा. युरोप खंडाचे नाव इरोप, इंग्लंडचे नाव इंगल्यांड, आयर्लंडचे ऐर्ल्यांड, न्यूयॉर्कचे नव योर्क, इ. रूपे आहेत. अपरिचित शब्दांचे तद्भवीकरण करण्याची प्रवृत्ती सर्वच ठिकाणी आढळते – देवेंद्र कुरवंजीही त्याला अपवाद नाही. योजने किंवा गावे या परिमाणात देशांचा विस्तार देऊन, या देशांत डोंगर नाहीत, हे राज्य फार थोर परंतु हूण (युरोपीय) लोकांस थोडकेच ठाऊक असे इ. अल्पशब्दी मार्मिक टिप्पण्याही केलेल्या आहेत. बारकाईने वाचल्यास सरफोजीराजांच्या तत्कालीन भूगोलाच्या सखोल आकलनाचा यातून स्पष्ट प्रत्यय येतो. रंजक पद्धतीने जगाचा भूगोल अशाप्रकारे सांगण्याचा हा प्रकार नक्कीच अभिनव होता.

**नाटके**

काव्ये, कीर्तने आणि कुरवंजीशिवाय तंजावरच्या नाटकांचेही सांस्कृतिक योगदान मोठे आहे. मराठी नाटकांची सुरुवात विष्णुदास भाव्यांनी इ.स. १८४३मध्ये केली असे मानले जात असले तरी तंजावरमध्ये मराठी नाटके इ.स. १६९०पासून रचली जात होती. दक्षिणेतील यक्षगानपरंपरा ही तंजावरमधील रंगभूमीचे प्रेरणास्थान होय. तंजावरकर मराठे राजांपैकी शहाजीराजे दुसरे आणि प्रतापसिंह महाराज या दोघांनी विपुल नाटके रचली. त्यातही शहाजीराजे दुसरे यांनी तब्बल बावीस मराठी नाटके, वीस तेलुगु, सात तमिळ आणि तीन हिंदीही नाटके लिहिली.

या विपुल नाट्यसंभारातील श्री त्यागराजविलास या रचनेचा प्रातिनिधिकदृष्ट्या विचार केल्यास यातील अनेक पैलूंचे आकलन सुलभ होईल. लेखक या रचनेस स्वत: यक्षगानप्रबंध अशी संज्ञा देतो. यात सूत्रधार पडद्यामागून गाणे म्हणतो व नर्तकी त्यातील हावभाव नृत्याद्वारे दर्शविते. याची कथा ही इ.स. नवव्या शतकात होऊन गेलेल्या सुंदर कवी नामक प्रसिद्ध तमिळ शैव संतांच्या आयुष्यातील एका प्रसंगाशी निगडित आहे. हा सुंदर कवी मोठा शिवभक्त असून, तिरुवारूरच्या शिवमंदिरात जाताना त्याला परवा नामक एक सुंदर वेश्याकन्या दिसते. दोघेही एकमेकांवर मोहित होतात व शंकराची संमती मिळाल्यासच लग्नाला तयार होईन, असे परवा म्हणते. तिच्या आईला हे समजल्याबरोबर ती यात खोडा घालते व परवा हिला ती घरी घेऊन जाते. परवा हिचे लग्न झाल्यास तिच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उपस्थित होणार असल्यामुळे ती लग्नाऐवजी स्वत:च्या तारुण्याची काळजी घेऊन व्यवसाय करत राहावा, असा उपदेश करते. इकडे सुंदर कवीही परवा हिच्या विरहाने व्याकूळ होतो. या प्रसंगातून केवळ शंकरच तारू शकेल या श्रद्धेने तो शंकराची प्रार्थना करतो व त्यावर प्रसन्न होऊन शंकर अखेरीस तिला सुंदर कवीसोबत लग्न करण्याची अनुमती देतो आणि यासाठी शंकराला मृत्युलोकात बराच काळ राहावे लागल्याने सुंदर कवी पार्वतीची क्षमा मागतो. इथे ही कथा संपते.

ही रचना मराठीत असली तरी यावरील द्राविडी प्रभाव इतका खोलवर आहे की ही अंतर्बाह्य एक दाक्षिणात्य साहित्यकृतीच आहे. यातील कैक पद्यखंडांची वृत्ते ही तेलुगु देश्य असून (उदा. द्विपद, कंदपद्य, इ.) जिथे संस्कृत वृत्ते वापरलीत, तिथे तेलुगु छंद:शास्त्राचे नियमही वापरलेले आहेत, उदा.

*तारकनाथधारि वरत्याग महेश्वर ऐस केल आ–*
*हार कशाल वस्त्रमणिहार कशाल विलासहास शृं–*
*गार कशाल भूषणद कर्पूरविवडे कशाल सौध सं–*
*चार कशाल देहउपचार कशाल कशाल यौवना*

या श्लोकाचे उत्पलमाला हे संस्कृत वृत्त असून याचे गण भ, र, न, भ, भ, र, ल, ग असे आहेत. यात दोन महत्त्वाची तेलुगु वैशिष्ट्ये दिसून येतात ती म्हणजे द्वितीयाक्षरी प्रास व यतिमैत्री. द्वितीयाक्षरी प्रासात प्रत्येक चरणातील द्वितीय अक्षर सारखे अथवा मित्रवर्ण (उदा. क असल्यास ग चालते) येणे आवश्यक आहे. यतिमैत्री म्हणजे प्रत्येक चरणातील प्रारंभीचे व दहावे अक्षर सारखे हवे. इथे ता, हा, गा, चा ही अक्षरे हा नियम पाळतात, उदा. हार कशाल वस्त्रमणिहार कशाल विलासहास शृं येथे सुरुवातीचे अक्षर 'हा' हे असून दहावे अक्षरही तेच आहे. याशिवाय पादांती यती हा मराठी छंद:शास्त्रातील नियम येथे धुडकावून लावलेला असून, तेलुगु पद्धतीने चरण सलग म्हणावे अशा पद्धतीने लिहिलेले आहेत. हा तेथे वृत्तदोष मानत नाहीत. या श्लोकावरून या रचनेतील तेलुगु प्रभाव किती खोलवर आहे हे दिसून येते.

तंजावरचे बहुसंख्य साहित्य हे पद्य किंवा गद्यपद्यमिश्रित असले तरी एका महत्त्वाच्या गद्यसाहित्याचा उल्लेख इथे करणे अत्यावश्यक आहे. तंजावर शहरातील सुप्रसिद्ध बृहदीश्वराच्या देवळाभोवती खूप विस्तीर्ण तटबंदी आहे. त्या तटबंदीच्या भिंतींवर मराठी भाषेतील एक कोरीव शिलालेख असून, त्यात भोसले घराण्याची मालोजीराजांपासून ते दुसऱ्या

सरफोजीराजांपर्यंतची हकिकत दिलेली आहे. याची तब्बल १३८ छापील पाने असून, अखिल भारतातील हा सर्वांत मोठा शिलालेख आहे. हा शिलालेख दुसऱ्या सरफोजीराजांनी सांगितल्यानुसार दिनांक १३ डिसेंबर १८०३ रोजी खोदून पूर्ण झाल्याचे त्यात नमूद आहे. बृहदीश्वराच्या मुख्य देवळाच्या इमारतीवर, तसेच इतर भिंतींवर शेकडो तमिळ लेख आहेत. त्यांसोबतच हा अतिविस्तृत मराठी लेखही आहे.

**बोलीभाषा**

आतापर्यंत तंजावरमधील मराठी साहित्याचा आढावा घेतला. परंतु रोजच्या व्यवहाराची बोलीभाषाही तितकीच महत्त्वाची आहे. ग्रांथिक व बोलीभाषांमधील फरक हा सर्वत्र व सर्वकाळी आढळतो. तंजावरच्या मराठी साहित्य व्यवहारावर द्राविडी प्रभाव किती खोलवर होता, याची कैक उदाहरणे वरच्या संक्षिप्त आढाव्यात ठिकठिकाणी आलेली आहेतच. ग्रांथिक भाषेपेक्षा रोजच्या बोलीभाषेवर हा प्रभाव अनेकपटीने जास्त पडलेला दिसतो. याचे कारण सरळच आहे – तंजावरमधील मराठी राज्याच्या ऐन भरातही तेथील स्थानिक तमिळभाषकांची संख्या ही मराठीभाषकांपेक्षा कैकपटीने जास्त होती. शिवाय महाराष्ट्रातून नव्याने येणारे लोक हे स्थानिकांच्या तुलनेत नेहमीच अल्पसंख्य असल्यामुळेही तेथील मराठीभाषक हे भाषिकदृष्ट्या महाराष्ट्रापासून वेगळे पडले. तमिळ भाषा व संस्कृतीच्या समुद्रातील जणू लहानसे बेट असल्याप्रमाणे तंजावरातील मराठी समाजाचे अस्तित्व असल्यामुळे तेथील मराठीवरील द्राविडी प्रभाव अधिक असणे अगदी साहजिक आहे. शिवाय येथे तंजावर या शब्दाचा अर्थ फक्त तंजावर शहर हा न घेता सामान्यपणे तंजावरच्या मराठी राज्याखाली येणारा सर्वच प्रदेश असा व्यापक अर्थ अपेक्षित आहे. या प्रदेशात कुंभकोणम, नागपट्टण इ. अनेक शहरे आहेत. मराठी भाषकांची सर्वांत जास्त संख्या तंजावर व कुंभकोणम इथे आहे. याखेरीज तंजावरच्या राज्यात न येणाऱ्या प्रदेशातही, उदा. मदुराई, रामेश्वरम, इथेही मराठी लोक आहेत.

तंजावरच्या मराठी बोलीची नेमकी वैशिष्ट्ये अनेक आहेत. त्यांपैकी काही महत्त्वाची वैशिष्ट्ये ही त्या बोलीचे उच्चारशास्त्र, विभक्तीप्रत्यय, वर्तमानकाळ-भूतकाळ-भविष्यकाळ इत्यादींद्वारे सांगता येतात. इतर कोणत्याही बोलीप्रमाणेच याही बोलीत जात-वर्ग इत्यादींनुसार शब्दनिवड व शब्दोच्चार यांत फरक दिसून येतात. मराठीने तमिळ किंवा क्वचित तेलुगुला अंगीकारणे इतक्यापुरतेच या बोलीचे वैशिष्ट्य मर्यादित नसून, काही बाबतींत एकमेवाद्वितीय रूपे व अनेक बाबतींत शिवकालीन आणि पेशवेकालीन मराठीशी अथवा आधुनिक ग्रामीण मराठीशी साधर्म्य ही वैशिष्ट्येही दिसून येतात. आधुनिक महाराष्ट्रातील माणसाला सकृद्दर्शनी या बोलीचे जाणवणारे सर्वांत ठळक विशेष म्हणजे दाक्षिणात्य प्रदेशातच आढळणाऱ्या अशा विशिष्ट हेलात ही बोली बोलली जाते. शिवाय आजच्या प्रमाणमराठीत न आढळणारे आणि निव्वळ काव्यात्मक वाटणारे उदंड सारखे शब्दही तंजावर मराठीत सर्रास वापरले जातात.

या बोलीत स्वर आणि व्यंजनांत प्रमाणमराठीपेक्षा वेगळे बदल होतात. उदा. ओ अ असा बदल होतो, उदा. ओळख या शब्दाचे वळख असे रूप होते. सध्याच्या ग्रामीण मराठीत हे रूप प्रचलित आहे. शिवाय करावं, बोलावं, इ. शब्दांच्या शेवटीचे अनुस्वार हे सध्याच्या प्रमाणमराठीत अनुच्चारित असले तरी तंजावरी मराठीत यांचा उच्चार केला जातो. शिवकालीन व पेशवेकालीन मराठीतही करावें, बोलावें, इ. शब्दांच्या शेवटचा अनुस्वार उच्चारला जाई. गांठ, पांच, इ. शब्दांमधील अनुस्वाराचाही स्पष्ट उच्चार या बोलीत आढळतो.

व्यंजनांत कैक ठिकाणी कठोर व्यंजने मृदू व्यंजनांत तर काही ठिकाणी उलटही बदल बघावयास मिळतो, उदा. वेंकोजीचे वेंगोजी, तसेच मंडपाचे मंटप अशी रूपे इथे बघावयास मिळतात. तसेच ह ऐवजी क-वर्गीय व्यंजने वापरली जातात, उदा. महालचे मघाल, इ. हा उघडच तमिळ प्रभाव आहे. तमिळमध्ये मुळात क-ख-ग-घ पैकी क-ग ही दोनच व्यंजने असून, एकमेकांच्या बदलीही वापरली जातात. महाप्राणाऐवजी क-वर्ग वापरला जातो. त्याखेरीज दंततालव्य च, ज इत्यादींचा उच्चार तालव्य केला जातो. यांसारखेच इतरही अनेक गुणधर्म उघडच तमिळ उच्चारांचा प्रभाव दर्शवितात.

क्रियापदांची रूपे पाहिल्यास त्यांमध्येही बरेच वैविध्य आढळते, उदा. करावे, जावे इ. विध्यर्थी क्रियापदांकरिता करूं ये, जाऊं ये अशी रूपे आढळतात. करून, धरून इ. कृदंत रूपांकरिता करिंगून, धरिंगून इ. रूपे येतात. काळदर्शक रचनांमध्येही वर्तमानकाळात आम्ही मराठी बोलतो इ. ऐवजी आम्ही मराठी बोलनार असे रूपही आढळते. दाक्षिणात्य प्रभावामुळे लिंग, वचन इ.बाबत बरीच धरसोड दिसून येते.

विभक्तिप्रत्ययांतही उल्लेखनीय फरक आढळतात. उदा.

या बोलीत सामान्यरूप लुप्त झालेले आहे. द्वितीयेचा प्रत्ययही अनेकदा गाळला जातो, उदा. मी तिरुपतीला गेले हे वाक्य मी तिरुपती गेले असे म्हटले जाते. कैकदा सप्तमीचा लोप होतो, उदा. चन्याचं दाळ पानी बिजून गाळून टेवला हे तंजावरी बोलीतील वाक्य पाहिल्यास पाण्यात ऐवजी पानी हा शब्द दिसेल. बाकी ठ ऐवजी ट, चण्याची डाळ ऐवजी चन्याचं दाळ इ. अनेक वेगळी रूपे आढळतील.

**समारोप**

स्वत:ची अनेक रोचक वैशिष्ट्ये बाळगून असणारी आणि अतिशय समृद्ध साहित्याने विनटलेली तंजावरी मराठी ही मराठ्यांचे राज्य असेतोवर वर्धिष्णू राहिली. इ.स. १८५५ नंतर राजाश्रय नष्ट झाल्यावर मात्र ब्रिटिश काळापासून आजपर्यंत येथील मराठीची सातत्याने पीछेहाट होत आली आहे. कैक मराठी मंडळींनी बदलत्या काळात नोकरीधंद्यांच्या निमित्ताने दक्षिण भारतातच चेन्नई, हैदराबाद, बेंगळूर, तसेच महाराष्ट्रातही स्थलांतर केले. आज खुद्द तमिळनाडूत मराठी ही मातृभाषा म्हणून बोलणाऱ्यांची संख्या एका लाखापेक्षाही कमी आहे.

या समाजातील काहीजणांनी आपल्या भाषेची व संस्कृतीची माहिती व्हावी याकरिता अलीकडेच दक्षिणी मराठी नामक एक यूट्यूब चॅनेलही काढलेले असून, त्यावर तंजावरी मराठी बोलीतील संभाषणाचे अनेक नमुने अपलोड केलेले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा भाषासंवर्धनासाठी उत्तमरीत्या वापर केला गेल्याची जगभरात अनेक उदाहरणे आहेत, तसा तो इथेही होईल अशी अपेक्षा आहे. मराठीच्या इतर बोलींप्रमाणे ही बोलीही प्रमाणीकरण आणि जागतिकीकरणाच्या रेट्यात आज हळूहळू संपत चालली आहे. कोणे एके काळी महाराष्ट्रापासून शेकडो किलोमीटर दूर मराठीचा झेंडा मोठ्या दिमाखाने फडकत ठेवणारे हे तंजावरचे छोटेसे राज्य आणि त्यातील समस्त मराठी मंडळींचे महाराष्ट्रावर मोठे ऋण आहे. महाराष्ट्रीय असोत किंवा बिगरमहाराष्ट्रीय, काही अपवाद वगळता लोकांना याची विशेष कल्पना नसते.

भाषावार प्रांतरचनेमुळे अनेक भाषांचा पूर्वेतिहास आज नष्टप्राय झाल्यात जमा आहे. कैक भाषा यामुळे आक्रसल्या. मराठीही त्यातच समाविष्ट आहे. महाराष्ट्राबाहेर कर्नाटक, तेलंगण, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यांत मराठीभाषकांची संख्या आजही कैक लाख आहे. तमिळनाडूत तुलनेने खूपच कमी असली तरी आजही कैक हजार मराठीभाषक तिथे आहेत. मराठीचा भाषापरीघ पूर्वी आजच्यापेक्षा किती विस्तृत होता हे यावरून समजते. तंजावरची मराठी बोली हे महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक सामर्थ्याचे एक जितेजागते प्रतीक आहे. पूर्वजांचा दुरभिमान नसावा हे जितके खरे, तितकेच त्यांबद्दल अज्ञान नसावे हेही खरे. तंजावरच्या या मराठी यशोगाथेबद्दल अभ्यासकांनी बरेच संशोधन केले असले तरी सामान्य वाचकांपर्यंत ते अजून पोचावे तितके पोचलेले नाही. सदर लेखाच्या माध्यमातून त्याकामी थोडीशी तरी मदत झाली तरी लेखनामागील हेतू सफल होईल, यात कोणतीही शंका नाही.

**संदर्भ**


१. गाडगीळ, विद्या. तंजावरचे मराठी राज्य आणि संस्कृती. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. प्रथमावृत्ती २००३.

२. धनपलवार, माणिक. दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास – दाक्षिणात्य साहित्य–संस्कृतीचा मराठीशी अनुबंध. राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, प्रथमावृत्ती १९९७.

3. Ranade, Usha Ramakrishna - AComparative Study of Tanjore Marathi (1750-1850) and Modern Marathi. PhD Thesis in Linguistics, University of Pune, 1988.

4. Devendra Kuravanji - Drama in Marathi giving the Geography of the world in songs. By Serfoji Rajah. Published by S. Gopalan on behalf of TMSSM Library Committee. General Editor T. Chandrasekharan. Tanjore Saraswati Mahal Series no. 18. Tanjore, 1950.

5. South Indian Maharashtrians. Edited by N.R. Kedari Rao. The Silver Jubilee Souvenir of The Mahratta Education Fund. Madras, 1937.

६.राव, तंजावर सांबमूर्ति. मराठी ऐतिहासिक शिलालिपी, तंजावर एथील श्री बृहदीश्वराचे देउळांतली. तंजावर, १९०७.


**– निखिल बेल्लारीकर**



बोलीभाषा विशेषांक

लेख

# झाडीबोली : अध्यतन अवलोकन

डॉ. हरिश्चंद्र बोरकर

**महाराष्ट्राच्या अतिपूर्व भागाला असलेल्या भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात जी बोली बोलली जाते ती झाडीबोली या नावाने ओळखली जाते. झाडीबोलीतील शब्दांचा आढळ मुकुंदराज विरचित मराठीतील आद्य पद्यग्रंथ विवेकसिंधू आणि महिम्भट संपादित मराठीतील आद्य गद्यग्रंथ लीळाचरित्र या ग्रंथांमध्ये आढळून येतो. झाडीबोली प्रमाण मराठीचीच बोली असून तिची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत.**

**सांप्रत** बोली व विशेषत: झाडीबोली हा माझा श्वास होऊन बसला आहे. माझ्याशी बोलणाऱ्या व्यक्तीच्या जिभेवर नाचणारे शब्द व त्यांचे विभ्रम यांचे मला विचित्र आकर्षण राहिले आहे. त्यामुळे ज्यांना माझी ही सवय माहिती झाली आहे, तो माझ्याशी संवाद साधताना अगदी सहेतुक सतर्क राहून प्रमाणमराठीत बोलायचा प्रयत्न करत असतो आणि ते सोंग फार वेळ न जमल्यामुळे पुढे तो तोंडघशी पडतो. तो निघून जाताच मी आपल्या खिशातील कागद काढून त्याच्या मुखातून निघालेले वेगळे शब्द, उच्चार, प्रत्यय, लकबी, वाक्प्रचार आणि म्हणी यांची नोंद घेतो. अशीच काही निरीक्षणे मी येथे नोंदण्याचा प्रयत्न करीत आहे.

**स्वरव्यवस्थेतील अल्पव्ययता**

प्रमाण मराठीतील अनेक वर्ण झाडीबोलीत आढळून येत नाहीत. स्वरांच्या संदर्भात बोलायचे झाल्यास 'ऐ' आणि 'औ' हे स्वर या बोलीत नाहीत. 'ऐ' या स्वराऐवजी 'अई' अथवा 'य्' यांचा वापर केला जातो. अकारापूर्वी 'अई' येतो, तर अन्यत्र तो 'य्' होतो.

उदा. ऐ–अई : बैल–बईल्, सैल–सईल्

ऐ–य् : बैलावर–बयूलावर्, सैलावो–सयूलाव्ना.

त्याचप्रमाणे 'औ' या स्वराऐवजी 'अऊ' अथवा 'व्' यांचा वापर केला जातो. अकारापूर्वी 'अऊ' येतो, तर अन्यत्र तो 'य्' होतो.

उदा. औ–अऊ, :गौर–गऊर्, मौत–मऊत्

गौरीला–गव्रीलं, मौतीला–मव्तीलं..

**व्यंजनव्यवस्थेतील अल्पव्ययता**

व्यंजनांच्या संदर्भात असे दिसून येते की प्रमाण मराठीत असलेली काही व्यंजने झाडीबोलीत ऐकायला येत नाहीत. त्यांची जबाबदारी इतर व्यंजनांना स्वीकारावी लागते.

या बोलीत 'ण्' हे व्यंजन आढळत नाही. त्याचे कार्य 'न्' या व्यंजनाला पार पाडावे लागते.

उदा. आद्यस्थानी : गणित–गनीत्, जाणीव–जानीव्.

अंत्यस्थानी : तोरण–तोरन्, पाणी–पानी.

तसेच या बोलीत 'छ्', 'श्' आणि 'श्' ही व्यंजने ऐकायला मिळत नाहीत. या तिन्ही व्यंजनांची जबाबदारी एकट्या 'स्' या व्यंजनाला सांभाळावी लागते.

उदा. छ्–स् : छगन–सगन्, छोटू–सोटू

श्–स् : शंकर–संकर्, शिकणे–सिक्ना

श–स : ऋशी–रुसी, भाशण–भासन्.

तथापि, एखाद्या शब्दात आकारयुक्त 'श्' हे व्यंजन असले तर ते 'य्' या व्यंजनपासोबत संयोग साधते.

उदा. आद्यस्थानी शाख–स्याक्, शाळा–स्याडा

मध्यस्थानी मशाल–मस्याल, स्मशान्–मस्यान्

अंत्यस्थाना आशा–आस्या, तमाशा–तमास्या.

उपरोक्त ठिकाणी केवळ एक व्यंजन तब्बल तीन व्यंजनांचे उत्तरदायित्व स्वीकारते; तर येथे मात्र एकाची अनुपस्थिती भरून काढायला तिघे पुढे येताना दिसतात. 'ळ' या व्यंजनाऐवजी बहुतेकदा 'र्' हे व्यंजन सज्ज असत;. तर कधीकधी तीच कामगिरी 'ल्' आणि 'ड्' ही व्यंजने सांभाळतात.

उदा. ळ-र् काजळ-काजर्, कावळा-काव्रा.

ळ-ल् चोळणा-चोलना, भोळा-भोला

ळ-ड् पोळी-पोडी, बळीराजा-बलीराजा

**व्यंजनव्यवस्थेतील विभ्रम**

झाडीबोलीने 'य्' आणि 'व्' या अर्धस्वर म्हणविणाऱ्या व्यंजनांच्यासंदर्भात वेगळे नियम केलेले दिसून येतात. या दोन्ही व्यंजनांचा स्वरांशी असलेला अन्योन्यसंबंध आपण वर प्रारंभीच स्वरविचारात पाहिला आहे. याशिवाय आणखी अन्य प्रकारे ते संबंध ऐकायला मिळतात. 'य्' हे व्यंजन आद्यस्थानी स्वतंत्रपणे कधीच येत नाही; तर तेथे ते एकारासह येते.

उदा. एक-येक्, एकटा-येक्टा.

तसेच 'व्' हे व्यंजन ईकारासह येत नाही; तर तेव्हा ते स्वत:चे अस्तित्व त्यागते आणि आपले सर्वस्व 'ई' या स्वराला अर्पण करते. म्हणजेच केवळ 'ई' हा स्वर उरतो.

उदा. विळा-इरा, वीट-ईट्, वीस-ईस्.

पण क्रमवाचक संख्यांच्या बाबतीत या नियमाला अपवाद असतो. तेथे मात्र 'वी' हा 'व्' व्यंजनासोबत स्वरसंयोग ऐकायला मिळतो.

उदा. पाच्वी, तेर्वी, चव्दावी. .

उच्चाराच्या संदर्भात 'च्', 'ज्' आणि 'झ्' यांचे उच्चार प्रमाण मराठीत 'तालव्य' व 'दंततालव्य' अथवा 'वर्स्य' असे वेगवेगळे ऐकायला मिळतात.

उदा. १. तालव्य : चरित्र, जग, जन, जय, जामात, जेवण, झेल, निर्झर.

२. दंततालव्य अथवा वर्स्य : चमचा, चारा, चोर, चांदोबा, चाकर, चोच, जावई, झरा, झाड, झोप.

पण झाडीबोलीला हे द्वैत अजिबात मान्य नाही. तर ती या गटातील दोन्ही प्रकारच्या आपल्या यच्चयावत शब्दांकरिता म्हणजेच उपरोक्त उभय गटांकरिता केवळ 'दंततालव्य' अथवा 'वर्स्य' उच्चार कायम ठेवते.

उपरोक्त उदाहरणांत प्रमाण मराठीला न जुमानता वरीलप्रमाणे दोन उच्चार न मान्य करता समान उच्चारस्थान स्वीकारणारी झाडीबोली 'ड्' या व्यंजनांच्या संदर्भात मात्र वेगळे वर्तन करून दोन उच्चार स्वीकारते. शब्दाच्या आद्यस्थानी अथवा जोडाक्षरासोबत नेहमीचा प्रमाण मराठीप्रमाणे ऐकायला येणारा 'ड्' या व्यंजनाचा उच्चार झाडीबोलीत ऐकायला मिळतो.

उदा. १. आद्यस्थानी : डगर्, डाका, डिक्रा, डुक्कर्, डोक्सा.

२. जोडाक्षरासोबत : आक्डा, आंग्डा, भांडा, भोब्डा.

तथापि, अन्यत्र मात्र त्याचा उच्चार हिंदीतील खाली बिंदी असलेल्या 'ड' या व्यंजनासारखा होतो.

उदा. मध्यस्थानी : अडानी, वाडई, वाडीव्

अंत्यस्थानी : झाड्, वाडा, घोडी.

झाडीबोलीत उच्चारसुलभतेच्या दृष्टिकोनातून आद्यस्थानी जोडाक्षर अथवा संयुक्त व्यंजन आढळत नाही. आद्यस्थानीच्या जोडाक्षराऐवजी दोन अवयव विभक्त होताना दुसरा अवयव नंतरच्या व्यंजनासोबतत संयोग साधतो.

उदा. प्रयाग-पऱ्याग, प्रवेश-पर्वेस.

तथापि, आद्यस्थानासंदर्भातील उपरोक्त नियमास अपवाद 'य्' या अर्धस्वराचा आहे. येथे 'य्' व्यंजनासोबत अन्य व्यंजन आद्यस्थानी संयोग साधू शकते.

उदा. ग्यान्, त्याचा, न्याव्, स्याडा.

झाडीबोलीत महाप्राण व्यंजनांना अत्यल्प वाव देण्यात आल्याचे आढळून येते. कारण ती व्यंजने केवळ शब्दाच्या आद्यस्थानी येत असतात. अन्यत्र संबंधित अल्पप्राण व्यंजन त्याचे स्थान ग्रहण करीत असते.. म्हणजेच 'ख्', 'घ्', 'झ्', 'ठ्', 'ढ्', 'थ्', 'ध्', 'फ्', आणि 'भ्' या महाप्राण व्यंजनांचे स्थान अनुक्रमे 'क्', 'ग्', 'ज्', 'ट्', 'ड्', 'त्', 'द्', 'प्', आणि 'ब्' ही अल्पप्राण व्यंजने स्वीकारतात. उदा.

| क्रमांक | महाप्राण | अल्पप्राण | प्र. मराठी | झाडीबोली |
|---|---|---|---|---|
| १. | 'ख्' | 'क्', | साखर | साकर् |
| २. | 'घ्', | 'ग्', | वाघ | वाग् |
| ३. | 'झ्', | 'ज्', | वांझ | वांज् |
| ४. | 'ठ्', | 'ट्', | विठ्ठल | इट्टल् |
| ५. | 'ढ्' | 'ड्', | पिढे | पिडा |
| ६. | 'थ्', | 'त्', | कथा | कता |
| ७. | 'ध्', | 'द्' | अर्धा | अर्दा |
| ८. | 'फ्', | 'प्', | वाफे | वापा |
| ९. | 'भ्', | 'ब्', | गाभण | गाबन् |

**संधी : वेगळे प्रयोग**

आपण बोललो ते पूर्णपणे सत्य आहे हे सांगण्याकरिता

'देवाशपथ' म्हणण्याची प्रथा प्रमाणमराठीत रूढ आहे. झाडीबोलीनेही या प्रथेचे अनुकरण केले असले तरी 'शपथ' हा शब्द न वापरता त्याऐवजी 'आन्' हा पर्याय ती उपयोगात आणते. ती येथेच थांबत नाही, तर चक्क त्यापूर्वी येणाऱ्या 'ची' या षष्टीच्या प्रत्ययाशी संधी साधून जाते. म्हणजेच 'देवाची आन्' असे न म्हणता 'देवाच्यान्' असा उच्चार करून आपले थेट संस्कृतशी कसे सख्य आहे हे दाखवून देते. साधारणपणे बोली संधीचा वापर कमी प्रमाणात करते, हा नियम असला तरी येथे मात्र संस्कृतपेक्षा वेगळी संधी स्वीकारून झाडीबोलीने तिच्यावर कुरघोडी केली आहे. त्यामुळे 'झाडीबोली ही संस्कृतची आई आहे' या मी नित्य मांडत असलेल्या प्रमेयावर पुन्हा शिक्कामोर्तब झाले आहे. याशिवाय 'बापाच्यान्' व 'मायेच्यान्' हे नवीन संधी घडवून आपल्या आईवडिलांचादेखील झाडीबोली उद्धार करून जाते.

असाच वेगळा संधी क्रियापदांच्या संदर्भातही झाडीबोली करताना दिसून येते. 'गेला होता', 'देलन् होतन्' अशी विभक्त युग्मे वापरण्यापेक्षा त्यांचे संधी करून मीलन घडविणे तिला उचित वाटते. 'गेल्ता', 'देल्तन्' असे बोल या बोलीत आपल्या कानी येतात. शहरी माणसारखा निवांतपणा रानावना निवास करणाऱ्या ग्रामीण परिसराच्या नशिबात नसतो. त्यामुळे असे घडते. म्हणूनच बोलणारास झालेली घाई हे संधीचे महत्त्वाचे कारण म्हणावे लागते.

**शब्दांची सामासिकता**

संधीप्रमाणेच सामासिकतादेखील बोलीत अल्प प्रमाणात आढळून येते, असे विधान केले जाते. पण झाडीबोली या नियमासही अपवाद ठरणारी आहे. किंबहुना प्रमाण मराठीत न आढळून येणारे आणि विग्रह करता न येणारे अनेक सामासिक शब्द या बोलीत नित्य कानावर पडत असतात.

खळ्यावर धानाचे चुरणे म्हणजे मळणी करताना रात्रौ जेवणाची ठरावीक वेळ ठरलेली असते. आभाळात एक विशिष्ट तारा दिसताच आपले काम बंद करून सारे भोजनास बसतात. त्यामुळे या चांदणीला 'जेवन्-चाल्नी' असे नाव दिले गेले आहे. या सामासिक शब्दाचा समावेश पारंपरिक व्याकरणातील समासांच्या कोणत्या प्रकारात करावा हा प्रश्नच आहे. 'रात्री जेव्हा जेवण करावयाचे तेव्हा आभाळात असणारी चांदणी' असा प्रदीर्घ विग्रह हा लहानशा सामासिक शब्दाचा करावा लागेल.

जेवणाशी संबंधित आणखी एक असाच विचित्र सामासिक शब्द झाडीबोलीत प्रचलित आहे. तो म्हणजे 'जेवन्-रात्' हा होय. याचा विग्रह 'जेवायची वेळ रात्री जेव्हा होत असते, ती वेळ' असा करता येईल. पण त्यास समासाच्या कोणत्या प्रकारात समाविष्ट करावयाचे हा प्रश्नच आहे.

वर जेवणासंबंधी अन्य सामासिक शब्द पाहिला. आता चांदणीचा समाचार घेऊ या. माणूस आहे म्हणजे त्याला रोग हे आलेच. या रोगांना प्रमाणमराठीत जशी वेगवेगळी नावे आहेत, तशीच ती झाडीबोलीनेही त्यांना स्वत:ची नावे दिली तही आहेत. त्यांच्यापैकी एक नाव आहे 'चाल्नी-अंदारा'. प्रमाणमराठीतील 'रातआंधळेपण' या शब्दाला हा पर्याय झाडीबोलीने शोधून काढला आहे. प्रमाणमराठीप्रमाणे झाडीबोलीने आंधळेपणाचा स्वीकार न करता त्याऐवजी अंधाराची निवड केली आहे; तर रात्रीऐवजी रात्रीला आकाशात दिसणाऱ्या चांदणीचा उल्लेख करून काव्यमयता साधली आहे. शिवाय कोणाच्या व्यंगाचा उल्लेख करू नये या मानवतेच्या नियमाचे तिने पालन केले आहे. वैद्यकशास्त्रानुसार मूळात ती व्यक्ती पूर्णपणे आंधळी नसते, तर तिला केवळ रात्री दिसत नाही. त्यामुळे सरळ त्यास 'आंधळा' संबोधणे सभ्यपणाच्या चौकटीत बसणारे कदापि नाही. हे ओळखून झाडीबोलीने अतिशय रूक्ष असलेल्या वैद्यकशास्त्रातही काव्यमयता आणायचा प्रयास येथे केलेला दिसून येतो. पण समासविग्रह आणि नामकरण यासंदर्भात काय करायचे हा प्रश्न व्याकरणकारांपुढे निश्चित निर्माण करून ठेवला आहे.

झाडीपट्टी आपल्या घनदाट अरण्याकरिता आणि अभयारण्यांकरिता जगप्रसिद्ध आहे. या हिरव्यागार रानात भेटणारे विविध प्राणी सर्वांनाच आकर्षित करीत असतात. या प्राण्यांची नावेदेखील झाडीबोलीने स्वत:च निर्माण केली आहेत. त्यांच्यापैकी एका प्राण्याचे नाव आहे 'घोड-नील्'. हा शब्द प्रमाणमराठीतील 'नीलगाय' याचा पर्याय आहे. झाडीबोलीने प्रमाणमराठीतील आद्यस्थानी आलेला 'नील' शब्द अंत्यस्थानी तर हटविला आहेच; शिवाय 'गाय' या प्राण्याऐवजी 'घोडा' पुढे केला आहे. प्रमाणमराठीत आद्यस्थानी विशेषण आल्यामुळे तो स्पष्टपणे कर्मधारय समास ठरतो. पण झाडीबोलीने शब्दांची उचलबांगडी केल्यामुळे त्याला समासाच्या कोणत्या कप्प्यात ढकलावे हा यक्षप्रश्न आहे.

झाडीपट्टीतील सासुरवाशीण सायंकाळी स्वयंपाक आटोपल्यानंतर कुटुंबीयांना भोजन वाढण्यापूर्वी 'लाहान्देव् मोटादेव्, खोड्याखोड्बा, साक्राबाई दुलाबाई...' असा मंत्र पुटपुटत दिव्याच्या ज्योतीला अथवा वातीला अन्नाची चार

शिते नैवेद्य म्हणून अर्पण करीत असते. या विधीला 'सीत्-वात् करक' असे नामाभिधान झाडीबोलीने प्रदान केले आहे. खरे म्हणजे येथे दोन शब्दांनी आपले स्थान बदलले आहे, असे दिसून येते. 'वात्-सीत्' अशी मांडणी असती तर 'वातीला शीत देणे' असा त्याचा विग्रह करता आला असता. पण आता तर येथे सारेच विपरीत घडून आलेले दिसून येते. अर्थात 'सामासिक शब्दातील घटकांचा स्थानबदल' असे या प्रवृत्तीला पारिभाषिक नाव देऊन मोकळे होता येईल.

**नामांसंदर्भात वेगळेपण**

प्रमाणमराठीत व्यक्तीला सन्मानपूर्वक बोलायचे असेल तर त्याकरिता 'राव' हा शब्द सामान्यपणे वापरतात. आता 'साहेब' पुढं होत आहे. अनेकदा 'रावसाहेब' अशीही पुनरावृत्ती होताना दिसते. पूर्वी 'जी' हा प्रत्यय अतिशय लोकप्रिय असायचा. झाडीबोलीने आजही तोच 'जी' कायम ठेवून आपली परंपरा अबाधित ठेवली आहे. पण एखाद्याला उद्धटपणे बोलायचे असले तर त्याच्या मूळ नामाला 'या' प्रत्यय लावयची जुनी प्रथा आजीही सांभाळते आहे. तसे प्राचीन मराठीत 'विठ्या, मायेच्या कारट्या' ही संत जनाबाईंनी विठ्ठलाला ओवाळलेली विशेषणे येथे आठवतील. या वळणाची झाडीबोलीतील उदाहरणे अशी : गोइंदा-गोंद्या, विठ्ठल-इट्या, सिंदे-सिंद्या, सेंडे-सेंड्या. गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव येथे इंग्रजांच्या गोळ्यांना बळी पडलेल्या हुतात्म्यांची नावे जाम्या व तिम्या. अशी आहेत. हिंदीत या प्रत्ययापूर्वी 'इ' स्वराचा आगम करण्याची प्रवृत्ती आढळून येते. त्यामुळे तेव्हा हीच रूपे गोंदिया, इटिया, सिंदिया अशी होतात. मूळ प्रतिष्ठाप्राप्त विशेषनामांचे हे विकृतिकरण होय, असे या प्रवृत्तीसंदर्भात विधान करता येईल.

लिंगाच्या संदर्भात झाडीबोली अनेकदा आपली वेगळी वाट पत्करताना दिसते. प्रमाणमराठीतील 'जागा' आणि 'स्याडा' ही स्त्रीलिंगी नामे आकारांत असल्यामुळे झाडीबालीने त्यांना थेट पुल्लिंगाच्या गटात सोडले असून त्यांची सामान्यरूपे 'जाग्या', 'स्याडा' अशी केली आहेत. तर 'दई' या शब्दात शेवटी 'ई' असल्यामुळे त्यास स्त्रीलिंग बहाल केले आहे. झाडीबोलीने केलेले हे लिंगपरिवर्तनाचे कसब शस्त्रक्रियानिपुण निष्णात शल्यचिकित्सकालाही आश्चर्यचकित करणारे आहे.

इकारांत पुल्लिंगी शब्दाचे सामान्यरूप याकारांत करावे हा प्रमाणमराठीतील नियम झाडीबोलीने इतका कंठस्थ केला आहे की ती थेट 'नंदी' या शब्दाचे सामान्यरूप 'नंद्या' असे करून टाकते, तर 'हत्ती' या नामाचे सामान्यरूप 'हत्त्या' असे सैनिकी शिस्तीने करून प्रमाणमराठीच्या व्याकरणाची हत्या करते.

झाडीपट्टी रंगभूमी आपले सातत्य आणि वैविध्य याकरिता अवघ्या जगभर प्रख्यात आहे. नाटक हा येथील जनतेचा केवळ छंद नसून संस्कार होऊन बसला आहे. पण लिंगाच्या संदर्भात 'नाटक' या नामाची अक्षरश: त्रेधातिरपीट उडाली आहे. कारण हा सर्वप्रिय शब्द प्रमाणमराठीने चक्क 'नपुंसकलिंगी' म्हणून स्वीकारला आहे; तर हिंदीने त्याचे लिंगपरिवर्तन करून त्यास 'पुल्लिंगी' बनवले आहे. झाडीबोलीने या दोघांनाही नाकारून त्याला 'स्त्रीलिंगी' रूपाने सजविले आहे. प्रमाणमराठी, हिंदी व झाडी यांचा 'नाटक' या शब्दांच्या लिंगासंदर्भात नपुंसकलिंगावरून पुल्लिंग आणि पुढे स्त्रीलिंग असा हा प्रवास आश्चर्यात टाकणारा आहे. आपल्या आवडत्या व प्रिय व्यक्तीला स्त्रीलिंगी संबोधणे हा मानवी स्वभाव येथे झाडीबोलीने योग्य प्रकारे जपला आहे... विठाईमाउली, भारतमाता यांच्यासारखा.

झाडीबोलीतील आकारांत पुल्लिंगी नामास लागणारा लघुत्वदर्शक 'उली' परप्रत्यय अनेक बाबतीत वेगळा व लक्षवेधी आहे. उदा. : इरा-इरुली, कोटा-कोटुली, गाडा-गाडुली, टंग्या-टंगुली, ढिरा-ढिरुली, पारा-पारुली, पिडा-पिडुली, भाना-भानुली, मारा-मारुली, मोरा-मोरुली अशी विचित्र उदाहरणे या बोलीत आढळतात. इंग्रजीतील स्मज या लघुत्वदर्शक प्रत्ययाची आठवण करून देणारा झाडीबोलीतील हा प्रत्यय आहे, असे म्हणता येईल.

याशिवाय झाडीबोलीत नामाचे लघुत्व दर्शविण्याकरिता काही पुल्लिगी अकारांत किंवा आकारांत नामांना इकारांत स्वरूप देऊन त्याचे लघुत्व दर्शविण्याकरिता स्त्रीलिंगात रूपांतर करण्याची प्रथा झाडीबोलीत दिसून येते.

उदा. : टाट्-टाटी, घंटा-घंटी, वाटा-वाटी.

**विशेषणांचे विशेष**

झाडीबोलीने स्वत:ची अनेक विशेष विशेषणे निर्माण केली आहेत. उदा. बाहाडा, सिंग्रा, उदा, खय्रा, खऊट्, पोकर्कास्ट्याा, हड्काया, उलट्गुब्या, डऊर्, आसल्, अनुला, हेंद्डा, सेव्, खर्, सडा, सड्संट्या... अशी कितीतरी वेगळी विशेषणे झाडीबोलीत नित्य कानांवर पडत असतात.

प्रमाणमराठीत 'सोपा' हे आकारांत विशेषण नामाच्या लिंगवचनानुसार बदलत असते. पण झाडीबोलीने त्याचे थेट 'सोपी' हे इकारांत विशेषण स्वीकारले आहे. त्यामुळे 'सोपी काम्', 'सोपी गोस्ट' अशी विशेषण-विशेष याची संगती कानावर पडत असते.

झाडीबोलीतील संख्याविशेषणांच्या संदर्भात बोलायचे म्हणजे अर्दा, पाऊन्, सव्वा, अडीच् या अपूर्ण संख्या या बोलीत ऐकायला मिळवात. येथे 'येक्' ते 'ईस्' या संख्यांचा नेहमी वापर होत असला तरी 'ईस्' या संख्येनंतर मात्र अनेकदा त्याच्या पटीचा पर्यायाने वापर करण्याची प्रवृत्ती दिसून येते. 'दोन् इसा', 'तीन् इसा' असा उल्लेख करून त्यानंतर एक् ते नऊ या संख्यांचा वापर होतो. जसे पंचेचाळीस या संख्येकरिता 'दोन् इसा अना पाच' असे बोलले जाते. अनेकदा 'ईस्' ऐवजी 'खंडी' या नामाचा उपयोग केला जातो. 'दोन् खंड्या', 'तीन खंड्या' असे म्हटले जाते. कुडव व खंडी ही धान मोजण्याची मापे आहेत. वीस कुडव म्हणजे एक खंडी असे प्रमाण असल्यामुळे आणि नेहमी कुडवाने धान मोजले जात असल्यामुळे ही प्रथा प्रचलित झाली असावी. धान मोजताना पहिल्या कुडवाला 'येक'ऐवजी 'लाभ' असा पर्याय वापरण्याची प्रथा येथे दिसून येते.

संख्यादर्शक विशेषणातील पूर्ण संख्यांना आगम होणारा 'टन' अथवा 'ठन्' हा परप्रत्यय झाडीबोलीचे वेगळेपण अधोरेखित करणारा आहे. 'दोन्टन्', 'पाच्टन्', बाराटन्' अशी वेगळी विशेषणे या बोलीत ऐकायला मिळत असतात. येथे 'केवळ' या विशेषणाचे कार्य 'टन्' हा प्रत्यय करून जातो असे दिसते. आपल्या मनाप्रमारे रक्कम किंवा वस्तू मिळाली नाही तर 'केवळ एवढेच' या अथाने अशी रचना बोलणाऱ्याच्या मुखातून निघत असते. एकप्रकारे मनातील अतृप्तता व असंतोष यातून प्रकट होत असतो. 'असंतुष्टतादर्शक संख्याविशेषण' असे पारिभाषिक नामाभिधान या वेगळ्याा विशेषणांकरिता वापरता येईल. परंपरागत व्याकरणाचे अनुपालन करून 'च' या एकत्वदर्शक निपाताच्या पंगतीत 'टन' या प्रत्ययास बसवून त्यास नियमबद्ध करता येईल. झाडीबोलीने प्रमाणमराठीला दिलेली ही छोटीशी पण अपूर्व देणगी म्हणावी लागेल.

संख्याविशेषणांतील पूर्ण संख्यांसोबत अनेकदा आढळणारा याच जातीचा एक प्रव्यय 'क' किंवा 'अक' हा आहे. झाडीपट्टीत अनेकदा 'पाचक्', 'बाराक्', 'इसक्' अशी या प्रत्ययासहीत पूर्ण संख्यांची रूपे ऐकायला मिळतात. प्रमाण मराठीत याचा अनुवाद 'सुमारे पाच', 'सुमारे बारा', 'सुमारे वीस' असा करता येईल. म्हणजेच 'सुमारे' हे विशेषण वापरून प्रमाणमराठीला जे व्यक्त करावयाचे असते, ते झाडीबोली केवळ 'क' या प्रत्ययाचा वापर करून पार पाडते.

विशिष्ट गंध अथवा वास यांचे वर्णन करणारी काही वेगळी गुणवाचक विशेषणे झाडीबोलीत नित्य कानांवर पडत असतात. त्यांचा येथे उल्लेख करावा लागेल. इस्ड्यान्, कुव्ल्यान्, घुट्ऱ्यान्, बोच्ड्यान्, मोयान् अशी काही उदाहरणे देता येतील.

**क्रियारूपातील प्रक्रिया**

झाडीबोली मूळ क्रियापदापासून प्रयोजक क्रियापद निर्माण करताना प्रमाणमराठीतील प्रचलित नियमाचे परिपालन करताना दिसत असली तरी अनेकदा तिने आपले वेगळे वळण घेतले आहे. प्रमाणमराठीत मूळ क्रियापदास प्रयोजक रूप देताना त्यात वृद्धी होत असली तरी झाडीबोलीत भिन्न रूपदेखील आढळून येते. येथे 'कोंडान्ऱा' हे क्रियापदाचे मूळ रूप प्रचलित असून 'कोंन्डा' हे त्याचे प्रयोजिक रूप आहे. प्रमाण मराठीत 'कोंडारना' हे रूप ऐकायला मिळत नसून केवळ 'कोंडणे' हे रूप प्रचलित असून त्यास 'सकर्मक क्रियापद' या श्रेणीत कोंडलेले आढळून येते.

याशिवाय झाडीबोलीत 'गर्ना-गान्रा', 'चर्ना-चार्ना', 'जर्ना-जार्ना', 'मरना-मार्ना' ही रूपे प्रचलित असली तरी प्रमाणमराठीला तयार न करता आलेली अन्य रूपेही या बोलीत आढळून येतात. प्रमाणमराठीत 'गाडणे' हे प्रयोजक ऐकायला मिळते. पण त्याचे मूळ रूप मात्र प्रचारात दिसत नाही. झाडीबोली मात्र 'गन्डा' हे मूळ रूप 'बोचणे' या अर्थाने वापरते. म्हणजे 'झेंडा गाडना' हे सर्वांना कळेल, पण 'काटा गड्ला' हे झाडीबोलीतील वाक्य कळणार नाही. तसेच प्रमाणमराठीत 'सरणे' हे क्रियापद प्रचारात असले तरी त्याचे प्रयोजक रूप मात्र तिने तयार केले नाही. झाडीबोलीने 'सारका' हे प्रयोजक रूप 'संपविणे' या अर्थाने सिद्ध केले आहे. त्यातही 'सार्ना' हे क्रियापद 'आंघोळीकरिता पाणी देणे' असा विशेष अर्थ धारण करते.

प्रयोजकाच्या संदर्भात झाडीबोलीने काही फसवी रूपे घडविली आहेत. वर 'सर्ना-सार्ना' या जोडीतील 'सार्ना' हे प्रयोजक रूप 'आंघोळीकरिता पाणी देणे' हा नित्याचा सकाळी कानांवर पडणारा अर्थ लक्षात घेतल्यास असेच फसवे आहे. अर्थात ही फसवणूक येथेच थांबत नाही. कारण ते केवळ युग्म नसून 'सर्ना-सार्ना-सारव्ना' असे चक्क त्रिकूट आहे. अर्थाच्या दृष्टीने वरील युग्माशी या तिसऱ्या अनाहुताचा लवलेश संबंध नाही. आणि असलाच तर केवळ नावापुरता आहे, असे म्हणता येईल. कारण त्याचा अर्थ 'घराच्या जमिनीला किंवा भिंतीला शेणाचे द्रावण चोपळणे' असा होतो. आणि केवळ झाडीबोलीतच नाही, तर प्रमाण मराठीतही हा शब्द याच अर्थाने प्रचलित

आहे. अन्य उदाहरण द्यावयाचे झाल्यास 'आर्ना-आरव्ना' हे युग्मदेखील असेच फसवे आहे. 'आरव्ना' म्हणजे 'आवळणे'. पण 'आरव्ना' हे त्याचे प्रयोजक होऊ शकत नाही. कारण त्याचा अर्थ 'कोंबड्याने बांग देणे' असा प्रमाणमराठीत सांगता येईल. याच फसवेगिरीचे अन्य उदाहरण 'पेना-पाज्ना-पाजव्ना' हे त्रिकूट आहे. यातील प्रथम स्थानी मूळ क्रियापद असून दुसरे त्याचे प्रयोजक असून ते प्रमाण मराठीतदेखील प्रचलित आहे. पण 'पाजव्ना' हे रूप शब्दसाधर्म्यामुळे 'पाज्ना'चे प्रयोजक वाटत असले तरी ते स्वतंत्र सकर्मक क्रियापद आहे. कारण त्याचा प्रमाण मराठीत अर्थ 'शस्त्रास धार लावणे' असा होतो.

आवश्यकतेनुसार वेगळी क्रियापदे निर्माण करण्यासंदर्भात झाडीबोलीची सृजनक्षमता विलक्षण आहे. त्याकरिता आणखी एक पुरावा पहा. प्रमाणमराठीप्रमाणे भोजनोत्तर हात धुण्याच्या प्रक्रियेकरिता 'आचवना' क्रियापद झाडीबोलीने वापरले आहे. भोजनोत्तर हात धुताना नेहमीच्या 'धुणे'ऐवजी हे वेगळे क्रियापद उपयोगात आणणाऱ्या प्रमाण मराठीला शौच केल्यानंतर ढुंगण धुण्याच्या क्रियेकरिता भिन्न क्रियापद निर्माण करण्याची आवश्यकता वाटली नाही. पण झाडीबोली मात्र अशी विसरभोळी नाही. तिने त्याला पर्यायी क्रियापद 'सोसव्ना' हे निर्माण करून आपली प्रचंड शब्दप्रसवक्षमता सिद्ध केली आहे.

प्रमाणमराठीला 'निघणे' या क्रियापदाला प्रयोजक रूप देता आले नाही. तर निघणे-काढणे या प्रमाणमराठीतील विजोड युग्मापेक्षा झाडीबोलीने वेगळे प्रयोजक 'हिट्ना:-हेड्ना' हे प्रचारात आणले आहे. येथे प्रमाणमराठीत 'निघणे' या क्रियापदाकरिता झाडीबोलीने 'हिट्ना' हा उचित पर्याय स्वीकारून त्याचे प्रयोजक रूप 'हेड्ना' निर्माण केले आहे. या प्रक्रियेत तिने प्रचलित नियमाचेही अनुपालन केल्याचे दिसून येते.

झाडीबोलीत क्रियापदाच्या संदर्भात अभ्यस्ततेची अनेक वेगळी उदाहरणे आढळून येतात. 'मी बईल् कलव्कुलव् केलू ना घरी आलू.' या वाक्यातील 'कलव्-कुलव्' हे अभ्यस्त क्रियापद प्रमाणमराठीत शोधूनही सापडणार नाही. याशिवाय केचल्-कुचल्, खुरप्-खारप्, पाकड्-पुकड्, मोड्-माड्, सिव्-साव् इत्यादी. आश्चर्य म्हणजे दुसऱ्या पदातील ही परिवर्तने अ-उ, आ-उ, इ-आ, उ-आ, ए-उ, ओ-आ या नियमांनुसार घडत असतात असे उपरोक्त उदाहरणांवरून सिद्ध होते.

क्रियापदाच्या अभ्यस्ततेचा अन्य प्रकार झाडीबोलीत आढळून येतो. 'येतायेवालं तो कामालं लागला.' 'आल्याक्षणीच' किंवा 'येताबरोबर' याला पर्यायी ही रचना आहे. जाता-जावालं, निंग्ता-निंगावालं, फुट्ता-फुटावालं, पेट्ता-पेटावालं, बोंबल्ता-बोंब्लावालं अशा प्रकारची काही अन्य उदाहरणे यासंदर्भात सांगता येतील.

झाडीबोलीत क्रियापदाला आगम होणरा 'सीन्' प्रत्यय तिचे विशेष वेगळेपण दर्शविणारा आहे. झाडीबोलीत 'मी जावासीन् ना मा मरावासीन्.' असे अनेकदा कानावर पडत असते. 'मी पोहचत नाही तोच आई मरण मावली,' असे त्याचे प्रमाणमराठीत भाषांतर करता येईल. ही रचना वेगळी असल्यामुळे आणि ती प्रमाणमराठीत आढळत नसल्यामुळे मी 'अर्थविचार' या प्रकरणात 'संयोगार्थ' या स्वयंनिर्मित पारिभाषिक नामाभिधानाने माझ्या शोधप्रबंधात ती नोंदली आहे. याची आणखी काही उदाहरणे...अ. मी गोटा मारावासीन् ना आंबा पडावासीन्.

आ. त्याना धान् पेरावासीन् ना पानी पडावासीन्.

इ. तिना भात् चारावासीन् ना पोरगा वकावासीन्.

प्रमाणमराठीत अशी रचना प्रचलित नसली तरी इंग्रजीतील 'No sooner deed... than' या सर्वश्रुत वाक्प्रचाराशी ती सख्य सांगणारी आहे. या संदर्भात एक आठवण सांगता येईल. एकदा मला दै. 'महाराष्ट्र टाइम्स'ने झाडीबोलीसंबंधात लेख मागितला होता. 'झाडीबोली : काही वैशिष्ट्ये' या शीर्षकाचा लेख तयार करून मी त्यांच्याकडे पाठविला. त्यांना या लेखातील 'मी जावासीन् ना मा मरावासीन्' हे वाक्य इतके आवडले की तेच त्यांनी त्या लेखाचे शीर्षक म्हणून स्वीकारले.

**क्रियाविशेषण अव्यये**

अभ्यस्त क्रियाविशेषणाच्या संदर्भात झाडीबोलीने अभूतपूर्व वळण स्वीकारलेले दिसून येते. 'सर्' या मूळ शब्दाची पुनरावृत्ती करून त्यापासून 'सर्सर्' असे पुनरावृत्तिवाचक क्रियाविशेषण प्रमाणमराठीत आढळते. शिवाय त्याच शब्दाला 'कन्' प्रत्यय लावून 'सर्कन्' हे अन्य क्रियाविशेषण येथे वापरले जाते. झाडीबोलीनेदेखील या दोन्ही पद्धतीने क्रियाविशेषणे सिद्ध करण्याची प्रवृत्ती स्वीकारली आहे. तथापि, तिचे केवळ त्या रूपांवर समाधान झालेले दिसत नाही. ती आणखी वेगळी तीन क्रियाविशेषणे तयार करते. त्या मूळ शब्दाचे ओकारांत रूप करून त्याची पुनरावृत्ती स्वीकारते. त्यामुळे 'सरोसरो' हे वेगळे क्रियाविशेषण या बोलीत ऐकायला मिळते. पण एवढ्यावरच तृप्त होईल ती झाडीबोली कसली? तिने पुन्हा त्या शब्दाला 'ना' आणि 'नारी' ही प्रत्यये आगम करून

दुपटीने वाढ केली आहे. ती याच क्रियाविशेषणाचे 'सऱ्ना' आणि 'सऱ्नारी' ही दोन रूपे वापरते. अशाप्रकारे प्रमाण–मराठीतील प्रचलित दोन रूपांपेक्षाही आणखी त्याची तीन नवीन रूपे योजून तिने आपले अनन्यसाधारणत्व प्रकट केले आहे. अशाप्रकारे एका शब्दाची तीन रूपे धारण करून आपली शब्दसंपदा वाढविणारी झाडीबोली ही संपूर्ण विश्वातील एकमेव बोली असावी.

**'च्' निपाताचा भिन्न उपयोग**

झाडीबोलीत शब्दाची पुनरावृत्ती करून प्रथम शब्दात 'च' हा निपात संलग्न करण्याची वेगळी प्रवृत्ती आढळून येते. 'ईईर् गोडच् गोड्, पानी खोलच् खोल्' हे वाक्य लहान मुलांच्या खेळात नेहमी कानांवर पडते. आधिक्य दर्शविण्याकरिता येथे च या मूळच्या एकत्वदर्शक निपाताचा उपयोग केल्याचे दिसून येते. यात खूप, भरपूर, अधिक असा अर्थ अभिप्रेत आहे. त्यामुळे 'आधिक्यवाचक निपात' असे वेगळे पारिभाषिक नाव या भेदाकरिता प्रदान करता येईल. नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या चारही प्रकारांमध्ये या नवीन निपाताचा आगम करता येतो. उदाहरणार्थ......

१. नाम : गावाच् गावा, घराच् घरा, पोराच् पोरा.

२. सर्वनाम : तोच् तो, तेच् ते, त्याच् त्या.

३. विशेषण : काराच् कारा, गोडच् गोड्, लंबाच् लंबा.

४. क्रियापद : खाताच् खाते, जाताच् जावा, बोल्ताच् बोल्ते.

**कोरोना काळातील उपलब्धी**

संशोधन कधीच पूर्ण नसते. ते सतत वृद्धिंगत होत असते, बदलत असते. त्यास अनेकदा विशिष्ट प्रसंग कारणीभूत होत असतात. कोरोनामुळे संपूर्ण जीवनात झालेले परिवर्तन अनेक वेगळ्या गोष्टी सांगून गेले आहे. भाषिक संदर्भातही मला काही वेगळे शब्द ऐकायला मिळाले. ते तसे वेगळे नव्हते. पण या काळात त्यांनी स्वत:कडे विशेष लक्ष वेधून घेतले. अशा अनेक शब्दांपैकी केवळ तीन शब्दांचा परिचय येथे करून देणे आवश्यक ठरेल.

या कोरोनाच्या काळात अनेकदा मुखांतून पुढील वाक्य ऐकायला मिळत होते. 'माऱ्निका तो वाचंल् मनत् होतास्. कोटी वाच्ला?' यातील संपूर्ण वाक्य कळले. पण त्यातील 'माऱ्निका' हा शब्द मला वेगळा वाटला. या शब्दाच्या वाक्यातील स्थानाच्या संदर्भात बोलायचे झाल्यास हा शब्द वाक्याच्या प्रारंभी वापरलेला दिसून येतो. पुढल्या व्यक्तीच्या म्हणण्यातील अपयश किंवा खोटारडेपणा प्रकट करण्याकरिता या वेगळ्या शब्दाचा वापर झाडीबोलीत नित्य होत असतो. खूप बढाई मारणाऱ्या व्यक्तीच्या पोकळ आश्वासनाचा फोलपणा उघड करण्याकरिता हा शब्द योग्य कामगिरी पार पाडत असतो. याला पर्यायी शब्द प्रमाणमराठीत तर आढळला नाहीच; पण इंग्रजीतही कानावर आला नाही. 'माऱ्निका पय्ला नंबर् येयेल् मनत् होतास्. मंग् नापास् काहा झालास्?' असे उद्गार पोकळ वल्गना करून आपल्या पालकाची फसवणूक करणाऱ्या आपल्या मुलाची झाडाझडती घेणाऱ्या झाडीपट्टीच्या अनेक पालकांच्या मुखांतून ऐकायला मिळतात. आणखी काही उदाहरणे...

अ. माऱ्निका मोट्यान् फसल् होयेल् मनत होता. कोटी आये तं?'

आ. माऱ्निका निस्ता लवत् होतास घोड्याच्यावानी. आता का सक्ती पेट्ली?'

इ. माऱ्निका पोऱ्गा होयेल् मनत् होतास्. पर् पोऱ्गीच् झाली.

याच काळात आणखी एक वेगळा शब्द ऐकायला मिळाला. 'तो काना बुहू दिसाचा बेमार् होता.' हे ते दखलपात्र वाक्य आहे. यातील 'काना' हा शब्द विशेष दखलपात्र म्हणावा लागेल. प्रमाणमराठीत या शब्दाला पर्याय द्यायचाच आला तर 'असे म्हणतात की' असा विस्तृत सांगता येईल. पण परंपरागत व्याकरणात त्याला कोठे जागा द्यावी हा प्रश्नच आहे. अर्थाचा विचार करता 'काना' हा शब्द झाडीपट्टीतील 'कानोबा' या लाडक्या देवाशी संबंधित निश्चित नाही. हा 'काना' वाक्यात कोठे बसलेला असेल याचा भरवसा नाही. याची वाक्यातील निवासस्थाने तीन आहेत. वरील वाक्यात तो कर्त्याच्या नंतर आहे. शिवाय कधी तो कर्त्याच्या पूर्वी म्हणजे वाक्याच्या आद्यस्थानी विराजमान झालेला असतो; तर कधी वाक्याच्या शेवटी अगदी पूर्णविरामाच्या पूर्वी त्याचे वास्तव्य दिसून येते. उदाहरणार्थ...

अ. आद्यस्थानी : काना पोऱ्गी पुरामंदी वाहून् गेली.

आ. कर्त्यानंतर : त्यालं काना लोकाय्ना मस्त झोडप्ला.

इ. वाक्यांती : अमदा इवान् पीक् येवाचा आये काना.

याच कोरोनाच्या काळात आणखी एक वाक्य वारंवार कानावर पडत होते. 'त्याची तब्येत् सुदऱ्ल्या हाऱ्ची बिगल्ली.' वक्तव्य करणारी व्यक्ती महिला असो की पुरुष असो; सुशिक्षित असो की अशिक्षित, प्रत्येक जण अगदी चिंताग्रस्त मुद्रेत याच वाक्याची पुनरावृत्ती करीत होता. अगदी जवळचा माणूस कोरोनातून बरा झाला असे वाटत असताना अचानक त्याची प्रकृती पुन्हा बिघडली, असा त्याच्या

मनातील भाव असायचा. पण झाडीबोलीतील वरील उद्गार मात्र अगदी वेगळे आहेत. या वाक्यातील 'हार्ची' हा प्रत्यय अगदी नवीन आहे. माझ्याकरिता तरी नवीन आहे. पूर्वी कित्येकदा ऐकला असेल; पण आता तो लक्ष्यवेधी ठरला आहे. प्रत्ययाचे स्वरूप परिवर्तनशील असून झाडीपट्टीतील दोन लिंगे व दोन वचने यांच्यानुसार ते बदलत असते. या प्रत्ययाची झाडीबोलीतील लिंग-वचनानुसार वाक्ये पुढीलप्रमाणे-

अ. पुल्लिंगी-एकवचनी : पोर्गा गेल्याहार्चा वापेस् आला.
आ. पुल्लिंगी-अनेकवचनी : पोरा गेल्याहार्चं वापेस् आलं.
इ. स्त्रील्लिंगी-एकवचनी : पोर्गी चेती झाल्याहार्ची निज्ली.
ई. स्त्रीलिंगी-अनेकवचनी : पोरी येती जमल्याहार्च्या घरी गेल्या.

याशिवाय 'चुलीचा इस्तो पेट्ल्याहार्चा अन्कीन् इज्ला.' हे वाक्य झाडीपट्टीतील ग्रामीण गृहिणींच्या मुखांवाटे नित्य निघत असते. या रचनेत दोन विरोधी क्रियापदे येत असतात. झाडीबोलीतील विरुद्धार्थी क्रियापदांचा हा विचित्र संयोग निश्चितच आगळावेगळा मानावा लागेल.

प्रमाणमराठीची बोली असूनही झाडीबोलीने आपले वेगळेपण कसे जोपासले आहे याचा आलेख येथे संक्षिप्त रूपात आखलेला आहे. यावरून ती स्वत: प्रमाणभाषेची प्रचलित परिमाणे पूर्ण करणारी आणि त्यातही आपली वेगळी वैशिष्ट्ये जपणारी आहे हे स्पष्ट होते.

**परिशिष्ट**

**बोलीचे नाव व माहिती**

महाराष्ट्राच्या अतिपूर्व भागाला असलेल्या परिसरास 'झाडपट्टी' असे संबोधले जाते. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या चार जिल्ह्यांचा झाडीपट्टीत समावेश होतो. या भागात जी बोली बोलली जाते, ती 'झाडीबोली' या नावाने ओळखली जाते. उपरोक्त चार जिल्ह्यांशिवाय नागपूर व मध्यप्रदेशातील रायपूर आणि छत्तीसगडमधील दुर्ग व आंध्रातील सीमावर्ती भागांचा 'झाडीबोलीचा प्रदेश' म्हणून समावेश करता येतो. झाडीबोलीतील शब्दांचा आढळ मुकुंदराजविरचित मराठीतील आद्य पद्यग्रंथ 'विवेकसिंधू' आणि म्हाइंभटसंपादित मराठीतील आद्य गद्यग्रंथ 'लीळाचरित्र' या बाराव्या शतकातील ग्रंथांमध्ये होतो.

झाडीबोली ही प्रमाण मराठीचीची बोली असून तिची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. या बोलीत अनेक वर्ण आढळत नाहीत. येथे 'ण्' या व्यंजनाचा उच्चार 'न्' केला जातो. तसेच 'छ्', 'श्' आणि 'श्' या तिघांचे कार्य एकटा 'स्' पार पाडतो. शिवाय 'ज्' आणि 'झ्' यांचा केवळ एकच उच्चार येथे प्रचलित आहे. 'ड्' या व्यंजनाचा उच्चार हिंदीप्रमाणे होता.

या बोलीत नपुंसकलिंग आढळत नाही. केवळ पुल्लिंग व स्त्रीलिंग या दोन लिंगावरच तिचे कार्य चालते. त्यामुळे तिने स्वत:ची वेगळी लिंगव्यवस्था स्वीकारली आहे. नामाच्या लिंगपरिवर्तनाच्या बाबतीत 'उली' हा लघुत्वदर्शक प्रत्यय लक्षवेधी ठरतो. उदा. कोटा-कोअुली, गाडा-गाडुली, ढिरा-ढिरुली, मारा-मारुली इत्यादी. विशेषांच्या बाबतीत 'केवळ' या अर्थी 'टन' हा परप्रत्यय वेगळा वाटतो. उदा. 'पाच टन', 'दाहा टन' असे ऐकायला मिळते.

क्रियापदांच्या अनेक वेगळ्या रचना झाडीबोलीत प्रचलित आहेत. 'मारमूर करून', 'जाताजावालं', असे अभ्यस्त प्रयोग या बोलीत आढळतात. तसेच 'मी जावासीन ना मा मरावासीन' असा प्रमाणमराठीत न आढळणारा 'अर्थ'प्रकार झाडीबोलीत बोलला जातो. अभ्यस्त शब्दांच्या बाबतीत हा प्रयोग अधिक ऐकायला मिळतो. 'खोलच खोल', 'जाताच जावाचा', 'मानसाच मानसा' असे शब्दांच्या सर्व जातींमध्ये बोलले जाते.

प्रमाणमराठीत 'सर' या शब्दावरून 'सर्रकन' व 'सरसर' ही अन्य दोन क्रियाविशेष रूपे निर्माण होतात. झाडीबोलीतही ही प्रचलित असली तरी तेवढ्यांवर तिचे समाधान होत नाही. त्याशिवाय 'सरना' सरनारी' आणि सरोसरो' असे अन्य तीन पर्यायांचा उपयोग ती करते. तसेच 'म्हणून' या उभयान्वयी अव्ययाकरिता 'मुहून' हे रूप ती स्वीकारतेच, शिवाय 'मुहूनस्यान, 'मुहूनस्यानी' व 'मुहूनस्यारी' हे अन्य तीन पर्याय येथे उपयोगात आहेत. अशाप्रकारे झाडीबोली आपली शब्दसंख्या वृद्धिंगत करताना दिसते. याशिवाय नाम, विशेषण, क्रियापद आदींचे वेगळे प्रतिशब्द या बोलीने सिद्ध करून आपली शब्दश्रीमंती वाढविली आहे.

झाडीबोलीसंदर्भात अधिक माहितीकरिता डॉ. हरिश्चंद्र बोरकर लिखित पुढील ग्रंथ कृपया अवलोकन करावेत.

१. 'झाडीबोली : भाषा आणि अभ्यास' (१९९८)
२. 'झाडीबोली मराठी शब्दकोश' (२०००)
३. 'भाषिक भ्रमंती' (२००८)
४. 'अर्थपंचमी' (२०१३)

**- डॉ. हरिश्चंद्र बोरकर**

साहित्य : दिवाळी २०२१



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# न्हांगूळ आदार ईला: सामाजिक वास्तवाचे पारुषी (खिवारी)

डॉ. देवानंद सोनटक्के

**संजय बालाघाटे यांचा 'न्हांगूळ आदार ईला' (२०२०) हा वाशीमच्या काव्याग्रह प्रकाशनाने काढलेला कवितासंग्रह आहे. वंचित, भटक्या-विमुक्तांचे प्रश्न त्यांच्या समस्या,त्यांच्या अस्तित्वाचे प्रश्न आणि त्यांचे आत्मभान या कवितासंग्रहातून मांडले आहे. या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे यात आशयाला पूरक अशा भाषिक अभिव्यक्तीसाठी भटक्या विमुक्तांची बोली वापरली आहे.**

**संजय** बालाघाटे यांचा 'न्हांगूळ आदार ईला' (२०२०) हा वाशीमच्या काव्याग्रह प्रकाशनाने काढलेला कवितासंग्रह आहे. वंचित, भटक्या-विमुक्तांचे प्रश्न, त्यांच्या समस्या, त्यांच्या अस्तित्वाचे प्रश्न, आणि त्यांचे आत्मभान या कवितासंग्रहातून मांडले आहे. या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे यात आशयाला पूरक अशा भाषिक अभिव्यक्तीसाठी भटक्या विमुक्तांची बोली वापरली आहे. प्रमाणमराठी वाचकांच्या आवडीनिवडीचा विचार न करता- म्हणजे वाचकसापेक्षता न बाळगता आपल्या अनुभवाशी बांधिलकी जपत बोलीतील शब्द वापरून भाषिक निष्ठा जपली आहे, त्याबद्दल कवीचे अभिनंदन!

कवीच्या म्हणण्यानुसार या कवितेत भटक्या विमुक्त जातींपैकी नाथपंथी डवरी-गोसावी, कैकाडी, वासुदेव, जोशी, गोंधळी, चित्रकथी, बागडी, मसानजोगी, वैदू या समाजाची बोली भाषा जिला 'पारुषी' किंवा 'खिवारी' बोली म्हटले जाते, ती या कवितेत प्रामुख्याने आली आहे. तिचे स्वरूप समजून घेण्याआधी भटक्या व विमुक्त समाजाबद्दल जाणून घेणे गरजेचे आहे.

**भटक्या जाती**

उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणाऱ्या लोकांना भटके- इंग्रजीत 'नोमॅड्स' म्हणतात. नोमॅड हा शब्द 'नोमी' किंवा 'नेमो' (गुरे चारणे) या ग्रीक शब्दापासून तयार झालेला आहे. अमेरिका आणि युरोप खंडात या जमातींना 'जिप्सी' म्हणतात. हा शब्द ईजिप्शियन' ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे, जिप्सी हे मूलतः भारतातून आले असावेत, भारतातून दोन हजार वर्षांपूर्वी त्यांनी युरोप-अमेरिकेकडील देशांत स्थलांतर केले, असेही तज्ञांचे मत आहे. (संदर्भ : https://mr.vikaspedia.in/)

भटक्यांच्या निरनिराळ्या विकसित अवस्थांनुसार त्यांना- 'अन्नशोधक भटकें' (नैसर्गिक साधनसंपत्तीवर निर्वाह करणारे) 'शिकारी भटके' (अन्नशोधक भटक्यानंतरची अवस्था), 'चारण भटके' (पशूंचे संगोपन करणारे), 'व्यापारी भटके' (पशूंचा क्रय-विक्रय करणारे), 'सेवाकर्म करणारे भटके' (व्यवसायाद्वारा लोकांना सेवा देणारे) आणि 'करमणूक करणारे भटके' (त्यांची करमणूक करणारे भटके) म्हणून ओळखले जाऊ लागले.

सेवाकर्म करणारे प्रकारचे भटके हे भारतात बंजारा, लमाण, बेलदार, गाडुला, घिसाडी-लोहार, शिकलगार म्हणून परिचित आहेत. कर्नाटकातील बुडुबुडिकी, गोंधळी आणि जोशी घरोघरी जाऊन भविष्यकथन व मदारी सर्पाचा खेळ करतात. डोंबारी तारेवरची कसरत, नंदीवाले बैलांचा खेळ आणि काही जादूचे प्रयोग करतात. मात्र भारतातील पारंपरिक सामाजिक-आर्थिक व्यवहारात भटक्यांचे स्थान नगण्य आहे. (संदर्भ : https://mr.vikaspedia.in)

**विमुक्त जमाती**

परिस्थितीच्या दबावामुळे किंवा आर्थिक विपन्नावस्थेमुळे काही भटक्या जमाती गुन्हेगारीकडे वळल्या तेव्हा त्या गुन्हेगारजमाती म्हणून आस्त्रेळखल्या जाऊ लागल्या. गुन्हेगारजमातीतील विशिष्ट जमाती या विशिष्ट प्रकारचे गुन्हे करीत असत. उदा., पूर्वीच्या मध्य प्रांतातील (आजचे भंडारा, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर हे जिल्हे आणि मध्य प्रदेशातील महाकोशलसारखे भाग) गोपाळ आणि मारवाडी–कंजार जमाती या फक्त गुरांचीच चोरी करीत असत. कोरवा ही जमात घरफोडी आणि चोरी करणे भ्याडपणाचे कृत्य मानी. तसेच गुन्हे केव्हा आणि कसे करावयाचे यासंबंधीसुद्धा काही संकेत वा नियम असत. पंजाबमधील टॅगू हे रात्रीच्या वेळी कधीही गुन्हे करीत नसत. भामटे ज्या खेड्यात राहत, तेथे कधीही चोरी करीत नसत. पूर्वीच्या संयुक्त प्रांतातील (विद्यमान उत्तर प्रदेशातील) सानोरहिया हे आपल्या घराजवळ चोरी करीत नसत. वर्तणुकीचे नियम आणि नैतिकता ते काटेकोरपणे पाळीत असत. (संदर्भ : https://mr.vikaspedia.in/) या जमाती गुन्हेगार मानल्यामुळे गावगाड्यापासून अति दूर जंगलात वास्तव्य करणाऱ्या आणि उपजीविकेचे साधन नसल्यामुळे गावगाड्यातील आर्थिक व्यवहारात या जमातींनाही कोणतेच स्थान नव्हते. लमाण, बंजारा, वडार इ. अपवाद वगळता उपजीविकेची साधने या जमातींजवळ नव्हती.

इंग्रजी सत्तेच्या काळात १८७१ साली क्रिमिनल ट्राइब्ज अँक्ट करण्यात आला. या कायद्यानुसार भटक्या लोकांचे समूहच्या समूह गुन्हेगारटोळ्या ठरवण्यात आले. संचारनिर्बंध लादण्यात आले आणि बंदिस्त वस्त्यांत त्यांना अडकवून ठेवण्यात आले. स्वतंत्र भारतात हा कायदा मागे घेण्यात आला व या जमातींना मुक्त करण्यात आले. त्यामुळे गुन्हेगारटोळ्या किंवा गुन्हेगारजमातींना विमुक्त जमाती असे संबोधण्यात येऊ लागले. आज महाराष्ट्रात गोंधळी, जोशी, मराडी, चित्रकथी, वासुदेव, नंदीवाले, तिरमाळ, बेरड, रामोशी, पारधी, वडार अशा ४२ विमुक्त व भटक्या जमाती आहेत. (संदर्भ : https://shor.at/JV6q2bnN) त्यांची स्वतःची अशी बोली आहे.

**भटक्या विमुक्तांच्या बोली**

महाराष्ट्रात एकूण ५२ प्रकारच्या बोली आहेत. त्यांपैकी भटक्या–विमुक्तांच्या स्वतंत्र बोली आहेत. पद्मगंधा प्रकाशनाने प्रसिद्ध केलेला 'भारतीय भाषांचे सर्वेक्षण–मराठी भाषा' या ग्रंथात विभाग तीनमध्ये (संपा. अरुण जाखडे, २०१३, पृ. ५५३ –६९४) भटक्या विमुक्तांच्या बोलीची माहिती दिली आहे. त्यात कुंचीकोरवा, कैकाडी, कोल्हाटी, गोरमाटी, गोल्ला, गोसावी, घिसाडी, चित्तोडिया, छप्परबंद, डोंबारी, नंदीवाले, पारधी, नाथपंथी डवरी, मांग, मांग गारुडी, बेलदार, वडारी, वैदू इत्यादी भटक्या–विमुक्तांच्या बोलींचे विवेचन आले आहे. तसेच त्यांच्या गुप्त व सांकेतिक बोलींचे स्वरूपही लक्ष्मण चव्हाण यांनी (५७३–५८५) सांगितले आहे.

**गुप्त व सांकेतिक भाषा**

चव्हाण यांच्या म्हणण्यानुसार हे भटकंती करणारे लोक कलाकुसरीची कौशल्ये, व्यापार, भीक, भिक्षा या मार्गांनी आपली उपजीविका करत. तत्कालीन समाजव्यवस्थेत त्यांना प्रतिष्ठाही होती. पुढे इंग्रजांनी इथली राज्ये खालसा करून त्यांचे सैन्यबळ कमी केले. नवीन लष्करी ठाणी बसवली, दळणवळणाची आधुनिक साधने आणली. त्याचा राजे–रजवाडे, संस्थानिकांप्रमाणेच या जाती–जमातीतील लोकांवरही मोठा परिणाम झाला.

मोगल, पेशवे यांच्याबरोबर व्यापारउदीम करणारे बंजारी, वंजारा, सैन्यात राहुट्या ठोकणारे छप्परबंद, रामोशी, मांग, महादेव कोळी, गारुडी, कैकाडी, कंजारभाट अशा जातिजमातींच्या सैन्यातल्या नोकऱ्या गेल्या. या जमातींचे राज्यव्यवस्थेतील स्थान व रोजगार संपुष्टात आला. उपजीविकेची साधने नष्ट झाली. सैन्य कमी झाले. त्यामुळे रामोशी, मांग, महादेव कोळी, वडार, मांग, गारुडी, कैकाडी, कंजारभाट यांच्यावर बेकारीची वेळ आली व भिक्षा मागून जेवणे वाट्याला आले. जंगलावरील उपजीविका थांबली. त्यामुळे या जमातीत स्वातंत्र्याच्या प्रेरणा निर्माण होऊन इंग्रजांविरुद्ध उठाव करणे त्यांना क्रमप्राप्त झाले.

या उठावांचा बंदोबस्त करण्यासाठी ब्रिटिशांनी निःशस्त्रीकरणाचा– १८७१चा 'क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट' हा क्रूर कायदा त्यांच्यावर लादला. यातूनच इंग्रज आणि कंजारभाट, बंजारा, रामोशी, कोळी, मांग या जमातींचा संघर्ष सुरू झाला. इंग्रजांचा ससेमिरा त्यांच्यामागे लागला. या जमातींबरोबरच भटक्या मांग, गारोडी, कटवू, छप्परबंद, टकारी, भामटा यांच्यावरसुद्धा हा दडपशाहीचा फेरा पडू लागला. त्यामुळे प्रशासन, पोलिसी दडपण, छळ आणि अत्याचार यातून मुक्त होण्याकरता गुप्त सांकेतिक भाषेचा भटक्या विमुक्तांमध्ये उदय झाला. स्वसंरक्षणाच्या हमीसाठी आणि स्वतः धोक्यात येऊ नये यासाठी या भाषांचा उपयोग या जमाती करत होत्या. (भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण

महाराष्ट्र, पृ. ५७३)

या जमातींपैकी कैकाडी,मांग, मांग-गारुडी, पारधी, नाथपंथी, नाथपंथीडवरी, गोसावी, वैदू, नाथ जोगी, जोशी, वासुदेव, मसणजोगी, गिरीगोसावी या समाजाच्या अशा गुप्त भाषेपैकी 'पारुषी' किंवा 'खिवारी' बोली आहे. 'खिवारी' या शब्दाचा अर्थ मागतकरी असा होतो. ही खिवारीबोली फारशी-उर्दू-मराठी यांच्या मिश्रणातून नवे शब्द तयार करून झाली आहे; तर कैकाडी बोली कन्नड-तेलगु-मराठी यांच्या मिश्रणातून निर्माण झाली आहे. या भटक्या समाजाच्या पारुषी - खिवारी बोलीतील शब्द वापरून बालाघाटे यांची कविता साकारली आहे.

संजय बालाघाटे आपल्या सशक्त व आशयपूरक अशा बोलीतून भटक्या, विमुक्त समाजाच्या कायम भटकंतीचे, अस्थिरतेचे, जगण्याच्या विवंचनेचे दु:ख आणि इतिहासात कुठलीही त्यांची नोंद नसल्याची खंत, शिवाय त्यांच्या समस्या, त्यांच्या जातपंचायतीसारख्या चालीरीती, उदारनिर्वाह पद्धत व त्यांच्या समस्या, त्यांच्या अस्मिता व आत्मभान, सामाजिक एकोप्याची गरज, धर्म-अध्यात्म नाकारून संविधानमूल्ये आत्मसात करण्याची भूमिका- त्यांच्या कवितेत येते.

*पिचलेल्या पालातून प्रसवलेला जाळ 'त्यांच्या' हाती नेऊन दिलास*
*अन् त्यानं तुझ्या हाती सुन्नी दिली, करपून काजळलेल्या*
*तीन दगडांच्या चुलीतल्या धुरानं गुदमरून टाकलीयेत पालं...*
*पालाची खुटं ना कुणाच्याच जागेत*
*आम्ही आमचं दर्सन एंड सर्जननिर्माणाचे सोहळे*
*निदान त्याच्या हाती पालांची दोरी देताना*
*तुला त्याच्या कुजक्या... इटलेल्या*
*कापून सपाट जांघेत*
*साजरे करणारे मर्दच*
*ठेवले नाहीस तू पालात.*
*तूपण पालाची-चळवळीची*
*'संविधान'रेषा वलांडली लेका*
*उंटाच्या ढामणीचा मुका घेण्यापेक्षा*
*तू थांबला असतास जाग्यावर तर*
*तीन दगडांच्या चुली मोडल्या नसत्या!*
*अंधारातली तोंडं*
*वाळगो कोल्हाकू आदार ईगत*
*अन् म्हणाली नसती*
*पर न्हांगूळ आदार ईला!*

या पहिल्याच कवितेत कवी आपल्या समाजातील तथाकथित पुढारी व प्रस्थापित झालेल्या लोकांवर तुटून पडतो. अनेक विद्रोही कवी प्रस्थापित व्यवस्थेला बोल लावत असताना आत्मपरीक्षण करत नाहीत; त्या पार्श्वभूमीवर राम दुतोंडे, लोकनाथ यशवंत, अरुण काळे यांच्याप्रमाणेच इथे कवी संजय बालाघाटेही पुढाऱ्यांवर टीका करतात. कारण हे नेते आपल्या जातिपोटजातीच्या कळपात शिरले. त्यामुळे पालं कुठंच जाग्यावर नाहीत, तीन दगडांच्या चुलीचं नातं तोडून आपापल्या जाती-पोटजातीच्या 'खुराडयात' शिरली असे कवी म्हणतो. पालं होती तेव्हापण सामाजिक एकोपा होता. पण पुढारीपणाच्या नादात आपली पालं, समाजएकोपा विसरून भटका समाज जाती-उपजातीत विभागला गेला. याची चीड व्यक्त करताना कवी आपली बोली वापरतो.

या कवितेत सुन्नी (शिस्न) हे कैकाडी बोलीतील, तर दर्सन (लंड), ढामणीचा (ढुंगणाचा) हे पारुषी- खिवारी बोलीतील शब्द आले आहेत. व्यवस्थेविरुद्ध बोलत असताना कवीला आपला संताप या शिव्यासदृश शब्दांतून व्यक्त करावासा वाटतो व त्याला आपल्या बोलीतील मातृभाषेतील शब्दांचाच आधार वाटतो. *'वाळगो कोल्हाकू आदार ईगत'* (कुणब्याच्या कुपाटीला आधार आहे-), *'पर न्हांगूळ आदार ईला!'* (पण आम्हाला आधार नाही) अशी आपली व्यथाही तो याच कैकाडी बोलीत व्यक्त करतो. म्हणजे कवीचा भाषिक परीघ त्याच्या मातृभाषेनुसार नव्हे, तर आशयाच्या सामाजिक परिघानुसार विस्तारतो आहे. कधी नाथपंथी गोसाव्यांची, कधी कैकाडी, गोसावी, वैदू, जोशी या समाजाची तर कधी चक्क दख्खनी बोलीही वापरतो.

कवीच्या मते, भटक्यांचा संघर्ष अजूनही संपलेला नाही. त्यासाठी कवी सामाजिक एल्गार पुकारतो- *'फुलण्यासाठी समतेची बाग, आता एकेक काडी जमवून, पेटवावी लागेल आग.'* अशी भूमिका व्यक्त करत कवी त्यासाठी फक्त *'हातांच्या बोटांची मूठ कर, एका सुरात रणभेदी आवाज दे, अन् हा देश अर्धा नावाने कर...!'* असे आवाहन करतो. यासाठी 'एका सुरात' येण्याची गरजही कवी बोलून दाखवतो. स्वातंत्र्य मिळूनही आपल्या समाजाला काहीच मिळाले नाही. त्यामुळे *'चारित्र्यहीनांनाही पवित्रता बहाल करणारे हे स्वातंत्र्य'* अशा शब्दांत त्याची निर्भत्सना करतो. या व्यवस्थेने असे निराधार ठेवल्याने कवी प्रस्थापित धर्म, अध्यात्म आणि संस्कृतीलाही नावे ठेवतो.

*जिथे नग्नताही केली जातेय शिल्पबद्ध..*
*अन् व्याभिचारी अध्यात्माचे शिंपडले जाते पाणी*
*गोमूत्र म्हणून सर्वत्र*
*आम्हाला तुझ्या चौऱ्याऐंशी लक्ष योनीतून मुक्तता*
*नाही का कधी?*

असा प्रश्न कवी करतो. *'आरत्या-भजनं गात राहण्यापेक्षा मी गेलो असतो पलीकडच्या वस्तीत जलसा होऊन तर, सूर्यामृत प्राशन करता आले असते मला'* असे म्हणत धर्म-अध्यात्म यांपेक्षा समता, स्वातंत्र्य व संविधान कवीला मोलाचे मानतो.

'नाट म्हंजे नाट नस्तं' या कवितेत पुन्हा कवीची खिवारी बोली प्रकटली आहे.

*बरसात चळकधार...*
*चार सालं दम घेऊन पत्र्यांच्या भोकातून*
*अन् सांदीतून चिवानी गळून.....*
*नाट झालं ओलंपिच्च...*
*तडा गेलेल्या भिंती*
*ओल फुटून सादळल्या.*
*टुळकून खुटल्यावर*

असे त्याचे नाट, म्हणजे घर-खरे तर पाल आहे. अशा गळक्या छपराच्या तडा गेलेल्या पत्र्यातून 'चीवानी' म्हणजे पावसाची धार गळत असते. कवी पुढे चांगल्या भिंतीच्या घरात आला, मात्र आपला समाज अजूनही पालातच आहे याची खंत बाळगतो. त्यासाठी संविधानाची मूल्ये त्यांच्यापर्यंत पोचली पाहिजेत असे त्याला वाटते. त्याला बाबासाहेबांच्या शब्दांची एकीकडे आठवण होत जाते; आणि दुसरीकडे त्याच्या आईमुळे त्याला एकूण सामाजिक वास्तवाची जाणीवही होत जाते.

*आय जोरात खवंडल्यासारखी*
*ये परादयापकाऽऽ*
*पुस्तकाच्या थप्पीजवळ टोपलं लाव टोपलं*
*बापू मोडकं नाट हाय आपलं*
*भाईर भिंतीवर शेवाळ चढलंय खावड्यागत*
*माती गेली सडून अन्*
*डोळ्यावर कातडं वडून कुटवर चिडकावं*

अशी आपली व्यथा खिवारी बोलीतून व्यक्त करते. बापू नुसत्या भाषणानं *'गळणारं नाट ठालत नाही जाग्यावर'* या शब्दात आई त्याला वास्तवाचे भान आणून देते.

*खंटणाऱ्या आभाळाला शिवणारी*
*करवाडली का नाई कुनी सुई?*
*बाबासाबाच्या भिजलेल्या, फुटूची शपत तुला,*
*खवंदलं पाह्यजे नाट तू*
*नायतर सगेसोयरे बी मान*
*वाकडी करत चिडकत गेलेत नाटाकडं!*
*नाट म्हंजे नाट नस्तं*
*खिवाऱ्याचं गाव अस्तं!*

बाबासाहेबांची शपथ घालून आई कवीला भटक्यांसाठी घर हे नुसते घर नसून स्थायिक झालेले एक गावच असते, याची जाणीव करून देते. या कवितेत भटक्या विमुक्तांच्या खिवारी बोलीतील- चिवानी (पाणी), नाट (घर), टुळकुन (झोपून), खुटल्यावर (उठल्यावर), चोलतात (बोलतात), खंवडल्या (भांडल्या), खावड्यागत (चोरासारखं),चिडकावं (पाहावं), ठालत (राहत), खंटणाऱ्या (रडणाऱ्या), करवाडली (केली), खंवदलं (बांधलं), चिडकत (बघत), खिवाऱ्याचं (मागतकऱ्याचं) असे कितीतरी खिवारी बोलीतील शब्द व संवाद येतात.

*'या देशाच्या सातबाऱ्यावर माझी नोंद नाही'* याच्याबद्दल कवी तक्रार करतो. 'कुणब्याच्या पोटी कुणबी, सुताराच्या पोटी सुतार, चोराच्या पोटी चोर जन्माला येतो' हा स्टीफन या ब्रिटिश अधिकाऱ्याने सिद्धांत मांडला. त्यामुळे 'भटके बायबर्थ क्रिमिनल आहेत' म्हणून 'गुन्हेगारांचा वर्ण तयार करून...रामोशी, छप्परबंद, टकारी, कैकाडी, वडार अन् पारधीही' त्यात समाविष्ट केले गेले. ब्रिटिश हळूहळू जंगलात शिरत गेल्याने स्वातंत्र्य संगराची पहिली ठिणगी १८५७पूर्वी उडली, मात्र ज्याची नोंद घेण्याची तसदीही घेतली नाही, इथल्या पुस्तकी इतिहासकारांनी' अशी तक्रार कवी करतो आणि १८७१ साली गुन्हेगार म्हणून का असेना पण भटक्यांची नोंद झाल्याचे समाधान व्यक्त करतो.

मात्र १५ ऑगस्ट १९४७ आमच्यासाठी नाहीच! आम्हाला वगळून दिलं स्वातंत्र्य गावांना, गावकुसांना अन् जंगलांनाही.. म्हणून विमुक्त-भटक्यांच्या हक्काचं प्रतिबिंब उमटू शकलं नाही, संविधानात आजतागायत' अशी तक्रार कवी करतो. कारण स्वातंत्र्यानंतरही अशा भटक्यांचा दिवस असा असतो-

*पाटे, वरवंटे, डालगे, टोपले*
*जुनी कापडे, चटया, कढया*
*प्लास्टिकच्या घागरी घेऊन*
*कुणब्याशी बोलतात पिढ्यानपिढ्या!*
*'देव दान पावलं'*

*संबळ, चुडबुडकं, किंगरी, टाळ*
*काखेत कुमट*
*चिंध्यात अफू लावून बाळ.*
*बिब्बा, सुया, दोरे, केसांवर देत*
*नव्या भांड्यावर जुने कपडे घेत*
*पालं अशी जगतात सालोन्साल.*
*पालं मरतात मग अंधार पडला की*
*गुना, फँड्री, तित्तर-बित्तर*
*ल्हावरं, ससा,*
*मेकोळी-बिकोळी*
*छिलप्पी, सुद्दी, रेंगवी*
*रेवाटी अन् चिवानी-बिवानी*
*मुरमुरे, बैदे अन् टापकी-टुपकी*
*खवंडण-बिवंडण चालू असतं आदिम...*
*भामडे घासकतात अन् फुकट लुगावतात*
*खावडे-खावडे चोलत*

या कवितेतही भटक्या विमुक्तांच्या खिवारी बोलीतील- आदेश (नाथजोगी जमातीतील अभिवादन), खिव (भीक), मेकोळी (माझे), रेंगवी (मटण), रेवाटी (मटण), टापकी (भाकर), खंवडण (भांडण), भामडे (पोलीस), घासकतात (येतात), लुगावतात (मारतात), खावडे (चोर), चोलत (म्हणत), चिवाणी (दारू), बैदे (अंडे) हे शब्द येतात. मात्र गुना (डुक्कर), फँड्री (डुकरीण) हे शब्द कैकाडी भाषेतील आहेत. तित्तरबित्तर हे मराठी; लवंगी - गिरीगोसावी बोलीतील - छिल्लपी (मासे), सुद्दी हे शब्द आहेत; तरलवंगी गोसावी बोलीतील मुरमुरे (झिंगे)असे शब्द आले आहेत. आता कैकाडी (तेलुगु, कानडी, मराठी मिश्रित) आणि खिवारी (फारशी, उर्दू , मराठी मिश्रित) या स्वतंत्र बोली असूनही बालाघाटे यांच्या कवितेत सामाजिक प्रश्न समान आल्याने भाषिक व्यापकता येते आहे.

पुढे कवितेत भटक्या विमुक्तांचे पोट ज्यावर आहे, त्या गोंधळगीतांचाही संदर्भ येतो- *'रेणुकामाते गोंधळा येऽऽ कानीफनाथा गोंधळा येऽऽ बिरोबादेवा गोंधळा ये'* असे पारंपरिक नमन करून कवी पुढे त्याच लयीत विडंबन, उपरोध व विद्रोहभावना, चीड व्यक्त करतो-

ठोकशाही माते गोंधळा येऽऽ
मतदार राजा गोंधळा ये ऽऽ
हजार-पाचशे मताला घे
समता रांड गोंधळा ये ऽऽ
छिनाल बंधुता गोंधळा येऽऽ
*स्वातंत्र्या भोसडीच्या गोंधळा येऽऽ*
*दिवटीत तेल ओततो*
*ढामणी तेल लावून वल्ली*
*सत्तादादा तू ठोकायला येऽऽ*

या कवितेतही भटक्या विमुक्तांच्या खिवारी बोलीतील टापकी (भाकर), चिवाणी (दारू), बोच्या (गुदद्वार), ढामणी (ढुंगण), कपरीची (पोटाची), लुगवायला (मारायला) असे शब्द येतात.

इळा हाणला की 'खपळले दोघं' या कवितेत- पन्नाशीतली लक्शीमबाय जोशीन ही एकटी तिच्या अब्रूला कशी जपते, त्यासाठी प्रस्थापितांच्या विरोधात कशी उभी राहते, त्याची कहाणी येते. या कवितेतील शब्द जोशी बोलीतील आहेत-

*कपरीची आग इजवण्यासाठी मी*
*निभळले खामणाच्या खेतात*
*तितं नाटातल्या नानू टापल्याबरं*
*आला रुबाबदार खामण*
*गवताच्या काडीलाका हात लावला रांडं! म्हणत*
*टापल्या अन् खामण भांडू लागला तिला*
*शेगू दे नस्तातुज पटकर फेडून घेऊ*
*अन् पाठवू घरी तसंच.. तवा लक्शीमबाई*
*नागिनीगत चवताळून बोलवाडली*
*आरं पोटाला टापकी मिळत न्हाई म्हनून*
*शेगाड्या पाणक्या नव्हंत आमी*
*भिकाऱ्या रांडा माजल्यात*
*म्हणत खामणानं तिचा पदर पकडला*
*तेव्हा तिनं हातातला फर्डा ईळा*
*त्याच्या हातावर चालवला...*
*इळा हाणला की खपळले दोघं*
*ढामणीला पाय लावून*

असे सांगणारी लक्ष्मीबाई जोशी समाजाची आहे. मात्र तीही भटकी- मागतकरी (खिवारी) असल्याने कवी तिच्या या आत्मसन्मानाचा गौरव करतो- 'खिवारी लक्शीमबाय कुठल्याही झुंजार राणीपेक्षा पराक्रमी वाटते!' अशा शब्दात तिचा गौरव करतात. इथे मला अरुण काळे यांच्या कवितेतली 'लहानीबाय' आठवते. सामान्य गरीब स्त्रियांजवळ असलेले आत्मसन्मानाचे मूल्य या कवींना महत्त्वाचे वाटत आले आहे.

या कवितेतही भटक्या विमुक्तांच्या जोशी बोलीतील खपळले (पळाले), कपरीची (पोटाची), निभळले (गेले),

खामणाच्या (बामणाच्या), खेतात (शेतात), नाटातल्या (गावातल्या), टापल्या (पाटील), नऱ्यांच्या (माणसांच्या), खिवारी (मागतकरी), शेगू (संभोग), बोलवाडली (बोलली), शेगाड्या (झवाड्या), पाणक्या (बाया), ढामणीला (ढुंगणाला) असे शब्द आले आहेत. कवीच्या मते, बातमी म्हणजे सत्याचं उत्कट दर्शन असतं, ती भाषाशुद्धीची चळवळ नसते! त्यामुळे शुद्ध-अशुद्धतेच्या आग्रहापेक्षा कवीची जाणीव व त्यातील अनुभव जास्त महत्त्वाचा आहे. त्यामुळे या कवितेतही 'टापरीचा' (अपानवायूचा) असा शब्द आलेला आहे.

*फक्त एकदा आयनात पहा!*
*ये खिवारी दोस्ता,*
*तटतटत पेटून ऊठ आता*
*स्वीकारू नको पुराणातल्या अरे*
*लबाड - ढोंगी बाता*
*अरे तुझी ढामणी चोहीकडून*
*लुगावणं चालू असताना*
*तू उसासाही टाकत नाहीस?*
*किती दिवस चालणार हे*
*खावड्यांचे गुण गाणे?*
*खपळू दे पाय अन्*
*उधळून दे झोळीतील दाणे*

या कवितेतही भटक्या विमुक्तांच्या खिवारी बोलीतील, ढामणी (ढुंगण), लुगावणं (मारणं), खावड्यांचे (चोरांचे), खिवारी (मागतकरी, भिक्षेकरी), खपळू (पळू), हे शब्द आले आहेत. हरी आज्या म्हणतो- 'नरे हो, कशी कंडी करवाडून ढामणी लुगावली आपली, कळलंच नाही फाटेस्तोर' इथे स्वातंत्र्योत्तर काळातही नव्या व्यवस्थेनेदेखील आपली वाट लावली आहे असे कवीला म्हणावयाचे आहे. जेव्हा विकासाच्या कल्पनावर बोलणारे सुधारक या समाजाला म्हणतात- 'अंधश्रद्धा विकासातली मोठी धोंड आहे, पंचांगांची बाडं अन् पोपटाचा पिंजरा टाकून द्या'; तेव्हा आम्ही म्हणालो, 'मग पोटाला टापकी कशी मिळंल?' ते म्हणाले, 'उजेडाकडे जायचं ना, मग भूकच लागणार नाही, तुमच्या हातावर भाग्याची रेषा उमटणार आहे.' इथे पुस्तकी सुधारक अंधश्रद्धेला विरोध करतात, पण उपजीविकेच्या पर्यायाबद्दल बोलत नाही, असा विरोधाभास टिपला आहे. या कवितेतही दंड्या (वासुदेवाचं एक वाद्य), नरे हो (मर्द हो), ढामणी (गांड), लुगावली (मारली), टापकी (भाकर) असे शब्द खिवारी बोलीतील आले आहेत.

शिक्षणानेही भटक्यांचे प्रश्न सुटत नाही. कचरी पारधीनीच्या मुलीवर शिक्षकच नजर ठेवतो. तेव्हा त्या शिक्षकाला तिच्या अस्सल पारधी मराठीमिश्रित बोलीत शिव्या देते- *'य्ये चश्मेवाल्या सायबा, म्या लेकरू शिकाय धाडलं रं, तुला तोंड मारायला नाही, घरी तुजं इजंना गेलं काव्हय?'* पुढे ती त्याच्या पुरुषी इंद्रियालाच आव्हान देते. *'का तुज चुलीत घालून, इस्त्यात वांगं भाजल्यावानी, भाजू का खालीवर तडतड.'* आणि शेवटी आपल्या जातीचा इतिहास व अस्मिता जागी करते. *'पारधी म्हंजी चोर नव्हं, इस्तव असतंय इस्तव.'* तिच्या या ताकदीचा सन्मान करताना कवी तिला *'कचराबाय, या तुझ्या बोलानं कपड्यातली त्याची नग्नता उजागर झाली अन् लेक सावित्रीची आज मोठी सायबीन झाली!'* (पृ. ६७) असे म्हणतो.

मालन चाची या मुस्लीम स्त्रीचे व्यक्तिचित्र साकारताना कवी तिच्या दखणी मुस्लीम बोलीचा वापर करतो.

*'च्यार शेरड्या परडीमें चराती हूँ*
*होर खेतमें तो कामाबी नहीं है ना!*
*वो तो चल बसे बहोत पहले*
*मैं अकेली संभालती हूँ घर*
*जो लकडीसे बना है*
*हमारे में ना*
*वैसा कोई भेद नही रह्यता*
*अल्लाताला को मानते हैनं सब!*
*लेकीन चार जवान बेटिया की*
*शादी का सवाल'* (पृ. ६८)

इथे भटक्यांप्रमाणेच वंचित व उपेक्षित, पण संकटांसमोर न झुकणाऱ्या मुस्लीम स्त्रीचे चित्रण तिच्या बोलीमुळेच जिवंत झाले आहे.

जातपंचायत हा भटक्यांच्या समाजाचा एक रीतिप्रकार. त्यात स्त्रीला दुय्यम स्थान. त्या जातपंचायतीचेही चित्रण कवितेत येते. जादूटोणा केल्याच्या संशयावरून गीता नावाच्या वैदू स्त्रीला तिचा नवरा, सासू आरोप करून जातपंचायतीसमोर आणतात. ही जातपंचायत वैदूची असल्याने यातील सगळे संवाद व शब्द वैदू बोलीतील आहेत. नवरा म्हणाला-

*'दान्क देयम फटकूंद'*
*मग तिची सासू म्हणाली,*
*'इसेट वानं मिद पन काटा हैतत'*
*सतराव्या वर्षी ती परित्यक्ता*
*चारशे अठ्यान्नव चुलत्यानं केली.*

*पुनः जातपंचायतीनं बजावलं*
*पोलिसात गेला तर जातीभाईर...*
*म्याका, कल्लू, झगडम्कोडी,*
*गेली गीता एकदिवस...*
*वैदू स्त्री म्हणून तिचे महानिर्वाणच ते!*
*बोचऱ्या थंडीत पिंजलेल्या, ताठलेल्या*
*दाढी-केसांनी दिला थाटात फैसला*
*तिच्या नवरा...सासू अन् सासऱ्याला*
*तिची मेटेल, फुसटलला शय लावून नदीत सोडा.*

या कवितेत भटक्या विमुक्तांच्या वैदू बोलीतील समतीला (सवतीला), मंतरगाडाकडं (मांत्रिकाकडं), दान्क् देयम फटकुंद (हिला भूत लागलं), इसेट वानं मिद पन काटा हैतत (दे तिला सोडून, तुझाबी घात होईल), कोडी (कोंबडी), म्याका (बकरा), कल्लू (दारू), झगडम (भांडण), मेटेल (जोडवी), फुसटल (मंगळसूत्र), शय (हात) हे बोलीतील शब्द व वाक्ये येतात. जातवास्तवातील समाजवास्तव आणि समाजवास्तवाच्या चित्रणासाठी आवश्यक असलेली वैदू समाजबोली कवीने वापरल्यामुळे नवऱ्याने, सासूने केलेले आरोप व तिला दिलेली शिक्षा याची धार त्याच बोलीतील शब्द वापरल्याने तीव्र झाली आहे. कवितासंग्रहात वापरलेल्या भटक्याविमुक्त समाजाच्या विविध बोली फॅशन किंवा बदल म्हणून आलेल्या नाहीत, तर कवीच्या आशयपरिघातीलच आहेत. उलट या बोलींच्या सशक्त वापराने मराठी कवितापरंपरेत आशय व शैलीदृष्ट्या कवीने मोलाची भर घातली आहे.

या कवितासंग्रहात कवीने भटक्या-विमुक्तांचा इतिहास, संस्कृती, समस्या, चालीरीती, जगणे, त्यांचा संघर्ष, आत्मसन्मानासाठी चाललेली धडपड चित्रित केली आहे. शेवटी या संघर्षाला यश मिळायचे असेल तर सर्व ४२ भटक्या-विमुक्त जातींनी एकत्र येऊन लढा देण्याची गरज कवीने बोलून दाखवली आहे. त्यासाठी त्याने गोधडीची प्रतिमा वापरली आहे. 'गोधडी' या कवितेत कवी आपल्या समाजजातिबांधवाना म्हणतो-

*तुझे तू शिकले पाहिजे अनवाणी चालायला*
*उभे राहून बोलायला...!*
*काळोख सरत आलाय माथ्यावरचा*
*बेचाळीस तुकड्यांना जोडून गोधडी शिवली पाहिजे!*

यातील 'बेचाळीस तुकड्यांना'चा अर्थ मूळ ४२ भटक्या-विमुक्त जमातींना एकत्र आणण्याची गरज कवी पुन्हा अधोरेखित करतो. आपल्या हक्काचे स्थान पुन:प्रस्थापित करू पाहतो. कवीने वापरलेली बोलींची व्यापकता व सर्वसमावेशकता हा कार्यकर्ता आणि कवी याच्या सामाजिक प्रयोजनाचा भाग आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. एकूणच सामाजिक जाणिवेच्या कवितांमध्ये बोलींच्या स्थानामुळे हा कवितासंग्रह सशक्त आणि कवी दखलपात्र ठरला आहे.

**संदर्भ :**

https://mr.vikaspedia.in/
भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण-महाराष्ट्र, संपा. अरुण जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१३.
न्हांगूळ आदार ईला, संजय बालाघाटे, काव्याग्रह प्रकाशन, वाशिम.

**- डॉ. देवानंद सोनटक्के**



**भारतातील सर्वात मोठा शिलालेख (तंजावर). हा मराठी भाषेत असून यात तंजावरी बोलीतील शब्दही आढळतात. (सौजन्याने : निखिल बेल्लारीकर)**

बोलीभाषा विशेषांक

लेख

# कोलामी भाषेचे स्वरूप व विवेचन

डॉ. श्रीकृष्ण काकडे

**कोलाम ही आदिवासी जमात प्रामुख्याने गोंडवनातील डोंगराळ भागात आढळून येते. कोलाम लोकांची वस्ती प्रामुख्याने यवतमाळ जिल्ह्यातच अधिक आहे. मानववंशशास्त्रज्ञांच्या मते कोलाम जमातीचे मूळ वसतिस्थान तमिळनाडूमधील निलगिरी पर्वत हे आहे. म्हणूनच त्यांच्या भाषेमध्ये बरेच तमिळ शब्द आढळून येतात. काही अभ्यासकांच्या मते कोलाम जमातीचे मूळ वसतिस्थान यवतमाळजवळील लासिना हे आहे.**

**आदिवासी** हे भारतीय संस्कृतीचे अभिन्न अंग आहेत. भारतात एकूण ७०५ आदिवासीजमातींचे वास्तव्य आहे, मध्यभारत हा तर आदिवासींचा केंद्रबिंदू आहे. येथील आदिवासीसंस्कृती आणि भाषा आपल्या वेगळ्या रंग-रूप आणि वैशिष्ट्यांसाठी ओळखल्या जातात. नर्मदेच्या दक्षिणेकडील हा प्रदेश विध्यांचल आणि सातपुड्याच्या पर्वतरांगानी व्यापलेला आहे. नर्मदा, तापी, पूर्णा, पैनगंगा, वैनगंगा, प्राणहिता, इंद्रावती व गोदावरी अशा नद्यांच्या खोऱ्यांचा हा प्रदेश आहे. या प्रदेशात हजारो वर्षांपासून अनेक आदिवासीजमातीचे वास्तव्य आहे, ज्यात प्रामुख्याने कोलाम ही आदिवासीजमात प्रामुख्याने गोंडवनातील डोंगराळ भागात आढळून येते. महाराष्ट्रातील नांदेड, चंद्रपूर, वर्धा व यवतमाळ जिल्ह्यांत या जमातीच्या लोकांचे वास्तव्य आहे,तरीही कोलाम लोकांची वस्ती प्रामुख्याने यवतमाळ जिल्ह्यातच अधिक आहे. एकूण कोलामांपैकी ७५% कोलाम एकट्या यवतमाळ जिल्ह्यात राहतात. त्यांची वस्ती प्रामुख्याने यवतमाळ, वणी, झरी, घाटंजी आणि केळापूर या तालुक्यांत एकवटली आहे. मानववंशशास्त्रज्ञांच्या मते कोलाम जमातीचे मूळ वसतिस्थान तमिळनाडूमधील निलगिरी पर्वत हे आहे, तेथून ते काळाच्या ओघात महाराष्ट्रात येऊन स्थिरावले आहेत, म्हणूनच त्यांच्या भाषेमध्ये बरेच तमिळ शब्द आढळून येतात. पण हे मत पटणारे नाही. काही अभ्यासकांच्या मते कोलाम जमातीचे मूळ वसतिस्थान यवतमाळ जवळील लासिना हे असून तेथून ते नांदेड व आदिलाबाद (आंध्रप्रदेश)लगतच्या जिल्ह्यात स्थलांतरित झाले असावेत. याला अनेक अभ्यासक दुजोरा देतात.

कोलाम स्वत:ला 'कोलावार' म्हणवतात. 'कोलावान' हे एकवचनी व 'कोलावार' हे अनेकवचनी रूप आहे. ते स्वत:च्या भाषेला 'कोलाम पाना' किंवा 'कोलावान गोट्टी' असे म्हणतात. भाषेला 'पाना' व बोलीला 'गोट्टी' असे त्या भाषेत शब्द आहेत. कोलाम लोकांची 'कोलामी भाषा' असेच आता सर्वत्र रूढ झाले आहे, ही भाषा द्राविडियन भाषाकुळातील. त्यावर वऱ्हाडी व तेलुगूचा जास्त प्रभाव दिसून येतो. ग्रियर्सन यांनी भारतीय भाषांची पाहणी करताना कोलामीबद्दल काही माहिती १९०६मध्ये लिहून ठेवली आहे. गोंडी व कोलामी या दोन भाषांमध्ये साम्ये व तुरळक तफावत फार आहे. गोंड व कोलाम ह्या दोन्ही जमाती शेजारी राहात असल्यामुळे व दोन्हींचे कूळ द्राविडियन असल्यामुळे दोन्ही भाषांमध्ये अनेक बाबतीत साम्य दिसून येते. कोलामी भाषेचा संबंध ग्रियर्सनने तोडा भाषेशी जोडला आहे. तोडा भाषा ही निलगिरी पर्वतावरील तोडा नामक प्राचीन जमातीची आहे. डॉ. केतकर, हिरालाल व रसेल यांच्या मते कोलामी भाषेचे मूळ स्थान तमिळ व तेलगू यांच्यामधील प्रदेशात असावे. किनवटकडील नाईकपोड लोकांची भाषा कोलामीच आहे. त्यांच्याकडील 'नायकी' भाषा

दुसरी तिसरी कोणती नसून ती कोलामीच आहे. ती वेगळी भाषा असल्याचा अनेक पूर्वसूरींचा, संशोधकांचा गैरसमज झालेला आहे.

नायकी व कोलामी यांच्यामध्ये बहुधा सर्वच शब्द समान आहेत असे कोलामी भाषेचे अभ्यासक डॉ. भाऊ मांडवकर यांचे मत आहे. कोलामी व नायकीतील साम्य त्यांनी सोदाहरण दाखविले आहे. ते पुढीलप्रमाणे आहे, जसे अय्याक (कचरा), आंगाडी (बाजार), आंगासी (जांभई), आट (चिकटणे), आड (तहान लागणे), आडाग (चालणे), आण (असणे), आत्तिन (तेथे), आंदार (काही), नींगा (माशी), मास (माणूस), सीमा (मुंगी), आदुम (दाबणे), आराक (कापणे), आले (रात्र), एल्का (उंदीर), काला (स्वप्न), नालका (जीभ), तेर (खाट), माक (झाड), वान्ना (भावजय), पाम (साप) असे समान शब्दच नव्हेत, तर प्रयोजकादी रूपेही नायकी व कोलामी यात सारखी आहेत. तेव्हा ह्या दोन भाषांना एकमेकींपासून वेगळे काढण्याचे काही कारण नाही असे डॉ. मांडवकर यांचे मत आहे. कोलाम लोक आपसात कोलामी भाषेतून व्यवहार करतात तर आंध्र प्रदेशाच्या जवळपास राहणारे काही कोलाम इतरांशी तेलगू आणि इतर भागांतील सर्व कोलाम इतरांशी मराठी बोलतात.

अनेक गावांतील कोलाम जमातीचे लोक तर मराठी संस्कृतीशी अगदी एकरूप झालेले आहेत. ते मराठ्यांप्रमाणे आहार घेतात व पेहराव घालतात. त्यांच्या प्रथा-परंपरा, चालीरीती मराठी संस्कृतीशी एकरूप झालेल्या आहेत. अनेक कोलाम तर अस्खलितपणे मराठीदेखील बोलतात.

**कोलामी भाषेचे भौगोलिक क्षेत्र**

कोलामी भाषा विस्तृत भौगोलिक प्रदेशात बोलली जाते. वर्धा-वैनगंगा नद्यांच्या खोऱ्यातील यवतमाळपासून तेलंगणातील उतनुर, आसिफाबादपर्यंत तर इकडे चंद्रपूरच्या कोपरणा, माणिकगडापासून वणी, किनवट माहूरच्या टेकड्यांपर्यंत पसरलेले आहे. महाराष्ट्र व तेलंगणा यांच्या सीमावर्ती प्रदेशाचा हा भाग आहे. यवतमाळ जिल्ह्यातील लासिनापासून पैनगंगेपर्यंतचा प्रदेश कोलामी भाषेचे केंद्रबिंदू आहे, ज्यात लासिनापासून राळेगाव, घाटंजी, पांढरकवडा, झरीजामणी, मारेगाव, वणी, पाटण, माहूर, किनवटचा परिसर येतो. या परिसरात कोलाम पोड(गावे) स्वतंत्ररीत्या अस्तित्वात आहेत. कोलामी पोडांवर प्रामुख्याने कोलामी भाषेचाच वापर केला जातो.

**कोलामी भाषेची ध्वनिव्यवस्था**

कोलामी भाषेची ध्वनिव्यवस्था द्राविडियन भाषांशी मिळतीजुळती आहे. ज्याचे स्वन व व्यंजन असे वर्गीकरण करता येते. मानवी मुखाद्वारे उच्चारल्या गेलेल्या व भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनीला 'स्वन' म्हणतात. स्वनाचे 'स्वर' व 'व्यंजन' असे विभाजन करता येते. कोलामी भाषेत एकूण बारा स्वर व बावीस व्यंजने आहेत.

स्वर - अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ,ओ, औ,अं, अः

व्यंजने - क, ग,

च, ज,

त, द, ध, न,

थ, ड, ण, ट,

प, ब, भ, म,

य, र, ल, व, स, ह.

ट व ब ही व्यंजने मराठीतून कोलामीने स्वीकारलेली आहेत.

**व्याकरणिक प्रक्रिया**

कोलामांच्या भाषेत ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध, फ, भ या महाप्राण व 'ह'कारयुक्त वर्णांचा वापर असला तरी तो कमी आहे. यापैकी 'छ' व 'ह'चा वापर प्रायः आढळत नाही. 'छ'च्या जागी 'च', 'ख'च्या जागी 'क', 'घ'च्या जागी 'ग', 'झ'च्या जागी 'ज', 'ठ'च्या जागी 'ट', 'ढ'च्या जागी 'ड', 'थ'च्या जागी 'त', 'ध'च्या जागी 'द', 'फ'च्या जागी 'प', 'भ'च्या जागी 'ब' वापरण्याकडे कल आहे. कोलामीचे उच्चारणच असे आहे, ही हकारयुक्त अक्षरे ते 'ह'चा किंचित लोप करून उच्चारतात, मात्र ही अक्षरे त्या भाषेतच नाहीत असे नाही. ञ हे मात्र आढळत नाही. ड, न, म ही अनुनासिके आहेत. श,ष ही व्यंजने आहेत, पण त्याऐवजी 'स'चा वापर जास्त होतो. आरंभीचे 'क्ष' हे व्यंजन या भाषेत नसून 'ही', 'हु' ऐवजी



बरेचदा 'इ' व 'उ'चा उपयोग केला जातो. 'ळ'चा वापर कोलामी भाषेत बऱ्याच जागी आहे. उदा. हिवताळ (हिवाळा), सिरमूळ (कानातील मळ). कोलामी भाषेत एकवचनी शब्दाचे अनेकवचन करताना ३-४ पद्धतींचा वापर होतो. बऱ्याचदा मूळ शब्दांना ल लावून अनेकवचन होते. मूळ शब्दाच्या शेवटी 'ल' असला तर 'सिल' लावून अनेकवचन करतात. काही जागी 'कुल' लावून अनेकवचन होते. अंती अनुनासिके असलेल्या शब्दांना शेवटी 'ल' लावून,पण किंचित फरकाने अनेकवचन होते. कोलामी भाषेत नपुंसकलिंग नाही,फक्त पुल्लिंग व स्त्रीलिंग आहे. बऱ्याचशा शब्दांमध्ये 'राल' लावून स्त्रीलिंगी रूप होते. उदा. तेलगिराल, वड्डिराल.

कोलामी भाषेत नातेसंबंधांसाठी असलेल्या शब्दांतही वेगळेपणा आहे. तो विस्ताराने नातेवाचक शब्दसंग्रहामध्ये येतो. किंचित फरक करून शब्द तयार झाल्याचे मनोहर दृश्य कोलामी भाषेत आढळते. उदा. 'मित' या शब्दाचा उडी असा आहे. 'मिते' या शब्दाचा अर्थ 'टोळ' व 'मीते' याचा अर्थ 'ससा' असा आहे. 'मित', 'मित्ते' व 'मीते' हे तिन्ही शब्द उडण्याशी संबंधित आहेत व त्यावरूनच ते उडणे, टोळ व ससा यांना लावलेले आहेत. 'मोकाम' म्हणजे तोंड असा अर्थ या भाषेत असून 'मोकाराम' म्हणजे नथ असा अर्थ आहे. 'मोकाम' व 'मोकाराम' हे दोन्ही शब्द जवळचे व दोन्हींची स्थानेही जवळची. 'रुव' म्हणजे फेकणे आणि 'रुसी' म्हणजे फेकून देणे, टाकणे, वार करणे. या 'रुव' आणि 'रुसी' या दोन्हींच्या जवळचा 'रोसी' हा शब्द असून त्याचा अर्थ 'सुरी' असा आहे. वार करणे या अर्थाचा 'रुसी' शब्द व सुरी या अर्थाचा 'रोसी' ह्या शब्दांचे उच्चार किंचित फरक ठेवणारे आहेत.

'रेसन आते' म्हणजे 'जंगली कुत्रा' यांतील 'रेसन' हा शब्द फेकणे, सोडणे या अर्थाच्या 'रुसी', 'रुव' यांच्याजवळचा आहे. वेगवेगळ्या अर्थच्छटांचे 'रुव', 'रुसी', 'रोसी' व 'रेसन'आते हे चारही शब्द कोलामीत आहेत, ती एक उल्लेखनीय बाब आहे. कोलामीतील कित्येक शब्द द्रविडीला जवळचे असले तरी ते शब्द संस्कृतात आढळतात. द्राविडी आणि आदिवासी भाषांचे, देशी भाषांचे व संस्कृतचे घनिष्ठ नाते असल्याचे ते द्योतक आहे असे डॉ. मांडवकर म्हणतात. उदा. कोलामीतील व संस्कृतातील 'हेड' व वऱ्हाडातील 'हेंडे' आणि मराठीतील 'हेडाऊ' हे शब्द. 'राक' म्हणजे घासणे व मराठीतील 'राख' वा 'राखुंडी' हा शब्द, मासोळीसाठी असलेला कोलामीतील 'मोसाली' हा शब्द किंवा राक्षसासाठी आलेला कोलामातील 'राकासी' हा शब्द यासारख्या उदाहरणांनी मराठी, संस्कृत, आदिवासी भाषा यांचा अन्योन्य संबंध शोधता येईल.

कोलामी भाषा पूर्णपणे मौखिक आहे, या भाषेला लिपी नसल्यामुळे तिचे लेखन देवनागरीतून होत असल्याचे दिसून येते. कोलामी भाषेच्या मौखिक परंपरेत लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार व कोडे यांची समृद्ध परंपरा प्रचलित आहे. कोलामी बोलीभाषेत स्त्रियांची लोकगीते विपुल प्रमाणात आढळून येतात. कोलामांमधील अनेक बुजुर्ग लोक कोलामी भाषेत दीर्घ लोककथा सांगतात, ज्यातून कोलामी भाषेचे अस्सल स्वरूप प्रकट होते. परंतु काळाच्या ओघात हा लोकसाहित्याचा खजिना दिवसेंदिवस लुप्त होत आहे. कोलामी लोकांच्या रोजच्या बोलण्यात म्हणी व वाक्प्रचार यांचा मोठा वापर असतो. कोलामी भाषेचा स्वतंत्र शब्दसंग्रह असून त्यात अनेक वैशिष्ट्यपूर्ण शब्दांचा समावेश दिसून येतो.

कोलामी भाषेतील काही शब्द हेग हिस्लॉप, हिरालाल, रसेल, सुधीभूषण भट्टाचार्य व टी. ब्युरो यांनी गोळा केले. सेतु माधवराव पगडी यांनी कोलामी भाषेचे व्याकरण इंग्रजीत लिहिले व या भाषेवर डॉ. एमेन्यू यांनी इंग्रजीत प्रबंध लिहिला. परंतु यांपैकी एकानेही कोलामी भाषेत गीते असल्याची माहिती दिली नाही. त्यामुळे कोलामीत गाणी नाहीत हा समज सेतुमाधवराव व डॉ. एमेन्यू यांनी करून घेतला. डॉ. केतकरांच्या ज्ञानकोशात कोलामांची गाणी मराठी असल्याची माहिती दिली आहे. या सर्वांमुळे कोलामीत गीते नाहीतच, असा समज भाषाभ्यासकांचा झाला, हा समज विचारात घेऊन डॉ. भाऊ मांडवकर यांनी कोलामी भाषेतील गीते 'कोलाम' या ग्रंथात समाविष्ट केली आहेत.

बदलत्या काळात कोलामी भाषेवर इतर भाषांचा मोठा परिणाम होत असून त्यामुळे या भाषेचे मूळ स्वरूप हरवून चाललेले आहे. या भाषेवर मराठी, तेलुगू व हिंदी भाषांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. विकासाच्या अनेक योजना कोलामांपर्यंत येऊन पोहोचल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या परंपरागत जीवनामध्ये अनेक बदल होत आहेत. पारंपरिक जीवन कालबाह्य होत आहे. जगण्याच्या अनेक संज्ञा काळाच्या ओघात बदलत आहेत, त्यामुळे कोलामी भाषेत सुद्धा मोठ्या प्रमाणावर परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

**– डॉ. श्रीकृष्ण काकडे**

ऋतुरंग वर्ष २९वे । दिवाळी २०२१ ।
संपादक : **अरुण शेवते**

**आजोळचे दिवस विशेषांक**

ऋतुरंग दिवाळी अंकाचे हे २९वे वर्ष आहे. या वर्षीचा विशेषांक 'आजोळचे दिवस' हा आहे. आजोळच्या नातेसंबंधाची वीण घट्ट विणलेली असते. आजी-आजोबा, मामा, काका, आत्या या साऱ्या मायेच्या सावल्या असतात. त्यांच्या सहवासातले वातावरण, आठवणी न विसरता येण्यासारख्या असतात. आईवडिलांचा, गुरूंचा आपल्या जडणघडणीत महत्त्वाचा सहभाग असतो. पण या आजोळच्या सावल्यांचा रेशीमबंध आपल्या आठवणींना उत्कटतेने जपतो. आयुष्याकडे मागे वळून पाहताना तो आपल्या जगण्याचीही साक्ष देतो.

**या अंकातील लेखक** : गुलज़ार, सचिन तेंडुलकर, अभिषेक बच्चन, विश्वास पाटील, सुशीलकुमार शिंदे, विनय सहस्रबुद्धे, संजय राऊत, राधिका आपटे, डॉ. पी. डी. पाटील, यशवंतराव गडाख, बाळासाहेब थोरात, राजू परुळेकर, उदय निरगुडकर, नितीन चंद्रकांत देसाई, मोनिका गजेंद्रगडकर, फादर फ्रान्सिस दिब्रिटो, प्रगती बाणखेले, मलिका अमर शेख, प्रभा गणोरकर, रश्मी कशेळकर, सुनील मेहता, अमृता सुभाष, प्रदीप चंपानेरकर, शाहू पाटोळे, अरविंद जगताप, नीतिन आरेकर, शुभदा चौकर, श्रीधर फडके, किशोर मेढे, अनिल साबळे, लक्ष्मण खेडकर, विजयराज बोधनकर, अन्वर हुसेन, डॉ. राजेंद्र मलोसे, प्राची रेगे, सुचिता घोरपडे, अश्विनी देसाई, द. वि. अत्रे, शर्वरी शेवते.

**मुखपृष्ठ** : अन्वर हुसेन । **रेखाटने** : विजयराज बोधनकर, अन्वर हुसेन

**मूल्य : २५० रुपये । पृष्ठसंख्या : २५०**

ऋतुरंग प्रकाशन

संपर्क : **अरुण शेवते**
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४
shevatearun@gmail.com

**अंक सर्व विक्रेत्यांकडे उपलब्ध.**
घरपोच अंक हवा असल्यास प्रकाशनपूर्व सवलत आणि कुरिअर खर्चासह २५० रुपये.
बुकिंग संपर्क : ऋतुरंग प्रकाशन - ८१०४४४६९४३

महाराष्ट्राचा एक मोठा प्रादेशिक भूभाग असलेला मराठवाडा भौगोलिक आणि भाषिकदृष्ट्याही तसाच व्यापक, विविधतापूर्ण आणि समृद्ध आहे. कर्नाटक आणि तेलंगणा या दोन दक्षिणेतील राज्यांना मराठवाडा खेटून बसलेला आहे. निजामाची दीर्घकालीन राजवट मराठवाड्यावर होती. त्यामुळे सीमावर्ती भागात मराठी-तेलुगु-कानडी-दखनी अशी विविधरंगी मिश्र भाषा चालते. सांस्कृतिक आदानप्रदानही चालते. मराठवाड्यात अनेक बोली बोलल्या जातात. त्यामुळे एकच एक अशी विशिष्ट बोली 'मराठवाडा बोली' म्हणून सांगता येत नाही. मात्र मराठवाड्याची म्हणून एक खास उच्चारांची विशिष्ट लकब, हेल, शब्द, धाटनी आणि वैशिष्ट्य आहे. त्यावरून मराठवाड्यातील बोली ओळखायला येते. मराठवाड्यातील सीमावर्ती बोलीवर किंवा विशिष्ट जिल्ह्यातील बोलीवर काही संशोधन अभ्यासही झालेले आहेत. मात्र संपूर्ण मराठवाड्याच्या बोलीचा एकत्रित असा भाषाशास्त्रीय अभ्यास आजवर झाल्याचे दिसत नाही. असा एकत्रित भाषाशास्त्रीय अभ्यास करणे हे एक मोठे आणि आव्हानात्मक कार्य निश्चित आहे. मराठवाड्यात भाषिक बहुलतेबरोबरच अनेकपदरी सांस्कृतिक बहुलताही आहे, आणि हेच मराठवाड्याचे, तिथल्या भाषेचे वैभव आणि समृद्ध वारसा आहे.

**- सुशील धसकटे**



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# ठाकरी बोली

मोहन रणसिंग

**ठाकर जमात फक्त महाराष्ट्राच्या विविध भागात वास्तव्य करून आहे. ठाकरांच्या बोलीवर त्या त्या प्रदेशातील प्रादेशिक भाषांचा परिणाम झालेला आहे. त्यामुळे ठाकरी बोलीत प्रदेशानुरूप भेद पडत गेला. पुण्याचे कुणबी आणि नाशिकचे ठाकूर यांची भाषा मुख्यत: कोंकण मराठीशी जुळती आहे. या हिशेबाने ठाणे जिल्ह्यातील ठाकरांच्या बोलीवर, येथे प्राबल्याने असलेल्या कुणबी बोलीचा प्रभाव पडलेला आहे.**

**‘ठाकरी’** बोली ही एक जातिनिष्ठ बोली आहे. ठाकर जमातीची बोली ती ठाकरी बोली. ठाकर ही महाराष्ट्रातील एक आदिवासी जमात आहे. उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकण प्रांतात ह्या जमातीचे वास्तव्य कमीअधिक प्रमाणात आहे. सह्याद्रीच्या उत्तरेकडील पूर्व-पश्चिम पट्ट्यात ही जमात एकवटलेली आहे आणि ह्या प्रदेशापासून जसे दूरवर जाऊ तसे त्यांची वस्ती विरळ होत जाते. विरळ वस्तीच्या प्रदेशात ते अल्पसंख्यांक ठरतात. त्यामुळे बहुसंख्यांकांच्या बोलीचा ह्या ठाकरी बोलीवर परिणाम झालेला आहे. तरीही आपापल्या प्रादेशिक वैशिष्ट्यांचा साज चढवून आपले जातिनिष्ठ वैशिष्ट्य ह्या बोलीने टिकवून ठेवलेले आहे.

‘मराठी भाषा : उद्गम व विकास’ ह्या पुस्तकात श्री. कृ.पां. कुलकर्णी यांनी ‘मराठीचे प्रांतिक भेद’ ह्या नावाने एक प्रकरण लिहिलेले आहे. त्यात ठाकरी बोलीचा उल्लेख केलेला आहे. पण तो उत्तर कोकणीची पोटभाषा म्हणून. मात्र इतर तत्सम आदिवासी बोलींची वैशिष्ट्ये ते देतात, पण ठाकरी बोलीची वैशिष्ट्ये त्यांनी नमूद केलेली नाहीत.

ठाकरी बोलीचे आजचे स्वरूप पाहता शे-दोनशे वर्षांपूर्वी ही बोली कशी होती हे सांगणे कठीण आहे. बारा कोसांवर भाषा बदलते असं म्हणतात. तसं बावीस वर्षांनी (एक पिढी) भाषा बदलते असं म्हणायला हरकत नाही. ‘‘वारली व ठाकर ह्यांच्या पूर्वजांच्या प्राचीन अनार्य भाषांचा मागमूसही आता लागणे दुरापास्त समजावे’’ असे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. वि.का. राजवाडे म्हणतात.[१] यावरून ठाकरी बोलीला प्राचीन इतिहास आहे असे दिसून येते. ‘‘स्वत:ची मूळ भाषा टाकून केव्हा ना केव्हा तरी एखाद्या परभाषेचा स्वीकार न केलेला समाज विरळाच, असे इतिहासावरून दिसून येते.’’ असे भाषाशास्त्रज्ञ श्री. ना.गो. कालेलकर म्हणतात. यालाच पुष्टी मिळेल असं विधान मानववंशशास्त्रज्ञ डॉ. इरावती कर्वे यांनी केलेलं आहे. त्या म्हणतात, ‘‘भाषा व्याकरणाने बांधली गेली तरी जोपर्यंत ती बोलभाषा राहते, तोपर्यंत व्याकरणात न सांगितलेले कित्येक प्रयोग रोज होत असतात व हळूहळू भाषा इतकी बदलते की दर शंभर वर्षांनी भाषेचे व्याकरण व शब्दकोश बदलत जातो.’’

‘‘ठाकर जमातीचे लोक महाराष्ट्रीसम अपभ्रष्ट प्राकृत भाषा बोलत होते’’ असं श्री. वि.का. राजवाडे म्हणतात. तर ठाकरी जमातीचे अभ्यासक श्री. एल.एन. चापेकर म्हणतात, ‘‘ठाकर मराठी बोलतात.’’[२] ह्या जमातीचे दुसरे अभ्यासक डॉ. श्री. गोविंद गारे म्हणतात, ‘‘ठाकूरांच्या (ठाकरांच्या) बोलीला ठाकरी बोली म्हणतात. ही बोलीभाषा एक विशिष्ट उच्चाराची आहे. परंतु ती मराठीच आहे.’’[३] ह्या उदाहरणांवरून व प्रत्यक्ष अभ्यासावरून हे सिद्ध होते की, ठाकरी ही एका विशिष्ट जमातीची बोली असली तरी ती

मराठीपासून फार दूर नाही व तिचे वैशिष्ट्य हे उच्चारांवर आहे.

ठाकर जमात ही फक्त महाराष्ट्रातच आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांत ती वास्तव्य करून आहे. म्हणून ठाकरांच्या जातिनिष्ठ बोलीवर त्या त्या प्रदेशातील प्रादेशिक भाषांचा परिणाम झालेला आहे. त्यामुळे ठाकरी बोलीत प्रदेशानुरूप भेद पडत गेला. ''पुण्याचे कुणबी आणि नाशिकचे ठाकूर यांची भाषा मुख्यत: कोकण मराठीशी जुळती आहे.''[४] असा अनुभव श्री. ना.गो. कालेलकर व्यक्त करतात. ह्या हिशेबाने ठाणे जिल्ह्यातील ठाकरांच्या बोलीवर तेथे प्राबल्याने असलेल्या कुणबी बोलीचा, पालघर-डहाणू प्रदेशातील ठाकरी बोलीवर वाडवळी बोलीचा, रायगड जिल्ह्यातील ठाकरी बोलीवर आगरी बोलीचा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकरीवर मालवणी बोलीचा प्रभाव पडलेला आहे.

म्हणजेच महाराष्ट्रातील विविध प्रदेशातील ठाकरी बोलीत साम्य आढळून येत नाही. आणि ती जडणघडण भाषाशास्त्राच्या नियमाला अनुसरूनच आहे. येथे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर जमातीच्या अनुषंगाने ठाकरी बोलीचा विषय प्रतिपादन केलेला आहे.

ठाकरी बोलीस वेगळी अशी अक्षरलिपी नाही. ह्या बोलीत लेखन उपलब्ध नाही. हिचे पूर्वावस्थेतील रूप हे केवळ जे मौखिक परंपरेने चालत आलेले आहे, तेच गृहीत धरलेले आहे. नागरी संस्कृतीच्या संपर्कात न आलेल्या निरक्षर लोकांच्या सान्निध्यात राहून जे काही अभ्यासायला मिळाले, तेवढेच! ठाकर लोकगीतांतून, पोवाड्यांतून (कथाकथन) आणि लोककथांतून जे काही पारंपरिक शब्द ऐकायला मिळाले, ते महत्त्वाचे वाटले. ठाकर बोलीचा विचार चार टप्प्यांत केलेला आहे. १) व्याकरण, २) पारिभाषिक शब्दसंग्रह, ३) वाक्प्रचार व म्हणी, ४) भाषेचे नमुने.

**व्याकरण**

ठाकरी बोलीचे व्याकरण साधारण मराठीप्रमाणेच आहे. काही ठिकाणी अल्पसा फरक आहे. तो उदाहरणांसहित मांडलेला आहे. मराठीहून ठाकरी बोलीचे वेगळेपण कळावे म्हणून व्याकरणाचा तुलनात्मक विचार केलेला आहे. त्यातून मराठी (म) व ठाकरी (ठा) बोलीतील भेद स्पष्ट होईल.

**संख्याविशेषण**

ठाकरी बोलीतील संख्याविशेषण ही मराठीसारखीच आहेत. अपवाद फक्त 'एक'चा. 'एक' हे संख्याविशेषण मराठीत तीनही लिंगात सारखेच असते. ठाकरीत ते तीनही लिंगात वेगवेगळे असते.

| | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|---|
| मराठी – | एक आंबा | एक छत्री | एक पाखरू |
| ठाकरी – | योक आंबा | एक छत्री | याक पाखरू |

**नामविचार**

सामान्यनामाच्या अनेकवचनात फरक आहे.

| | एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| मराठी – | आंबा | आंबे | दिवा | दिवे |
| ठाकरी – | आंबा | आंबं | दिवा | दिवं |

आकारान्त पुल्लिंगी सामान्यनामात एकवचनात साम्य, अनेकवचनात भेद आहे. नपुंसकलिंगी अकरान्त नामात तीच परिस्थिती आहे.

| | एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| मराठी – | पुस्तक | पुस्तके | झाड | झाडे |
| ठाकरी – | पुस्तक | पुस्तका | झाड | झाडा |

**विशेषनाम**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मराठी – | शिवराम | राम | प्रभाकर | सदानंद |
| ठाकरी – | शिवगा | रामगा | पब्ला | सद्गा |

ठाकरीमध्ये पुल्लिंगी विशेषनाम आकारान्त होते, तर स्त्रीलिंगी विशेषनाम 'इ'कारान्त होते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मराठी – | सुशिला | शांता | शाली | जना |
| ठाकरी – | सुस्ली | शेंती | शाल्गी | जन्गी |

**पुरुषविचार**

| | प्र.पु.ए.व. | अ.व. | द्वि.पु.ए.व. | अ.व. |
|---|---|---|---|---|
| मराठी – | मी | आम्ही | तू | तुम्ही |
| ठाकरी – | मी | आमी | तू | तुमी |

दोन्ही पुरुषांच्या अनेकवचनात मराठीतील महाप्राण 'ह' लोप पावलेला आहे. तृतीय पुरुष नपुंसकलिंगामध्ये फरक दिसून येतो.

मराठी – ते फूल ती फुले

ठाकरी – त्या फूल ती फुला

एकवचनात दर्शक सर्वनामात फरक आहे. अनेकवचनात सामान्यनामात फरक आहे.

विभक्तीच्या द्वितीया व तृतीयेच्या प्रत्ययांत फरक आहे.

| | प्र.पु.ए.व. | प्र.पु.अ.व. | द्वि.पु.ए.व. | द्वि.पु.अ.व. |
|---|---|---|---|---|
| मराठी – | मला | आम्हाला | तुला | तुम्हाला |
| ठाकरी– | माला | आमास्नी | तुला | तुमास्नी |
| | तृ.पु.ए.व. | तृ.पु.अ.व. | तृ.पु.ए.व | तृ.पु.अ.व. |
| | | पुल्लिंगी | | स्त्रीलिंगी |
| मराठी – | त्याला | त्यांना | तिला | त्यांना |
| ठाकरी – | तेला | तेस्नी | तिला | तेस्नी |

वरील उदाहरणात अनेकवचनातील फरक ठळकपणे दिसतो. तृतीयेच्या पुल्लिंगी व स्त्रीलिंगी तृतीय पुरुषामध्ये फरक आहे.

| | पुल्लिंगी | | स्त्रीलिंगी | |
|---|---|---|---|---|
| | ए.व. | अ.व. | ए.व. | अ.व. |
| मराठी – | त्याने | त्यांनी | तिने | त्यांनी |
| ठाकरी – | तेना | तेनी | तिना | तेनी |

**क्रियापद**

मराठी – अनंत कुठे गेला? शांता इथे आली

ठाकरी – अंता कुटं गेला? शेंती हतं आली

मराठी व ठाकरीत क्रियापदांची रूपे सारखीच आहेत. मात्र ती रूपे 'काळा'नुरूप बदलतात, हे 'कालविचारा'मध्ये दिसून येते.

**कालविचार**

**साधा वर्तमानकाळ**

| | प्र.पु.ए.व. | प्रथम पुरुष अ.व. |
|---|---|---|
| मराठी – | मी वाचतो | आम्ही वाचतो |
| ठाकरी – | मी वाचतो | आमी वाचताव |
| | द्वि.पु.ए.व. | द्वितीय पुरुष अ.व. |
| मराठी – | तू जातोस | तुम्ही जाता |
| ठाकरी – | तू जातोस | तुमी जातासा |
| | तृ.पृ.ए.व.(पु.) | तृतीय पुरुष अ.व. (पु.) |
| मराठी – | तो खेळतो | ते खेळतात |
| ठाकरी – | तो खेळतो | ते खेळत्यात |
| | तृ.पु.ए.व. (स्त्री) | तृतीय पुरुष अ.व. (स्त्री) |
| मराठी – | ती बघते | त्या बघतात |
| ठाकरी – | ती बगती | त्या बगत्यात |
| | तृ.पु.ए.व. (नपुं.) | तृतीय पुरुष अ.व. (नपुं.) |
| मराठी – | पाखरू उडते | पाखरे उडतात |
| ठाकरी – | पाखरू उडता | पाखरा उडतात |

वरील उदाहरणांवरून दिसून येते की, साध्या वर्तमानकाळात प्रथम पुरुष, द्वितीय पुरुष व तृतीय पुरुष पुल्लिंगाच्या एकवचनातील क्रियापद हे मराठीत व ठाकरीत सारखेच चालते. मात्र अनेकवचनातील क्रियापदे भिन्न आहेत. नपुंसकलिंगातही अनेकवचनातील क्रियापदात भिन्नता आहे.

**अपूर्ण वर्तमानकाळ**

दोन्ही भाषांच्या अपूर्ण वर्तमानकाळात तीनही पुरुषांतील दोन्ही वचनातील क्रियापदात फरक आहे.

**प्रथम पुरुष**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | मी लिहीत आहे | आम्ही लिहीत आहोत |
| ठाकरी – | मी लिवतोय | आमी लिवताव |



**द्वितीय पुरुष**

एकवचन अनेकवचन

मराठी – तू वाचत आहेस तुम्ही वाचत आहात

ठाकरी – तू वाचतोय्स तुमी वाचतेय्सा

**तृतीय पुरुष**

एकवचन अनेकवचन

मराठी – तो पाहत आहे ते पाहत आहेत

ठाकरी – तो बघतोय (किंवा) ते बगतायत (किंवा)

बगत हाय बगत हाय्त

**तृतीय पुरुष (स्त्री)**

एकवचन अनेकवचन

मराठी – ती खेळत आहे त्या खेळत आहेत

ठाकरी – ती खेळतेय त्या खेळताय्त

**तृतीय पुरुष (नपुं.)**

एकवचन अनेकवचन

मराठी – ते (फुलपाखरू) उडत आहे ती उडत आहेत

ठाकरी – त्या उडताय ती उडताय्त

येथे सर्व क्रियापदांमध्ये फरक आहे. कर्त्यानुसार क्रियापदे बदलतात.

**पूर्ण वर्तमानकाळ (धातुसाधित) प्रथम पुरुष**

एकवचन अनेकवचन

मराठी – मी पुस्तक वाचलेले आहे आम्ही पुस्तक वाचलेले आहे

आम्ही पुस्तके वाचलेली आहेत

ठाकरी – मी पुस्तक वाचलाय आम्ही पुस्तक वाचलाय

आम्ही पुस्तका वाचलेय्ता

**द्वितीय पुरुष**

एकवचन अनेकवचन

मराठी – तू पुस्तक वाचलेले आहेस तुम्ही पुस्तक वाचलेले आहे

तुम्ही पुस्तके वाचलेली आहेत

ठाकरी – तू पुस्तक वाचलाय्स तुमी पुस्तक वाचलय्सा

तुमी पुस्तका वाचलेय्सा

**तृतीय पुरुष**

एकवचन अनेकवचन

मराठी – त्याने पुस्तक वाचलेले आहे त्यांनी पुस्तक वाचलेले आहे

त्यांनी पुस्तके वाचलेली आहेत

ठाकरी – तेना पुस्तक वाचलाय तेनी पुस्तक वाचलाय

तेनी पुस्तका वाचलेय्ता

कर्माचे अनेकवचन झाले की क्रियापद बदलते.

**भूतकाळ**

**साधा भूतकाळ – प्रथम पुरुष**

एकवचन अनेकवचन

मराठी – मी गेलो आम्ही गेलो

ठाकरी – मी गेल्लो आमी गेल्लाव

**द्वितीय पुरुष**

एकवचन अनेकवचन

मराठी – तू लिहिलेस तुम्ही लिहिलेत

ठाकरी – तू लिवलाय्स तुमी लिवलाय्सा

**तृतीय पुरुष (पु)**

एकवचन अनेकवचन

मराठी – तो निजला होता ते निजले होते

ठाकरी – तो निजला व्हता ते निजलं व्हतं

**तृतीय पुरुष (स्त्री)**

एकवचन अनेकवचन

मराठी – ती गेली होती त्या गेल्या होत्या

ठाकरी – ती गेल्ली व्हती त्या गेल्ल्या व्हत्या

**तृतीय पुरुष (नपुं.)**

एकवचन अनेकवचन

मराठी – ते पळाले होते ती पळाली होती

ठाकरी – त्या पळाला व्हता ती पळाली व्हती

**अपूर्ण भूतकाळ – प्रथम पुरुष**

एकवचन अनकेवचन

मराठी – मी जात होतो आम्ही जात होतो

ठाकरी – मी जाय्त व्हतो आमी जाय्त व्हताव

**द्वितीय पुरुष**

एकवचन अनेकवचन

मराठी – तू खात होतास ते खात होते

ठाकरी – तू खाय्त व्हतास ते खाय्त व्हतं

**तृतीय पुरुष (पु.)**

एकवचन अनेकवचन

मराठी – तो वाचत होता ते वाचत होते

ठाकरी – तो वाचीत व्हता ते वाचती व्हते

**तृतीय पुरुष (स्त्री)**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | ती गात होती | त्या गात होत्या |
| ठाकरी – | ती गाय्त होती | त्या गाय्त व्हत्या |

अपूर्ण भूतकाळात व्हता, व्हती, अशी रूपे येतात. सहायक क्रियापदात कधी कधी उपान्त्य 'य्' (अर्धा य) लागतो. उदा. जाय्त, खाय्त. मात्र 'पळत' ह्या क्रियापदात काही फरक होत नाही.

### साधा भविष्यकाळ

**प्रथम पुरुष**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | मी येणार | आम्ही येणार |
| ठाकरी – | मी यतेलो | आम्ही यत्यालाव |

**द्वितीय पुरुष**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | तू जाणार | तुम्ही जाणार |
| ठाकरी – | तू जात्यालास | तुमी जातेलसा |

**तृतीय पुरुष (पु)**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | तो वाचणार | ते वाचणार |
| ठाकरी – | तो वाचत्याला | ते वाचतेलं |

**तृतीय पुरुष (स्त्री)**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | ती नाचणार | त्या नाचणार |
| ठाकरी – | ती नाचतेली | त्या नाचत्याला |

**तृतीय पुरुष (नपुं.)**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | ते येणार | ती येणार |
| ठाकरी – | त्या यत्याला | ती यतेली |

सर्वच पुरुषात क्रियापदातील रूपात फरक आहे हे दिसून येते.

### अपूर्ण भविष्यकाळ

**प्रथम पुरुष**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | मी वाचत असेन | आम्ही वाचत असू |
| ठाकरी – | मी वाचीत आस्तेलो | आमी वाचत आस्त्यालाव |

**द्वितीय पुरुष**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | तू खात असशील | तुम्ही खात असाल |
| ठाकरी – | तू खायत् अस्त्यालास | तुमी खायत् आस्तेलसा |

**तृतीय पुरुष (पु)**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | तो गात असणार | ते गात असणार |
| ठाकरी – | तो गाय्त आस्त्याला | ते गाय्त आस्तेलं |

**तृतीय पुरुष (स्त्री)**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | ती पाहत असणार | त्या पाहत असणार |
| ठाकरी – | ती बगत आस्तेली | त्या बगत आस्त्याला |

**तृतीय पुरुष (नपुं.)**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | ते जात असणार | ती जात असणार |
| ठाकरी – | त्या जाय्त आस्त्याला | ती आय्त आस्तेली |

### विभक्ती विचार

प्रथम विभक्ती प्रत्ययांचा विचार करून ठाकरी बोलीतील प्रत्ययांत कुठे आणि कसा बदल होतो ते पाहू.

| विभक्ती | एकवचनी प्रत्यय | अनेकवचनी प्रत्यय |
|---|---|---|
| प्रथमा | – | – |
| द्वितीया | स, ला, ते | स, ला, ना, ते |
| तृतीया | ने, ए, शी | नी, शी, ई, ही |
| चतुर्थी | स, ला, ते | स, ला, ना, ते |
| पंचमी | ऊन, हून | ऊन, हून |
| षष्ठी | चा, ची, चे | चे, च्या, ची |
| सप्तमी | त, ई, आ | त, ई, आ |
| संबोधन | – | नो |

ठाकरीमध्ये द्वितीयेचे अनेकवचन, तृतीयेचे अनेकवचन, पंचमीच्या दोन्ही वचनात व सप्तमीतील अनेकवचनात फरक आहे.

**द्वितीया**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मराठी – | फुलास, फुलाला | फुलांस, फुलांना |
| ठाकरी – | फुलाला | फुलास्नी |

येथे 'ना' ऐवजी 'स्नी' हा प्रत्यय ठाकरीत वापरतात.

**विभक्ती प्रत्यय**

| | मराठी | ठाकरी |
|---|---|---|
| तृतीय एकवचन | फुलाने | फुलान् |
| तृतीया अनेकवचन | फुलांनी | फुलानी |
| पंचमी एकवचन | फुलाहून | फुलासून |
| पंचमी अनेकवचन | फुलांहून | फुलात्सून |
| सप्तमी एकवचन | फुलात | फुलांत |
| सप्तमी अनेकवचन | फुलात | फुलात्नी |

थोडक्यात, त्, त्सून, सून, त्नी हे ठाकरीमध्ये विभक्ती प्रत्यय आहेत. विशेषनामाच्या संबोधनातही वेगळेपण आहे.

| मराठी | ठाकरी | मराठी | ठाकरी |
|---|---|---|---|
| रामा | रामग्या | शाली | शाल्गे |
| जगन्नाथा | जग्या | माली | माल्ये |
| शांता | शेंते | सुभाष | सुब्ल्या |

**वचन**

| एकवचन | अनेकवचन | |
|---|---|---|
| | मराठी | ठाकरी |
| आंबा | आंबे | आंबं |
| ससा | ससे | ससं |
| कुत्रा | कुत्रे | कुत्रं |
| फुल | फुले | फुला |
| पुस्तक | पुस्तके | पुस्तका |
| दार | दारे | दारा |
| घर | घरे | घरा |

आकारान्त नामाचे अनेकवचन अनुनासिक अ'कारान्तमध्ये होते. तर अ'कारान्त नामाचे अनेकवचन आकारान्त रूपात होते. तसेच पाखरू-पाखरा, लिंबू-लिंबवा, पिशवी-पिश्या अशाप्रकारे अनेकवचनाचे रूप बदलते.

**सर्वनाम**

पुरुषवाचक सर्वनामातील पुल्लिंगी व स्त्रीलिंगी सर्वनामे ठाकरी भाषेतही मराठीप्रमाणे असतात. फक्त महाप्राण हा लुप्त होतो. उदा. आम्ही-आमी, तुम्ही-तुमी.

दर्शक सर्वनामांमध्ये थोडासा फरक आहे. मराठीतील दर्शक सर्वनाम हा, ही, हे, तो, ती, ते. ठाकरीमध्ये 'हा' ऐवजी 'ह्यो' म्हणतात. उदा. हा मुलगा - ह्यो पोरगा.

तसेच 'ते' ह्या नपुंसकलिंगी सर्वनामाऐवजी 'त्या' वापरतात. तसेच 'हे' ऐवजी 'ह्या' वापरतात. उदा. ते मांजर - त्या मांजूर, ते पुस्तक - त्या पुस्तक, हे पेन - ह्या पेन. पुल्लिंगी 'तो' हे सर्वनाम तसेच राहते. 'त्यो' होत नाही.

**संबंधी सर्वनाम**

मराठी - जे, जी. उदा. जे सांगितले तेच कर

ठाकरी - ज्या, जी. उदा. ज्या सांगितला त्याच कर.

काही शब्दयोगी अव्यये ठाकरीत वापरताना त्यांचीही रूपे बदलतात. काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

**कालवाचक**

मराठी - जेव्हा, तेव्हा - **जेव्हा** येशील, **तेव्हा** सांगून यावे

ठाकरी - जवा, तवा - **जवा** येशील, **तवा** सांगून यावा

**स्थलवाचक**

मराठी - जिथे, तिथे, इकडे, तिकडे, इथे

ठाकरी - जतं, ततं, हग्डं/हग्डन्, ततं/तग्डन्, जक्डं, तक्डं

उदा. जिथे तिथे पाणीच पाणी (मराठी)

**जक्डं तक्डं** पाणीच पाणी (ठाकरी)

**स्थितिवाचक**

मराठी - जिकडे - तिकडे

ठाकरी - जक्डं - तक्डं

**गतिदर्शक**

मराठी - इकडून, तिकडून, येथून, तेथून

ठाकरी - हग्डंसून, तग्डंसून, हत्सून, तत्सून

उदा. मराठी - इथून जा तिकडून आण

ठाकरी - हत्सून जा तत्सून/तग्डंसून आण

**साहचर्यवाहक**

मराठी - बरोबर, उदा. माझ्या बरोबर ये

ठाकरी - वांग्डा, उदा. माझ्या वांग्डा ये

**हेतुवाचक**

मराठी - साठी - उदा. माझ्यासाठी तेवढं कर

ठाकरी - खातर - उदा. माझ्याखातर तेवढा कर

**क्रियाविशेषण**

मराठी - आतून - जवळून

ठाकरी - भितुरसून - जवळसून

**पारिभाषिक शब्द**

ठाकरी बोलीतील व्याकरण व शब्दसंपदा ही मराठी भाषेतूनच आलेली आहे, तसेच संबंधित प्रादेशिक बोलीतून. उदाहरणार्थ, सिंधुदुर्ग जिल्ह्याविषयी बोलायचं तर मालवणीतून. गेली कित्येक वर्षे ही बोली प्रादेशिक बोलींच्या संपर्कात आहे. तरी ह्या भाषिक आक्रमणानंतरही

ठाकरीने आपली शब्दसंपदा जोपासून ठेवलेली आहे.

**संख्या**

योक (एक), याक (एक), स (सहा), नव (नऊ), धा (दहा), नंतर धा नि योक, धा नी दोन असा बोलीतील प्रकार आहे. असे विसापर्यंत झाले की, 'योक इसा' होते. मग योक इसा योक, योक इसा दोन अशा संख्या मोजतात. दोन ईसा म्हणजे चाळीस. पाच इसा म्हणजे शंभर.

'प्रथम' किंवा 'पहिल्यांदा' ह्या मराठीऐवजी 'पयल्यांदर', 'दुसऱ्यांदर', तिसऱ्यांदर असा शब्दप्रयोग होतो.

**वार**

आईतवार (रविवार), बेस्तरवार (गुरुवार), सुकीरवार (शुक्रवार) व सनवार (शनिवार). बाकीचे वार मराठीप्रमाणेच.

**मराठी महिने**

चैतीर (चैत्र), वैसाक (वैशाख), सरावन (श्रावण), भादवा (भाद्रपद), पूस (पौष), बाकीचे महिने एकतर ठाऊक नाहीत किंवा माहीत असले तर मराठीप्रमाणेच उच्चारतात.

**नक्षत्र**

नक्षत्रांची अल्पशी माहिती आहे. मीरग (मृग), उत्रा (उत्तरा), हस्ता (हस्त), आदा (आर्द्रा), पूस (पुष्य), असळसा (आश्लेषा), मुळा (मूळ), पुनवस (पुनर्वसू). बाकीची नक्षत्रं माहीत नाहीत किंवा माहीत असल्यास मराठीप्रमाणेच.

**ऋतू**

ठाकरांना एकच ऋतू माहीत आहे. गीम (ग्रीष्म), थंडीतील मोसमाला 'पूस' म्हणतात. अन्य ऋतूंची नावेही माहीत नाहीत.

**राशी**

राशींची काहीही माहिती नाही.

**कालगणना**

कालगणना करताना, ''चवथीपासून शिमगा स म्हयनं'' किंवा ''नागपंचमीसून चवथ योक म्हयना'', ''शिमग्यापासून पाडवा पंधरा दिसार.'' अशी कालगणना करतात.

**घराविषयक**

हुमरा (उंबरठा), उब्ला (दाराची चौकट), लोटा (ओटा), दारोस्ती (दरवाजावरची मोकळी जागा), वळय (माजघर), होवरी (पडवी), पाशीट (घराच्या छताच्या आतून मधला भाग), मॅड (मेढ), वय (घराभोवतीचे किंवा शेताभोवतीचे फुटकळ काट्याकुट्यांनी केलेलं कुंपण), आकांडा (वयमधून आत जाण्यासाठी लावलेला लाकडी अडसर), वाल (मातीचे कुंपण), धक्का (खळ्यात बसण्यासाठी केलेला मातीचा सोफा), सांडशी (लहान मुलांची गावठी औषधं ठेवण्याची बांबूची लहानशी पेटी)

**प्राणीविषयक**

मांजूर, मांजार (मांजर), जराळ, मुरकट (मच्छर), मास्की (माशी), हुमला, मुगा (मुंगळा), तातड (लाल तडतडीत मुंग्या), पक (पीस), पका (पिसे), जिर्ला (झुरळ), पाका (फुलपाखरू), म्हस (म्हैस), पेटूक (कुत्र्याचे पिलू), पेटका (कुत्र्याची पिले), तलग (लहान कोंबडी), पिंगानी (चतुर), बाऊल (रानमांजर), कवाकोंबडी (रानकोंबडी), कोगळण (कोकिळा).

**शरीरविषयक**

मुस्का, ताँड (तोंड), गची (गळा), नका (नखे), भावसा (खांदा), दुका (अश्रू), खाडकी (हनुवटी), खुबा (घोटा), कमार (कंबर), क्यास (केस), पोला (गाल किंवा कानशील), फोंडकी (मानेच्या वरचा डोक्याचा भाग), फोफीस (फुफ्फस), बुकांडा (ढुंगण), तरटा (डोके), पारोसा (तोंड न धुतलेला).

**निसर्गविषयक**

झाळक (झुडुप), आंबोली (आंब्याचे रोप), आळ (फणसाचे रोप), घोटी (गऱ्यातील आठली), पारी (आंब्याची बी), न्हिमार, हिमार (ऊन), खडाप (खडक), गुंडा (दगड), तॉर (कैरी), न्हय (नदी), सकेरी (बारीक दगड असलेली सुकी माती), धुकट (धूर), परसा (आग), डुरका (डबके), चुडात (माडाची फांदी), पिडा (पाने छाटलेली माडाची फांदी), शिरटी (डहाळीच्या टोकाचा तोडलेला दोन फूट लांबीचा तुकडा), शिरपुटा (सुकलेल्या बारीक काटक्या ज्या सरपणासाठी वापरतात.), पतेरा (झाडाची गाळून पडलेली सुकी पाने), सोला (कोकम), नाल (नारळ), नाक्डा (लाकडे), होंडका (खड्डा), खांदली (फांदी), निवळकांडा (निवडुंग).

**शेतीविषयक**

जगाल, कोळसा, रूमणी, इशाड, गुटा, जॉत (औत), ढिकळा, कुडी, मुडी, मडकूळ, चोपना, पेटना, लाट, फाफाळा, कोळमा, वायंगानी, शेळ.

**कालविषयक**

इरड (अर्धा दिवस), दिस (दिवस), दोंपार (दुपार), फाटपटी (पहाटे), तिनसांन (तिन्ही सांजा), वरीस (वर्ष),

अवंदा (यंदा), हाली (थोड्या दिवसांपूर्वी), वाईचशेकान (थोड्या वेळाने).

**इतर**

लाताड (मुंगी चावल्यानंतर त्या ठिकाणी अंगावर सुजलेला भाग), खांडुक (खरूज), खवनी (खपली), व्हदूळ (मगास), आपड (शिवाशीव), आपडणे (शिवणे), अनोसा (उपाशी), बाय (विहीर), राजू (विहिरीतून पाणी काढण्यासाठी वापरण्यात येणारा काथ्याचा दोर), बासा (उष्टा), बाट्टाभात (टोपात शिजवलेला पेजेशिवायचा भात), निवळ, प्याज (पेज), येदवा (एवढ्यात), तेदवा (तेवढ्यात), बापया (पुरुष), वाईच (थोडासा), तुरमाना (सुक्या मिरचीचे देठ), व्हाईन (उखळ), लाटन (कंदील), लाडीस (ट्रंक, लॉरी), पिरडूक (मंगळसूत्रातील मणी), गळेसरी (मंगळसूत्रासारखा गळ्यात घालण्याचा हार), हून (गरम), हुनहुनीत (गरमागरम), टिकाभांगा (नट्टापट्टा), पाकळूक (माया, लोभ), म्हनी (पाट), पाळ (मूळ), ठायबस्की (चिकटून राहणे किंवा आपुलकीने राहणे), आचिव (अरुंद), जवरा (परिसर), इचकना (तोंड वेंगाडणे किंवा अपशब्दांची लाखोली वाहणे), व्हलप (ऊब), गुचकावणे (प्रोत्साहित करणे), करवादणे (रागावणे), थापा (जमिनीवर पडलेला शेणाचा गोळा), डुबुल्गा (गरगरीत शरीरसौष्ठव असलेला मुलगा), काडावडी (काबाडकष्ट), भेतुक (कच्च्या आंब्याची कापलेली शीर), भ्यात (बांबू मधोमध चिरल्यानंतरची एक बाजू), मॅट (झाडांची राई), झुडतार (मानसन्मान नसलेला, किंमत नसलेला), सोमता (ताबडतोब), सामका (सरळ), सोपला (मेला), मंछामोड (वासना मरणे), चाबोळा (खूश करण्यासाठी तोंडावर गोड गोड बोलणारा), इरागत (लघवी, मूत्र), मुगडा (झाडूची मूठ), भितळा (कुऱ्हाडीने तोडलेले लाकूड), मनाय (पुरुषगडी), यावशाव (व्यवसाय), सालपटा (ढलप्या).

**वाक्प्रचार व म्हणी**

वाक्प्रचार व वाक्संप्रदाय

१) रेडा खाऊन पाड्याला हात घालणे – खूप खाणे, खादाडपणा.

२) हुसक्यान् वाघ मारणे – संशयाने चोर पकडण्याचा प्रयत्न करणे.

३) उसलात जाऊन अंगाला पात लावून न घेणे – चोरी करून पुरावा न ठेवणे.

४) अद्रुन करून – जाणीवपूर्वक, मुद्दामहून.

५) शेणावर काढणे – अपमान करणे.

६) हडुत शिवो करणे – क्षुद्र लेखणे.

७) तडक्यावर मडका – जोराचे भांडण.

**म्हणी**

१) पाठीवर मारावा, पण पॉटावर मारू नये – कुणाला उपाशी ठेवू नये.

२) आसावा पाटचा, नायतर पॉटचा – आपली माणसंच आपल्या मदतीला धावतात.

३) कापल्या किरंगाळीवर मुतायचा नाय – संकटाच्या वेळीसुद्धा थोडीशी मदत न करणे.

४) बळकटाच्या खांद्यावर – ताकदवान माणूस काहीही करू शकतो.

५) याक बॉट कापला तर दुसऱ्या बोटाला दुक पावती – आपल्या माणसाच्या दु:खाने व्यथित होणे.

६) आगाच्या पगा नि उतवाला ढेंगा – कांगावा करणे.

७) आधार नसते नारी, हिंडते दारोदारी – आधार नसलेल्या बाईला दारोदार हिंडावे लागते.

८) पुढा तक्डं मुलुख थोडा – कुठेही जायला मोकळीक.

९) पोटाची नळी आणि कानाची पाळी वाढवावी तेवढी वाढती – सवयीने काही होऊ शकतं.

१०) काळजी करी नि गोमना भरी – खोटं दु:ख व्यक्त करणं.

११) मुखी मुखी पाय मरशील, खाल्ल्यार माजा काय करशील? – ज्याचं करावं भलं तो म्हणतो आपलंच खरं.

१२) चित गेला चवकडं आणि घागर फुटली बायकडं – एकाग्रता नसली की नुकसान होतं.

१३) ठाकरांनी केला ती पाखरांनी खाल्ला – ठाकरांच्या करण्याला काही किंमत नाही.

१४) धरला तर चोर, नाय पातशाहून थोर – चोर तो चोर वर शिरजोर.

१५) फुकट खावं आणि गोपाळाचा भाव – फुटका माणूस.

१६) कपाळाला आठी, तोंडाला मिठी – राग आला तरी दाखवू नये.

१७) उभा आससर लाखाचा, पडला काय फुकाचा – कार्यरत आहात तोपर्यंतच मान.

१८) चाफा लावला कुणी, विठू झाला धनी – मेहनत

एकाने करायची, त्याचा लाभ दुसऱ्याने उचलायचा.

१९) खऱ्याला काटा नि खोट्याला ताठा – खोटेपणाला भाव मिळणे.

२०) शेजारणीच्या भरवशा, रस काढला निरवशा – जो दुसऱ्यावर विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला.

२१) कामाला नाय पार नि बसायला नाय थार – खूप घाईत असणे.

२२) देल घेल त्या गोमटा, नाय देल त्या हिंमटा – जो देत राहतो तो बरा, न देणारा वाईट.

२३) घरात नाय तांदूळ, सानगा म्हंता उकड सांडूळ – जवळ काहीही नसताना कोणीतरी मोठी मागणी करणे.

२४) लाजन गेला तो उपाशी मेला – गरजवंतास अक्कल नसते.

२५) भाईर बढाया नायकाचे, घरात हाल बायकाचे – फुकटच्या बढाया मारणे.

२६) पोराच्या मळणीला बी नाय, भात नाय – अननुभवी माणसाकडून कोणती अपेक्षा करू नये.

२७) वशाड गावात एरंड बळी – वासरात लंगडी गाय शहाणी.

२८) तापल्याला खापार धरतीच्या माथ्यार – कुणाचा दोष कुणाला सजा.

२९) म्हाताऱ्या बैलाला घुंगूरवाळं – पिकल्या पानाचा देठ हिरवा.

३०) एक बात सोळा हात – खोटं बोलणं.

३१) ससा जाय आपल्या वसा – स्वभावाला औषध नाही.

३२) जेची खांबली बलकट, तेचा वासरू कुदता – पाठिंबा असला तर दुर्बल माणूससुद्धा दादागिरी करतो.

३३) बाबा गेला पंढरपुर्ला, आता तरी वडं नाय आला तरी वडं – दु:खात किंवा सुखात दोन्हीकडे फायदाच.

ठाकरी बोलीत 'पिणे' हे क्रियापद नाही. पाणी खातो, चाय खातो असाच शब्दप्रयोग होतो. **डोळ्यांत बोट घातलं तरी दिसत नाही** म्हणजे खूप अंधार असल्याचं दर्शविणे. **कावळ्याच्या डोळ्यासारखं पाणी** म्हणजे अतिशय स्वच्छ पाणी. असे काही शब्दप्रयोग ठाकरी भाषेत आहेत.

**ठाकरी बोलीचा नमुना**

**गरीब नवरा–बायकोचा संवाद**

**बायको –** वशाड पडला ह्या पावसार, अट्टन करून घराभायर पडताना लागतो. आता जातेलो कशी बाजारात? ती गोणत्याची खॉळ तरी बनवा. काय गा, आज बाजाराचा दिस हाय. काय सोय केलीसा?

**नवरा –** काल सावकाराकडं गेल्लो. तेना धा रुपयं ऋण दिलं. तितक्यात काय त्या भागव.

**बायको –** तितक्यात कसा भागंल? पोरास्नी साळची पुस्तका व्हयी. साळंचं कपडं आणाया व्हयं. धा रुपड्यात कसा व्हत्याला?

**नवरा –** जेवडा जमल तेवडा कर. आता मी तरी कुटं घाण ऱ्हावू? सावकार म्हंतोय, आधिचाच ऋण हाय आंगार. कुणाकडं हात पसरतेलीस?

**बायको –** घरात भाताचा योक गोटा नाय. पोरास्नी दर्वज पेजंचा निवळ तरी खायला गावाय व्हया?

**नवरा –** जेना चॉच दिलेय तो दाना देत्याला. चल दिवसासकळ बाजारात्सून जाव्न येव्या. लय लांब हाय. परतताना तिन्सान व्हतेली.

**टीपा –**


१) महिकावतीची बखर, वि.का. राजवाडे, वरदा बुक्स, पुणे, दु.आ. जून १९९१, पृ. ८४

२) Thakurs of the Sahyadri - L.N. Chapekar, University of Bombay, 1966, Pg. 229

३) सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील ठाकूर (ठाकर) आदिवासी – डॉ. गोविंद गारे, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्र.आ., मार्च २००२, पृ. ५६

४) भाषा : इतिहास आणि भूगोल, ना.गो. कालेलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई, सप्टेंबर १९६४, पृ. २३ (प्रस्तावना).


**– मोहन रणसिंग**

नागालँडमधील १८ जमातींची आणि प्रशासनाची भाषा वेगवेगळी आहे. शेजारील राज्य आणि देशांच्या भाषांचा प्रभाव येथे पडतो. बेंगळुरू, पुणे, मुंबई अशा मोठ्या बहुसांस्कृतिक शहरांमध्ये १०० भाषा बोलले जाणे स्वाभाविक आहे. भाषावार प्रांतरचना झाली; पण आता बहुभाषिक शहरे ठरवण्याची गरज आहे.

**– डॉ. गणेश देवी, भाषातज्ज्ञ**

**संदर्भ : म. टा., पुणे**

बोलीभाषा विशेषांक

## लेख

# गोंडी बोलीतील वाक्यरचना आणि पदबंध

डॉ. हरिचंद नांगसू नरेटी

**‘गोंडी’ शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल विद्वानांमध्ये एकवाक्यता आढळून येत नाही. महाराष्ट्र स्टेट गॅझेटियरमध्ये हिंदूंनी आदिवासी जमातीला ‘गोंड’ हे नाव दिल्याचा उल्लेख आहे. भारतीय विश्वकोशात मात्र ‘गोंड’ हे नाव कोणी दिले याविषयी माहिती मिळते. चौदाव्या शतकातील मुस्लिमांनी प्रथम ‘गोंड’ व ‘गोंडवन’ हे शब्द वापरले.**

**सामाजिक** जीवनात संपर्क आणि संदेशवहनाचे साधन म्हणून भाषेला फार महत्त्वाचे स्थान आहे. या कारणाने ती सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भातील एक मुख्य साधन बनते. भाषा आणि वाङ्मय हे समाजजीवनाचे वैभव आहे. या दृष्टीने त्या त्या समाजातील सांस्कृतिक जडणघडणीचा परिचय आपल्याला होत असतो.

‘गोंड’ ही एक आदिवासी जमात होय. ती अनार्य जमात असून, द्रविडियन गटातील मानली जाते. गोंड ज्या परिसरात बहुसंख्येने राहतात, त्या भूप्रदेशाला गोंडवन हे नामाभिधान प्राप्त झाले आहे. जातिवाचक अर्थाने ‘गोंड’ ही जात अस्तित्वात नाही, कारण कोणतीही गोंड नावाने ओळखली जाणारी व्यक्ती स्वत:ला कधीच गोंड संबोधित नाही. तर ती स्वत:ची ओळख करून देताना कोयावंशीय ‘कोयतुर’ किंवा ’कोई’, गायता, प्रधान, ढोली, बुरड, कोयता, माडिया, मुरिया अशी करून देते. त्यांचा धर्म आणि संस्कृती ‘कोयतुर’ संस्कृती म्हणून ओळखली जाते. ‘मराठी भाषा उद्‌गम आणि विकास’ या आपल्या ग्रंथात कृ. पां. कुलकर्णी यांनी गोंड हे आर्यपूर्व काळापासून या देशातील ‘मूलनिवासी’ असून त्यांची पाणिनीपूर्व काळात महाराष्ट्रात संपन्न वसाहत असल्याचा उल्लेख केला आहे. आज गोंडाच्या संपन्न वसाहती दिसत नाहीत, याचाच अर्थ एक तर त्यांच्यावर कोणी आक्रमण करून त्यांच्या वसाहती उद्‌ध्वस्त केल्या असतील किंवा ते काळाच्या उदरात गडप झाले असतील.

‘गोंडी’ शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल विद्वानांमध्ये एकवाक्यता आढळून येत नाही. महाराष्ट्र स्टेट गॅझेटियरमध्ये हिंदूंनी आदिवासी जमातीला ‘गोंड’ हे नाव दिल्याचा उल्लेख आहे. भारतीय विश्वकोशात मात्र ‘गोंड’ हे नाव कोणी दिले याविषयी माहिती मिळते. चौदाव्या शतकातील मुस्लिमांनी प्रथम ‘गोंड’ व ‘गोंडवन’ हे शब्द वापरले. याच संदर्भात इतिहासतज्ज्ञ अ.ज. राजूरकर म्हणतात, ‘तेलगु भाषेत ‘कोंडा’ ह्याचा अर्थ पर्वत किंवा पहाड असा होतो. ह्या अर्थाने पर्वताच्या पहाडाच्या आश्रयाने वास्तव्य करणारे व एका विशिष्ट धर्मसंस्कृतीचे आचरण करणारे लोक ते ‘गोंड’ होत. ह्याचा पुढे अपभ्रंश होऊन गोंड हा शब्द तयार झाला असावा.

गोंड लोक जी भाषा बोलतात, ती ‘गोंडी’ भाषा होय. ही भाषा प्राचीनतम असल्याचे पुरावे आढळतात. गोंडी भाषा ही प्राचीन ‘तामीळ’ असल्याचे मत फादर हेरॉस, काल्डवेल, न्यायमूर्ती रानडेंनी म्हटले आहे. चंद्रपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरमध्ये गोंडी भाषा ही द्रविड भाषासमूहातील एक भाषा असल्याचा उल्लेख केला आहे. गोंडीचे नाते हे द्रविडसमूहाशी आहे असे डॉ. जी. ए. ग्रीयर्सन यांनी आपल्या भारतातील भाषिक पाहणीवरील पुस्तकात गोंडी भाषेचा विचार करताना व्यक्त केले आहेत. इतिहाससंशोधक राजूरकर यांना गोंडीचे मूळ द्रविड भाषासमूहात आहे हे मत मान्य नसल्याचे दिसते. त्यांच्या मते गोंडी भाषा ही वन्य भाषा आहे. गोंडी भाषेवर मराठी,

हिंदी, तेलगू, कानडी आणि संस्कृत या भाषांमधील शब्दांचा प्रभाव वगैरे मुळीच पडत नाही. प्रादेशिक सान्निध्यामुळे शब्द घुसले एवढेच. गोंडी भाषा आपले वैशिष्ट्य राखून आहे.

**गोंडी बोलीतील वाक्यविचार (कोया लम्जाता कळिङ्ग पुसमाळ)**

वाक्यात येणाऱ्या शब्दांना 'पद' असे म्हणतात. शब्दांपासून वाक्य बनतात. वाक्यात येणारे शब्द परिस्थितीनुसार वेगवेगळे कार्य करतात. (कळिते वाताल लम्जानुङ्ग पदुम्क इनतोर, कळि लम्जाना बनेमान्ता. कळिते वायेह् लम्जाङ्ग अलेग अलेग काज कियाताङ्.) गोंडी बोलीमधील वाक्य खंडकीय संरचनेने (तिवताल दोहमाळ) तयार झालेले असते. सीमक व सुरयोजन यांचा प्रभाव गोंडी बोलीत जाणवतो. समतल सुरयोजन विधानार्थी असले तरी ते आरोही सुरयोजनात (तरगेवाल सुरमाळ) उच्चारले की ते प्रश्नार्थक (पुसमाळ) बनत असते.

गोंडी बोलीतील वाक्यामध्ये क्रियापद मुख्य असते. वाक्यात नामे, विशेषण, क्रियापदविशेषण हे क्रियापदापूर्वी येते. वाक्यात कर्ता-कर्म-क्रियापद हा क्रम पाळला जातो. कर्ता आणि कर्म हे नामपदबंध असतात. अकर्मक संकर्मक हा क्रियाभेद आढळून येतो.

**एकावयवी वाक्य (उन्दपदेम कळिङ्ग)**

गोंडी बोलीत वाक्य एक अवयवाचे असू शकते, आणि हा अवयव बहुतेकदा क्रियापद असतो.

१) दान्तोना (मी) जातो, २) कियाकि (तू) करशील,
३) वायूकिट (तुम्ही) याल, ४) हायनूर (तो) मरेल,
५) वायका (मी) येईल, ६) आयार होईल, पुरे

**केवलप्रयोगी (परचुकि) :–** अबा (अरे), असा (आणखी), बाताल (काय), हुडुत- (छट/झिडकारणे), हेगन्डरे (अरेच्या).

**होकार (इङ्गमाळ) :–** इङ्गो (हो), ठिक (ठीक), हां (होय), उङ्गो (होय).

**नकार (इलार) :–** अंहं (अहं), हट-हिट (छट), हुडुत(छट), आयो (नाही).

**स्वागत प्रतिसाद (सेवामान उर्रकरि) :–** बदामरा (कसे रे), जयसेवा (जयसेवा).

**प्राण्यांना हाकलणे (कटियाकुन पुळाना) :–** हुरेऽ (माकडास), हियूया (बैलास), सो कोंबडीस, हर्रा (षेळीस), धुरेऽऽ (कुत्र्यास), हाट्ट (कावळ्यास).

**प्राण्यांना बोलावणे (कटियाहकुन केयाना) :–** डुर्रो (कुत्र्यास), हम्बा (बैलास), को-को (कोंबड्यास).

**निंदाव्यंजक शब्द – शिव्या (चुगली कियाना लम्जा–राङ्गाना) :** आळपुळे (बायकोला हाकलणारा), आहारयेते (संकट आणणारी बाई), खसपाळ्या (एकाच ठिकाणी बसून राहणारा), टन्याझावे, बट्टाडोरे, भिकारचोट्या, भोकनाळ्या, सत्तरअरिहन्दान, सिन्डराहि, ळ्यान. ह्या गोंडी बोलीतील प्रसंगानुसार उच्चारल्या जाणाऱ्या शिव्या आहेत. इतर भाषेत 'ळ' हा शब्द बोलण्यात येत नाही, परंतु 'गोंडी' बोलीत 'ळ' हा शब्द येतो हे विशेष.

**पदबंध (पदुम) :**

साधारणत: गोंडी बोलीतील वाक्य दोन पद्बंधाचे मिळून तयार झालेले असते.

१) नामपद्बंध (परोयपदुम)
२) धातुसाधित नाम (सिरपन्डताल परोय)

**१) नामपदबंध (परोयपदुम) :**

नामपद्बंधात तीन प्रधान घटक आहेत.

अ) नाम (परोय्), ब) सर्वनाम (सबेपरोय), क) धातुसाधित नाम (सिरपन्डताल परोय).

**अ) नाम (परोय ) :**

१. लोन् अर्त / (घर पडले).
२. प्रेमसाय वायनुर /(प्रेमसाय येईल).
३. पेकाल किलान्तोर / (मुलगा रडतो).
४. लयोरिङ्ग मार्त/(तारुण्य संपले.)

**ब) सर्वनाम (सबेपरोय) :**

२. नन् डेयतान/(मी उडी घेतली).
२. निमाट लुकाट/(तुम्ही लपा).
३. ओर केयान्तोर/(तो बोलावतो).
४. अद आचान्ता/(ती निवडते).

**क) धातुसाधित नाम (सिरपन्डताल परोय) :**

४. हातुर जितो आतुर/(मेलेले जिवंत झाले).
२. उरसा मार्त/(शेताची लावणी संपली).
३. उर्सा सदेमात्/(शेताची लावणी जमली).
४. विताना आयार/(पेरणी होईल).

**२) क्रियापदबंध (किर्यापदुम) :**

ह्यामध्ये सामान्य क्रियापद, साहाय्यक क्रियापद व धातुसाधितयुक्त क्रियापद असे प्रकार केले जातात.

**अ) सामान्य क्रियापद (साधो किरयाबेत) :**

नन पुहान्तोना/(मी नांगरतो).

पिटे परियत्/(पक्षी उडाला).
वरताल वायनुर/(पाहुणा येईल).
रेला मारत्/(रेलानृत्य संपली).

**ब) साहाय्यक क्रियापद (कयसिये किरयाबेत) :**
ओर बेस मन्तोर/(तो छान आहे).
एर पेकाल आनदुर/(हा मुलगा आहे).
यायाल अगा मन्ता/(आई तेथे आहे).
बाबाल दिपाते मन्दानुर्/(बाबा शेतात असेल).

**क) धातुसाधित क्रियापद (सिरपन्डताल परोय) :**
नन् गुळसोर मन्तोना/(मी लोळूत राहतो).
अद कला किनद्/(ती ओरडत होती).
ओर हुन्चोर मन्दानुर/(तो झोपत असेल).
याल खाम्टे माता/(आई झोपली आहे).
ओर वित्च मतोर/(तो पळत होता).

**३) नामपदबंधाचा विस्तार (परोयपदुमता साङ्गमाळ) :–**
अ) विशेषण (परोयगन)
ब) समानाधिकरण (सारक्माळ)
क) षष्ठीविभक्त्यंत (सङ्गोत इटुक)
ड) धातुसाधित विशेषण (गोतगनवाल सबेपरोय्)
इ) नामसाधित विशेषण (परोय्पन्डताल परोय्गन)
ई) दर्शक सर्वनाम (सबेपरोय वेहे)
ऊ) संबंधी सर्वनाम (गोतगनवाल सबेपरोय).

**४) विशेषण (परोयगन) :**

नामापूर्वी विषेशण येऊन विस्तारित नामपदबंध तयार होत असतो. उदा. हुडला पेडि / (लहान मुलगी), लाटि वदुर / (लांब बांबू).

**गोंडी बोलीतील काही वैशिष्ट्यपूर्ण पदबंध पुढीलप्रमाणे :**
अलोना कुसरि / (अळणी भाजी)
चडरा पिन्डि / (कणदार पीठ)
आसिल येर / (स्वच्छ पाणी)
टाटकाल कुसरि/ (ताजी भाजी)
चक्दाळ पिरी/ (भुरकट गवत)
ढाडि आळ / (गर्भवती बायको)
झोल कटुल/ (सैल खाट)
पळ्यान डन्ड/ (पडीत जमीन)
कलिङ्गता येर/ (गढूळ पाणी)
मेनदुलहिता कोयताळ/ (लठ्ठ स्त्री)
कटरेल जना/ (टणक जोंधळा)
बोळका मोसोर/ (नथीशिवाय नाक)
येवरेह छवाङ्ग/ (जुळी मुले)
घन मरा/ (घन लाकूड)
भोबडा मानय/ (दंतविहिन मनुष्य)
सनट्या पेकाल/ (एकटा मुलगा)
सुळ्या दाबेन/ (टोकदार दाभण)
हलको वन्जि/ (हळवे भात)
होळता कसेर/ (धारदार सुरी).

**५) समानाधीकरण (सारक्माळ) :**

नामापूर्वी अन्य नाम येऊन विस्तारित नामपदबंध तयार होत असतो. उदा.
कम्पुरा नार/ (खामखुर्रा गाव)
पुरवादिया/ (रविवारदिवस)
गायकि दादि/ (गाय राखणारा आजा)
पिरिङ्ग मटा/ (उंच पर्वत)
बिलासपुऱ्या खाति/ (बिलासपूरचा लोहार)
बुताय बोडि/ (भूताचा तलाव)
बुळहा पेन/ (बुढाल देव)
लुचइ वन्जि/ (लुचई भात).

**षष्ठीविभक्त्यंत (सङ्गोत इटुक)**

नाम, सर्वनाम व विशेषण यांना विभक्ती प्रत्यय लागून तो शब्द नामपदबंधापूर्वी येतो.
गायताना गादी/(पाटलाची गादी/खुर्ची)
मामाना वाळि /(मामाचा वाडा)
तरास्ता कोजी/(सापाचे चिन्ह)
नाटेना तवा/(गावाची सीमा).

शिवाय गोंडी बोलीतील एकवचनातील व अनेक वचनातील षष्ठीविभक्त्यंत 'तोर', 'नोर', 'नाङ्ग', 'नोर' हे प्रत्यय लागून या प्रकारात विस्तार होतो.
मरिनोर बाबो / (मुलाचे बाबा)
मायतोर मानय / (हरवलेला मनुष्य)
मयताङ्ग कोनदाङ्ग /(चरलेले बैल)
वरियतोर पेकोर/ (घाबरलेली मुले).

**त) धातुसाधित विशेषण (सिरपन्डताल परोयगन) :**

क्रियापदास विशिष्ट प्रत्यय लागून ते रूप नामपदबंधापूर्वी येते.
अटे कोयताळ/(स्वयंपाक करणारी स्त्री)
अरता पिर /(पडता पाऊस)
करता गाटो /(जळालेला भात)
उहे कोयताळ/(दूध पाजणारी बाई)
कसके कोलयाल /(चावणारा कोल्हा)
कास्ता येर्/(गरम पाणी)
कोयली मरका/(करपलेला आंबा)
निन्दिता लोन्/(मोठे कुटुंब)

पडियाल छवा/(रांगणारे मूल)
बयही नय्/(पिसाळलेला कुत्रा)
बिराजे दुलही /(शोभणारी वधू)
मले मान्दि/(परतीची वरात)
रयता वान/ (उतरलेला चेहरा)
लेहळी ठालाल/(खादाड गाय)
विते आळ/(पळालेली बायको)
जुनाङ्ग् परायक् /(जुने तांदूळ).

**ब) नामसाधित विशेषण (परोयपन् डताल परोयगन) :**

नामास विशिष्ट प्रत्यय लागून तो शब्द नामपदबंधापूर्वी येतो.

नरकाडा बेरा /(रात्रीची वेळ)
नलेन्ज बेरा /(शुक्लपक्ष)
मुरमि ठिया / (मुरमी जमीन)
मुळक्ताल गाटो /(नासलेला भात)
येर गाटो /(पाणी भात)
वते मेंदुल /(कोरडे अंग)
वार्वसि तोळिव /(वाळूमिश्रित माती)
सरकारि रज्जा /(रासायनिक खत).

**म) दर्शक सर्वनाम (सबेपरोय वेहे) :**

नामापूर्वी दर्शक सर्वनाम येऊन ते विशेषणाचे कार्य करते आणि नामपदबंधाचा विस्तार घडून येतो.

अदे कोन्दा /(ते बैल)
अदे परभाटुम /(तो अजगर)
ओद् काळाले /(ती मधुमक्षिका)
इद गोयहाल/(ही घोरपड)
इद् करिहे /(ही शिक्षिका)
इद कोळकाङग् /(ह्या चिमण्या)
एर पेकोर /(ही मुले)
अव भयसिङग् /( त्या म्हशी).

**संबंधी सर्वनामे (गोतगणवाल सबेपरोय) :**

नामापूर्वी संबंधित सर्वनाम येऊन विशेषणाचे कार्य करीत असताना नामपदबंधाचा विस्तार होतो.

१) बोर मानेय बुतो किनतोर, ओर नावोर तमु आनदुर / (जो माणूस काम करतो, तो माझा भाऊ आहे.)
२) बद पेडी निकुन वेहचुन वात, अद नावा हेलाळ आन्द/ (जी मुलगी तुला सांगून आली, ती माझी बहीण होय.)
३) बोर पेकोरक मरापरो करसानतोर, ओर पेकोरक करियोरक / (जी मुले झाडावर चढून खेळत आहेत, ती मुले अभ्यास करीत नाही.)
४) बव कोयताह हुकिला हन्जि, अवेहकुन पिनि पय्ता/ (ज्या बायका धुवायला गेल्या होत्या, त्या आजारी पडल्या.)

**क्रियापदबंधाचा विस्तार (किरयापदुमता साङ्गमाळ)**

नामाप्रमाणे क्रियापदापूर्वी शब्द येऊन क्रियापदबंधाचा विस्तार होतो किंवा त्याची व्याप्ती सीमित होते. ही प्रक्रिया पुढील प्रकाराने घडून येते.

अ) क्रियाविशेषण अव्यय (किरयागन पदेम)
ब) नामपद्बंध (परोयपदुम)
क) विधिविशेषण (नेम परोयगन)
ड) धातुसाधित (सिरपनडुम)

**अ) क्रियाविशेषण अव्यय (किरयागन पदेम)**

१) ओर नेन्ड वातुर /(तो आज आला.)
२) निमा अचूनेक वायकि /(तू तोपर्यंत येशील.)
३) ओर उरुबूरु वळक्तुर/(तो समक्ष बोलला.)
४) पिर इदाम अरान्ता /(पाऊस खूप पडतो.)
५) यायान हेरे उदितुर/(आईजवळ बसला.)
६) हुन्डराल हबार डेयत्/(लांडग्याने बाजूला उडी घेतली.)



**ब) नामपदबंध (परोयपदुम)**

क्रियापदापूर्वी नामपदबंध येऊन क्रियापद्बंधाचा विस्तार होत असतो.

१) ओर कोरकुसेङ्ग हतुर/(तो पहाटे गेला.)

२) पेपि रेह्काते वातुर /(मोठे बाबा खेचराने आले.)

३) नन् कमपुराताल वातान/(मी खामखुऱ्याहून आलो.)

४) कलेर हरदिग्डाल वितितुर /(चोर रस्त्याजवळून पळाला.)

५) निमा घळिकमेन्ड् पोसा/(तू थोडा वेळ थांब.)

६) पेडि लोन हत्/(मुलगी घरी गेली.)

**क) विधिविशेषण/(नेम परोयगन) :**

क्रियापदापूर्वी विशेषण येऊन ते क्रियाविशेषणाचे कार्य करते आणि क्रियापदबंधाचा विस्तार घडून येतो.

१) कोन्दा लुस्त अरत् /(बैल अशक्त पडला.)

२) पेडि बेस वळकान्ता /(मुलगी छान बोलते.)

३) येर कलिङ्गत /(पाणी गढूळ झाले.)

४) रेङ्गा हवियताल मन्ता / (बोर आंबट आहे.)

५) लोन बेस मन्दाना / (घरी छान राहावे.)

**ड) धातुसाधित/(सिरपनडुम) :**

क्रियापदाला विशिष्ट प्रत्यय लागून ते रूप सामान्य क्रियापदापूर्वी येते आणि क्रियापदबंधाचा विस्तार होत असतो.

१) ओन पेलिहक्नाह् हाहतुर्/(त्याला खूप मारले.)

२) ओर परके हतुर/(तो मागे गेला.)

३) ओर येन्दानबेरा केक्सान्तोर/(तो नाचताना खेकतो.)

४) पेकाल मिळन्चमिळन्च हुळान्तोर/(मूल वाकून बघते.)

५) यान वायनाच् पोसकि/(आई येईपर्यंत थांबशील.)

**नाम–क्रिया–सुसंवाद/(परोय–किरया–चोखवळक) :–**

गोंडी बोलीत क्रियापदाचा सुसंवाद कधी कर्त्याशी तर कधी कर्माशी राखला जातो. शिवाय एखाद्या विशेष संबंधित वस्तूशी केला जातो, मराठी व्याकरणात ज्याला कर्तरी, कर्मणी व भावे प्रयोग म्हणतात. गोंडी व्याकरणात कयमाळि वळूक (कर्तरी प्रयोग), करमाळी वळूक (कर्मणी प्रयोग), भावमाळी वळूक (भावे प्रयोग) असे म्हणतात.

**निष्कर्ष (इसाब) :**

१) गोंडी बोलीतील वाक्य खंडकीय संरचनेने तयार झालेले आहे. वाक्यामध्ये क्रियापद मुख्य असते. नामे, विशेषणे, सर्वनामे इत्यादींचा अंतर्भाव होऊन ते क्रियापदापूर्वी स्थानापन्न होतात.

२) गोंडी बोलीतील बहुतेक वाक्ये 'कर्ता–ती' या प्रकारातील असतात. या बोलीत वाक्य एक अवयवाचे असू शकते आणि हा अवयव बहुतेकदा क्रियापद असतो.

३) गोंडी बोलीतील वाक्य दोन पदबंधाचे मिळून तयार झालेले आहे.

**आधारभूत गोंडी बोलीची / साहित्याची संदर्भसूची :**


१) अग्रवाल रामभरोस – 'गढा मण्डला के गोंड राजा' (उत्तर प्रदेश शासनद्वारा पुरस्कृत) प्रका. गोंडी पब्लिक ट्रस्ट, मण्डला, प्र. आ. २ सप्टें २००२.

२) कंगाली मोतीरावण – 'गोंडी व्याकरण तथा भाषारचना' प्रकाशक चंद्रलेखा कंगाली, नागपूर, द्वि. आ. २००८.

३) कंगाली मोतीरावण – 'मराठी गोंडी शब्दकोश' प्रकाशक गोंडवाणा आदिम भाषा साहित्य संशोधन मंडल.

४) कंगाली मोतीरावण – 'सैंधवी लिपि का गोंडी मे उद्वाचन' प्रकाशक गोंडवाणा आदिम भाषा साहित्य संशोधन मंडल, नागपूर, द्वि. आ. २०१२.

५) कंगाली मोतीरावण – 'गोंडवाना का सांस्कृतिक इतिहास'

६) गावीत पुष्पा – 'आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य' अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्र.आ. २०१४.

७) गारे गोविंद – 'आदिवासी लोककथा' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर पुणे, प्र. आ. डिसें. २००३.

८) जगदलपुरी लाला – 'बस्तर' (लोक कला– संस्कृती), विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्र. आ. २०११.

९) तुमराम विनायक – 'उलगुलानव्रती' गौरवग्रंथ संपादनः सुनील कुमरे, विनायक प्रकाशन, पुणे, नागपूर, प्र.आ. २०१४.

१०) मंडाले सीताराम – 'कोयाबोली' गोंडी शब्दसंग्रह, २०११.

११) मेश्राम भुजंग – 'अभुजमाड' लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र. आ. ऑगस्ट २००८.

१२) राजुरकर अ.ज. –'चंद्रपूरचा इतिहास' हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, प्र. आ. २००९.


**समारोप**

'गोंडी' ही एक प्राचीनतम व समृद्ध अशी बोलीभाषा आहे. या बोलीभाषेत विपुल प्रमाणात पारंपरिक लोकसाहित्य दडलेले आहे. भौगोलिक परिस्थिती, प्रगत भाषांचा संपर्कप्रभाव आणि संस्कृतिभिन्नता यामुळे गोंडी बोलीमध्ये थोडक्यात फरक जाणवतो. गोंडी बोलीमध्ये काही शब्दांतील मूळ रूपं 'संमिश्र' दिसून येतात. सीमांत प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या गोंड लोकांच्या गोंडी बोली, अन्य प्रांतांच्या संपर्कामुळे त्या–त्या प्रदेशातील विकसित

भाषांचे शब्द कळतनकळत येऊन मिसळलेले आहेत. खरंतर गोंडी बोलीभाषेचे अस्सल रूप शोधणे व त्याचा स्वतंत्र अभ्यास करणे आज जागतिकीकरणात फार मोठे आव्हान ठरलेले आहे. शिवाय गोंडी बोलीभाषेचा दैनंदिन व्यवहारात जाणीवपूर्वक वापर करणारा आणि बोलणारा वर्ग पाहिजे त्या प्रमाणात दिसून येत नाही. सुशिक्षित तरुण आणि अधिकारीपदावर कार्यरत असलेले गोंडी भाषिक यांच्यामुळेच आज गोंडी बोलीला मृतावस्था प्राप्त झालेली आहे. ही फार काळजी करण्यासारखी गोष्ट आहे. परंतु आजही ग्रामीण भागात निसर्गाच्या सान्निध्यात, जंगल-पहाडाच्या आश्रयाने राहणाऱ्या गोंड लोकांनी आपल्या भाषेला जिवंत आणि समृद्ध ठेवलेले आहे.

वाढत्या लोकसंपर्कामुळे व इतर भाषांच्या प्रभावामुळे गोंडी बोली बोलणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. गोंडी बोली भाषेच्या दृष्टीने ही फार मोठी हानी आहे. बहुसंख्य गोंड लोक आपली मूळ भाषा न बोलता आर्यभाषा वापर दैनंदिन व्यवहारांमध्ये करतात. स्वभाषेविषयीची अनास्था व उदासीनता. सुशिक्षितांमध्ये प्रामुख्याने वाढीस लागली आहे. गोंडी भाषिकांनी या बाबतीत गांभीर्याने विचार केला पाहिजे. भाषाशास्त्रीय-दृष्ट्या तिचा अभ्यास केला पाहिजे. तेव्हाच या बोलीच्या भविष्यकालीन अस्तित्वाविषयी आपल्याला निश्चिती करता येईल. गोंडी भाषेचे संशोधन करण्याचे यापूर्वीचे प्रयत्न म्हणजे व्यंकटेश आत्राम यांचे 'गोंडी संस्कृतीचे संदर्भ' या ग्रंथातून दिसून येते. गोंडीगणांचे आचार्य तिरुमाल मोतीरावण कंगाली हे गोंडी भाषेचे महत्त्वाचे संशोधक आहेत. त्यांनी 'गोंडवाना का सांस्कृतिक इतिहास', तसेच 'गोंडी कळकियान उण्डे लम्बेज चवळी' या गोंडी भाषेवर संशोधन करून आजच्या पिढीसाठी भाषासंशोधनाच्या अंगाने मोठे मार्गदर्शक ठरतात. एक महत्त्वाचे आदिवासी साहित्यिक श्री. भुजंग मेश्राम यांनी 'आदिवासी साहित्य आणि अस्मिता' या वैचारिक ग्रंथातून त्यांनी गोंडी भाषेला लिपी आहे असे सांगून बोलीभाषेचे स्वरूप उलगडले आहे.

गोंडीएत्तर लेखकांमध्ये डॉ. एस.जी. देवगावकर व डॉ. शैलेजा देवगावकर यांनी 'गोंडी प्रधान आणि कोलाम' या ग्रंथांतून गोंडी बोलीचा स्वर, व्यंजन यांच्या उच्चारण व्यवस्थेवर प्रकाश टाकलेला आहे.

गोंडी लोकांची बोलीभाषा त्यातील शब्दवैभव आणि अर्थवैभव ही आदिवासी साहित्याची शक्तिस्थळे होत. या वैभवाने आदिवासी गोंडी वाङ्मय साहित्यपटलावर चट्कन नजरेत भरणार आहे. हे वैभवी अस्तित्व आदिवासी गोंडी साहित्यिकांनी टिकवलं तरच गोंडी बोलीला आणि या बोलीतील वाङ्मयाला वेगळेपण आणि सांस्कृतिकदृष्ट्या अर्थ व भविष्य राहू शकते.

**– डॉ. हरिचंद नागसू नरेटी**


## मुंबई मराठी साहित्य संघाची अलीकडील प्रकाशने

**एका पिढीचे आत्मकथन (दुसरी आवृत्ती),** संपादक : पु.शि. रेगे, वा.ल. कुळकर्णी, रा.भि. जोशी, गं.ब. ग्रामोपाध्ये
**दुसऱ्या पिढीचे आत्मकथन,** संपादक : उज्ज्वला मेहेंदळे
**मराठी बोलु कौतुके,** संपादक : अशोक बेंडखळे / उषा तांबे
**एका मुंबईकराची कहाणी (दीर्घकथा),** लेखक : गंगाधर गाडगीळ
**काशिनाथ त्र्यंबक तेलंग (अल्पचरित्र),** लेखक : गंगाधर गाडगीळ
**मराठी साहित्य सूर्यमाला,** संपादक मंडळ : सुहासिनी कीर्तिकर, चंद्रशेखर गोखले, प्रतिभा बिस्वास, सावित्री हेगडे
**ज्ञानतपस्वी रुद्र – न.र. फाटक यांचे चरित्र,** लेखिका : अचला जोशी
**मराठी नाट्यसंमेलन अध्यक्षीय नाट्यसूर्यमाला : भाग २,** संकल्पना : शं.ना. अंधृटकर, संपादन : सुभाष भागवत
**महानगर मराठी साहित्य संमेलन : अध्यक्षीय विचार,** संकल्पना : ज.बा. कुलकर्णी,
संपादक मंडळ : उषा तांबे, उज्ज्वला मेहेंदळे, अशोक बेंडखळे, पद्माकर शिरवाडकर
**इये मराठीचिये नगरी,** संपादक : अशोक बेंडखळे / डॉ. उज्ज्वला मेहेंदळे
**तिसऱ्या पिढीचे आत्मकथन, भाग १ आणि २,** संपादक : डॉ. उज्ज्वला मेहेंदळे
**अमृत कण कोवळे,** लेखिका : रेखा नार्वेकर
*आगामी...* ''**बालसाहित्याचे स्वरूप आणि व्याप्ती**''
संपादक : डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, सहसंपादक : श्री. एकनाथ आव्हाड

बोलीभाषा विशेषांक

लेख

# आदिवासी निहाली भाषेचे स्वरूप

रश्मी जगदीशराव सातफळे

**निहाली ही जमात अतिशय मागासलेली असून त्यांचे वास्तव्य अगदी पाचच गावात आहे. त्यांची भाषा दिवसेंदिवस लोप पावत आहे. आताची परिस्थिती इतकी दयनीय आहे की, नवीन पिढीला पूर्णतः निहाली भाषादेखील येत नाही. त्यांच्यातील बुजूर्ग लोकांनाच त्यांची पूर्णतः भाषा येते. निहाली भाषेची स्वतंत्र अशी लिपी नाही. पीएच.डी. करत असताना त्यांच्या गावात जाऊन, त्यांच्यात राहून, त्यांच्या भाषेची, संस्कृतीची माहिती घेण्याचा एक यशस्वी प्रयत्न काही वर्षांपासून मी करत आहे.**

**भारतात** अनेक आदिवासीं जमाती आढळून येतात. त्यांपैकी आदिवासींच्या मुख्य जमाती आंधा, ओराव, कातकरी, भिल्ल, कोरकू, बैंगा, बरडा, बोचा, कोकणा, कोलाम, बामचा, बैना, महादेव, गोंड, ढोर-कोळी, टोकरे-कोळी, ठाकर, परधान, पावरा, मल्हार कोळी, मन्नेरवारलु, महादेवकोळी, माडिया गोंड, वारली, हलबा, पारधी, कोकणा-कोकणी, टाकणकार पारधी, फासेपारधी ह्या जमाती आहेत. त्यांपैकी मध्यभारतात आढळणारी 'निहाल' ही एक जमात आहे. निहाल लोक हे कोरकूंच्या सान्निध्यात पूर्वीपासून राहत असल्याचे दिसते. रसेल व हिरालाल यांनी निहाल 'कोरकूंची' एक उपजमात असून त्यांची उत्पत्ती कोरकू आई व भिल्ल वडील यांच्यापासून झाली असल्याचे प्रतिपादन केले आहे. अतिशय मागासलेली व गरीब अशी निहाल ही जमात असून तिचे वास्तव्य निमाड, मध्यप्रदेशातील होशंगाबाद, बैतुल, हरदा या जिल्ह्यांबरोबरच महाराष्ट्रातील अमरावती, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यांत असल्याचे दिसते. कोरकू आणि निहाल त्यांचे जीवनव्यवहार सारखे असून त्यांच्यात बरेच साम्य आहे. बुलढाणा जिल्ह्यातील काही गावाचा अपवाद वगळता इतर सर्व निहाल, कोरकू भाषा बोलताना दिसतात. ह्या आदिवासी निहाल व कोरकू यांच्यात रोटी-बेटीव्यवहार पूर्णपणे निषिद्ध आहेत. निहाल जमातीत विकासाच्या संधी अजूनही पोहोचल्या नाहीत. ही जमात आजही दारिद्र्य, गरीबी, निरक्षरता, मागासलेपणा अशा असंख्य समस्यांनी त्रस्त आहेत. ह्या सर्व कारणांमुळेच निहाल जमातीवर ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा प्रभाव वाढताना दिसतो आहे.

निहाल जमातीची म्हातारी माणसे आजही सांगतात की त्यांनी पूर्वी फार हलाखीच्या परिस्थितीत दिवस काढलेले आहेत. त्यांच्या अंगावर कपडेसुद्धा नसायचे. गवताच्या झोपड्यात ते निवास करीत होते. त्याचे अन्न म्हणजे जंगलातील कंदमुळे, फळे, मोहाची फुले, जंगली भाज्या हेच होते. त्यात थोडीफार शिकार व मासेमारी ते करीत असत. विपरीत परिस्थितीत जगण्यासाठी त्यांना चोऱ्या व दरोडे टाकावे लागत असत व त्याच कारणामुळे त्यांना इतर जमाती गावात राहू देत नसत. त्यामुळे आजही त्यांच्या वस्त्या गावाबाहेर असल्याचे दिसते. कोरकूसारखेच निहालांचे धार्मिक जीवन असल्याचे दिसते. ते स्वत:ला हिंदू धार्मिक समजून खेडा, मुढवा, हनुमान, महादेव या देवदेवतांची पूजा करताना दिसतात. निहाल समाजाचे महत्त्वाचे सण भवई, जिरोती, पोळा, दसरा, दिवाळी, होळी हे साजरे करतात. कोरकूसारखाच निहालाचा पेहराव आहे. निहाल लोक जंगलात जेथे जुने पाणी (डोह) असेल, तेथे ते तीर्थाला जाऊन आपले नवस फेडतात. निहाल व कोरकू याची गोत्रव्यवस्था सारखी असून त्यांच्या आडनावात बरेस साम्य आढळते. निहालांचा मुख्य व्यवसाय गुरेढोरे चारणे हा असून ते शेतमजुरी करतात. निहाल शाकाहारी व मांसाहारी अशा दोन्ही प्रकारचा आहार घेतात. त्यांच्यात मद्यसुद्धा प्रिय आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.कि.मी. एवढी असून त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपाययोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के एवढे होते. वर्ष २०११मध्ये झालेल्या जनगणनेत ११२३.७४ १०५.१० ९.३५ आदिवासी लोकसंख्या (लाखांत) टक्केवारी एवढी आहे.

महाराष्ट्रात कोलाम, (यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यत: रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्रशासनाने आदीम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत. राज्यात एकूण ३६ जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, जामूद व ठाणे (सह्याद्री प्रदेश) चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ(गोंडवन प्रदेश) या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्ह्यांमध्ये मुख्यत: अधिक आढळून आहेत.

**निहाली भाषेची पूर्वपिठिका**

निहाल ही एक जमात महाराष्ट्रात राहणाऱ्या आदिवासी जमातींपैकी एक जमात आहे. रावणाचे वंशज म्हणून निहाली लोक स्वत:ला अतिशय अभिमानाने समजतात. त्यांच्यापैकी जर कोणी मरण पावले तर ती व्यक्ती लंकेला रावणाकडे जातो असे ते समजतात. निहाली लोकांची भाषा ही अतिशय वेगळी आहे. व त्यामुळे ती निहाली भाषा म्हणून ओळखली जाते. 'निहाली' किंवा 'नहाल' या नावाने त्यांना इतर ओळखत असले तरी ते स्वत:ला 'कोलट' म्हणून घेतात. आपल्या भाषेला ते कालटुमांडी (मांडी – भाषा) म्हणतात. कोलटा लोकांच्या वस्त्या बुलढाणा जिल्ह्याच्या जळगाव जामोद तालुक्याच्या डोंगराळ भागात आहेत. कोल म्हणजे माणूस 'टा' हा अनेकवचनी प्रत्यय लागून 'कोलटा' शब्द तयार होतो. कोलटा म्हणजे माणसे. ते स्वत:ला प्रथम माणसे समजतात. म्हणून कोलटा हे नाव आहे.

शिकारीसाठी हे लोक पटाईत असल्यामुळे पूर्वी इंग्रज लोक शिकार करण्यासाठी त्यांची मदत घेत होते. निहाल ह्या भाषेचा बराच जुना इतिहास आहे. मोगल काळातही ह्या भाषेचा उल्लेख सापडतो. औरंगजेबाच्या मते हे लोक लुटारू, दरोडेखोर आणि घातकी होते. पेशवेकाळातही असाच समज होता. पुढे इंग्रज अधिकारी कॅप्टन फॉरसिय याने तसाच अभिप्राय दिला आहे. निहाल लोक पूर्वी आपल्या भाषेची माहिती कोणाला देत नसत व आपली भाषा इतरांसमोर बोलतही नसत. निहालखेरीज ते आणखी एक गुप्त सांकेतिक भाषा वापरतात. त्यात हिंदी, कोरकू शब्दांची सरमिसळ असते. त्यांचा अर्थ इतरांना समजत नाहीत. उदा : 'आज सफेंद खाऊया' याचा अर्थ गाय मारून खाऊया. निहालमधील अनेक लोक स्वत:ची भाषा बोलण्याऐवजी कोरकू भाषा बोलतात. महत्त्वाचे म्हणजे निहाली भाषेला लिपी नाही. पण ती देवनागरीत लिहिता येते. काही चिन्हे जास्त वापरावी लागतात. वेदांच्या भाषेप्रमाणे यात स्वरांचा आघात महत्त्वाचा आहे. कोल म्हणजे माणूस. 'टा' हा अनेकवचनी प्रत्यय लागून 'कोलटा' शब्द तयार होतो. कोलटा



सखा

म्हणजे माणसे. ते स्वत:ला प्रथम माणसे समजतात. निहाली महाराष्ट्रात बुलढाणा जिल्ह्यात कोरदेव, जामुद, शांतिनगर, सोनबर्डी या गावांमध्ये विशेषत: बोलली जाते. ह्या गावातील लोक निहाली भाषेचा प्रयोग करताना गर्व करतात. ज्यात युवा, लहान मुले, प्रौढ किंवा वयस्कर लोक मागे नाहीत.

परंतु ह्या गावाच्या शेजारचे गाव अंबाबरवर, चुनखडी, उमापूर, निमखडी, रायपूर, शिवनी, सेंबा आणि वाडी इत्यादी गावात निहाल कोरकू बोलतात. अधिकतर निहाली बहुभाषिक असल्याने ते मराठी, हिंदी भाषा वा कोरकू इत्यादी बोलतात. परंतु अन्य लोक इतर क्षेत्राच्या व्यतिरिक्त मेळघाट, निमाड, हुशंगाबाद, बहतुल, हरदा, इत्यादी क्षेत्रात असणारे निहाल कोरकू ही भाषा बोलतात.

**भाषेचे स्वरूप**

निहाली ही निहाल जमातीची बोली असून तिला लिपी नाही. ही बोली बुलढाणा जिल्ह्यातील काही गावांत फक्त

जिवंत असून इतर निहालांनी मात्र कोरकू ही बोली पूर्णपणे आत्मसात केली आहे. त्यामुळे या बोलीच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निहाली बोलीचे स्वरूप पूर्णपणे भिन्न असून तिचे शब्दांचे अनेक अर्थ व उच्चारणानुसार अर्थभिन्नता हे निहाली बोलीचे वैशिष्ट्य आहे.

निहाली भाषेच्या मौखिक परंपरेत लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्यप्रचार व कोडे याची समृद्ध परंपरा प्रचलित आहे. निहाली बोली भाषेत स्त्रियांची लोकगीते, लोककथा, वाक्यप्रचार, म्हणी ह्या विपुल प्रमाणात आढळून येतात. निहालामधील अनेक बुर्जुग लोक निहाली भाषेत दीर्घ लोककथा सांगतात. ज्यातून निहाली भाषेचं अस्सल स्वरूप प्रकट होते. परंतु काळाच्या ओघात व शिक्षणाच्या अभावामुळे ह्या लोकसाहित्याचा खजिना दिवसेंदिवस लुप्त होत आहे. निहाली लोकांच्या रोजच्या बोलण्यात म्हणी व वाक्यप्रचार यांचा मोठा वापर असतो. निहाली स्त्रिया शेतातील काम करताना आपल्या निहाली भाषेची गीतं गातात. त्याचप्रमाणे एखाद्या आनंदाच्या प्रसंगी ते आपली लोकगीते गाऊन पारंपरिक नृत्य करून आनंद साजरा करतात. अतिशय प्रमुख सणांच्यावेळी स्त्री-पुरुष आपले पारंपरिक वेष परिधान करून व पारंपरिक वाद्यांचा वापर करून नृत्य सादर करून सण साजरा करतात.

**निहाली भाषेची ध्वनिव्यवस्था**

मानवी मुखाद्वारे उच्चारल्या गेलेल्या व भाषेत वापर होणाऱ्या ध्वनीला 'स्वन' असे म्हणतात. याचे पुन्हा विभाजन स्वर आणि व्यंजनात करता येते. निहाली बोलीत ३३ स्वन आहेत.

**स्वर :**

निहाली बोलीत अ,आ,इ,उ,ए,ओ असे एकूण सहा स्वर आहेत.

**व्यंजने :**

निहाली बोलीत २७ व्यंजने आढळतात.

क,ख,ग,

घ,च,ज,ट,ठ,ड,ढ,ण,त,थ,द,ध,न,प,फ,ब,भ,म,

य,र,ल,व,स,ह

निहाली बोलीत मराठीतील 'ळ' चा उच्चार 'र' व 'श', 'ष'चा उच्चार 'स' तर 'झ'चा उच्चार 'ज' होतो. निहाली बोलीत अनुनासिके फक्त 'न', 'ण' एवढेच आहेत. अशा प्रकारे निहाली बोलीत स्वर आणि व्यंजन यांची व्यवस्था आढळते.

**निहाली भाषेवर इतर भाषांचा प्रभाव**

निहाली भाषेवर कोरकू भाषेचा अतिशय जास्त प्रभाव झालेला आढळून येतो. त्यामुळे निहाली भाषेचा लोप पावण्यास सुरुवात झाली आहे व निहाली लोकांवर आधुनिक भाषेचा (हिंदी, मराठी) प्रभाव स्पष्ट दिसून येतो.

**म्हणी :**

**निहाली आणि त्याचा मराठी अर्थ**

नेग घातिजेरेय भावरीकी
विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर

खारूजा ज्यादा, खरच्या कम
हौस बडी, खर्ची थोडी

कोल्यान मियान काबी धवबे पोपर का उगायका
कोळसा उगाळावा तितका काळाच

टेयेका गयरा कामाय बेक कामाय जेर
खायला काळ, भुईला भार

काग्गो बासका पाणी नांगकाबी मांडीका
उचलली जीभ लावली टाळ्याला

बोटो हारूका
बोट घालून मोठं करणे

मेबेमेका मा नेटो चांगो चेंडाकेन
मानलं तर देव, नाहीतर दगड

हट्टी चल्ली हाटोका नायटा भेकटींगका हजार
हाती चले बजार कुत्रे भेके हजार

पास आखाडा सेरीका बेठूगाय
पाचही बोटे सारखी नसतात.

**संदर्भ :-**

१. The Tribe and castes of the central provinces of India, R. V. Russell & Hiralal, Macmillan and 10. Limited, London, 1916, P. 158.

२. निहाली माणसं, समाज शिक्षण माला, क्र ५३८, अशा मुंडले, समाज शिक्षण माला, २० जुलै १९९५.

**- रश्मी जगदीशराव सातफळे**



बोलीभाषा विशेषांक

## लेख

# आदिम कातकरी लोकांचे राहणीमान व संस्कृती

दत्तात्रेय चि. पवार

**कातकरी बोलीभाषेवर अन्य भाषांचा परिणाम झालेला दिसून येतो. साधारण पन्नास वर्षांपूर्वी प्रत्येक कातकरीवाडीत कातकरी बोली बोलली जायची. आज परिस्थिती बदललेली आहे. केवळ चार ते पाच वाड्यांमध्येच कातकरी बोली बोलली जाते. पुढील दहा वर्षांत बोलीचं काय होणार याची चिंता करणे महत्त्वाचे ठरेल. बोली बोलूनच टिकेल हे मला सांगायचे आहे.**

**आदिम** कातकरी ही जात, आदिम काळापासून या देशात अस्तित्वात आहे. असा पुरावा रामायणात मिळतो. आदिम कातकरी प्रामुख्याने पूर्वीपासूनच घनदाट जंगलदऱ्यांमध्ये राहायचे. जंगलात शिकार, कंदमुळे, फळे हाच त्यांचा प्रमुख आहार असायचा. जसजसा काळ पुढे गेला, तसतशी ही आदिम कातकरी लोकांची जमात, इतर आदिवासी लोकांच्या संपर्कात येऊ लागली. पूर्वीपासूनच जंगलात राहत असल्यामुळे जंगली प्राण्यांचे वेगवेगळे आवाज, तसेच पक्ष्यांचे आवाज हे हुबेहूब काढत असत व ते आवाज त्या लोकांना सहज समजत असत. झाडांना पालवी कधी फुटली, मोहर कधी आला, किती प्रमाणात आला. फुले-फळे किती प्रमाणात आली आहेत, त्यावरून येणाऱ्या वर्षात पाऊस किती प्रमाणात पडेल. थंडी, उन्हाळा कसा जाईल हे आदिम कातकरी लोकांना अचूक माहीत असे.

खेड्यापाड्यात आजपण काही वयस्कर लोक प्राण्यांच्या आवाजावरून पुढील येणाऱ्या संकटाचा अंदाज बांधतात. काही वेळेस कुत्री वेगवेगळे आवाज काढून रडतात, भुंकतात, तसेच विचित्र आवाज काढतात. तसेच पक्षीसुद्धा येणाऱ्या संकटाची पूर्वसूचना देतात. परंतु आजच्या घडीला त्या पक्ष्यांच्या आवाजाकडे आपल्याला लक्ष देण्यात वेळ नाही. उदा. कावळा, घुबड, टिटवी हे पक्षी चांगल्या किंवा वाईट गोष्टीची पूर्वसूचना आपल्याला देत असतात. मी लहान असतानाचा एक प्रसंग आठवतो. माझे आईवडील, भाऊ लाकडी कोळसा बनवण्यासाठी पुणे, भोर, तसेच रत्नागिरी जिल्ह्यात दसरा संपला की जात असत. शिक्षणासाठी माझी सावत्र आई आणि मी घरीच राहत असत. मी त्यावेळेस इयत्ता तिसरीमध्ये शिकत होतो. त्यावेळेस आमच्या पाड्यामध्ये फक्त चार कुटुंबं राहत होती. दसऱ्याला गेलेली कुटुंबं सहा महिन्यांनंतरच मुलं गावी येत असत. कातकरी वस्ती ही प्रामुख्याने आजच्या घडीला तरीही गावाच्या बाहेरच असते. त्यांची विहीर ही फक्त त्या लोकांसाठी गावाच्या बाहेर असते. पालघर असो की ठाणे-रायगड असो.

त्यावेळेस रोज पहाटे भालू (कोल्हा) आमच्या वाडीच्या शेजारून ओरडत जात असत. त्यावेळेस माझी आई, तसेच आमच्या सोबत राहत असलेले माझे बालमित्र, तसेच वयस्कर लोक रात्री शेकोटी पेटवली की एकत्र येऊन बसत व आपापसात बातचीत करत.

'अर भुऱ्या. सीत्या. काकड्या जपाह्या भालू दरदिस आपल्या पाड्याजवळून आरडत जाहत. औंदा काहीतरी मोठी घटना घडील. अरे होर खराच जान्या कायतरी हिल' असे ते आपापसात बोलत असत. आणि पंधरा दिवसांनी आमची वाडी पूर्णपणे जळून खाक झाली. त्यामध्ये फक्त आमची झोपडी वाचली. जर का आपण

पशुपक्ष्यांचे नीट निरीक्षण केले तर काही प्रमाणात त्यांचे संकेत आपल्याला कळतात. काही प्रमाणात थोडेफार मलासुद्धा व इतर लोकांना पक्ष्यांचे आवाज समजतात. आजपण कावळा जर वेगळ्या पद्धतीने ओरडला तर आपल्या घरी पाहुणा येणार किंवा आपल्या कुटुंबामध्ये दु:खद निधन झालं असेल तर कावळा आपल्याला हमखास निरोप देतो. तसेच समजा, रात्री आपण बाहेर पडलो आणि घुबड विशिष्ट ओरडले तर आपल्याला येणाऱ्या पूर्वसंकटाची संकेत असतो. तसेच जर आपण रात्री जंगलात गेलो तर टिटवी हमखास ओरडते. एक तर ती जंगली प्राण्यांना सावध करते किंवा आपल्याला येणाऱ्या संकटाची चाहूल देते. हे मी स्वत: अनुभवले आहे.

आदिम कातकरी हा प्रामुख्याने कोकण किनाऱ्यालगतचे जे जिल्हे आहेत, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वस्ती करून आहे. कातकरी लोक हे प्रामुख्याने जंगलदऱ्या-खोऱ्यात राहत असल्यामुळे व तो रानटी प्राण्यांना घाबरत नसल्यामुळे त्याचा फायदा त्यावेळेस इंग्रज सरकारने पुरेपूर करून घेतला. तेव्हा खैरांची बने ही ठाणे-पालघर जिल्ह्यात खूप होती. कातकरी लोक हे लाकूड तोडण्यात कुशल कारागीर होते व त्यांची जंगलातून वाहतूक करण्यासाठी दऱ्याखोऱ्यात रस्ते नव्हते. त्यावेळेस आदिम कातकरी लोक हे शरीराने मजबूत असल्यामुळे मोकळ्या जागेपर्यंत हेच वाहतूक करत. खैरांपासून कात बनवण्यात येत असे. खैरांची लाकडे तोडण्याची व कात बनवण्यासाठी लहान तुकडे करण्याचे काम हे कातकरी लोक करत असत. तसेच त्यावेळेस त्यांच्याकडून कात बनवण्याचे काम करून घेतले जाई. म्हणून या लोकांना अगोदर इतर समाज काततोडी, काथोडी संबोधे व नंतर तेच कातकरी संबोधले गेले. इंग्रजांच्या काळात कातापासून रंग, तसेच त्याचा भुसा हा खनिज तेल काढण्यासाठी वापरला जाई. त्यावेळेस कातकरी लोकांचा हा मुख्य व्यवसाय लाकूडतोड हाच होता. इंग्रजांच्या राजवटीमध्ये सागवान लाकडाला खूप मोठी मागणी होती. तेव्हा लाकूड ठेकेदार लोक कातकरी लोकांना जंगलतोडीसाठी थोडीफार आगाऊ रक्कम अगोदर देत असत व जंगलतोडीसाठी दसऱ्याला ते त्यांच्या गावातून सर्व कुटुंबाला घेऊन जंगलतोडीच्या ठिकाणी जात असत. त्यावेळेस ह्या कातकरी मुलांचे शिक्षण अजिबात झालेच नाही.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात पालघर, ठाणे येथील जंगले कमी झाल्यामुळे आम्हां कातकरी लोकांना उपासमारीची वेळ आली. मुळातच तेव्हापासून सतत स्थलांतर असल्यामुळे आमच्याकडे जमीन बिलकूल नाही. आजच्या घडीला जवळजवळ ७५% आदिम कातकरी ही भूमिहीन आहेत. त्यावेळेस पुणे-रायगड-रत्नागिरी येथे लाकडापासून कोळसा बनवण्याचे काम चालू होते. आमचे कातकरी लोक ओल्या लाकडापासून कोळसा बनवण्यास तरबेज आहेत. तेव्हा तिथल्या काही ठेकेदारांना ही बातमी कळल्यानंतर कोळसे ठेकेदार रघुनाथ मारणे, विठ्ठल धुमाळ, नथु पाशिलकर असे काहीएक ठेकेदार ह्या कातकऱ्यांना आगाऊ थोडी फार रक्कम देऊन दसऱ्याला पालघर जिल्ह्यातून प्रामुख्याने वाडा-विक्रमगड व थोड्याफार इतर तालुक्यातून पुणे-रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्गला घेऊन जात असत. त्या लोकांना डोंगरदऱ्यामध्ये एक-एक कुटुंब कमीतकमी एक किलोमीटरपेक्षाही जास्त भोंगा (झोपडी) बनवून तिथे राहावे लागे. मुळातच कातकरी लोक हे जंगली प्राण्यांना घाबरत नसल्यामुळे वाघा-नडगाच्या जंगलामध्ये बिनधास्तपणे राहत असत.

नंतर आम्हां कातकरी लोकांना कोळसाठेकेदार खर्ची म्हणून सात दिवसासाठी अडीच रुपये व नंतरच्या काळात पाच रुपये व बाजरीचे पीठ किंवा गव्हारीचे पीठ पंधरा ते वीस किलो देत. त्यामध्ये कुटुंब मोठं असेल तरीपण तेवढ्यामध्ये भागून घ्यायचे. समजा, आजारपण किंवा बाळंतपण किंवा इतर गोष्टी तो ठेकेदार स्वत: करत असे. ते पैसे त्या गड्याच्या नावे शक्यतो नावावर पकडत नसत. हा जो काळ होता, तो ५० ते ६० वर्षांपूर्वीचा आहे. आमचे कातकरी लोक हे एवढे कुशल होते की दहा-बारा फुटीचा मोठा हुंडका, जो हुंडका चार-पाच गड्यांना उचलण्यास मुश्कील होते, अशा हुंडक्याचे रूपांतर ते कोळशामध्ये जशाच्या तसेच करत असत. जेवढा मोठा कोळसा असेल, तेवढा भाव ठेकेदाराला मिळत असे. बनवलेला कोळसा हा ठेकेदारशेठ पोत्यावर हिशोब करून द्यायचा. त्यावेळेस एका पोत्याचा भाव अडीच रु. व नंतरच्या काळात हा दर पंधरा रु. असा देत असत. एक गडी मोठं कुटुंब असेल तर सहा महिन्यामध्ये पाचशे ते सहाशे पोती कोळसा बनवत असे. लहान कुटुंब असेल तर साडेतीनशे ते चारशे पोती बनवत असत. शेवटी जूनमध्ये हा कोळसा बनवण्याचा व्यवसाय बंद केला जाई. तेव्हा ठेकेदार त्या गड्यांचा सहा महिन्यांचा हिशोब करत असत. सहा महिन्यांसाठी दिलेली खर्ची ह्या लोकांनी घेतलेला बयाणा (आगाऊ रक्कम) असे मिळून त्यांचे निघालेले पैसे त्यांना दिले जाई. जर का एखाद्या

गड्यावर बाकी निघाली तर ठेकेदार त्याला थोडेफार पैसे पुढील वर्षासाठी बयाणा म्हणून देत असे व नंतर ह्या लोकांना ठेकेदाराच्या गाडीमधून (ट्रक)मध्ये बसवून नेलं जाई. तालुक्याच्या गावापर्यंत ते पायी प्रवास करत. हे लोक येताना सुकलेली काजूची बोंडं, काजूच्या बिया, थोडेफार उरलेले पीठ, तसेच फणसे, ठेकेदारांनी त्यांच्यासाठी दिलेल्या रंगांच्या टाक्या, तसेच एक-दोन पोती हे लोक हमखास घेऊन येत असत. घरी आल्यानंतर यांची गावी असलेली झोपडी पूर्णपणे मोडलेली असे. ह्या लोकांच्या झोपडीला पूर्वी कधीच दारं नसत.

नंतरच्या काळात कोळसा बनवण्यासाठी लागणारे जे अंगळ, सरकारने त्याच्यावर बंदी आणली. त्यानंतर आम्हा कातकरी लोकांचा उपजीविकेचा प्रश्न अतिशय बिकट झाला. तेव्हा हे आमचे कातकरी लोक ठाणे, वसई येथे वीटभट्टीचा कारखाना चालू होता त्या वीटभट्टीवर जाऊ लागले. हा वीटभट्टीव्यवसाय त्यांच्या जिल्ह्यात असल्यामुळे त्यांना रोजगार थोडाफार जवळ उपलब्ध झाल्याने ते कुटुंब-मुलांना शिक्षणासाठी घरी ठेवत असत. त्यामुळे ह्या काळात आदिवासी कातकरी मुलांचे शिक्षण थोड्याफार प्रमाणात झालेले दिसते. जे लोक इनामदारीने काम करत असत, त्यांना बऱ्यापैकी पैसे मिळू लागले. त्यामुळे त्यांच्या राहणीमानात थोडीफार सुधारणा झाली.

हे वीटभट्टीचे काम फार कष्टाचे काम. प्रामुख्याने दिवाळी ते जून महिन्यापर्यंत केले जाते. हिवाळा असो की उन्हाळा ते त्यांना करावेच लागते. त्याचे कारण असे की ह्या लोकांनी वीटभट्टीमालकाकडून अगोदर आगाऊ रक्कम म्हणून जूनमध्ये गौरीगणपती, नंतर दसरा व दिवाळीसाठी पैसे उचललेले असतात. यामध्ये वीट बनवणारे पातलेवाले यांना रात्री पहाटे तीन वाजल्यापासून हे काम करावे लागते. सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण एवढा त्यांचा आराम. परत दुपारी दोन वाजल्यापासून रोज नित्यनियमाप्रमाणे करावेच लागते. जर का केले नाही तर वीटभट्टीमालक आंठोडा खर्चीकपात काही वेळेस करतात. त्याचप्रमाणे हर कामवाले हेदेखील काम अतिशय कष्टाचे आहे. वीटभट्टी रचण्यासाठी बनवलेल्या कच्च्या मातीच्या २० ते २५ वीटा घेऊन कितीही ऊन असलं तरी तिचे माप पडेपर्यंत त्या वीटा डोक्यावर घेऊन धावावे लागते. हे काम गुरंढोरं करणार नाही असे करावे लागते. जर का काही वेळेस हे काम दारू पिऊन किंवा काही करणास्तव ४-५ दिवस केले नाही, तर वीटभट्टीमालकाकडून त्या गड्यास मारझोड होते. प्रत्येक मालक हा सारखाच असतो असे नाही. त्याचे कारण असे असते की ह्या लोकांच्या कामाच्या विश्वासावर वीटभट्टी-मालकाने लाखो रुपये गुंतवलेले असतात. हे कामगार लोक निव्वळ दारू पिऊन काम करत नसल्यामुळे काही प्रमाणात असे प्रकार होताना दिसतात.


सखा

माझे कातकरीबांधव हे शक्यतो वीटभट्टीवर प्रामाणिकपणे काम करतात. त्याचे दुसरे कारण असे की ह्या वीटभट्टी मजूरलोकांना वीटभट्टीमालक आगाऊ रक्कम देतात. ही रक्कम काही वेळेस मोठी असते हे मजूर लोक दोन-दोन वीटभट्टीमालकाकडून रक्कम घेतात व तिसऱ्याच मालकाकडे मजुरीसाठी पळून जातात. त्यामुळे काही वीटभट्टीमालक नाराज होऊन असे प्रकार होताना दिसतात. तसेच काही वेळेस गुराढोरासारखे काम करून शेवटी त्याच्या हातात काही रक्कम मिळतच नाही. त्यामुळे ह्या आदिवासी कातकरीबांधवांना पुढील वर्षासाठी आगाऊ रक्कम ३% घ्यावीच लागते. कारण त्यांच्याकडे दुसरे उपजीविकेचे साधन नाही.

तसेच हे लोक सहा महिने वीटभट्टीवर गुराढोरांसारखे काम करून आल्यावर फक्त हे लोक वीस ते पंचवीस दिवसच आपल्या आदिम कातकरीसमाजातील मुलामुलींचा लग्नसोहळा साजरा करतात. नंतर पुन्हा गावामधील पाटलाकडे आवनीचे (भातलावणी) काम करतात. आवनी

झाल्यानंतर लगेच ओला चारा (ओले गवत) कापून ते ठरावीक ठेकेदारांना देण्याचे काम. एक धडी ही ४० किलोची असते. एका धडीचा भाव हा २० रु. ह्याप्रमाणे असतो. प्रत्येक तालुका-जिल्ह्यात हा भाव जास्तकमी असतो. हा ओले गवत कापणीचा हंगाम हा भातकापणीच्या अगोदर संपतो. नंतर भातकापणी चालू होते. नंतर भातझोडणी संपल्यावर पुन्हा हे लोक वीटभट्टीवर कामासाठी जातात. आजच्या घडीला जवळजवळ ८० टक्के कातकरी लोक हे वीटभट्टीवर व इतर मजुरीसाठी स्थलांतर करत असतात.

आदिम-कातकरी लोकांची बोलीभाषा ही प्रामुख्याने गुजराती, राजस्थानी, खानदेशी, भिल्ल अशा भाषा मिळून तयार झाली आहे.

| | मराठी शब्द | कातकरी शब्द |
|---|---|---|
| १. | चादर | बनाट |
| २. | मान | बगड |
| ३. | अंडी | साकु |
| ४. | उचकी | अटुकली |
| ५. | बल्ब | गुलुप |
| ६. | नवरा | वहडास |
| ७. | सांगणे | सांगुला |
| ८. | होते | हेतल |
| ९. | आजा | खेबडा, डवर |
| १०. | आजी | खेबडी, डोशी |
| ११. | चोली | पोलका |
| १२. | बेडुक | बेडोक |
| १३. | पातळ, लुगे | फडका |
| १४. | बेसन | अलन, पिटवण्या |
| १५. | जवान मुलगी | बांडगी |

असे प्रत्येक वस्तूला आदिम कातकरीमध्ये वेगळे शब्द आहेत. परंतु आपण सांगतो त्याप्रमाणे २० किलोमीटर अंतरावर आपली प्रत्येक समाजाची बोलीभाषा ही बदलत असते. तशीच आमची ही कातकरी भाषा थोड्या प्रमाणात बदलत आहे असे निदर्शनास येत आहे. जशी पालघर जिल्ह्यात थोडीशी वेगळी असू शकते. तसेच ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये, इतर समाजांमध्ये हे कातकरी लोक वावरतात, त्याप्रमाणे ह्या कातकरी बोलीभाषेवर परिणाम झालेला दिसून येतो. मी पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात राहत असून ४० वर्षांपूर्वी आमच्या वाड्या तालुक्यामध्ये प्रत्येक कातकरी वाडीमध्ये ही आमची कातकरी भाषा व सर्वच आमचे बांधव आमच्या बोलीभाषेमध्ये संवाद करत असत. आजच्या घडीला आमच्या वाडे तालुक्यामध्ये १६४ वाड्या आहेत. ह्या वाड्यांपैकी ४ ते ५ वाड्यांमध्ये आमची कातकरी बोलीभाषा बोलली जाते. जर का ह्या ४० वर्षांमध्ये आमच्या बोलीभाषेवर एवढा परिणाम होत असेल तर पुढील १० वर्षांत आमची कातकरी बोलीभाषा ही लोप पावण्याच्या शेवटच्या टप्प्यात आहे.

आमची बोलीभाषा वाचावी. आमच्या चालीरीती, आमची संस्कृती ही इतर आदिवासी समाजापेक्षा फार वेगळी आहे. उदा. ५०-६० वर्षांपूर्वी आमची लग्न लावण्याची पद्धत ही इतर समाजापेक्षा वेगळी होती. आमच्या पाड्यातील वाडीतला जो कातकरी समाजाने निवडलेला नाईक (वाडीप्रमुख) त्याच्या आदेशानुसारच आमची लग्नं लावली जायची. तसेच आमची एखादी व्यक्ती निधन पावल्यास त्याचे अंत्यसंस्कार आमच्या चालीरीतीप्रमाणेच करावे लागत. एखाद्या मुलाचं लग्न ठरवायचं असेल तर अगोदर मुलामुलींच्या आईवडिलांनी एकत्र बसून विचारविनिमय करून, त्या वाडीतील नाईक व इतर पाच पंच एकत्र समोरासमोर बसून त्यांना विचारलं जायचं, की तुम्हाला एकमेकांना पसंत आहे का? त्याला आमच्या भाषेमध्ये 'बापबोल' असे मानतात. तसेच आमच्या साखरपुड्यामध्ये मुलाकडील नातेवाईक व मुलीकडील नातेवाईक हे एकत्र बसून लग्नाचे देवाणघेवाणचे कायदे पक्के करून घेतात. आमच्या आदिम कातकरीमध्ये मुलांच्या वडिलांना लग्नाचा निम्मा खर्च देज व धान या कायद्यांतर्गत मुलीला द्यावा लागतो. तसेच दोन्ही मंडळींकडून मुलीला लग्नात सोन्याचे मंगळसूत्र व पाच मणी हे करावेच लागतात.

आमची कातकरी भाषा लोप पावण्याची बरीचशी कारणे आहेत. समजा, कातकरी एखादी व्यक्ती चांगली सुधारलेली आहे. सुटबुट घालून त्याने तालुक्याच्या गावी बसस्थानकावर किंवा गर्दीच्या ठिकाणी इतर कातकरी लोक एकत्र जमल्यावर आपल्या बोलीभाषेत संवाद साधला तर आजूबाजूला इतर समाजाचे लोक मागच्या वाटेस बोलतात, 'अरे हे तर काथोडी (कातकरी) आहेत.'

आमचे कातकरी ६०% लोक दारू व्यसन व इतर व्यसनाधीन आहेत. थोड्याफार हट्टी व गुन्हेगारी वृत्तीचे असल्यामुळेही इतर समाजातील लोक असे बोलत असावे असे मला वाटते. आमचे कातकरी लोक इतर समाजाप्रमाणे

सणवार साजरे करतात. सणाच्या दिवशी थोडेफार दारूचे व्यसन करून आमचे कातकरी लोक झिंगीचा नाच (डबा व ढोलकी) आपल्या बोलीभाषेत गाऊन रात्री २ वाजेपर्यंत नाचतात. आमची कातकरी गाणी व नाच अतिशय तालबद्ध असतात. हा नाच बघण्यासाठी इतर समाजाचे बांधव आवर्जून उपस्थित राहतात. ही आमची संस्कृती व चालीरीती टिकावी म्हणून शासनदरबारी खूप प्रयत्न केले. परंतु आजवर कोणत्याही प्रकारचे आम्हाला यश आलेलं नाही.

आताच दोन वर्षांपासून महाराष्ट्र शासनाने आदिम कातकरी लोकांचा विकास होत नाही म्हणून आदिम कातकरी विकास योजना ही महाराष्ट्रातर्फे राबवली आहे. या योजनेचे कार्यकारी संचालक आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन डॉ. नीरज हातेकरसर यांची नियुक्ती केली आहे. ही व्यक्ती तज्ज्ञ व हुशार असून आदिम कातकरींसाठी प्रामाणिकपणे कार्य करत आहेत. परंतु खरोखरच आदिम कातकरींचा विकास करायचा असेल तर त्यांना व्यसनापासून दूर कसे करता येईल याचा विचार करावा लागेल. ह्या लोकांची व्यसनापासून सहज सुटका होणार नाही. त्यासाठी मी स्वत: हातेकरसरांना भेटून त्यांच्यासमोर मांडले की, आपल्याला छोटे-छोटे मेळावे घेऊन, व्यसन केल्याने आपले व शरीराचे काय नुकसान होते, आपल्या कुटुंबावर काय परिणाम होतात ते आपल्या डोळ्यांसमोर आहे.

काही थोड्याफार प्रमाणामध्ये मोखाडा, जव्हार, विक्रमगड व वाडा भागामध्ये आदिम कातकरी हे अल्प प्रमाणात माळकरी झाले आहेत. जर का आपण त्या कुटुंबाकडे बघितले तर व्यसनाधीन लोकांपेक्षा त्यांचं राहणीमान उंचावलेलं दिसतं. आदिम कातकरी समाज हा पैशाची बचत करत नाही. मजुरीमधून आलेला पैसा ते दारू व इतर व्यसनासाठी वापरतात. आपल्याला आढळून आले आहे की जव्हार, मोखाडामध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त का? शासनाने त्यासाठी भरपूर प्रयत्न केले आहेत. तरीपण कुपोषण आहे तसेच आहे. यासाठी स्थानिक पातळीवरील त्या समाजातील प्रमुख व्यक्तीशी चर्चा करून त्यासाठी काय उपयोजना केली पाहिजे ते त्याच लोकांना माहीत आहे.

आमची कातकरी मुलं ही आदिवासी प्रकल्पाच्या शाळेमध्ये सर्व सुखसुविधा असतानादेखील आश्रमशाळेमध्ये राहायला तयार होत नाहीत. पालकसुद्धा पाठवायला तयार होत नाहीत. आदिवासी प्रकल्प अधिकारी आम्हाला बोलावून कार्यालयामध्ये घेतात व सांगतात की तुमची कितीही मुलं असू दे, त्यांना आम्ही आश्रमशाळेमध्ये प्रवेश देतो. परंतु ही मुले आश्रमशाळेमध्ये राहायला तयार नसतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे इतर आदिवासी जातीमुळे मिसळण्यास तयार नसतात. त्यांची बोलीभाषाही कातकरी असल्यामुळे इतर मुलं मला हसतील असे त्यांना वाटते. आम्ही आदिम जातीच्या सर्व कार्यकर्त्यांनी आदिम कातकरी आदिवासीचे कार्यकारी संचालक आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य डॉ. नीरज हातेकरसर यांना, तसेच आदिवासी विकास विभाग प्रधान सचिव महाराष्ट्र राज्य यांना निवेदनाद्वारे प्रत्येक तालुक्यामध्ये जिथे आदिम कातकरी जास्त प्रमाणात असेल तिथे आदिम कातकरीसाठी आदिवासी प्रकल्पाकडून किंवा आदिवासी विकास विभागाकडून एकतरी आश्रमशाळा असावी अशी आम्ही आदिवासी विकास विभाग यांना नम्र विनंती केली आहे.

जोवर आदिवासी कातकरी मुलांचे शिक्षण बारावीपर्यंत होत नाही, तोपर्यंत ह्या लोकांचा विकास होणे शक्य नाही. जर ह्या मुलांचे शिक्षण झाले नाही तर ही मुलं व्यसनाधीन होतील. तसेच त्यांच्याकडे जमीन वगैरे व कामधंदा नसल्यामुळे ही मुले गुन्हेगारीकडे आपसुकच वळतील. कातकरी लोकांची बारावी-पंधरावी पास झालेली सुशिक्षित मुले-मुली, त्यांच्या हाती वीटभट्टी व मजुरीशिवाय, तसेच त्यांचे आईवडील मजूर असल्यामुळे मुलासाठी, कोणत्या व्यवसायासाठी पैसे नसतात. अशा निराशेतून ही शिकलेली सुशिक्षित मुलं दारूच्या आहारी किंवा इतर व्यसनांच्या आहारी जातात. तसेच ही मुले बेरोजगार होऊन गुन्हेगारी वृत्तीचे होऊ शकतात. तसेच ह्या जिल्ह्यांमध्ये गडचिरोलीसारखा प्रश्न उद्‌भवू शकतो. जर का महाराष्ट्र शासनाने सुशिक्षित मुलांना स्वयं रोजगार उत्पन्न करून दिला तर त्यांचे संपूर्ण कुटुंब हे नक्कीच स्थलांतर करणार नाहीत.

**– दत्तात्रेय चि. पवार**





**बोलीभाषा विशेषांक**

## लेख

# कोरकू बोली

**डॉ. काशीनाथ बऱ्हाटे**

**महाराष्ट्रातील ४७ आदिवासी जमातींपौकी 'कोरकू' ही एक प्रमुख जमात आहे. महाराष्ट्रातील अकोला व बुलढाणा जिल्ह्यांच्या पर्वतरांगा तसेच मध्यप्रदेशातील पूर्व निमाड (खंडवा), बैतुल, छिंदवाडा, होशंगाबाद या जिल्ह्यांमध्येही कोरकूंची वस्ती आहे. आर्यपूर्व कालखंडापासून भारतात ऑस्ट्रिक व द्राविडी परिवारातील आदिम जमातींचे वास्तव्य होते. कोरकू ही ऑस्ट्रो-आशियाई भाषासमूहापौकी मुंडा गटातील भाषा आहे.**

**महाराष्ट्रातील** ४७ आदिवासी जमातींपैकी 'कोरकू' ही एक प्रमुख जमात आहे. महाराष्ट्रातील अकोला व बुलढाणा जिल्ह्यांच्या पर्वतरांगा, तसेच मध्यप्रदेशातील पूर्व निमाड (खंडवा), बैतुल, छिंदवाडा, होशंगाबाद या जिल्ह्यांमध्येही कोरकूंची वस्ती आहे. आर्यपूर्व कालखंडापासून भारतात ऑस्ट्रिक व द्राविडी परिवारातील आदिम जमातींचे वास्तव्य होते. ऑस्ट्रिक परिवारातील 'कोरकू' हे मध्यभारताच्या सर्वात पश्चिमेस स्थायिक झालेले आहेत. त्यापलीकडे ऑस्ट्रिक परिवारातील कोणत्याही जमातीचे वास्तव्य दिसत नाही.

कोरकू ही ऑस्ट्रो-आशियाई भाषासमूहांपैकी मुंडा गटातील भाषा आहे. याच गटात संथाळी, कोरवा, मुण्डारी, हो, सावार, गदाबा ह्या भाषा येतात. कोरकू हे झारखंडामधील मुंडा या वांशिक गटाशी संबंधित आहे.

कोरकू बोलीतील स्वनिमांचे खंडित स्वनिम व खंडाधिष्ठित असे दोन प्रकार पडतात. ज्यांचे उच्चारण स्वतंत्रपणे करता येते अशांना खंडित स्वनिम असे म्हणतात; आणि जे स्वतंत्रपणे उच्चारता येत नाहीत, खंडित स्वनिमासोबतच ज्यांचा उच्चार करावा लागतो, अशा स्वनिमांना खंडाधिष्ठित स्वनिम असे म्हणतात. अशा स्वनिमांना सहोच्चारी स्वनिम असेही म्हणतात.

**स्वरस्वनिम :**

कोरकू बोलीतील सर्व स्वरस्वनिम सघोष असून बहिर्गामी उच्छ्वासाद्वारे उच्चारले जातात. या बोलीत स्वनांचे ऱ्हस्वदीर्घत्व स्वनिमिक नसल्याने स्वनांच्या दीर्घ उच्चारांना स्वनिम मानण्याचे कारण नाही.

सारख्याच स्वनिम परिसरात येणाऱ्या दोन शब्दांमधील अल्पतम ध्वनियुग्म शोधून कोरकू बोलीतील स्वरस्वनिम निश्चित करता येतात. त्यानुसार निश्चित केलेल्या स्वरस्वनिमांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे. या बोलीत 'अ, आ, इ, उ, ए, ओ' हे सहा स्वरस्वनिम आढळतात.

**स्वर स्वनिमाचे वर्गीकरण :**

| **प्रयत्न** | **उच्चारणस्थान** | | |
|---|---|---|---|
| | अग्र | केंद्र | पश्च |
| उच्च | इ | | उ |
| मध्य | ए | अ | ओ |
| निम्न | | आ | |

**व्यंजनाचे वर्गीकरण :**

अल्पतम ध्वनियुग्मांच्या साहाय्याने निश्चित केलेल्या व्यंजनस्वनिमांचे उच्चारस्थान, घोषत्व, प्रयत्न व प्राणत्वावर आधारित वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**उच्चारस्थान**

| प्रयत्न | ओष्ठ्य<br>अघोष घोष | दंत्य अघोष<br>घोष | तालव्य<br>अघोष घोष | मूर्धन्य<br>अघोष घोष | कंठ्य<br>अघोष घोष | कंठद्वारीय<br>सघोष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्पर्श | प् ब्<br>फ् भ् | त् द्<br>थ् ध् | | ट् ड्<br>ठ् ढ् | क् ग्<br>ख् घ् | | अल्पप्राण<br>महाप्राण |
| स्पर्श<br>संघर्षी | | | च् ज्<br>झ् | | | | अल्पप्राण<br>महाप्रमाण |
| नासिक्य | म् | न् | | | ङ् | | अल्पप्राण |
| घर्षक | | स् | | | | ह् | अल्पप्राण<br>महाप्राण |
| पार्श्विक | | ल् | | ळ् | | | अल्पप्राण |
| कंपित | | र् | | | | | अल्पप्राण |
| अर्धस्वर | व् | | य् | | | | अल्पप्राण |

**खंडाधिष्ठित स्वनिम :**

स्वनिमांचा दुसरा प्रकार खंडाधिष्ठित स्वनिम होय. कोरकू बोलीत खंडाधिष्ठित स्वनिमांचे बलाघात, सुसरावली व सीमासंबंधी हे तीन प्रकार आढळतात. हे सर्व खंडाधिष्ठित स्वनिम वाक्यांतर्गत येतात.

**१. बलाघात –**

कोरकू बोलीतील वाक्यांतर्गत येणाऱ्या वेगवेगळ्या शब्दांवर कमीअधिक बलाघात दिल्यास वाक्याचा अर्थ बदलतो.

इया बोको इस्कुलेन् सेनेबा (माझा भाऊ शाळेत जातो).
माझा भाऊ, दुसऱ्याचा नाही.

इया बोको इस्कुलेन् सेनेबा (माझा भाऊ शाळेत जातो).
माझा भाऊ, बहीण नाही.

इया बोको इस्कुलेन् सेनेबा (माझा भाऊ शाळेत जातो).
माझा भाऊ, शाळेत जातो; इतर कुठेच नाही.

वरील वाक्यांपैकी पहिल्या वाक्यात 'कोणाचा' असा प्रश्न विचारल्यास माझा असे उत्तर अपेक्षित आहे. दुसऱ्या वाक्यात 'कोण' असा प्रश्न विचारल्यास भाऊ असे उत्तर अपेक्षित आहे आणि तिसऱ्या वाक्यात 'कोठे' असा प्रश्न विचारल्यास शाळेत असे उत्तर अपेक्षित आहे.

**२. सुसराघात –**

कोरकू बोलीतील ध्वनींचे चढउतारानुसार उच्चारण केल्यास वाक्याचा अर्थ बदलतो. वक्त्याच्या मनातील अपेक्षा व भावना सूरयोजनामध्ये प्रकट होतात.

कोरकू बोलीत समतल, अवरोही व आरोही हे तीन सुसरावलीचे प्रकार आढळतात.

जाटु फगनुखे मुन्डाखेनेज् (जाटुने फगुनला मारले).
समतल सूरयोजन.

जाटु फगनुखे मुन्डाखेजन् (जाटुने फगुनला मारले).
आरोही सूरयोजन.

जाटु फगनुखे मुन्डाखेजन् (जाटुने फगुनला मारले).
अवरोही सूरयोजन.

वरीलपैकी पहिल्या वाक्याचे समतल सूरयोजन असल्याने विधानार्थी वाक्य तयार होते. दुसऱ्या वाक्याचे आरोही सूरयोजन असल्याने प्रश्नार्थक वाक्य तयार होते, आणि तिसऱ्या वाक्याचे अवरोही सूरयोजन असल्याने आश्चर्यदर्शक किंवा उद्‌गारवाचक वाक्य तयार होते.

**३. सीमासंधी –**

वाक्यातील खंड किंवा विराम बदलला की, वाक्याचा अर्थ बदलतो. एकाच वाक्यात वेगवेगळ्या ठिकाणी विराम घेतल्यास भिन्न अर्थाची दोन वाक्ये तयार होतात.

अर्थात हा प्रकार कोरकू बोलीत अत्यल्प प्रमाणात आढळतो.

डनिज् डिज् बान् (हा तो नाही).

डनिज् डि जबान् (ही ती जबान).

**रूपविचार :**

भाषेमध्ये ध्वनींच्या ज्या अनेकविध अर्थपूर्ण रचना आढळतात, त्या रचनांचे विघटन करीत गेलो असता जे लघुतम सार्थ रूप शिल्लक राहते, त्या रूपास 'रूपिका' असे म्हणतात. काही रूपिका या भाषेत स्वतंत्रपणे वावरत असतात. भाषिक संज्ञापनात रूपिकांचे विविध प्रकारचे संयोग होतात. भाषिक रूपातील अर्थदृष्ट्या लघुतम घटक असणाऱ्या रूपिकांच्याही विविध सरंचना असतात.

**रूपिकांचे वर्गीकरण :**

भाषेतील सार्थ लघुतम रूपास रूपिका असे म्हणतात. समान कार्य करण्याच्या उद्देशाने एकत्र आलेल्या या रूपिकांच्या समूहाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अमूर्त संबोधास रूपिम असे म्हणतात. रूपिमांचा भाषेतील वावर कसा आहे त्यावरून त्यांचे मुक्त रूपिम व बद्ध रूपिम असे दोन प्रकार पडतात.

**१. मुक्त रूपिम :**

मुक्त रूपिम भाषेत स्वतंत्रपणे संचार करू शकतात. स्वतंत्रपणे वावरणाऱ्या रूपिमांचा विशिष्ट आशय सूचित होतो. म्हणून अशा रूपिमांना आशयसूचक रूपिम किंवा मुक्त रूपिम असेही म्हणतात. इतर सर्व भाषांप्रमाणेच कोरकू बोलीतही आशयसूचक रूपिमांची संख्या सर्वाधिक आहे. मुक्त रूपिमांमध्ये नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद व अव्ययांचा समावेश होतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उदा. | नाम | – | कोरो (माणूस) | सिटा (कुत्रा) |
| | सर्वनाम | – | इन्न्ज् (मी) | डि (तो) |
| | विशेषण | – | केन्डे (काळा) | आवेल् (चांगला) |
| | क्रियापद | – | सेने (जाणे) | आजोम् (ऐकणे) |
| | अव्यय | – | इटा (खाली) | बगे (हळू) |

**२. बद्ध रूपिम :**

बद्ध रूपिम भाषेत स्वतंत्रपणे न वावरता सार्थ रूपांची जुळणी करण्यासाठी इतर रूपिकांच्या आश्रयाने सहभागी होतात. म्हणून त्यांना बद्ध रूपिम किंवा कार्यसूचक रूपिम असे म्हणतात. आशयसूचक रूपिकांना लागून येणारे कार्यसूचक रूपिम म्हणजे प्रत्यय होय. कोरकू बोलीत बद्ध रूपिमांचे प्रमाण कमी असले; तरी त्यांची आवृत्तीक्षमता मात्र मुक्त रूपिमांपेक्षा जास्त आहे. या बोलीत अनेकवचनी प्रत्यय, द्विवचनी प्रत्यय, विभक्ती प्रत्यय हे बुद्ध रूपिम आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | कोरो+कु | – कोरकु | (माणसं) |
| | कोरो+किनिज् | – कोर्किन्ज् | (दोन माणसं) |
| | डिज्+आ् | – डिजा | (त्याचा, त्याची, त्याचे) |
| | आम्+आ | – आमा | (तुझा, तुझी, तुझे) |
| | खिटि+न् | – खिटिन् | (शेतात) |
| | डोबा+खे | – डोबाखे | (बैलाला) |

**शब्दसिद्धी :**

शब्दनिर्मितीच्या प्रक्रियेत दोन किंवा दोनपेक्षा जास्त रूपिमांचा संयोग झालेला असतो. कोरकू बोलीत शब्दनिर्मितीच्या तीन पद्धती आढळतात.

**अ. प्रत्ययागम :**

शब्दाच्या निर्मितीत प्रत्ययागमाचे महत्त्वाचे कार्य असते. मूळधातू आणि प्रत्यय यांच्या योगाने एक अर्थपूर्ण व्याकरणीय संरचना तयार होते. प्रत्ययांना स्वत:चा स्वतंत्र अर्थ नसला तरी सार्थ रूपांची जुळणी करण्याच्या उद्देशाने शब्दांना लागून आलेल्या प्रत्ययांमुळे भाषिक रूपाची अर्थवाहकता साधली जाते.

साधारणत: प्रत्ययांचे पूर्वप्रत्यय, मध्यप्रत्यय आणि परप्रत्यय असे तीन प्रकार पडतात.

**१. पूर्वप्रत्यय :**

मुक्त रूपिमांच्या पूर्वी लागणाऱ्या प्रत्ययास पूर्वप्रत्यय असे म्हणतात. कोरकू बोलीत पूर्वप्रत्ययाचे प्रमाण अत्यल्प आहे. 'हुन्जु' (खेळ) या शब्दाला 'ड्ड' हा प्रत्यय लागला की, 'डुहुनजु' (स्थानिक खेळ) या अर्थाचा नवीन शब्द तयार होतो. परंतु 'ड्ड' या प्रत्ययांची साधना इतर रूपिमांशी होत नाही. स्थलवाचकदर्शक सर्वनामाच्या निकटत्वदर्शक व दूरत्वदर्शक सर्वनामांच्या साधनेत पूर्वप्रत्यय येताना दिसतात. स्थलवाचकदर्शक सर्वनामांमधील निकटत्वदर्शक सर्वनामांच्या अग्रस्थानी 'डि' किंवा 'डे' हे प्रत्यय येऊन दूरत्वदर्शक सर्वनामाची साधना होते. या व्यतिरिक्त धातूंच्या क्वचित प्रसंगी नामाच्या आद्यस्थानी प्रत्ययागम होऊन सामान्य क्रियापदाची साधना होते. धातूच्या आद्यवर्णाची आवृत्ती धातूच्या आद्यस्थानी होते.

| | | |
|---|---|---|
| किजि (विकणे) | : | किकिजि (विकतो), |
| गोच् (मारणे) | : | गोगोच् (मारतो) |
| रोपो (रोप) | : | रोरोपो (रोप लावतो), |
| जोम् (जेवण) | : | जोजोम् (जेवतो) |

**२. मध्यप्रत्यय :**

रूपिमांच्या मध्यस्थानी येणाऱ्या प्रत्ययाला मध्यप्रत्यय असे म्हणतात. कोरकू बोलीत मध्यप्रत्ययांचेही प्रमाण अत्यल्प आहे. प् : मूळ क्रियापदाच्या प्रथम अवयवस्थानी 'प्' या प्रत्ययाचा आगम् होऊन परस्परसंबंध दर्शक क्रियेचा

बोध होतो. ज्या अवयवस्थानी 'प्' या प्रत्ययाचा आगम होतो, त्या अवयवाचा संस्कार प्रत्ययावर होतो.

गोच् (मारणे) – गोपोच् (एकमेकांना मारणे)
मान्डि (बोलणे) – मापान्डि (एकमेकांना बोलणे)
होळा (भेटणे) – होपळ (एकमेकांना भेटणे)

वरील शब्दांमध्ये येणारे प्रत्यय हे नियमित नसल्याने ते इतर शब्दांच्या निर्मितीप्रक्रियेत सहभागी होऊ शकत नाहीत.

**३. अंत्यप्रत्यय / परप्रत्यय :**

मुक्त रूपिमांच्या अंत्यस्थानी लागणाऱ्या प्रत्ययाला परप्रत्यय असे म्हणतात. कोरकू बोलीत परप्रत्ययांचे प्रमाण लक्षणीय आहे. मूळ रूपिका आणि त्यांना लागणारे प्रत्यय यापासून तयार होणाऱ्या रचनाचे अनेक प्रकार पाहायला मिळतात.

**वचनप्रत्यय :**

कोरकू बोलीत संस्कृत भाषेप्रमाणे एकवचन, द्विवचन आणि अनेकवचन असे तीन प्रकार आहेत. अर्थात संस्कृत भाषेच्या प्रभावातून किंवा संपर्कामुळे अशी समानता कोरकू बोलीत आली असावी असे म्हणता येणार नाही. वचनव्यवस्था ही कोरकू बोलीचे स्वतंत्र वैशिष्ट्य आहे.

कोरकू बोलीत फक्त सजीवांच्या नामांनाच वचनाचे प्रत्यय लागतात. निर्जीव वस्तूंच्या नामांना प्रत्ययागम होत नाही.

उदा. एकवचन कोरो (माणूस)
द्विवचन कोरोकिन्ज् (दोन माणसं)
अनेकवचन कोरकु (अनेक माणसं)

'कोरो' या नामाने एका माणसाचा निर्देश होतो. 'कोरो' या रूपास 'किन्ज्' हा द्विवचनी प्रत्यय लागला की, दोन माणसांचा निर्देश केला जातो; तर 'कोरो' या मुक्त रूपिमास 'कु' हा अनेकवचनी प्रत्यय लागला की, अनेक माणसं किंवा लोक हे अनेकवचनी रूप तयार होते.

मूळ रूपातील 'ओ' या स्वराचा लोप होतो. अर्थात सर्वच अनेकवचनी शब्दांमध्ये रूपिकेच्या अंत्यस्थानी येणाऱ्या स्वराचा लोप होतो असे नाही. काही रूपिकांची रूपे तीनही वचनात सारखीच राहतात.

उदा. एकवचन सिटा (कुत्रा)
द्विवचन सिटाकिन्ज् (दोन कुत्रे)
अनेकवचन सिटाकु (कुत्रे)

काही विशिष्ट निर्जीव वस्तूंच्या नावापुढे 'कु' हा प्रत्यय येतो. तथापि, या प्रत्ययामागे वरील वचनव्यवस्थेसारखी साधना न होता एका नवीन अर्थाच्या शब्दाची निर्मिती होते. मजेशीर गोष्ट म्हणजे निर्जीव वस्तूंच्या नावापुढे 'कु' हा प्रत्यय लागल्यावर सजीवांच्या समूहवाचक शब्दाची निर्मिती होते.

उरा+कु उराकु (घरातील माणसं)
गाव+कु गावकु (गावातील माणसं)
हाटि+कु हाटिकु (बाजारातील माणसं)

वरील निर्जीव नामांना जोडून येणारा 'कु' हा प्रत्यय समूहवाचक अर्थधारणेसाठी काही विशिष्ट शब्दांमध्ये येत असल्याने त्याला अनियमित प्रत्यय म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

कोरकू बोलीतील क्रियापदांना 'इठाक्, किन्ज्' आणि 'मिनकु, इन्कु' असे व्यक्तिवाचक प्रत्यय लागून एकवचन, द्विवचन आणि अनेकवचनी रूपांची साधना होते. क्रियापदांच्या बहुतांश रूपांना हे प्रत्यय लागत असल्याने त्यांना नियमित प्रत्यय म्हणता येईल.

क्रियापद जोजोम् (खाणे)
एकवचन जोजोम्इठाक् (खाणारा)
द्विवचन जोजोम्किन्ज् (दोघे खाणारे)
अनेकवचन जोजोमिनकु (खाणारे)

कोरकू बोलीत 'इठाक्, इनकु, मिन्कुन या रूपांचा वापर शब्दघटनेसाठी अनेक ठिकाणी केला जातो. त्या तुलनेत 'किन्ज्' या द्विवचनी प्रत्ययाचा वापर मात्र अत्यल्प प्रमाणात होताना दिसतो. 'इठाक' हे रूप क्रियापदांना व क्वचित प्रसंगी नामांना लागून येते. त्यावेळेस उपपद तत्पुरुष समासाची निर्मिती होते. या सामासिक रचनेतील 'इठाक्' या पदाचा स्वतंत्रपणे उपयोग होत नाही.

कमाय्+इठाक् कमाय्इठाक् (कामकरी)
खेटि+इठाक् खेटिइठाक् (शेतकरी)

**लिंगप्रत्यय :**

कोरकू बोलीतील लिंगव्यवस्था वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. वस्तूवाचक नामांना लिंगाचे विकार होत नाहीत. सजीवांच्या नामांतील लिंगभेद दाखविण्यासाठी विशिष्ट प्रत्ययांची साधना केली जाते. त्यातही मुनष्यप्राणी आणि मनुष्येतर प्राणी असे दोन भाग पडतात. मनुष्यप्राण्यातील 'पुरुष' या शब्दासाठी 'धोटा' आणि 'स्त्री' या शब्दासाठी 'जापाय' हा शब्द वापरला जातो. मनुष्येतर प्राण्यांचा लिंगभेद दर्शविण्यासाठीसुद्धा या शब्दांचा सामासिक शब्दांसारखा उपयोग केला जाते.

धोटाकुला (वाघ) जापायकुला (वाघीण)
धोटासिटा (कुत्रा) जापाय्सिटा (कुत्री)

'धोटा' आणि 'जापाय' हे शब्द मनुष्येतर प्राण्यांच्या नामांच्या आधी लागून येतात. त्यामुळे पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी नामांची साधना होते. नपुंसकलिंगाचा प्रकार या बोलीत आढळत नाही.

मनुष्यप्राण्यातील 'पुरुष' या शब्दासाठी 'धोटा' आणि 'कोरो' असे दोन शब्द वापरले जातात. आणि स्त्रीसाठी 'जापाय' हा शब्द वापरला जातो. याव्यतिरिक्त 'धोटा' आणि 'जापाय' या शब्दांच्या वापराने अनुक्रमे 'नवरा' आणि 'बायको' यांचा निर्देश केला जातो.

कोरकू बोलीत नातेवाचक नामांच्या पुढे प्रत्ययागम येऊन स्त्रीलिंगी नामांची साधना होते. पुल्लिंगी नातेवाचक नामाचे स्त्रीलिंगी नामांत रूपांतर होताना खालील स्त्रीलिंगी प्रत्यय वापरले जातात. वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे स्वत:च्या नातेसंबंधाचा व दुसऱ्याच्या नातेसंबंधाचा निर्देश करताना वेगवेगळे प्रत्यय स्वीकारले जातात. सर्वसामान्य पुल्लिंगी नातेवाचक नामास 'टे' हा प्रत्यय लागला की स्त्रीलिंगी नाम तयार होते.

**टे :** कुरार्(नातू) — कुरार्टे (नात)
गाग्टा(पुतण्या) — गाग्टाट (पुतणी)

**जे :** कोन् (स्वत:चा मुलगा) — कोन्जे (स्वत:ची मुलगी)
बावन् — (स्वत:चा साळा)
बावन्जे — (स्वत:ची साळी)
बोको — (स्वत:चा धाकटा भाऊ)
बोकोजे — (स्वत:ची धाकटी बहीण)
कोसरेट (पुतण्या) — कोसरेटजे(स्वत:ची पुतणी)

**जेटे :** कोन्जे (स्वत:ची मुलगी) — कोन्जेटे(दुसऱ्याची मुलगी)
बोकोजे — बोकोजेटे
(स्वत:ची धाकटी बहीण) — (दुसऱ्याची धाकटी बहीण)
बावन्जे — बावनजे्टे
(स्वत:ची साळी) — (दुसऱ्याची साळी)
कोसरेट्जे — कोसरेट्जेटे
(स्वत:ची पुतणी) — (दुसऱ्याची पुतणी)

मूळ नातेवाचक नामात 'जे' हा प्रत्यय लागला की स्वसंबंधदर्शक स्त्रीलिंग रूप तयार होते आणि नातेवाचक नामास 'जे' हा प्रत्यय कायम राहून त्यापुढे 'टे' या प्रत्ययाची साधना केली की, परसंबंधदर्शक स्त्रीलिंगी नामाची निर्मिती होते.

कोरकू बोलीत नातेवाचक संबंध दाखविण्यासाठी स्वसंबंधदर्शक आणि परसंबंधदर्शक प्रत्ययांचा वापर केला जातो. वचनप्रत्ययांप्रमाणेच हेसुद्धा या बोलीचे स्वयंभू वैशिष्ट्य म्हणून ओळखले जाते.

कोरकू बोलीत व्यवसायवाचक पदांच्या शेवटी 'किनज्' हा स्त्रीलिंगी प्रत्यय लागून स्त्रीलिंगी नामांची निर्मिती होते. सजीवांच्या नावांना लागून द्विवचनाचा निर्देश केला जातो, तेव्हा तो द्विवचनी प्रत्ययाच्या रूपात असतो, आणि व्यवसायवाचक नामांना 'किन्ज्' हा प्रत्यय लागून येतो. तेव्हा तो स्त्रीलिंगी प्रत्यय म्हणून वापरला जातो. अशाप्रकारचे 'किन्ज्' या प्रत्ययाचे दुहेरी कार्य या बोलीत आहे.

कुंभार+किन्ज् — कुंभारकिन्ज् (कुंभारीण)
खाटि+किन्ज् — खाटिकिन्ज् (लोहारीण)

**विभक्ती प्रत्यय :**

वाक्यातील शब्दांचा संबंध दाखविण्यासाठी नाम किंवा सर्वनाम यांच्या स्वरूपात जो बदल किंवा सर्वनाम यांच्या स्वरूपात जो बदल किंवा विकार होतो, त्याला विभक्ती असे म्हणतात. विभक्ती प्रत्ययांना असेही विकारी प्रत्यय म्हणतात. ते नेहमीसाठी पदांच्या चरमस्थानी येत असतात. प्रत्येक विभक्तीचे स्वत:चे स्वतंत्र प्रत्यय या बोलीत आढळत नाही. ज्याप्रमाणे मराठी भाषेत द्वितीया आणि चतुर्थी यांचे प्रत्यय रूपदृष्ट्या समान आहेत, त्याप्रमाणेच याही बोलीत द्वितीय आणि चतुर्थी विभक्तीचे प्रत्यय समान आहेत. तसेच तृतीया आणि पंचमी विभक्तीचा 'टेन' हा प्रत्यय समान रूपात येतो. तथापि, कोरकू बोलीत वाक्यांतर्गत येणाऱ्या कर्त्यास तृतीयेचा प्रत्यय लागत नाही. प्रथमा विभक्तीला एकवचनात शून्य प्रत्यय असतो. द्विवचन आणि अनेक वचनास मात्र प्रत्ययागम होतो. नामांना विभक्तीचे विकार लागताना नामाचे मूळ रूप बहुतांशी बदलत नाही. म्हणजे नामाचे सामान्यरूप होण्याची प्रक्रिया फार क्वचित ठिकाणी बघायला मिळते.

कोरकू बोलीत विभक्ती आणि त्यांचे प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत.

| विभक्ती | एकवचन | द्विवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| प्रथमा | शून्य | किनज् | कु |
| द्वितीया | खे, केन्, के | किन्ज्केन्, किन्ज्खे | कुकेन् |
| तृतीया | टेन्, गोन् | किन्ज्टेन् | कुटेन् |
| चतुर्थी | खे, केन्, के | किन्ज्केन्, किन्ज्खे | कुकेन् |
| पंचमी | टेन् | किन्ज्टेन् | कुटेन् |
| षष्ठी | आ, गा | किन्जा, किन्ज्गा | कुगा, कुका |
| सप्तमी | एन्, गेन्, न् | किन्जेन्, किन्ज्गेन् | कुएन् |

| विभक्ती | एकवचन | द्विवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| प्रथमा | शून्य (बैल) | डोबाकिनज् (दोन बैल) | डोबाकु (अनेक बैल) |
| द्वितीया | डोबाखे, केन्, के | डोबाकिन्ज्केन्, किन्ज्खे | डोबाकुकेन् |
| तृतीया | डोबाखेन्, गोन् | डोबाकिन्ज्टेन् | डोबाकुटेन् |
| चतुर्थी | डोबाखे, केन्, के | डोबाकिन्ज्केन्, किन्ज्खे | डोबाकुकेन् |
| पंचमी | डोबाखे टेन् | डोबाकिन्ज्टेन् | डोबाकुटेन् |
| षष्ठी | डोबागा | डोबाकिन्जा, किन्ज्गा | डोबाकुगा |
| सप्तमी | डोबाएन् | डोबाकिन्जेन्, किन्ज्गेन् | डोबाकुएन् |

**सामासिकता :**

कोरकू बोलीत सामासिकता हा शब्दसिद्धीचा एक प्रकार आढळतो. दोन मुक्त रूपिमांच्या संयोगाने सामासिक शब्दाची निर्मिती होते. त्यात नाम, विशेषण, क्रियापद व अव्यय या शब्दांचे संयोग होतात.

**सामासिकतेचे घटक :**

नाम, विशेषण, क्रियापद यापैकी दोन घटक समासात असतात. दोन भिन्न घटकांचे दोन भिन्न शब्द समासात येऊ शकतात किंवा कित्येकदा एकाच घटकाचे दोन भिन्न शब्दही त्यात असतात. त्या संयोगातून सिद्ध झालेला सामासिक शब्द त्याच जातीचा किंवा शब्दजातीचा निर्देश करीत असतो.

शब्दघटनेतून सामासिक शब्दांना महत्त्वाचे स्थान आहे. दोन किंवा त्यापेक्षा अधिक पदांच्या संयोगातून सामासिक शब्द तयार होतात. सामासिक शब्दातील दोन पदांच्या प्रधान गौणत्वावरून समासाचे चार प्रकार पडतात.

**१. द्वंद्व समास :** सामासिक शब्दातील दोनही पदे प्रधान असणे म्हणजे द्वंद्व समास होय. कोरकू बोलीत या समासाची खालील रूपे सापडतात.

**अ. इतरेतर द्वंद्व :** जापाय्+धोटा

जापाय्धोटा (बायको आणि नवरा)

साना+सानि

सानासानि (म्हातारा आणि म्हातारी)

**ब. समाहार द्वंद्व :** बोलण्यातील परिणामकारकता व्यक्त करण्याच्या उद्देशाने अशा समासांची रचना होत असल्याचे आढळते.

आटा+पाणि आटापाणि (जेवण, पाणी व इतर)

चिडि+मुङ्गि चिडिमुङ्गि (पक्षी, किटक व इतर)

**क. वैकल्पिक द्वंद्व :** म्या+बरि म्याबरि (एक किंवा दोन)

**२. बहुव्रिही समास :** बहुव्रिही समासातील दोनही पदे दुय्यम असतात. या पदांच्या संयोगातून तिसऱ्याच पदाचा बोध होतो. या समासाचे उपवादात्मक रूप कोरकू बोलीत आढळते.

काडि+डबी काडिडबी (आगपेटी) रातोगोमोज् (चंद्र)

बुलुम्+डा बुलुम्डा (अंडाशय) दियागोमोज् (सूर्य)

**३. अव्ययीभाव समास :** ज्या समासात पहिले पद प्रधान व दुसरे पद दुय्यम असते, त्यास अव्ययीभाव समास असे म्हणतात. या समासातील पहिले पद अव्यय व दुसरे पद नाम किंवा विशेषण असते. या दोन पदांच्या संयोगाने सिद्ध होणारे सामासिक पद क्रियाविशेषण अव्यय असते. कोरकू बोलीत अव्ययीभाव समासाचे खालील प्रकार आढळतात.

**अ. पूर्वपद अव्यय :** टेया+राटो टेयाराटो (आज रात्री)

हर+मेना हरमेना (प्रत्येक महिना)

**ब. परपद अव्यय :** जेनुम्+भर् जेनुम्भर् (जन्मभर)

राटो+भर् राटोभर् (रात्रभर)

**क. अभ्यस्त :** राटे+राटो राटेराटो (रातोरात)

म्या+म्या म्याम्या (एकाएकी)

**४. तत्पुरुष समास :** ज्या समासातील दुसरे पद महत्त्वाचे असते व अर्थाच्या दृष्टीने गाळलेला शब्द किंवा विभक्तीप्रत्यय विग्रह करताना वापरावा लागतो, त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.

कोरकू बोलीत तत्पुरुष समासाचे खालील उपप्रकार सापडतात.

**अ. विभक्ती तत्पुरुष :** या समासात विभक्ती प्रत्ययाचा किंवा विभक्तीचा अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाचा लोप करून दोन्ही पदे जोडलेली असतात. या समासात पहिला शब्द बहुधा नाम किंवा विशेषण असतो. त्याला विग्रहात विभक्तीचे प्रत्यय लागतात.

**द्वितीय तत्पुरुष :** आवेल्+जगा आवेल्जगा (चांगली जागा)

बिली+आम्बे बिली+आम्बे (पिकलेला आंबा)

**चतुर्थी तत्पुरुष :** जुजुला+चखान् जुजुलाचखान् (जळणासाठी लाकूड)

**षष्टी तत्पुरुष :** भुरि+उरा भुरिउरा (पक्ष्याचे घरटे)

**सप्तमी तत्पुरुष :** उस+कोरो उसकोरो (आजारी माणूस)

**ब. उपपद तत्पुरुष :** जेव्हा तत्पुरुष समासातील दुसरे पद ज्याचा वाक्यात स्वतंत्रपणे उपयोग करता येत नाही, अशा प्रकारच्या समासास उपपद किंवा कृदन्त तत्पुरुष समास असे म्हणतात. या तत्पुरुष समासातील परपद हे धातुसाधितरूप असते.

कमाय्+इठाक् कमाय्इठाक् (कामकरी)

केकेडा+इठाक् केकेडाइठाक् (बैलगाडी हाकणारा धुरकरी)

**क. कर्मधाराय तत्पुरुष :** ज्या समासातील दोन्ही पदे प्रथमा विभक्तीत असतात, तेव्हा त्यास कर्मधाराय तत्पुरुष समास असे म्हणतात. दोन्ही पदे एकाच विभक्तीत येत असल्यामुळे या समासास समानाधीकरण तत्पुरुष समान असेही म्हणतात. तत्पुरुष समासाच्या या प्रकारातील दोन्ही पदांचा परस्पर संबंध विशेषण विशेष्य किंवा उपमान उपमेय अशा स्वरूपाचा असतो.

**विशेषण पूर्वपद :** या समासातील पहिले पद विशेषण व परपद नाम असते.

ज्वान+टारे ज्वानटारे (तरुण अशी मुलगी)

**विशेषण परपद :** यात पूर्वपद नाम असते व परपद विशेषण असते. म्हणजेच नाम+विशेषण असा संयोग असतो.

अमास+दिन आमसदिन (अमावस्या)

**विशेषण उभयपद :** केन्डे+भोर् केन्डेभोर् (काळाशार)

निला+गार् निलागार् (हिरवाकंच)

**उपमान पूर्वपद :** चान्दो+म्वार् चान्दोम्वार् (चंद्रमुख)

**उपमान परपद :** म्वार्+चान्दो म्वार्चान्दो (मुखचंद्र)

**रूपक उभयपद :** या समासातील दोन पदांत रूपकात्मकता साधलेली असते.

ढेन्डेज्+गोमोज् ढेन्डेज्गोमोज् (चंद्र हाच देव)

बिन्ज्+गोमोज् बिन्ज्गोमोज् (साप हाच देव)

**ड. द्विगू तत्पुरुष समास :** द्विगू तत्पुरुष समासातील पहिले पद संख्याविशेषण असते व त्या सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा अर्थ दर्शविला जातो.

बारि+मेट् बारिमेट् (दोन डोळे)

बारि+धळकु बारिधळकु (दोन मजूर)

**क. अभ्यस्तता :**

रूपिमाची पुनरावृत्ती होऊन जो शब्द तयार होतो, त्याला अभ्यस्त शब्द म्हणतात. अभ्यस्त शब्दांच्या निर्मितीने भाषेतील शब्दसंग्रहात भर पडते. त्याहीपेक्षा बोलणाऱ्याच्या मनातील आशयाची परिणामकारकता, तीव्रता व्यक्त होते. कोरकू बोलीत अभ्यस्त शब्दांचे अवयवसंरचना, अर्थ व उपयोग यावरून पुढील प्रकार पडतात.

१. पूर्णाभ्यस्त २. अंशाभ्यस्त ३. अनुकरणवाचक शब्द

**१. पूर्णाभ्यस्त – मूळ रूपिम + अभ्यस्त रूपिम्**

पूर्णाभस्त शब्दात प्रतिपादिकाची जशीच्या तशी पुनरावृत्ती झालेली असते.

| | | | |
|---|---|---|---|
| नाम – | मिखोर्+मिखोर् | मिखोर्मिखोर् | (एकएक) |
| सर्वनाम – | चोच्+चोच् | चोच्चोच् | (कायकाय) |
| विशेषण – | उनि+उनि | उनिउनि | (नवनवीन) |
| क्रियापद – | सिगि+सिगि | सिगिसिगि | (थरथर कापणे) |
| अव्यय – | बगे+बगे | बगेबगे | (हळूहळू) |

**२. अंशाभ्यस्त शब्द**

अभ्यस्त शब्दात पूर्वप्रातिपादकाची अंशत: आवृत्ती झालेली असते. पूर्वप्रातिपादकातील स्वनिक परिसरानुसार पदाची आंशिक आवृत्ती होते. अभ्यासात कोणत्या स्वनिमाचा आदेश होतो यावरून अंशाभ्यस्त शब्दाच्या निर्मितीचे निरनिराळे रचनाप्रकार कोरकू बोलीत आढळतात. यापैकी काही रचनांमध्ये या बोलीतील बहुतेक सर्वच शब्द परावर्तित करता येतात, त्यांना सामान्य रचना असे म्हणतात व काही रचना विशिष्ट शब्दांनाच लागू पडतात, त्यांना विशिष्ट रचना असे म्हणतात.

**अ. सामान्य रचना :**

१. या रचनेत पूर्वप्रातिपदिकाच्या प्रारंभीचे व्यंजन व स्वर यांच्याऐवजी 'गि'चा आदेश होऊन अभ्यस्त शब्द तयार होतो. कोरकू बोलीतील बहुसंख्य नामे, सर्वनामे, विशेषणे, क्रियापदे आणि क्रियाविशेषणे या रचनेत परावर्तित करता येतात.

नाम : आटागिटा (जेवण वगैरे)

डामागिमा (पौसे वगैरे)

सर्वनाम : आमागिमा (तुझे वगैरे)

डिङ्गागिङ्गा (तिकडे वगैरे)

विशेषण : पुलुमगिलुम (पांढरा वगैरे)

आवेल्गिवेल् (चांगला वगैरे)

क्रियापद : आनुगिनु (पाजणे वगैरे)

जोजोम्गिजोम् (चांगला वगैरे)

अव्यय : टावेन्गिएन् (वर वगैरे)

सम्मान्गिम्मान् (पुढे वगैरे)

२. काही रचनांमध्ये प्रातिपदिकाच्या आद्यस्थानीय व्यंजनासोबतच्या 'अ, आ, ए' स्वरांऐवजी 'इ, उ' या स्वरांचा आदेश होतो.

| | | |
|---|---|---|
| काटा+कुटा | काटाकुटा | (जोरात हलवणे) |
| चका+चिका | चकाचिका | (इकडेतिकडे) |

**ब. विशिष्ट रचना :**

अभ्यस्त शब्दांमधील काही रचना विशिष्ट शब्दांपुरत्याच मर्यादित असतात. पूर्वप्रातिपदिकाच्या अर्थाशी समान असणारा किंवा त्या प्रादिपदिकाशी संबंधित दुसऱ्या प्रातिपदिक शब्दाचा आगम होऊन हा अभ्यस्त शब्द तयार होतो.

| | | |
|---|---|---|
| आराङ्गा+तुराङ्गा | आराङ्गातुराङ्गा | (शिळेपाके) |
| आरा+पाला | आरापाला | (भाजीपाला) |

**३. अनुकरणवाचक शब्द :**

स्पष्ट किंवा अस्पष्ट, वास्तविक किंवा काल्पनिक ध्वनींचे अल्पांशाने तरी अनुकरण करणाऱ्या म्हणजे त्या मूळ ध्वनीशी जुळणाऱ्या अभ्यस्त शब्दांना अनुकरणवाचक किंवा नादानुकारी शब्द असे म्हणतात. कोरकू बोलीत या प्रकारातील खालील शब्द आढळतात.

| | | |
|---|---|---|
| कोचोल+कोचोल | कोचोलकोचोल | (नारळातील पाण्याचा आवाज) |
| कुस+मुस | कुसमुस | (कुजबुज) |

**सर्वनामे :**

कोरकू बोलीत सर्वनामांचे वैविध्यपूर्ण प्रयोग पाहायला मिळतात. सर्वनाम हा बद्धछारिय वर्ग असून सर्वनामांची संख्या अतिशय सीमित आहे. नामांचा वारंवार होणारा वापर टाळण्यासाठी सर्वनाम ही पर्यायी व्यवस्था असते. कोरकू बोलीत सर्वनामांचे एकवचनी, द्विवचनी आणि अनेकवचनी रूपे सापडतात. नामांप्रमाणेच सर्वनामासाठी विभक्ती प्रत्यय व परसर्ग लागतात. विभक्तीप्रत्यय व परसर्ग लागताना मोजक्याच सर्वनामांचे सामान्यरूप होते. कोरकु बोलीत सजीव व निर्जीवांसाठी स्वतंत्र दर्शक सर्वनाम वापरले जाते. सर्व सर्वनामांची दोनही लिंगातील रूपे सारखीच असतात. म्हणजेच या बोलीत सर्वनामांना लिंगाचे विकार होत नाहीत.

**सर्वनामांचे वर्गीकरण :**

सर्वनामांचे पुढीलप्रमाणे पाच प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते.

१. पुरुषवाचक २. आत्मवाचक ३. दर्शक ४. प्रश्नकार्थक ५. अनिश्चित.

**पुरुषवाचक सर्वनामे :**

संभाषणाच्या दृष्टीने पुरुषवाचक सर्वनामाचे तीन घटक महत्त्वाचे आहेत.

१. वक्ता २. श्रोता ३. उल्लेखित व्यक्ती.

या तीनही वर्गातील नामांच्याबद्दल येणाऱ्या सर्वनामांना पुरुषवाचक सर्वनामे असे म्हणतात. बोलणारा स्वत:चा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो, ती प्रथम पुरुषवाचक, ज्याच्याशी बोलायचे त्याचा उल्लेख करताना जी सर्वनामे आपण वापरतो, ती द्वितीय पुरुषवाचक आणि ज्यांच्याविषयी बोलायचे त्या व्यक्ती व वस्तू यांचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो, ती तृतीय पुरुषवाचक सर्वनामे होय.

कोरकू बोलीत प्रथम, द्वितीय, तृतीय पुरुषवाचक सर्वनामे लिंगाच्या संदर्भात विनियोगक्षम नाहीत. मात्र सर्व पुरुषवाचक सर्वनामे वचनाला विनियोगक्षम असून त्यांची द्विवचनात व अनेकवचनात वेगवेगळी रूपांतरे होतात.

कोरकू बोलीत पुरुषवाचक वचन विकारांसह पुढीलप्रमाणे आहे.

| पुरुष | एकवचन | द्विवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| प्रथम | इन्ज् (मी) | आलनज् (आपण दोघे) | आबुन्/आबुन्ज् (आपण) |
| | | आलिन्ज् (आम्ही दोघे) | आले (आम्ही) |
| द्वितीय | आम् (तू) | आपिन्ज् (तुम्ही दोघे) | आपे (तुम्ही) |
| तृतीय | | | |
| सजीव | डिज् (तो, ती) | डिकिन्ज् (ते दोघे) | डिकु (ते) |
| निर्जीव | डि (ते) | डि | डि |

कोरकू बोलीत सामान्यपणे सजीवांच्या नामांच्या द्विवचनासाठी 'किन्ज्' आणि अनेकवचनासाठी 'कु' हा प्रत्यय लागतो. परंतु सर्वनामांच्या बाबतीत तृतीय पुरुषी सर्वनामांचा अपवाद वगळता प्रथमपुरुषी व द्वितीय पुरुषी सर्वनामांच्या द्विवचनासाठी व अनेकवचनासाठी अनुक्रमे 'किन्ज्' व 'कु' या प्रत्ययांचा वापर न होता स्वतंत्र संरचना स्वीकारल्या जातात.

**दर्शक सर्वनामे :**

वस्तूचा निर्देश करण्याकरिता जे सर्वनाम वापरले जाते, त्यास दर्शक सर्वनाम असे म्हणतात. कोरकू बोलीत सजीवांसाठी व निर्जीवांसाठी दर्शक सर्वनामांचा स्वतंत्रपणे प्रयोग केला जातो. शिवाय अतिनिकटत्व, निकटत्व, दूरत्व, अतिदूरत्व दर्शविण्यासाठीसुद्धा स्वतंत्र दर्शक सर्वनामांचा वापर केला जातो. अतिनिकटत्व दर्शक सर्वनामाद्वारे खूप जवळच्या वस्तूचा निर्देश केला जातो. निकटत्वदर्शक सर्वनामाद्वारे

जवळच्या वस्तूचा निर्देश केला जातो. दूरत्वदर्शक सर्वनामांद्वारे दूरच्या वस्तूचा निर्देश केला जातो. तर अतिदूरत्व सर्वनामाद्वारे खूप दूरच्या वस्तूचा निर्देश केला जातो.

कोरकू बोलीत दर्शक सर्वनामे लिंगाला विनियोगक्षम नाहीत. परंतु वचनाला मात्र विनियोगक्षम आहेत. सजीव व निर्जीव वस्तूंचा निर्देश करण्यासाठी एकवचनात खालील दर्शक सर्वनामाचा विनियोग केला जातो.

| | अतिनिकट | निकट | दूर | अतिदूर |
|---|---|---|---|---|
| सजीव<br>एकवचन | निज्<br>(हा) | इनिज्<br>(हा) | डिज्<br>(तो) | हुज्/हुजे<br>(हा) |
| द्विचन | निकिन्ज्<br>(हे दोघे) | इनकिन्ज्<br>(हे दोघे) | डिकिन्ज्<br>(ते दोघे) | हुकिन्ज्<br>(ते दोघे) |
| अनेकवचन | निकु<br>(हे) | इनिकु<br>(हे) | डिकु<br>(ते) | हुकु<br>(ते) |
| निर्जीव | नि<br>(हा) | इनि<br>(हा) | डि<br>(तो) | हाऽऽ/<br>हुऽऽ/होऽऽ<br>(तोऽऽ) |

कोरकू बोलीत काही स्थलवाचकदर्शक सर्वनामांचे वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग केले जातात. निकटत्वदर्शक नामाच्या अग्रस्थानी 'डि' किंवा 'डे' या रूपाचा प्रत्ययागम होऊन दूरत्वदर्शक सर्वनामांची निर्मिती होते.

इड्गा (येथे) डिड्गा (तेथे)

इफार् (असा) डिफार् (तसा)

**विशेषणे :**

नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करणाऱ्या शब्दास विशेषण म्हणतात. कोरकू बोलीत विशेषणे सामान्य रूप, लिंग व वचन यांच्यानुसार विनियोगक्षम नसतात. म्हणजे त्यांना रूपदृष्ट्या कोणतेही विकार जडत नाहीत. या बोलीत नामांच्या वस्तुवाचक निर्जीव रूपांना लिंग, वचन व सामान्यरूपाचे विकार लागत नसल्याने तीच व्यवस्था विशेषणांच्या बाबतीतही कायम राहते. तथापि, विशेषणांना रूपदृष्ट्या विकार लागत नसले तरी अर्थदृष्ट्या मात्र ते नामांची व्याप्ती मर्यादित करीत असल्याने विकार समजले जातात.

**विशेषणांचे कार्याधिष्ठित वर्गीकरण :**

विशेषणांचे वाक्यातील कार्यानुसार तीन प्रकार पडतात.

**अ. गुणविशेषणे :**

ज्या विशेषणांवरून नामांचा आकार, गुण, स्वभाव इत्यादींचे ज्ञान होते, त्या विशेषणांना गुणविशेषणे असे म्हणतात. त्यांची कोरकू बोलीतील खालील उदाहरणे देता येतील.

**आकार –** खाट् (मोठा), सनि (छोटा), पसा (रुंद), सक्ळा (अरुंद), साळा/पुरा (पूर्ण), पाळा (अर्धा), काचा (वाकडा), सर्का (सरळ).

**काल –** जुना (जुना), उनि (नवीन), टाटा (ताजा), आराङ्गा (शिळे), साना (म्हातारा), ज्वान् (तरुण).

**गुण –** आवेल् (चांगला), बुरा (वाईट), साजाका (चांगला), बाका (वाईट), भला (चांगला), खयराटि (दुष्ट), राव् (चांगला, योग्य), सरय् (वाईट, दुष्ट), भाम्रा (थंड), चर्का (गरम), रबाङ्ग् (थंड), सेडा (गरम),

**चव –** सिम्बिल् (गोड), कटिज् (कडू), खटा (आंबट), खारा (खारट)

**रंग –** केन्डे (काळा), पुलुम् (पांढरा), राटा (लाल), निला (हिरवा), काक्डा (उजळ), साव्ळा (सावळा)

**स्पर्श –** डाटो (राठ), मरम् (नरम), रबाङ्ग् (थंड), सेडा (गरम)

**ब. संख्याविशेषणे :**

नामाची संख्या दर्शविणाऱ्या विशेषणांना संख्याविशेषणे असे म्हणतात या बोलीत संख्याविशेषणांचे पुढील प्रकार पडतात.

१. गणनासूचक संख्या २. समुदायवाचक संख्या
३. प्रभागसूचक संख्या ४. क्रमवाचक संख्या
५. आवृत्तीवाचक संख्या ६. वितरणवाचक संख्या
७. अनिश्चित संख्याविशेषणे

**क्रियापदे :**

क्रियापद म्हणजे वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द. कोरकू बोलीत नामाप्रमाणेच क्रियापद हासुद्धा मुक्तद्वारीय वर्ग आहे. नामानंतर क्रियापद हा विकारक्षम शब्दांचा एक मोठा वर्ग आहे.

क्रियापदातील प्रत्ययरहित मूळ शब्द म्हणजे धातू होय. या धातूला विविध प्रकारचे प्रत्यय लागून क्रियापदाची साधना होत असते. धातूच्या प्रत्यययुक्त रूपांद्वारे काळ, अर्थ, क्रियाव्याप्ती, पुरुष, लिंग आणि वचन या व्याकरणिक क्रिया दर्शविल्या जातात. कोरकू बोलीत पुरुष आणि लिंगाचे विकार क्रियापदांना होत नाही.

कोरकू बोलीत अवयवसंरचनेवरून क्रियापदांचे तीन

प्रकार आढळतात.

१. एकावयवी क्रियापदे

२. द्विअवयवी क्रियापदे

३. त्रिअवयवी क्रियापदे

कोरकू बोलीत एकावयवी व द्विअवयवी क्रियापदे जास्त प्रमाणात आढळतात. तुलनेत त्रिअवयवी क्रियापदे अत्यल्प प्रमाणात आहेत.

**क्रियापदांचे प्रकार :**

कोरकू बोलीत क्रियापदांचे सकर्मक व अकर्मक असे दोन प्रकार आढळतात. अकर्मक क्रियापदांच्या तुलनेत सकर्मक क्रियापदांची संख्या अधिक आहे. काही अकर्मक क्रियापदांचे सकर्मक क्रियापदांमध्ये रूपांतर होताना मूळ क्रियापदाच्या अंत्यस्थानी स्वरपरिवर्तन किंवा प्रत्ययागम होतो.

**अकर्मक क्रियापदे :**

कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्त्यापाशीच थांबत असेल किंवा कर्त्याच्या ठिकाणी लय पावत असेल तर ते क्रियापद अकर्मक असते. कोरकू बोलीतील अकर्मक क्रियापदे पुढीलप्रमाणे आहेत.



सखा

आजोख (ऐकणे), इरा (परतणे), एवेर् (नेसणे), ओले (जाणे), कोळ् (वाकणे), गुजु/गो (मरणे), गिटिज् (झोपणे), जाम् (रडणे), टेड्गेन (उगवणे), डान् (असणे), थाड्  (असणे), पेडा (राहणे), बिड् (उठणे), रिन्ज् (विसरणे), लोकोम् (थकणे), हेजे (येणे), सबान् (बसणे), सेने (जाणे).

**सकर्मक क्रियापद :**

आबुड्ग (धुणे), आपराड्ग् (भांडणे), आवरेज् (झाडणे), इटि (उघडणे), एन्डा (वाढणे), उम्ना (मोजणे), उट् (गिळणे), ओडेज् (ओढणे), किठा (नांगरणे), खाप् (चावणे), गेडेज् (कापणे), घल (दाखविणे), जोलोम् (सारवणे), टेथेर् (रागावणे), डो (पाहणे), तथाड् (थांबवणे), धिकूलि (ढकलणे), निजे (उघडणे).

**सामान्य क्रियापदे :**

प्रतिपादिक+प्रत्यय

कोरकू बोलीत धातूला केवळ वचन, काळ व अर्थ यांचे प्रत्यय लागतात. या बोलीतील धातूला पुरुष व लिंग यांचे प्रत्यय लागत नाही. वाक्यातील सामान्य क्रियापद वाक्याचा अर्थ पूर्ण करीत असते. या बोलीतील सामान्य क्रियापदावर फक्त कर्त्याच्या काळ व अर्थ यांचाच प्रभाव पडतो. वाक्यातील कर्त्यांचा वचनाचा परिणाम क्रियापदावर होत नाही. सजीव कर्माच्या वचनाचा प्रभाव मात्र क्रियापदावर पडतो. निर्जीव कर्माच्या वचनानुसार क्रियापद प्रभावित होत नाही. वाक्यातील कर्त्याच्या काळाचा परिणाम क्रियापदावर होतो. साधा वर्तमानकाळ व साधा भविष्यकाळ यात क्रियापदांचे व त्यांना लागणाऱ्या प्रत्ययांचे रूप समान असते. साध्या भूतकाळात क्रियापदांना विविध प्रकारचे प्रत्यय लागतात. बरेचदा क्रियापदाच्या रूपावरून काळाचा बोध न होता आज्ञा, विनंती, उपदेश, कर्तव्य या बोलणाऱ्याच्या मनातील हेतूचे सूचन होते.

**वचनप्रक्रिया :**

कोरकू बोलीत वाक्यातील क्रियापदे सजीव कर्त्याच्या वचनाप्रमाणेच बदलतात. कर्त्याच्या वचनाने वाक्यातील क्रियापद प्रभावित होत नाही. वाक्यातील कर्माच्या वचनाप्रमाणे बदलणाऱ्या क्रियापदाचा वावर प्रत्यक्ष बोलीरूपात अत्यल्प प्रमाणात आढळतो. वाक्यातील सजीव कर्म द्विवचनी असल्यास क्रियापदास 'किन्ज्' या द्विवचनी प्रत्ययाचा विकार होतो व कर्म अनेकवचनी असल्यास 'कु' या बहुवचनी प्रत्ययाचा विकार होतो. उदा :

एकवचन – एनिज् म्या सिटा टाखा (हा एक कुत्रा आहे).

द्विवचन – इनिज् बरि सिटाकिन्ज् टाखाकिन्ज् (हे दोन कुत्रे आहेत).

अनेकवचन – इनिज् सिटाकु टाखाकु (हे कुत्रे आहेत).

**काळ –**

वाक्यातील क्रियापदावरून क्रिया कोणत्या काळात घडत आहे याचा जो बोध होतो, त्यास काळ असे म्हणतात. कोरकू बोलीतही वाक्यांतर्गत येणाऱ्या क्रियापदावरून क्रिया कोणत्या काळात सुरू आहे याचा

बोध होतो. साध्या वर्तमानकाळ व साध्या भविष्यकाळात क्रियापदांची रूपे समान असतात. साध्या भूतकाळासाठी व काळाच्या पोटभेदांसाठी स्वतंत्र प्रत्यय वापरले जातात.

साधा वर्तमानकाळ, साधा भूतकाळ व साधा भविष्यकाळ यांच्यासाठी सामान्य क्रियापदाचा उपयोग केला जातो. काळाचे प्रमुख तीन प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१. साधा वर्तमानकाळ २. साधा भूतकाळ

३. साधा भविष्यकाळ

**१. साधा वर्तमानकाळ व साधा भविष्यकाळ :**

कोरकू बोलीतील साध्या वर्तमानकाळी व साध्या भविष्यकाळी रूपांना 'बा' हा प्रत्यय लागतो. साध्या वर्तमान व साध्या भविष्यकाळातील क्रियापदांची रूपे लिंग, वचन व पुरुष निरपेक्ष असतात. तसेच अकर्मक व सकर्मक या दोन्ही प्रकारांत क्रियापदांची रूपे समान असतात.

इन्ज् सेनेबा (मी जातो/मी जाईन)

डिज् सेनेबा (तो जातो/तो जाईल)

आले सेनेबा (आम्ही जातो/आम्ही जाऊ)

**२. साधा भूतकाळ :**

कोरकू बोलीत साधा भूतकाळ असताना मूळ क्रियापदाला खालील विविध प्रकारचे प्रत्यय लागतात. साध्या भूतकाळातील क्रियापदांची रूपे लिंग, वचन व पुरुष निरपेक्ष असतात.

न्/एन्/येन्

| | | |
|---|---|---|
| इन्ज् ओलेन् | (मी गेलो) | ओले+न् |
| डिज् ओलेन् | (तो गेला) | ओले+न् |
| आले आजोमेन् | (आम्ही ऐकले) | आजोम्+एन् |
| आपे आजोमेन् | (तुम्ही ऐकले) | आजोम्+एन् |

**क. संयुक्त क्रियापदे :**

सामान्य क्रियापद आणि साहाय्यक क्रियापद यांच्या संयोगाने बनलेल्या क्रियापदाला संयुक्त क्रियापद असे म्हणतात. वाक्यातील क्रिया पूर्ण आहे किंवा अपूर्ण आहे किंवा दीर्घकाळ चालणारी आहे, या आधारावर कोरकू बोलीतील वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ यांचे पुढील पोटभेद पडतात.

१. अपूर्ण वर्तमानकाळ : इन्ज् सेनेलाक्केन् (मी जात आहे). आले सेनेलाक्केन् (आम्ही जात आहोत).

२. अपूर्ण भूतकाळ : इन्ज् सेनेलाक्केन् डान् (मी जात होतो). आले सेनेलाक्केन् डान् (आम्ही जात होतो).

३. अपूर्ण भविष्यकाळ : इन्ज् सेनेलाक्केन् होङ्गा (मी जात असेन). आले सेनेलाक्केन् होङ्गा (आम्ही जात असू).

४. पूर्ण वर्तमानकाळ : इन्ज् ओलेन् (मी गेलो). आले ओलेन् (आम्ही गेलो)

५. पूर्ण भूतकाळ : इन्ज् ओलेन् डान् (मी गेलो होतो). आले ओलेन् डान् (आम्ही गेलो होतो).

६. पूर्ण भविष्यकाळ : इन्ज् ओलेन् होङ्गा (मी गेलो असेन). आले ओलेन् होङ्गा (आम्ही गेलेलो असणार).

७. रीती वर्तमानकाळ : इन्ज् सेनेलाक्केन् डा (मी जात असतो). आले सेनेलाक्केन् डा (आम्ही जात असतो).

८. रीती भूतकाळ : इन्ज् सेनेलाकुडा (मी जात असे). आले सेनेलाकुडा (आम्ही जात असू).

९. रीती भविष्यकाळ : इन्ज् सेनेबाले (मी जात जाईन). आले सेनेबाले (आम्ही जात जाऊ).

**अव्यये :**

अव्यय ही अविकारी शब्दजाती आहे. कोरकू बोलीत पुढील चार प्रकारची अव्यये आढळतात.

**अ. क्रियाविशेषण अव्यये :**

१. कालदर्शक : आय (आता), गाफाङ्ग् (उद्या), टेन्ज् (आज).

सिंङ्गरूप (संध्याकाळी), एटा (पुढील), डिफीन् (पूर्वी).

२. सातत्यदर्शक : राटोभर (रात्रभर), जेन्मभर (जन्मभर), हर्टेम् (नेहमी).

३. आवृत्तीवाचक : लय्का (पुष्कळ), रोजुका (दररोज), एठा (पुन्हा).

४. स्थितिदर्शक : एङ्गा (येथे), डिङ्गा (तेथे), एङ्गान् (इकडे), डिङ्गान् (तेथे), इटा (खाली), मेरान् (जवळ).

५. गतिवाचक : एङ्गान्टेन् (येथून), ङ्गिान्टेन् (तेथून), टावटेन् (मागून).

**ब. उभयान्वयी अव्यये :**

दोन किंवा अधिक शब्दांना अथवा वाक्यांना जोडणाऱ्या अविकारी शब्दांना उभयान्वयी अव्यये असे म्हणतात. कोरकू बोलीत पुढील उभयान्वयी अव्यये आढळतात.

१. समुच्चयबोधक : डो – म्या साना डो सानि डान (एक म्हातारा आणि म्हातारी होती).

२. विकल्पबोधक : या – म्या सिटा या बारि सिटाकिन्ज् (एक कुत्रा किंवा दोन कुत्रे).

बान्मका – आम् उरान् सेने बान्मका इन्ज् सेनेबा (तू घरी जा नाहीतर मी जातो).

३. न्यूनत्वबोधक : पेने – इन्ज् कुलाके बान् हिग्रा ; पेने बानाकेन् हिग्राबा (मी वाघाला घाबरत नाही ; अस्वलाला घाबरतो). मका – मेटे राजा इङ्गान् उङ्गान् गावेन् पोज्या

डोके; मका डिजे परन्देन् का हेज्डुन् (नंतर राजाने इकडच्यातिकडच्या गावात मुलगा शोधला; परंतु त्याला पसंत आला नाही).

४. परिणामबोधक : लाका – डिज्खे आटा जोजोमा बान् जिडुन लाका डिज् ओलेन् (त्याला जेवण दिले नाही म्हणून तो गेला).

डेमारे – इन्ज्खे खिटि कामायेन् ड्याएन् डेमारे उरान् हेज डुन्का (मला शेताच्या कामात उशीर झाला त्यामुळे घरी आलो नाही).

**क. शब्दयोगी अव्यये :**

दोन शब्दांचा संबंध जोडण्याचे कार्य करणाऱ्या व शब्दाला जोडून येणाऱ्या अव्ययांना शब्दयोगी अव्यये म्हणतात. नामाला किंवा सर्वनामाला विभक्ती प्रत्ययांऐवजी शब्दयोगी अव्यये लावण्याची पद्धत कोरकू बोलीतसुद्धा आढळते.

१. कालवाचक : मेटेन् (नंतर), बादोन् (नंतर), लागा (पासून), सुटु (आधी).

२. स्थानवाचक : इटा (खाली), एटा (पुढे), टला (आत), टाव (मागे).

३. गतिवाचक : लिएटेन् (वरून), इटाटेन् (खालून), मेराटेन् (जवळून), सम्माटेन् (समोरून).

४. हेतुवाचक : घल्या/घल्जया (साठी/करिता).

५. कारकवाचक : मारे (मुळे).

६. व्यतिरेकवाचक : सिवाय् (शिवाय).

७. तुलनात्मक : टेन्, बेदला (पेक्षा).

८. योग्यतावाचक : खिजा (सारखा), ओङ्गो (सारखा).

९. संग्रहवाचक : बि/भि.

१०. संबंधवाचक : बारेन् (विषयी).

११. साहचर्यवाचक : टिन् (बरोबर), सङ्गो (सोबत).

**ड. केवलप्रयोगी अव्यये :**

जी अव्यये वक्त्याच्या मनातील सहजस्फूर्त भावनांचे प्रकटीकरण करतात, त्यांना केवलप्रयोगी अव्यये असे म्हणतात. कोरकू बोलीत केवलप्रयोगी अव्ययांचे वर्गीकरण त्यांच्या भावनांवरून केले जाते.

१. हर्षदर्शक : हे माऽ (हे माय) अहा (अहाहा)

२. शोकदर्शक : हे माय्ऽऽ (आई ग) ए भगवान् (अरे देवा)

३. आश्चर्यदर्शक : हॉ आऽ (असं) सच्चो का (खरंच)

४. संमतीदर्शक : हे (हां) साजाम्का (बराय) हा आ (ठीक आहे)

५. प्रशंसादर्शक : साब्बास(शाब्बास) वाऽ (वा)

६. विरोधदर्शक : हुऽळ (हुड्) चुच्याबि (काहीच)

७. तिरस्कारदर्शक : हुऽट् (शी) थुऽ (थू)

८. संबोधनदर्शक : हाला(अगं, अहो) ऐऽअइऽ (ऐ अरे)

९. मौनदर्शक : कटाम् (चूप) किळिङ्ग (चूप).

**वाक्यविचार :**

कोरकू बोलीत वाक्यात नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियाविशेषण व क्रियापद या शब्दजातींचा अंतर्भाव असतो. वाक्यात क्रियापद हा घटक मुख्य असतो. सामान्यत: कर्ता, कर्म, क्रियापद या अनुक्रमाने वाक्याची रचना साधली जाते. विशेषण हे नामापूर्वी येते तर क्रियाविशेषण हे क्रियापदापूर्वी येते. क्रियापद वाक्याच्या शेवटी स्थानापन्न झालेले असते. वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या लिंग, वचन, पुरुषाप्रमाणे बदलत नाही. कर्माच्याही केवळ वचनाचाच प्रभाव क्रियापदावर पडतो. वाक्याचे उद्देश व विधेय असे पृथक्करण करता येते. उद्देशात नाम, सर्वनाम, विशेषण यांचा समावेश होतो. तर विधेयात क्रियापद व क्रियाविशेषणाचा अंतर्भाव होतो. वाक्यांत रूपिका शब्द, पदबंध व उपवाक्य या विविध पातळीवरच्या रचना आढळतात. पैकी शब्दांचे विवेचन रूपविचारात आलेले आहेत.

**प्रयोगविचार :**

कोरकू बोलीत नामपदबंधाचा क्रियापदपदबंधाशी सुसंवाद नसतो. वाक्यातील कर्त्याच्या लिंग, वचन पुरुषाप्रमाणे क्रियापद बदलत नाही. त्यामुळे कोरकू बोलीत कर्तरी प्रयोग संभवत नाही. कर्माच्या लिंग व पुरुष यांचाही प्रभाव क्रियापदावर पडत नाही. वाक्यातील केवळ सजीव कर्माच्या वचनाचा प्रभाव क्रियापदावर पडून कोरकू बोलीतील त्रिवचनांचे प्रत्यय क्रियापदाला लागतात. वाक्यातील सर्व सजीव कर्म एकवचनी असल्यास मूळ क्रियापदास 'नेज्/खेनेज्', कर्म वचनी असल्यास 'किन्ज्' आणि कर्म अनेकवचनी असल्यास 'कु' हा प्रत्यय लागतो. कर्मणी प्रयोग वाक्यातील सजीव कर्माच्या रूपांपुरताच सीमित असतो. म्हणजेच कोरकू बोलीतील बहुतांश क्रियापदे भावे प्रयोगात वावरणार असतात.

पुल्लिंगी – राम् इस्कुलेन् ओलेन् (राम शाळेत गेला).

स्त्रीलिंगी –सिता् इस्कुलेन् ओलेन् (सिता शाळेत गेली).

प्रथमपुरुषी –इन्ज् इस्कुलेन् ओलेन् (मी शाळेत गेलो).

तृतीयपुरुषी – आम् इस्कुलेन् ओलेन् (तू शाळेत गेला).

तृतीयपुरुषी –डिज् इस्कुलेन् ओलेन् (तो शाळेत गेला).

अनेकवचनी – डिकु इस्कुलेन् ओलेन् (ते शाळेत गेले).

**वाक्यांचे अर्थाधिष्ठित प्रकार :**

कोरकू बोलीत वाक्यांचे अर्थाधिष्ठित प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१. होकारार्थी : आमा जिमु चोज्? (तुझे नाव काय?), इनिज् सिटा (हा कुत्रा आहे).

२. नकारार्थी : इन्ज् कुलाके बान् हिगरा (मी वाघाला घाबरत नाही), इन्जेन् आयोम् बान् (मला आई नाही).

३. विधानार्थी : इया बोका इस्कुलेन् सेनेबा (माझा भाऊ शाळेत जातो).

४. प्रश्नार्थी : चोज्? (काय?), जे? (कोण?), चोटो? (किती?), टोने? (कोणता?), चोफार? (कसा?).

५. आज्ञार्थी : इङ्गन् हेजे (इकडे ये), डिजा जिमु कोम्बराये (त्याचे नाव विचार).

**वाक्याचे रचनेनुसार प्रकार :**

कोरकू बोलीत वाक्यांचे रचनेच्या आधारे तीन प्रमुख प्रकार पडतात.

**१. केवल वाक्य :**

ज्या वाक्यात एकच उद्देश व एकच विधेय असते, त्या वाक्याला केवल वाक्य असे म्हणतात.

उदा- डोमा इस्कुलेन् ओलेन् (डोमा शाळेत गेला), सिटा मिनुलेन् भुभुबा (कुत्रा मांजरीवर भुंकतो).

**२. संयुक्त वाक्य :**

ज्या वाक्यात एकापेक्षा अधिक समान दर्जा असणारी उपवाक्ये प्रधानबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात, त्या वाक्यास संयुक्त वाक्य असे म्हणतात. उपवाक्ये कोणत्या अव्ययांनी जोडली जातात, यावरून संयुक्त वाक्याचे प्रकार पडतात.

१. समुच्चबोधक : डो (आणि).

२. विकल्पबोधक : या (किंवा), कि (कि), बानमका (नाहीतर).

३. न्यूनत्वबोधक : पेने/फेने (परंतु), लेकिन (पण), मका (पण).

४. परिणामबोधक : लाका (म्हणून), डिमारे (त्यामुळे), डिकालाका (त्यासाठी).

**३. मिश्र वाक्य :**

एक प्रधान वाक्य व एक किंवा अधिक गौणवाक्ये गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडून जे संमिश्र वाक्य तयार होते, त्यास मिश्र वाक्य असे म्हणतात. कोरकू बोलीत गौणत्वबोधक अव्ययांचा वापर मिश्र वाक्यात केला जातो.

१. कारकबोधक : चोजाकि (कारणकी)

२. स्वरूपबोधक : कि (की)

३. संकेतबोधक : कि/टासो (क)

भौगोलिकदृष्ट्या कोरकूंच्या वसाहती ह्या हिंदी आणि मराठीभाषक प्रांताच्या सीमावर्ती क्षेत्रात असल्याने कोरकू आणि गोंडी व तत्सम् आस्ट्रिक आणि द्राविडी भाषेतील मूर्धन्य ध्वनींचा प्रभाव आर्यभारतीय भाषांवर जसा पडला, तसाच या भाषिक संपर्कामुळे मराठी, हिंदी आणि पुढे इंग्रजांच्या अधिपत्यामुळे इंग्रजी भाषेतील असंख्य शब्द कोरकू बोलीनेही आत्मसात केलेले आहेत.

दळणवळणाच्या सुविधा, शिक्षण, नोकरी आणि प्रसारमाध्यमे यामुळे कोरकूंच्या नवीन पिढीच्या बोलण्यात हिंदी व महाराष्ट्रातील मेळघाटात सर्व शासकीय, प्रशासकीय कारभार व शिक्षण मराठीत असल्याने पुरुषांच्या व शिक्षण घेत असलेल्या नवीन पिढीच्या बोलण्यात मराठी शब्दांचा वापर व्हायला लागलेला आहे.

कोरकू बोलीच्या भाषाशास्त्रीय संशोधनाच्या निमित्ताने निरनिराळ्या शाळांमधील विद्यार्थ्यांशी संपर्क साधल्यावर एक आश्चर्यकारक गोष्ट समोर आली. ती म्हणजे कोरकूभाषक विद्यार्थी मराठी हिंदी भाषांपेक्षा इंग्रजीचे उच्चारण अधिक शुद्ध व स्पष्ट रूपात करतात. कोरकू बोलीतील बिन्ज्, टिन्ज्, खोन्ज्, कोन्ज्, आबुन्ज्, आपिनज्, आलिन्ज्, किन्ज्, किळिन्ज्, तिळिन्ज्, सिरिंन्ज्, इफटिन्ज् या शब्दांच्या अंत्यस्थानी येणारे न्ज् व रोङ्ग, आबुङग्, लाङ्ग, गाफाङग् या शब्दांच्या अत्यंस्थानी ङ्ग्ग या रूपांचे उच्चारण इंग्रजीतील वर्तमानकाळी इन्ज् प्रत्ययासारखे आहे. पुन्हा पुन्हा येणाऱ्या या शब्दांमुळे व त्याच्यातील उच्चार साधर्म्यामुळे कोरकूभाषक विद्यार्थी मराठी भाषेपेक्षा इंग्रजी भाषा अधिक लवकर आत्मसात करतात.

आस्ट्रिक भाषापरिवाराच्या मुंडा या गटातील पश्चिमेकडील बोली म्हणून कोरकूंची ओळख आहे. मौखिक परंपरांच्या व भाषिक संदेशनाच्या पातळीवर अत्यंत समृद्ध असणाऱ्या या बोलीचे भवितव्य मात्र धोक्यात आलेले आहे. नागरीकरणाच्या संपर्काने कोरकूंच्या मनातही आपल्या बोलीविषयीचा न्यूनगंड तयार व्हायला लागलेला आहे. तो दूर करण्यासाठी मौखिक परंपरांचे संकलन, भाषिक संशोधन करून त्यांना समाज, संस्कृती व स्वभाषेचे आत्मभान करवून देणे गरजेचे आहे.

**– डॉ. काशीनाथ बऱ्हाटे**

बोलीभाषा विशेषांक

## लेख

# आदिवासी पावरा समाज आणि पावरी बोलीभाषा

**संतोष पावरा**

**महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश या परिसरात मोठ्या प्रमाणावर असलेल्या आदिवासी, भिल्लसमाजाबरोबर पावरा समाजातील लोकांची वस्ती आहे. निसर्गपूजक पावरा समाजाची लोकपरंपरा, मौखिक साहित्य आणि जीवनमूल्यांची समृद्ध संस्कृती आहे. पावरासमाजाची स्वतंत्र ओळख अजूनही उजेडात नाही ही वास्तविकता आहे. पावरा हा पावागडच्या वस्तीत राहणारा समाज म्हणजे पावरासमाज.**

### आदिवासी पावरा समाज :

आदि + वासी या शब्दापासून 'आदिवासी' शब्दाची व्युत्पत्ती झालेली आहे. त्यामुळे आदिवासीसमाजाची खरी ओळख आपल्याला 'आदिवासी' या शब्दावरूनच स्पष्ट होऊन जाते. आदिवासी हा धर्मपूर्व समाज आहे. ज्यावेळी कुठलीही जात,पात धर्म, पंथ, पार्टी, पक्ष नव्हते, तेव्हापासून आदिवासी आपल्या संस्कृतीला पाया मानून जीवन जगत आहे. आदिवासींची संस्कृती निसर्गपूजक आहे. ज्यात समता, बंधूता, प्रेम, विश्वास, श्रम, समूह सहकार्य अशी मानवी जीवनमूल्य व निसर्गजतन, संवर्धनाची शिकवण आहे. पण भोगवादी, भांडवली व्यवस्थेने जल, जंगल जमिनीवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केल्याने निसर्गाची मोठी हानी होत आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाला ओरबाडून ठेवले आहे. त्यामुळे निसर्गजतन, संवर्धनासाठी आदिवासीसंस्कृती जतनसंवर्धन करणे आवश्यक आहे असे जगभरातल्या तत्त्ववेत्त्यांचे मत आहे.

भारतात एकूण ४६१ आदिवासीजमाती आहेत. भिल्ल, गोंड, मुंडा, संथाल अशी अनेक प्रमुख आदिवासीजमाती सर्वांना परिचित आहेत.

महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेशच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर आदिवासी लोकांची वसाहत आहेत. सातपुडा पर्वत, तापी-नर्मदाच्या आश्रयात भिल्लसमाज वास्तव्यास आहे. ह्याच परिसरात आदिवासी पावरासमाजही मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास आहे. निसर्गपूजक पावरासमाजाची लोकपरंपरा, मौखिक साहित्य आणि जीवनमूल्यांनी समृद्ध संस्कृती आहे. पण पावरा समाजाची स्वतंत्र ओळख अजूनही उजेडात नाही ही आजची वास्तविकता आहे. याला काही कारणे आहेत ती समजून घेतली पाहिजे.

प्राचीन काळापासून पावरा समाजाची समृद्ध जीवनव्यवस्था होती. मध्यवर्ती 'डाब' राज्याचे सत्ताधारी केंद्र होते. त्याकाळी निंबाड प्रांतात केलासन, रेल्या कोबाड्या, कुंबाय कुंदूराणा असे पावरा राज्यकर्ते होऊन गेले. हे आपल्याला अनेक प्राचीन कथा, गीतं, गायन यांच्यावरून लक्षात येते. ग्रीक तत्त्वज्ञ सोपक्लस यांच्या नाटकासारख्या अनेक कथा पावरा समाजात आजही प्रचलित आहे. म्हणजे अतिप्राचीन काळीदेखील आदिवासी पावरा बोलीभाषा, ज्ञान, साहित्य परंपरा चांगल्या पद्धतीने समृद्ध होती असे दिसते.

राजस्थान 'मेवाड'चा राजा महाराणा प्रतापला १६७६च्या हल्दीघाट लढाईत भील योद्ध्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली होती. लढाईच्या शेवटी राणा प्रतापला जंगलाचे आश्रय घ्यावे लागले. त्यावेळीही खूप काळपर्यंत भिल्लांनी राणा प्रतापला आश्रय दिला. त्यांना संरक्षण दिले. त्यामुळे भिल्लाचे शौर्य आणि मदतीच्या वृत्तीने महाराणा प्रताप खूश होऊन आपल्या राज्यात जहागिरी,

इमानदार अशा अनेक महत्त्वाच्या पदव्या त्यांनी आदिवासींना बहाल केल्या. भिल्लशौर्याच्या गौरवार्थ मेवाड राज्याच्या राजशिक्यावर एका बाजूला महाराणा प्रताप आणि दुसऱ्या बाजूला शौर्यवीर पुंजा भीलची प्रतिमा होती. त्या काळी भिल्लासोबत पावरा योद्धेही निश्चितच होते आणि त्या आधीच्या काळातही होते; पण त्यांना पावरा म्हणून नाही तर भिल्ल म्हणूनच उल्लेख होत असेल असे लक्षात येते.

महाराणा प्रताप यांच्यानंतर अनेक राज्यकर्ते मेवाड, उदेपूर संस्थानात राज्य करून गेले. त्यानंतर इतर राजपूत, मोगलाई राज्यकर्त्यांनी आदिवासींवर खूपच अन्याय अत्याचार केले. ते आदिवासींना कमी लेखू लागले. जबरदस्तीने धर्म परिवर्तन करू लागले. विषमता निर्माण होऊ लागली. अमानुषरीत्या आदिवासींवर छळ होऊ लागले. सुंदर बाया, तरुण मुलींची अब्रू लुटली जात होती. शेवटी आदिवासींनी तेथून पलायनाचा रस्ता स्वीकारला.

राजस्थानच्या मेवाड, पाल परिसरातून मोठ्या प्रमाणावर आदिवासी लोकांनी पलायन करून सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला. काही गुजरात राज्यातील पंचमहल जिल्ह्यातील हलोल तालुक्यातील परिसर, सापनेर डोंगरी किल्ला म्हणजे पावागड येथे वास्तव्यास आले. पावागडच्या परिसरात या लोकांनी वास्तव्यास सुरुवात केली. या जुल्मी राज्यकर्त्यांपासून ते आपली ओळख लपवून राहू लागले. पाल आणि पावागड परिसरात अनेक काळ वास्तव्य असल्यामुळे या समाजाला नंतरच्या काळी 'पावरा' असे म्हणून ओळखू लागले.

महाराष्ट्रात एकूण ४५ आदिवासी जमाती आहे. भारतीय संस्कृतिकोशातील खंड ५मध्ये पावरा समाजाचा अर्थ दिलेला आहे, त्यात–

पावरा शब्दाची फोड अशी केलेली आहे.

पा + व + रा =पावरा

पा– पावागडच्या

व– वस्तीत

रा–राहणारा समाज म्हणजे पावरा.

अनुसूचित जाती–जमाती हुकूम सुधारणा कायदा १९७६च्या १०८ परिशिष्ट १मधील ९मध्ये भिल्ल आदिवासी जमातीचा उल्लेख आहे. त्यात काही भिल्लांच्या उपजमाती आहेत. त्यातील एक जमात म्हणजे आदिवासी पावरा जमात होय. पावरासमाजाची कुलदेवी 'गिरहण' माता आहे. पावरासमाज म्हणजे भिल्लांची उपजमात आहे असे सरकारी कागदपत्री आणि अनेक साहित्यात नमूद असले तरी पावरा ही भिल्लांची समकालीन आदिवासी जमात असल्याचे पावरातज्ज्ञ, जाणकार यांचे मत आहे.

खान्देशातील धुळे, नंदुरबार, जळगाव जिल्ह्यात मोठ्या संख्येने पावरासमाज वसलेला आहे. तसेच मध्यप्रदेशातील खरगोन, पानसेमेल, बडवानी, धार, इंदौरसारख्या शहरात पावरासमाजाचे वास्तव्य आहे. इंदौर जिल्ह्यातील गुण हा तालुका पूर्वेकडील पावरा लोकांच्या वास्तव्याचे शेवटचे ठिकाण असे समजले जाते. गुजरात आणि मध्यप्रदेशच्या मध्यभागी सातपुडा परिसरात वास्तव असणाऱ्या आदिवासी पावराला 'पाल्या' असे म्हणतात. तर धडगाव, सातपुडा परिसरात वास्तव असणाऱ्या पावराला बारवट्या असे म्हणतात. बारे म्हणजे दरी अर्थात डोंगरदऱ्यात राहणारे 'बारे' यांनाच बारवट्या असे संबोधले जाते. नर्मदा नदीकाठच्या लोकांना 'नोंददोड्या' असेही म्हणतात. सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या पावरासमाजाला 'देहवाव्या / देहवाल्या' म्हणून ओळखले जाते. तसेच बारे अक्राणी परिसरातील भादल गावाहून स्थलांतर होऊन मध्यप्रदेशच्या परिसरात वसलेल्या काही लोकांना भादेला आणि राठ्वा असेही म्हणतात. मध्यप्रदेशाच्या घाटमध्यावर राजेराजवाडे होते त्या परिसरात वसलेल्या लोकांना 'राजवाड्या' म्हणतात तर 'निंबाड' परिसरात असलेल्या आदिवासींना 'निंबाड्या' असे म्हणतात. 'गुण' परिसरातील पावरा समाजाला 'ऊलकूऱ्या' असे म्हणतात.

अशा प्रकारे स्थान / काम / आणि त्यांची विशेषता यावरून त्या प्रकारची उपमा असल्याचे दिसत असले तरी सर्वांची ओळख म्हणून महाराष्ट्रातील आदिवासी पावरा हे 'पावरा' म्हणून आणि मध्यप्रदेशातील पावरा 'बारेला' म्हणून ओळखले जातात.

**आदिवासी पावरा बोली :**

आदिम बोलीत मौखिक साहित्याचा खजिना आहे आणि मौखिक साहित्य हे विश्वसाहित्याचा पाया. कोणत्याही बोलीभाषेतून विचारांचे, भावनांचे आदानप्रदान होते. म्हणजे ती बोली आईच्या दुधाइतकीच पवित्र आणि सुसंस्कृत असते. कारण त्या बोलीभाषेत त्या संपूर्ण समाजाचे अस्तित्व, अस्मिता सामवले असते. वाचिक साहित्य, संस्कृती, रूढी व परंपरा, म्हणी, उखाणे, कथा, गीत इतकेच नाही तर संपूर्ण जीवन सामावलेले असते. बोली संपुष्टात येणे म्हणजे त्या त्या समाजाचे पूर्ण अस्तित्व नाहिसे होते. म्हणून घरातूनच बोलीभाषेचे संस्कार बालमनावर

रुजवले गेले पाहिजे. त्या त्या बोलीतील मौखिक साहित्य जपले पाहिजे. बोलीत साहित्यलिखाण केले पाहिजे.

आदिवासीत समूहजीवनाची परंपरा आहे. आदिवासी समूहाने नाचतो, गातो, कोणतेही कामदेखील समूहाने केले जाते. शिकार करणे, फळं गोळा करणे, घर बांधणे, शेत करणे अशी अनेक कामं, सण-उत्सवातही समूहाला महत्त्व आहे. आदिवासीजीवन अगदी निर्मळ आहे. निसर्ग आणि मानवी जीवनावरील प्रेम शुद्ध आहे. हे आपल्याला आदिवासीपरंपरेतील अनेक गीत, कथेवरून सहज लक्षात येते.

आदिवासी पावरा समाजाच्या बोलीभाषेला 'पावरी बोली' असे म्हणतात. स्थानपरत्वे विविध नावाने पावरा समाज ओळखला जातो, तसे बोलीच्या बाबतीतही आहे. लयीत आणि त्या त्या परिसराच्या अनुषंगाने तेथील जीवनाच्या प्रभावाने पावरी बोलीतही थोडाफार बदल जाणवून येतो. अस्सल पावरा बोली भाषा खूपच मवाळ, संथ आणि अलंकारिक आहे.

उदाहरण :

● आपू माणहे से मोलवडान होच काह जीवे?

(माणसाने माणसासारखेच वागले पाहिजे. मांडूळसारखी नियत ठेवून कशाला जगायचं?)

● काचलो माह दुखणेह वार नी लागतलो. पाकला पानोन होच जीवन यो.

(हाडामासाच्या शरीरास हे दुख यायला वेळ लागला नाही. पिकलेल्या पानासारखे जीवन केव्हा गळून पडेल काही सांगता येत नाही.)

● वडोन पान पिपवोह नी लागावडू ने, पिपवोन पान वडोह नी.

(निसर्गनियमाविरुद्ध कुठलेच कार्य करायला नको. वड़ाचे पान पिंपळाच्या झाडावर लावू नका आणि पिंपळाचे पान वडाला लावू नका.)

जसे गीत, कथांमध्ये पावरी बोलीभाषेचा उपयोग होतो, तसेच शब्द पावरी बोलीतून वापरात येतात; पण आज वेगवेगळे प्रवाह आणि आधुनिकीकरणाच्या युगात पावरी भाषेवर मोठ्या प्रमाणात मराठी, हिंदी, गुजराती, आणि राजस्थानी भाषेचा प्रभाव झालेला दिसून येतो. पावरी बोलीभाषेला वेगवेगळ्या परिसरात पुढीलप्रमाणे ओळखले जाते. १) बारवटी, २) देहवावी, ३) पाली, ४) राठवी

उदा-

१) बारवटी :

● वेगा हे पोलू बाहमारु बालू ते.

(लवकर या. किती मोठा साप आहे बघा तो.)

२) देहवाली :

● बुले तेरा बुरे वेचायतला.

(बोलेल त्याचीच बोरं विकली जातात.)

३) पाली :

खेतर मा मक्की लगाडर्यू

(शेतात मका लावला आहे.)

४) राठवी :

पाच भाछे बसिन निवाडू करसु?

(पाच पंच बसून निवाडा करू.)

● एकवचनी, अनेकचनी शब्द :

| एकवचन | अनेकवचन |
| --- | --- |
| जातलू (जातो) | जातला |
| खातलू (खातो) | खातला |
| पितलू (पितो) | पितला |



नाचतलू (नाचतो) नाचतला

- पुल्लिंगी शब्द स्त्रीलिंगी शब्द

कादूव (माती) आंबली (चिंच)

सुरू (मुलगा) सुरी (मुलगी)

कोवाव (मोर) वासडी (गाय)

होहरू (सासरा) वोवडी (सून)

- पावरी-मराठी शब्दार्थ :

१) चांद हुरज-चंद्र-सूर्य २) कुरचली-खेकडा ३) ओन्डो काकडो-पपई ४) दातवू-विळा ५) हातपुडू-सापपुडा ६) आहळी-पावरा समजातील महिलांच्या गळ्यातील चांदीचा एक दागिना ७) देजो-वधूमूल्य ८) नवाय-पावरा समाजातील नवीन आलेल्या पिकाचे विधिवत पूजनाचा सण ९) लेखाऱ्या-शिकणारे, लिहिणारे १०) जेठ-पावसाळा.

- पावरा बोलीभाषेतील मौखिक साहित्य :

पावरा समाजात अफाट मौखिक साहित्य आहे. प्रेमगीतं, जखडीगीतं, नवायगीतं, होळीगीतं, इंदलगीतं इतिहासावर आधारित गीतं, जीवनमूल्यांची गीतं विविध प्रसंगी गायली जातात. ह्या गीतांचा निर्माता कुणी एक गीतकार नसतो. ही गीतं त्या त्या वेळी समूहाने सहज रचली जातात. तसेच आदिवासी समाजात अफाट कथा आहेत. रोडाली आहेत, गायण आहेत. ढोल, मांडळ, रनथा, गांघळ, पावी, ढाक अशा अनेक वाद्यांवर गीते आणि कथाही म्हटली जातात. उदा. निसर्ग आणि मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान सरळसोप्या शब्दांत टिपलेले आहे हे आपल्याला सदर गीतातून लक्षात येईल.

*दुय दिहोन जिव्णु दादा*
*माणहो साथे बुराय नी कोरोनू*
*नदी दोडी जिव्णु दादा*
*मुगरो साथे बुराय नी कोरनू*

(भावार्थ - दोन दिवसांचे हे जीवन मिळाले आहे दादा! सर्व मिळूनमिसळून प्रेमाने, आपुलकीने वागले पाहिजे. आपले जीवन हे नदी किनाऱ्यावर आहे. कुठल्याही प्राणी, पक्ष्याला इजा करायची नाही. तेव्हाच निसर्ग आणि मानवी जीवनाचे कल्याण आहे.)

*धरती मातापोर नाचणे लाग्या*
*धरती वा माता ने पाया पोडो वोऽऽ*
*धरती माता पोर नाचणे लाग्या*
*धरती माता खुसीमा नाचाड़े वोऽऽ*

(भावार्थ : सदर गीत लग्नाच्या वेळी मुलंमुली, महिला-पुरुष एकत्र येऊन गातात.) धरतीमातेवर नाचतो आम्ही तर प्रथम धरतीमातेला वंदन करतो. धरतीमातेवर आम्ही नाचायला लागलो. धरतीमाता आम्हाला खुशीत नाचवत आहे.)

*खाज्या तारी पागडी ।*
*सिरकार आपकी लेद्यू रे काय बावी रयू ।।*

भारतीय इतिहासातील थोर आदिवासी क्रांतिकारक खाज्या नाईक यांच्या इतिहासावरील गीतामधून मांडण्यात आले आहे.

शेताची कामे करतानादेखील उत्साहात गीतं म्हटली जातात. आदिवासी जीवनात श्रमाला महत्त्व आहे. आणि श्रम करताना आळसावलेली अवस्था नसते. खुशीखुशीत काम केले जाते.

*डुगरखेडा गावोंमा*
*गंज्यू गुवाव ओतूऽऽऽ*
*ओयडे बोयडे डुरे चारे*
*पावी पोर डुरोह नाचाडे वो..ऽऽ*
*डुरोन दुख: होंबवतू कोये*
*तिंधरी बुली बुलतू कोये वो..ऽऽऽ*
*जेतार मौत आवली कोये*
*मान्हे रोण डुरे गोणा रोडता कोये वो.ऽऽ*

भावार्थ : (या ठिकाणी गीताच्या माध्यमाने एका गावाची गुराख्याची कथा सांगण्यात आली आहे-

एक डूगरखेडा म्हणून गाव होते. त्या गावात एक गुराखी राहत होता. त्याचे नाव गंज्या होते. गावातील बऱ्याचशा लोकांची गुरे तो चारत होता. त्याला गुरांशी खूपच प्रेम, लगाव होता. प्रत्यक्ष गुरांची भावभावना तो बारकाईने टिपत होता. त्यामुळे त्याला गुराची भाषादेखील कळत होती.

गुरं गंज्या गुराखीशी आपले सुखदु:खदेखील व्यक्त करत होते. त्यांच्या अनेक वेळा गप्पा रंगत होत्या. खरं म्हणजे तो कधीच त्यांना गुरं असे समजत नव्हता. आपलाच परिवार, आपलेच भाऊबंद असे समजत. त्यामुळे त्यांच्यावर त्याने कधी काठीने वार केला नाही.

एकदा अचानक गंज्या गुराखी मरण पावला. लोकं गोळा झाले. नात्यातील लोकं अश्रू गाळत होते. गुरांनाही त्याची मरणाची खबर लागली तेव्हा सर्व गुरं त्याच्या मौतवर आली आणि नात्यातील माणसापेक्षाही मोठ्या आक्रोशाने रडू लागली. हे दृश्य पाहून संपूर्ण गाव अचंबित होऊन गेले होते.

असे अनेक गीतं रात्र रात्र जागून आदिवासी नाचत, गात असतात, तेव्हा रात्र कशी निघून जाते हेदेखील कळत

नाही. आणि नाचत, गात अशा प्रकारे जीवनमूल्यांचे शिक्षण, संस्कार आदिवासी हसत खेळत एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला सुपूर्द करत असतो. निसर्ग आणि मानवी मूल्यांनी भरलेली ही गीतं मानवी जीवनातील अनमोल साहित्य आहे हे आजच्या शिक्षणव्यवस्थेने ओळखले पाहिजे. तंत्रज्ञानाच्या युगात झपाट्याने आदिवासीबोली, साहित्यसंस्कृतीवर परिणाम होत आहे. त्यामुळे बोलीभाषेचे अस्तित्व हा मोठा चिंतेचा विषय आहे. बोलीभाषा नष्ट होणे म्हणजे मानवी साहित्य, संस्कृती, जीवन नष्ट होते हे जाणीवपूर्वक समजून घ्यायला हवे. त्यासाठी आदिवासी जीवनदेखील अभ्यासक्रमात घेतले पाहिजे. म्हणजे नेहमी तुमचेच विचार आमच्यावर थोपू नका. आमचे जीवनदेखील तुम्ही समजून घ्या. नवीन पिढीला हे ज्ञान सुपूर्द करा. त्यांनाही वास्तविक आदिम जीवन समजू द्या.

*सावा, कालेजन पढाईमा रोन*
*आह् बुलीह डाव्वी मेकणू*
*काय यो भी जातीवाद, विषमतावादोन मुवे से?*
*बाघ बाघे आह् बुलीह विहरावीन*
*आदिमता खतम कोन्नेन साजिश से?*

सदर पावरी बोलीभाषेतील कवितेच्या ओळीतून संतोष पावरा यांनी व्यवस्थेसमोर प्रश्न उपस्थित केला आहे–

*शाळा–कॉलेजच्या अभ्यासातून*
*मायबोली डावलून ठेवणे*
*हेदेखील जातीयवाद, विषमतावादाची जळे आहेत का?*
*हळूहळू मायबोली विसरायला लावून*
*आदिमता नष्ट करण्याचे षडयंत्र आहे का?*

आदिवासी पावरा बोलीभाषेतील म्हणी उखाण्यातदेखील गर्भ अर्थ दडलेले आहेत. तेदेखील समजून घेतले पाहिजे. वडोन साव्वूने सुरीन साव्वू एक (भावार्थ : झाडाची सावली आणि मुलीची माया सारखी असते) मुलीची प्रेम, माया जीवनात वृक्षासारखी असते म्हणजे झाडालादेखील जीवनातील विशेषतः किती आहे व मुलीचे मानवी जीवनात किती महत्त्व आहे हे सहज या म्हणीतून दर्शवले आहे. त्यामुळे बोलीभाषेतील ही जीवनमूल्ये जपण्यासाठी विशेष प्रयत्न झाले पाहिजे. प्रमाणराष्ट्र, राज्यभाषा शिकण्याच्या ओघात बोलीभाषेला विसरून कसे चालेल?

आज इंटरनेटच्या जमान्यात दुनिया जवळ आली आहे असे जरी वाटत असले तरी आंतरिक नाती दुरावलेली आहेत हे नाकारता येणार नाही. संस्कृती रीतिरिवाजाशी नाते तुटत आहे. कथा, गीत अशी असंख्य अबाधित मौखिक साहित्य बोलीभाषेतील दुराव्यासोबत नष्ट होत आहे. या विषयावर चिंतन होणे गरजेचे आहे. त्यामुळे बोली जिवंत असली तर हे लोकसाहित्य, संस्कृती आणि इतिहास जतन होईल असे वाटते. त्यामुळे त्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले गेले पाहिजे. बोली जिवंत असली तरच इतर गोष्टी ...बोली संपली म्हणजे त्या बोलीबरोबर त्या त्या समाजाची रूढी, परंपरा, इतिहास, साहित्यशोध पूर्ण सभ्यता नष्ट होऊन जाते हे लक्षात घ्यायला हवे. ५ फेब्रुवारी २०१० रोजी भारतीय उपखंडाच्या अंदमान–निकोबार द्वीपातील 'बो' बोली बोलणाऱ्या पंचाऐंशी वर्षांच्या बोआताईचे निधन झाले. तिच्यासोबत पासष्ट सहस्त्र वर्षांपासून बोलली जाणारी बो बोलीदेखील मातीत मिसळून गेली. किती मोठे दुर्दैव आहे! वेळीच ही बोली जतन, संवर्धन झाले असते तर त्या बोलीतील विशेषता जीवनव्यवहार, जीवनमूल्ये पुढील पिढीला सुपूर्द करता आले असते. अशा अनेक बोलीभाषांची दखल घेतली गेली नाही त्यामुळे त्या नाहीशा झाल्या आहेत याचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे. प्रो. पीटर लेडफोजेड हे भाषातज्ज्ञ होते. त्यांनी अनेक मृत झालेल्या कैक भाषांवर संशोधन केले होते. तसेच डॉ. गणेश देवी भाषा संशोधन केंद्राच्या माध्यमातून भाषा, बोलीभाषा जतन, संवर्धनासाठी मोलाचे कार्य करत आहेत. आदिवासी भाषा जतन, संवर्धनासाठी संयुक्त राष्ट्र संघटनांनी २०१९पासून भाषा वर्ष घोषित केले आहे. पण भारत सरकार अजूनही आदिवासी भाषा जतन, संवर्धनाचे कार्य लक्षात घेत नाही याची खंत वाटते. अनेक लहानमोठे कार्यक्रम घेऊन, प्रबोधन, चर्चासत्र आयोजित करून बोली जतन, संवर्धनासाठी शासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे. बोलीभाषा जतन, संवर्धन ही काळाची गरज आहे हे लक्षात ठेवूया.

आपणो वाजो – पेहराव, आपणी आह्बुली
आपूच जतन संवर्धन कोन्नू से आपणी संस्कृती
(आपले वाद्य, पेहराव, आपली बोली
आपल्यालाच जतन करावी लागेल आपली संस्कृती.)

पावरा सामाजातील म्हणी :

- होयड्यान दोर वाडीलोगन
सरड्याची बीळ वडागपर्यंत.
- वात कोरी वातडी, बुखी मोरे आतडी
बाता करतो मोठ्या, भुकी मरते आतडी.
- नवली ताह धोवली
नवी होती तोपर्यंत (जात्यावर) दळत होती, (आता नखरे,

आळस इ.)

● जोणेची जाणे वांझी वाह ताणे

जन्म देणारीला वेदनेची जाणीव असणार, वांझ फक्त पाठ ताणेल.

● उवीम लालोंम लाल ओखात्रिम हालोम हाल

होळीत लाल लाल, ओखत्रीम हालच हाल.

● पोटलोन गुडू ने कामदार मोटाय कोरे

पाटलाचा घोडा आणि कामदाराचा रुबाब

● खादे जुव्वावो ने, जुवाव्वो हुदूणू

खांद्यावर जू आणि जू शोधत फिरता

● गोडहू सरकी जाय ने पाटोह दिन काय फायदू?

साप निघून गेल्यावर पाट(रेषेला) मारून उपयोग काय?

● गावोन कुत्रो गावोखेर बुकतलो

गावाचा कुत्रा गावाच्या बाजूने भुंकणार!

● राजाह गोवेची राणी

राजाला आवडेल ती राणी!

● कन्नू तोहलो भन्नू पोडे

जसे कार्य, तसे भरावे लागते.

● दिह पोड्या वाका, बाय कोये काका

दिवस आले कठीण, बाय म्हणतो काका.

● पोहावोन पान तीनूच

पळसाची पाने तीनच!

उखाणे :

● तांबान डेगडीमा राय राय बीजा – उंबर

तांबाच्या हांड्यात रायसारख्या बिया – उंबर

● एक दादू दिह ने रात बाव्तू रोये – ताटलो

एक दादा रात्रंदिवस बघत राहतो – घराचे तट्टे

● बुंदे आंदूँण उपर आडी – चिमणी

खाली आंदण वरती हांडी – चिमणी

● मामिन पेटोम मामू लुटे – बेव– वोव्यो

मामीच्या पोटात मामा झोपतो – घरचा खांब आणि त्यावरून ठेवले जाणारे आडवे लाकूड (वोव्यो)

शब्दार्थ :

● गिरहण : साग वृक्षाचे लाकूड आदिवासी पावरा समाजाची कुलदैवत. पावरा समाजात जेव्हा घराची उभारणी करतात, तेव्हाच गिरहण कुलदैवताची स्थापना केली जाते.

● सिरकार – सरकार

● मुगर – मगर

● ढाक – पायात धरून वाजवण्याचे ढोलकसारखे चर्मवाद्य. आदिवासी पावरा समाजात ढाक वाद्य खास करून दिवासाच्या उत्सवात वाजवतात.

**संदर्भ :**


● वाहरू सोनवणे, आदिवासी साहित्य आणि चळवळ (प्रकाशन, विद्रोही साहित्य संस्कृती, चळवळ महाराष्ट्र)

● सुभाष पावरा, 'ढोल' अंक २००१ (भाषा संशोधन केंद्र, बडोदा )

● मुलाखत : बड्या विकला पावरा (जाणकार)

● मुलाखत : बायटी पावरा (जाणकार)

● 'पावरा साहित्य' गटचर्चा (२६–२७/०८/२०२१)


**– संतोष पावरा**

मराठी भाषेला अनेक बोली आहेत. त्यामध्ये विशेष ज्ञात नसलेली भाषा (बोली) म्हणजे चित्पबानी. असे सांगतात की भगवान परशुरामाने यज्ञ करण्यासाठी चित्पावन ब्राह्मणांना कोकणात म्हणजे प्राचीन अपरांत प्रदेशात आणले. कोकणात, विषेशतः राजापूर, पावस, गावखंडी, कुर्धे, आडिवरे, कोणसर या तालुक्यांत चित्पावन ब्राह्मण ही भाषा बोलत. पुढे यातील काही लोकं चरितार्थासाठी, विशेषतः नारळी, पोफळीच्या बागा व भातशेती करण्यासाठी गोव्यामध्ये तसेच कर्नाटकामधील मंगलोरच्या आसपास गेली. पूर्वी राजा किंवा संस्थानिक जंगल, जमीन, भातशेती व बागायती कसण्यासाठी देत असत. साहजिकच कर्णाटकामधील मंगलोर जवळ मुंडाजे गावातील व आसपासचे ब्राह्मण आजही थोड्याफार प्रमाणात चित्पावनी भाषा बोलतात. तसेच गोव्यातील काही भागात चित्पावनी बोलली जाते. चित्पावन भाषेचे उच्चारण बरेचसे नाकातून होते.

**संदर्भ : 'चित्पावन आणि चित्पावनी' – डॉ. सुमतीबाई भिडे**

**सौजन्याने : प्रभाकर शं. भिडे**



**बोलीभाषा विशेषांक**

## लेख

# मराठीच्या सांकेतिक आणि गुप्तबोली

**डॉ. अनंता कस्तुरे**

**गुप्त बोलीस हिंदीमध्ये 'अंदर की बात', बंगालीमध्ये 'संध्या भाषा' तर इतर भाषेत कोड लँग्वेज, मिताक्षरी, कोडवर्ड, मिरर लँग्वेज असे संबोधले जाते. मराठी भाषेतील गुप्तबोलींच्या निर्मितीमागे व्यवसायातील तंत्रे इतरांना कळू नयेत, समूहातील सामर्थ्य व गोपनीयता नष्ट होऊ नये, धर्माचे तत्त्वज्ञान अबाधित रहावे, विरोधकांपासून संरक्षण व्हावे, व्यावसायिक अर्थप्राप्ती इत्यादी विविध प्रमुख हेतू असलेले दिसतात.**

**मानव** हा समाजशील प्राणी आहे. तो समूहाने राहतो. जगातील प्रत्येक मानव हा समूहात राहताना ज्याप्रमाणे मनातील भावभावना, इच्छा-अपेक्षा व्यक्त करतो, त्याप्रमाणे तो आपल्या वैयक्तिक गोष्टी, जात, धर्म, समूह, संप्रदाय व गट यांच्याही अनेक बाबी गुप्त ठेवत असतो. मानवाचा हा व्यक्त होण्याचा व गुप्त ठेवण्याचा स्वभाव वा प्रवृत्ती ही नैसर्गिक आहे. मानवाची ही विचारधारा प्रत्येक मानवात, समूहात, जातिधर्मात व संप्रदायात आढळते. यामागे प्रत्येकाच्या श्रद्धा, व्यवसाय आणि धर्माचे तत्त्वज्ञान दडलेले असते. मानवाच्या खुलेपणाने प्रकट होण्यातून जगात जशा विविध भाषा आणि बोलींची निर्मिती झाली, त्याप्रमाणेच मानवाच्या गुप्तता जपण्यातूनही अनेक सांकेतिक भाषा व गुप्तबोलींची निर्मिती झालेली आहे. प्रस्तुत लेखात मराठीच्या सांकेतिक भाषा व गुप्तबोली, त्यांचा अनुबंध, मराठीच्या गुप्तबोलींचे स्वरूप, समाजातील उपयोजन, गुप्तबोलीचे हेतू, इतिहास, वैशिष्ट्ये, अभ्यासक्षेत्रे यांचा विचार करणार आहोत.

गुप्तशब्दांचे शब्दकोशात गुपित, अप्रकट, गूढ, सुप्त, छुपे, पडद्याआड, चोरटे, खासगी, गोपनीय असे अर्थ दिलेले आहेत. गुप्त बोलीस हिंदीमध्ये 'अंदर की बात', बंगालीमध्ये 'संध्या भाषा' तर इतर भाषेत कोड लँग्वेज, मिताक्षरी, कोडवर्ड, मिरर लँग्वेज असे संबोधले जाते. मराठी भाषेतील गुप्तबोलींच्या निर्मितीमागे व्यवसायातील तंत्रे इतरांना कळू नयेत, समूहातील सामर्थ्य व गोपनीयता नष्ट होऊ नये, धर्माचे तत्त्वज्ञान अबाधित राहावे, विरोधकांपासून संरक्षण व्हावे, व्यावसायायिक अर्थप्राप्ती, तत्त्वज्ञानाचा प्रसार, गुप्तता, प्रबळ श्रद्धा, धर्महित, कायदा-प्रशासनापासून संरक्षण असे विविध प्रमुख हेतू असलेले दिसतात.

जगातील प्रत्येक भाषेला, बोलीला व त्यामधील साहित्याला स्वतःचा असा इतिहास असतो. त्यांची काळानुरूप चालत आलेली परंपरा असते. जगात आज २७८६ बोलीभाषा बोलल्या जातात. त्यापैकी भारतात २८४ भाषा व १६५२ बोली आहेत. या बोलींमध्ये गुप्तबोलींनाही विशेष महत्त्व आहे. जागतिक पातळीवर गाव, प्रांत, समूह, गट, संप्रदाय, धर्म आदींमध्ये गुप्त व सांकेतिक भाषा आहेत. या बोलींचे जागतिक स्तर, भारत देश, विविध संप्रदाय, धर्म, राजकर्ते व काळ यानुसार परंपरा व इतिहास सांगता येतो. तो इतिहास विविध ग्रंथ, पोथी, समूह, शिलालेख आदींमध्ये उपलब्ध आहे. प्रत्येक देशातील गुप्तबोलींचे स्वरूप, त्यातील शब्द, वाक्यरचना, सांकेतिक खाणाखुणा व चिन्हे ही वेगवेगळ्या पद्धतीची आहेत. चीन व जपानमध्ये 'चित्रलिपी' ही गुप्त भाषा उगम पावलेली दिसते. चित्रलिपी ही चीन व जपानमधील भाषेची जननी असून या भाषेतूनच तेथील इतर भाषा व बोली निर्माण झालेल्या आहेत. बायबलमध्ये 'यथश' ही हिब्रु भाषेतील पद्धत गुप्त भाषायुक्त आहे. इजिप्तमध्ये चित्रलिपी ही गुप्त भाषा रूढ होती.

भारतामध्ये सांकेतिक भाषा व गुप्तबोली या फार प्राचीन काळापासून चालत आलेल्या आहेत. प्रत्येक समूहात स्वतःची अशी स्वतंत्र गुप्तभाषा प्रचलित होती. 'कथासरित्सागर' ग्रंथात विविध सांकेतिक लिप्यांचे उल्लेख आढळतात. प्राचीन काळातील ताम्रपट, शिलालेख, शिल्पकला, हस्तलिखिते, विविध मुद्रावस्थातील आकृत्या, मूर्ती, गूढलिपी, किल्ले, किल्ल्यातील खजिना, गुप्त दरवाजे, ते उघडणारे रहस्यमय तंत्र, त्यांच्या विविध चाव्या व नकाशे, रस्ते, मुद्रा व अनेक रहस्यमय पडदे अशा अनेकांमध्ये गुपित सांकेतिक भाषा आढळते. भारतात महानुभाव, जैन, बौद्ध, रामानुज इ. संप्रदायामध्येही गुप्त बोली व सांकेतिक भाषेची परंपरा आढळते. त्याबाबत अनेक पुरावे उपलब्ध आहेत.

मराठी प्रांतातही विविध जाती-जमाती, संप्रदाय, व्यवसाय, धर्म, गट-तट इत्यादीनुसार गुप्तबोलीचे स्वरूप विविधांगी आढळते. मराठीच्या गुप्तबोलीत सांकेतिक चिन्हे, अंक, खाणाखुणा व चित्रे असे विविध संकेतही दिसून येतात. गुप्तबोली या समूहाप्रमाणेच राजदरबारी, तसेच प्रत्येक राज्याच्या गुप्तचर संस्थांनी निर्माण केलेल्या दिसतात. इंग्रजांच्या गुप्तचर यंत्रणेत मेजर हडसन, मिर्झा इलाही बख्क्ष या गुप्तहेरांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. छत्रपती शिवाजी महाराजांनी गुप्तहेरांची यंत्रणा स्वतंत्रपणे बहिर्जी नाईक यांच्या नेतृत्वाखाली राबवली होती. इस्राइलची गुप्तचर संस्था मौसाद यासह जगातील अनेक गुप्तचर संस्थाच्या प्रशिक्षणात छ. शिवाजीमहाराज व गुप्तहेर बर्हिजी नाईक यांची गुप्तनिती अभ्यासक्रमात शिकवली जाते. भारतातील ऋग्वेद, अथर्ववेद, तैतिरिय संहिता, महाभारत आदी ग्रंथात गुप्तचर यंत्रणा, गुप्तहेर, हेरसंस्था यांचे संदर्भ आलेले आहेत. कौटिल्य यांनी कौटिल्यम अर्थशास्त्रम् या ग्रंथात गुप्तहेरांचे नऊ प्रकार सांगितले आहेत. अभ्यासकांनी गुप्तचर संस्थांचे ह्युमन इंटेलिजन्स व टेक्निकल इंटेलिजन्स अशा दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे. याप्रमाणे गुप्तबोलींच्या इतिहासाला प्राचीन परंपरा असलेली दिसून येते. आजही या गुप्तबोली सर्वत्र प्रचलित आहेत.

प्रत्येक गुप्तबोली ही विशिष्ट अशा सांकेतिक खाणाखुणा व संकेतांनी बनलेली असते. गुप्तबोलीचा सामाजिक व भाषिक व्यवहार पूर्ण होण्यासाठी विशिष्ट संकेत, चिन्हे व खाणाखुणांची गरज असते. यावरून गुप्तबोली व सांकेतिक बोली यांच्यातील अनुबंध किती घट्ट व एकरूप आहे हे कळते. भारतातील सांकेतिक बोलीला वेगळी अशी परंपरा असलेली दिसते. पूर्वीच्या काळी अंक दर्शविण्यासाठी हातांच्या बोटांचा वापर केला जात असे. लेखनकलेचा शोध लागण्याअगोदर सांकेतिक भाषा दाखविण्यासाठी दृश्य चिन्हांचा वापर होतो. काही सांकेतिक शब्दांसाठी मानवाचे अवयव, छंद, त्यातील चरणाची अक्षरे, देवता, गृह, नक्षत्र आदींचा वापर केलेला दिसतो. गावपातळीवर लहानपणी मुले जी 'च'कारी बोली वापरतात, ती सांकेतिक बोलीच होय. संगमेश्वरी ही व्यापारी लोकांची वाणी म्हणजेच भाषा आहे. आरवली गावातील व्यापारी लोक हे एकमेकांशी संवाद साधण्यासाठी व व्यापार करण्यासाठी संगमेश्वरी ही सांकेतिक भाषा वापरत. प्राचीन काळातील धार्मिक ग्रंथातही सांकेतिक बोलीचा वापर झालेला दिसतो. शतपथ ब्राह्मण, तैतिरीय ब्राह्मण या ग्रंथात चार संख्येसाठी कृत, चौवीस संख्येसाठी गायत्री, अठेचाळीस संख्येसाठी जगती याप्रमाणे सांकेतिक चिन्हाचा वापर केलेला दिसतो. इंग्रज सरकारने आदिवासींना जेव्हा गुन्हेगार म्हणून संबोधले, तेव्हा पारधी, भिल्ल, तडवी, पावरा, गौंड या सर्व जमातींनी स्वसंरक्षणार्थ आणि कायद्यापासून बचाव करण्यासाठी पारुषी ही गुप्त आणि सांकेतिक भाषा निर्माण केली. यामध्ये जा म्हणजे जास्मा, पळ-परमळ, भाकर-भारमाकर, ये-चेरमे, चाल-चारमाल, घोडा-घोरमोडा असे शब्दप्रयोग वापरले आणि सांकेतिक व गुप्तबोलीतून स्वतःचे संरक्षण केले.

मराठी समूहात वेगवेगळ्या दैवतांचे लोकउपासक आहेत. त्या त्या समूहात आणि लोकउपासकांमध्ये सांकेतिक आणि गुप्त भाषा असलेली दिसते. गोंधळी समाजातील लोक हाताच्या खाणाखुणा करून एकमेकांकडे संदेश पोहचवितात आणि त्या माध्यमातून अर्थाजन करतात. गोंधळ्याची भाषा ही सांकेतिक भाषा आहे. पूर्वीच्या काळी ईजिप्त देशामध्येही चित्रलिपी प्रचलित होती. समाजात एखादी भाषा नष्ट झाली की त्या भाषा व समूहाबरोबर त्या परिसरातील आणि प्रांतातील संस्कृती, साहित्य, भौगोलिक-सामाजिक पर्यावरण आदीविषयक ज्ञानही नष्ट होत असते. हे सर्वकाही टिकविणे आणि त्याचे संवर्धन करणे गरजेचे ठरते. अंदमान बेटावर जेव्हा त्सुनामी धडकली होती. त्यावेळी त्या बेटावरील एकही आदिवासी त्सुनामीचा बळी ठरला नाही किंवा आदिवासींचे फारसे काही नुकसानही झाले नाही. कारण त्या आदिवासींना समुद्रातील बदलत्या लाटा व बदलते पर्यावरण याविषयीचे ज्ञान अवगत होते. ते ज्ञान त्यांनी विशिष्ट सांकेतिक शब्दातून एकमेकांपर्यंत आणि समूहांपर्यंत पोहचविले. त्याबरोबर, जेव्हा त्सुनामी, भूकंप व इतर नैसर्गिक संकटे आली, त्यावेळी आदिवासींनी सांकेतिक

शब्द, खाणाखुणातून ती माहिती इतरांना दिली आणि ते उंच टेकडीवर सुरक्षित ठिकाणी जावून थांबले. यावरून समाजव्यवहारात सांकेतिक आणि गुप्त भाषांचे असणारे महत्व अधोरेखित होते. तसेच समाजाचे व देशाचे रक्षण करण्याची क्षमता या सांकेतिक भाषेत आहे. हेही स्पष्ट होते.

आज सोशल मीडियावर Whatsapp, फेसबुक, ट्युटर आदींमध्ये चॅटिंग लॅग्वेज, शॉर्टकट भाषा, टीनएज स्लॅग या भाषांचा वापर सातत्याने केला जात आहे. ही भाषा जो शिकतो, त्याला भाषेतील सांकेतिक, गुप्त, शॉर्टकट संकेत माहीत असतात. त्याशिवाय ही भाषा कळणार नाही. कोणत्या शब्दासाठी कोणते अक्षर व अंक वापरायचे याची माहिती, ज्ञान प्रत्येकाला समजावून घेणे महत्त्वाचे ठरते. कमी शब्दांत अधिक आशय देण्यासाठी तरुणांकडून चॅटिंग लँग्वेजचा वापर केला जात आहे. समाजात सोशल मीडियाबरोबरच व्यवहारातील संभाषणातही ही चॅटिंगची भाषा वापरली जाते. या लँग्वेजचा प्रत्येकजण आपल्या सोयीनुसार अर्थ लावताना दिसतो. सध्याच्या युगात अंकमिश्रित भाषेचा वापर होतो आहे. ही सर्व प्रकारची भाषा सांकेतिक आणि गुप्तबोलीचे काळानुरूप बदलते रूप आहे, हे मान्य करावे लागते. बौद्ध धर्मामध्येही सांकेतिक भाषा होती. या धर्मामध्ये अनुयायांना विशिष्ट तऱ्हेने काढलेली वर्तुळे, शरीरांच्या अवयवांचे हावभाव याद्वारे सांकेतिक व गुप्त भाषा शिकवली जात असे. ज्यांना या पंथाची दीक्षा मिळाली आहे, अशानांच या पंथाची सांकेतिक भाषा शिकवली जात असे. बौद्ध धर्माबरोबरच महानुभाव संप्रदाय, संतसाहित्य आदींमध्येही ही सांकेतिक भाषा आढळते. यावरून सांकेतिक भाषेचे विविधांगी असलेले स्वरूप लक्षात येते.

सांकेतिक आणि गुप्तबोली या एकाच नाण्याच्या दोन्ही बाजू आहेत. दोहोंच्यामध्ये अन्योन्य संबंध असलेला दिसतो. सांकेतिक भाषेशिवाय कोणतीच गुप्तबोली निर्माण होऊ शकत नाही. म्हणजेच सांकेतिक भाषा ही गुप्तबोलीची जनक भाषाच आहे. सांकेतिक भाषा व गुप्तबोली यांचे संदर्भ काळानुरूप बदलतात; परंतु या भाषा कमी प्रमाणात नष्ट होतात. पण नष्ट होतानाच नवीन संदर्भ घेऊन नव्याने सांकेतिक भाषा आणि गुप्तबोलीचे महत्त्व अधोरेखित होते. एकंदरीत सांकेतिक भाषा आणि गुप्तबोली यांचा अनुबंध घट्ट असलेला दिसतो. दोन्ही भाषांचाचे अस्तित्व आजही मौखिक आणि लिखित स्वरूपात टिकून आहे. काळ बदलतो आहे तशी सांकेतिक भाषा आणि गुप्तबोलीही बदलताना पाहावयास मिळते. या बदलत्या भाषा व बोलीचा काळानुरूप अभ्यास होणे आवश्यक आहे; तरच दोन्हीतील अनुबंध टिकेल असे वाटते.

मराठीसमूहात जेवढ्या बोली, जाती व संप्रदाय आहेत, त्या प्रत्येकाची स्वतंत्र अशी एक गुप्त व सांकेतिक भाषा आढळते. गुप्तबोली ही व्यवसाय, संकटसमयी, तत्त्वज्ञानाचा प्रसार व धार्मिक विधी करताना वापरली जाते. ती मौखिक असते; पण लिखित असतेच असे नाही. क्वचितच काही अभ्यासक व संस्था त्याची नोंद आपल्या दप्तरी ठेवताना पाहावयास मिळतात. गुप्तबोली फारसी लुप्त होत नाही. कारण ती पारंपरिक आणि आधुनिक या दोहोंतील दुवा स्वीकारत, नवे शब्द-वाक्य-म्हणीचे संदर्भ घेत काळानुरूप बदल स्वीकारताना दिसते. गुप्तबोली ही त्या त्या समूहाने निर्माण केलेली असते. त्यामुळे त्या बोलीत त्या समूहातील भाषा, जात, धर्म, संप्रदायातील शब्द-वाक्यरचना समाविष्ट केलेली असते. ही बोली त्या समूहाच्या व्यावहारिक बोलीपेक्षाही वेगळी असल्यामुळे ती अवघड व क्लिष्ट आढळते.

त्यामुळे ती बोली इतरांना काय बोलली जाते आहे? संवादात काय चालले आहे? हे सहजासहजी समजत नाही. त्या भाषेचा उलगडा त्या समूहातील व्यक्तीशिवाय भाषा तज्ज्ञानांही होत नाही. त्या गुप्तबोलीतील शब्द, म्हणी, वाक्यप्रचार, वाक्यरचना याचे अर्थ कोणत्याच शब्दकोश आणि संदर्भग्रंथात सापडत नाहीत. गुप्तबोली ही त्या समूहाने स्वत:च्यासाठी तयार केलेली भाषा असते. त्यामुळे त्या बोलीत तिरकस शब्द, छोटी वाक्यरचना, यमकरहित जोडशब्द व अर्थहीन शब्द अनेक स्वरूपात आढळतात. या सर्वांचे ज्ञान आणि आकलन हे फक्त त्याच समूहाला होताना दिसते.

गुप्त भाषा ही समूहानुसार, समूहातील गट व उपजातीनुसार बदलते. ही भाषा त्या समूहातील स्त्री-पुरुष व लहान मुले या सर्वांनाच येते असे नाही. ज्याप्रमाणे आपणाला शाळेत मातृभाषेबरोबर हिंदी, इंग्रजी, संगणक, संस्कृत आदी भाषा शिकविल्या जातात, त्याचे ज्ञान प्रत्येकजण आत्मसात करीत असतो, त्याप्रमाणे त्या समूहातील इच्छुकांना त्या गुप्तभाषेतील शब्द, कोडे, वाक्ये, संदर्भ शिकावे लागतात. तसे व्यावहारिक संभाषण करून ती बोली आत्मसात करावी लागते आणि मग ते समूहाच्या व्यवहारात सहभागी होताना दिसतात. प्रत्येक समूह हा व्यवहारासाठी बोली तयार करतो आणि तिचा वापर सातत्याने करतो. त्यामुळे ती समूहात बोली म्हणूनच रूढ राहत असते. त्या बोलीचे अस्तित्व कमी-जास्त प्रमाणात असू शकते. पण ती बोली असते हे

मात्र निश्चित.

महाराष्ट्रातील आदिवासी आणि भटक्या जाती-जमाती यांच्यामध्ये गुप्तबोली जास्त प्रमाणात आढळून येतात. किंबहुना या समूहाची द्विभाषिक लोकसंस्कृती असलेली दिसते. द्विभाषिक लोकसंस्कृती म्हणजे त्यांची मातृभाषा ही एक की जी परंपरेने चालत आलेली असते आणि गुप्तभाषा दुसरी की जी समूहासाठी तयार केलेली असते. तडवी या समाजाची तडवी ही मातृभाषा आहे. तर जंगली ही गुप्तभाषा आहे. तसेच भिल्ल समाजाची भिलोरी ही मातृभाषा आहे तर पारसी ही गुप्तभाषा आहे. अशा अनेक जाती व जमातींमध्ये मातृभाषा आणि गुप्तभाषा या वेगवेगळ्या असलेल्या दिसतात. मातृभाषा आणि इतर भाषा बोलीप्रमाणे गुप्तभाषा ही व्यक्तीला सहजपणे शिकता येत नाही. कारण गुप्तभाषा शिकायची असेल तर त्या समूहांनी त्या व्यक्तीला त्या समूहामध्ये स्वीकारावयास हवे. त्या समूहाने त्या व्यक्तीला भाषा-बोली शिकवायचे ठरवले तरच त्या गुप्तबोलीतील अक्षर, अंक, सांकेतिक चिन्हे, खाणाखुणा या सांगितल्या जातील आणि शिकविल्या जातील.

शिकण्याची प्रक्रिया सुरू झाली की मग त्या बोलीतील बारकावे, तिचे स्वरूप, गुप्तता व संदर्भ हळूहळू कळू लागतील. भाषाबोली शिकण्यासाठी तुम्हाला त्या समूहाने स्वीकारणे आणि भाषा-बोली शिकविणे महत्त्वाचे ठरते. ही बोली शिकण्यासाठी त्या समूहात मिसळणे व एकरूप होणे गरजेचे असते. त्या समूहाची संस्कृती, चालीरिती, परंपरा, नियम, श्रद्धा-अंधश्रद्धा, शिस्त आदीचे पालन करावे लागते. त्या समूहातील महत्त्वाच्या व्यक्तींच्या सोयी आणि वेळेनुसार त्या समूहात प्रत्यक्ष सहभागी व्हावे लागते. त्या बोलीतील बारकावे, शब्द-वाक्यांचे निरीक्षण करून प्रसंगी संभाषणात सहभाग घेऊन ती बोली आत्मसात करावी लागते. इतर भाषेप्रमाणे गुप्तबोलीला लिपी नसते. त्यामुळे तिथे अंकलिपी, बाराखडी किंवा त्या संदर्भातले पुस्तकही उपलब्धही नसते. तसेच ती गुगल, संगणक आदी ठिकाणीही नेमकेपणाने उपलब्ध होत नाही. या सर्वांचा विचार करून प्रत्येकाला गुप्तभाषा ही स्व-अनुभव, निरीक्षण आणि सरावातून शिकावी लागते. यामुळे स्वत: सहभागी झाल्याशिवाय ही बोली शिकता येत नाही हे निश्चित आहे. ही भाषा-बोली शिकताना खूप कष्ट घ्यावे लागतात. मनात शिकण्याची ऊर्मी ठेवावी लागते. इथे आपल्या आवडी-निवडीला, छंदाला, समज-गैरसमजाला काही अर्थ नसतो. तो समूह जसा म्हणेल त्याप्रमाणे आपणास बदलावे लागते. त्यांच्याशी हितगुज साधतच शिकण्याचे पुढचे पाऊल टाकावे लागते. त्यांच्यातील श्रद्धा-अंधश्रद्धा व त्यांचे विशिष्ट मतप्रवाह यावर जास्तीचे भाष्य करून चालत नाही. त्यांना सुधारवण्याचा आणि त्यांच्यात लगेच बदल करण्याचा प्रयत्नही करता येत नाही. काही गोष्टी त्यांच्या दृष्टीने चुकीच्या वाटल्या की ते बोली शिकविणार नाहीत. त्यांच्या मनात आपल्याबद्दलचा संशय कायम राहत असतो. त्या मानसिक अवस्थेतच आपणाला शिकत राहावे लागते. दररोज मिळणाऱ्या शब्दांचा, वाक्याचा स्वत:चा असा शब्दकोश लिखित स्वरूपात तयार करावा लागतो. सराव करणे व समूहात मिसळणे हाच एकमेव मार्ग बोली शिकण्याचा असलेला दिसतो. कोणत्याही समूहाची बोली एकदा शिकली म्हणजे ती बोली कायमची शिकली किंवा बोलता आली असे होत नाही. कोणतीच गुप्त बोली ही कायमची नसते. तो समूह संरक्षणार्थ त्या बोलीत काळानुरूप बदल करीत असतो. त्यामुळे शिकलेली भाषा ही त्या काळापुरतीच मर्यादित असते. काळ बदलला की समूह त्या भाषेतील बराचसा भाग नष्ट करतो आणि नवीन काळ, संदर्भानुसार नवीन भाषा तयार करतो. त्यामुळे प्रत्येक गाव, बोली शिकलेल्या व्यक्तीला पुन्हा त्या समूहात सहभागी होऊन बदलते संदर्भ, बदलती भाषा व शब्द शिकावे लागतात आणि त्यासाठी पुन्हा समूहात सहभागी व्हावे लागते.

गुप्त भाषा या आजच्या काळात आधुनिक झाल्या आहेत. या भाषांनी नवीन तंत्रज्ञान आणि संदर्भ स्वीकारले आहेत. त्यामुळे ही भाषा व्यवसाय आणि प्रसार यानिमित्ताने सोशल मीडियावर शब्द, कोडे, खाणाखुणा, चिन्हे या स्वरूपात वापरली जात आहे. गुप्तबोली ही स्थानिक राहिलेली नाही. तिचे अस्तित्व हे विश्वपातळीवर दिसून येते. गुप्तबोलीचे विविध प्रकार हे समूह, गट, जाती-उपजाती यानुसार वेगवेगळे आहेत. असे असले तरी गुप्तबोली ही प्रांत व भागात बोलली जाते. पण ती कधीच एकसारखी असत नाही. विभिन्नता आणि प्रयोगशीलता हे तिची वैशिष्ट्ये आहे. भारतातील गुप्तबोलीविषयी डॉ. प्रभाकर मांडे यांनी नेमकेपणाने प्राचीन परंपरा सांगितली आहे, ते म्हणतात की, भारतात धर्म, संप्रदाय, व्यवसाय अशा निरनिराळ्या आधारावर जे गट किंवा समूह निर्माण झालेले आहेत, त्यांच्यामध्ये आपल्या धर्मविचारासंबंधी, तत्त्वज्ञानाविषयी किंवा व्यावसायिक विशेषांविषयी गुप्तता राखण्याची प्रवृत्ती दिसून येते. अशा प्रकारे गुप्तता राखण्याची परंपरा फार प्राचीन आहे हे मांडे यांचे मत रास्त वाटते.

गुप्तबोली हा समूहाचा आविष्कार असतो. समूहामध्ये जे ठरलेले आहे, नियोजले आहे, त्याप्रमाणे ती बोली व्यक्त होत असते. गुप्तबोली ही सोन्याच्या खजिन्याप्रमाणे म्हणजेच 'म्हातारीची पिशवी' याप्रमाणे त्या त्या समूहात जपून ठेवली जाते. गुप्तबोलीबद्दल प्रत्येकाच्या मनात आकस आहे. त्या समूहात काहीतरी वेगळे चाललेले असते. असा समज-गैरसमज आहे. जोपर्यंत गुप्तभाषा या अनेक तयार झाल्या. पण त्या इतर समूहाच्या संपर्कात व्यवहारात आलेल्या दिसून येत नाहीत. त्या दुसऱ्या समूहाला शिकविल्या जात नाहीत. त्यामुळेच गुप्तभाषांचे आदिमपण आणि मूळपण आजही टिकून आहे. गुप्तबोली ही समूह, जात-गटानुसार जशी आढळून येते. बोलली जाते. त्याचप्रमाणे ती भाषा राजदरबारी, तसेच गुप्तचर संस्थाच्यामध्येही बोलली जाते.

आज जगातील प्रत्येक देशाने गुप्तचर संस्था स्थापन केलेल्या आहेत. त्या संस्थाच्या माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यातील माहिती मिळवली जाते. भारताची-रॉ, इस्त्राईल-जाता मोसाद, सोव्हिएत रशिया- के. जी. पी, पाकिस्तान- आयएसआय अशा काही गुप्तचर संस्थांची नावे सांगता येतील. आज २१व्या शतकात गुन्हेगारी व आतंकवादी हेदेखील गुप्तभाषेचा वापर करीत असलेले दिसतात. त्यांची कोड लॅंग्वेज ही फक्त त्यांच्यापुरतीच मर्यादित असते. त्यामुळे त्याचा उलगडा सहजासहजी दुसऱ्यांना होताना दिसत नाही. याप्रमाणे मराठी समूहातील जगभरातील, तसेच भारतातील गुप्तभाषेचे स्वरूप विविधांगी आहे. प्रत्येक समूहानुसार प्रत्येक बोलीला वेगवेगळे पदर असलेले दिसतात. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत ही बोली चालत आलेली आहे. काळानुरूप तिच्यामध्ये बदल झालेले दिसून येतात. या बदलाचा विचार आणि संशोधन वेळोवेळी होणे आवश्यक वाटते.

महाराष्ट्रासह जगभरात गुप्तबोली बोलणारे मराठीसमूह आहेत. हे समूह जात, धर्म, संप्रदाय, व्यवसाय, लिंग, वय आदीनुसार निर्माण झालेले आहेत. भटक्या जाती, अनुसूचित जमाती, व्यावसायिक, सांप्रदायिक, गुप्तहेर, साहित्यिक, प्रशासकीय, शेतकरी व कामगार, ग्रामदैवतांचे भगत, लोकज्योतिषी अशा समूहाच्या विविध प्रकारानुसार गुप्तबोलीचे स्वरूप वेगवेगळे आढळते. महाराष्ट्रात अंबुजी, चौरासी, वाघेरी, छप्परबंद, पारसी, डागुरी, बागवानी, करपल्लवी, साखित, च बोली, मिताक्षरी, कोडवर्ड, चित्रलिपी, अंकभाषा, मुखस्थविद्या, वाद्याची भाषा, आडबोली, सकळा, अंकपल्लवी, गुप्तलिलाव, देह गुप्त बोली, कोड लॅंग्वेज, जंगली, जडभाषा, संगमेश्वरी, वडारी, चिडक, नंदभाषा, बोटंमोडी, टकारी अशा ३० प्रकारच्या गुप्त व सांकेतिक भाषा आढळतात. या प्रत्येक जाती जमातींच्या गुप्तबोलींचे समाजव्यवहारातील संपर्कप्रक्रिया व संप्रेषणव्यवहार विविधांगी आढळतो.

गुप्तबोली बोलणाऱ्या मराठी समूहामध्ये विमुक्त-भटक्या जाती-जमातींची संख्या अधिक आहे. या समूहांनी आपले परंपरागत व्यवसाय जपत संरक्षण व गुप्ततेसाठी आपल्या गुप्तबोली निर्माण केल्या. आज कमी प्रमाणात या बोली त्या त्या समूहात रूढ असलेल्या दिसून येतात. कोल्हाटी, वैदू, गोपाळ, कैकाडी, रायरंद, डक्कलवार, शिकलगार, रामोशी, डवरी आदी समूहाच्या गुप्तभाषेस पारसी असे म्हणतात. या सर्व समूहाची गुप्तभाषा 'पारसी' असली तरी प्रत्येक समूहानुसार प्रत्येक जातीची शब्द, वाक्यरचना काही अपवाद वगळता वेगवेगळी असलेली दिसून येते. विमुक्त व भटक्या जाती समूहातील काही जातींची स्वतंत्र अशी गुप्तबोली आहे. नंदीवाले-नंदीवाले बोली, राजपूत भामटा-डागूर, टकारी भामटा टकारी, छप्परबंद-छप्परबंद गुप्तबोली, कटबू-चिडक, कंजारभाट-चौरासी या समूहांनी स्वतंत्र गुप्तबोली निर्माण केलेल्या आहेत. मांग समूहाची अंबुशी किंवा अबुजी गुप्तबोली ही वेगळी असलेली दिसते. मराठी समूहात अनेक भटक्या व विमुक्त जाती-जमाती आहेत की त्यांच्यामध्ये गुप्तबोली बोलल्या जातात. त्या आजही टिकून आहेत. परंतु येथे प्रातिनिधिक स्वरूपात काही जातींच्या गुप्तबोलींचा विचार केलेला आहे. सर्वच जातीतील गुप्तबोलींचा शोध घेणे आवश्यक व महत्त्वाचे ठरेल.

टकारी भामटा हा समूह महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आढळून येतो. त्यांची 'टकारी' ही सांकेतिक व गुप्तभाषा आहे. या गुप्तभाषेत तेलगू आणि कन्नड भाषेतील शब्द आढळतात. पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक व कोल्हापूर जिल्ह्यातील ठरावीक ग्रामीण भागात ही बोली बोलली जाते. या गुप्तबोलीत कट्टेड (पोलीस), वैचलू (रुपये), फडुइल्ल (तुरुंग), गोवड (फौजदार), बचकू (दागिना), मूचड (चोर) असे शब्द आढळतात. छप्परबंद या समूहाची लोकसंख्या खूपच कमी आहे. इंग्रजकाळात हा समूह नाणी तयार करून व्यवहारात आणत. त्याकाळी इंग्रजांनी समूहाला गुन्हेगार ठरविले. ते स्वतःची अशी 'छप्परबंद'ही गुप्तबोली बोलतात. हा समूह जळगाव, होटगी, सोलापूर व मुंढवा येथे आढळतो. छप्परबंद गुप्त बोलीत कैकाडी, कंजारभाट समूहाच्या बोलीतील, तसेच कन्नड भाषेतील बोण्णा (सोने),

कल्ल (दारू), कुत्ता खपराळ (शिपाई), चिबडा (कामगार), नावडी (पोलीस चौकी), दोक (घर), मंडळ (टोळी), टिपी (भाकर) याप्रमाणे शब्द येतात.

या गुप्तबोलीत तोब गया (पोलिसाच्या हातावर तुरी दिली), खांमुर लो (खोटी नाणी करायला सुरुवात करणे) अशी वाक्यरचना आढळते. छप्परबंद समूह अल्पप्रमाणात असला तरी तो संघटित आहे. नवीन व्यवसाय, नोकरी व शासकीय सुविधाच्या शोधात असलेला दिसतो.

कटबू हा समूह महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात आढळतो. विजापूर, कारवार व सोलापूर परिसरात या समाजाचे वास्तव आहे. त्यांनी समूहांतर्गत व्यवहारासाठी 'चिडक' ही सांकेतिक बोलीभाषा निर्माण केली. या भाषेत कोकणी बोलीतील अनेक शब्द आहेत. काही शब्द डवरी समूहाच्या गुप्तबोलीतीलही दिसून येतात. उदाहरणार्थ, मन्याळ (पाणी), पनवा (पुरुष), ढोकळा (रुपया), झोरगोळ (मटण), पनवी (स्त्री) इत्यादी. कटबूसमूहाची लोकसंख्या ठरावीक असल्यामुळे ही बोलीही कमी प्रमाणातच वापरली जाते.

कंजारभाट हा समूह महाराष्ट्रात गावोगावी जाऊन पाले ठोकून भटकंती करणारा समूह आहे. हा समूह दादागिरीने भिक्षा मागत असल्यामुळे लोकांच्या मनात या समूहाबाबत भीतीचे वातावरण असते. पूर्वी या समूहातील स्त्रिया गैरकृत्य करीत असत. आज कोल्हापूर, इचलकरंजी, पुणे, संगमनेर, नंदुरबार, जळगाव आदी ठिकाणी रहिवासी झालेले दिसतात. हा समाज हिंदूधर्मीय आहोत असे सांगतात. त्यांची 'चौरासी' ही सांकेतिक व गुप्तभाषा आहे. या गुप्तबोलीत नांद (गाव), खावर (घरफोडी), नोकीदार (चौकीदार), होडा (तुरुंग), न्हो (शंभर), रेढी (गाढव), बलवा (रुपया), लोड (बैल), चिमडी (तलवार), थर (तीन), खतीस (तीस)असे शब्द दिसून येतात.

भटक्या जातीत मांग - अंबुजी, वडार - वड्डेरी, शिकलगार - जडभाषा, राजपूत भामटा - डागूर अशा गुप्त बोली वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

जगभरातील मराठी समूहाचा विचार करता भटक्या जाती-जमातीबरोबरच आदिवासी जमाती ठिकठिकाणी आढळतात. महाराष्ट्राचा विचार करता तडवी, भिल्ल, अहिर, महादेव कोळी, वारली, ठाकर, कोरकू अशा अनेक जमाती जंगल व डोंगराच्या परिसरात राहतात. आदिवासी जमातीची संस्कृती, रूढी, परंपरा, भाषा व जीवनशैली ही वेगवेगळी असलेली दिसते. या जमाती जातनिष्ठ अशा गुप्तबोली बोलतात. या जमातींनी कायद्यापासून संरक्षण मिळवण्यासाठी, समूहांतर्गत व्यवहारासाठी गुप्तबोली निर्माण केल्या. त्या आजही टिकून आहेत. मराठी भाषेत आदिवासीच्या प्रमुख भाषेप्रमाणेच गुप्तबोली-भाषाही महत्त्वपूर्ण आहेत. पारधी ही सातत्याने भटकंती करणारी आदिवासी जमात आहे. पूर्वीच्या काळी या समूहातील लोक शिकार व मासेमारी करून आपला उदरर्निवाह करीत. पारध म्हणजे शिकार करणे यावरूनच जमातीस पारधी नाव पडले. भारतात महाराष्ट्र, राजस्थान व गुजरात आदी राज्यात ही जमात आढळते. फासेपारधी, हरणपारधी, मीर कोरचार व वाघरी अशा पोटजाती आहेत. त्यांची 'पारसी' ही गुप्तबोली आहे. काही उपजाती वाघेरी गुप्तबोली बोलतात. ही बोली पारधी, मारवाडी, गुजराथी व राजस्थानी मिश्रित आहे. त्यांच्या भाषेत डोड्या (पोलीस पाटील), साटो (ऊस), वशाळी (चोरी), खपाई (शिपाई), बटलो (पाखरू) असे शब्द, याचबरोबर खपाई आवास मूल (शिपाई येतो आहे पळ) अशी वाक्यरचनाही आढळते. पारधी हा समूह प्रदेशानुसार वेगवेगळ्या उपजातींमध्ये दिसतो. त्यांची गुप्तभाषा ही वेगवेगळी आहे. आज हा समूह शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी होत असला तरी नोकरी व शासनाच्या विविध सुविधांच्या विवंचनेत आहे. त्यांच्या गुप्तबोली आजही त्या त्या समूहात प्रचलित आहेत.

पूर्वीच्या काळी गुन्हेगार म्हणून समजला जाणारा भिल्ल हा एक आदिवासी समूह आहे. त्यांनी इंग्रजांविरोधात केलेले उठाव इतिहासात नोंद आहेत. भिल्लांनी स्वतःच्या संरक्षणासाठी व कायद्यापासून बचाव व्हावा या उद्देशाने स्वतःची पारसी ही गुप्तभाषा निर्माण केली. त्यांची व्यवहाराची भाषा 'भिलोरी' ही स्वतंत्र आहेच. पण गुप्ततेसाठी त्यांनी भिलोरी मिश्र अशी पारसी गुप्तभाषा तयार केली. या गुप्तभाषेत भिलोरीतील ह, व, र, म, हे वर्ण योजून व स्वरांचे शब्दातील स्थान बदलून आणि कधी कधी नवे स्वर योजून गुप्तबोली बोलली जाते. या गुप्तबोलीतील शब्द जास्मा (जा), येरमे (ये), घोरमोड (घोडा), भारमाकर (भाकर), दूरमूध (दूध) याप्रमाणे दिसून येतात. भिल्लांच्या पारसीत परमिनी पी (पाणी पी), दारमारू पेरवानी का? (दारू प्यायाची का?), धरमरी लिद्या (धरून नेले) या प्रकारची वाक्यरचना आढळते. भिल्ल हा आदिवासी समूह असून त्यांची व्यवहाराची बोली भिल्लोरी आहे. तर समूहांतर्गत पारसी ही गुप्तभाषा बोलली जाते. आज भिल्लसमूह शैक्षणिक सामाजिक दृष्टीने प्रगती करताना पाहावयास मिळतो. त्यांची पारसी ही गुप्तबोली आजही

समूहात प्रचलित आहे. तडवी हा आदिवासी जमातीचा समूह आहे. तो सातपुडा पर्वतरांगेच्या पायथ्याशी वास्तव्य करतो. तडवी हे स्वतःला भिल्ल समाजाचे वंशज मानतात. तडवी ही त्यांची मातृभाषा आहे. तर 'जंगली' ही गुप्तभाषा आहे. हा समूह जंगली गुप्त भाषेस 'निसर्गभाषा' असेही म्हणतो. या समूहाने जंगली गुप्तभाषेची निर्मिती ही निसर्गातील अनेक वस्तू, पशू, प्राणी, पक्षी, झाडे, पाने व इतर रोजच्या जीवनातील वस्तू, आवाज, नाद इत्यादीचा उपयोग करून केलेली आहे. हा समूह आपली संस्कृती, रूढी-परंपरा यांचे संरक्षण करण्यासाठी, तसेच परंपरेचे जतन करण्यासाठी जंगली गुप्तबोलीचा वापर करतो. याप्रमाणे भिल्ल हा समूह जंगली ही गुप्तभाषा बोलतो. आजही हा समूह ही भाषा जपताना दिसतो. अशा प्रकारे मराठी समूहामध्ये आदिवासी जमातीमध्ये गुप्तबोलींची परंपरा आढळते. महाराष्ट्रात भिल्ल, वारली, कोरकू, कातकरी, महादेव कोळी अशा अनेक आदिवासी जमातींचे समूह आहेत. प्रत्येकाची व्यवहाराची भाषा स्वतंत्र आहे. काही समूहात गुप्तभाषाही प्रचलित आहेत.

सराफी बाजारातील नंद भाषेस १३ व्या शतकापासूनची परंपरा आहे. धनगर समाजाची शेळीमेंढी खरेदी-विक्री करतानाची पारसी गुप्तबोली आजही प्रचलित आहे. कापड व्यावसायिक बागवानी गुप्तबोलीचा वापर करतात. जनावरी बाजारातील व्यापारी व दलालांची पारसी व गमज्यातील बोटेमोडी गुप्तबोली सर्वत्र दिसते. खाटिक, हॉटेल, मटका, जुगार-पत्ते या व्यावसायिकांची गुप्तबोली गाव, प्रदेश व समूहानुसार वेगवेगळी आढळते.

जगातील अनेक राज्यात, प्रांतातील विविध संप्रदायामध्ये गुप्त व सांकेतिक भाषा आहेत. बौद्ध, ख्रिश्चन, हिंदू, मुस्लीम, महानुभाव, रामानुज व जैन अशा प्रत्येक संप्रदायांमध्ये गुप्त व सांकेतिक भाषा या प्राचीन कालखंडापासून चालत आलेल्या आहेत. आजही या विविध संप्रदायांमध्ये काळानुरूप बदललेल्या गुप्तभाषा आढळतात. आपल्या संप्रदायांचे तत्त्वज्ञान व अंतर्गत बाबी इतरांना कळू नये, गरजेवेळी संप्रदायातील अनुयायी यांनी संप्रदायाने तयार केलेल्या विशिष्ट गुप्त व सांकेतिक भाषेत बोलावे यासाठी प्रत्येक सांप्रदायिकांनी स्वतःच्या समूहासाठी गुप्तभाषेची निर्मिती केली. काळानुरूप त्या भाषेत व संकेतामध्ये प्रत्येक संप्रदायांनी बदल केलेले दिसतात. बौद्ध धर्मसंप्रदायामध्ये एक विशिष्ट अशी सांकेतिक भाषा वापरली जाते. ही गुप्त व सांकेतिक भाषा समजून घेतल्याशिवाय अनुयायींना बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान व त्यातील आचारसंहिता कळत नसत. भारताचा विचार करता ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात बौद्ध धर्मात आपली गुप्तता ठेवण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केलेले दिसून येतात. या काळात गौतम बुद्धांचे निरोप हे विशिष्ट सांकेतिक भाषेत बदलत असत.

उदाहणार्थ, एखाद्या संदेशामधील सगळ्या स्वर व्यंजनामध्ये अदलाबदल केली जायची किंवा प्रत्येक शब्दामधील अक्षर उलट क्रमाने लिहिली जायची. लिहिलेला मजकूर समजू नये म्हणून तो वेगळ्याच कोनात म्हणजे तिरका व आडवा लिहिला जायचा.

कुमारिलभट्ट यांना बौद्ध धर्मामध्ये जाऊन त्यांचे संकेत व तत्त्वज्ञान शिकावे लागले.

याबाबत मा. शं मोरे यांनी मत व्यक्त केले आहे की, 'ज्यांना पंथाची दिक्षा दिलेली आहे, त्यांनाच ही गुप्तबोली शिकवली जात.' बौद्ध धर्मामध्ये विशिष्ट तऱ्हेने काढलेली वर्तुळे म्हणजे मुद्रा अशा स्वरूपाचे गुप्त अर्थ बोलीत असत. ठिकठिकाणची जी बौद्ध लेणी आहेत, त्यामध्ये ब्राह्मी लिपीत शिलालेख उपलब्ध आहेत. त्यातही गुप्तता दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यापासून अनेक मराठीजन या धर्मात सहभागी झाले आहेत. यापूर्वी अनेक जण सहभागी होते; पण प्रमाण कमी होते. जगभरातील मराठीसमूह या धर्माचे अनुयायी असून ते बौद्ध धर्मातील गुप्तभाषेचा वापर करताना दिसतात. बौद्ध धर्मातील चर्चगीतांचे कवी व महामानव हे बौद्धाचे तांत्रिक व यौगिक संप्रदायातील सिद्धाचार्य होते. त्यांच्या गीतांची भाषाही सांकेतिक होती. तिला 'संध्या भाषा' असे म्हणत. तसेच काहीजण 'अंदर की बात' असेही म्हणतात. याप्रकारे बौद्ध धर्मात गुप्ततेची परंपरा चालत आलेली आहे.

बौद्ध धर्माप्रमाणे हिंदू धर्मामध्येही गुप्त व सांकेतिक भाषा आढळते. हिंदू धर्मामध्ये मराठीसमूहही सहभागी आहे. भारतात वैदिकांची एक संकेतभाषा असल्याचे महारूद्योपाध्याय यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांनी सांगितले आहे. महाभारत, रामायण, भगवद्गीता आदी धार्मिक ग्रंथांमध्ये सांकेतिक भाषेचे उल्लेख आलेले आहेत. हिंदू धर्मात विविध जाती-जमाती यांचा समावेश होतो. या सर्व जातीची स्वतंत्र अशी गुप्तभाषा आहे. ती सर्वत्र बोलली जाते.

महाराष्ट्रासह देशात जैन धर्माचे कार्य प्राचीन काळापासून आजपर्यंत सुरू आहे.

संप्रदायाचे अनुयायी अंतर्गत समूहामध्ये स्वतःची अशी गुप्तभाषा बोलतात. जैन संप्रदायात विविधांगी स्वरूपाचे साहित्यलेखनही झालेले आहे. त्यामध्येही गुप्त-सांकेतिक

बोलीचा वापर होत असे. उदाहरणार्थ, परमाणूला मुद्‌गल म्हणायचे असा संकेत होता. घातीकर्म, अघातीकर्म, स्कंद, संस्कार, कंद, जीव, अजीव, संवर, निर्जर असे कितीतरी गुप्त संदेश जैन वाययात आढळतात.

जैन धर्मातील विविध प्रथांमध्येही गोपनीयता ठेवली जाते. मृतप्रसंगी शोकप्रदर्शन करताना जैन समाजात गाणी म्हणण्याची प्रथा आहे. ही गाणी काही महिलांनाच येतात आणि ती गाणी गुप्त ठेवतात. जैन धर्मात गुप्तबोली व सांकेतिक भाषा ही रूढ असल्याचे दिसून येते.

महानुभाव संप्रदायात व्यावहारिक बोलीबरोबरच गुप्त व सांकेतिक भाषेचा वापर केला जात होता. महानुभावाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी संप्रदायाचे जे तत्त्वज्ञान आणि विचारधन सांगितले होते, तेच अनुयायांपर्यंत पोहचावे यासाठी या संप्रदायात विशिष्ट अशा लिप्या आणि सांकेतिक भाषा निर्माण केलेल्या होत्या. संप्रदायात गोपनीयता राहावी यासाठी नागरिक, सुंदर लिपी, पारपांडत्य लिपी, अंक लिपी, शून्य लिपी, सुभद्रा लिपी, श्री लिपी, ब्रजलिपी, मनोहरा लिपी, कविश्वरी लिपी, सकळा अशा तीस लिप्या तयार केलेल्या होत्या. या सर्व लिप्यांना गुप्ततेचे कवच होते. या संप्रदायात अक्षराऐवजी अंक वापरले जायचे. यातून अंकपल्लवी लिपीची निर्मिती झालेली दिसते. उदाहणार्थ, अ-२, ६-३, ४-४, क-६, ख-७, ६-२०, ५-२३, स-३१, १-३४, ज्ञ-३५

याप्रमाणे महानुभाव संप्रदाय हा मराठी भाषेच्या लेखन रचनेसाठी जसा महत्त्वाचा ठरतो, तसाच तो गुप्त व सांकेतिक भाषा आणि लिप्या निर्माण करण्यातही. या संप्रदायाचे कार्य उल्लेखनीय आहे.

महाराष्ट्र-गोवा राज्यातील अनेक मराठी समूहांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. ख्रिश्चनधर्मातही गुप्तता पाळली जात. सांकेतिक भाषेचा वापर होत असे. त्यांचा धर्मग्रंथ 'बायबल'मध्ये 'च' भाषेचा वापर झालेला आहे. हिब्रू भाषेतही गुप्तभाषेशी संबंधित अशी 'अथश' नावाची पद्धत रूढ होती. यामध्ये मूळ संदेशातले पहिले आणि शेवटचे अक्षर यांची अदलाबदल केली जायची. असेच उरलेल्या अक्षरांच्या बाबतीत करून त्यातून 'च'च्या भाषेतला संदेश तयार केला जायचा. उदारणार्थ, आपणास 'खतरनाक' असा मूळ संदेश द्यावयाचा असेल तर 'अथश'मध्ये तो 'कनारतख' असा होईल.

ख्रिस्तपूर्व ६०५मध्ये डॅनिएल यांनी भाषेविषयी मांडलेले मत विचारात घेतले तर 'बायबल' या ग्रंथास आधारभूत मानून 'च'च्या म्हणजे गुप्तभाषेतला तो पहिला तज्ज्ञ मानला जातो. साहित्य क्षेत्रातही 'च' भाषा आढळते. डॅन ब्राऊन यांनी 'द दा विंची कोंड' या कादंबरीत येशू ख्रिस्ताच्या काळापासून ज्या रहस्यांचे जतन त्यांच्या घराण्याने केले होते, ते रहस्य यापुढेही अबाधित राहावे, दुसऱ्या कोणास ते कळू नये यासाठी 'ब्रदरहूड' स्थापन केली. त्यामार्फत सैनिक गट तयार करून गुप्त कागदपत्रे जमा करीत अशी माहिती आलेली आहे. ख्रिश्चन धर्मात 'प्रायरी ऑफ सायन' व 'ओपन देई' या गुप्तसंघटना धर्मातील गुप्तरहस्याचे पिढ्यानपिढ्या जतन करण्याचे कार्य करीत आहेत. इस्लाम धर्मातही गुप्त व सांकेतिक भाषेचा वापर प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. इस्लामचा प्रसार करताना अनेक प्रकारच्या गुपितांसाठी गुप्तभाषेचा वापर केला जायचा.

यासाठी मूळ अक्षरांच्या ऐवजी दुसरी अक्षरे वापरली जात. या गुप्तभाषेत अक्षर वापरण्याऐवजी , !, / अशी चिन्हे वापरली जात असत. अरबांनी खूप मेहनत करून 'मोनोअल्फाबेरिक सबस्टिट्यूट सायफर' या प्रकाराचे तंत्रज्ञान विकसित करून मूळ संदेश गूढ भाषेत ठेवण्यात आले. यासाठी 'क्रिप्टोनॉलिसिस' तंत्र नव्याने शोधले. हे इस्लाम धर्मात गुप्तभाषेसाठी महत्त्वाचे मानले जाते.

अशा प्रकारे मराठीसमूह हे हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध, इस्लाम व जैन धर्मामध्ये सहभागी झालेला दिसतो. या समूहांनी प्रत्येक धर्माच्या तत्त्वज्ञान व आचारसंहितेप्रमाणे गुप्त बोलीभाषेचे पालन केले. गुप्तभाषेत व्यवहार करीत. विविध संप्रदायाचे व धर्माचे तत्त्वज्ञान टिकविण्यासाठी मराठीसमूहांनी केलेले प्रयत्न महत्त्वपूर्ण आहेत.

महाराष्ट्राबाहेरील इतर राज्यातील, तसेच परदेशातील मराठी जन हे विविध गुप्तबोलींचा वापर करतात. मराठी भाषेतील साहित्यिकांनी कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथन, डायरी व ग्रंथांमध्ये गुप्त व सांकेतिक भाषेचे वर्णन केलेले आहे. लहान मुले, स्त्रिया, गुन्हेगार, नक्षलवादी, आतंकवादी हे गुप्तबोलीचा वापर करतात. ग्रामदैवतांचे भगत हे विशिष्ट अशी पारसी गुप्तबोलीचा वापर करतात. बिरोबाचे भगत 'हुईक', मेंढकी समूह 'ताडदेव भाडळी' भवानीमातेचे गोंधळी 'गोंधळ', लक्ष्मीआईचे भगत 'नवस' अशा विधीवेळी आपापल्या गुप्त व सांकेतिक भाषेत बोलत असतात. राघूवाले, कुडमोडी, पिंगळे, सहदेव, सटवाईवाले, डवरी, कापडी व मनेरी या सर्व जोशी-समूहातील लोकज्योतिषी हे परंपरागत व्यवसायाच्यावेळी गुप्तबोली वापरतात. गणिती, वाद्यांची गुप्त व सांकेतिक

भाषा सर्वत्र आढळते. सर्व गुप्त बोलीत काळानुरूप बदल झालेले आहेत. आज माहिती तंत्रज्ञान, सोशल मीडिया, संगणक, इंटरनेट यांचा वापर गुप्त बोलीसाठी होताना दिसतो.

प्रत्येक बोलीभाषेला एक व्याकरणव्यवस्था आणि स्वतंत्र भाषिक व्यवस्था असते. गुप्तबोलीची वर्णमाला पुढीलप्रमाणे आढळते. स्वर: अ, आ, इ, ई, उ ऊ, ए, ऐ, ओ, औ, ॲ, ऑ, असे एकूण १२ स्वर,

स्वरादी : अं एक स्वरादी. व्यंजने क, ख, ग,

च, छ, ज, झ. , ट, ठ, ड, ढ, ण,

त. थ, द, ध, न , प, फ, ब, भ, म,

अशी एकूण वर्गीय व्यंजने २३.

य, र, ल, व, श, ष, स, ह, ळ अशी इतर व्यंजने ९ आहेत. याप्रमाणे मराठी गुप्तबोलीत १२ स्वर, ०१ स्वरादी आणि ३२ व्यंजने अशी वर्णमाला आढळते.

मराठीच्या गुप्तबोलींचे डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. गणेश देवी, डॉ. अजीज तडवी, डॉ. यु. म. पठाण अशा मोजक्याच अभ्यासकांनी संधोधन व लेखन केलेले आहे. मराठीच्या विविध समूहातील तीसहून अधिक गुप्तबोली या मौखिक स्वरूपात आहेत. तिचे संकलन, विश्लेषण आणि प्रकाशन करण्यासाठी शासन, संशोधनसंस्था आदींनी आर्थिक पाठबळ देणे आवश्यक आहे. भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, भटक्या जाती यांच्या गुप्त व सांकेतिक भाषा आजही समाजात प्रचलित आहेत. शासनाने गुप्तभाषेच्या अभ्यासाला चालना द्यावी व सर्वतोपरीने मदत करावी.

माहिती-तंत्रज्ञानाचा गैरवापर करून आतंकवादी, नक्षलवादी, गुन्हेगारी आदीजण हे गुन्हेगारीसाठी 'कोड लँग्वेज', गुप्त सांकेतिक बोलीचा वापर करीत आहेत. त्यांच्या गुप्तबोलींचे सर्वेक्षण करून तशी समाजात जनजागृती करण्यासाठी शासन, सामाजिक-संशोधनसंस्था आदींनी सहभाग घेणे आवश्यक आहे. गुप्तबोलीच्या सर्वेक्षणासाठी विद्यापीठस्तरावर संशोधनप्रकल्प, एम. फिल, पीएच.डी.साठी विषय देऊन स्वतंत्रपणे एका एका बोलीचा सखोल अभ्यास करण्यात यावा.

संशोधक, अभ्यासक व लेखकांना मराठीसमूहाच्या गुप्त बोली, लोकसंस्कृती जतन करणेसाठी प्रोत्साहित करावे. सर्व ग्रंथालयामध्ये गुप्तबोलीविषयी पुस्तके, ग्रंथ उपलब्ध करून देणे आणि वाचकांची अभिरुची वृद्धिंगत करणे महत्त्वाचे वाटते.

युनो/युनोस्को या जागतिक स्तरावरील भाषाभ्यासाच्या संघटनांनी मातृभाषा, बोली यांच्या संशोधनाला महत्त्व व प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे सर्वत्र बोलींचे संशोधन सुरू आहे. प्रस्तुत संशोधन हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे. गुप्त बोलीच्या अभ्यासामुळे मराठीसमूहातील आंतरसंबंध, संस्कृती, मानवजातीचा इतिहास, गुप्तबोलींचे ज्ञानभांडार, बोलीतील साम्यभेद, रूढी-परंपरा आदी सर्वांसाठी खुल्या होत आहेत. गुप्तबोलीतील प्रभाव, भाषामिश्रण, बोलीची नवनिर्मिती, साहित्यनिर्मिती आदी गुप्तबोलीतील संशोधनाचे नवीन विषय उपलब्ध आहेत. हे विषय नवोदित संशोधकांसाठी दिशा देतील. गुप्तबोलीचा स्वतंत्र शब्दकोश तयार करता येईल. मराठीच्या गुप्तबोली या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करून त्यातील शोधनिबंधाचे पुस्तक प्रकाशित करता येईल. भटक्या जाती आणि आदिवासी जमाती यांच्या गुप्तबोर्लींचे संशोधन करून व्याकरणरचना स्पष्ट करणे गरजेचे वाटते.

**– डॉ. अनंता कस्तुरे**

## भाषाभान

समाजाच्या पोटात शिरायचं असेल, तर सर्वात मोठा आधार भाषेचा घ्यावा लागतो. अन्य कुठलीही आमिषे तात्पुरती आणि तकलादू ठरतात. भाषेशिवाय आपण कुठलाही व्यवहार करू शकत नाही, संवाद करू शकत नाही, हे सत्य जाणून प्रथम भाषा आत्मसात करणे, हे फादर स्टीफन्स यांनी ओळखले होते. आजही आपण भाषेचे महत्त्व एकमेकास पटवून देत असतो. बोलीभाषांना जवळ करायचे म्हणजे माणसांजवळ जाण्याचा मार्ग सुकर होतो. आपला विचार, आपले सांगणे, समोरच्याचे ऐकणे, त्याला समजावून सांगणे, त्याला आपलेसे करणे आणि आपण त्याचे होणे, या सर्व व्यवहारात भाषेशिवाय आणि बोलीभाषेशिवाय दुसरा मार्गच नाही, हे फादर स्टीफन्स यांनी लक्षात घेतले होते. त्यामुळे गोव्यात पडलेले त्यांचे पहिले पाऊल (इ. स.१५७९) धर्मप्रसाराचे न ठरता गोव्यातील स्थानिक भाषा कोकणी, मराठी, आणि कारवारी आत्मसात करण्यासाठी उचललेले दिसते.

**संदर्भ : 'शालोम' – साहित्य अकादेमी प्रकाशन, दिल्ली.**



बोलीभाषा विशेषांक

लेख

# बोली-भाषेतील कथाविश्व

मनीष पाटील

**जगातल्या प्रत्येक बोलीभाषेत गंमत आहे आणि तीच एक मोठी शक्तीसुद्धा आहे. बोली समजावून सांगावी लागत नाही, एका हृदयातून मार्दव घेऊन बाहेर पडते आणि दुसऱ्या हृदयापर्यंत सहज पोहचते. हजारो वर्षांपासून बोलीभाषा नैसर्गिक पद्धतीने निर्माण व विकसित होत आलेल्या आहेत. त्या साचेबद्ध नाहीत. त्यांना व्याकरणाचं कुंपण नाही. बोलीची लय माणसाच्या हृदयाचा ठाव घेते. म्हणूनच कोणतीही बोलीभाषा उमगायला फारशा अडचणी येत नाहीत.**

**बोलीभाषा** हा माझ्या आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय. मुंबईसारख्या शहरात आज मला जवळजवळ पस्तीस वर्षं झाली; पण मी माझी बोली विसरलो नाही. किंबहुना तिला मी माझ्यातून दूर होऊ दिले नाही. माझ्या बोलीभाषेविषयी मला आधीही कधी न्यूनगंड नव्हता आणि आजही नाही. मी कथा लेखनाला सुरुवात केल्यावर पहिली कथा माझ्या खानदेशी (लेवा गणबोली) बोलीतच लिहिली. लिहिली म्हणजे तशी ती मी ठरवून लिहिली नाही तर ती आपसूक माझ्या बोलीतूनच बाहेर आली. माझं बालपण जास्तकरून गाव-खेड्यात व्यतीत झालेलं असल्याने आणि कथेतील प्रसंगसुद्धा त्याच पार्श्वभूमीचे असल्याने असेल, ती कथा माझ्या बोलीभाषेतून उमटली असावी. ती उत्तम झाली. वाचकांनाही खूप आवडली. त्या कथेवर येत गेलेल्या प्रतिक्रियांनी मला चांगलाच हुरूप दिला आणि मग आवर्जून मी बोलीतून कथालेखन करू लागलो. काही ठराविक भाग, संवादांबरोबरच अगदी अथपासून इतिपर्यंत बोलीभाषेचा वापर मी माझ्या कथेत करतो. माझ्या कथासंग्रहावर प्रतिक्रिया देताना सुप्रसिद्ध कवयित्री अनुराधा नेरुरकर यांनी त्यांच्या पत्रात असं म्हटलं होतं की, 'माह्यावाल्या गोष्टी' वाचण्याआधी मला असं वाटत होतं की ही भाषा मला कळेल का? नाही कळली तर मग कथेतील गंमत तरी कशी अनुभवता येईल? पण प्रत्यक्ष खानदेशी बोलीतील या कथा वाचताना कसलीही अडचण आली नाही आणि एकूण एक कथेचा मला पुरेपूर आनंद मिळाला.'

बोलीभाषेची ही गंमत तर आहेच, पण तिची ही एक मोठी शक्तीसुद्धा आहे. आणि हे जगातील प्रत्येक बोलीभाषेला लागू आहे. म्हणूनच एखादा भैय्या आपल्याशी भोजपुरीतून बोलतो तरी त्याला काय म्हणायचं आहे ते आपल्याला कळतं. बोली समजावून सांगावी लागत नाही. ती एका हृदयातून मार्दव घेऊन बाहेर पडते आणि दुसऱ्या हृदयापर्यंत सहज पोहचते. हजारो वर्षांपासून बोलीभाषा नैसर्गिक पद्धतीने निर्माण व विकसित होत आलेल्या आहेत. त्या साचेबद्ध नाहीत. त्यांना व्याकरणाचं कुंपण नाही. बोलीला एक लय असते. ती लय माणसाच्या हृदयाचा ठाव घेते आणि मग न समजण्याचा प्रश्नच उरत नाही! म्हणूनच कोणतीही बोलीभाषा (अर्थात आपल्या प्रमाणभाषेशी व तिच्याशी साम्य असलेल्या भाषांशी संबंधित) उमगायला फारशा अडचणी येत नाहीत. गेल्या काही वर्षांत बोलीतून लिखाण चांगल्या प्रमाणावर होत आहे. खरं म्हणजे बोलीभाषा ही बोलण्याची भाषा असते. तिला लिपी नसते. तिचं भौगोलिक क्षेत्रसुद्धा मर्यादित असतं. पण तिची शब्दसंपदा अफाट असते. शब्द खूप अर्थवाही असतात. लवचिक असतात. बोलताना या भाषांची खरी गंमत असते. बोलणाऱ्याचे हातवारे, हावभाव, उच्चारांतील हेल, लय हे सर्व

इतकं मजेशीर आणि नैसर्गिक असतं की ती भाषा केवळ ऐकली जात नाही तर बघितली सुद्धा जाते. म्हणजेच बोलीभाषा साभिनय वापरली जाते. ठरवून नाही तर निसर्गत:च ती अभिनयासकट प्रकटते आणि मग बोलणाऱ्याची भाषा कळो न कळो, त्याला काय म्हणायचं आहे हे अगदी सहजरीत्या ऐकणाऱ्याला कळतं. हातवारे, हावभाव, शब्दकळा, लय, म्हणी, वाक्प्रचार ही सर्व बोलीभाषेची अविभाज्य व शक्तिशाली अंगे आहेत.

बोलण्यातून कोणतीही बोली आपल्याला कळते. पण भिन्न बोलींची माणसे एकमेकांशी प्रमाणभाषेतून संवाद साधतात. मराठी वाचकांना आपल्या बोलीव्यतिरिक्त इतरही बोलीभाषा, त्यातील गंमत, गोडवा कळावा या हेतूने आणि सोबतच बोलींच्या संवर्धनाला आपलाही काही हातभार लागावा या साहित्यिक जबाबदारीतून मी महाराष्ट्रात बोलल्या जाणाऱ्या, तसेच महाराष्ट्राबाहेर बोलल्या जाणाऱ्या मराठीशी संबंधित बोलींतील कथांचं संपादन करण्याचा घाट घातला. अतिशय वेगात होणारं जागतिकीकरण, शहरीकरण, प्रचंड प्रमाणात होणारं माणसांचं स्थलांतर, टीव्ही-मोबाइलमुळे संकोचत जाणारं माणसाचं सांस्कृतिक जग, त्यात सरकार आणि जनतेची आपल्या भाषेबद्दलची उदासीनता यामुळे किमान भारतातल्या तरी नुसत्या बोलीच नाही तर प्रमाण भाषांनाही धोका निर्माण झाला आहे.

भाषा टिकवण्यासाठी, वाढवण्यासाठी साहित्यिकांनी पुढाकार घेणं गरजेचं आहे. लोकांमध्ये जागृती करणं आवश्यक आहे. या विचारांती आणि कथा-गोष्टी हा माझा प्रांत असल्याने महाराष्ट्र सीमेंतर्गत बोलल्या जाणाऱ्या व मराठीशी संबंधित निरनिराळ्या बोलींतील कथा एका (किंवा अनेक) संग्रहात समाविष्ट करून त्या मराठी वाचकांसमोर ठेवण्याचा एक वेगळा प्रयोग मी सुरू केला आहे. त्यामुळे बोलीभाषा वाचतील, वृद्धिंगत होतील, टिकतील असं नाही. पण या सर्व गोष्टींसाठी या संग्रहाची मदत निश्चितच होईल. मात्र बोलीभाषा जगवायच्या असतील, वाढवायच्या असतील, अधिकाधिक समृद्ध करायच्या असतील तर ते फक्त आणि फक्त लोकसहभागानेच होऊ शकतं. त्यासाठी 'बोली म्हणजे अशुद्ध' हा न्यूनगंड आधी लोकांच्या मनातून काढला पाहिजे. आणि लोकांनी रोजच्या व्यवहारात आपापल्या बोलीभाषांचा वापर केलाच पाहिजे आणि वाढवलाच पाहिजे.

बोली टिकवण्यासाठी मदतीची ठरणारी एक छोटीशी पायवाट म्हणजे बोलीतून साहित्यनिर्मिती करणे. आज अनेक साहित्यिक ही वाट चोखाळत आहेत. त्यांचं साहित्य मराठी भाषिकांना भावतं आहे. कुठे बोलीची अडचण निर्माण होत नाही आहे. बऱ्याच प्रमाणात कविता, कथा, कादंबऱ्यासुद्धा बोलीतून लिहिल्या जात आहेत. पण 'बुंदी पाडू' साहित्यिकांचा इथेही मोठा धोका आहे. दोनचार शब्दांच्या ओळी करून एकाखाली एक लिहिल्या की कविता आणि पानाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत ओळी भरल्या की कथा असं समजणारे अनेक हलवाई बोलीतूनही दिवसरात्र बुंदी पाडू लागले आहेत. त्यांच्याकडे उत्साह जास्त आणि लेखन कला व अभ्यास फारच कमी आहे. अर्थात गांभीर्याने व चांगलं लेखन करणारेही अनेक साहित्यिक आज बोलीभाषेतून लिखाण करत आहेत.

बोलीतील कथासंपादनासाठी बोलीतील कथा व कथालेखनाचा धांडोळा घेत असताना अनेक बोलीभाषा-अभ्यासक, लेखक व त्यांच्या विविधांगी कथालेखनाशी ओळख झाली आणि बरीच वर्षे माझ्या मनात रुतून बसलेला 'लेखक बोलीचा वापर फक्त विनोद निर्मितीसाठी करतात' हा समज आणि खंत दूर झाली. बोलीतून आज जे चांगले, नामांकित लेखक कथा लिहित आहेत, ते दर्जेदार कथालेखन गांभीर्याने करत आहेत. विनोदी, गंभीर, माणसाचं सुख-दुःख, भावविश्व उलगडणारं, हलक-फुलकं, सामाजिक आशय मांडणारं असं विविधांगी लेखन विविध बोलींतून होत आहे. काही बोलींतील साहित्य-कथासंग्रह विद्यापीठांनी अभ्यासक्रमात घेतले आहेत. ही खूप चांगली गोष्ट आहे. बोलीभाषांमधून कथांचे विविध प्रकार जरी हाताळले जात असले तरी त्यात जास्त प्रमाण लघुकथांचं दिसतं.

आज बोलीत विनोदी कथाही बऱ्याच प्रमाणावर लिहिल्या जात आहेत. पण त्यात 'ब्लॅक ह्युमर' हा विनोदाचा प्रकार मात्र अत्यल्प आहे. बोलींतून आज जे लिखाण होत आहे, ते खरं म्हणजे प्रमाणभाषेच्या लिपीतून होत आहे. बोलीला लिपी नसते. मग कथा लिहायची, बोली लिखित रूपात आणायची तर लिपी असलेल्या प्रमाणभाषेशिवाय पर्याय नाही. म्हणजे लिखित स्वरूपात होणारी बोलीची साहित्य निर्मिती ही खरं म्हणजे प्रमाणभाषेतून होत आहे ती बोलीतील उच्चारांप्रमाणे शब्द लिहून वा निर्मून. पण याला मर्यादा आहेत. कारण बोलीभाषा ही बोलायला जेवढी सोपी, तेवढीच ती लिहायला आणि वाचायला कठीण असते. बरेच शब्द बोलीतील मूळ उच्चारांप्रमाणे लिहिता येत नाहीत. त्यामुळे

कथा लिहिताना अनेक शब्द बदलतात. असाच प्रकार बोलीतील कथा वाचताना होतो. आपल्याच बोलीतील शब्द पट्‌कन वाचणं जमत नाही. म्हणजे जितक्या सफाईदारपणे आपण बोलीतून बोलू शकतो, तितक्या सफाईदारपणे ती आपण लिहू व वाचू शकत नाही.

बोलीभाषेतील कथाविश्वाची जर आपण यात्रा केली, तर या विश्वाचे दोन प्रमुख भाग आपल्याला दिसतात. एक लिखित कथा आणि दुसऱ्या मौखिक कथा वा गोष्टी. आपण मराठीच्या वा भारतातल्या बोलींबद्दल बोलू. कथा हा शब्द जरा जड वाटतो म्हणून आपण गोष्ट असाच उल्लेख करू. तर अशा या बोलीतील मौखिक गोष्टींचं विश्व फार म्हणजे फार मोठं आहे आणि त्याचा काळही खूप मोठा आहे. हजारो वर्षे या मौखिक गोष्टी भारतातल्या प्रत्येक बोलींतून प्रवाहित होत आलेल्या आहेत. आजही होत आहेत आणि पुढेही होत राहतील. आज लिखित गोष्टी जरी उपलब्ध होत असल्या तरी गोष्ट सांगणे आणि ऐकणे याची जादू आजही मुलांवर आणि पालकांवर पूर्वी इतकीच आहे. या प्रकारातील गंमत, उत्सुकता आजही टिकून आहे. एकांतात, एकलकोंडेपणे, मनातल्यामनात गोष्ट वाचण्यापेक्षा ती चार जणांमध्ये बसून ऐकणे, आई-बाबा, आजी-आजोबा, मित्र यांच्या तोंडून ऐकणे याची गंमत आजच्या काळातही टिकून आहे. अशा गोष्टी सांगण्या-ऐकण्याच्या वेळाही ठरलेल्या असतात. संध्याकाळी किंवा रात्री झोपताना धाब्यावर वगैरे. असे कार्यक्रम हे देवाण-घेवाणीचे असतात. म्हणजे सांगणारा सांगत असतो आणि ऐकणारे अधूनमधून त्याला प्रश्न, शंका विचारत असतात. मग सांगणारा त्यांना उत्तरं देतो आणि त्याची शंका मिटल्यावरच गोष्ट पुढे सरकते. या मौखिक प्रकारात दोन्ही बाजूंनी संवाद होतो. अशा गोष्टीत सातत्याने थोडे थोडे बदल होत राहतात.

मौखिक पद्धतीतील एक उपपद्धत म्हणजे एकाच बाजूने संवाद. म्हणजे एक वा काही जण एकत्रितपणे गोष्ट सांगणार आणि समोर बसलेला समुदाय ती ऐकणार. पहिल्या प्रकाराने मुलांचं भावविश्व घडतं. त्यांची कल्पनाशक्ती विस्तारत राहते. तर वरील दोन्ही पद्धतींनी जनाजना-मनामनापर्यंत आपल्या परंपरा, इतिहास पोहचतो. सद्गुण-अवगुण, बरं-वाईट असे बोध मिळत राहतात. पंचतंत्र, जातककथा त्या त्या काळातील प्रमाण भाषेत लिहिल्या गेल्या असतीलही, पण त्या संपूर्ण भारतवर्षात माणसामाणसापर्यंत पोहोचल्या त्या वेगवेगळ्या बोलींतूनच. धार्मिक प्रथा-परंपरा, सण-वारांचं महत्त्व, सामाजिक संदेश, बोधकथा, इतिहास, रामकथा, महाभारत, लोकशिक्षण असा अमुल्य ठेवा लोककथांच्या रूपात मौखिक पद्धतीने अनंत काळ टिकून राहिला. प्रवाहित राहिला. त्यात तो तो प्रदेश, संस्कृती, तिथली बोलीभाषा यांच्या  मर्यादा आणि शक्तीनुसार काही बदल झाले. पण त्या गोष्टींचा आत्मा बदलला नाही. त्यांतील संदेश, तात्पर्य बदलले नाही. ते पिढ्यानुपिढ्या लोकांपर्यंत व्यवस्थित पोहचत राहिलं.

प्रत्येक माध्यमाची काही शक्तिस्थळ आणि काही मर्यादा असतात. असं असूनही बोलीभाषेतील गोष्टींच्या माध्यमातून मानवसंस्कृती वर्षानुवर्ष प्रवाहित राहिली. गोष्टींच्या माध्यमातून प्रथा, परंपरा, इतिहास, लोकशिक्षण हजारो वर्षे प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहचवण्याची मौखिक परंपरेतील गोष्टींची ही पद्धत आणि तिची शक्ती अचंबित करणारी आहे. रामायण, महाभारत, बुद्धाच्या गोष्टी, पंचतंत्र, जातककथा असतील किंवा काही शे वर्षांपूर्वीचा शिवाजी महाराजांचा इतिहास असेल, आपण सर्वांनी पुस्तकात वाचण्याआधी कोणाच्या तरी तोंडून गोष्टीरूपाने ऐकलेला असतो. प्रमाण भाषेतून नव्हे तर बोलीभाषेतून. दिवसेंदिवस हे प्रमाण कमी होत असलं तरी आजही ते टिकून आहे. ते वाढवण्याची, अधिकाधिक समृद्ध करण्याची जबाबदारी लेखकांवर तर आहेच, पण त्याहीपेक्षा बोलीभाषिक समूहांची जास्त आहे. ती त्यांनी गांभीर्याने पार पाडलीच पाहिजे अशी कळकळीची परिस्थिती आज नक्कीच आहे. भाषा, संस्कृती, परंपरा या कायद्याने नाही तर लोक सहभागानेच वाचवता येतील. टिकवता येतील आणि समृद्धही करता येतील. आणि हे टिकवण्याचं महत्त्वाचं काम आजवर मौखिक कथापद्धतीने केलेलं आहे. ते यापुढेही गोष्टी सांगण्याच्या प्रक्रियेतून आपल्याला करता येईल. आपण ते केलं पाहिजे. खरं म्हंजे आपल्याला ते करावं लागेल.

बोलीभाषा जशी जशी कृश होत जाईल, तशा तशा या गोष्टी शक्तिहीन, क्षीण होत जातील. आणि गोष्टींमुळे जिवंत राहिलेल्या अनेक प्रथा, परंपरांचा, इतिहासाचा प्रवाह सुकत जाईल. आयुष्यातील गंमत, परंपरागत ज्ञान, प्रबोधन, शिकवण सर्वच हरवून बसू आपण. ठरवून रचलेल्या गोष्टींच्या चौकटीत बसून एक ठोकळेबाज आयुष्य आपल्या वाटेला येईल. मानसिक गरजा भागवणारी माणसाची निर्मितिक्षमता संपून जाईल. एक निरस आयुष्य माणूस जगत राहील. माणसाचे मागचे सगळे संदर्भ पुसले जातील आणि चालू काळात जे काही होत आहे, तेच

सत्य, योग्य आणि प्रगत आहे अशा गैरसमजात मानवजात गुरफटेल. माणसामाणसातील आस्था, प्रेम, आपलेपणा कमी होईल. हे सर्व थांबण्यासाठी मला असं वाटतं की लिखित स्वरूपापेक्षाही वर्षानुवर्ष नैसर्गिकरीत्या विकसित होत आलेल्या बोलीभाषांच्या वापराने, मौखिक गोष्टींची देवाणघेवाण साधतसाधतच आजही आणि पुढेही माणूस माणसाशी जोडलेला राहील. त्याची संस्कृती, परंपरा, नीतिनियम जपले जातील. पुढे जात राहतील. खानदेशातील 'वह्या', कोकणातील 'दशावतार', उत्तर भारतातून भारतभर फिरणारी 'रामलीला' हे सर्व वेगवेगळ्या माध्यमांतून लोकांना आपल्या प्रथा, परंपरा, इतिहास, महापुरुष इत्यादींच्या गोष्टी सांगण्याचाच भाग नाहीत का? किंवा नाटक तरी काय आहे? आवाज व अभिनय यांतून गोष्टी, कथा यांना दिलेलं दृष्य रूपच नाही का?

रामायण, महाभारत ही महाकाव्यं म्हटली जातात. म्हणजे इथे काव्याच्या माध्यमातून महाकथा सांगितलेल्या आहेत. पूर्वी गावोगाव 'रामलीला' यायच्या. दसऱ्याच्या काही दिवस आधी. दसऱ्याच्या दिवशी रावणाचा वध करून ती 'रामलीला' संपायची. संपूर्ण रामकथाच त्या रामलीलेतून दाखवली, कथन केली जायची. या 'रामलीला' बहुतेक करून उत्तर भारतातनं यायच्या. पण श्रोत्यांना भाषेची अडचण कधी झाली नाही. प्रत्येक बोलीभाषेत लोककलेचे असे प्रभावी प्रकार आहेत की जे माणसात गोष्टी भिनवतात. वाचन, मनन, चिंतन, अभ्यास हे सर्व न करता अशा शेकडो गोष्टी-कथा गायनाच्या, नाटकाच्या, कथनाच्या माध्यमातून मौखिक पद्धतीने जनमानसांत इतक्या रुजवलेल्या आहेत, भिनवलेल्या आहेत की इतक्या सहजासहजी ते भारतीय जनमानसातून नष्ट होणार नाही. चित्रपट किंवा दूरदर्शनवरील मालिका हासुद्धा एका वेगळ्या माध्यमातून कथा-गोष्टी सांगण्याचाच प्रकार आहे. हे सर्व टिकवण्यासाठी, शुद्ध स्वरूपात राहण्यासाठी गोष्टी सांगणे, ऐकणे ही प्रक्रिया सुरू राहिली पाहिजे. आपआपल्या बोलीतून ती सुरु राहिली पाहिजे.

बोलीभाषेत कथा, गोष्टी कधी निर्माण झाल्या हे सांगणं अवघड आहे. मला असं वाटतं की प्रत्येक प्राणिमात्राला एकमेकांशी संवाद साधण्यासाठी भाषेची आवश्यकता असते. माणसालाही ती होती. आपल्या भावना, सुख-दु:ख, आनंद, राग, लोभ, प्रेम, दुस्वास इ. अवस्था इतर माणसांपर्यंत पोहोचवण्यासाठी माणसाचे होणारे हातवारे, त्याचे निघणारे आवाज या सर्वांतून त्याने स्वर, ध्वनी, अक्षरं पकडली असावीत. मग हळूहळू त्यातनं शब्द आकाराला आले. या प्रक्रियेतून आणि त्या त्या ठिकाणच्या जीवनसरीतेतून बोली निर्माण झाल्या असाव्यात. मुळातच या निसर्गात सर्व काही आहे. अगदी गीत, संगीत आणि गोष्टीही! गीतेतील वचन 'तुम्ही इथे काही आणलं नाही आणि तुम्ही इथून काही नेणार नाही' हे कणाकणाला लागू आहे. माणसाच्या कल्पनेने, त्याने टिपलेल्या घटनांनी, त्याच्या अनुभवाने तो निसर्गातून गोष्टी वेचत राहिला. वाचत राहिला. त्या त्याने इतरांना सांगितल्या. त्या मौखिक रूपात अनेकानेक वर्षे जिवंत ठेवल्या. गरजेनुसार निरनिराळ्या विषयांना, घडून गेलेल्या घटनांना तो गोष्टरूप देत गेला. आपली विकसित होत गेलेली संस्कृती, परंपरासुद्धा त्याने गोष्टींत बसवल्या. मग त्या गोष्टीरूपाने एक पिढी दुसऱ्या पिढीला देत राहिली. मला आजही वाटतं की लिखित गोष्टी किती प्रभावी आहेत किंवा त्या किती जणांपर्यंत पोहचत असतील, त्यापेक्षा मौखिक गोष्टी जास्त प्रभावीपणे आणि जास्त लोकांपर्यंत पोहचतात.

त्या त्या समाजाच्या चालीरीती, प्रथा, लोकांच्या सवयी, अनुभव, कल्पना यानुसार प्रत्येक बोलींतून नवनवीन लोककथा निर्माण होत राहिल्या. त्या एका जणाकडून दुसऱ्याकडे जाताना, एका पिढीतून दुसऱ्या पिढीत जाताना, एका बोलीतून म्हणा किंवा एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जाताना, एका संस्कृतीतून दुसऱ्या संस्कृतीत जाताना त्यांत बदल होत राहिले. नवीन ठिकाणच्या निसर्गात, चालीरीतींत, जगण्यात, संस्कृतीत मिसळून त्यांचं रूप बदलत राहिलं. पण अशा गोष्टी त्या त्या बोलीची लय, ताल परिधान करून प्रवाहित राहिल्या. बोलीतील या गोष्टी शब्दबंबाळ नसतात. पण त्यांना काही अर्थ असतो असंही नाही. पण ती एखाद्या झऱ्याप्रमाणे मनातून फुटलेली असते. खळखळत असते. त्या गोष्टीत गंमत असते. नाद असतो. ती ऐकणाऱ्यात कुतूहल आणि उत्सुकता निर्माण करते. म्हणूनच या गोष्टींची देवाण-घेवाण होताना दोन्ही बाजूंनी संवाद होत राहतो. ऐकणाऱ्याचं कुतूहल शमल्यावरच ती गोष्ट पुढे सरकते.

बोलीभाषेतील या गोष्टींत काहीही होऊ शकतं. प्राणी बोलू शकतात, माणसं उडू शकतात. पाताळलोक, स्वर्गलोक असतो. माणसाचा एखादा प्राणी वा पक्षी किंवा त्याउलटही होतं. असं अचाट, अजब विश्व बोलीतील कथांत असतं की जे प्रमाण वा लिखित भाषेतील भयकथा, गूढकथांमधे शोभेल. मधे अंदमान-निकोबार, व्हिएतनाम,

इजिप्त अशा देशांतील लोककथा माझ्या वाचनात आल्या. त्यातही कुठे राक्षस आहे, कुठे झाड माणसाला खातं इ. इ. असं अचाट, अजब विश्व आहे. भूत, पिशाच्च अशा गूढ प्रतिमासुद्धा लोककथांतूनच निर्माण झाल्या. इतकंच काय, पण कल्पवृक्षही भारतीय कथाविश्वाला अशाच एखाद्या लोककथेने दिलेली देणगी असावी. अशा गोष्टी ऐकताना दोन्ही बाजूने संवाद होणं अटळ असतं. बोलीला व्याकरणाचं कुंपण नसल्याने तीत एक स्वच्छंदपणा, अवखळपणा आणि उपजत उत्साह असतो. तो लोककथा-गोष्टींमध्ये पुरेपूर उतरलेला असतो आणि सांगणारा व ऐकणारा अशा दोघांनाही भरपूर आनंद, समाधान देतो. मौखिक परंपरेतील या लोककथांचं कुठे विश्लेषण, परीक्षण झाल्याचं वाचण्यात वा ऐकण्यात नाही. ते शक्यही झाले नसावे. कारण वेळोवेळी या गोष्टींनी आपली रूपे बदललेली असतात. अर्थात त्यातला आनंद, गंमत, उत्साह, कुतूहल, संदेश, तात्पर्य मात्र बदललेले नसतात.

आता आपण बघू की लिखित स्वरूपातील बोलीकथांची काय स्थिती आहे. लिखित कथांचा जर धांडोळा घेतला तर फार दूर जाता येत नाही. फारफारतर पन्नास-साठ वर्ष मागे जाता येतं. म्हणजे त्या आधी बोली लिहिली जात नव्हती असं नाही. पण प्रमाण फार कमी होतं. जास्तकरून पश्चिम महाराष्ट्रातील बोलींच्या वापरापर्यंत ते प्रमाण मर्यादित होतं. ग्रामीण कथांमधून बोलींचा वापर व्हायचा, पण तो संवादांपुरता मर्यादित होता. प्रसंग, निवेदन, वर्णन हे प्रमाणभाषेत असायचं. अशा कथांमधेही जास्तकरून प. महाराष्ट्रातील भाषा असायच्या आणि त्याही ठरावीकच. कथा संपूर्णपणे बोलीतून लिहिली तर इतर मराठी वाचकांना कळणार नाही असं लेखकाला वाटत असावं. दुसरं कारण हेसुद्धा असावं की त्या काळात लेखन बहुतकरून उच्च वर्णीय लोक करायचे. त्यांच्या बोलण्यात बोलींची लय असली तरी ते स्वत:च्या लिहिण्या-बोलण्यात प्रमाण मराठीचाच वापर करायचे व इतर समाजातील जे लोक लिहित होते (काही अपवाद वगळता), ते शिक्षित, प्राध्यापकी पेशातील असायचे आणि बोली म्हणजे गावंढळ, अशुद्ध असा ठाम समज त्या काळात असल्याने त्यांनी बोलीतून कथालेखन टाळले असावे.

प. महाराष्ट्रातील बऱ्याच बोलीभाषा या प्रमाणमराठीशी खूप जवळीक असणाऱ्या आहेत. म्हणूनही त्यांचा वापर कथांमधून बऱ्याच प्रमाणावर झाला असावा. त्याउलट अहिराणी, खानदेशी (लेवा गणबोली), झाडी, पोवारी इ. अनेक भाषा प्रमाणमराठीपासून बऱ्याच लांब आहेत. आदिवासी वा भटक्या विमुक्तांच्या भाषा तर आपल्याला अजिबातच कळत नाहीत. हेही कारण असावे की ज्यामुळे या बोली लिखाणापासून दूर राहिल्या असाव्या. पण गेल्या काही दशकांमध्ये बोलीभाषांविषयी लोक जागृत होत आहेत. शिक्षण समाजातील अनेक स्तरांत झिरपल्याने इतरही बोली भाषांमधून कथा लेखन होऊ लागलं. ते अर्थातच प्रमाण भाषेची लिपी वापरून. आज उभ्या महाराष्ट्रात वेगवेगळ्या बोलीभाषांतून कथालेखन होत आहे. ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या कथांमध्ये प्रामुख्याने बोलींचा वापर झाला आणि ते साहजिकही आहे. कारण गाव आणि बोलीभाषा म्हणजे शरीर आणि रक्त. गाव आहे तर बोली आहे आणि त्या बोली आहेत तर गाव.

आताच्या काळात महाराष्ट्रभर आणि बाहेरही अनेकजण बोलीतून कथालेखन करत आहेत. बोलीतून कथालेखन होणं, एकमेकांची बोलीभाषा एकमेकांना माहिती होणं वा असणंसुद्धा गरजेचं आहे. बोलीतील कथांवर काम करताना महाराष्ट्रातल्याच अनेक बोली मला नव्याने माहिती झाल्या. आजही बरेच जण आमच्या बोलीला 'अहिराणी भाषा' समजतात. कित्येकांना हे माहितीच नाही की खान्देशात अहिराणी व खान्देशी (लेवा गणबोली) या दोन प्रमुख बोली आहेत. आज बोलीतून दमदार कथालेखन होत आहे. राजन गवस, जी. के. ऐनापुरे, रमजान मुल्ला यांचं प. महाराष्ट्रीय बोली भाषांमधील कथालेखन उभ्या महाराष्ट्राला आवडतं. डॉ. अशोक कोळी, रवींद्र पांढरे आणि मी स्वत: खान्देशी बोलीतून कथालेखन करतो आहे आणि ते लोकांच्या पसंतीस उतरत आहे.

ग्रामीण, शहरी दोन्ही ठिकाणच्या मासिकं, दिवाळी अंकांतून आमच्या कथा प्रसिद्ध होतात. त्यांना संपूर्ण महाराष्ट्रातून पसंतीच्या पावत्या येतात तेव्हा बोलीच्या अभिमानाने ऊर भरून येतो. 'माह्यावाल्या गोष्टी' या माझ्या कथासंग्रहालासुद्धा संपूर्ण महाराष्ट्रातून उभारी देणाऱ्या प्रतिक्रिया आल्या. दुसऱ्या संग्रहाबद्दलही विचारणा होत असते. हा अनुभव फक्त माझा नसून निष्ठेने दर्जेदार कथा बोलीभाषेतून लिहिणाऱ्या सर्वच कथालेखकांचा आहे याची मला खात्री आहे. इतक्या वर्षांत एकही फोन 'मला भाषा कळत नाही' असं सांगणारा आला नाही. कोणी कोणी एखाददोन शब्दांचे अर्थ वा म्हणी, वाक्प्रचारांचे अर्थ विचारतात. ते साहजिकच आहे. हीच बोलीची गंमत आहे. शक्ती आहे. हरिश्चंद्र बोरकर, नागो थुटे, सुनिता

कोंडबत्तूनवार यांच्यासारखे अभ्यासक सामाजिक विषय घेऊन झाडी बोलीतून दमदार कथालेखन करत आहेत. विदर्भातल्याच वऱ्हाडी भाषेतून नवनीत देशमुख, बाबाराव मुसळे, प्रतिमा इंगोले कसदार कथालेखन करतात. छत्तीसगढी, मराठी आणि वऱ्हाडी अशा अनेक भाषांच्या संगमातून निर्माण झालेल्या पोवारी' या बोलीभाषेतून ज्ञानेश्वर टेंभरे हे 'हासो आन भूत भगाओ' सारख्या लोककथा लिहित आहेत. खान्देशातील अहिराणी भाषेतून डॉ. सुधीर देवरे कथालेखन करीत आहेत.

पावरी या आदिवासी भाषेतून संतोष पावरा हा तरुण पोरगा 'राणी काजल', 'एकलव्य' अशा आदिवासी संस्कृती सांगणाऱ्या लोककथा लिहित आहे. आगरी भाषेतून आधी शंकर सखारामांनी आपल्याला उत्तम गोष्टी दिलेल्या आहेतच. आज उरणच्या ए. डी. पाटील यांच्यासारखे काही जण संपूर्ण आगरी कथांची निर्मिती करत आहेत. तर मालवणीतून स्नेहा राणे, वैभव साटम, कल्पना मलये, सदानंद राणे असे लोक मालवणी  कथेचा पट मांडत आहेत. तिलोरी या जवळ जवळ नामशेष व्हायला आलेल्या भाषेतून कथालेखन रत्नागिरीचे अरुण इंगवले करत आहेत. मराठवाड्यातील उदगीरी भाषेतून प्रसाद कुमठेकर, बागवानी उर्फ दखनी या मजेशीर बोलीभाषेतून इर्शाद बागवान हे तरुण छान कथा लिहित आहेत. मराठवाड्यातून भीमराव वाकचौरे, महेश मोरे ही मंडळी मराठवाडी बोलीभाषेतून कथालेखन करत आहेत. तर डॉ. शंकर विभूतेंचा 'आडवाट' हा मराठ्वाडी बोलीभाषेतला एक उल्लेखनीय कथासंग्रह आहे. महाराष्ट्राच्या राजधानी परिसरात वाडवळीतून केळवे येथील प्रा. स्मिता पाटील, वसईचे जोसेफ तुस्कानो कादोडी उर्फ सामवेदी बोलीतून तर मुरबाडचे गिरीश कंटे हे मुरबाडी उर्फ कुणबी भाषेतून कथा लिहून बोलीभाषेतील लिखित कथाविश्वात भर घालत आहेत. नगरी बोलीभाषेचा पट डॉ. संजय बोरुडे वाचकांसमोर मांडत आहेत. मराठवाडा, प. महाराष्ट्र, नगर या भागांतील बहुतेक बोलीभाषा प्रमाणमराठीच्या खूप जवळ जाणाऱ्या आहेत तर, खान्देशी (लेवा गणबोली), अहिराणी, वाडवळी, सामवेदी, संगमेश्वरी अशा अनेक बोलीभाषांचे उच्चार प्रमाणमराठीपेक्षा बरेच वेगळे आहेत. पोवारी, दखनी या हिंदीमिश्रित भाषा आहेत. त्यांत प्रमाण मराठीपेक्षा खूपच वेगळेपण आहे. पण तरीही या बोलीभाषांतून लिहिलेल्या कथा आपल्याला चांगल्या कळतात. त्यांचा पुरेपूर आनंद घेता येतो.

आदिवासी भाषा मात्र प्रमाणमराठीपेक्षा खूपच अंतर राखून आहेत. या भाषा कदाचित मराठीभाषेच्या आधी उगम पावलेल्या असाव्यात. आपसातल्या व्यवहारांमुळे इतर बोली आणि प्रमाण मराठीचे काही शब्द या भाषांमधे मिसळलेले आहेत. एवढंच साम्य आपल्याला दिसतं. म्हणून आदिवासी भाषेतील कथेचा संग्रहात समावेश करताना मला त्या भाषेतील लिखित कथेबरोबरच त्या कथेचं मराठी भाषांतर घ्यावं लागलं. त्याच ठिकाणी इतर बोलीतील कथांचे फक्त काही शब्दार्थ देऊन काम भागलं.

हे झालं महाराष्ट्र सीमेअंतर्गत बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेतील कथांचं विश्व. याव्यतिरिक्त महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागातही अनेक जण मराठीबरोबरच आपापली बोली वाचवण्यासाठी, टिकवण्यासाठी धडपडत आहेत. त्यात इराप्पा गुरव हे एक नाव. इराप्पा गुरव खानापुरी बोलीभाषेतून चांगल्या कथा मांडत आहेत. तसेच गोवा पोलिसात शिपाई असलेले पडलोसकरसुद्धा आपल्या बोलीतून कथा मांडत असतात. असेच अनेक जण महाराष्ट्र–कर्नाटक, महाराष्ट्र–मध्य प्रदेश, महाराष्ट्र–छत्तीसगढ, महाराष्ट्र–आंध्र प्रदेश, महाराष्ट्र–गुजराथ अशा विविध सीमाभागातील बोलींतून कथा मांडायचा प्रयत्न करत आहेत. इथे मी शंभर टक्के बोलीतून लिहिलेल्या कथांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. अशा कथांचं प्रमाण फक्त संवादबोलीतून असलेल्या कथांपेक्षा कमी असू शकतं. पण दिवसेंदिवस ते वाढत आहे हे सुचिन्ह आहे.

एकंदर आपल्या असं लक्षात येतं की बोलीभाषेतील कथाविश्व अफाट आहे. अमर्याद आहे. त्या कथांचे आशय–विषय, मांडणीचे प्रकारसुद्धा अमर्याद आहेत. या सर्व गुणांबरोबरच ते चिरंजीवही आहे. हजारो वर्षांतही ते मृत झालेलं नाही. साचून त्याचं डबकं झालेलं नसून आजही ते प्रवाहित आहे. गेल्या काही वर्षांत या कथाविश्वाच्या मुख्य अशा मौखिक प्रवाहाला लिखित कथांचा प्रवाह येऊन मिळाला आहे. हे सुचिन्ह असलं तरी एकूणच मराठी वाचकांची संख्या आणि उत्साह पाहता लिखित बोलीकथा किती जणांपर्यंत पोहचतात हा प्रश्न आहेच. कथाकथनाची मौखिक पद्धत मला आजही लिखित पद्धतीपेक्षा जास्त चांगली, प्रभावी व आश्वासक  वाटते. लिखित साहित्य पुस्तकात आणि पुस्तकं कपाटात बंद राहतात. वाचनपद्धतीच्या ऱ्हासामुळे फार कमी लोकांपर्यंत आज साहित्य पोहचत आहे. टीव्ही, मोबाइलसारख्या यंत्रांमुळे माणसामाणसातील संवाद सुद्धा कमी होत चालला आहे, ज्यामुळे मौखिक कथा प्रसारही कमी कमी होत जाण्याची

भीती आहे. म्हणून नुसतं बोलीतून लिहून समाधान मानण्यापेक्षा आणि बोलीतल्या गोष्टी वाचून समाधान मानण्यापेक्षा आपण वाचलेल्या कोणत्याही बोलीतल्या कथा आपल्या स्वत:च्या बोलीतून इतरांना सांगितल्या तर बोलीसोबतच हे कथाविश्व टिकण्यास, समृद्ध होण्यास फार मोठा हातभार लागेल.

बोलीकथा-वाचनाचे, कथनाचे कार्यक्रम जागोजागी केले, टीव्हीवरून बोलीकथांचे वाचन, त्यावर आधारित मालिका प्रसारित झाल्या तर अनेक प्रदेशांतील लोकसंस्कृती, स्वभाव, खाणं-पिणं-जगणं यांची ओळख एकमेकांना होत राहील. त्या त्या प्रदेशाचं महत्त्व, वैशिष्ट्यांची ओळख होत राहील. ही जबाबदारी लेखक, कलाकार यांची तर आहेच, पण सर्व मराठी (खरं म्हणजे जागतिक) समाजाचीच आहे. यात शंका नाही. यासाठी सर्वांनी 'बोलीतून लिहा, बोलीतून वाचा, बोलीतून बोला' हे घोषवाक्य आपापल्या मनात ठसवून घेतलं पाहिजे. सरकारनेही ज्या-त्या प्रदेशातील प्रमुख बोलीभाषेचा त्या त्या प्रदेशातील अभ्यासक्रमात समावेश केला तर संस्कृतीचे अनेक झरे जिवंत होतील, जिवंत राहतील आणि बोली म्हणजे गावंढळ, अशुद्ध, बोलीतून बोलणे म्हणजे अशिक्षितपणा ही भीती, हा न्यूनगंड लोकांमधून आपोआप निघून जाईल. मग बोलीतील कथाविश्व अजून बहरत राहील.

**– मनीष पाटील**

**पोवार, पंवार, पवार समाज आणि त्यांच्या पोवारी, पंवारी, पवारी बोलीभाषेविषयी–**

पूर्व विदर्भातील झाडीपट्टीचे मुख्य जिल्हे म्हणजे बंजारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा आणि जुन्या सी.पी. आणि बेरारमधील तथा आताच्या मध्यप्रदेशातील बालाघाट, सिवनी, छींदवाडा, बैतुल या जिल्ह्यात झाडीबोली खालोखाल बोलली जाणारी बोलीभाषा म्हणजे पोवारी, पंवारी, पवारी बोलीभाषा. भारत सरकारच्या सर्वेक्षणानुसार हिंदीची उपभाषा म्हणून पोवारी, पंवारी, पवारी बोलीभाषेचा उल्लेख भाषा सूचित केलेला आहे. त्यानुसार पोवारी बोलणाऱ्या भाषकांचा क्रमांक ४२वा असून ३८ ते ४० लक्ष लोकसंख्या असलेल्या पोवार समाजातील ४,२५,७४५ पोवर लोक बोलचालीत अजूनही पोवारी बोलीभाषेचा वापर करतात. (ही आकडेवारी जुनीच आहे). नागपूर विद्यापीठातील डॉ. सु.बा. कुलकर्णी यांनी प्रथमच, १९७२मध्ये पोवारी बोलीभाषेचा शास्त्रोक्त अभ्यास करून, पीएच.डी.साठी प्रबंध सादर केला. १९९९ मध्ये डॉ. मंजू अवस्थी यांनी बालाघाट जिल्ह्यातील बोलींचा पोवारी, पंवारी, पवारी अभ्यास सादर करून, रायपूर विद्यापीठाची डि.लिट्. पदवी प्राप्त केली. त्यानंतर डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे यांनी, २०११पासून पोवारी, पंवारी, पवारी बोलीभाषेचा भाषावैज्ञानिक पद्धतीने अभ्यासाचा विडा उचलला असून त्यांनी पवारी ज्ञानदीप हा महत्त्वाचा ग्रंथ सिद्ध केला आहे. नागपूरचेच जयपालसिंह पटेल यांनी पवार गाथा तथा अन्य पाच-सहा पुस्तके पोवारी बोलीभाषेत प्रकाशित केली आहेत. पोवारी बोलीभाषेची स्वर व्यवस्था अधिकांश हिंदी भाषेप्रमाणेच आहे. पोवार समाजाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे हा समाज मुख्यतः मूर्तीपूजक नसून निसर्गपूजक आहे.

**सौजन्याने : ॲड. लखनसिंह कटरे,** मो. ८२०८५५७१६४



चला पालि शिकूया

प्रा. शुक्राचार्य गायकवाड

**आपण ग्रंथप्रेमी आहातच!**

**सजग आणि समृद्ध वाचक होण्यासाठी**

**५७ वर्षांची दीर्घ परंपरा असलेल्या**

**‘ललित’ या वाङ्मयीन मासिकाचे वर्गणीदार व्हा!**

# ललित

## वार्षिक वर्गणी ४५० रुपये

## चार वर्षांची सवलतीची वर्गणी १६०० रुपये

या वर्गणीत २०० रुपयांच्या दिवाळी अंकासह दहा अंक (यात विशेषांकांचाही समावेश आहे) देण्यात येतील.

**वर्गणी खालील ठिकाणी स्वीकारली जाईल.**

* **ललित कार्यालय (मुंबई)** – २३८२६२२५, २३८७३५०२ * **मॅजेस्टिक बुक डेपो (गिरगाव)** – २३८८२२४४ * **मॅजेस्टिक ग्रंथदालन (दादर)** – ९८९२२२०२३९ * **मॅजेस्टिक बुक डेपो (ठाणे)** – २५३७६८६५, २५४३०६५२ * **मॅजेस्टिक (पुणे)** – ०२०–२४४५९८१५, ९९२२३४४०८१ किंवा वर्गणीचा चेक/डीडी **‘ललित मंथली’** या नावाने ३०८, फिनिक्स, ४५७ एस. व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई–४००००४ या पत्त्यावर पाठवावा किंवा **‘ललित’च्या बँक ऑफ महाराष्ट्र, गिरगांव शाखेच्या २००५३७०१००६ (IFCS code no. : MAHB0000006) या क्रमांकाच्या बँकखात्यात रक्कम जमा करून** majesticph@gmail.com या इमेलवर पैसे भरल्याचे तपशील कळवावेत. त्याचप्रमाणे आपली वर्गणी येथेही भरू शकता : www.MajesticReaders.com

**या शिवाय वर्गणी इथेही भरू शकता.**

| G Pay | UPI | Paytm | PhonePe |
|---|---|---|---|
| **9664161090** | **UPI Id : kothawale.ashay@okaxis** | **9664161090** | **9664161090** |

**वर्गणी भरल्यावर नाव आणि पत्ता ९८२०९५५५६७ या व्हॉट्सॲप क्रमांकावर कळवावा किंवा एसएमएस पाठवा.**

# । कविता ।

## मालवणी बोली

## चांन्ना

चांन्ना पडला लाटार
होडी हलता काठार

चांन्ना झऱ्यात व्हावता
चांन्ना न्हैत पेयता

चांन्ना पडला मांगरार
चांन्ना पडला डोंगरार.

चांन्ना पडला सागार
चांन्ना पडला आंगार

चांन्ना पडला फुलार
दिसता तुजा गालार

चांन्ना पडला तळ्यात
दिसता तुजा डोळ्यांत.

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

चांन्ना - चांदणे, झऱ्यात व्हावता - झऱ्यातून वाहते, न्हैत पेयता - नदीत पोहते, मांगरार - परसदारीच्या छोट्या घराच्या कौलावर, आंगार - अंगावर, सागार - सागवानाच्या झाडावर, गालार - गालावर.

**– दादा मडकईकर**

## मालवणी बोली

## गोडदी

आयेन जुन्या लुगडाचे सुरेख
गोडदे शिवलेन पाठ-मान याक करुन
गरिबीन घराक लागलाला ठगाळ
टाके सोयन घालूनय उसवतच गेला
हुनान गोडदेचो टाको सावशीत
दोळ्यात तॅल घालून नगेन घाली
घरात नयो चादरी, बुरणूस, शाली
असा बरा बरा कायमाय येवक लागला
घराक लागलाला दळीदार, आता
कसाय बसाय पाठी पडला
चादरी, बुरणूस, शाली फाटतच गेले
तेंका ठगाळ लावक काय वाव, नाय
पुन आयेन शिवलेली गोडदी
दुधावयल्या मवमव सायेसारखी
तेचो रंग हुडासलो फाटली तरी तेची
उब खयल्याच मखमलीक येवची नाय
गोडदी दसली काय, माका पाठीक पाँग,
कंबरेसून वाकलेली आये आठवता
गोडदेत शिरलय काय, आयेच्या
कुशीत शिरल्यासारख्या वाटता
''याक बरा केलस आये, तु गेलस,
पुन, जाताना गोडदेत तुझी माया ठेवन गेलस.''

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

आयेन - आई, सावशीत - लक्ष देऊन, दोळे - डोळे, नगेन - काळजीपूर्वक, दळीदार - दारिद्र्य, बुरणूस - जाडजुड पांघरूण, ठिगाळ - ठिगळ, हुडासलो - फिका पडला, पाँग - कुबड, आटावता - आठवते.

**– कल्पना बांदेकर**



## आगरी बोली

## आमचं ते

आमचं ते रागान बिसलं बाई
काय झाला कलत नाही ।।ध्रु।।

आम्मी झेतली मसालं पाना
तेन कमी परला चुना
माजं व्हठ रंगलं नाही ।।१।।

जेवान पुरानपोलीचा केला
त्यावर साजूक तूप सोरला
पून बोलून साखर पेरली नाही ।।२।।

दोगं निंगालू आम्मी बाजारला
झिकमिक झिकमिक डिरेस केला
पून तेंचा बटान लावला नाही ।।३।।

सवारी रंगान आली जरा
तेंनी झेतला केसाना गजरा
मी लाजून हासले नाही ।।४।।

आखरून तखरून तेंची साद
हात लावाचा भारी नाद
मी दूरच रायले बाई ।।५।।

. . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

बिसलं - बसलं, कलत - कळत, पोली - पोळी,
सोरला - सोडला, पून - पण, निंगालू - निघालो,
झेतला - घेतला, आखरूनतखरून- इकडूनतिकडून,
रायलं - राहिले.

**– एल.बी.पाटील**

## सामवेदी बोली

## शिमण्यो

सुलीपुडश्या छपरोरश्यो शिमण्यो कॉनस हुरॉन गॅल्यात
सुली आणि भांशी खापल्यापासॉन
गावामिन्ने टॉवर आलॅ आणि
घरोर हुरनार्यो शिमण्यो पून पळाल्यो.

या सगळ्या शिमण्यायी ठरविल्या नॉय ना येकमेकामिन्ने?
महानाया वस्तीतनॉ पळॉन जासॉ?
बायका तॉर अजूक पारख्या जालॅ नॉय
सुलीपुडशा धगीलॉ

मिनशॅ मिन्ने त्या जळात्यात
नाय धार नाय वाफ माह्या हारक्या हॉतात
दुखऱ्या मनायी शिवशिव आयकीत रॅत्यात
स्वातास हॉत्यात 'द टावरिंग इन्फर्नो'
मिंग आतलॉ शिवशिवाट पूण
राखाडी हॉत जातॅ.

. . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

सुलीपुडश्या - स्वयंपाकघराच्या, सुली - चुली,
छपरोरश्यो - छपरावरील, शिमण्यो - चिमण्या,
हुरॉन - उडून, गल्यात - गेल्या आहेत,
भांशी - भानस (ओटा - प्लॅटफार्म),
खापल्यापासॉन - संपल्यापासून, उद्घाटन
झाल्यापासून, गावमिन्ने - गावामध्ये, गावात.
घरोर - घरावरील, हुरनार्यो - उडणाऱ्या, पून - पण,
आलॅ - आले, येकमेकामिन्ने - एकमेकांमध्ये,
महानाया - माणसांच्या, जॉल - झाल्या,
जासा - जायचं, मिनशॅ मिन्ने - आतल्याआत, मधल्यामध्ये.
जळात्यात - जळतात, धार - धूर,
माह्या हारक्या - काजळीसारख्या, काळपट.
हॉतात - होतात, मनायी- मनाची,
शिवशिव - चिवचिव, आयकीत - ऐकीत, ऐकत.
रॅत्यात - राहतात, स्वातास - स्वतःच,
मिगॅ - मग, नंतर. जातॅ - जातो.

**– सिसिलिया कार्व्हालो**

## सामवेदी बोली

## एक हॉतॉ बाबा.....

भाटामिन्यॅ फेरी मारदा
हुकलेले झाडे बगीदा
बावीतशा राटाआ मोडलेल्या खुटोर
नंदार टाकिदा तिगाळा.....
बग बाबाई आठवण येते गा?

हेजे खासरे ऊगाळले
तडॅ नवे घरे झाले
दांडपोंदळ गेले
पाईपाआ राज्य आले
भाटे बेऑन डोकायत्यात
आते ये भैय्या कडशे आले?

दवणॉ मोगरॉ जकलॉ निकलॉ
कोथमिरीऑ सुवास खपलॉ
दा रूपाला शार काडयो
बजारातनॅ हाडता तिगाळा.....
बग बाबाई आठवण येते गा?

हातात कुदळ अन् पाठीओर निंबार
घामाय निथळातॅ पान पान्याकरता रजार
तू हाडले दलाल आन विकीली खार
हिरव्यो तांबड्यो नोटी
शारू वाट्याये पळाल्यो आतेतरी......
बग बाबाई आठवण येते गा?

तांबड्या टोपीत बाबा
जहनी पॉपसायेब दिख्यासॉ
वसयकराऑ माल नुसतॉ
नावोरने विक्यासॉ
खांद्योरशा कावडीला
खुरूसाऑ हॉतॉ मान
वसयवाळॉ आलॉ नाय गा
मंबयकर हैरान
केळीये जोड जोडॉन माहने जोडनाऱ्या
बाबाई बग तुला आठवण येते गा?



हान्सॉ थकॉन भागॉन पोरापारात यासॉ
दिहाभराऑ विहांबॉ भगून
नवटाक पावशेर घ्यासॉ
बाबाने फाटका सदरा घायला
तुला सुटाबुटात हाडला
आतॅ मित्राहरी चिअर्स करता तिगाळा....
बग बाबाई आठवण येते गा?

काबाडकष्ट करॉन् वाडविला
रगात आटवॉन हिकविला
शेठशा घारा गाआन रेवॉन
तुला त्याने बाआर धाडला
देवळात जाता तिगाळा
खाशीओर लांबनेस डॉकायता
आल्मा दिहा निमित हरव्या
शार मेनवाती लाविता
बाबाई जिंदगी अहीस जळली
तू बाबा जाल्यॉर तुला ती गोष्ट कळली
नवॉ धडॉ हिक्या मिळातॅ तिगाळा....
बग बाबाई आठवण येते गा?

. . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

बावीतशा - विहिरीतील, नंदार - नजर, तिगाळा - तेव्हा, हेजे, खासरे - रानं, खाचरं, दांडपोंदळ- पाणी वाहून नेण्यासाठीची व्यवस्था, बेऑन- भीतीने, निकलॉ - लपला, निंबार - ऊन, रजार- जपमाळेची प्रार्थना, जहनी-जसा, खुरूसाऑ; मान - क्रॉसचा मान, विहांबॉ - विसावा, बाआर धाडला - परदेशात पाठवलं, खाशीओर - कबरेवर, आल्मा दिहा - पितरांच्या स्मृतिदिनी.

**– संगीता वाझ**



## वाडवळी बोली

## आंगणामनशा ओलाणीवर!

आंगणामनशा ओलाणीवर,
हुकत घातलोये ओले कपडे!
आयकटलं मीन ते आपापसात,
कायतरी कुजबुजतात बापडे!

कडक निंबर पडलोयं बायेर,
तापलोयी हवा न धूळ!
वेळ दुफारशी, घारखडले जकले,
जकले कपडे झालते व्याकूळ!

हक्काळ हक्काळ पाण्यात डुबवुन,
गुदमरवले बोस जकल्यांना!
काडुन घडीभर ठेवलं मंग,
मोकळं हायसं वाटलं त्यांना!

हाबु लावुन, ब्रशानं रगडुन,
धरुन आपटले जकल्यांना!
कमीस पडले जकले हाल मंग?,
कुटले धोक्यानं एकेकांना!

बालदीभर पाण्यात लगरसा,
मंग ओतला टिनोपाल!
बुसकाळुन पिळुन काडले,
बोलले  खपले का आमशे हाल?

हुकत घातला सदरा पयला,
रेला ओगास पडुन दुमडुन!
कोटव रेला बाजुला पण,
हँगरला दिमाखात अडकुन!

टोपी ऐटीत जाऊन बहली,
खुटाया ऊश्श्या टोकाला!
सोळी लाजत हुकु लागली,
दोरिया बिज्या टोकाला!

कडक ऊनाये दिही होते ते,
रणरणत होतं बायेर निंबर!,
जमीन गेलती तापुन जकली,
आग ओकतोयं वरसं अंबर!

हांज जाली, निंबर निवळलं,
ओबाय उठली दुफारशी निजुन!
कपडे जकले हावटुन घेतले,
घड्या घातल्या ओहरीत बहुन!

एकमेकाये कपडे गेले,
आपआपल्या  कपाटात!
नय कुरकुरता बहुन रेले तय,
पावत उद्या उजाडव्यायी वाट!

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

ओलाणी - कपडे वाळत घालण्याची दोरी,
आयकटलं - ऐकलं, निंबर - ऊन्ह, दुफार - दुपार,
घारखडले - वाळून कडक झाले, बोस - खूपच,
लगरसा - थोडासा, ओगास - गप्पसा, कोटव - कोटसुद्धा,
खुट - खुंटी, दिही - दिवस, हांज - संध्याकाळ,
ओबाय - वहिनी, हावटून - एकत्र करून,
ओहरीत - ओसरीत, बहून रेले - बसून राहिले,
पावत - पर्यंत.

**– सुहास काशिनाथ राऊत**

## कादोडी बोली
## ऊपकाराऑ हरगॉ ताजॉ

मंबय जाय गा दुबय जाय
अमेरिकेत जाय गा लंडनला जाय
बायकुपुडॅ तुई डाळ हिजॅदॅ
आहा कुकर अजून आलास नाय

जिन्याखालश्या डोकऱ्या बयला
वाट बग्यादो लावॉ नाका
नाक्योर जावॉन येदा तिगाळा
भज्याई पुडी भाऑ नाका

रातबर मोबाइल बगित्या पोराऑ
कान मॉड्यादो घाबरॉ नाका
पोराकरतान् नुसते पैशे देनारा
ATM...मशीन बनॉ नाका

पैसॉ जालॉ तॅ माजॉ नाका
गरीब हाव भगून लाजॉ नाका
हक्काआ बुंबलाआ आटवान करा
पन ऊपकाराऑ हरगॉ ताजॉ नाका

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

तुई - तुझी, हिजॅदॅ - शिजेल, येदा - येशील, तिगाळा - तेव्हा, भाऑ नाका - विसरू नकोस, कान मॉड्यादो - कान पिरगाळायला, हाव - आहात, माजॉ नाका- माजू नये, भगून - म्हणून, बुंबलाआ आटवान - सुक्या बोंबलाची आमटी, हरगॉ - सरंगा, आलास - आलाच

**– बर्नड लोपीस**



## अहिराणी बोली
## खानदेसनी बेटी

खानदेसनी बेटी
पोर खानदेसनी प्यारी से बेटी
तिले कष्टानी आवड से भलती
भ्याये ना कामले जाने ना जीवले
खेतमान घरमा भ्याये कामज तिले
चुला पा बयस उन मा तयस
सासू सासरासले बी समाई लेस
लेक जरी ऱ्हायनी वानीकिनीनी
सासरले जाताज धुयदान तीनी
पोर खानदेसनी वागनुकनी शिस्तीनी
तिनाज बये हुब्या -हायेत घरन्या भींती
खानदेसनी बेटी नांदस खराब घर मा बी
नाव काढस मायबाप न म्हने मी अश्शीलनी बेटी
मायबापनी लाडनी अस्तुरी तिना रामनी
कस्तुरी तिना जनमनी ती उधयी देस

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

भलती-खूप, खेतमान-खेत, कामज-काम, बयस-जळते, तयस-तळते, वानीकिनीनी-कौतुकाची किंवा लाडाची एकुलती एक, तिनाज-तिच्यामुळे, अश्शीलनी-खानदानी, अस्तुरी-पत्नी, भींती-भिंती, हुब्या-उभ्या, उधयी-उधळून.

**– मंदाकिनी पाटील**



## मराठवाडी बोली

## ''सगळ्या माणसांना जेरीस आणणाऱ्या काळात''

'कोसाला एकच दिवा नांदल' हे मनवा भाकणारे
कधीच विजून गेलेत वाऱ्याच्या झोकात
मग आता
माणसाच्या मुळावर उठणारं
या काळानं कोणतं खज्याळ नकीतर हाळजीलंय?
माणसाच्या उभ्या हायातीलाच पान लागलंय.
रोजच्या रोज मरणाला चूच करून
जीव मोकळा करून घेतोय आम्ही.
रोज पिशवीतून आणून खाता खाता
पोटाची गार भरली होती जित्यपणी
अखेर आपली अशीच पिशवी भरली जाईल
असं चुकुनही कोणी चितलं नव्हतं मनी.
नाही हंबर नाही गहिवर
नाही रडबोंब नाही ओवी
झाला काळजाचा मसणवटा
परकी माती उसना खांदा
माशी वारायला पदर परका.

माणुसकी फकाट झाली म्हणाय गेली तर
ती कोणत्या काळात घवघव नांदली?
मंग आताच का
हे चिडकं खवंदं इतकं चिडतंय?

गरमीच्या भरणी नकीतरात
तुला पान लागलं
तेव्हा मी बँकेत चेक वटवत होतो
म्हणून तुझी मौत सापडली नाही मला.
तुला अखेरचं डोळेभरून पाहण्याचं
गळ्याखालची पोळी चोंबळण्याचं राहून गेलं,

खैर
तुझ्या मौतीला पाचपन्नास जनांचे हात लागले
चुलत्याच्या कोऱ्या धोतराचा गलप
तुझ्या अंगावर पांगरल्याचे कळाले.
सगळ्या माणसांना जेरीस आणणाऱ्या काळात
तू आमच्यापेक्षा भाग्यवंत निघालास

'तुझे मुंगसं माणसाला धार्जीण'
असा हा मनवा पिढ्यान् पिढ्या तोंडोतोंडी सरकत जावो
तुझ्या कीर्तीला बरकती मिळो.

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

मनवा - म्हण, झोक - झोत, खज्याळ - खोडकर / आरकट, नकीतर - नक्षत्र, हाळजीने - जन्मला घालणे, पान लागणे - साप चावणे, चूच करणे - झिडकारणे, माशी वारने - मृत देहावरील माशा पदराने झिडकारणे, फकाट - कंगाल, चिडकं. खवंदं - ओली जखम, चोंबळणे - चोळणे / कुरवाळणे, मुंगसं - बैलाच्या तोंडाला बांधलेली जाळी, बरकती - भरभराट/ समृद्धी.

**– अमृत तेलंग**



## तावडी बोली

## उतर उतर लते खाली...

उतर उतर लते खाली एस्टीतून बया
सोडतो न् मी तुल्हे नव्या रिक्षातून मह्या ... ।। धृ ।।

धडधड व्हते मही जव्हा इस्टानात येते
जिरावून जातो घाम तव्हा चोरून पाहाते
चालतीन कधलोंग सांग नुस्त्या खाणाखुणा
म्हणून्त आनला मीन्हं  हा नवा भेटीचा बहाना
उतर उतर खाली मह्या फडकतो डोया ..... ।। १ ।।

बापामांघी लागून मीन्हं दोन एकर इकली
तुह्यासाठीच राणी हे नवी रिक्षा घेतली
रिक्षात बसवून तुल्हे फिरविन चहूकडे
मांघे वळून पाहाय फक्त एकदा मह्याकडे
मान महे म्हन्न एकदा करतो गयावया ..... ।। २ ।।

चाल चाल मह्यासंगे भुर्रर उडून जाऊ
शहरामंधी दोन्ही झनं खोली करून राहू
राणीवानी तुल्हे गड्या मी सुखामंधी ठेविन
घरामंधी राहाजो तू मी हे रिक्षा चालविन
संध्याकायी जाऊ मस्त मारू बगीच्याच्या फाया ।। ३ ।।

आयकनं दोस्ता मह्या नको येडापणा करू
मांघे मांघे यून आसा गड्या पिच्छा नको करू
घरी कोन्हं सांगलं तं भो व्हईन सम्दा बेंग्या
बापापुढे मीबी तुल्हे तव्हा दाखविन ठेंग्या
हातपाय जोडून तव्हा करशीन आयकोया ... ।। ४ ।।

आसं जर केल्हं तुन्हं मी जित्ता नि राहाणार
व्हकाराची वाट तुह्या कधी नही पाहाणार
त्येच्यापेक्षा आसं कर्तो आत्ताच उडी मारतो
प्रेमासाठी एस्टीखाली तरफडून मरतो
मढ्यावर तेवढा फक्त टाक्झो कफनाचा बोया ।। ५ ।।

नको नको आसं करू उतरते मी खाली
सम्द सोडून व्हते मी राणी तुह्यावाली
राजाराणी दोन्ही आपू भुर्रर उडून जाऊ
सुखी संसाराचं गाणं आपू दोन्ही मियून गाऊ
तुह्यासाठी जीव राजा मह्या बी झाला भोया ।। ६ ।।

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

बया - बाई, तुल्हे - तुला, मह्या - माझ्या,
इस्टान - बसस्टॉप, जव्हा - जेव्हा, तव्हा - तेव्हा,
डोया - डोळा, इकली - विकली, मह्याकडे - माझ्याकडे,
फाया - फेऱ्या, बेंग्या - फिसकटणे, ठेंग्या - नकारघंटा,
आयकोया - गयावया, नि - नाही, बोया - बोळा,
फडकणे - फडफड करणे.

**– अशोक कौतिक कोळी**

## चंदगडी बोली

## उभ्या ऊसात गं...

उभ्या ऊसात गं रान झालं लई
जाताव यरवाळी भांगलूस बाई ।। धृ ।।

आगं खुळी पसारली घुळी
घातली खाद रानास लागली
म्हागाईगत रानच वाढोली ।। १ ।।

घेवा लांब रट्ट्याची आंगी
ऊसाच्या पानास्नं धार दांडगी
नात्यांगत आंग नाजूक लई ।। २ ।।

यतो मिय्या भाकरी बांधोन
जावा पाण्याचा बिंदगा घ्युन
सोसावोन व्हते दांडगी कायली ।। ३ ।।

उभ्या ऊसात गं रान झालं लई
जाताव यरवाळी भांगलूस बाई...

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

जाताव - जातो, यरवाळी - लवकर, घुळी - रानाचा प्रकार, लांब रट्ट्याची आंगी - लांब हातोप्याचे शर्ट, मिय्या - मी, बिंदगा - घागर, सोसावोन - तहान लागून, कायली - काहिली (त्रास)

**– हणमंत जयवंत पाटील**



## झाडी बोली

## मरू देसील का पान्या? (गझल)

जगू तू देस नाही तं, मरू देसील का पान्या?
इतल्ला एवडा माजा, घरी नेसील का पान्या?
तप्याना आटलं आसू, लडावालं नसं कोनी
धदगत्या वांज सरनावर, तरी येसील का पान्या?
कितिक झन लागलं फासी, तुज्या बैमान नेतीना
करू नोको असा हासा, सपत घेसील का पान्या?
दनाना दन् बरससिल तू, तऱ्याची खांड फुटल्यावर
जमीनीलं फिरुन मनसिल, बरा टेसील का पान्या?
जरासा सांग तू मालं, गरा सोकून आल्यावर-
तुज्या घरचं घुटक आसू, खरा पेसील का पान्या?

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

देस - देत, तं - तर, पान्या - पावसा, इतल्ला- निरोप, एवडा - एवढा/ इतुका, माजा - माझा, तप्याना - उन्हाळ्यात प्रखर, उन्हामुळे, आटलं - बाष्पीभवन झालेले, लडावालं - रडण्याकरिता, नसं - नाही, धदगत्या - चहुबाजूंनी पेट घेतलेला, वांज - निपुत्रिक, कितिक झन - कित्येक जण, नेतीना (नेत) - नियत, करू नोको - करू नकोस, हासा - टिंगलटवाळी / उपहास, सपत - शपथ, दनाना दन् - धो धो /मुसळधार / स्वैर, तऱ्याची - तळ्याची/तलावाची, खांड - तळ्यातील पाणी नहराद्वारे विसर्ग होणाऱ्या जागी पारावर तात्पुरती माती टाकून अडवलेली जागा, जमिनीलं - भूईला / जमिनीला, मनसिल - म्हणशील, टेसील - रागीट / ऐट / दिमाखदार, मालं - मला, गरा - गळा/ कंठ, गरा सोकून आल्यावर - तहानेने घसा कोरडा झाल्यास, घुटक - एखादं घुट, पेसील, का - पिणार काय?

**– लोकराम केशव शेंडे**

## कोरकू बोली

## कोणजईगा प्रार्थना



हे भगवान जन्म जिली इंजके
आदिवासी माय गा लाजाटे
हिगरा हाजे लक्के इंजेन
इनी आधुनिक सभ्य समाजटे
चोलाका भी गोजकेज्जा
इंजके माय लाजा गर्भो टे
हिगरा हाजे लक्के इंजेन
इयाँगा जान गोजुगा टे
हे भगवान जन्म जिली इंजके
आदिवासी माय गा लाजा टे
कोणू बन चाहता इंज
आधुनिक सभ्य, सुसंस्कृत समाजेन
खीजो, भेदभाव डो अत्याचार डडावा
नागरी पुरुषप्रधान समाजेन
दहेज प्रथागा, नरक रोंगो दुःख सहेन डडा लक्केन
आधुनिक विज्ञान तंत्रज्ञाना लाबड़ सभ्य समाजेन
हे भगवान जन्म जिली इंजके
आदिवासी माय गा लाजा टे
संभालाटिंजके डिकू हजारो सालगा
मूलमंत्र 'स्त्री-पुरुष समानता' गा
चोटो बादोन सभ्य समाज सागे लक्केन अचरानेन
मूलमंत्र 'स्त्री-पुरुष समानता' गा
जन्म जिली इंजके डी समाजेन
जे जीके मंत्र इनी विश्व के 'स्त्री-पुरुष समानता' गा
हे भगवान जन्म जिली इंजके
आदिवासी माय गा लाजा टे
जन्म जिली डी जगान
जे डोके शान कोणजईगा
कोणजई लक्ष्मी उरागा
इफान संस्कृती आदिवासीकू गा
डिज डोके वारिस स्त्री संस्कृती गा
इनी महान भारत माता गा
हे भगवान जन्म जिली इंजके
आदिवासी माय गा लाजा टे
टाका इफर तकलिबेन आदिवासी समाज
गरिबीन थाड़ लक्केन डो गोएन
फिर भी आमके जन्म जेवा कविता इनी जगेन
मान डोटे संस्कृती आदिवासी समाजागा
स्थापना डाए नया कीर्तिमान,
डाटके लड़ाई डाय इनी पुरुषप्रधान समाजाटे
मेडा सम्मन डोजोम
आदर्श महान 'आदिवासी संस्कृती' गा
हे भगवान जन्म जिली इंजके
आदिवासी माय गा लाजा टे

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

जिली - देणे, इंजके - मला, लाजाटे - पोटातून, हिगरा हाजे - भीती वाटणे, इनी - या, समाजाटे - समाजाची, चोलाका भी - कधी ही, गोजकेज्जा - मारून टाकणे, इयाँगा - माझा, कोणू - जन्म घेणे, बन - नाही, खीजो - क्रोध/राग, डडावा -करतात, नरक रोंगो - नरकसारखा, डडा लक्केन - करत आहे, संभालाटिंजके - संभाळून ठेवणे, डिकू - त्यांनी, चोटो - किती, सागे - देणे, डी समाजेन - त्या समाजात, जे - कोण, जीके - दिले/ दिला, डोके - ठेवणे, कोणजईगा - मुलीचे, उरागा - घराची, इफान - अशी, डिज - तो, ते, ती, टाका - आहे, थाड़ - राहणे, आमके - तुला, जन्म जेवा - जन्म देणे, मान डोटे - मान ठेवणे, डाय - करणे.

**– रामगोपाल रामलाल भिलावेकर**

## दखनी बोली

## तू आया नई तो

तिरी बांट देखको सुके बाग के फुलां
तिरी बांट देखको थक्या आंगनका झुला

तू आया नई मुका हुया पिंजडेमेका मिट्टू
तू आया नई तो हुया मोत्या अपना खट्टू

तू आया नई तो दूद पिना छोडी बिल्ली
तू आया नई तो बंद हुई चिल्लमचिल्ली

तू आया नई तो सुना पड्या रे गांव
तू आया नई तो गायब हुई रे छांव

तू आया नई तो नई आई तिरी राणी
तू आया नई तो आग्गेच बडी नई कानी

. . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

तिरी-तुझी, नई - नाही, बांट - वाट, देखको - पाहून, थक्या - थकले, हुया - झाला, चिल्लमचिल्ली- आरडाओरडा, बडना - पुढे सरकणे, कानी - कहाणी

**– डी. के. शेख**



## बंजारा बोली

## हिमतेनं जीत मळीचं

छातीम अंगार पचालं
ये आंधारेन हारादं
तारी वाट बांधीय वोनं
जिदेरो पाणी परादं

चड उतार घाट देखन
थमेनी नंदीरी धार
भाटारी फोडन छाती
जाणू छं नंदीनं पार

नशिबेनं रोयेरो छोड
आत आयतो केन मळोचं
जे हात झलचं बातू
हिमतेनं जीत मळीचं.

. . . . . . . . . . . . . . . . . .

**शब्दार्थ**

हारादं - हरव/ पराजित कर, तारी - तुझी, वोनं - त्याला, परादं- पाज, थमेनी - थांबत नाही, नंदी- नदी, भाटा - दगड, जाणू छं - जाणे आहे, पार - पल्याड, रोयेरो - रडायचे, आतं- इथे, केनं - कुणाला, मळोचं - मिळालय, झलचं - झेलतात / स्वीकारतात, बातू - कुस्ती / झगडा, मळीचं - मिळालंय, हिमतेनं - हिमतीलाल

**– वीरा राठोड**

## पावरी बोली

## घर

आय - बाहेहे जन्म देल्या तींद्री भी अर कर,
भायहोह ...! मारा..... टाईम्मां टाईम काढीन जाया करजी घर!

खूब कबाड कष्ट करीन तोह हिकावडू से,
जहलो जमलं तहलो तेरो कर्तव्य निभावडू से !
तार करीन हवकारन अपमान भी लिकावडू से,
आज भी बाबू तारु तेरी संस्कृती टिकावडू से !
खूब करला से .. भायहो..! तारी फिकर..!
भायहोह! मारा... टाईम्मां टाईम काढीन जाया करजी घर!

वेचीने लाकडा,
गिरवे मेकीने खेतोने टुकडा!
पेरीने फाटला कपडा,
रईने टुटला झोपडा!
कयलू से तोह ... तु शिक्षण कर..!

भायहोह ...! मारा..... टाईम्मां टाईम काढीन जाया करजी घर!

हिकीन बण्यू तू सायब चांगलू,
हयरमा तू बांध्यू मोटू बंगलू !
चे बी आई बाबां नी भामण्या देवन फुटू टांगलू ,
तारु बांध लेच्यू बंगलू.. आय - बाहेह बी बांध दे आयतो मोटो घर...!

भायहोह ...! मारा.... टाईम्मां टाईम काढीन जाया करजी घर!

आई तारी जीवनभर कयली से मारू लाडक बेटू,
सायब बणीन मां रये आईहाते सेटू सेटू!
खुबूज वेला करीन तोह करली से मोटू,
उतारवयमां बन तेरू आधारन टेकू!
तारा बचपन दिहे ... मनसे कर अर ..!

भायहोह ..मारा....! टाईम्मां टाईम काढीन जाया करजी घर!



**शब्दार्थ**

आय बाहेहे - आईवडील, देल्या - दिला, तींद्री - त्यांची, अर - आठवण, भायहोह - भाऊ रे, मारा - माझ्या, टाईम्मा टाईम - वेळात वेळ, जाया - जात जा, खूब - खूप, तोह - तुला, हिकावडू -शिकवलं, से - आहे, जहलो - जसं, तहलो - तसं, तेरो - त्यांचे, निभावडू - निभावलं, तार करीन - तुझ्यासाठी, हवकारन - सावकाराचे, भी - ही, लिकावडू - लपवलं, खूब करला से - खूपच केलीय, वेचीने - विकुनी, लाकडा -लाकूड (सरपण), गिरवे - गहाण, मेकीने - ठेवूनी, खेतोने टुकडा - शेतीचा काही भाग, पेरीने - नेसूनी, फाटला - फाटके कपडे, रईने - राहूनी, टुटला - टुटके, झोपडा - झोपडी, कयलू - सांगितलय, हिकीन - शिकुनी, बण्यू - बनला - झाला, सायब - साहेब, चांगलू - चांगला, हयरमा - शहरात, बांध्यू - बांधला, मोटू - मोठा, बंगलू - बंगला, चे बी - तिथं, त्यातही, फुटू - फोटो, नी - नाही, टांगलू - लावला - टांगला, तारू - तुझा, बांध लेच्यू - बांधून घेतला, बांध दे - बांधून दे, आयतो मोटो - लहान मोठं, तारी - तुझी, कयली से - म्हणत राहिली, मारू - माझा, लाडक बेटू - लाडका पोरगा, बणीन - होऊन, बनून. मां रये - नको राहू, आईहाते - आईपासून, सेटू - लांब, खुबूज - खूपच, वेला - त्रास, तकलीफ, करली से मोटू - केलीय मोठा, उतारवयमा - म्हातारपणी, बन - हो, तेरू - तिचा, आधार - टेकू, दिहे - दिवस, कर अर - आठवण कर.

**– विठ्ठल सुभाष भंडारी**
**(प्रेम भंडारी)**

**गंधाली दिवाळी २०२१**

**वर्ष ३४ वे**

**पृष्ठे २४०, मूल्य २२५ रुपये**

# गंधाली



**दिवाळी अंक असा असेल –**

* **कथा** –उषा तांबे, वसंत वाहोकार, प्रतिभा सराफ, अशोक लोटणकर, राजेंद्र वैद्य, वर्षा रेगे, जयश्री विजय पाटील, रश्मी रामचंद्र पटवर्धन, दत्तात्रय शंकर म्हेतर, रमानंद विष्णू खाकुर्डीकर, डॉ. मधुकर केशव वर्तक, अनघा तांबोळी
* **कादंबरी**– तृतीय पंथीयांची जीवन कहाणी सांगणारी कादंबरी डॉ. अलका शशांक कुलकर्णी
* **लेख**– रमेश नागेश सावंत, वैभव साटम, मनोज आचार्य
* **कविता विभाग एक** – (नारायण लाळे संपादित) अशोक बागवे, डॉ. अनुजा जोशी, मंगेश विश्वासराव, राजीव जोशी, अमोल साहेबराव खरात, डी. के. शेख, दमयंती भोईर, जयश्री हरी जोशी, फ.म. शहाजिंदे, मके.
* **कविता विभाग दोन** – (संपादकीय निवड) सुरेश पाचकवडे, पद्माकर कळसकर, जनार्दन काजिर्डेकर, डॉ. विनय वसंतराव दांदळे, तुळशी राम बोकडे
* **गिरिजा कीर कथास्पर्धा विजेते** – पाच कथालेखक :– हेमंत कोठीकर, प्रमोद नामदेवराव बोरसरे, ज्योत्स्ना अरुण सावरकर, क्षमा गोसावी, मृदुला मोहन आगाशे
* **नेहमीचे सदर** – मकेचं कणीस
* **मुखपृष्ठाविषयी थोडेसे** – कविवर्य वसंत बापट यांच्या कवितेवरील मुखपृष्ठ आणि विवेचन
* **संपादकीय** – विस्मृतीत गेलेल्या साहित्यिक परंपरा
* **व्यंगचित्रे** – दत्तात्रय शंकर म्हेतर

**वितरण**
**मुंबई – बी. डी. बागवे आणि कं., मॅजेस्टिक बुक हाऊस**
**पुणे – संदेश एजन्सी, पूनम एजन्सी**
**नाशिक – पाठक बंधू**
**कोल्हापूर – एन.टी. तेग्गीनमणी**

* **मुखपृष्ठ आणि आतील**
**संपादक – डॉ. मधुकर केशव वर्तक**
**अ–९, दहिसर दर्शन, मराठा वसाहत,**
**देसाई रोड, दहिसर (पूर्व), मुंबई – ४०० ०६८.**
**भ्रमणध्वनी – ९७०२७५२५२१**
**ईमेल** –gandhalidiwali@rediffmail.com
gandhalidiwali@gmail.com

# परिचय

**१. डॉ. गणेश देवी**

अध्यक्ष, भारतीय भाषा लोक-सर्वेक्षण आणि राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रसेवा दल.

**२. प्रवीण दशरथ बांदेकर**

कविता, कादंबरी, ललित लेख, समीक्षा, बालसाहित्य इ. साहित्यप्रकारात लेखन. येरू म्हणे, खेळखंडोबाच्या नावानं, चिनभिन (कविता), चाळेगत, उजव्या सोंडेच्या बाहुल्या, इंडियन ॲनिमल फार्म (कादंबरी), घुंगुरकाठी, हरवलेल्या पावसाळ्यांचा शोध (ललित). महाराष्ट्र फाऊंडेशनसह अनेक पुरस्कारांनी सन्मानित. 'चाळेगत' अनेक विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमात समाविष्ट. (भ्रमणध्वनी : ९४२२४३६१००)

**३. रश्मी कशेळकर**

भुईरिंगण व भुयपर्मळ हे दोन ललितलेखसंग्रह प्रकाशित. ललितलेखनात स्वतःची शैली. लेखनात मालवणी, कुडाळ बोलीभाषांची सहजता, विशेषत: बोलीतील संवाद, शब्द, तसेच लोकसंस्कृती मुक्त वापर. (भ्रमणध्वनी : ९४२१४४२३१६)

**४. डॉ. मधुकर केशव वर्तक**

'नामदेव धोंडी महानोर कवी – एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. 'आठवांच्या पारंब्या' ही कादंबरी व 'मधुपर्क' कथासंग्रह प्रकाशित. 'कार्यमग्नता जीवन व्हावे' हा जीवनगौरवग्रंथ प्रकाशित. 'गंधाली' दिवाळी अंकाचे संस्थापक व संपादक. (भ्रमणध्वनी : ९७०२७५२५२१)

**५. स्मिता पाटील**

लेखिका, कवयित्री. 'पाझर' कवितासंग्रह प्रसिद्ध. वाडवळी बोलीची अभ्यासक. डॉ. गणेश देवी यांच्या नेतृत्वाखाली 'भारतीय लोकभाषांचे लोकसर्वेक्षण' या प्रकल्पात वाडवळी आणि वारली बोलीबद्दल माहिती देऊन सहभाग. अनेक पुरस्कार प्राप्त. (भ्रमणध्वनी : ८००७८४८३८४)

**६. डॉ. अविनाश पाटील**

एम.ए., एम.फिल., पीएच.डी., डिसीए (जर्नालिझम). महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागातून संशोधन अधिकारी म्हणून निवृत्त. वस्ती नसलेले गाव (आगरी बोलीतील कादंबरी), गजलवेल (प्रातिनिधिक गजलसंग्रह), आगरी समाजाचा इतिहास (संपादित), मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात आगरी बोलीतील कथा, कविता समाविष्ट. अनेक पुरस्काराने सन्मानित. (भ्रमणध्वनी : ९८६९०५१३३७)

**७. भानुदास पाटील**

कला शाखेचा पदवीधर. आगरी बोलीभाषेतून विनोदी कथा, कविता, नाटिकांचे लेखन. 'दुभंग' हा कथासंग्रह प्रसिद्ध. कथांना अनेक पुरस्कार प्राप्त. बोली जिवंत राहावी म्हणून मित्रमंडळीत आगरी बोलीतूनच संभाषण. (भ्रमणध्वनी : ९८९२२५२३४५)

**८. डॉ. नरेश नाईक**

निवृत्त अध्यापक. सामवेदी बोलीच्या संरचनात्मक अभ्यासावरील ग्रंथास म.सा.प. पुणे, यांचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार. महाराष्ट्र शासनाचा, कै. नरहर कुरुंदकर भाषाशास्त्र पुरस्कार, मराठी अभ्यास परिषदेचा, कै. ना. गो. कालेलकर भाषाविज्ञान पुरस्कार प्राप्त. (भ्रमणध्वनी : ७३५०५०८३१०)

**९. डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**

प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ. 'मराठी कादंबरीची समाजभाषावैज्ञानिक चिकित्सा' या विषयावर पीएच.डी. 'समाजभाषा

विज्ञान आणि मराठी कादंबरी', 'समीक्षापद्धती : सिद्धांत आणि उपयोजन' आदी ग्रंथ प्रकाशित. 'चंदगडी बोली : इतिहास आणि भूगोल' हा संशोधन प्रकल्प. शासनाच्या 'नरहर कुरुंदकर' उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्काराबरोबर अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त. (भ्रमणध्वनी : ९४२२६२८३००)

**१०. प्रा. (डॉ.) गोपाळ ओमाणा गावडे**

महावीर महाविद्यालयामध्ये मराठी विभागप्रमुख. 'बाई शेवंती फुललेयी' (चंदगड परिसरातील लोकगीतं), 'मामा वरेरकर : प्रयोगाची नांदी' ही पुस्तके प्रकाशित. मराठी अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व मराठी अभ्यास मंडळ, महावीर महाविद्यालय, (स्वायत्त) कोल्हापूर येथे कार्यरत. सदस्य – व्यवस्थापन समिती, महावीर महाविद्यालय. (भ्रमणध्वनी : ९४२११००५६२)

**११. डॉ. रमेश सीताराम सूर्यवंशी**

शेतकरी कुटुंबात जन्म. एम.ए.बी.एड. अहिराणी बोलीवर भाषाशास्त्र विभागातून पीएच.डी. इंग्रजीचे अध्यापन. अहिराणी भाषेवर संशोधन, संकलन. समग्र अहिराणी वाङ्मय प्रसिद्ध. अहिराणी बोलीसुलभ व्याकरण, खानदेशातील म्हणी वर्गीकरणात्मक ग्रंथ प्रकाशित. (भ्रमणध्वनी : ९४२१४३२२१८)

**१२. डॉ. राजशेखर शिंदे**

एम.ए. पीएच.डी. (मराठी), 'पु.शि. रेगे यांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पदवीसाठी संशोधन (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), 'अरुण कोलटकरांच्या कवितेचा शैली वैज्ञानिक अभ्यास' यु.जी.स. बृहत्प्रकल्प पूर्ण (२०१४), 'पु.शि. रेगे यांच्या कवितेचा शोध' (हर्मिस प्रकाशन, पुणे), असा असामी : पु.ल. देशपांडे (जन्मशताब्दी गौरवग्रंथ) संपादन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. अनेक महत्त्वाच्या विषयांवर शोधनिबंध प्रकाशित. (भ्रमणध्वनी : ७५८८३७३७१०)

**१३. डॉ. प्रतिमा पंजाबराव इंगोले**

'वऱ्हाडी लोकगीतांचा चिकित्सक अभ्यास' यावर पीएच.डी. कविता, कादंबरी, ललित लेख, वैचारिक लेख, संशोधनपर लेख, समीक्षा, भाषाशास्त्रविषयक लेखन, बालकादंबरी अशा विविध प्रकारात विपुल लेखन, १०२ पुरस्कार प्राप्त.
(भ्रमणध्वनी : ९८५०११७९६९)

**१४. निखिल बेल्लारीकर**

व्यवसायाने आयटी अभियंता. इतिहासाची, त्यातही मराठेशाहीच्या इतिहासाची आवड व त्यामुळे अनेक ठिकाणी लेखन. आंतरराष्ट्रीय पातळीवरील शोधनिबंधांसह मराठी वृत्तपत्रे, मासिके व दिवाळी अंकांत लेखन. मराठेशाहीशी संबंधित डच साधने हा संशोधनाचा मुख्य विषय. (भ्रमणध्वनी : ७२१९२७३०५३)

**१५. डॉ. हरिश्चंद्र प्रभाकरराव बोरकर**

नक्षलग्रस्त आदिवासी भूभागात भाषिक व सांस्कृतिक उत्थानासाठी कार्य. कथा, कविता, एकांकिका, नाटक, भाषाशास्त्र, लोकसाहित्य, चरित्र, वाङ्मयकोश, समीक्षा आदी क्षेत्रात विपुल लेखन. ११० ग्रंथ प्रकाशित. शासनाचा उत्कृष्ट ग्रंथपुरस्कार, तसेच भाषासंवर्धक पुरस्काराने सन्मानित. झाडीबोली चळवळीचे अध्वर्यू. 'मराठी अंत्याक्षरी शब्दकोश', तसेच 'ग्रामगीतेची शब्दश्रीमंती' हा ग्रंथ प्रकाशित. (भ्रमणध्वनी : ९४२२८९०९३७)

**१६. डॉ. देवानंद सोनटक्के**

पीएच.डी. सहयोगी प्राध्यापक, डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव. सामर्थ्याचा स्वर, समीक्षेचा अंत:स्वर, समीक्षेची अपरूपे, कवितेचा अंत:स्वर ही महत्त्वाची समीक्षाविषयक पुस्तके प्रकाशित. मराठी विश्वकोश विकीपीडियासाठी लेखन व संपादन. उदयोन्मुख व उत्कृष्ट समीक्षक पुरस्कार प्राप्त. (भ्रमणध्वनी : ९८६०२६३१६३)

**१७. डॉ. श्रीकृष्ण काकडे**

सहयोगी प्राध्यापक, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला. मध्यभारतातील आदिवासी – कोरकू, निहाल, राठवा, गोंड

(थाट्या, परधान, माडिया), भिल्ल, पारधी, बंजारा या जमातींची लोकगीतं, लोककथा, विविध आदिवासी बोलींचे शब्दसंग्रह, म्हणी, वाक्प्रचार, नृत्य, नाटक, संस्कृतीचे संकलन. मध्य भारतातील धनगरी गीते/ओव्या, वासुदेवांची गीते, हरबोला (तुंबडीवाले) यांची आख्याने, भराडी (नाथजोगी) गीते, जागरण गोंधळी गीते, पोतराजांच्या धूपारत्या, बहुरूपी लोकांची लोकआख्याने, मसानजोगी संस्कृती या विषयीचा डाटा संकलन. आदिवासींची डाक्युमेंटरी, लोकगीतांच्या चित्रफिती, ध्वनिफितीची निर्मिती. डॉ. गणेश देवी यांच्यासोबत आदिवासी कोरकू, निहाल, राठ्या, थाट्या या भाषांचे संशोधन, डॉ. देवींच्या PLSI प्रोजेक्टमध्ये समावेश. (भ्रमणध्वनी : ९८५०२५००७९)

**१८. मोहन रणसिंग**

मुंबई विद्यापीठाची एम.ए. पदवी प्राप्त. ठाकर जमातीचे संशोधक. आजपर्यंत नऊ पुस्तके प्रकाशित. (भ्रमणध्वनी : ९८२०८१४६२०)

**१९. डॉ. हरिचंद नांगसू नरेटी**

साहाय्यक प्राध्यापक (मराठी) सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे कार्यरत. (भ्रमणध्वनी : ७०५७५३४२८७)

**२०. रश्मी सातफळे**

एम.ए. मराठी वाङ्मय यात सुवर्णपदक. निहाली भाषेवर पीएच.डी.चा अभ्यास. (भ्रमणध्वनी : ९७६६७५०२५६)

**२१. दत्तात्रेय चिमा पवार**

अत्यंत गरीब आदिम कातकरी कुटुंबात जन्म. एसटीमध्ये कंडक्टर (वाहक) म्हणून नोकरी. कातकरी बोलीभाषा टिकावी म्हणून इतर तालुक्यातील लोक एकत्र करण्याचा प्रयत्न. (भ्रमणध्वनी : ७०५७७२२९९६)

**२२. डॉ. काशीनाथ बऱ्हाटे**

अचलपूर येथे महाविद्यालयात प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख. स्व. छगनलाल मूलजीभाई कढी कलामहाविद्यालय, अचलपूर. आदिवासी भाषा संस्कृतीचे अभ्यासक, लेखक, समीक्षक, संशोधक. 'कोरकू बोली : वर्णनात्मक आणि समाजभाषावैज्ञानिक अभ्यास', 'बहिणाबाई चौधरी : व्यक्तित्व आणि कवित्व' हे ग्रंथ प्रकाशित. 'दक्षिणपूर्वआशियाई भाषापरिवाराच्या मुंडा गटातील भाषांचा तौलनिक अभ्यास'. बृहत् संशोधन प्रकल्प सादर. (भ्रमणध्वनी : ९४२०१२४७१४)

**२३. संतोष पावरा**

ढोल काव्यसंग्रह (२०१७), साहित्य अकादमी दिल्ली, क्षेत्रीय कार्यालय, मुंबईच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या बोलीभाषासंग्रहात दहा पावरी मातृभाषेतील कविता समाविष्ट. 'आदिम कथा' या ग्रंथात तीन कथा पावरी मातृभाषेत प्रकाशित. अनेक पुरस्काराने सन्मानित. (भ्रमणध्वनी : ७०३०५२२६५७)

**२४. डॉ. अनंता कस्तुरे**

मराठी विभागप्रमुख, श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज पाचगणी. 'मराठी समूहातील गुप्तबोलींचा अभ्यास' या विषयावर पीएच.डी. २५ शोधनिबंध प्रकाशित. विविध नियतकालिकांतून शोधनिबंध, कथा, कविता प्रसिद्ध आणि पुस्तकं प्रकाशित. कविता व शोधनिबंधांस अनेक पुरस्कार. (भ्रमणध्वनी : ९९२२८६६५३६)

**२५. मनीष लक्ष्मण पाटील**

कॉम्प्युटर इंजिनीयर. प्रमाणमराठी व खान्देशी (लेवा गणबोली) बोलीतून कथालेखन. लेख, परीक्षण व ललित लेखन. महाराष्ट्र व मराठी भाषिक प्रदेशातील बोलीभाषांतील कथांचे संपादन करून विविध बोलीभाषेतील कथा एका संग्रहातून मराठी वाचकांना सादर करण्याचा मराठीतील पहिला प्रकल्प पूर्णत्वाकडे. (भ्रमणध्वनी : ९९२००४२४४१)

- **दादा मडकईकर –** मालवणी बोलीचा अभिमान बाळगणारे कवी, गायक (भ्रमणध्वनी : ९४२३३०४७९५)
- **कल्पना बांदेकर –** मालवणी बोलीतील कवयित्री (भ्रमणध्वनी : ७७९६३२४१९५)
- **एल.बी. पाटील –** रायगडभूषण, आगरी बोलीचे कवी, लेखक (भ्रमणध्वनी : ८८५०२८७४८६)
- **डॉ. सिसिलिया कार्व्हालो –** कवयित्री, अभ्यासक (भ्रमणध्वनी : ९४२२३८५०५०)
- **संगीता वाझ –** सामवेदी बोलीत कवितालेखन (भ्रमणध्वनी : ८९८३७५९३८०)
- **सुहास राऊत –** वाडवळी बोलीतील कविता, गीतलेखन (भ्रमणध्वनी : ९९२३००४८९५)
- **बर्नड लोपीस –** कादोडी बोलीत कवितालेखन (भ्रमणध्वनी : ७०६६६९६१११)
- **ॲड. मंदाकिनी पाटील –** कवयित्री. अहिराणी बोलीची अभ्यासक (भ्रमणध्वनी : ९९६०४१११९०)
- **अमृत तेलंग –** मराठवाडी बोलीतून कवितालेखन (भ्रमणध्वनी : ९९७०९२०४९५)
- **डॉ. अशोक कौतिक कोळी –** तावडी बोलीचे अभ्यासक, कवी (भ्रमणध्वनी : ९७६५३९०२९७)
- **लोकराम शेंडे –** झाडी बोलीचे कवी/गीतकार (भ्रमणध्वनी : ८८०५७६४००९)
- **हणमंत पाटील –** चंदगडी बोलीत कवितालेखन (भ्रमणध्वनी : ९०११५२९३८८)
- **रामगोपाल भिलावेकर –** कोरकू बोलीभाषेचे कवी (भ्रमणध्वनी : ९४०३४०१९६८)
- **डी. के. शेख –** दखनी बोलीतून कवितालेखन (भ्रमणध्वनी : ८९९९८६०९०१)
- **वीरा राठोड –** मराठी तसेच बंजारा बोलीतून कवितालेखन (भ्रमणध्वनी : ९४२०४३१७१८)
- **विठ्ठल भंडारी –** कवी प्रेम भंडारी म्हणून परिचित, पावरी बोलीत कवितालेखन (भ्रमणध्वनी : ९८८१८०७९२८)





# श्रद्धांजली

**लीलाधर कांबळी** - ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक
**सरोज खान** - ज्येष्ठ नृत्यदिग्दर्शिका
**कमल शेडगे** - सुलेखनकार, मुखपृष्ठकार
**गोविंद चव्हाण** - नाट्यनिर्माते, अ. भा. नाट्यपरिषद अध्यक्ष, बोरीवली शाखा
**रवी दाते** - संगीतकार
**नीला सत्यनारायण** - साहित्यिक, निवृत्त सनदी अधिकारी
**ललिता केंकरे** - साहित्य संघ सभासद
**पंडित जसराज** - शास्त्रीय गायक
**निशिकांत कामत** - दिग्दर्शक
**प्रणव मुखर्जी** - माजी राष्ट्रपती
**सुहास लिमये** - संस्कृत, मराठी भाषावर्ग शिक्षक
**मीना देशपांडे** - ज्येष्ठ साहित्यिक
**श्रीकांत नेर्लेकर** - ज्येष्ठ पत्रकार
**आशालता वाबगावकर** - ज्येष्ठ गायिका, अभिनेत्री
**मंगला पंडित** - साहित्य संघ सभासद
**प्रा. पुष्पा भावे** - ज्येष्ठ साहित्यिक
**सौ. आशा मुळगावकर** - माजी कोषाध्यक्ष, साहित्य संघ सभासद
**वसंत ठुकरूल** - साहित्य संघाच्या अ. बा. गजेंद्रगडकर संदर्भ ग्रंथालयाचे माजी ग्रंथपाल
**रवि पटवर्धन** - ज्येष्ठ नाट्य अभिनेते
**पुष्पा भेंडे** - माजी उपाध्यक्ष सुभाष भेंडे यांच्या पत्नी
**नरेंद्र भिडे** - प्रसिद्ध संगीतकार
**आस्ताद देबू** - नृत्यकार (कथ्थक, कथ्थकली)
**दत्ता घोसाळकर** - निर्माते
**पद्मश्री सुनील कोठारी** - ज्येष्ठ नृत्यअभ्यासक
**बालम केतकर** - कवी आणि चित्रकार
**ईश्वर बिद्री** - ज्येष्ठ सिनेमॅटोग्राफर
**मा. य. गोखले** - सदस्य ठाणे ग्रंथसंग्रहालय
**डॉ. प्र. चिं. शेजवलकर** - ज्येष्ठ व्यवस्थापनतज्ज्ञ, लेखक
**नील शीहान** - शोधपत्रकार, लेखक
**सुधीर दातार** - ज्येष्ठ गायक
**शशिकुमार मधुसूदन चित्रे** - खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ज्ञ
**शंकर सारडा** - ज्येष्ठ लेखक, समीक्षक
**राघवेंद्र कडकोळ** - ज्येष्ठ अभिनेते
**इलाही जमादार** - गझलकार
**राजीव कपूर** - अभिनेता, दिग्दर्शक
**राजा मयेकर** - ज्येष्ठ अभिनेते
**सदा डुंबरे** - साप्ताहिक सकाळचे माजी संपादक, ज्येष्ठ पत्रकार
**श्रीकांत मोघे** - ज्येष्ठ अभिनेते
**अशोक शेवडे** - ज्येष्ठ लेखक, मुलाखतकार
**सागर सरहदी** - ज्येष्ठ लेखक आणि चित्रपट निर्माते
**विलास वाघ** - प्रकाशक, सुगावा प्रकाशन
**शशिकला** - ज्येष्ठ अभिनेत्री
**विरुपाक्ष कुलकर्णी** - मराठी कन्नड अनुवादक
**श्रीकृष्ण बापूराव जोशी** - ज्येष्ठ साहित्यिक
**सुमित्रा भावे** - ज्येष्ठ दिग्दर्शिका
**प्रकाश खरात** - कवी
**किशोर नांदलसकर** - ज्येष्ठ अभिनेते
**वामन भोसले** - ज्येष्ठ चित्रपट संकलक
**वनराज भाटिया** - ज्येष्ठ संगीतकार
**अच्युत ठाकूर** - संगीतकार
**मधुसूदन नानिवडेकर** - ज्येष्ठ गझलकार
**सतीश काळसेकर** - ज्येष्ठ कवी, साहित्यिक
**आनंद अंतरकर** - संपादक, लेखक
**जयंत पवार** - नाटककार, समीक्षक, लेखक

## श्री. एकनाथ आव्हाड यांच्या 'शब्दांची नवलाई' पुस्तकास प्रथम क्रमांकाचा राज्यस्तरीय पुरस्कार

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाच्या वतीने देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती सन २०२०च्या पुरस्कारामध्ये सुप्रसिद्ध बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या 'शब्दांची नवलाई' या दिलीपराज प्रकाशन, पुणेने प्रकाशित केलेल्या बालकवितासंग्रहास प्रथम क्रमांकाचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच कविवर्य ए. पां. रेंदाळकर वाचनालय, जि. कोल्हापूरच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट बालसाहित्यासाठीचा राज्यस्तरीय पुरस्कारही शब्दांची नवलाई या पुस्तकास नुकताच जाहीर झाला आहे. मराठी भाषेची गोडी वाढवणाऱ्या बालकविता या पुस्तकात आहेत. म्हणी, वाक्प्रचार, समानार्थी-विरुद्धार्थी शब्द, जोडशब्द, अलंकार, व्याकरण... हे सारेच 'शब्दांची नवलाई'मधील कवितांमधून उलगडले आहे.

## प्रा. प्रतिभा सराफ यांना मिळालेले पुरस्कार

१. जस्न-इ-रिझवी, या रिझवी कॉलेजतर्फे 'गेस्ट ऑफ हॉनर' पुरस्कार साहित्यिक योगदानासाठी दिला गेला. (१८ जानेवारी २०२०)
२. कोकण मराठी साहित्य परिषद 'सहजसंवाद' या पुस्तकासाठी 'अनंत काणेकर स्मृति पुरस्कार' जाहीर झाला आहे. (२३ जानेवारी २०२०)
३. 'आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटने'चा 'टॉप टेन दिवाळी अंक लेखक' यात तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या स्पर्धेमध्ये एकशेसाठपेक्षा अधिक लेखकांनी सहभाग नोंदवला होता. (१३ एप्रिल २०२०)
४. 'मराठी साहित्य वार्ता' समग्र साहित्यिक योगदानासाठी राज्यस्तरीय 'संत चोखामेळा काव्यगौरव पुरस्कार' दिला गेला. (१ मे २०२१)

## 'शब्दांची नवलाई' आता पोवारी बोलीभाषेत

उपक्रमशील शिक्षक, पोवारी बोलीभाषेचे व शिक्षण विषयाचे अभ्यासक रणदीप बिसने सरांच्या लेखणीतून साकारलेला बालसाहित्यकार एकनाथ आव्हाड यांचा 'शब्दांची नवलाई' या बालकाव्यसंग्रहाचा पोवारी बोलीतील अनुवाद लवकरच प्रसिद्ध होणार आहे. सिंदीपार, ता. लाखनी जि. भंडारा हे मूळ गाव बिसने सरांचे असून ते सध्या आदर्श विद्यामंदिर शाळा, नागपूर येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. तिरीप हा पोवारी बोलीतील त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

**'भोयरी मराठी शब्दकोश आणि भाषा विज्ञान'** हा सुरेश म. देशमुख यांचा भोयरी बोलीवरील महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथात महाराष्ट्रातील वर्धा, नागपूर, अमरावती व मध्यप्रदेशातील बैतूल आणि छिंदवाडा जिल्ह्यात बोलल्या जाणाऱ्या भोयर पवार जातीतील बोलीचा अभ्यास मांडला आहे. २५६ पृष्ठांच्या या ग्रंथात दहा प्रकरणातून भोयर बोलीतील शब्द, त्यांचे मराठी अर्थ, व्याकरण, स्वन-स्वनिम-संयोग व्यवस्था, वाक्यरचना आदी अभ्यास मांडला गेला आहे; तर 'भोयरी संस्कृती' या सुरेश म. देशमुख यांच्या ग्रंथातून संपूर्ण बोलीभाषेत भोयर संस्कृती आणि त्यातील ४४ सण व उत्सव यांची माहिती दिली आहे. भोयर समाजाच्या संस्कृतीचा व बोलीचा अभ्यास करणाऱ्यांसाठी हे दोन्ही ग्रंथ अत्यंत महत्त्वाचे आहेत. यातील पहिला ग्रंथ संवेदना प्रकाशन नागपूर यांनी प्रकाशित केला आहे दुसरा ग्रंथ स्वतः सुरेश देशमुख यांनी प्रसिद्ध केला आहे.

**सौजन्याने : डॉ. देवानंद सोनटक्के**

# नियामक मंडळ
# २०१८ – २०२३


**विश्वस्त** : श्रीमती विजया दिवेकर, श्रीमती अचला जोशी, श्री. प्रवीण काटवी, श्री. अभिजित गजेंद्रगडकर, श्री. अभय भालेराव.

**अध्यक्ष** :

**उपाध्यक्ष** : श्री. माधव खाडिलकर, श्री. अशोक कोठावळे, श्री. गंगाराम गवाणकर, श्रीमती रजनी जोशी, डॉ. मधुकर केशव वर्तक, श्री. जयंत सावरकर, श्री. गौतम ठाकूर

**नियामक मंडळ सदस्य** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्री. सुभाष भागवत, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. अशोक बेंडखळे, श्री. चंद्रशेखर गोखले, श्री. स्वामीकुमार बाणावलीकर, श्री. पद्माकर शिरवाडकर, प्रा. प्रतिभा बिस्वास, श्री. एकनाथ आव्हाड, प्रा. नरेंद्र पाठक, श्री. प्रमोद पवार, प्रा. प्रतिभा सराफ, श्रीमती सावित्री हेगडे, श्री. दिलीप भाटवडेकर, श्रीमती शकुंतला मुळये, श्री. विलास म्हामणकर, श्री. सुधीर ठाकूर, डॉ. अश्विनी भालेराव गांधी, श्री. रोहिदास पांगे, श्रीमती रेखा नार्वेकर, श्रीमती शैलजा म्हात्रे, श्री. मनोहर सोमण, श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर, श्री. यशवंत भिडे, डॉ. अनुपमा उजगरे, डॉ. दीपक पवार, डॉ. सुरेखा सबनीस, श्री. नारायण लाळे, श्री. अनंत दाभोळकर, श्री. सतीश सामंत, श्री. अनिल गचके, श्री. सारंग दर्शने, श्री. सिद्धार्थ पारधे, श्री. दिवाकर नातू, श्री. ज्ञानेश पेंढारकर.

**स्वीकृत सदस्य** : श्रीमती मीनाक्षी जयकर, श्री. आमोद उसपकर.

**सन्माननीय सल्लागार** : श्री. जयराज साळगावकर, श्री. दिनकर गांगल, श्री. प्रसाद कांबळी

**कार्यकारी मंडळ** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. अश्विनी भालेराव गांधी, श्री. सुभाष भागवत, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्री. प्रमोद पवार, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. मनोहर सोमण, श्री. अशोक बेंडखळे, श्री. रोहिदास पांगे, श्री. सुधीर ठाकूर, श्री. एकनाथ आव्हाड.

**स्वीकृत सदस्य** : श्री. दिलीप भाटवडेकर






नार्वेकर फार्म्स – किहीम, अलिबाग तर्फे  हार्दिक शुभेच्छा.

निसर्गरम्य हिरवागार परिसर, स्विमिंग पूल, आवडीचे भोजन, प्रशस्त बंगले, कॉटेजिस  – शिवाय खेळण्यासाठी प्रशस्त मैदान.–

मुंबईपासून फक्त एक तासाच्या अंतरावर.

कौटुंबिक समारंभ तसेच डेस्टिनेशन Wedding साठी उपलब्ध.

संपर्क साधा  ९८९२९३८१८०




मराठी भाषेविषयी आस्था असणा-या प्रत्येक मराठीप्रेमी वाचकाने वाचायलाच हवा असा ग्रंथ.
मुंबई मराठी साहित्य संघाचे अष्टदशकपर्वातील प्रकाशन.

## इये मराठीचिये नगरी.

संपादनः अशोक बेंडखळे,डॉ.उज्ज्वला मेहेंदळे
प्रस्तावना:मधू मंगेश कर्णिक

संत ज्ञानेश्वर,संत नामदेव,संत एकनाथ,मुस्लिम संत,
स्वा.सावरकर,ब्रिटिश राजवट,कुसुमाग्रज,बहिणाबाई
आणि शिलालेख यांचे मराठी भाषेला योगदान.

सहभागी लेखक: व्याख्याते डॉ.सुधाकर देशपांडे,
डॉ.अरुण टिकेकर,डॉ. यु.म. पठाण, डॉ. कुमुद गोसावी,
प्रा. म.रा.जोशी,विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर,
ज्यो.जयंतराव साळगावकर,डॉ.निशिकांत मिरजकर,
डॉ.द.ता.भोसले

प्रकाशकः मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ.भालेराव मार्ग,गिरगाव,मुंबई ४. फोन:२३८७६१५८
वितरक : ग्रंथाली, वुलन मिल म्यु.स्कूल,जे.के.सावंत मार्ग,माटुंगा(प.),मुंबई१६